# “महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याविषयी तुलनात्मक अभ्यास”

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला
शोधप्रबंध

संशोधक
श्री. देवकाते बाळासाहेब नानासाहेब

मार्गदर्शक
प्रा. डॉ. भामरे राजेंद्र पोपटराव

ऑगस्ट, २०१७

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. देवकाते बाळासाहेब नानासाहेब यांनी **"महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याविषयी तुलनात्मक अभ्यास"** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : पुणे
दिनांक :

मार्गदर्शक

(प्राचार्य डॉ. भामरे राजेंद्र पोपटराव)

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **“महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याविषयी तुलनात्मक अभ्यास”** हा शोधप्रबंध मी प्राचार्य डॉ. भामरे राजेंद्र पोपटराव यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे संशोधक

दिनांक :

(श्री. देवकाते बाळासाहेब नानासाहेब )

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, "महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याविषयी तुलनात्मक अभ्यास" submitted by Shri. Deokate Balasaheb Nanasaheb to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph. D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Interview.

Place: Pune

Signature of Research Guide

Date -

Signature of Head of the Department

Office seal

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विभागात विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी हा शोध प्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या माझ्या कार्याला अनेकांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रत्यक्षात सहकार्य मिळालेले आहे. त्याच्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

“महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याविषयी तुलनात्मक अभ्यास” या विषयावर संशोधन काम पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. भामरे राजेंद्र पोपटराव यांनी मला मार्गदर्शन केले. त्यांनी मला माझे विचार स्वतंत्रपणे मांडू दिले, पण लेखन प्रभावी होण्यासाठी तसेच त्यात सुत्रबद्धता आणण्यासाठी योग्य त्या ठिकाणी अनमोल अशा सूचना केल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मी माझे काम पूर्ण करू शकलो. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

प्राचार्य डॉ.अरविंद बुरूंगले, उपप्राचार्य डॉ.अशोक धुमाळ, एस.एम जोशी कॉलेज, हडपसर(पुणे) यांनी मला प्रबंध लिहिण्यास प्रोत्साहित केल्याबद्दल त्यांचे मी मनापासून आभार मानतो. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विभाग प्रमुख डॉ.सौ.नलिनी वाघमारे, प्रा.डॉ.सोपान शेंडे, डॉ. कुलकर्णी प्रा.डॉ. विद्यासागर, प्रा. डॉ. लहू गायकवाड, डॉ.दिपक गायकवाड, डॉ.सुमित्रा कुलकर्णी, प्रा.डॉ.राजदेव, डॉ.पाटील, प्रा.डॉ.फडतरे, प्रा.डॉ.घाडगे, प्रा.डॉ.कुंभोजकर, प्रा.डॉ.किशोर गायकवाड, डॉ.अभंग, प्राचार्या डॉ.शोभा इंगवले, प्रा.डॉ.मोकाटे, प्रा.सालके, प्रा.डॉ.दत्तात्रय कोरडे, डॉ. वैद्य यांनी बहुमोल मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार.

एस.एम जोशी कॉलेज, हडपसरचे प्रा.डॉ.डोंगरे, प्रा.लंगोटे, प्रा.डॉ.चव्हाण, प्रा.डॉ.काळेल, प्रा.घोडके, प्रा.कांबळे, प्रा.जरे, प्रा.डॉ.काळे, प्रा.डॉ.रोडगे, प्रा.गायकवाड, प्रा.लोखंडेतसेच ग्रंथपाल सुप्रिया नवले ग्रंथालयातील सर्व शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांनी मला सहकार्य केल्याबद्दल त्यांचेही आभार.

माझ्या संशोधन कार्यात माझ्या कुटुंबाचे फार मोठे योगदान आहे. माझी पत्नी सौ.अनिता देवकाते हिची प्रेरणा, प्रोत्साहन, माझी कन्या कु.हर्षदा देवकाते व चिरजींव हर्षवर्धन देवकाते यांनीही मला खूप मदत केली आहे. या सर्वाचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

शोधप्रबंधाचे सुबक व आकर्षक टायपिंग करून देण्याचे काम समृद्धी टायपरायटींग यांनी करुन दिले. त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो आणि धन्यवाद देतो.

अभ्यासक
श्री. देवकाते बाळासाहेब नानासाहेब

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | प्रतिज्ञापत्र | II |
| ● | प्रमाणपत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | प्रस्तावना व संशोधनाची रूपरेषा | १ ते १९ |
| | संशोधनाचा विषय, संशोधनाची उद्दिष्टे संशोधनाचे महत्त्व | |
| | संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा : | |
| | सैद्धांतिक पार्श्वभूमी, संशोधन पद्धती, | |
| | इतिहास संशोधनाचे प्रकार, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, | |
| | प्रकरण नियोजन, | |
| २. | एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राची स्थिती | २० ते ६० |
| ३. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण | ६१ ते ११६ |
| ४. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा आढावा | ११७ ते १९७ |
| ५. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांचे संस्थात्मक कार्य | १९८ ते २६७ |
| ६. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज याच्या सामाजिक कार्याचा तुलनात्मक अभ्यास | २६८ ते २९८ |
| ७. | उपसंहार | २९९ ते ३२३ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३२४ ते ३३१ |
| | प्रश्नावली | ३३२ ते ३३५ |
| | परिशिष्टे | ३३६ ते ३४३ |
| | नकाशे | ३४४ |
| | छायाचित्रे | ३४५ ते ३५७ |

# प्रकरण पहिले

## प्रस्तावना व संशोधनाची रूपरेषा

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून भारतात राष्ट्रवादाचे समाज व धर्म सुधारणेचे वारे वाहू लागले होते. राजा राममोहन रॉय हे आधुनिक भारताचे अध्वर्यू होते समाजातील अनिष्ठ रूढीविरूद्ध त्यांनी आवाज उठविला. यवनांची सत्ता महाराष्ट्रावर असताना या यवनांनी हिंदू लोकांवर जुलूम, अत्याचार, हिंदू स्त्रियांची अब्रु लुटली जात होती. यवनी सत्तेने आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. अशा धामधुमीच्या काळात सर्वत्र अराजकता माजली होती. लोकांमध्ये एकोपा नव्हता. सामाजिक विषमता, जातिभेद, अस्पृश्यता इ. बाबी प्रकर्षाने जाणवत होत्या. बाराव्या व तेराव्या शतकामध्ये संतांची कामगिरी उल्लेखनिय होती. त्यांच्या वाणीने प्रबोधन व साहित्याने लोकांना जागृत करण्याचे महान कार्य केले. महाराष्ट्रात मोठया प्रमाणात जात पाळली जात होती. कर्मकांड पूजा–अर्चा तंत्र–मंत्र, जप–तप यांना महत्त्व प्राप्त झाल्यामुळे समाज दरिद्री जीवन जगत होता. अशा स्थितीत महाराष्ट्रात समाजसुधारकांची मालिका तयार झाली. आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, विष्णूशास्त्री पंडित, दादोबा पांडुरंग तर्खडकर, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा फुले, शाहू महाराज, महर्षी शिंदे, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारक निर्माण झाले. या समाजसुधारकांनी आपल्या साहित्यातून लेखनीतून समाजाला जागृत केले. त्यांनी शिक्षणास अग्रक्रम देवून वंचित मागासलेल्या समाजासाठी शाळा सुरू केली. वसतिगृह स्थापन केले.

बहुजन समाज हा सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व आर्थिक सुधारणांपासून वंचित होता. या वर्गाला हीन स्वरूपाची कामे करावी लागत होती. समाजात चार वर्ण अस्तित्त्वात होते. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी वर्णव्यवस्था समाजात होती. वरील तीन वर्ग चांगले जीवन कंठीत होता. परंतु चौथा वर्ण शूद्र यांस हलकी, कमी प्रतीची कामे करावी लागत होती. शिक्षणापासून हा वर्ग वंचित होता. दारिद्र्य हे त्यांच्या पाचवीला पुजले होते. या समाजास शैक्षणिक व आर्थिकदृष्टया भक्कम केल्याशिवाय तो आपल्या पायावर उभा राहणार नाही. याची जाणीव अनेक समाजसुधारकांना झाली.

महात्मा फुले यांनी प्रथमतः बहुजन समाजाच्या हातात लेखणी देण्याचे काम केले. यासाठी इ.स.१८५१ मध्ये अस्पृश्य समाजासाठी वेताळ पेठेत पहिली शाळा उघडली. चौथी इयत्तेमध्ये शिकणाऱ्या मातंग समाजातील मुक्ता साळवी या मुलीने महार, मांग या जातीवर निबंध लिहिला. अहमदनगरच्या साप्ताहिकामध्ये १८४२ मध्ये ख्रिश्चन मिशनऱ्याने तो छापला. यातून मुलीची विचारशक्ती दांडगी होती, हे दिसते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे अंग आहे. हे ओळखून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य समाजासाठी शिक्षणाची दारे खुली केली. यासाठी त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' (निराश्रीत साहयकारी मंडळी) या संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करणे व या समाजातील लोकांना नोकऱ्या मिळवून देणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्टे होते. समाजात अनिष्ट प्रथा, जातिभेद, अस्पृश्यता, मुरळी सोडणे, देवदासी या प्रथा होत्या. या नष्ट करण्यासाठी महर्षी शिंदे यांनी जातीने लक्ष देवून या प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. यासाठी सरकार दरबारी कायदा करण्याचा आग्रह धरला होता.

राजर्षी शाहू महाराज यांची ख्याती महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभर पसरली होती. कोल्हापूरच्या करवीर नगरीचे ते संस्थानिक राजे होते आपल्या संस्थानात अस्पृश्य वर्गातील लोकांना सामावून घेतले गेले. अस्पृश्य, वंचित समाजाला सामाजिक, धार्मिक, आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचा एक मार्ग म्हणजे शिक्षण होय. या समाजातील लोकांना शिक्षण घेतल्याशिवाय ते सुधारणार नाहीत. त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचे कार्य कोणी केले असेल तर ते राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. २५ जुलै १९१७ रोजी त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा ठराव आपल्या दरबारात मंजूर केला.

राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात असा आदेश काढला की, ८ सप्टेंबर १९१७ च्या आदेशान्वये शाहू महाराजांनी ३० सप्टेबर १९१७ पासून कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. प्राथमिक शिक्षण सुरू करण्यात येईल आणि ते सक्तीचे व मोफत असेल. असा फतवा काढला. सन १९१९ पासून त्याची अतिशय काटेकोरपणे अमंलबजावणी केली गेली. मुला–मुलींना शाळेत पाठविण्यासंबंधीचे आदेश पालक व गाव कामगार यांना देण्यात आले. इ.स.१९०२ मध्ये कोल्हापूर संस्थानात नोकरीसाठी राखीव जागा ठेवण्याचा कायदा केला. अस्पृश्यासाठी राजदरबारात राखीव जागा ठेवल्या.

संस्थानाचा विचार न करता त्यांनी देशाचा विचार केला होता. यावरून त्यांच्या अंगी असलेला दूरदर्शीपणा दिसून येतो.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाबाबतचे उचललेले क्रांतिकारक स्वरूपाचे पाऊल होते. याची कल्पना येते. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य जसे महत्त्वाचे आहे. तसेच अस्पृश्य उद्धाराचे कार्य ही महत्त्वाचे आहे. अस्पृश्य जाती ही भारतीय समाजातील अत्यंत अभागी असा घटक होता. वर्षानुवर्षे हा वर्ग हीन जीवन जगत होता. त्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते. त्यांचे माणूसपणाचे हक्कही नाकारण्यात आले होते. अस्पृश्यांची स्थिती गुलामापेक्षाही वाईट होती. समाजातील वरिष्ठ जातींच्या लोकांची सेवा करण्यासाठीच अस्पृश्यांचा जन्म झाला आहे. असा समज येथील वरिष्ठ जातींनी करून घेतला होता. त्यामुळे अस्पृश्य जातीचे लोक सामाजिक विषमता, आर्थिक शोषण व अन्याय याचे बळी ठरले. भारतीय समाजात सर्वात जास्त उपेक्षित, वंचित वर्ग अस्पृश्यांचा होता. ब्रिटिश राजवटीच्या काळात अस्पृश्यांना प्रथमतः वरिष्ठ जातीच्या बरोबरीने काही अधिकार मिळाले. शिक्षणाची संधी आणि सरकारी नोकरीत प्रवेश मिळाल्याने त्यांचे अठरा विश्व दारिद्र्य व गुलामगिरी नष्ट होण्यास होईल.

महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचे शाहू महाराजांना आकर्षण वाटत होते. आपल्या धर्मातील बहुजन समाज मागासलेला असून अस्पृश्य समाजाची अवस्था अतिशय दयनीय अशी होती. शाहू महाराजांनी ६ जुलै १९०२ रोजी एक आदेश काढून मागासलेल्या वर्गासाठी नोकऱ्यांमध्ये पण जागा राखीव ठेवल्या जातील, अशी घोषणा केली. १९११ मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. डॉ.कोलते म्हणतात की, जोतिबा फुले यांच्या मृत्यूनंतर खंड पडलेला सत्यशोधक चळवळीच्या स्फुलिंगास शाहू महाराजांनी फुंकर घातली. स्वतःचे धर्मकृत्ये पुरोहिताशिवाय स्वतःच करावीत. असे सत्यशोधक समाजाचे एक सूत्र होते. ब्राम्हणेत्तरामधून पुरोहित निर्माण व्हावेत यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी एक शाळा काढली.

बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अलौकिक स्वरूपाचे कार्य केले. खेडयापाडयातून राहणाऱ्या लोकांना आपली मुले शहरात शिकविता

यावीत यासाठी प्रत्येक जातीधर्माचे वसतिगृह काढली. यामध्ये अस्पृश्य मुलांच्या शिक्षणासाठीही वसतिगृह काढली होती.

या अस्पृश्य समाजाला दिशा(शिक्षण) देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. प्रत्यक्ष कार्याला सुरूवात केली. त्याचप्रमाणे राजर्षी शाहू महाराजांनी ही परंपरा चालू ठेवून मागासलेल्या समाजाची उन्नती करणे हे राजर्षी शाहू महाराजांनी आपले जीवन कार्य मानले होते. भेदाभेद, सामाजिक विषमता, दुर्बल घटकावर होणारा अन्याय याविषयी त्यांना आत्यंतिक चीड होती. या वर्गावरील अन्याय धुडकावून लावण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर केला. अस्पृश्य वर्गाला वरिष्ठ वर्गाबरोबर स्थान प्राप्त करता यावे यासाठी शिक्षणाची गुरूकिल्ली या वर्गाला दाखविली. गरज ओळखून १९०७ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी कोल्हापूरात एक वसतिगृह सुरू केले. या वसतिगृहास मुंबई इलाख्याचा गव्हर्नर जनरलची दिवंगत कन्या ‘मिस व्हायोलेट क्लार्क’ हिचे नाव देण्यात आले. कारण तिने स्वतः अस्पृश्योद्धाराच्या कार्यात भाग घेतला होता. राजर्षी शाहू महाराजांनी या वसतिगृहासाठी एक इमारत उपलब्ध करून दिली होती. त्याचबरोबर अनुदान ही मंजूर केले होते. तसेच व्हिक्टोरिया मराठा बोर्डिगमध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय करण्यात आली होती. या मागासलेल्या विद्यार्थ्यांना निरनिराळया सवलती देवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात राजर्षी शाहू महाराजांनी ओढून घेतले.

अशाप्रकारे विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे.

# संशोधन प्रबंधाची मांडणी

## १.१ प्रास्ताविक –

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात जे समाजसुधारक होऊन गेले त्यामध्ये महात्मा फुले, गोपाळ हरी देशमुख, न्या.रानडे, गोखले, भांडारकर, म.गांधीजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य समाजासाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. या अस्पृश्य समाजाला ज्ञानाचा किरण दाखविला. शिक्षण हे पवित्र कार्य असून या शिक्षणाचा उपयोग बहुजन समाजातील लोकांना व्हावा, यासाठी महर्षी शिंदे यांना 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना करण्यात आली.

## १.२ संशोधनाचा विषय :

**"महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याविषयी तुलनात्मक अभ्यास"**

## १.३ संशोधनाची उद्दिष्टे :

१) तत्कालीन राजकीय, सामाजिक स्थित्यंतराचा आढावा घेणे.

२) एकोणीसाव्या, विसाव्या शतकातील समाज सुधारणा चळवळींचा ऐतिहासिक मागोवा घेणे.

३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

४) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या साहित्याच्या आधारे त्यांचे विविध क्षेत्रातील विचार प्रकाशात आणणे.

५) दलित वर्गाच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

६) आधुनिक शिक्षणाच्या प्रबोधनामुळे समाजाचा शिक्षणविषयक बदलेल्या भूमिकेचा अभ्यास करणे.

७) अस्पृश्य/मागासलेल्या वंचित लोकांसाठी शिक्षणाची द्वारे खुली करून देण्यासाठी शैक्षणिक संस्थांची स्थापना करणे इ. उद्दिष्ट डोळयासमोर ठेवले आहे.

## १.४ संशोधनाचे महत्त्व :

एकोणिसाव्या व विसाव्या शतकाच्या कालखंडातील भारतीय समाज अनेक बंधनामध्ये अडकला होता. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अस्पृश्यता, जातिभेद इ.

घटकांचा पगडा समाजामध्ये होता. उच्च वर्गातील समाज शिक्षण घेत असत. परंतु सर्वसामान्य अस्पृश्य जातीतील, पददलित समाज शिक्षणापासून वंचित होता. अंधारामध्ये तो चाचपडत जीवन जगत होता. त्यांच्यात दीप लावण्याचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केले.

या अस्पृश्य समाजाला न्याय हक्काने भांडण्यासाठी शिक्षणाची सोय निर्माण करून दिली. या दोन महान व्यक्तींचे अस्पृश्य समाजासाठी केलेले कार्य मोलाचे असल्यामुळे या संशोधन विषयाचे महत्त्व अधिक आहे.

### १.५ संशोधनाची गृहितके :

१) पाश्चात्यांच्या आगमनामुळे आधुनिक शिक्षणाचा परिचय भारतीयांना झाला. पश्चिमेकडील ज्ञान, विज्ञान, शिक्षण यांचा पूर्वेकडील संस्कृतीशी संयोग झाला. मध्ययुगीन मूल्य जावून आधुनिकता प्रस्थापित झाली.

२) महात्मा फुले यांनी वंचितासाठी सुरू केलेल्या शैक्षणिक चळवळीचा परिचय करून देता येईल.

३) एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील समाज सुधारणा चळवळीत ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर तसेच मराठा व मराठेतर भेद दिसून येतात.

४) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत वंचितांचा सामाजिक व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी केलेल्या कार्याची ओळख करून देता येईल.

५) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या लेखनाच्या/साहित्याच्या माध्यमातून समाज सुधारणेचे परखड विचार मांडले. समाज परिवर्तन घडविण्याची क्षमता त्यांच्या विचारामध्ये कशी आहे याची जाणीव करून देता येईल.

६) अस्पृश्य, पद्दलित, मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण महत्त्वाचे आहे, हे ओळखून शिक्षण संस्थांची स्थापना केली. त्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून संस्थात्मक व रचनात्मक कार्याचे जाळे महाराष्ट्रात कसे विणण्यात आले याचा परिचय करून देणे शक्य झाले आहे.

७) या थोर महात्म्यांनी स्वतःच्या कृती उक्तीत अंतर पडू न देता केलेल्या अभूतपूर्व कार्याचा परिचय करून देता येईल. त्यासाठी त्यांना सामाजिक अवहेलना सहन करावी लागली. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज हे कृतीशील समाजसुधारक होते. पोथीनिष्ठ समाजसुधारक नव्हते. काळाच्या पुढे जावून समाजासमोर आदर्श ठेवला. सामाजिक क्रांती घडवून आणली. बुद्धी प्रामाण्य जपूण त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात ज्ञानोदयाचे युग (Age Of Enlightenment) सुरू झाले.

८) धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील स्त्रियांची दुरावस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी केलेल्या रचनात्मक कार्याची ओळख करून देता येईल.रचनात्मक कार्य केले आहे. स्त्री दास्य, मुक्ती समानता या समस्यांची चिकित्सा प्रभावीपणे सुरू झाली.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

एकोणीसावे व विसावे शतक हे धर्मसुधारणा चळवळीचे शतक असल्याने तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक सुधारणा क्षेत्रात अनेक समाज सुधारक पुढे आलेले आहेत. बहुजन समाजातील एक कर्ता म्हणून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याला मर्यादा पडतात. तसेच त्यांनी ज्या दलित समाजाच्या उद्धारासाठी जे कार्य केलेले आहे ते मौलिक आहे.

मूळ ऐतिहासिक साधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध झालेली दिसत नाहीत. त्यामुळे समकालीन व्यक्तींची चरित्रे, वर्तमानपत्रे इ.च्या आधारे विषयाची मांडणी करावी लागते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक कार्याचा घेतला आहे.

## १.७ सैद्धांतिक पार्श्वभूमी :

मध्ययुगात अनियंत्रित व धार्मिक अधिष्ठान असलेली राजेशाही अस्तित्वात होती. या काळात धर्माचे स्तोम, राजसत्तेचे प्राबल्य वाढले होते. स्त्रियांना हीन वागणूक दिली जात होती. राजाच्या हातात सत्ता केंद्रित झाली होती. राज्यविस्तारासाठी राजे शेजारच्या राज्यावर आक्रमण करून त्यांना पराभूत करीत असत. त्यांची संपत्ती लुटून आणत असत. त्याचबरोबर पराभूत राज्यातील स्त्रियांना पळवून आणून त्यांची अब्रू लुटली जात असे. या हिंदू स्त्रीला

कोणाकडे ही आपले गाऱ्हाणे मांडता येत नसे. तिच्या गळयाभोवती गुलामगिरीचा फास होता. स्त्री समाजातील दुय्यम स्थान, गौण अस्तित्व असलेली अबला होती.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकाच्या कालखंडात भारतीय समाजात धार्मिक कर्मकांडे, पूजा–अर्चा, अंधविश्वास, स्त्री–पुरूष भेद इत्यादी सर्व प्रकर्षाने जाणवत होता. समाजात अस्पृश्यता, जातपात मोठया प्रमाणत पाळली जात होती. अस्पृश्यता निवारणासाठी सामुदायिक व संघटीत अशा परिस्थितीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या या सामाजिक सुधारणा मौलिक आहेत.

महर्षी शिंदे यांनी १८ आक्टो. १९०६ रोजी मुंबई 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'(निराश्रीत साहाय्यकारी मंडळ) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेची उद्दिष्टे अशी होती की, अस्पृश्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण करणे, स्पृश्य समाजाचे परिवर्तन करणे तसेच अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे, सार्वजनिक धर्माची शिकवण देणे इ. होते. बहुजन समाजातील लोकांना शिक्षणाची संधी मिळवून दिली. वर्षानुवर्षे हा समाज अंधःकारात, गुलामगिरीचे जीवन जगत होता. त्यांच्यात शिक्षणाच्या रूपाने ज्ञानाची ज्योत पेटविण्याचे महान कार्य महर्षी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या विद्वानांनी केले आहे.

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात वंचित, उपेक्षित, शोषीत, दलित, शेतकरी, कष्टकरी, कामगार व महिला या वर्गाच्या दुःखाला वाचा फोडण्याचे प्रथम काम महात्मा फुले यांनी केले आहे. त्यांना वंचितांचा (सबाल्टर्नचा) नेता  असे संबोधले जाते. महर्षी वि.रा. शिंदे यांनी अस्पृश्यता १९०७ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात हा प्रश्न काँग्रेस श्रेष्ठीपुढे लावून धरला होता.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूरमधील करवीर संस्थानात प्रथम अस्पृश्यांना सेवेत सामावून घेण्यापाठीमागे राजर्षी शाहू महाराजांची या अस्पृश्य वर्गाविषयी असलेली सहानुभूती व कळवळा दिसून येतो. चित्पावन ब्राह्मणांनी त्यास विरोध दर्शविला. परंतु राजर्षी शाहू महाराजांनी त्यांचा विरोध मोडून काढला. त्यासाठी  त्यांना यांचा रोष पत्करावा लागला. शिक्षणाचे महत्त्व ओळखून राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात मुला–मुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे असा आदेश ३० सप्टेंबर १९१७ रोजी काढला होता. प्राथमिक शाळेबरोबरच माध्यमिक, उच्चमाध्यमिक व इतर व्यवसायिक शाळेची निर्मिती करण्यात

आली. यामुळे सर्व समाजातील लोकांना याचा फायदा झाला. समाजातील अस्पृश्य, मागासलेल्या लोकांना शिक्षण घेता यावे, यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी 'मिस क्लार्क' हिच्या नावाने वसतिगृहे सुरू केले. या महिलेस अस्पृश्यांविषयी तळमळ होती. आपल्या हयातीत तिने या घटकाविषयी थोडे बहुत कार्य केले होते. अस्पृश्य जातीतील विद्यार्थ्यांना राहण्याची सोय व्हावी यासाठी शाहू महाराजांनी व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग सुरू केले होते. निवासी आश्रमशाळा महाराजा सयाजीराव गायकवाडांनी सुरू केल्याने, मागासवर्गीयांसाठी वसतिगृहे राजर्षी शाहू महराजांनी सुरू केलेत. निराश्रीतांसाठी अनाथालये व शाळा वि.रा.शिंदे यांनी सुरू केल्या. ज्यांच्या समाज जीवनात अंधकार होता. तेथे नव्या विचारांचा ज्ञानाचा दिवा पेटवला.

समाजात ज्या चालीरीती, रूढी पंरपरा, जातिभेद व गुन्हेगार इत्यादी सुरु होत्या. समाजाला लागलेली एक प्रकारची कीड होती. ही कीड नष्ट करण्यासाठी वि.रा. शिंदे यांनी अहोरात्र कष्ट सोसले. अनेक अवहेलना सहन कराव्या लागल्या. परंतु त्यांनी आपले काम अखंडपणे चालू ठेवले. या कामात भगिनी जनाक्का शिंदे यांचाही सहभाग होता.

महर्षी शिंदे हे एक समाजसुधारक होते. त्याचबरोबर एक संशोधक आणि लेखकही होते. अस्पृश्य पूर्वी कोण होते, याचा शोध घेवून मनुस्मृतीमधील अस्पृश्यतेचे स्वरूपही त्यांनी उलगडून दाखविले आहे. सावकारांकडून व ब्रिटिश सरकारकडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. 'बळीचे राज्य' देशात यावे अशा पद्धतीने शेतकऱ्यांनी वर्तन करावे, असा संदेश त्यांनी आपल्या लेखनातून केला आहे.

## १.८ संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन :–

प्रा.डॉ.येळकर सतिश व्यंकटराव यांनी सत्यशोधक चळवळीचे समाज विकासातील योगदान पुणे शहर एक अभ्यास, हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे मार्च २००९ मध्ये सादर करून पीएच.डी.ही पदवी मिळविली. या शोधप्रबंधामध्ये केवळ पुणे शहरातील सत्यशोधक समाजाविषयीची सविस्तर माहिती दिलेली आहे. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याही कार्याचा थोडयाफार प्रमाणात कार्याचा उल्लेख आलेला आहे. परंतु मी माझ्या शोधप्रबंधातून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

प्रा.डॉ.खणे बी.डी. यांनी श्री शाहू अ स्टडी ऑफ सोसिओ–पॉलिटीकल रिफॉर्मस(१८८४–१९२२) हा शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन १९७८ मध्ये

सादर केला होता. या शोधप्रबंधामध्ये शाहू महाराजांच्या सामाजिक व राजकीय कार्याविषयीची माहिती नमूद केलेली आहे. ही माहिती सविस्तरपणे मांडलेली आहे. मी माझ्या शोधप्रबंधात राजर्षी शाहू महाराजांची राजकीय, सामाजिक व इतर माहिती देऊन त्यांच्या कार्याची तुलना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याशी केलेली आहे.

प्रा.डॉ.नलवडे एम.डी. यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन १९७८ मध्ये शाहू ऑफ कोल्हापूर : सोशिअल रिव्होल्युशनरी(१८७४–१९२२) हा शोधप्रबंध सादर केला होता. यामध्ये राजर्षी शाहू महाराजांची केवळ सामाजिक माहिती सविस्तर देण्यात आलेली आहे. तर प्रा.डॉ.पवार एम.जे. यांनी राजर्षी शाहू छत्रपती ॲण्ड द ब्रिटिश पॅरामाऊंट  इन इंडिया हा शोधप्रबंध २००८ मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पीएच.डी.पदवीसाठी सादर करण्यात आलेला होता. यामध्ये राजर्षी शाहू महाराज व ब्रिटिशांचे सर्वश्रेष्ठ अधिकार याविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. मात्र मी माझ्या शोधप्रबंधात राजर्षी शाहू महाराजांच्याबरोबरच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचेही कार्य देऊन त्यांच्या कार्याचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

प्रा.डॉ.जाधव अर्चना श्रीराम यांनी कोल्हापूर वसतिगृह चळवळीचा ऐतिहासिक अभ्यास हा विषय घेऊन सन जून  २०११ मध्ये शिवाजी विद्यापीठात पीएच.डी.ची पदवी मिळविलेली आहे. या शोधप्रबंधात राजर्षी शाहू महाराज यांनी स्थापन केलेल्या वसतिगृहाबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. ही वस्तीगृह सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी स्थापन केलली होती. वसतिगृहाच्या माध्यमातून त्यांनी फार मोठे समाजसुधारणेचे कार्य केले होते. हे त्यातून स्पष्ट होते. मात्र मी माझ्या शोधप्रबंधात त्यांच्या वसतिगृह कार्याबरोबरच राजर्षी शाहू महाराजांचे इतरही सामाजिक व आर्थिक कार्य सविस्तरपणे देऊन त्याची तुलना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याशी केलेली आहे.

प्रा.डॉ.कोरडे डी.डी. यांनी ‘वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (इ.स.१९०० ते २०००) हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे आक्टोबर २०१२ मध्ये पीएच.डी.च्या पदवीसाठी सादर केला होता. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे वाईच्या ब्राम्हो समाजातील कार्य सविस्तरपणे दिलले आहे. परंतु मी माझ्या शोधप्रबंधात महर्षी

विठ्ठल रामजी शिंदे यांचे सर्वच ब्राम्हो समाजाचे कार्य सविस्तर देऊन इतरही कार्याचा समावेश केलेला आहे.

याशिवाय महर्षी शिंदे विठ्ठल रामजी यांनी स्वतः लिहिलेले माझ्या आठवणी व अनुभव हे आत्मचरित्र १९९९ मध्ये प्रकाशित केले असून त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आजोबापासून ते त्यांचे बालपण, शिक्षण, धार्मिक व सामाजिक कार्य स्पष्टपणे मांडलेले आहे. पवार गो.मा.यांनी संपादित केलली महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची रोजनिशी यामध्ये फर्ग्युसन कॉलेज, इंग्लंड(मॅचेस्टर) व येरवडा कारागृह येथील दैनंदिनी घडणाऱ्या घटनांची माहिती तपशिलवारपणे मांडलेली आहे. पवार गो.मा. यांनी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य' हे पुस्तक लिहिलेले आहे. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे संपूर्ण जीवन कार्य रेखाटले आहे. तसेच पवार गो.मा.यांनी संपादित केलेले 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय' खंड १ ला, 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन आणि चिंतन', हा ग्रंथ २००९ मध्ये प्रकाशित झालेला आहे. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे चरित्र रेखाटले आहे. डॉ.शंकरराव कदम यांनी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य व कार्य' हे पुस्तक २००० मध्ये प्रकाशित केले असून त्यामध्ये धर्म व समाज, शैक्षणिक व राजकीय यासंबंधीचे विचार मांडलेले आहेत.

डॉ.जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेले 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', हा ग्रंथ त्यांनी २००७ मध्ये प्रकाशित केलेला आहे. यामध्ये त्यांनी राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र दिलेले आहे.साळुंखे पी.बी.यांनी 'राजर्षी शाहू महाराज गौरव ग्रंथ' सन १९७६ मध्ये प्रकाशित केला असून यामध्ये शाहू महाराजांचे जीवन चरित्र रेखाटले आहे. सूर्यवंशी कृ.गो. यांनी 'राजर्षी शाहू राजा व माणूस' हा ग्रंथ १९८४ मध्ये प्रकाशित केला असून यामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या जन्मापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यतच्या सर्व कार्याची सविस्तर माहिती दिलेली आहे. प्रा.डॉ.शिरीष पवार यांनी 'राजर्षी शाहू महाराज विचार आणि कार्य' हे पुस्तक २०१२ मध्ये प्रकाशित झालेले असून त्यामध्ये शाहू महाराजांचे सर्व क्षेत्रातील विषयासंबंधीचे विचार सविस्तरपणे मांडलेले आहेत. पचिंद्रे श्रीराम ग. यांनी 'शाहू' या नावाचे पुस्तक २०१० मध्ये प्रकाशित केले असून त्यामध्ये शाहू महाराजांचे जीवन कार्य मांडलेले आहे. डॉ.जाधव रमेश यांनी 'शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक' एक शोध हे पुस्तक २००७ मध्ये प्रकाशित केलेले आहे. यामध्ये

शाहू छत्रपती व लोकमान्य टिळक यांच्या कार्याची तुलना केलेली आहे. चव्हाण रा.ना. यांनी 'राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य' हे पुस्तक सन २०१३ मध्ये लिहिलेले असून यामध्ये शाहू महाराज यांचे सामाजिक विचारधारा ही कशी होती व सामाजिक कार्य याविषयी सविस्तरपणे माहिती दिलेली आहे. कीर धनंजय यांनी 'राजर्षी शाहू छत्रपती' हे पुस्तक २०११ मध्ये लिहिलेले असून यामध्ये शाहू महाराजांचे जीवन व कार्य याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे.

## १.९ संशोधन पद्धती :

इतिहास पुनर्लेखनाची आवश्यकता एखाद्या ऐतिहासिक घटनेची कारणमींमासा करण्यासाठी ऐतिहासिक घटनेचे स्पष्टीकरण देण्यासाठी त्या घटनेमागील कार्यकारणभाव स्पष्ट करण्यासाठी इतिहासकार करीत असतो अनेक कारणांमधून एखाद्या  कारणाला अग्रक्रम देऊन त्याआधारे कारणाची मालिका  तयार करीत असतो. त्यासाठी इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक ठरते. त्यामुळे इतिहास लेखनात एकाच गोष्टीकडे इतिहासाच्या अशा पुनर्लेखणामुळे एकाच गोष्टीकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात याचा प्रत्यय येऊन दृष्टी व्यापक होते.

## १.१.१० इतिहास संशोधनाचे प्रकार :

सदर संशोधन प्रकल्पासाठी संशोधकाने ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. संशोधन कार्य तीन प्रकारचे आहे.

### १) कथनात्मक किंवा निवेदनात्मक :

एखादया घटनेबाबत प्रसंगाबाबत अगर विषयासंबधी नवी माहिती ती अज्ञात असलेली माहिती मिळवून ती सुसंबध्द रीतीने वाचकापुढे मांडणे हा संशोधनाचा पहिला प्रकार आहे. ह्याचा मूळ उद्देश गतकालीन अज्ञात बाबींवर प्रकाश झोत टाकणे, गतकाळासंबधीच्या ज्ञानात नवी भर टाकणे, ज्ञानाचे नवे दालन खुले करणे हा असतो. या नव्या माहितीचा उपयोग संशोधन करण्यासाठी व त्याच्या सुसंगत मांडणीवर भर असतो.

### २) विश्लेषणात्मक लेखन :

नवी माहिती प्रकाशात आणण्यापेक्षा उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीचा ऐतिहासिक साधनांचा नव्या दृष्टिकोनातून अभ्यास करून प्रस्थापित प्रमेयाहून भिन्न प्रमेय मांडणे हा उद्देश असतो. उपलब्ध साधनसामुग्रीचे पुनःपरीक्षण करून प्रचलित मतापेक्षा वेगळा

निष्कर्ष काढण्याचा असा संशोधनाचा प्रयत्न असतो. यात नव्या साधनांच्या शोधाला स्थान नसते. असे नव्हे अनेकदा नवी सामुग्री, नवा पुरावा हाती लागल्यामुळे नवे प्रमेय मांडण्यास पुष्टी मिळते. मात्र अशा संशोधनात संपूर्ण भर नव्या पुराव्यांच्या मांडणीवर नसतो तर उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधकांचा हेतू असतो.

**३) मूलगामी संशोधन :**

हा प्रकार अधिक मौलिक व तात्त्विक स्वरूपाचा आहे. इतिहास विषयाच्या सखोल व प्रदीर्घ चिंतनातून त्याबाबत काही नवे सिध्दांत मांडण्याचा त्यात प्रयत्न असतो. यात उपलब्ध ऐतिहासिक माहितीचा साधन सामुग्रीचा वापर करण्यात येत असला तरी त्यातून काही सर्वसामान्य मुलगामी सिध्दांत मांडले जातात. त्यामुळे इतिहास विषयाला नवी तात्त्विक बैठक दिली जाते. अशा संशोधनासाठी केवळ एखादया घटनेचा अगर व्यक्तीच्या कार्याचा अभ्यास पुरेसा नसतो, तर दीर्घ कालखंडातील घटना प्रवाहाचा अगर गतकालीन मानवी जीवनाच्या विविध घटकांचा अभ्यास करून त्यातील अंतस्थसूत्र उलगडून दाखविण्याचा संशोधकाचा प्रयत्न असतो.

इतिहास संशोधनाचे वरीलप्रमाणे विविध प्रकार असले तरी सदर संशोधनाचा विषय विश्लेषणात्मक आणि मूलगामी संशोधन या प्रकारात मोडतो. हे संशोधन पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक साधनसामुग्री संकलन तसेच मुलाखती घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे राजर्षी शाहू महाराज यांनी स्थापन केलेल्या शाळा, वसतिगृहे येथील नामवंत अशा व्यक्तीच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे प्राथमिक साधने म्हणून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'माझ्या आठवणी व अनुभव', 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' आणि 'राजर्षी शाहू महाराज यांचे जीवन व कार्य', त्याचबरोबर सरकारी कागदपत्रे, महर्षी शिंदे यांचे रोजनिशी शैक्षणिक अहवाल, ब्रिटीश अधिकाऱ्यांचे अस्पृश्य, वंचित, उपेक्षित वर्गासाठी केलेल्या सामाजिक सुधारणांचा अहवाल, विविध समाजसुधारकांच्या कार्याच्या नोंदी संशोधन कालखंडातील वृत्तपत्रे, नियतकालिके विविध शैक्षणिक संस्थांचे अहवाल यांचा वापर केलेला आहे. गरजेनुसार दुय्यम साधने व संशोधन कालखंडातील फोटो, त्याचबरोबर दृकश्राव्य महर्षी शिंदे साधनांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्यावरील चित्रफीत इत्यादींचा वापर आवश्यकतेनुसार केला गेला आहे.

## १.११ प्रकरण नियोजन

या शोधप्रबंधात एकूण सात प्रकरणात विभागणी केलेली आहे. ती प्रकरणे पुढीलप्रमाणे

**प्रकरण पहिले**

**प्रास्ताविक व संशोधनाची रूपरेषा**

या प्रकरणात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याची ओळख व्हावी यादृष्टीने प्रास्ताविकात माहिती दिलेली आहे. त्यातून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक कार्यात त्यांनी ज्या संस्थेद्वारे हे कार्य केले होते त्या संस्थेविषयीची माहिती दिलेली आहे.

संशोधनाची रूपरेषा यामध्ये संशोधन समस्या किंवा संशोधनाचा विषय, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, सैद्धांतिक पार्श्वभूमी, संशोधन पद्धती, इतिहास संशोधनाचे प्रकार यामध्ये १) कथनात्मक किंवा निवेदनात्मक २) विश्लेषणात्मक लेखन ३) मूलगामी संशोधन इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण दुसरे – एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राची स्थिती**

या प्रकरणात एकोणिसाव्या शतकातील राजकीय स्थिती, सामाजिक स्थिती, धार्मिक आर्थिक स्थिती याची सविस्तर माहिती दिलेली आहे. राजकीय स्थितीमध्ये राष्ट्रीय सभेच्या स्थापनेचा इतिहास दिलेला आहे. राष्ट्रीय सभेत प्रारंभी मवाळवाद्यांची सत्ता होती. पुढे बंगालची फाळणी झाल्यावर ही राष्ट्रीय सभा जहालवादाकडे झुकली. लोकमान्य टिळकांनी आपली चतुःसूत्री वापरून राष्ट्रीय चळवळीस गती देण्याचे काम केले. त्यासाठी स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण याद्वारे स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याची सविस्तर माहिती दिलेली आहे. सामाजिक परिस्थितीमध्ये एकोणीसाव्या शतकात समाजात जातिप्रथा, अस्पृश्यता, बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवा विवाह, बहुपत्नीत्व, सतिप्रथा इत्यादी अनिष्ट प्रथा होत्या. आचार, विचार स्वातंत्र्य यांना समाज जीवनात स्थान नव्हते. स्त्री शूद्रावर लादलेली बंधने यांना धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. विविध जाती जमातीत विभागलेला समाज श्रेष्ठ कनिष्ठतेच्या संकल्पनेतून दुभंगला व रुढी परंपरा यांचे वर्चस्व असलेला समाज विस्कळीत बनला होता. धार्मिक परिस्थितीमध्ये समाजातील लोक सण, उत्सव, व्रतवैकल्ये,

पूजा–अर्चा, संस्कार व मूर्तीपूजा मोठ्या भक्तीभावाने करीत असतात. याची सविस्तर माहिती दिलेली आहे. तर आर्थिक परिस्थितीत एकोणिसाव्या शतकातील शेती, व्यापार व उद्योगधंदे यांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण तिसरे**

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण**

या प्रकरणात विसाव्या शतकात सर्वच बाबतीत सुधारणा चळवळी सुरू झाल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होऊन त्यांचा पिंड समाजसुधारणेसाठी तयार झाला होता. या प्रकरणात महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांची समाज सुधारणेबाबत वैचारिक जडणघडण कशी झाली याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची वैचारिक जडणघडण ही प्रामुख्याने विठ्ठल रामजी शिंदे व बसवंतराव (आजोबा), विठ्ठल रामजी शिंदे व वडील रामजी शिंदे, विठ्ठल रामजी शिंदे व आई यमुनाबाई शिंदे, विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावरील प्रार्थना समाजाचा प्रभाव, उदारमतवादी ख्रिस्ती धर्म पंथाकडे मत आकर्षित झाले यातूनच विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचाराची जडणघडण झाली व ते एक थोर समाजसुधारक झाले.

राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण पाहत असताना राजर्षी शाहू महाराजांचा जन्म व घाटगे घराण्याचा वारसा, कागलच्या घाटगे घराण्याचा वारसा, राजर्षी शाहू महाराजांचे वडील जयसिंगराव घाटगे यांचा वारसा, राजर्षी शाहू महाराजांचे दत्तकविधान, राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण, प्रारंभीचे शिक्षण व्यवस्था, राजकोट महाविद्यालयातील शिक्षण, स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखालील शिक्षण, राजर्षी शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व व छंद, महादेव गोविंद रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सामाजिक विचारतेचा प्रभाव, राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक संस्थाशी आलेला संबंध, डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी व राजर्षी शाहू महाराज सत्यशोधक समाज व राजर्षी शाहू महाराज, राजर्षी शाहू महाराज व आर्य समाज, मार्क्सवादाची वैचारिकता, राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणिक विचारांची जडणघडण, सामाजिक सुधारणेच्या विचारांची जडणघडण व ब्राम्हणेत्तर चळवळीचे विचार इत्यादीतून राजर्षी शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण झाली.

**प्रकरण चौथे**

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा आढावा**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक कार्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा प्रार्थना समाजात प्रवेश –(२९ मे १८९९), इंग्लडमधील धर्मशास्त्र शिक्षणाचा प्रभाव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक कार्यास प्रार्थना समाजातून प्रारंभ, अस्पृश्यता निवारणाचे कार्य, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यतेविषयीचे विचार, १) अपृश्यता ही आर्यपूर्व संस्कृतीतून भारतात आली असावी, २) अस्पृश्य एके काळाचे राज–वैभव भोगलेले राजे आहेत, अस्पृश्यांची स्थिती, डिप्रेस्ड क्लास मिशन(All India Depressed Class Mission), अस्पृश्यता निवारक संघाची स्थापना, अस्पृश्यांच्या उन्नतीकरीता सरकारकडे निवेदन राखीव मतदार संघांचा पुरस्कार, व्हायकोम सत्याग्रह, अस्पृश्यांची शेतकी परिषद पुणे(१९२६), शेतकऱ्याविषयीचे कार्य, श्री.म.माटे यांचे अस्पृश्यांच्या विषयीचे कार्य, श्री.म.माटे यांचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याविषयीचे मत, मुलींचे सक्तीचे शिक्षणविषयक धोरण, मद्यपान निषेधाची चळवळ, शिमग्याच्या सणातील अनिष्ठ प्रथा बंद केल्या दुष्काळ आपत्ती निवारक समिती, मुरळी प्रतिबंधक चळवळ व इन्फ्लुएंझाग्रस्ताना मदत इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्यामध्ये दुष्काळावर उपाययोजना प्लेगवर उपाययोजना, विविध जातीच्या वसतिगृहाची स्थापनेस सहकार्य, विविध जातीच्या वसतिगृहाची स्थापनेस सहकार्य या वसतिगृहामध्ये मराठा वसतिगृह, जैन वसतिगृह, मुसलमान वसतिगृह, लिंगायत वसतिगृह, मिस क्लार्क हॉस्टेल (१९०८), इतर समाजातील वसतिगृह, राजर्षी शाहू महाराजांचा आरक्षणविषयक जाहिरनामा(१९०२), राजर्षी शाहू शिक्षण प्रसाराचे कार्य, दलितासाठी रात्र शाळा, दलितांना मोफत शिक्षण(२४ नोव्हेंबर १९११), दिल्ली दरबार पाटील शाळा, सत्यशोधक शाळा, प्राथमिक शिक्षण, मोफत सक्तीचे शिक्षण, शालान्त परीक्षा, स्त्रीशिक्षण, राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीतील करवीर राज्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख, राज्याबाहेरील शैक्षणिक कार्य, अस्पृश्यता निवारणाचे कार्य, अस्पृश्यांची गुलामगिरीतून मुक्ती कार्य, हजेरी व वेठबिगार पद्धती बंद, महार वतन खालसा, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर संबंध, तलाठी क्लासमध्ये येणाऱ्या दलित विद्यार्थ्यांकरिता स्कॉलरशीप(२५ जून १९१९), मुकनायकास आर्थिक मदत, सनदी वकील(११ मार्च १९२०),

माणगाव परिषद(२१ व २२ मार्च १९२०), राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक कार्य, १) स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन, २)जोगत्या मुरळी प्रतिबंध कायदा, ३) आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह कायदेशीर मान्यता, ४) क्रुरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा, ५) घटस्फोटाचा व वारसाचा कायदा ६) विधवा पुनर्विवाह कायदा इत्यादी कार्याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण पाचवे**

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांचे संस्थात्मक कार्य**

या प्रकरणात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या संस्थात्मक कार्याचा आढावा घेतलेला आहे त्यामध्ये प्रार्थना समाज व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, प्रार्थना समाजातील विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य, डिप्रेस्ड क्लास मिशन(All India Depressed Class Mission), अस्पृश्यता निवारक संघाची स्थापना इत्यादीची सविस्तर माहिती घेतलेली आहे. तर राजर्षी शाहू महाराजांचे संस्थात्मक कार्य पाहत असताना आर्य समाजातील कार्य, सत्यशोधक समाजातील राजर्षी शाहू महाराजांचे कार्य, जैन, लिंगायत व थिऑसॉफिकल सोसायटी यांच्या सामाजिक संस्थाना सहकार्य, राजर्षी शाहू महाराजांचे ब्राम्हणेत्तर चळवळीतील कार्य, अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्याप्रसार करणारी मंडळी संस्था, मद्रासकडील ब्राम्हणेत्तर चळवळीशी (जस्टीस चळवळ) साधलेला संपर्क, राजर्षी शाहू महाराज व कामगार चळवळ इत्यादीची सविस्तर माहिती घेतलेली आहे.

**प्रकरण सहावे**

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा तुलनात्मक अभ्यास**

या प्रकरणात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा तुलनात्मक अभ्यास घेतलेला आहे त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे बालपणीचे संस्कार, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे परस्पर संबंध, व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टे, प्रार्थना समाजास सहकार्य, सत्यशोधक विचारप्रणालीचे चाहते, अस्पृश्यतेविरूद्धचा लढा, शेतकऱ्याविषयीचे कार्य, क्षात्रजगद्गुरूपदाला विरोध, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्यातील स्नेहाचे संबंध, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

व राजर्षी शाहू महाराजांचा केलेला गौरव, मुरळी व देवदासी पद्धतीस प्रतिबंधक घालण्याचा प्रयत्न, सांस्कृतिक जीवनात सुधारणा इत्यादीची तुलनात्मक माहिती घेतलेली आहे.

**प्रकरण सातवे**

**उपसंहार**

या प्रकरणात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याची तुलनात्मक अभ्यासाची तुलनात्मक माहिती देवून मूल्यमापन केलेले आहे.

## संदर्भ

१) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २ ऑक्टोबर २००५

२) भांडारकर पु. ल., 'सामाजिक संशोधन पध्दती', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, तिसरी आवृत्ती, १९८७

३) आगलावे प्रदीप, 'संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र', विद्या प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २०००

# प्रकरण दुसरे

# एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची स्थिती

## २.१ प्रास्ताविक

एकोणिसावे शतक हे आधुनिक भारताच्या इतिहासात एक महत्त्वाचे शतक मानले जाते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक दृष्टिकोनाला कलाटणी देणारे आहे. महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे कार्य या शतकात झाले. वैज्ञानिकतेची जोड देण्यात आली. भविष्याची रम्य स्वप्ने बघण्याची धडपड या शतकात चालू झाली. एकोणीसावे शतकात संमिश्र जीवन प्रेरणांचा आविष्कार येथे आढळतो. नवज्ञानाचे आकर्षण यात दिसून येते. नवप्रेरणा समाजात प्रचलित असलेल्या परंपरा यामुळे समाजाची अवस्था एखाद्या वावटळीसारखी झाली होती. परंपरेने चालत आलेल्या रुढीचे चित्र होते.

भारतीय समाजात बुध्दीप्रामाण्यवादाचे किंवा विज्ञाननिष्ठेचे कोणतेच अस्तित्व नव्हते. युरोपियन राष्ट्रामध्ये प्रबोधन चळवळीने नवविचारांना चालना मिळत गेली. ग्रंथप्रामाण्यापेक्षा येथील समाजाने बुध्दीप्रामाण्यवादाला व अनुभवसिध्दतेला प्राधान्य देवून विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अमूलाग्र प्रगती घडवून आणली. बुध्दीला पटणारेच ज्ञान स्वीकारण्याची परंपरा सुरू झाल्याने कला, साहित्य व समाजजीवन या क्षेत्रात नवविचार व आचार यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. चर्च व धर्मसंस्थेच्या कर्मकांडाच्या कचाट्यातून समाज मुक्त होऊ लागला होता.

भारतीय समाज मध्ययुगीन जीवन जगत होता. जातिसंस्थेला समाजात विशेष स्थान होते. समाज जातिव्यवस्थेचा ज्येष्ठ कनिष्ठ विचारांनी जखडलेला होता. कनिष्ठ वर्गाला सामाजिक स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्याचे कोणतेच मानवाधिकार नव्हते. उलट श्रेष्ठ जातींनी आपल्या विशेषाधिकाराच्या जोरावर उच्च स्थान प्रस्थापित केले होते. शिक्षणाची मक्तेदारी ही केवळ श्रेष्ठ वर्गापुरतीच मर्यादित होती. कनिष्ठ वर्गांना कोणतीच संधी नव्हती. शिक्षणापासून ते वंचित होते.[१]

व्यक्ती स्वातंत्र्य, मानवता, सामाजिक, समानता, बुध्दीप्रामाण्यवाद इ. विचारांनी प्रभावित झालेल्या या तरुणांनी आपल्या समाजाविषयीचे आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात केली. भारतीय समाजाचे विघटन करणाऱ्या जातिसंस्थेचे अस्तित्व नष्ट होण्याची त्यांना गरज वाटू

लागली. जातीतील परस्पर संबंधाची कठोर बंधने दूर झाल्याशिवाय येथील समाजात सामाजिक एकतेचे वातावरण निर्माण होणार नाही. तसेच समाजातील सर्व घटकांना समाजाचा एक भाग म्हणून असलेल्या मानवतेचे अधिकार मिळणार नाहीत याची जाणीव सुशिक्षित वर्गाला होऊन सामाजिक सुधारणा व धर्मसुधारणेच्या कार्याला चालना मिळाली. भाषणे, लेख याद्वारे समाजात नवविचार रुजविण्याचा प्रयत्न होऊ लागला. तसेच विविध संस्थांची स्थापना करुन समाज प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[२]

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात पेशवाईचा अंत होऊन इंग्रजी सत्तेची स्थापना झाली. म्हणजेच महाराष्ट्राच्या नशिबी राजकीय गुलामगिरी आली. कोणत्याही राष्ट्राच्या किंवा लोकसमूहाच्या दृष्टीने राजकीय गुलामगिरी अवमानकारक असते आणि या पर्वाची सुरुवात एकोणीसाव्या शतकाने करुन दिली. त्यामुळे हे शतक भयानक होते. इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यावर नवी राज्य या न्यायाने इंग्रजी सत्तेने विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. प्रशासन व्यवस्था, कायदा व न्यायव्यवस्था, शिक्षण पध्दती इ. क्षेत्रात इंग्रजी सत्तेमुळे परिवर्तन होऊ शकले, त्याचे दूरगामी स्वरुपाचे परिणाम झाले. तिने आपल्या समावेत आधुनिक ज्ञानाचा उपयोग समाजजीवन बदलून टाकण्यास झाला. एकंदरीत एकोणिसाव्या शतकाची सुरुवात ही वादळी स्वरुपाची झाली असेच सर्वार्थाने म्हणावे लागेल.

विसाव्या शतकाची सुरुवात ही एकोणिसाव्या शतकाइतकीच वादळी ठरली नसली तरी ही या शतकाच्या प्रारंभी अशा अनेक स्वरुपाच्या महत्त्वपूर्ण घटना घडल्या होत्या की, त्याचे पडसाद पुढील काळात अनेक वर्षे महाराष्ट्राच्या समाजजीवनावर झालेले दिसतात. एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी महाराष्ट्रात राजकीय व सामाजिकदृष्ट्या एका वळणावर आणून सोडले होते. म्हणजेच महाराष्ट्रात परिवर्तन होण्यास सुरुवात झाली होती, असेच म्हणावे लागेल.[३]

एकोणीसाव्या शतकापेक्षा विसावे शतक हे बदलाचे शतक मानावे लागेल. कारण या काळातील महाराष्ट्राच्या सामाजिक स्थितीचे वर्णन करताना एका गोष्टीचे भान ठेवणे आवश्यक होते. या काळात महाराष्ट्रात राजकीय व सामाजिक जीवनात काही महत्त्वपूर्ण हालचाली घडून येत होत्या. त्या फक्त शहरी भागापुरत्याच मर्यादित आहेत की, काय अशी ग्रामीण भागातील लोकांची भावना निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांनी त्या गोष्टीकडे फारसे लक्ष दिले नाही. तसेच ग्रामीण भागातील जनतेला या हालचाली विषयी जाग नव्हती, ते अज्ञानी होते. विसाव्या

शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्राची स्थिती जाणून घेताना त्यावेळचा शहरी समाज आणि ग्रामीण समाज यात फारसा फरक नव्हता.

## २.२ राजकीय स्थिती :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास करताना फक्त महाराष्ट्रापुरताच विचार करणे उचित ठरणार नाही. कारण की, प्रारंभी महाराष्ट्राचे राजकारण अखिल भारतीय राजकारणाशी जोडले गेले होते. संपूर्ण देशाशी त्याचे अतुट नाते होते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना या दोन घटनांना भारतीय राजकारणात विशेष महत्त्व आहे. यातूनच भारतीय राजकारणात वेगळी कलाटणी मिळालेली दिसून येते. राजकीय क्षेत्रात गुणात्मक बदल झालेला दिसतो. या पाठीमागे भारतीय समाजसुधारकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. एखादी घटना घडली की, तिचे पडसाद सर्व देशभर कानाकोपऱ्यात उमटलेले दिसतात. यातूनच भारतीय लोकांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना जागृत होण्यास मदत होते. जनतेमध्ये राष्ट्रीय भावना वाढीस लागते. १९०५ च्या बंगालच्या फाळणीमुळे महाराष्ट्रातील राजकारण ढवळून निघाले होते.[४] प्रारंभीची महाराष्ट्राची राजकीय परिस्थितीचा विचार करता त्या सुमारास देशात घडलेल्या म्हणून विसाव्या शतकाच्या काही महत्त्वाच्या घटनांचा देखील मागोवा घेणे आवश्यक ठरते.

लॉर्ड कर्झनची राजवट ही जुलूम, दडपशाही, जबरदस्ती या नावाने ओळखली जाते. भारताच्या व्हॉईसरॉय म्हणून १८९९–१९०५ पर्यंत काम केले तो कट्टर साम्राज्यवादी होता. त्याच्या ठिकाणी श्रेष्ठत्वाची भावनाही अतिशय जबर होती. बंगालची फाळणी करुन हिंदू व मुस्लीमामध्ये धार्मिक भेदभाव निर्माण केला होता. कर्झन एक उत्तम व कार्यक्षम प्रशासक म्हणून ओळखला जातो. परंतु भारतीय जनतेच्या मनात त्याच्याविषयी द्वेषाची भावना निर्माण झाली होती. जुलूम, जबरदस्ती इ. कारणांमुळे त्याचा कारभार एकतंत्री स्वरुपाचा होता. सत्तासूत्रे हाती येताच त्याने सत्तेच्या केंद्रीकरणावर भर दिला. तसेच प्रांतिक सरकार व प्रांताचे गव्हर्नर यांच्या अधिकारात कपात केली होती. मवाळवादी गटाचे नेते न्या. गोपाळ कृष्ण गोखले यांनी कर्झनच्या कामगिरीवर कठोर टीका केलेली आहे. एक उद्दाम राज्यकर्ता म्हणून त्याची प्रतिमा सर्वसामान्य भारतीय लोकांच्या मनात घर करुन होती. बंगालची फाळणी केल्यामुळे भारतीय लोकांच्या मनात कर्झनविषयी तिरस्काराची भावना निर्माण झाली होती. हिंदू व मुस्लिम यांच्यात

धार्मिक प्रश्न निर्माण करुन आपला दुहेरी हेतू साध्य करण्याचा कुटील डाव कर्झनने आखला होता.[५]

लॉर्ड कर्झनने बंगाल प्रांताचे राज्यकारभाराच्या सोयीसाठी दोन भागात विभाजन केले होते. पूर्व बंगाल (आसाम), पश्चिम बंगाल (बिहार, ओरिसा) असे विभाग पाडले होते. १६ ऑक्टोबर १९०५ रोजी फाळणी झाली. त्याच्या एक–दोन वर्षे अगोदरपासूनच बंगालच्या फाळणीची योजना पुढे आली. तेव्हापासून बंगाल प्रांत पेटून उठला होता. फाळणीला विरोध करण्यासाठी बंगाली जनतेने व्यापक प्रमाणात आंदोलन सुरू केले. इंग्रज अधिकाऱ्यांचा डाव भारतीय लोकांच्या लक्षात येताच संपूर्ण देशभरातील जनतेने या फाळणीला विरोध दर्शविला होता.

ब्रिटिश सरकारच्या विरोधात १८५७ ला भारतीय शिपायांनी बंड पुकारले होते. त्यापेक्षाही या बंगालच्या फाळणीला अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. या आंदोलनातून भारतीय जनतेच्या मनात राष्ट्रवादाची भावना अधिक दृढ होत गेली. १९०५ नंतर मात्र जहाल व मवाळ यांच्यातील मतभेद उफाळून येऊ लागले. या फाळणीच्या निमित्ताने इंग्रज सरकार विरुध्द तीव्र आंदोलन करण्याची वेळ आली होती. असे जहाल गटाच्या नेत्यांना वाटू लागले. त्यामुळे काँग्रेस अंतर्गत आक्रमक पवित्रा त्यांनी घेण्यास सुरुवात केली. बनारस येथे भरलेला काँग्रेस अधिवेशनात याची प्रचिती आली. या अधिवेशन काळात भारत भेटीवर येत असलेल्या (प्रिन्स ऑफ वेल्स) चे स्वागत करण्यासंबंधीचा राजकीय ठरावावर वादावादी झाली. मात्र तो सामंजस्याने मिटविला. कलकत्ता या ठिकाणी राष्ट्रीय काँग्रेसचे १९०६ ला अधिवेशन भरले. याचे अध्यक्षपद दादाभाई नौरोजी यांना देण्यात आले. परंतु अधिवेशन काळात जहाल – मवाळ यांच्यातील मतभेदांचे प्रदर्शन घडले होते. पुढे १९०७ च्या सुरत अधिवेशनात अध्यक्ष पदावरुन वाद सुरू झाला होता. नागपूरऐवजी ते सुरत या ठिकाणी भरविण्यात आले. कारण विदर्भात जहालांचे वर्चस्व अधिक होते. म्हणून मवाळ नेत्यांनी अधिवेशनाचे ठिकाण बदलेले जहाल नेत्यांची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली. त्यामुळे काँग्रेस संघटनेवर मवाळ गटाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. अध्यक्षपदाची माळ मवाळ नेते रासबिहारी घोष यांच्या गळात पडली. लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली जहालांचे वेगळे अधिवेशन भरविले त्याचे अध्यक्षपद लो. टिळकांना देण्यात आले.[६]

टिळकांनी राष्ट्रवादाच्या रुपाने महाराष्ट्रात प्रसाराचे कार्य सुरू केले. त्याचप्रमाणे बंगालमध्येही अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल यांनी लोकजागृतीचे कार्य हाती घेतले. अरविंद घोष यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून काँग्रेसच्या कार्यावर सडकून टीका केली. पाल यांनी 'न्यू इंडिया' या वृत्तपत्रातून कॉग्रेस सरकारवर कडाडून हल्ला चढविला. ब्रिटिशांची भूमिका शोषक राज्यकर्त्यांची असल्यामुळे ते भारतीयांना मदत करतील अशी भ्रामक कल्पना होती. राजकीय कार्यात ते आपणांस मार्गदर्शन करतील अशी गरज भारतीयांना उरलेली नाही. आता त्यांची जाण्याची वेळ आलेली आहे. अशा आशयाची बातमी बिपिनचंद्रांनी संपूर्ण स्वशासनाची मागणी केली. कर्झनच्या प्रतिगामी व भारत विरोधी धोरणाची माहिती जनतेला स्पष्टपणे करुन देण्याचे कार्य 'न्यू इंडिया', 'बंगाल संध्या', 'युगांतर' ही वृत्तपत्रे मोठ्या हिरहिरीने कार्य करीत होती. लॉर्ड कर्झनच्या जुलमी, प्रतिगामी धोरणाची झळ भारतीयांना जशी अधिक अधिक होवू लागली. जशी जहाल राष्ट्रवादाच्या प्रचाराला अधिक धार चढली. जहाल गटातील नेते मोठ्या आत्मविश्वासाने काँग्रेसमधील नेत्यांवर आपल्या विचारांचा पगडा बसविण्यासाठी सत्तासूत्रे घेण्याचा प्रयत्न जहाल गट करु लागला. जहाल व मवाळ यांच्यातील वैचारिक भेदाचे वारे काँग्रेसमध्ये उमटू लागले. या दोघांमुळे काँग्रेस दुभंगण्याची भीती वाटू लागली.[७]

न्या. रानडे यांच्या महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय सुधारणांच्या क्षेत्रामध्ये मोलाचा वाटा होता. लो. टिळक, न्या. रानडे यांच्याविषयी म्हणतात 'थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्रास आपल्या विचारांनी ऊब देऊन त्यास सजीव करण्याचे काम प्रथमतः रानडे यांनीच जीवापाड मेहनत घेतली होती.'

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. रानड्यांच्या निधनानंतर मवाळ गटाचे नेतृत्व गोपाळ कृष्ण गोखले यांच्याकडे आले. या गटाला अनेक मवाळ नेते लाभले. महाराष्ट्रात बंगालच्या फाळणीचे लोक येऊन दाखल झाले. अनेक महाराष्ट्रीयन नेत्यांनी या आंदोलनास पाठिंबा दर्शविला होता.

महाराष्ट्रात या आंदोलनाचे नेतृत्व लो. टिळक यांच्या रुपाने आले. टिळकांचा प्रथम पासूनच बंगालच्या फाळणीला विरोध होता. लाल, बाल, पाल इ. नेत्यांच्या बरोबरीने आवाज उठविला होता. देशभर शेकडो सभा घेऊन सरकार विरोधी प्रचाराचा धडाका उठविला होता. टिळकांनी आपल्या 'केसरी' या वृत्तपत्रातून इंग्रज सरकार विरुध्द प्रचाराची तोफ डागली. १५

ऑगस्ट १९०५ च्या केसरी लेखात म्हटले होते की, इंग्रजी राज्य हल्ली चालले आहे. पुराणातील रावणादिकांच्या कथा सोडून दिल्यानंतर इतिहासात असे एकही उदाहरण नाही की 'जेथे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या गळ्याभोवती घातलेले पारतंत्र्याची दोरी यत्किंचितही सैल न करता हजारो वर्षे तशीच ठेवली. परंतु लॉर्ड कर्झनला हे तत्त्व सहज समजण्याइतके हुशार व बुध्दीमान आहेत. परंतु वैभव आणि अधिकार यांच्या मदाने त्याच्या बुध्दीवर जबरदस्त आवरण पडले आहे की मदोन्मत हत्तीप्रमाणे बंगाली राष्ट्राच्या लोकमतास ते गवतासारखे तुडवून टाकीत आहेत. परकीय सत्तेशी कोणत्याही मार्गाने सामना केला पाहिजे.' यासंबंधी मार्गदर्शन करताना टिळकांनी म्हटले होते की, 'शब्द नकोत कृती पाहिजे आणि तीही निश्चयाची कृती पाहिजे. अशी वेळ आता येऊन ठेपली आहे. बंगाल प्रांतातील बंगाली आंदोलकांनी ब्रिटिश सत्तेच्या विरोधात स्वदेशी व बहिष्कार ही शस्त्रे उपसली होती. स्वदेशी वस्तूचा पुरस्कार आणि परकीय मालाची होळी (बहिष्कार) असे स्वरुप त्याचे होते.' बंगाल प्रांतात या चळवळींना मोठ्या प्रमाणात लोकांनी पाठिंबा दिला होता. लो. टिळकांनी महाराष्ट्रात देखील स्वदेशी व बहिष्कार या मार्गाचा अवलंब केला होता. यासाठी लोकांमध्ये जनजागृती घडवून आणण्याचा कार्यक्रमाला प्रथम प्राधान्य दिले.

एकोणिसाव्या शतकापासूनच महाराष्ट्रात स्वदेशीच्या वापराचा पुरस्कार केला होता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या मवाळवादी नेत्यांनीही स्वदेशीच्या चळवळीस पाठिंबा दिला होता. परंतु बंगाल फाळणी विरोधाच्या आंदोलन काळात एक राजकीय शस्त्र म्हणून स्वदेशीच्या वापराचा आग्रह धरला जाऊ लागला. त्यामुळे स्वदेशीच्या चळवळीच्या वेळी वेगळी धार चढली होती. स्वदेशीचा वापर, परकीय मालावर बहिष्कार हा विचार प्रकर्षाने पुढे आला. काँग्रेसमधील मवाळ नेत्यांचा बहिष्काराला विरोध होता. बहिष्कारामुळे आपल्या सनदशीर चळवळीला आक्रमक स्वरुप प्राप्त होईल, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु लो. टिळकांनी असे म्हटले की, बहिष्कार ही स्वदेशीच्या चळवळीची दुसरी बाजू आहे. स्वदेशी चळवळी यशस्वी करावयाची असेल तर परकीय मालावर बहिष्कार टाकणे योग्य ठरेल. इंग्रजांना वेठीस धरल्याशिवाय त्याच्या मालावर बहिष्कार टाकल्याशिवाय ते वठणीवर येणार नाहीत. सर्वसामान्य जनतेला राष्ट्रीय काँग्रेसच्या झेंड्याखाली टिळकांनी चतु:सूत्रीचा कार्यक्रम हाती घेतला. चतु:सूत्री म्हणजे स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चार तत्त्वांचा पुरस्कार करुन केलेला कार्यक्रम

होय. यापैकी स्वराज्य हे अंतिम ध्येय मानण्यात आले तर स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे स्वराज्य प्राप्तीचे मार्ग ठरविले गेले. लो. टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार या मार्गाचा अगोदर उल्लेख केला होता. त्यास त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाची जोड देऊन आपल्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, स्वधर्म, स्वसंस्कृती यांचे महत्त्व कळावे यासाठी राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता होती. यातूनच राष्ट्रप्रेमी युवकांची एक नवी पिढी तयार होईल, असे त्यांनी प्रतिपादन केले होते. सरकारने चालविलेल्या शाळामधून केवळ कारकून तयार करण्याचे आणि गुलामी मनोवृत्ती वाढविण्याचे शिक्षण दिले जाते. येथील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्रीय शिक्षण देणे यासारखे उपक्रम इंग्रज सरकाराला परवडण्यासारखे नव्हते. शिक्षण देणे हा इंग्रजांचा उद्देश नव्हता. असे टिळकांचे मत होते. म्हणूनच त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसतो. बंगालच्या फाळणीला विरोध म्हणून महाराष्ट्रातून लो. टिळकांच्या मदतीने लढण्याचे नेतृत्व केले त्याचबरोबर मवाळ नेत्यांचाही त्यात सहभाग होता. मवाळ गटाचे नेते गो. कृ. गोखले हे लाला लजपतराय यांच्याबरोबर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्यावतीने लंडनला जाऊन तेथे त्यांनी बंगालच्या फाळणीविरुध्द त्या देशात प्रचारसभा घेऊन तेथील जनमत या चळवळीस अनुकूल करुन घेतले. ब्रिटिश जनतेसमोर गोखल्यांनी बहिष्कार या मार्गाचा उघडपणे पुरस्कार केला. यावेळी काँग्रेसचे नेते दादाभाई नौरोजीनी इंग्लंडमध्ये ही बंगालच्या फाळणीच्या विरोधात आवाज उठवून आपला भारतीय जनतेच्या विरुध्द चालविलेल्या दडपशाहीचा त्यांनी निषेध व्यक्त केला.

महाराष्ट्रात टिळकांच्या नेतृत्वाखाली स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीला चांगला प्रतिसाद मिळत गेला. लोकांनी स्वदेशीचा वापर करावा म्हणून काँग्रेसच्या मंत्र्यांनी जनजागृतीची मोहीम हाती घेऊन गावोगावी पदयात्रा काढून, सभा घेऊन लोकांमध्ये स्वदेशीविषयीचे आकर्षण निर्माण केले. पुण्यात तर वि. दा. सावरकरांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी परदेशी कापडाची होळी केली. महाराष्ट्रात स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीला जनतेचा पाठिंबा मिळण्यामागे बंगालची फाळणी हे एक कारण होते. त्यातूनच लॉर्ड कर्झनची जुलमी राजवटीची व एकतंत्री कारभाराचीही भर पडली होती. विशेषतः कर्झनची साम्राज्यवृत्ती, भारतीयांविषयी दाखविलेली तुच्छतेची भावना यामुळे जनतेमध्ये मोठा असंतोष पसरला. या आंदोलनाला वाचा फोडण्याचे काम केसरी, मराठा, काळ यासारख्या वृत्तपत्राने केले होते. लो. टिळकांनी कर्झनच्या

राजवटीची तुलना औरंगजेबाच्या राजवटीशी केली. लॉर्ड लिटनने ही वृत्तपत्र स्वातंत्र्यावर निर्बंध लादले होते. यातून भारतीय जनतेचा आवाज दाबला जाईल, असे इंग्रजांना वाटत होते. पण तसे झाले नाही. उलट असंतोषामध्ये अधिक भर पडत गेली.

परकीय सत्ताधाऱ्यापासून देशाची आर्थिक पिळवणूक होत होती. १९०४ साली मुंबईमध्ये काँग्रेसचे अधिवेशन भरण्यापूर्वी दादाभाई नौरोजी व वेडरबर्ग यांनी टिळकांना खाजगीत पत्रे पाठवून राष्ट्रीय ऐक्य घडवून ऐक्याच्या हेतूने दोन्ही गटांना आव्हान केले. दादाभाईंनी आपल्या पत्रात टिळकांचा करारीपणा, धैर्य यांच्या गुणांची देशाला गरज आहे असे म्हटले आहे. राष्ट्रीय चळवळीतून सरकारला भांडता येईल. त्यांच्याविरुध्द तोफ डागता येईल. काळ, वेळ यासाठी खर्च करावा लागेल. भारतीयांच्या दृष्टीने ती एक मोठी आपत्ती होतीच. परंतु सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने तो एक मोठा विजय होता असे मत मांडले. दादाभाईंनी टिळकांना तडजोडीचे व ऐक्याचे आवाहन केले. यावर टिळकांनी दादाभाईंना लिहिलेल्या पत्रात असे मत व्यक्त केले की, त्यांचा गट पुरस्कृत करीत असलेली विचारसरणी क्रांतिकारक नाही किंवा काँग्रेसला अपरिचित नाही.

मवाळवादी नेत्यांना जन आंदोलनाचे महत्त्व पटवून देणे जहालवाद्यांना शक्य झाले नाही. विचारांची देवाण घेवाण झाली ती लॉर्ड कर्झनच्या आत्यंतिक प्रतिगामी व उदार साम्राज्यवादी धोरणाने झाली. बंगालच्या फाळणीमुळे गो. कृ. गोखले, सुरेंद्रनाथ यांसारख्या मवाळवादी नेत्यांना भिती वाटू लागली. कर्झनच्या या दमन नीतीला तोंड देण्यासाठी आपल्या परंपरागत अर्ज विनंत्याचा मार्ग सोडून देवून सक्रीय प्रतिकाराला काँग्रेस सिध्द होईल. अशा प्रकारची परिस्थिती तयार झाली.

लॉर्ड कर्झनने बंगाली लोकांच्या भावनांची कदर केली नाही. त्यांच्या भावना पायदळी तुडवल्या. प्रशासकीय सेवेसाठी फाळणी करण्यात येत आहे. तसेच हिंदू व मुसलमानामध्ये तेड निर्माण करणे हे कर्झनच्या कुटनीतीचा भाग होता. मवाळवादी, ना. गोखले व सुरेंद्रनाथ हे अस्वस्थ झाले. मात्र बंगाली नेते काँग्रेसच्या प्रतिक्रियेची वाट न पाहता वंगभंगाविरुध्द जनआंदोलनाचे रणसिंग फुंकले. या आंदोलनाचे नेतृत्व सुरेंद्रनाथांनी स्वीकारुन मोठी लोकप्रियता मिळविली. जणू काही बंगाली राजे बनले. या फाळणीचा लढा फाळणी रद्द होईपर्यंत चालवायचा असा पक्का निर्धार झाला होता. आबालवृध्दांकडून या चळवळीला प्रचंड प्रतिसाद

मिळाला. या चळवळीचे पडसाद बंगालच्या काना–कोपऱ्यात उमटले. फाळणीची समस्या ही केवळ बंगालभर कोसळलेली आपत्ती नसून ती सरकारी भेदनीतिच्या रुपातील राष्ट्रीय समस्या आहे याची जाणीव टिळकांना झाली. त्यांनी या आंदोलनास सक्रीय पाठिंबा व्यक्त केला. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्री तत्त्वांचा खेडोपाडी प्रसार झाला. याचे पडसाद बंगालमधील ब्रिटिश मालावर झाला. फाळणी रद्द करण्याची भाषा ब्रिटिश कारखानदार करु लागले. यासाठी ब्रिटिश सरकारशी विनवणी करु लागले. ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकून भारतीय हिंदी लोकांनी परदेशी मालावर बहिष्कार (दारु, रसायने, औषधे) इत्यादी टाकून आपला असंतोष व्यक्त केला.[८]

लोकमान्य टिळकांच्या केसरी वृत्तपत्राने तर ब्रिटिश सरकारच्या धोरणावर सडकून टीका झाली. बंगालच्या फाळणी विरोधात या टिकेला आणखीच धार चढत गेली. बंगालच्या क्रांतिकारकांनी मुझफ्फरपूर येथे १९०८ ला बॉम्बस्फोट घडवून आणला. त्यासंबंधी टिळकांनी केसरीमध्ये लेख लिहिला म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर आरोप ठेवून राजद्रोहाचा खटला भरला. या खटल्यात न्यायालयाने टिळकांना दोषी ठरवून ६ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा ठोठावून. त्यांची रवानगी मंडालेच्या (म्यानमार, ब्रम्हदेश) तुरुंगात करण्यात आली. त्यामुळे ते काही काळ राजकारणापासून अलिप्त राहिले होते. नंतर त्यांची पहिल्या महायुध्दाच्या (१९१४) वेळी सुटका करण्यात आली. पुढे डॉ. ॲनी बेझंटच्या मदतीने मुंबईमध्ये १९१६ ला होमरुल चळवळ सुरू झाली. वसाहतीचे स्वराज्य प्राप्त करणे हे या चळवळीचा मुख्य हेतू होता. इंग्रजांनी भारतीयांना राजकीय स्वातंत्र्य बहाल करावे. सामाजिक सुधारणा करण्यात. उत्पादन काढण्यात ते सक्षम आहेत. असे ब्रिटिश अधिकाऱ्यांना सुनविले गेले हाते.

बंगाल, बिहार, ओरिसा मिळून बंगाल प्रांत तयार झाला. याचे क्षेत्रफळ १,८९,००० चौ. मैल आणि लोकसंख्या ८ कोटी इतकी होती. त्यात बिहार व ओरिसाची (Non-Bengall's) लोकसंख्या २ कोटी १० लक्ष होती. कर्झनने फाळणीला प्रशासकीय सीमांचे पुनर्निर्धारण (a mere adjustment of administrative boundaries) असे म्हटले आहे. अधिक स्पष्टीकरण देताना लॉर्ड कर्झन म्हणतो, मैमनसिंह आणि बाकरगंज विभागातील लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत आणि ते नेहमीच अशांतता निर्माण करतात. पोलिसांना व्यवस्थित बंदोबस्त करता आला नाही. एवढ्या मोठ्या विशाल प्रदेशावर देखरेख ठेवणे अवघड काम आहे. या हेतूने

फाळणीचा निर्णय झाला. फाळणीचे दोन गट तयार करुन १८६५ साली वायव्य प्रांत बनविला. १८७४ मध्ये आसाम प्रांत वेगळा करण्यात आला. १९०४ साली पूर्व बंगालचा दौरा करुन लॉर्ड कर्झनने अंतिम रुप देवून नव्या धोरणानुसार पूर्व बंगाल आणि आसाम नवीन प्रांत तयार झाले आणि राजशाही, चितगाव व ढाक्का असे तीन विभाग पाडले. ह्या प्रांताचे क्षेत्रफळ ५,४०,१०६ चौ. मैल आणि लोकसंख्या ३ कोटी १० लक्ष होती. त्यात १ कोटी ८० लक्ष मुसलमान तर १ कोटी २० लाख हिंदू होते. ढाका याठिकाणी प्रांताचे मुख्य कार्यालय ठेवून लेफ्टनंट गव्हर्नर हा प्रांतासाठी नेमला होता. बिहार, बंगाल, ओरिसा मिळून एक प्रांत तयार केला. त्याचे क्षेत्रफळ १४१५८० चौ. मैल आणि लोकसंख्या ५ कोटी ४० लक्ष होती. त्यात ४ कोटी २० लक्ष हिंदू आणि ९० लक्ष मुस्लिम लोक होते.

बंगालच्या फाळणीला मोठ्या प्रमाणात विरोध झाला. देशभर या फाळणीचे पडसाद उमटले. राष्ट्रीय ऐक्याला धक्का अशी बंगाली विद्वानांची कबुली होती. इतिहास, भाषा यांवर घाला घालणे, हिंदू, मुसलमान यांच्यात फुट पाडणे, साधन आहे आणि ते योग्य होते. पूर्व बंगालच्या गव्हर्नरने असे म्हटले की, त्याला दोन बायका आहे. पण मुसलमान बायको जास्त लोकप्रिय आहे. (Of his two wife The Mohammedan wife was his favourite) लॉर्ड कर्झन ही साम्राज्यवादी वृत्तीचा दिसून येतो.[९]

अरविंद घोष यांनी चतु:सूत्रीचा पुरस्कार करुन पुढे जाऊन त्यांनी असे सांगितले की, या कार्यक्रमाचा अवलंब करुन राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. 'राजकीय स्वातंत्र्य' हाच स्वातंत्र्य चळवळीचा व राजकीय उलथापालथीचा केंद्रबिंदू बनविला. राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रत्येकाने सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी ठेवावी. थोडक्यात वंगभंग विरोधी व स्वदेशी बहिष्कार चळवळीचे व्यापक स्वातंत्र्य चळवळीत रुपांतर करण्याचे जहालांनी ठरविले. स्वदेशी चळवळ अधिक प्रभावी, आक्रमक परिणामकारक होण्यासाठी पुढील कार्यक्रम आखला.

**बहिष्कार –**

बहिष्काराचा मार्ग प्रथम ब्रिटिश कापडापुरता मर्यादित होता. अल्पावधीतच त्याची व्याप्ती वाढून दारु, साखर, कागद, औषधे, रसायने, खेळणी व मीठ इ. सर्वच ब्रिटिश मालावर बहिष्कार घातला गेला. एवढेच नव्हे तर परदेशी वस्त्रांची (परदेशी कापडाची) होळी करण्यात आली. परदेशी कापड धोब्यांनी धुवू नये या कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

समाजातील सर्व स्तरांतील लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. शाळा, कॉलेजमध्ये स्वदेशी व बहिष्काराच्या शपथा घेवून हजारो तरुण या मोहिमेत सहभागी झाले. सरकारला अनुकूल असणारे जमीनदार व व्यापारी देखील चळवळीत सामील होते. या चळवळीत भाग घेतलेल्या लोकांवर पोलिसांनी लाठी हल्ले चढविला, शासकीय दंडाची भीती कमी होऊन नवे नैतिक धैर्य जनमाणसात निर्माण झाले. स्वकीयांवर बहिष्काराचे अस्त्र चालविले गेले. सामाजिकदृष्ट्या त्यांना वाळीत टाकले. भारतातील एका ब्रिटिश कंपनीने इंग्लंडला पाठविलेल्या एका निवेदनात बहिष्काराची चळवळ ब्रिटिश व्यापाऱ्यांना अहितकारक वाटते. इंग्लंडच्या मालावर भारतीयांनी बहिष्कार टाकल्यामुळे जपानी मालाचा उठाव बंगालमध्ये अधिक झाला असे कबुल केले.

**स्वदेशीचा पुरस्कार** :

भारतीय लोक स्वदेशीचे पुरस्कर्ते होते. स्वदेशीचा पुरस्कार भारतीय लोकांनी केला. स्वदेशीच्या मालावर आधारित कापड गिरण्या, साबण, आगपेट्या, कातडी कमविण्याचे कारखाने, बँक, विमा व्यवसाय इत्यादीं वस्तूंना प्राधान्य देण्यात आले. भारतीय भांडवलदारांनी मुंबई, अहमदाबाद या ठिकाणी 'कापड गिरण्या' सुरू केल्या. कलकत्ता येथे 'आगपेट्या' बनविण्याचा कारखाना सुरू केला. तर ढाका येथे 'साबण व कातडी कमविण्याचा' कारखाना सुरू करण्यात आले. महाराष्ट्रातील तळेगाव या ठिकाणी 'काच' उत्पादन करणारा कारखाना सुरू केला.

**राष्ट्रीय शिक्षण** :

स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीबरोबर राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीला देशात चांगला प्रतिसाद मिळाला. राष्ट्रीय शिक्षणाची सुरवात पुण्यातून चिपळूणकर, आगरकर, टिळक यांच्यातून झाली. बंगालमध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जींच्या रुपाने यापूर्वीच रुजली. १९०५ पासून चळवळीला गती प्राप्त झाली. वंगभंग चळवळीत हजारो विद्यार्थी सामील झाले. सरकारने त्यांच्यावर बडगा उचलला. अनेकांना शाळेतून काढून टाकण्यात आले. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळेमध्ये मुलांना टाकण्यात आले. रविंद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतनची स्थापना केली. तर महाराष्ट्रात १९०९ पर्यंत चिंचवड, तळेगाव, कोल्हापूर, यवतमाळ ठिकाणी राष्ट्रीय शिक्षण देणारी विद्यालये सुरू झाली.[१०]

विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रीयन जनतेत वरीलप्रमाणे मोठ्या प्रमाणात जनजागृती घडून आली तरी इंग्रजी सत्तेच्या विरोधात सुरू केलेल्या आंदोलनात जनता सहभागी झाली. याबाबत एक गोष्ट ध्यानी घ्यावी लागते ती म्हणजे शहरी भागातील वरिष्ठ वर्गापुरतीच होती. जी राजकीय जागृती झाली. ती फक्त मोजक्या वरीष्ठ वर्गापुरतीच मर्यादित स्वरुपात होती. या राजकीय जागृतीचे वारे खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचले नव्हते. ते राजकीय घडामोडी पासून अलिप्त होते, असे दिसते. याचे मुख्य कारण म्हणजे बहुसंख्य जनता ही शिक्षणापासून वंचित होती. त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण खूप होते. अज्ञान, अंधश्रद्धा, रुढीपरंपरा या खेड्यातील लोकांच्या पाचवीला पुजल्या आहेत. शिक्षण ही वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी होती असे खेड्यातील लोकांना वाटत होते. शिक्षण घेणे आपले काम नाही अशी त्यांची समजूत होती. ही समजूत काही अंशी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सोडविलेली दिसून येते.

महाराष्ट्रात ब्रिटिशांनी आपली सत्ता प्रस्थापित करुन सर्वाधिकार स्वतःकडे घेवून. हिंदी जनतेच्या अंधश्रध्दा, रुढी परंपरेला हात न लावता. राजकीय स्थितीवर आपले प्रभुत्व निर्माण केले.

ब्रिटिशांची भारतीय समाजावर पक्कड घट्ट बसवून राजकीय, प्रभुत्वाचा अवलंब करुन ब्रिटिशांनी आपली साम्राज्यवादी सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. काही सत्ताधीश हे ब्रिटिश धार्जिणे होते तर काही अपवादात्मक सत्ताधिशांनी हिंदी जनतेच्या हिताकडे लक्ष पुरविलेले दिसते. परंतु राजकीय स्थिती बळकट करण्याकडे त्यांचा कल होता.

## **२.३ सामाजिक स्थिती** :

एकोणिसाव्या शतकात सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळीत समाज सुधारणेची माहिती घेण्याअगोदर त्या काळातील समाज जीवनाचे स्वरुप कसे होते. समाजात जातीसंस्था कडक निर्बंध यास महत्त्व प्राप्त झाले. बुध्दिप्रामाण्यवाद, प्रयोगशीलता, भौतिक विद्या यापेक्षा परंपरा व ग्रंथप्रामाण्यवाद यांचे वर्चस्व वाढले होते. एकूणच समाजजीवनावर धार्मिक, अध्यात्मिक आचार विचारांचा मोठा प्रभाव होता. जातिव्यवस्थेच्या उतरंडीखाली समाज विभागलेला आहे. अनेक जाती उपजाती निर्माण झाल्या आहेत. श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव होता. कनिष्ठ जातीतील समाज अनेक बंधनामध्ये अडकला होता. शिक्षणाची मक्तेदारी फक्त उच्च वर्गाची होती. अस्पृश्य ओळखल्या गेलेल्या जातीला कोणतीही संधी मिळू शकली नाही.

त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांची अवस्था एखाद्या पशूपेक्षा अत्यंत दयनीय अशी होती.[११]

एकोणिसाव्या शतकात समाजात जातिप्रथा, अस्पृश्यता, बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवा विवाह, बहुपत्नीत्व, सतीप्रथा, इत्यादी अनिष्ट प्रथा होत्या. आचार, विचार स्वातंत्र्य यांना समाज जीवनात स्थान नव्हते. स्त्री शूद्रावर लादलेली बंधने यांना धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. विविध जाती जमातीत विभागलेला समाज श्रेष्ठ कनिष्ठतेच्या संकल्पनेतून दुभंगला व रुढी, परंपरा यांचे वर्चस्व असलेला समाज विस्कळीत बनला होता. भौतिक, तांत्रिक प्रगतीपासून समाज अलिप्त होता. बुध्दीप्रामाण्यवादाचा कोठेच अस्तित्व दिसत नाही. अशा स्थितीत प्रगत असणाऱ्या इंग्रजांनी सहज प्रभुत्व मिळविले.[१२]

राजा राममोहन रॉय हे पुरोगामी, उदारमतवादी विचारसरणीचे होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या संपर्कात आल्याने व इंग्रजी साहित्यामुळे त्यांचा दृष्टिकोन शास्त्रीय व बुध्दिवादी स्वरुपाचा बनला. वेदांचे बंगाली व इंग्रजी भाषेत भाषांतरे रॉयनी केली. या काळात त्यांना वेद व उपनिषदे यांचे तत्त्वज्ञान उपयोगात आणण्याची गरज वाटली. (एकेश्वरवादाचा पुरस्कार करुन रॉयनी 'आत्मीय सभेची' स्थापना केली. द्वारकानाथ टागोर, प्रसन्न कुमार टागोर, डॉ. राजेंद्रलाल मिश्र, राजाकली, शंकर घोषाल, नंदकुमार बोस इत्यादीं थोर विद्वान त्यांचे सहकारी होते. परंतु या सभेचे माध्यम इंग्रजी असल्यामुळे समाजात ही सभा रुजली नाही. त्यामुळे सामाजिक, धार्मिक कार्य हे मातृभाषेतून दिले जाईल असे ठरविले. २० ऑगस्ट १८२८ रोजी ब्राह्मो समाजाची स्थापना झाली. पुढील काळात भारतात धर्मसुधारणेच्या कार्याला व सामाजिक संस्थानच्या निर्मितीला चालना देण्याचे महान कार्य या समाजाने केले.

भारतीयांना खऱ्या धर्मतत्त्वांची ओळख व्हावी या हेतूने ब्राम्हो समाजाची स्थापना केली. वेदप्रणित धर्म हाच खरा हिंदू धर्म अशी समाजाची निष्ठा होती. एकेश्वरवादाचा प्रसार, मूर्तिपुजेला विरोध ही समाजाची प्रमुख वैशिष्टये होते.

१) ईश्वर एक असून तो निराकार आहे. सर्वांनी या निराकार ईश्वराची उपासना करावी.

२) ईश्वर सर्वांचा पिता असून आपण सर्व मानव एकमेकांचे बंधू आहोत.

३) जगातील सर्व धर्माचे अंतरंग सारखे असून या सर्व धर्माचा धर्मग्रंथाचा आदर करावा.

४) मूर्तिपुजेला विरोध करावा, प्रेम, सेवा व परोपकार याची सदैव जाणीव ठेवून परस्परांशी व्यवहार करावा.[१३]

अशा प्रकारची तत्त्वे रॉय यांनी सांगितली आहेत.

एकोणिसाव्या शतकातील राष्ट्रीय जागृतीचा फार मोठा परिणाम सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात दिसून आला. समाजातील रुढी परंपरेविरुध्द नवशिक्षितांनी आवाज उठवला, समाजात वाईट प्रथा रुढ होत्या. त्या नष्ट करण्यासाठी सामाजिक समता व मानवतावादी दृष्टीकोनातून उठावास पोषक वातावरण तयार झाले. जातिव्यवस्था, स्त्री–पुरुष, असमानता समाजात दिसत होती. धर्माचा समाजावर पगडा होता. अशा परिस्थितीत सामाजिक परिषद, भारत सेवक संघ, ख्रिश्चन मिशनरी इत्यादींनी सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. म. फुले, गो. हरी देशमुख, न्या. रानडे, बेहरामजी मलबारी, धोंडो केशव कर्वे, बिपिनचंद्र पाल, विरेश लिंगम पंतलू, नारायण गुरु, वि. रा. शिंदे, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.[१४]

महाराष्ट्राला फार मोठा सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परंपरेचा वारसा लाभलेला आहे. भारताला इतिहासाचे प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड व अर्वाचीन कालखंड असे तीन विभाग पडतात, या तीनही विभागात भारतीय समाजाने आपले स्थान टिकवून ठेवलेले दिसून येते. समाजाची उतरंड वेगवेगळ्या जातीजमातीमध्ये झाली होती.

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात भारतीय समाजात सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात होती. समाजात जातपात, अंधश्रद्धा, रुढीपरंपरा, धर्मभोळेपणा इत्यादी गोष्टी मोठ्या प्रमाणात पाळल्या जात होत्या. महाराष्ट्र त्याला अपवाद नव्हे.[१५]

इ.स. १८१८ ला पेशवाईचा अस्त होऊन ब्रिटिश राजवटीचा अंमल महाराष्ट्रात सुरू झाला. त्याकाळी महाराष्ट्र अस्तित्वात नव्हता. तो संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर १ मे १९६० पासून अस्तित्वात आला आहे. म्हणून आपण १ मे हा महाराष्ट्राचा वर्धापन दिन साजरा करतो. मराठवाडा विभागातील तेव्हाचे पाच व सध्याचे आठ जिल्हे यावर हैद्राबादच्या निजामची राजवट होती. कोकण, पश्चिम महाराष्ट्रावर इंग्रजांची राजवट होती. आजचा गुजरात प्रांत हा मुंबई प्रांताचा एक भाग होता. विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ हे ४ जिल्हे इ.स. १८०३ मध्ये नागपूरच्या भोसल्यांनी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीबरोबर जो तह केला

त्यानुसार ब्रिटिशांना मिळाले. ब्रिटिशांनी तो प्रदेश निजामला बक्षिस दिला. परंतु निजामावर ब्रिटिशांचे अमाप कर्ज झाले. त्याची परतफेड करणे निजामाला शक्य नव्हते. म्हणून वऱ्हाड प्रांत इंग्रजांना १८५३ मध्ये निजामाने परत देवू न टाकला. अशाप्रकारे नागपूरकर भोसले यांच्या ताब्यात असलेले विदर्भातील इतर जिल्हे ब्रिटिशांनी ताब्यात घेतले. महाराष्ट्रात राजकीय स्थित्यंतरे होत असताना नव्या सत्तांचा उदय होत होता. राजकीय क्षेत्रात सतत संघर्ष होत असत पण समाजजीवनात मात्र कोणतेही बदल होत नव्हते. महाराष्ट्रातील समाजरचनेतच कित्येक शतके कसलेही आवाहन नव्हते. पण ब्रिटिशांची राजवट, पाश्चात्य शिक्षण, पाश्चात्य विचार इत्यादींमुळे मात्र महाराष्ट्रातील जीवन पद्धतीला, संस्कारांना समजुती व श्रद्धा यांना आवाहन मिळाले. एक प्रकारची नवजागृती येथील समाजजीवनात झाली.[१६]

महाराष्ट्राची समाजव्यवस्था ही भारतीय समाजरचनेचा एक अंगभूत भाग होती, समाजरचना ही ईश्वर प्रणीत असून ती अपरिवर्तनीय आहे असा एक पक्का समज येथील लोकांचा होता. समाजजीवनात कोणतीच गती आलेली नव्हती. समाजजीवनावर दैववाद, अंधश्रद्धा, ईश्वरी इच्छा इ. गोष्टींचा मोठा प्रभाव होता. गोपाळ गणेश आगरकर यांनी महाराष्ट्रातील गतिशून्य अवस्थेवर टीका करताना लिहिले होते, आमची गृहपद्धती, आमची राज्यपद्धती, आमची शास्त्रे, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या हालचाली, रीतीरिवाज इंग्रज येईपर्यंत आमचे सारे व्यक्तिजीवित्व राष्ट्रजीवित्व ठशात घालून ओतलेल्या पोलादासारखे, दगडाप्रमाणे कठीण झालेल्या लाकडासारखे किंवा हडकासारखे कठीण होऊन राहिले असे म्हणण्यास हरकत नाही. इहवादी विचारसरणी या भूमीत खोलवर रुजू शकली नाही. इहनिष्ठेच्या अभावामुळेच निष्क्रियता आणि उदासिनता यांचे दर्शन महाराष्ट्रात घडून येते. भौतिक विद्या, बुद्धिप्रामाण्यवाद यापेक्षा सामाजिक जीवनात परंपरेला ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्व प्राप्त झाले होते. अध्यात्मिक व धार्मिक आचारांचा प्रभाव तत्कालीन जीवनावरही पडलेला दिसतो. धर्मभोळेपणा, अज्ञान, रुढीप्रियता इत्यादीमुळे भोळसट वृत्तीमुळे समाजाचे अधःपतन होऊ लागले होते. स्त्रियांच्या शिक्षणाचा पूर्ण अभावच होता, ग्रामसंस्था, जातिसंस्था, कुटुंबसंस्था यांच्या स्वरूपात व पद्धतीत फारसा फरक पडला नाही. रुढी परंपरेच्या जाळ्यात या संस्था अडकून पडल्या होत्या.

अठराव्या शतकातील भारतीय समाज एकसंघ नव्हता. धर्म, जात, प्रदेश, भाषा अशा अनेक कारणांनी विभागलेला होता. समाजात उच्चनीचता असा भेदभाव मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये होत होता. सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमतेची दरी फार मोठी होती. हिंदू समाजात जातिव्यवस्थेचे विघटन एक महत्त्वाचे कारण होते. उच्चवर्णीय मानल्या गेलेल्या ब्राह्मणांना विशेषाधिकार मिळत होता. जाती बंधने कडक होती. लोकांच्या व्यवसायावरुन जात ठरत असत. निरनिराळ्या जातीच्या गटात रोटीबेटी व्यवहार वर्ज मानला जाई.

हिंदूप्रमाणेच मुसलमान समाजातही समानतेचा पुरस्कार केलेला होता. शिया, सुन्नी असा भेदभाव केला जाई. तसेच इराणी, अफगाण, तुराणी व हिंदुस्थानी मुसलमान एकमेकात मिसळत नसत. उमराव, मुल्ला मौलवी हे कनिष्ठ स्तरातील धर्मबांधवांना कमी लेखत असत. स्त्रियांची परिस्थिती तर अतिशय दयनीय अशी होती. घरात मानसन्मान मिळे. परंतु समाजात तिला स्थान नव्हते. शिक्षणापासून ती वंचित होती. वडील, पती, पुत्र, यांच्या आधारावरच तिला आपले जीवन व्यथित करावे लागत असे. रझिया, चाँदबिबी यांसारख्या धुरंधर स्त्रिया सोडल्यास तिला स्वतंत्र अस्तित्व नव्हते. विधवांच्या दु:खांना तर सीमाच नव्हती. बालविवाह, सतीप्रथा अशा जाचक प्रथांना, रुढींना स्त्रियांना सामोरे जावे लागत असे.[१७]

विसाव्या शतकात प्रांतिक व देश पातळीवर अनेक सामाजिक संघटना अस्तित्वात आल्या. १८८७ साली म. गो. रानडे यांनी स्थापन केलेल्या भारतीय राष्ट्रीय परिषदेचे उद्देश मर्यादित स्वरुपाचे होते आणि तिला यशही मर्यादित मिळाले. १९०३ साली मुंबई प्रांतात 'बॉम्बे सोशल रिफॉर्म असोसिएशन'ची स्थापना झाली. महाराष्ट्रात म. फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे आणि बडोद्याचे नरेश महाराज सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यातील योगदान मोठे होते. तसेच मद्रासमधील ॲनी बेझंट यांच्या हिंदू असोसिएशनचे कार्यही उल्लेखनीय आहे. १९१८ मध्ये ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास असोसिएशन या संघटना अस्तित्वात आल्या.[१८]

**जाती संस्था** :

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाजजीवनावर जाती व्यवस्थेचा फार मोठा पगडा होता. विसाव्या शतकाच्या प्रारंभी तो पगडा तसाच कायम होता. जातिव्यवस्थेने येथील समाजात उच्चनीच भेदभाव निर्माण केला होता. हा समाज अनेक जातींत विभागला गेला

होता आणि जातीजातींमध्ये उच्चनीचतेच्या किंवा श्रेष्ठ–कनिष्ठत्वाच्या भावना अतिशय तीव्र होत्या. सामाजिक रचनेच्या उतरंडीत जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रत्येक जातीला एक विशिष्ट स्थान लाभलेले होते आणि त्या स्थानानुसार प्रत्येक जातीचे सामाजिक अधिकार व कर्तव्ये निश्चित करण्यात आली होती. जातिव्यवस्था ही जन्माधिष्ठित असल्याने व्यक्तीचे सामाजिक स्थान व दर्जा तिच्या जन्मावरून ठरत असे. त्यामुळे त्यात बदल घडविण्यास कसलाही वाव मिळत नसे. जातिव्यवस्थेने प्रत्येक व्यक्तीवर अनेक प्रकारची सामाजिक बंधने लादली होती. त्या बंधनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन केले जात असे. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार थोडाबहुत झाला होता. इंग्रजांनी आपल्याबरोबर आधुनिक विद्या व तंत्रज्ञान आणले. त्यामुळे आपल्या लोकांच्या जातीसंबंधीच्या परंपरागत दृष्टिकोनात बदल होईल अशी अपेक्षा होती. परंतु विसावे शतक उजडत असतानाच असे दिसून आले की, उच्चवर्णीय सुशिक्षितांमधील जाती विषमताविषयक अभिमानाची भावना अधिक प्रखर बनली. आपणच या समाजाचे कर्ते आहोत अभिमानाच्या या तोऱ्यात ते वावरू लागले होते. स्वधर्म व स्वसंस्कृती या नावाखाली उच्चवर्णीय स्वजातीचा अभिमान मिरवू लागले होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस विष्णूशास्त्री चिपळूणकर सारखे समाजधुरीण ज्ञान भांडाराच्या किल्ल्या ब्राह्मणांच्या कंबरेला असल्याने कनिष्ठ जातीच्या लोकांनी ब्राह्मणांची बरोबरी करण्याची अपेक्षा बाळगू नये, असा शेरा दिला.[१९] एकंदरीत पाहता कनिष्ठ वर्गातील लोकांची स्थिती दयनीय स्वरुपाची होती. अंध:कारमय जीवन जगत होता. ज्ञानावाचून वंचित होता. ज्ञान भांडाराच्या चाव्या फक्त वरच्या वर्गाकडे होत्या.

समाजव्यवस्थेमध्ये ब्राह्मणांचे स्थान नेहमी श्रेष्ठ राहणार अशी पुष्टी दिली, जातिभेद मोडण्याचा विचार उच्चवर्णियांच्या पचनी पडणे अवघड होते. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी जातिभेद मोडल्याशिवाय आपल्या देशाची उन्नती होणे शक्य नाही असे मत मांडले. त्यावर लो. टिळक म्हणतात की, जातिभेदासारख्या विषयांवर मतप्रदर्शन करण्याइतके गुण सयाजीरावांच्या अंगी नसल्यामुळे त्यांनी या विषयासंबंधी बोलू नये. अशा कठोर शब्दांत सयाजीराव गायकवाडांवर टीका केली होती.

जातिजातीतील रोटीबेटी व्यवहार करण्याच्या कल्पनेला टिळकांनी सक्त विरोध दर्शविला होता. पुढे राष्ट्रीय नेते म्हणून नावारूपाला आले परंतु जातिव्यवस्थेसंबंधी त्यांचे जे

विचार होते, त्यात बदल झाला नाही. यावरून उच्चवर्णियांचा सर्वसामान्य लोकांविषयीचा दृष्टीकोन कसा खालच्या दर्जाचा होता हे दिसून येतो. भारतीय समाजात वेगवेगळ्या जातिधर्माचे लोक होते. वेगवेगळ्या जातींनी आपले स्थान समाजात घट्ट करून ठेवले होते. समाजात ब्राह्मण, मराठा व इतर जातीचेही लोक होते. समाजात ब्राह्मणाला श्रेष्ठ स्थान होते. मराठे यामध्ये कुणबी ही जात असे. मराठे हे कुणब्यापेक्षा श्रेष्ठ समजत असत. कुणबी ही गरीब शेतकरी, शेतमजूर होते. इतर प्रमुख जातीमध्ये न्हावी, माळी, गुरव, धनगर इत्यादीं खेडेगावामध्ये बलुतेदारांना विशेष हक्क होते. (कुंभार, सुतार इत्यादीं सर्वजातीत पुन्हा पोटजाती होत्या. श्रेष्ठ, कनिष्ठ असे पोटभेद होते. प्रभु विरूद्ध ब्राह्मण असाही वाद होता पण तो सामाजिक स्वरूपाचा होता. प्रभू हे स्वतःला ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ समजत असत. एकोणिसाव्या शतकात प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात ब्राह्मणांचे निर्विवाद प्रभुत्व होते. यात एकूण ब्राह्मणांच्या संख्येपेक्षा चित्पावन (कोकणस्थ) या नावाने ओळखला जाणाऱ्या पोटजातीतील संख्या इ. १८९१ ते १९३१ या चाळीस वर्षांत दीड लाखापर्यंत होती. आणि इंग्रजी विद्याग्रहण करून सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी आपली पकड घट्ट केली.[२०]

**अस्पृश्यता**

दलित या शब्दाचा शब्दशः अर्थ पाहणे आवश्यक आहे. या शब्दाचा दळण–दलित–दलिन अशी एक व्युत्पत्ती सांगितली जाते. दळले गेलेले जात असलेले ते दलित व हयापासूनच दलित हा शब्द तयार झाला असावा असा एक तर्क केला जातो.दळण्यासाठी जाते पूर्वीपासून वापरले जाते. जात्यातले रडतात, सुपातले हसतात, आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते, या विविध लोकावलीवरूनच जात्याचे मराठी समाजजीवनातील स्थान स्पष्ट होते. चातुर्वण्य व्यवस्था हे जातीमधूनच निर्माण झाली. ज्या जात्यात भरडले–चिरडले–दळले गेले व काही प्रमाणात आजही जात आहेत. ते सर्व दलित म्हणजेच दलित अशी या पाठीमागची कल्पना आहे.

अनेक साहित्यिकांनी, विचारवंतानी दलित या संकल्पनेचा अन्वयार्थ चातुवर्ण्य व्यवस्थेशी संबंधित आहे. बाबूराव बागुल, अरूण कांबळे, नारायण सुर्वे इत्यादी साहित्यिकांनी दलित या संकल्पनेच्या व्यापक अर्थ लावला आहे. तळागाळातील वंचित सामाजिक आर्थिक शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या घटकाला दलित असे म्हणतात. डॉ.अनिल अवचट यांनी दलित भरडलेले, तुडविलेले असी व्याख्या केलेली आहे. सत्तेत परीट, न्हावी, कुंभार इत्यादी

ग्रामसंस्थेतील घटकांना गावगाडयाच्या बाहेर वावरणाऱ्या भटक्या जातीचा समावेश यामध्ये आढळतो. या भटक्या जमातीत अस्पृश्याइतकी कडक बंधने नव्हती परंतु त्यांच्यावर गुन्हेगारीचा शिक्का मारला जात अस्पृश्याइतकी हीन वागणूक मिळत नसे त्यामुळे अस्पृश्य जातीत ही दारिद्र्याची जाणीव होती.

दलित या शब्दाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केलेल्या आढळतात.

दलित या शब्दाचा अर्थ बाबूराव बागूल यांनी मानवाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे माणसाला महान मानणारे वंश, वर्ण, जाती, श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे दलित होय.

डॉ.गंगाधर पानतावणे यांनी दलित साहित्याची चळवळ एक मुक्तीसंग्राम आहे. स्वतःला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात माझे असे चित्र कोणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य होय.

राजा ढाले यांनी जो जो माझ्या समाजरचनेविषयी आणि सांस्कृतिक व्यवहाररचनेविषयी लढण्याचा दृष्टिकोन घेऊन साहित्याची निर्मिती करेल आणि वाट चुकलेल्या व्यक्तीला वाटेवर आणेल तो दलित

दत्ता भगत यांनी आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाद्वारे स्वतःला आणि सभोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा राष्ट्ररूप अविष्कार म्हणजे दलित होय.

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात परंपरागत हिंदू समाजव्यवस्थेची चौकट आणि मध्ययुगीन स्थितीशीलता या दोन गोष्टी उर्वरित भारताप्रमाणे महाराष्ट्रात लागू पडतात. समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात धर्माचे प्राबल्य होते. धार्मिक मूल्याबाबतच्या सार्वत्रिक ऐक्यामुळे विविध सामाजिक गट परस्परांशी जवळच्या नात्याने बांधले गेले होते. वर्णधर्म, जातिव्यवस्था, गावगाडा, कुटुंबसंस्था अशा सामाजिक संस्थांना दैवी अधिष्ठान आहे. या समजुतीचा पगडा समाज माणसावर बसला होता. त्यामुळे या संस्था अपरिवर्तनीय मानल्या जात. धार्मिक जीवन विलक्षण चाकोरीबध्द बनले होते. शास्त्रप्रामाण्य हे उच्चवर्णियांमध्ये तर रुढी प्रामाण्य हे बहुजन समाजात धर्माचे लक्षण बनले.

वर्ण–जातीची विषमता प्रधान चौकट, ज्ञान व श्रम यांची फारकत दैववादी व अंधश्रध्दा विचार चौकट, स्वयंपूर्ण व बंदिस्त ग्रामजीवन, स्त्रीदास्य ही भारतीय समाजाची काही वैशिष्ट्ये

तत्कालीन महाराष्ट्रालाही लागू पडत होती. ब्रिटिश पूर्व भारतात जात कुटुंब व खेड्याची पंचायत यांच्यापुढे व्यक्तीला पुर्णतः दुय्यम लेखले जात असे. महाराष्ट्रही याला अपवाद नव्हता. ग्रामसंस्था आणि जातिसंस्था हे येथील सामूहिक जीवनाचे मूलभूत घटक होते. ब्रिटिशपूर्व काळात आर्थिक क्षेत्रात वतनदारी तर सामाजिक क्षेत्रात जातिभावना यांचे वर्चस्व होते. समाजजीवन सुसंघटित नव्हे तर समुच्चयात्मक होते. गावांच्या समुदायाचा देश तर जातीच्या समुदायाचा समाज अशा सैल बांधणीची रचना होती.[२१]

प्राचीन काळापासून अस्पृश्यता पाळली जात होती. अस्पृश्यता म्हणजे कनिष्ठ वर्गातील लोकांशी शिवून न घेणे होय. समाजाला लागलेली ही एक कीड होती. ही कीड काढून टाकण्याचे काम समाजसुधारकांनी केलेले दिसून येते. विसाव्या शतकाच्या आरंभी समाजात अस्पृश्यतेच्या प्रथेचे पालन पूर्वीसारखेच केले जात होते.[२२] एकोणिसाव्या शतकात अस्पृश्यतेच्या प्रथेचा धिक्कार करून तिच्याविरुध्द लोकात जागृती घडवून आणण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी आपले आयुष्य वेचले. खिस्ती मिशिनरी, म. फुले, शाहू महाराज, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या समाज सुधारकांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. इंग्रज सरकारने कायदे समानता करून हे तत्व आणले. परंतु वरिष्ठ जातीतील लोकांचा अस्पृश्य समजलेल्या जातीविषयीचा दृष्टिकोन फारसा बदलला नव्हता. त्यामुळे अस्पृश्यांच्या स्थितीत विशेष सुधारणा झाली नाही. पेशवाईच्या काळात अस्पृश्य जातीच्या लोकांना गावातून फिरताना कमरेला झाडाची फांदी बांधणे, गळ्यात मडके अडकविणे यासारखे प्रकार चालत असत. परंतु अस्पृश्यतेची प्रथा मात्र बंद झाली नाही. ग्रामीण भागात तर अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळली जात होती. मुंबई, पुणे यासारखी शहरे सोडली तर अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षणाच्या सुविधा फारसा नव्हत्या. ग्रामीण समाजात ब्राह्मणाशिवाय इतर जातीच्या मुलांचा शिक्षण घेण्याचा कल विशेष नव्हता. शिक्षण ही अस्पृश्यांना न परवडणारी चैन होती. अस्पृश्य जातीचा मुलगा शाळेत चुकून गेला तर त्याला इतर विद्यार्थ्यांपासून लांब दूर कोठेतरी बसविले जात असे. वर्गातील विद्यार्थी नव्हे तर शिक्षक देखील त्याला स्पर्श करीत नसत. अस्पृश्यांनाच अतिशूद्र म्हटले जाई. अतिशूद्रांमध्ये महार, मांग, ढोर, चांभार या प्रमुख जाती होत्या. त्यापैकी महार ही संख्येने मोठी जात होती. 'गाव तेथे 'महारवाडा' अशी म्हण समाजात रुढ होती. सार्वजनिक देवालये, पाणवठे येथे अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. त्यांच्या येण्याने धर्म बुडेल, देव

बाटला जाईल अशी सवर्ण लोकांची समजूत होती. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृशांच्या मंदिर प्रवेशाचा, सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी सत्याग्रह करावे लागले होते. त्यावेळी देखील सनातनी लोकांनी त्यास कडाडून विरोध केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या दलित बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी चळवळी केल्या. सारा देह झिजवला होता.[२३] भारतीय समाजातील उपेक्षित, शोषित, पीडित, पददलित जनतेच्या उध्दारासाठी केलेली चळवळ दलित चळवळ होय. भारतीय समाजात परंपरेने अस्पृश्य जाती म्हणून ओळखल्या गेलेल्या जातीच्या लोकांना प्रामुख्याने दलित समाज किंवा दलित वर्ग असे संबोधले जाते. वास्तविक पाहता दलित या शब्दात कसलाही अर्थ किंवा संदर्भ नाही हे याठिकाणी प्रथम स्पष्ट केले पाहिजे. समाजातील अत्यंत दुर्बल व अन्याय, अत्याचार यांचे बळी ठरलेल्या घटकांना उद्देशून दलित असा शब्दप्रयोग केला जातो.[२४]

महात्मा फुले यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांसाठी स्वतःचा पाण्याचा आड खुला करून दिला आणि अस्पृश्य बांधव आनंदाने पाणी भरू लागले. अस्पृश्यता समाजात पावलोपावली पाळली जात होती. प्रत्येक व्यक्तीचा दर्जा हा तो कोणत्या जातीत जन्मला यावर ठरत असे. ना. म. जोशी यांनी 'पुणे शहराचे वर्णन' या ग्रंथात म्हटले आहे की, पेशवे काळात महार, मांग, चांभार, भंगी व धेड या जातीतील लोकांना रस्त्याला थुंकण्याची परवानगी नव्हती. कारण त्यामुळे रस्त्याच बाटतो असा सवर्णांचा समज होता. महाराष्ट्रातील समाजजीवनात अस्पृश्यता, धर्मरुढी, अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात होती. सामाजिक विषमता कमी करण्याचे कार्य समाजसुधारकांच्या प्रबोधनाने, साहित्याने, प्रेरणेने कमी झाले. त्याचबरोबर पाश्चात्य तत्वज्ञान, शिक्षण यामुळे अस्पृश्यता हळूहळू कमी होण्यास मदत झाली.

अस्पृश्यता ही मानव जातीला लागलेला कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने ती हानीकारक आहे. याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती. ते सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. मानवतेच्या व सामाजिक समतेच्या दृष्टीने कलंक असलेली ही अस्पृश्यता ही नष्ट केली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. म्हणून त्यांनी वरिष्ठ वर्गाच्या मक्तेदारीला व वर्चस्वाला आव्हान दिले. समाजातील उपेक्षित घटकांना दिलासा देणे हे आपली जबाबदारी आहे. हे मानून अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी त्यांची शैक्षणिक प्रगती होणे आवश्यक आहे. हे शाहू महाराज

जाणून होते. त्यासाठी त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी ८ सप्टेंबर १९१७ च्या आदेशान्वये कोल्हापूर संस्थानात त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देवू केले. सुरुवातीस त्यांनी अस्पृश्यांसाठी, मुलांसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. परंतु नंतरच्या काळात त्या बंद करुन इतर शाळांमध्ये स्पृश्य मुलांप्रमाणेच त्यांना सामावून घेण्याचे बंधन घातले. अस्पृश्य जातीतील मुलांना शिक्षणासाठीच्या विविध सवलती देवू केल्या. तसेच संस्थानात नोकरी दिली गेल्याने त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली, अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले. सार्वजनिक कार्यालये व सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांनाही इतरांप्रमाणे समान वागणूक दिली जावी असा आदेश काढला. इतर गरजू मुलांनाही शिक्षण घेता यावे यासाठी आर्थिक मदत केली. माणगाव येथे भरलेल्या १९२० च्या अस्पृश्यता निवारण परिषदेत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्यता मुक्ती चळवळीचे नेतृत्व करण्यास प्रोत्साहन दिले. नागपूर व दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्षपद शाहू महाराज यांनी भूषविले होते.[२५]

**बालविवाह**

एकोणिसाव्या व विसाव्या शतकामध्ये बालविवाह रुढ होता. पाळण्यात लग्न लावण्याची प्रथा सर्रास होती. बालविवाह पद्धतीत मुलीचे सर्वसाधारण वय ८ ते १० वर्षांच्या आतच विवाह लावला जात असे. मुलीला लग्न म्हणजे काय हे सुद्धा कळत नसे. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने तर आज्ञाच काढली (१७९९) की, मुलीचे लग्न ९ वर्षाच्या आतच करावे. बाल विवाहामुळे मुलीच्या आरोग्यावर परिणाम होत असे. त्यांचे मानसिक धैर्य खचले जाई. अर्थार्जनाचे ज्ञान त्यांना होत नसे. वैधव्य, अशक्त संतती, अल्पायुष्य हे सर्व दुष्परिणाम बालविवाहामुळे होत असत. बालविधवा पुढे कोणाच्या तरी वासनेला बळी पडत असत, गरोदर राहत व नुकतीच जन्माला आलेली मुले कोठेतरी फेकून देत. म्हणूनच म. फुले यांनी आपल्या घरातच 'बालहत्या प्रतिबंधक गृह' उघडले होते. विधवांना येथे येऊन सुरक्षित बाळंत व्हा, सर्व काही गुप्त ठेवले जाई. मुलांचेही संगोपन केले जाई. याकामी त्यांना रा. भांडारकर, गो. ह. देशमुख, बाबा परमानंद, तात्या पडवळ या व्यक्तींचे ही सहकार्य मिळाले.

मुलीचा विवाह अतिशय लहान वयात होत असत. त्यातून अनेक समस्या निर्माण होत. वयाच्या १४ व्या व १६ व्या वर्षी वैधव्य आलेल्या मुलींना संपूर्ण आयुष्य अंधारात खितपत

पडावे लागत होते. तसेच बहुपत्नीत्व हा स्त्रियांना एक शापच होता. ह्या अनिष्ट प्रथा विरुध्द ब्राम्हो समाज, आर्य समाज या संस्थांनी बरेच कार्य केले. विशेषतः केशवचंद्र सेन यांच्या प्रयत्नांमुळे १८७२ साली देशी विवाह कायदा संमत झाला. त्यानुसार बालविवाहाची प्रथा बंद करण्यात येऊन बहुपत्नीत्व विवाह गुन्हा म्हणून घोषित केला गेला. विधवा विवाहास व आंतरजातीय विवाहाला संमती देण्यात आली. १८९१ च्या संमती वयाच्या कायद्यानुसार विवाहप्रसंगी मुलीचे वय कमीत कमी १२ वर्ष निश्चित करण्यात आले होते. १९०१ मध्ये बडोदा संस्थानात बालविवाह विरोधी कायदा करण्यात आला. १९२८ च्या कायद्यानुसार विवाहप्रसंगी कमीत कमी वय मुलांसाठी १८ वर्षे आणि मुलीसाठी १४ वर्षे निश्चित करण्यात आले. कायद्याचे पालन न करणाऱ्यास शिक्षेची तरतूद होती. समाज परिवर्तन घडून येण्यासाठी समाज सुधारक आगरकर यांनी 'सुधारक' म्हणून लोक जागृती केली.[२६] विधवा स्त्रियांचे दुःख बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीतून आपणास पहावयास मिळते.

**स्त्री जीवन :**

प्राचीन काळापासून समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन संकुचित स्वरूपाचा होता. मुलगी झाली धनाची पेटी, मुलगा झाला वंशाचा दिवा अशी रुढ समाजात चालत आलेली दिसते. आज एकविसाव्या शतकात सुद्धा भ्रुणहत्या मोठ्या प्रमाणात होते आहे. शासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. विसाव्या शतकात स्त्रीविषयीचा दृष्टीकोन फारसा बदलला नाही. येथील पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे जीवनाच्या सर्व अंगावर पुरुषांचे वर्चस्व होते. परिणामी समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते. कुटुंबात स्त्रियांना कोणतेही अधिकार नव्हते. पुरुषांच्या तालावर नाचणे आणि पुरुषांची मर्जी सांभाळणे यापलिकडे दुसरे काहीच करता येत नसे. विसाव्या शतकातही स्त्रियांचे स्थान घराच्या चार भिंतीच्या आतच होते. 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित असले पाहिजे, अशी तत्कालिन समाजाची धारणा होती. त्यामुळे सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची त्यांना अजिबात मुभा नव्हती. भारतीय समाजातील किंवा हिंदू धर्मातील निरनिराळ्या प्रकारच्या अनिष्ट चालिरिती, रुढी, परंपरा, बालविवाह, जरठ पद्धत इत्यादीमुळे स्त्रियांचे जीवन असहाय्य होऊन बसले होते. त्यांना अनेक प्रकारच्या बंधनात जखडून ठेवले जात होते, त्यांना मोकळेपणाने श्वास घेण्याइतपतही स्वातंत्र्य समाजाने दिले नव्हते.

भारतीय समाजामध्ये अनेक अनिष्ट प्रथा होत्या. बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवा स्त्रियांचे केशवपन, विधवा विवाहाला प्रतिबंध, बहुपत्नी विवाह यासारख्या प्रथा स्त्रियांच्या मुळावर आल्या होत्या. पुरुषांनी स्त्रियांच्या नशिबी गुलामगिरीचे जिणे आणले होते. एकोणिसाव्या शतकात समाज सुधारकांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे समाजात काही बदल झाले. स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या होत्या. विधवा विवाहाला कायद्याने मान्यता मिळाली होती. त्यामुळे अपवाद म्हणून का असेना पण विधवा विवाह होऊ लागले होते. उदा. धोंडो केशव कर्वे यांनी गोदूबाई या ब्राह्मण विधवेशी विवाह केला होता. केशवपन सारख्या प्रथा पूर्णपणे बंद झाल्या नसल्या तरी त्यातील अमानुषता लोकांना वाटू लागली होती. त्यामुळे त्या बंद करण्याकडे समाजाचा कल झुकू लागला होता. १८९१ च्या संमती वय विधेयकाला महाराष्ट्रात मोठा विरोध झाला असला तरी अशा प्रकारच्या सुधारणा लोकांच्या कलाने हळूहळू घडवून आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत असे त्या विधेयकाचे विरोधकही म्हणू लागले होते. थोडक्यात भारतीय समाजात स्त्रियांवर फार मोठ्या प्रमाणात अन्याय होत होता याची जाणीव समाजसुधारकांना व विचारवंतांना होऊ लागली. या विविध कारणांमुळे विसाव्या शतकात पदार्पण करताना स्त्रियांच्या स्थितीत थोड्याबहुत सुधारणा झाल्या होत्या. तरीदेखील लक्षात घेतले पाहिजे की, या सुधारणा प्रामुख्याने शहरी भागापुरत्या व समाजातील वरिष्ठ वर्गापुरत्या मर्यादित होत्या. उदा. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पण शिक्षणाचा लाभ वरिष्ठ वर्गातील स्त्रियांनीच घेतला. ग्रामीण भागातील तसेच बहुजन समाजातील स्त्रिया विसाव्या शतक उजाडल्यानंतरही शिक्षणापासून वंचितच राहिल्या होत्या.

महाराष्ट्रातील समाज जीवनाचा आढावा घेत असताना समाजात बालविवाह, बहुपत्नी विवाह यासारख्या प्रथा ग्रामीण भागात सर्रास रुढ होत्या. स्त्रियांवरील अन्यायाबाबत अगदी थोडक्यात बोलायचे झाले तर इतकेच म्हणता येईल की, आज एकविसाव्या शतकातही स्त्रियांवरील अत्याचार कमी व्हावेत, त्यांना सन्मानाची वागणूक मिळावी, त्यांच्या हक्काचे रक्षण व्हावे, याकरिता महिला संघटना संघर्ष करू लागल्या आहेत. यावरून एकंदरीत समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन संकुचित स्वरूपाचा होता. स्त्रियांना शिक्षण दिले तर धर्म बुडेल अशी सनातनी मंडळींची भूमिका होती. म. फुले म्हणतात की, ‘जिच्या हाती पाळण्याची दोरी,

ती जगाते उद्धार करी'. एक महिला काय करून दाखवते याचे चित्र म. फुले यांनी मांडले आहे. १८४८ साली भिडे वाड्यात म. फुल्यांनी मुलीसाठी पहिली शाळा सुरू केली. स्वतः आपल्या पत्नीला शिकवून शिक्षिका बनविले. हा मोठा आदर्श त्यांनी समाजाला घालून दिला. जगन्नाथ शंकरशेठ, ताराबाई शिंदे, म. फुले, आगरकर, महर्षी शिंदे या व्यक्तींनी स्त्री जीवनाच्या उद्धारासाठी आयुष्यभर कष्ट सोसले. आजसुद्धा महिलांना अनेक संकटांशी सामना करुन आपले जीवन व्यतीत करावे लागते.

सतीचा शब्दश: अर्थ पवित्र व सद्‌गुणी स्त्री असा आहे. ज्या स्त्रीने स्वत:ला पती चरणी वाहून घेतले आहे आणि आपले मरणोत्तर चिरस्थायी वैवाहिक जीवन आपल्या पतीसोबत व्यतीत करण्याचा विचार करुन ठाम निश्चय केला होता. पतीच्या चितेत उडी टाकून स्वत:ला जाळून घेई अशा करता सती हा शब्द वापरला जाई. ईस्ट इंडिया कंपनीचे धोरण भारतीयांच्या रुढी प्रथेमध्ये हस्तक्षेप करावयाचा नाही असे होते. तरी लॉर्ड कॉर्नवॉलिस, लॉर्ड हेस्टिंग्ज यांसारख्या ग. जनरलनी स्त्रीला सती जाण्यास सक्ती करु नये. गरोदर स्त्रीला सती जाण्यास बंदी सोळा वर्षांखालील स्त्रीला सती जाण्यास मज्जाव होता. काही बंधने घातली. विशेषत: सती जाणाऱ्या स्त्रीला सक्ती केली जात नाही ना हे पाहण्यासाठी प्रसंगी पोलीस पथक ही नेमले होते.

राजा राममोहन रॉय या समाजसुधारकांनी सती प्रथेविरुध्द आवाज उठविला. ही प्रथा बंद व्हावी यासाठी विल्यम बेटिंगला उत्तेजन दिले. त्याचप्रमाणे डिसेंबर १९२९ च्या अधिनियम XVII नुसार सतीकृती किंवा जीवंत स्त्रीला जाळणे वा पुरणे बेकायदेशीर ठरविण्यात येऊन मनुष्यवधाचा गुन्हा समजून फौजदारी कोर्टाद्वारे शिक्षेची तरतूद केली. हा सतीबंदीचा कायदा फक्त बंगाली प्रांतापुरताच लागू होता. (१८२९) १८३० साली या कायद्यात सुधारणा करुन मुंबई व मद्रास प्रांतासाठी लागू करण्यात आली. अशा प्रकारे ही प्रथा कायद्याने बंद केली.

**बालहत्या** :

कन्या होणे हे अशुभ मानले जाई. कन्या होणे मोठे आर्थिक धोंड अशा समजूतीने तिला मारुन टाकण्याची दुसरी भयंकर प्रथा बंगाली व रजपूत लोकांत रुढ होती. आईवडिलांना आपल्या कन्येचे लग्न वेळेत लावता आले नाही तर त्यांची समाजात बदनामी होई. धार्मिक आज्ञेचा भंग मानला जाई. त्यामुळे काही जमातीत मुलगी झाली की जन्मत:च मारुन टाकले

जाई. अशी वाईट प्रथा समाजात होती. रणजितसिंगाचा मुलगा दिलीपसिंग म्हणतो की, लाहोर येथे त्याच्या बहिणीने तिच्या नवजात कन्येला पोत्यात घालून नदीत फेकून दिल्याचे त्याने पाहिले होते. अनिष्ट प्रथा बंद होणे आवश्यक आहे. यासाठी १७९५ चा बंगाल अधिनियम (XXI) आणि १८०४ अधिनियम III याद्वारे बालहत्या बेकायदेशीर ठरविण्यात आली. अशा प्रकारचे खुनाचे कृत्य करणाऱ्या व्यक्तीस शिक्षा होत असे.

**विधवा पुनर्विवाह –**

सती प्रथा, स्त्रीभृणहत्या यांसारख्या प्रथा बंद करुनही समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारली नव्हती. विधवा पुनर्विवाह, मुलींच्या विवाहाचे वय वाढविल्याने स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारण्याला हातभार लावला. ब्राम्हो समाजाने विधवा प्रश्नांबाबत वादविवाद करुन अनुनयामध्ये यासारखी लोकप्रियता मिळविली. पंडित विद्यासागर यांनी या क्षेत्रात मोलाची भर टाकली. प्राचीन संस्कृतीमधील जुने पुरावे शोधून काढून वैदिक वाङ्मयाने विधवा पुनर्विवाहाला कशी चालना दिली. या संदर्भात सरकारने कायदेशीर तरतूद करावी अशा प्रकारची विनंती करणारे ९६७ लोकांच्या सह्यांचे एक निवेदन सरकारला सादर केले. त्यांच्या प्रयत्नाला यश येऊन १८५६ साली हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला. त्यामुळे कायदेशीररित्या संततीला मान्यता मिळाली.

धोंडो केशव कर्वे यांनी हा प्रश्न उचलून धरुन. गोदूबाई या ब्राह्मण विधवेशी १८९३ साली विवाह केला. मद्रासमध्ये विरेश लिंगम पंतलू यांनी खूप परिश्रम घेतले. कर्वेंनी १९१६ साली मुंबईत भारतीय महिला विद्यापीठाची स्थापना करुन महिलांना शिक्षणाची संधी प्राप्त करुन दिली.

१८४९ साली कलकत्ता येथे बेथूनने मुलींसाठी शाळा सुरू केली. स्त्री शिक्षण लोकप्रिय करण्यामागे पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे योगदान मोलाचे होते. बंगालमधील ३५ पेक्षा अधिक शाळांशी त्यांचा संबंध होता. मुंबई प्रांतात एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी स्त्री शिक्षण चळवळीत आघाडी घेतली आणि स्टुडंडटस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीची स्थापना केली. नाना शंकर शेठने मुंबईत तर म. फुले यांनी पुण्यात १८४८ ला मुलींसाठी शाळा सुरू केल्या. सावित्रीबाईंनी मुलींना शिकविण्याचे काम केले. १८५४ च्या वूडच्या खलित्यात स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला होता.[२७]

## २.४ धार्मिक स्थिती :

एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात वैचारिक क्रांतीमुळे मानवी जीवनमानच बदलून गेले. बुध्दिवाद, तर्कनिष्ठा, मानवतावाद या तत्त्वांनी आधुनिक दृष्टिकोनाला आधार दिला. यातून भारतीय समाज व्यवस्थेचे परीक्षण करता येऊ लागले. समाजातील सामाजिक विषमता, अन्याय, जुलूम दूर करण्यास सुरुवात झाली. भारतीय समाजसुधारणेसाठी कोणत्या गोष्टी प्रेरक ठरल्या याविषयी इतिहासकारांनी भिन्न मते मांडली आहेत. चार्लस हीमसाथ सारख्या काही इतिहासकारांनी त्यामागे केवळ पाश्चात्य विचारांची प्रेरणा दिसते. सुशोमन सरकारसारख्या इतिहासकारांला ही मीमांसा मान्य नाही. परकीय वसाहतवादी शासन हे जित समाजाच्या पुनरुत्थानामागील प्रेरणा असू शकत नाही. उलट असे शासन सुधारणेच्या प्रक्रियेत अडथळेच निर्माण करते, असे त्यांचे मत होते.

सामाजिक सुधारणाचे हनन करणे हे अंतिम उद्दिष्ट नसून वसाहतवाद विरुध्द निर्माण झालेल्या प्रतिकूल जाणिवेचा तो एक भाग होता. याची जाणीव पाश्चात्य शिक्षणातून मिळाली. धार्मिक सुधारणेच्या माध्यमातूनच सामाजिक उत्कर्ष होतो. धर्म ही समाज जीवनाचा मूळ आधार आहे. भारतीयांच्या मनात या चळवळीने प्रारंभ केला. त्यातून सामाजिक सुधारणा आकार घेवू लागल्या. सतीची प्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्वाची प्रथा, बाल जरठ विवाह, विधवा स्त्रियांवर होणार जुलूम, अन्याय जातिभेद इत्यादी अनिष्ट रुढींचा उगम धर्मशास्त्रात आहे. अशी समजूत त्याकाळी प्रचलित होती. त्याचे निर्मुलन करण्यासाठी धर्माची मूलतत्त्वे लोकांना समजावून सांगणे महत्त्वाचे होते. शिवाय धार्मिक क्षेत्रातील शब्दप्रामाण्य, कर्मकांडाचे स्तोम, अंधश्रध्दा, पुरोहित वर्गाकडून अज्ञानी समाज गटाचे होणारे शोषण, मूर्तिपूजा व अनेक देवदेवतांची उपासना व्रतवैकल्ये हाच धर्म असा समज होता. ही नाहिशी झाल्याशिवाय समाजाचा विकास होणार नाही, याची जाणीव सुधाकरांना होती. म्हणूनच भारताच्या प्रबोधनाचे स्वरुप धार्मिक सुधारणेपुरते संकुचित नसून सर्वांगीण सुधारणेचे ते एक रुप होते. भारतीय समाजसुधारकांनी या चळवळीच्या माध्यमातून समाज प्रबोधन करत लोकांमध्ये जागृती घडवून आणली.[२८]

महाराष्ट्राला फार मोठी सांस्कृतिक परंपरा व वारसा लाभलेला आहे. समाजातील लोक सण, उत्सव, व्रतवैकल्ये, पूजा–अर्चा, संस्कार, मूर्तीपूजा मोठ्या भक्तीभावाने करीत असतात.

महाराष्ट्राला संतांची मोठी देणगी मिळाली आहे. अनेक धर्मपंथांमध्ये वेगवेगळे संत निर्माण झाले. त्यांनी आपल्या साहित्यातून लोकांचे प्रबोधन केले. एकोणिसावे शतक हे प्रबोधनाचे शतक मानले जाते. या काळात विज्ञान, तत्वज्ञान, दळणवळण इ. क्षेत्रात शोध लागले. या शोधाचा उपयोग लोक आपल्या व्यावहारिक जीवनात करीत असत. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात दसरा, संक्रांत, वसंतपंचमी, होळी, बलिप्रतिपदा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा इत्यादी सण उत्सव कमी अधिक प्रमाणात साजरे केले जात होते. जन्मोत्सव, गर्भाधान, जातकर्म, नामकरण, व्रतबंध हे संस्कार समाजात रुढ होते. 'जावळे' काढण्याचाही विधी केला जात असे. प्राचीन काळात माणसाच्या पाळण्यापासून ते थडग्यापर्यंत संस्काराचे सोळा प्रकार दिलेले असून त्यानुसार मुलांचा विधी केला जात असे. समुद्र पर्यटन करण्यास बंदी होती. एखाद्या माणसाने समुद्र पर्यटन केले तर त्यास प्रायश्चित्त दिले जाई. हिंदू धर्मात मूर्तिपूजेला खूप महत्व होते. घराघरातून मूर्तीपूजा केली जात असत. खंडोबा, विठोबा, गणपती इ. दैवतांना लोकांच्या दृष्टीने खूप महत्व होते.

महाराष्ट्राला फार पूर्वीपासून सांस्कृतिक परंपरेचा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे भारतीय समाज वेगवेगळ्या जातीपंथामध्ये विभागलेला दिसून येतो. त्यांच्या चालीरीती परंपरा यात भिन्नता आढळते. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात सर्वसामान्य लोकांच्या मनावर धर्माचा फार मोठा पगडा होता. धार्मिक आचार विचार यांना लोक अतिशय महत्त्व देत होते. देवधर्माविषयी त्यांच्या मनात श्रद्धा असल्याने धर्माचे पालन करणे हा आपल्या कर्तव्याचा एक महत्वाचा भाग आहे अशी त्यांची समजूत होती. त्यामुळे समाजात धर्माला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. या काळात धार्मिक प्रश्नांबाबत समाजात उलटसुलट चर्चा केली जात होती. एकोणिसाव्या शतकात धर्मासंबंधी बरेच विचार मंथन झाले होते. धर्माच्या नावाखाली समाजात जे अनिष्ट प्रकार चालले होते त्यावर हिंदू धर्मातीलच काही विचारवंतांनी जोरदार टीका केली. या विचारवंतांना हिंदू धर्माविषयी आत्मियता वाटत होती. परंतु धर्माच्या नावाखाली चाललेल्या अनिष्ट प्रकारामुळे हिंदू धर्माची प्रतिमा मलीन होत होती, अशी त्यांची तक्रार होती. त्यामुळे हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न चालविले होते. दंगलीच्या निमित्ताने दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप केले गेले. त्याचा परिणाम असा झाला की, दोन्ही धर्मीयांमध्ये

परस्परांविषयी द्वेषची, कटूतेची भावना वाढीस लागली. हे जातियतेचे भूत घालविण्यासाठी हिंदू–मुस्लीम या जमाती एकत्र येणे आवश्यक आहे.

समाजातील काही लोक धार्मिक बाबींकडे चिकित्सक वृत्तीने बघतात तर बहुसंख्य लोक धार्मिक बाबतीत जुन्या रुढी, प्रथा यांना चिकटून बसलेले असतात. ते धर्माला महत्त्व देत असत. या सामान्य लोकांच्या मनात धर्म खोलवर रुजलेला होता. हिंदू धर्म हा प्राचीन पुराण काळापासून असलेला धर्म आहे.

आपल्या भारताची संस्कृती जगात श्रेष्ठ दर्जाची मानली जाते. या संस्कृतीचा अभ्यास इतर परकीय देश करतात. लो. टिळकांनी गणेशोत्सव, शिवजयंती हे उत्सव सुरू करुन लोकांना सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. त्यामुळे अनेक समाजातील लोक धार्मिक कार्य आहे म्हणून या सांस्कृतिक उत्सवात सहभागी होत असत. आज या धार्मिक कार्यक्रमांचे रुपांतर राजकीय व्यासपीठ बनलेले आहे.

## २.५ आर्थिक स्थिती :

भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा होता, भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीवरच अवलंबून होती. शेतातून पिक काढून शेतकरी आपली उपजिविका भागवत असे. संपूर्ण देशाला अन्नधान्य पिकविण्याचे काम शेतकऱ्याला (बळीराजाला) करावे लागत आहे. त्यामुळे शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. विसाव्या शतकातील महाराष्ट्राची आर्थिक स्थिती ही एकोणिसाव्या शतकासारखीच होती. त्यात फारसा बदल झाला नव्हता. जैसे थी परिस्थिती होती. शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. तांदूळ, ज्वारी, बाजरी व कडधान्ये, तेल बियांचे उत्पादन घेतले जात असे. या काळात शेती ही पारंपरिक पद्धतीने केली जाई. त्यामुळे उत्पादन फारसे होत नसे. त्यामुळे इतर व्यवसाय केले जात असत. शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा होता. या व्यवसायातून सरकारला कराच्या रुपाने महसूल मिळत असत.[२९] विसाव्या शतकात राजकीय घडामोडी होवून ब्रिटिश सत्तेचे आगमन महाराष्ट्रात झाले. आपल्या प्रगत तंत्रानी कारभार करण्यास त्यांनी सुरुवात केली. त्या अगोदर पेशवाईच्या काळात तर पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले होते. त्यामुळे शेतीमालाच्या उत्पादनात वाढ झाली. गावचा प्रमुख पाटील, कुलकर्णी हे दोघे गावचा कारभार पाहत असत.

गावाच्या (ग्रामाच्या) संरक्षणाची करवसुलीची जबाबदारी त्यांच्यावर होती. उत्तर पेशवाईच्या काळात मात्र जमीन महसूलाच्या वसूलीसाठी शेतकऱ्यांचा छळ केला जाई. दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांसाठी विहिरी किंवा पाटबंधाऱ्याची सोय उत्तर पेशवाईच्या काळात विशेष झालेली दिसत नाही. त्यामुळे ऐंशी टक्के शेतकरी जे कोरडवाहू शेती करीत होते. त्यांना आपली उपजिविका भागवणे कठीण झाले होते. शेतमजुरांची अवस्था तर फारच वाईट होती.

प्राचीन व मध्ययुगीन काळात प्रत्येक खेडी स्वयंपूर्ण होती. मात्र बंदिस्त समाजजीवन समृध्द नव्हते. ग्रामसंस्था ही भारतातील एक प्राचीन संस्था होती. वर्षानुवर्षे ती टिकून राहिलेली होती. मध्यवर्ती शासनात (सरकारात) कितीही बदल झाले तरी ग्रामसंस्थेवर त्याचा विशेष परिणाम होत नसे. कारण नवे राज्यकर्ते खेड्यांच्या प्रशासन व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न सहसा करीत नसत. इंग्रज राजवटीची स्थापना भारतात होण्यापूर्वी भारतीय खेड्यांची प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक स्वायत्तता अबाधित होती. पण इंग्रज सत्तेचे आगमन झाल्यानंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी खेड्यांच्या व्यवस्थेत हस्तक्षेप केला. मात्र अर्थव्यवस्थेत बदल घडून आले नाही. पारंपारिक व्यवस्था होती. तशीच टिकून होती. खेड्यातील शेतकरी शेतातून पिक काढून गावातील लोकांच्या गरजा भागवत असत. शेती पिकविणारा शेतकरी व गावातील इतर व्यवसाय करणारे यांचे संबंध चांगले होते. गावात बारा बलुतेदार होते. चौगुला, सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, परीट, गुरव, कोळी, महार, मांग, चांभार इ. या घटकांमार्फत गावाचा कारभार चालत असे. त्यालाच 'गावगाडा' असे म्हटले जाई. हे लोक आपल्या वस्तू गावातील लोकांना विकत. त्याच्या मोबदल्यात त्याला धान्य दिले जाई. त्याला 'बलुतं' असे म्हटले जाई, ही प्रथा मध्ययुगीन काळात व मराठेशाहीच्या काळात अस्तित्वात होती. ग्रामीण समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या पांढरीविषयी अत्यंत ओढ होती. त्यामुळे व्यवसाय किंवा रोजगारासाठी गाव सोडून लोक जाण्यास सहसा तयार होत नसत. दुसरी बाब म्हणजे इंग्रजी राजवटीच्या स्थापनेनंतर येथे औद्योगिकीकरणास फारसी चालना मिळाली नव्हती. एकोणिसाव्या शतकात मुंबई वगळता महाराष्ट्रातील इतर शहरांचा औद्योगिक विकास फारसा झाला नाही. त्यामुळे आपल्या परंपरागत व्यवसायाचा त्याग करण्याचे ग्रामीण समाजातील लोकांची तयारी नसे. बलुतेदारीत बरेच दोष आढळून येतात. त्यात तिचा सर्वात महत्वाचा दोष म्हणजे ही पद्धती जाती व्यवस्थेशी निगडीत होती. अलुतेदार व बलुतेदार यांचे व्यवसाय

जातिनिहाय म्हणजेच जातीनुसार निश्चित करण्यात आलेले होते. त्यांचे व्यवसाय वंशपरंपरेने चालत असल्यामुळे लोकांना व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. तसेच अन्य पर्याय नसल्यामुळे आहे त्या व्यवस्थेला चिकटून राहणे त्यांना भाग पडत असे.[३०]

ब्रिटिश राजवटीच्या काळात मोठ्या प्रमाणात शेतकरी दरिद्री बनत चालला होता. अंतर्गतदृष्ट्या शेतकरी जरी मुक्त असला तरी भौतिक परिस्थितीशी सामना करता–करता दारिद्र्याच्या विळख्यात अडकला गेला. रॉबर्ट क्लाईव्ह आणि वॉरन हेस्टिंग्ज यांनी बंगाल प्रांतातून जास्तीत जास्त महसूल गोळा करण्यावर भर दिला. बंगालच्या १/३ प्रदेशाचे एका जंगलामध्ये परिवर्तन/रुपांतर झाले. तेथे रानटी जनावरे राहतात अशी तक्रार कॉर्नवॉलिसने केली. परंतु पुढे परिस्थिती सुधारली नाही. शेतकऱ्यांची स्थिती ही जमिनदारांच्या लहरी, दयेवर अवलंबून होती. जमीन महसूल परवडेल इतका होता. मात्र वेठबिगारांची स्थिती वाईट होती. बेकायदेशीररित्या पट्ट्या वसूल केल्या जाई. रयतवारी, महालवारी पध्दतीत शेतकऱ्यांची स्थिती फारसी चांगली नव्हती. सरकारने जमीनदारांची जागा घेवून चढ्या दराने महसूल आकारत असे. महसूल आकारणीचे प्रमाण शेतमाल उत्पादनाच्या एक तृतीयांस ते एक द्वितीयांस इतके होते. एकोणिसाव्या शतकात दारिद्र्यात वाढ होऊन शेतीची वाताहत झाली. चढ्या दराने महसूलाची आकारणी करणे हे त्यापैकी एक कारण होते. इ. स. १८२६ मध्ये बिशप हेबर लिहितो की, सांप्रतच्या कर आकारणीच्या प्रमाणाखाली ऐतद्देशीय किंवा युरोपियन शेतकरी आपली उन्नती करु शकेल असे मला वाटत नाही. शेतमालाच्या एकूण उत्पादनापैकी निम्म्या उत्पादनाचे सरकार मागणी करते. शेतकऱ्यांची स्थिती दयनीय होती. वर्षानुवर्षे जमीन महसूलात वाढ होत गेली. १८५७–५८ मध्ये १५.३ कोटी रुपये होती. १९३६–३७ मध्ये ती ३५.८ कोटीपर्यंत वाढली. तरी शेतमालाच्या एकूण उत्पादनापैकी जमीन महसूलापोटी वसूल केल्या जाणाऱ्या उत्पादनाचे प्रमाण विशेषतः विसाव्या शतकात कमी झाले. कारण किंमती वाढल्या तसेच उत्पादन ही वाढत गेले. त्या प्रमाणात जमीन महसूलाचे प्रमाण वाढविण्यात आले नाही. कारण जादा भाव आकारला गेल्याने त्याचा अनिष्ट परिणाम झाला. पीक सरासरीपेक्षा कमी असेल अथवा अजिबात नसेल तरी जमीन महसूल ठराविक तारखेलाच भरावा लागत असे. पीक चांगले आल्यास त्याला जमीन महसूल देता येत असला तरी ते कमी झाल्यास जमीन महसूल देणे कठीण जात असे. महसूलाची रक्कम वसूल करण्यासाठी सरकार

जमीन विक्रीस काढत असत. परंतु बहुतेक वेळा स्वत: शेतकरीच जमिनीचा तुकडा विकण्यास तयार होत. जमीन विकण्याशिवाय पर्याय नव्हता. अनेक वेळा जमीन महसूल जमा न करता आल्यामुळे शेतकऱ्यांना सावकाराकडून व्याजाच्या रुपाने कर्ज काढावे लागत. जमीन विकण्यापेक्षा सावकराकडे शेतजमीन गहाण ठेवून कर्ज काढण्याकडे शेतकऱ्यांचा कल अधिक होता.[३१]

जगामध्ये भारताची ख्याती एक संपन्न राष्ट्र म्हणून होती. भारतीय कारागीरांचा माल देश विदेशात पाठविला जात असत. भारतीयांचे पाश्चिमात्त्यापेक्षा उत्पादनाबाबत अव्वल दर्जाचे तंत्रज्ञान होते. उत्तम, कापूस, सुती, रेशमी कापड, तसेच लोह, तांबे, सोने इत्यादी धातूचे अलंकार तयार केले जात असत. जगाच्या बाजारपेठामध्ये रेशीम, सुती कापड, मसाले, नीळ, साखर, मौल्यवान खडे, पोलाद, अफू इत्यादी वस्तू विदेशात निर्यात केल्या जात होत्या.[३२]

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून बलुतेदारी पद्धतीला तडे जाण्यास सुरुवात झाली. तथापि दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून खऱ्या अर्थाने तिच्या विघटनाची प्रक्रिया सुरू झाली. शेती व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा होता. बहुसंख्य लोकांची शेतीवर उपजिविका चालत असे. तेव्हा शेतकरी हा सर्वांचा पोषणकर्ता होता. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे खरे स्वरूप कसे होते यावरून शेतकऱ्याची आर्थिक स्थिती जाणून घेणे आवश्यक ठरते. भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यावर ग्रामीण समाजाच्या अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण बदल होईल असे वाटले तरीही विशेष बदल झाले नाहीत. परिणामी इंग्रजी सत्तेचे भारतीयांच्या आर्थिक जीवनावर बरेवाईट परिणाम झाले. भारतीयांचे आर्थिक शोषण करणे हे ब्रिटिश वसाहतिक शासनाचे मुख्य उद्दिष्ट होते. या त्यांच्या नीतिमुळे भारतातील हस्तकला व्यवसायाचा ऱ्हास झाला. त्यांच्या जमीनविषयक धोरणाचेही शेती व्यवसायावर विपरित असे परिणाम झाले. ब्रिटिश शासक भारतीयांची कशी पिळवणूक करीत याचे विदारक चित्र दादाभाई नौरोजी यांनी आपल्या 'पॉव्हर्टी अँड ब्रिटिश रुल इन इंडिया' व 'अर्थिक निःसारण' या ग्रंथात मांडले आहे.

दादाभाई नौरोजींनी आर्थिक नि:सारण हा सिध्दांत १८६७ मध्ये मांडला इंग्लंड भारतीय संपत्तीचा ऱ्हास करीत आहे. संपत्तीचे नि:सारण हे भारतीयांच्या दारिद्र्याचे मूळ कारण आहे. हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेची ती वाईट बाब आहे. ही आर्थिक कायद्याची क्रूर अंमलबजावणी नसून ब्रिटिश धोरणाची अविचारी आणि निर्दयी कृती आहे. भारताच्या वस्तू भारतात खाऊन

राहिलेल्या वस्तू इंग्लंडला नेणे क्रूरपणाचे आहे. असे इंग्लंडवर दोषारोपण केले आहे. अर्ध शतकभर या सिध्दांताविषयी जोरदार मोहीम उघडली. दादाभाई नौरोजींनी १८५१ ते १८७१ या वीस वर्षाच्या कालखंडात हिंदुस्थानच्या द्रव्याचे शोषण कशा पध्दतीने चालू आहे. हिंदी जनता कशी दरिद्री बनत चालली आहे. याचा अंदाज घेतला. द्रव्य शोषण थांबल्याशिवाय हिंदी जनतेचा उध्दार होणार नाही. असा ठाम विश्वास त्यांचा होता. १८७१ साली ईस्ट इंडिया फिनॅक्स कमिटी या नावाची संस्था उभारण्यात येऊन तिने आपले विचार मांडले. हिंदी जनतेचे दरवार्षिक उत्पन्न अवघे वीस रुपये एवढे होते. हे उत्पन्न सरकार तुरुंगातील कैद्यांसाठी दरमाणसी जो खर्च करते. त्याहूनही कमी आहे. असे त्यांनी समप्रमाण सिध्द केले आहे. जनतेचे दारिद्र्य असेच वाढत गेले तर ब्रिटिश साम्राज्यात भारतीय जनतेच्या पाचवीस तांडव बांधले आहेत. हिंदी आपत्तीला लागलेली मोठी गळती मानली गेली आहे. तिचे स्वरुप दोन प्रकारचे होते. एक राजकीय स्वरुपाचे तर दुसरे व्यापारी किंवा औद्योगिक या घटकांपर्यंत पोहोचलेले होते. हिंदुस्थानच्या या संपत्तीला मोठी गळती लागली आहे. तिचे स्वरुप द्वितीय आहे. पहिल्या प्रकारात युरोपियन अधिकारी येथे जो पैसा साठवून ठेवतो तो हानीकारक आहे. इंग्लंडमध्ये नेमण्यात आलेल्या लोकांना जे पगार व पेन्शन दोन्ही गोष्टी पाठवितात. हिंदुस्थान सरकार विलायतेत जो खर्च करतो. गळतीचा दुसरा प्रकार म्हणजे बिनअधिकारी युरोपियन लोक येथे जो पैसा कमावून विलायतेत पाठवितात तो या गळतीमुळे हिंदुस्थानात भांडवल साठवू शकत नसल्यामुळे ब्रिटिश लोक येथून धुवून नेलेला पैसा पुन्हा भांडवल रुपाने परत आणतात. त्यांना येथून उद्योगधंद्यांचा जणू काही मक्ताच घेतला. म्हणूनच या मार्गाने ते हिंदुस्थानच्या द्रव्याचे अधिकच हरण करतात. या सर्वांचा उगम सरकारी द्रव्यापहरणाचा आहे. द्रव्यापहरणाच्या सिध्दांतावर पहिला आक्षेप घेण्यात आला की ब्रिटिश अधिकाऱ्यांना जो पगार देण्यात येतो तो सर्वच पैसा बुडीत गेला असे तुम्ही कसे म्हणतात. ब्रिटिश अधिकारी येथे जी नोकरी करतात तिचे योग्य वेतन म्हणून काही आहेच की नाही. त्यामुळे तुम्हांला जी शांतता लाभते तिला काही किंमत आहे किंवा नाही या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असतील तर या अधिकाऱ्यांचा जो पगार आहे त्यापैकी जो भाग ते विलायतेला पाठवितात त्यालाच फार तर द्रव्यहरण असे म्हणता येईल. दादाभाईंना हा युक्तिवाद पसंत नव्हता. युरोपियन अधिकाऱ्यांना जो जो पगार मिळतो. त्यापैकी पै–न्–पै द्रव्य हा आमचा अपहार आहे. कारण हा पैसा वस्तुतः

हिंदी मनुष्यालाच मिळावयास हवा होता. परंतु आज तो ब्रिटिश मनुष्याला मिळत आहे. अर्थात हे सर्वच द्रव्यहरण समजले पाहिजे. मग तो पैसा येथे खर्च व्हावेत किंवा विलायतेत खर्च व्हावेत राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर पुढीलप्रमाणे वक्तव्य केले ते असे – हिंदी लोकांना नेमल्यामुळे खर्च कमी येईल. मला असे वाटते की, हा मुद्दा लोकांना बरोबर आकलन झालेला नाही. वस्तुस्थिती अशी आहे, की हिंदी लोकांना नेमणे हे कमी खर्चाचे आहे इतकेच नाही तर तसे झाल्यास त्याला जो पगार आज मिळतो तो सर्वच्या सर्व आपल्या पदरात पडेल जेव्हा एखाद्या युरोपियनची नेमणूक करण्यात येते तेव्हा ज्या हिंदी लोकांची नेमणूक येथे स्वभावत: व्हावयास हवी. त्यांची जागा तो पटकावतो. नैसर्गिकरित्या हिंदी लोकांना नेमले तर त्यांच्याजवळ जो पैसा येतो तो राष्ट्राच्या दृष्टीने फायद्याचा ठरतो. जो पैसा साठविला जातो राष्ट्राचे हित जोपासतो. परकीय लोकांना मिळालेला पैसा राजकीय हिताच्या दृष्टीने तोटा असतो. उलट हिंदी लोकांना मिळणारी पै ही राष्ट्रीयदृष्ट्या बचत असते.[३३]

इ.स. १७६५ ते १७७० च्या दरम्यान कंपनीने चार मिलियन पौंडाचा माल भारतातून निर्यात होवू लागला. ही रक्कम बंगालच्या महसूलाच्या संदर्भात ३३ टक्के एवढी होती. दरवर्षी कंपनी इंग्लंडला तीन ते चार मिलियन पौंड संपत्ती देत होती. भारतातून आर्थिक ओघ इंग्लंडला जावून त्याचा उपयोग औद्योगिक विकास साधण्यास मदत झाली.

दादाभाई नौरोजींनी आर्थिक नि:सारण सिध्दांत मांडून भारतीय दारिद्र्याचे मुख्य कारण आर्थिक अपहरण सांगितले आहे. इंग्रज भारतीयांचे शोषण कसे करतात, संडरला लिहिलेल्या, १९०५ च्या पत्रात दादाभाई म्हणतात, “भारताची स्थिती अतिशय वाईट आहे. मालक आणि गुलांमाची अवस्था यावरुनही वाईट होती. एका लुटल्या जाणाऱ्या राष्ट्राची अवस्था व यामध्ये लुटारु मनसोक्त लुट करुन सहीसलामत निसटून जातो. भारतात इंग्रजांच्या आधी लुटारू येत पण ते लुटारू व आजच्या इंग्रज लुटारूंची तुलना केली असता मध्ययुगीन लुटारू फक्त श्रीमंतांना लुटत होते. गरीबांना नाही. परंतु आजचे इंग्रज लुटारू हे संबंध भारतात खेड्यापाड्यात पसरुन केवळ श्रीमंताचाच नव्हे तर अतिशय गरीब लोकांपर्यंत पोहोचले. एकंदरीत इंग्रजांची नीती त्रासदायक, रक्तशोषक प्रवृत्तीची होती. त्यामुळे भारतीय द्रव्याचे अपहरण करुन इंग्लडने आपला फायदा साधला.”

अॅडम स्मिथ एकमार्गी व्यवहाराला आणि भारतातून धन कमावण्याला लूट असे म्हणतो. शिवाय कंपनीच्या स्वामित्व अधिकाऱ्याला भारतात लुटारूंची नियुक्ती करणारे अधिकारी असे नाव ठेवतो. इतर देशातून येणाऱ्या मालावर दुप्पट कर तर इंग्लंडमधून येणाऱ्या मालावर अल्प कर होता.

इ. स. १८५२ साली इंग्लंडचे कापड, रेशीम, ऊनी माल, धातू कर पाच टक्के आयात कर लावला जाई. तर तोच माल इतर देशातून आला तर १० टक्के आयात कर भरावा लागत असत. इंग्लंडमधील पुस्तकावर कर नव्हता. परंतु इतर देशातून येणाऱ्या पुस्तकावर तीन टक्के कर आकारला जाई. याचा फायदा इंग्लंडला होत असे. लुटीचे प्रमाण व परिणाम सांगताना म्हणतात की, जो द्रव्यापहार या शतकाच्या प्रारंभी दरसाल तीन लक्ष पौंड होता. तो आज दरसाल तीन कोटी इतका झाला आहे. महंमद गझनीने अठरा स्वाऱ्या करुन अठरा वेळा हिंदुस्थान लुटला. इतिहासतज्ज्ञ म्हणतात, पण त्याने या सर्व स्वाऱ्यात लुटून नेलेली एकूण संपत्ती ही तुम्ही इंग्रजांनी एका वर्षात लुटली होती.

भारतीय संपत्तीचा ओघ लंडनला जात आहे. या संपत्तीचा फायदा भारतीयांना न होता इंग्लंडला अधिक होत होता. भारताच्या आर्थिक स्थितीचे वर्णन करताना लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी 'लक्ष्मी विलायतला चालली' या लेखात भारतीय अर्थव्यवस्थेचे खरेखुरे स्वरूप हिंदी लोकांच्या पुढे मांडले आहे. भारत ही इंग्रजांची हुकूमी बाजारपेठ होती. भारतातून कच्चा माल कमी किमतीत घेऊन लंडनमध्ये तो पक्का तयार करून भारतीय बाजारपेठेत जास्तीत जास्त किमतीने माल विकला जात असे. त्यातून त्यांना मोठ्या प्रमाणात नफा होत असे. मात्र भारतीय मालाला मागणी नसे. कारण जाडे–भरडे कापड आणि किंमत जास्त असल्यामुळे बाजारपेठेत माल खपत नसे त्यामुळे तो माल तसाच गोडावूनमध्ये सडून जात. ब्रिटिशांचे मात्र कापड आकर्षक, सुंदर, किंमत कमी असल्यामुळे भारतीय बाजारपेठेत त्याच्या मालाची विक्री अधिक होत असत. हा मोठा परिणाम आर्थिक स्थितीमध्ये झालेला दिसतो.[३४]

ब्रिटिशांनी जमीन महसूल व्यवस्थेत बदल घडवून आणले मात्र शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे बदल अन्यायकारक ठरले. कंपनी सरकारने जमीन महसूलाच्या वसुलीसाठी बंगालमध्ये कायमधारा पद्धती सुरू केली तर मद्रास व मुंबई प्रांतात रयतवारी पद्धती सुरू केली. मद्रास प्रांताचा गव्हर्नर सर थॉमस मन्रो याने इ. स. १८२० ला आपल्या प्रांतात रयतवारी पद्धती

अंमलात आणली. या पद्धतीमध्ये जमिनीचा मालक किंवा भू-स्वामी आपल्या जमिनीचा शेतसारा सरकारला देत असतो. जमीन मालक शेतसाऱ्यासाठी जबाबदार धरला जाई. त्याला आपली जमीन दुसऱ्याला खंडाने देण्याचा अथवा गहाण किंवा विकण्याचा अधिकार मिळाला होता. अशा मालकी हक्कामुळे शेतकरी शेतामध्ये स्वतः राबून उत्पादन काढत असत. रयतवारी पद्धतीत जमीन महसूल गावाकडून न घेता जमीन मालकाकडून वसूल केला जाई. महसुलाची आकारणी पिक उत्पन्न न पहाता जमिनीच्या निकषावर प्रतवारीवर ठरविली जाई. जमीन महसूल हा रोख पैशाच्या स्वरूपात घेतला जाई. तसेच वेळीच महसूल भरला नाही तर शेतकऱ्याकडून दंड वसूल केला जाई अशी इंग्रजांची जमीन महसूल पद्धती होती. त्यावेळच्या शेती व्यवसायाच्या स्थितीचा विचार करता जमीन महसूलाचे प्रमाण इतके जास्त होते की, सामान्य शेतकऱ्यांना हा महसूल म्हणजे एक न पेलणारे ओझे बनले होते. तसेच सारा वसूल करणारे सरकारी अधिकारी व नोकर शेतकऱ्याकडून बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात महसूलाची वसूली करीत असत. अज्ञानी भारतीय लोकांचा गैरफायदा घेण्यास हे अधिकारी सदैव तत्पर असत. त्यामुळे त्यांच्या अनेक बेकायदेशीर मागण्या शेतकऱ्यांना पुऱ्या कराव्या लागत असे. सारा वसूल वेळेवर भरण्याकडे अधिक दक्ष असत. दुष्काळ पडला तरी सारा माफ होत नसे. शेतकऱ्यांना महसूल कर भरावा लागत असे. इंग्रज सरकारच्या या सारा वसुलीच्या नीतीधोरणामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असत. याची परिणती शेतकरी सावकारशाहीच्या पाशात अडकून भरडला जात होता. दुःख दारिद्र्य व शोषण हे त्याच्या पाचवीलाच पुजले होते. शेतकऱ्याचा जन्म कर्जातच होतो आणि कर्जातच मरण पावतो. अशी त्यांची दैन्यावस्था होती, पूर्वी सावकार व शेतकरी यांचे संबंध चांगले होते. सावकार गावकऱ्यांना भीत असत परंतु इंग्रजी सत्तेमुळे त्यांना फायदा झाला. इंग्रज व सावकार हे दोघे मित्र बनले. पुढे मात्र परिस्थिती बदललेली दिसते. शेतकऱ्याचे अज्ञान, दारिद्र्य व त्यातून आलेली अगणिकता याचा लाभ उठविण्यासाठी डोळे लावून बसलेला सावकारांचा एक वर्ग ग्रामीण भागात उदयास आला. कौटुंबिक अडीअडचणी सोडविण्यासाठी व सरकारी वसूल भागविण्यासाठी गरीब शेतकऱ्याला सावकाराकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घ्यावे लागत असत.[३५] सावकाराच्या घराचा उंबरठा झिजविण्याशिवाय शेतकऱ्याला पर्याय उरला नव्हता. सावकाराचे व्याजदर भरमसाठ असल्याने सामान्य शेतकरी या ओझ्याखाली दबला जात असे.

मुद्दल तर बाजूला ठेवा पण त्यावरील व्याज नियमितपणे भरणे शक्य नव्हते. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन कर्जासंबंधीचे खोटे (दस्तऐवज) तयार करण्यास म्हणजेच कागदावर कर्जाचे खोटे आकडे लिहिण्यास सावकार मागेपुढे पहात नसे.

थोडक्यात शेतकऱ्याचा जन्म कर्जातच होतो आणि कर्जातच मरण पावतो. सावकारी पाश त्याच्या गळ्याभोवती आवळलेला असतो. कागदपत्रावर शेतकऱ्याच्या जमिनीचा गहाणखत लिहून घेत असत. कर्ज फिटले नाही तर जमीन विकून सावकार कर्ज वसूल करीत असत. सावकाराच्या दमननीतिचे चित्रण म. फुले यांनी पुढील शब्दात केले आहे.

हिशोबी घोळ सर्व गोंधळ वाढवी कर्ज डोईवर ।
आतून होई सावकार। पैसा देई गहाणावर।।
वेळ पाहून संधी साधून। मागणी नेट व्याजवर।
तगादा धाडी पाठीवर। दामदुप्पट सर्व एकवर।
नोंदतो गहाण खतावर दुमाला पुस्त रजिस्टर ।।

हा सावकार आपले पोट व्याजावर भागवत असत.[३६]

साम्राज्यवाद्यांनी शेतकऱ्यांचे अनेक प्रकारे मोठ्या प्रमाणात शोषण केले. भारतातील कच्चा माल निर्यात करून भारतात आपल्या कारखान्यातील पक्का माल विकावयास सुरुवात केली. त्यामुळे भारतीय देशी उद्योगधंदे व हस्तोद्योग बंद होऊ लागले. मात्र, आपल्या युरोपियन नोकरास गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळत असे. इंग्रजांनी कालवे बांधण्यावर फारसा खर्च केला नाही. परंतु सरंजामशाही काळात गावोगावी कालवे व तळी बांधण्यावर भर दिला होता. शेतीचे उत्पादन फारसे वाढले नाही पण शेतीवर अवलंबून असणाऱ्या/राहणाऱ्या लोकांची संख्या मात्र वाढली. मराठेशाहीत लाखोच्या संख्येने लोक आपला मुलूख सोडून परराज्यात जात असे. पण इंग्रज राजवटीच्या काळात शेतीकडे दुर्लक्ष झाल्याने शेतीचे उत्पादन घटले. अशा स्थितीत देशात मोठ-मोठे दुष्काळ पडले. या दुष्काळात लाखो लोक मरण पावले. १८७७-७८ साली मुंबई प्रांताच्या दक्षिण भागात मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळात पाच ते सहा लाख लोक तडफडून मरण पावले. १८६० च्या इंडिगो कमिशनने निर्देशनास आणले की १० लाखापेक्षा जास्त मजूर चहा, रबर व कॉफी मळ्यात काम करत तसेच कपडा, कोळसा व लोखंड, पोलाद कारखाने, इंजिनिअरिंग क्षेत्रात जेवढे कामगार आहेत त्यांच्यापेक्षा दोन तृतीयांश

कामगार नव्या मळे पध्दतीत आहेत. त्यापेक्षा ही महत्त्वाची गोष्ट म्हणजे उपासमारीने मरण पावणाऱ्या लोकांची चिंता न करता मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य भारतातून निर्यात केले जावू लागले. १८४९ मध्ये ८,५८,००० पौंड किंमतीचे धान्य निर्यात केले तर १८५८ मध्ये ३८ लाख पौंड किंमतीचे धान्य बाहेर पाठविण्यात आले. धान्य निर्यातीचा आकडा १८७७ मध्ये ७९ लाख पौंड, १९०१ मध्ये ९३ लाख पौंड होते आणि १९१४ मध्ये १९३ लाख पौंड किंमतीचा होता.

याच सुमारास एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दुष्काळांची संख्या आणि तीव्रता यात वाढ होत गेली. डब्ल्यू. एस. लिलीने आपल्या भारत आणि त्यांच्या समस्या या ग्रंथात सरकारी आकडेवारीनुसार दुष्काळ स्थितीची आकडेवारी दिलेली आहे.[३७] पुढील तक्त्यावरून भारतातील दुष्काळात किती लोक मरण पावली याची आकडेवारी पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

| वर्ष | मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या |
|---|---|
| १८००–१८२५ | १०,००,००० |
| १८२५–१८५० | ४,००,००० |
| १८५०–१८७५ | ५,००,००० |
| १८७५–१९०० | १५,००,००० |

यावरील आकडेवारीवरून आपणास असे सांगता येईल की, या शंभर वर्षांच्या काळात मोठे दुष्काळ पडले. लाखो लोक अन्न–अन्न करून मृत्युमुखी पडले. प्रत्येक वर्षाची आकडेवारी डोळ्यासमोर घेतली तर प्रत्येक वर्षात कमी अधिक दुष्काळाचे चित्र आपणास दिसते. सर्वात जास्त कडक दुष्काळ १८७५–१९०० मध्ये पडला होता. यावेळी पंधरा लाख माणसे अन्न–अन्न करून मरण पावली. शेतकरी व आदिवासी इ. लोकांवर उपासमारीची पाळी आल्यामुळे त्यांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. त्यात खानदेशात भिल्ल लोकांनी बंड केले. इ. स. १८३२ मध्ये ओल्या दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी पुण्यात बंड केले. ही सर्व बंडे इंग्रजांच्या अन्यायी, जुलमी धोरणामुळे झालेली होती.[३८]

## २.६ समारोप

१९ वे शतक हे महाराष्ट्रातील इतिहासास कलाटणी देणारे शतक समजले जाते कारण या शतकाच्या प्रारंभीच इंग्रजी सत्ता भारताबरोबरच महाराष्ट्रात स्थिर झाली होती. इंग्रजांनी

महाराष्ट्रातील पेशव्यांची सत्ता संपुष्टात आणल्याने शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य संपुष्टात आले होते. महाराष्ट्रात घडून आलेल्या या राजकीय परिवर्तनाचे दूरगामी परिणाम येथील समाजाच्या व समाजजीवनाच्या सर्वच अंगावर झाले. महाराष्ट्रात नव्या युगाची सुरूवात झाली. पेशवेकाळातील महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अशांतता व अराजकता, अनास्था व अनाचार संपून इंग्रजांच्या राजवटीत सुनियोजीत व सुव्यवस्थित अशी कार्यक्षम शासनपद्धती सुरु झाली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या देशातील प्रजेबरोबर एक वेगळा विचारप्रवाह सुरू केला. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, श्रेष्ठत्व–कनिष्ठत्व इ. प्रातिगामी विचारांनी जखडलेल्या अनेक वाईट चालीरिती, रूढी परंपरा यांनी बांधल्या गेलेल्या येथील समाजाला सामाजिक समतेचा नवा संदेश त्यांनी दिला.

इंग्रजी राजवटीच्या आगमनाने या देशात नव्या विचारांचे वारे वाहू लागले. सर्व समाज संक्रमणावस्थेतून वाटचाल करू लागला. येथील समाजाला नवा साक्षात्कार झाला. या परिवर्तनामुळे येथील धार्मिक, सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक जीवन ढवळून निघाले. पाश्चात्यांचे आधुनिक, वैज्ञानिक, प्रगत व पुरोगामी विचार आत्मसात करणे येथील समाजाला जड गेले. त्यामुळे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिवर्तनात अनेक अडसर निर्माण झाले होते. महाराष्ट्रातील समाज आपली परंपरागत चालत आलेली जुनी संस्कृती सोडण्यास सहजासहजी तयार नव्हता. तर दुसऱ्या बाजूला परिस्थितीच्या दबावामुळे होऊ लागलेल्या परिवर्तनाला तो रोखूही शकत नव्हता. अशा प्रकारे या समाजाची झालेली कोंडी फोडण्याचे महत्वाचे कार्य या शतकात समाजसुधारकांनी केलेले दिसून येते. इंग्रजांच्या परकीय सत्तेचे राजकीय स्वरूप वेगळे व आकर्षक असले तरी या मागचा त्यांचा आर्थिक हेतू वेगळाच आहे याची जाणीव काही समाजसुधारकांना झाली होती. राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनातील आधुनिक व प्रगत प्रेरणांचा स्वीकार केल्याशिवाय आपल्या समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही याची जाणीव महाराष्ट्रातील समाजात निर्माण करण्याचे कार्य या काळात समाज व धर्मसुधारकांनी केले. या समाज व धर्मसुधारकामध्ये महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे वगैरेचा समावेश होतो.

## संदर्भ


१ जाधव व्ही. के., आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००४, पृ. २०८

२. कित्ता, पृष्ठ. २०९

३ कित्ता, पृष्ठ. २१०

४. पाटील व्ही. बी., विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, २००४, पृ. ११

५. कित्ता, पृ. १३

६. कित्ता, पृ. १४

७. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४, पृ. २४८, २४९

८. कित्ता, पृ. २४९, २५०

९. ग्रोवर बी. एल. व बेल्हेकर एस., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी, दिल्ली, २०१५, पृ. २६३

१०. जाधव व्ही. के., आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००४, पृ. २०९, २१०

११. कित्ता, पृ. १०१

१२. कित्ता, पृ. १०१

१३. कित्ता, पृ. १०५–१०६

१४. बिपिनचंद्र, डॉ. एम. व्ही. काळे, मराठी अनुवाद, आधुनिक भारत, के सागर, पब्लिकेशन, पुणे २००६, पृ. २३१

१५. कित्ता, पृष्ठ. २३२

१६. गाठाळ साहेबराव, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, २००५, पृ. ७, ८

१७. वैद्य सुमन, कोठेकर शांता, उपरोक्त, पृ. १०, ११

१८. कित्ता, पृ. १२

१९. बिपिनचंद्र, डॉ. एम. व्ही. काळे, उपरोक्त, पृ. ९

२०. पाटील व्ही. बी., उपरोक्त, पृ. २१, २२

२१. दीक्षित राजा, इतिहास समविचार आणि केशवसुत, लोकवाङ्मयगृह मुंबई, १९९३, पृ. १९
२२. गाठाळ साहेबराव, उपरोक्त, पृ. ८
२३ कित्ता, पृ. ९
२४. पाटील व्ही. बी., उपरोक्त, पृ. २३
२५. बिपिनचंद्र, डॉ. एम. व्ही. काळे, उपरोक्त, पृ. २४३
२६. दीक्षित नी. सी., आधुनिक भारत, पिंपळापूरे नागपूर, २००३, पृ. १८७
२७. कित्ता, पृ. १८८
२८. वैद्य सुमन, कोठेकर शांता, उपरोक्त, पृ. २६२
२९. गाठाळ साहेबराव, उपरोक्त, पृ. १३,१४
३०. पाटील व्ही. बी., उपरोक्त, पृ. २८
३१. बिपीनचंद्र, मॉडर्न इंडिया, के सागर पब्लिकेशन, पुणे, पृ.१८१, १८२
३२. वैद्य सुमन, कोठेकर शांता, उपरोक्त, पृ. १२
३३. जावडेकर श. द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. ११७
३४. आठल्ये वि. भा., आधुनिक भारताचा इतिहास, अंशुल पब्लिकेशन, नागपूर, २००६, पृ. ४१३, १४
३५. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, २००३, पृ. ११
३६.. कित्ता, पृ. १२
३७. पामदत्त रजनी, भारत आजचा आणि उद्याचा, लोकवाङ्मयगृह, मुंबई, जुलै १९८६, पृ. ५६
३८. कित्ता, पृ. ५७

# प्रकरण तिसरे

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण

## ३.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रबोधनास सुरूवात झाली. त्यास अनेक घटना कारणीभूत ठरल्या होत्या. याच काळात महाराष्ट्रात व भारतात अनेक धर्मसुधारणा चळवळ, समाजसुधारकांनी केलेले कार्य, वृत्तपत्रांनी केलेली कामगिरी, पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव, मराठी भाषेत तयार झालेले साहित्य, इंग्रजी भाषेचा परिणाम अशा अनेक कारणामुळे राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. ब्रिटिशांची परकीय सत्ता दूर करून सर्वांगीण प्रगतीसाठी राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता वाटणारा एक गट निर्माण झाला होता. काही लोक क्रांतिकारक चळवळीकडे वळले तर काहींनी सनदशीर मार्गाने ब्रिटिशांकडून स्वराज्य मिळविण्यासाठी संघटनात्मक मार्ग व कृती यांचा अवलंब केला. याचवेळी काही समाजसुधारकांना राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक सुधारणेचे महत्त्व अधिक वाटत होते. तेव्हा त्यांनी बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व सामाजिक व धार्मिक जीवनातील अनिष्ठ परंपरा इत्यांदी दूर करण्यासाठी सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू केली होती. त्यामुळे विसाव्या शतकात सर्वच बाबतीत सुधारणा चळवळी सुरू झाल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होऊन त्यांचा पिंड समाजसुधारणेसाठी तयार झाला होता. तेव्हा आपण या प्रकरणात महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महर्षी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांची समाज सुधारणेबाबत वैचारीक जडणघडण कशी झाली याविषयी सविस्तर माहिती पाहणार आहोत.

## ३.२ कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

महर्षी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे मानवी मूल्यांची जोपासना करणारे असे समाजसुधारक होऊन गेले. ते त्यागाचे व निष्ठेचे प्रतीक असून त्यांनी अज्ञानाविरूद्ध वैचारिक बंड करून जुन्या धार्मिक अनिष्ठ परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वांचा अवलंब करून लोकांच्यात जागृती निर्माण केली. मानवाने मानवावर प्रेम

करावे तसा आचार सर्वत्र घडावा म्हणून आपले जीवन समर्पित केले होते. त्यांच्याकडे विद्वता, संयम व सेवावृत्ती या तत्त्वांचे पालन त्यांनी केले होते. ते एक समाजसुधारक, विविध धर्मातील तत्त्वांचे संशोधक आणि ध्येयवादी विद्वान म्हणून प्रसिद्ध होते.

**विठ्ठल रामजी शिंदे यांचे बालपण व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बालपणी संदर्भातील अनेक घटनांचा परामर्श घेतला तर आपणांस असे दिसून येते की, त्यांच्या बालपणीच्या बाबतीतील तपशील महत्त्वाचा वाटतो. कारण त्यांचे जे व्यक्तिमत्त्व घडले व भावी आयुष्यात त्यांच्या हातून जे कार्य घडले ते महत्वपूर्ण असून खोलवर परिणाम जाणवतो. विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी जमखिंडी (आता कर्नाटक राज्यात) भागात झाला. विठ्ठल रामजी शिंदे यांचे बालपण कर्नाटक राज्यात असलेल्या 'जमखंडी' या गावी कानडी व मराठी संस्कृतीच्या संमिश्र वातावरणात गेले होते. त्यामुळे या दोन्ही संस्कृतीचे संस्कार त्यांच्या मनावर झाले होते. कानडी आणि मराठी अशा दोन्ही संस्कृतीची वैशिष्टये जमखंडीच्या वातावरणात तर होतीच परंतु विठ्ठल रामजी शिंदे यांच्या घरातही आजोबांच्यात मराठयांची तर आजीत कर्नाटकची लक्षणे भरपूर दिसत होती.[१]

जमखिंडी हे गाव विजापूरच्या पश्चिमेस ३६ मैलांवर आहे. त्याकाळी जमखिंडी हे पटवर्धनांच्या अंमलाखाली (४२८ चौ. मैलाचे क्षेत्र) असलेले छोटेखानी संस्थान होते. हा भाग काही काळ कोण्णूरच्या देसाईच्या अधिपत्याखाली होता. पुढे हा मुलुख गोपाळराव पटवर्धन सरकार यांच्या ताब्यात आला. पटवर्धनांनी रामचंद्रराव आप्पासाहेब यास दत्तक घेतले. १८५३ ला राज्याच्या अधिकाराची सूत्रे हाती घेतल्यापासून ५० वर्षे त्यांनी संस्थानातील राज्यकारभार लोकहिताच्या दृष्टीने केला होता. विशेष बाब म्हणजे प्रजाजनासाठी मोफत शिक्षण देण्याची सोय निर्माण केली. वाचनालये काढण्यास उत्तेजन दिले. पाश्चिमात्त्य सुधारणेचा एक भाग आपल्या संस्थानात आणला आणि ब्राह्मण संस्थानात शिक्षणासाठी अनुकूल असे वातावरण झाले.[२]

**विठ्ठल रामजी शिंदे व बसवंतराव (आजोबा)**

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पूर्वजांपैकी त्यांच्या आजोबाविषयी निश्चित माहिती मिळते. आजोबांचे वडील चंद्रोजीराव हे विजापूरपैकी सुरापूरचे जहांगीरदार असल्याचे महर्षी शिंदे स्वतः नमूद करतात. सौंदत्ती येथे बाराव्या शतकात शिंदे घराण्याचे राज्य होते. त्या घराण्यांशी सुरापूरच्या शिंदे घराण्याचा जवळचा संबंध होता. चंद्रोजीराव लढाईत मारले गेले. त्यांचे

चिरंजीव बसवंता हे जमखिंडीस आप्पा दप्तरदारांचा मळा सांभाळून स्वतंत्रपणे राहत असे. त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि विनोदी स्वभावाबद्दल लहानपणीच लहानग्या विठूला आदर आणि आकर्षण वाटत होते. त्यांचे वर्णन करताना ते असे म्हणतात की, ते फार पाणेदार व कर्तृत्ववान पुरुष होते. शरीर सडपातळ, उंच, वर्ण चांगला गोरा, डोळे लाल, भुवया कोरलेल्या असे एकंदर रुबाबदार शरीरयष्ठी होती. त्यांचा पोषाख अस्सल दरबारी मराठेशाहीचा होता. तंगदार पांढरी विजार, घोळदार अंगरखा, पांढरी बिनपिळाची बत्ती मिशा झुपकेदार शुभ्र, लांब व ताठ एकंदरीत रुबाब मनात भरण्यासारखा होता. ते विनोदी स्वभावाचे होते. बसप्पा अथणी यांनी आपल्या मुलाच्या मागे मित्रावर विनोदी पदय रचले होते. जमखिंडीमध्ये बसवंतराव नावाजलेली व समाधानी जीवन जगत असलेली एक असामी होती. ते लष्करी पेशाचे वाटत असत पण नव्हते. शेती हा त्यांचा धंदा होता. लोक त्यास आवडीने सुभेदार या नावाने ओळखत होते. असे विठ्ठल रामजी शिंदे यांचे मत आहे. इ. स. १८७९ च्या दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.[३] विठ्ठल रामजी शिंदे यांचे आजोबा नागरिक, दरबारी व गुलहौसी होते. तर आजी खेडवळ, राकट व कुणबाऊ, यल्लमा या द्रविड देवतेला मानणारी होती.[४]

बसवंतराव (आजोबा) चा खानदानीपणा, स्वाभिमानाने रहाणे व विनोदी स्वभाव हे विठ्ठल शिंदेच्या अंगी उतरले. असावेत असे वाटते. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आजीचे नाव संताबाई असे होते. मुधोळजवळ असलेल्या लिंगनूर नावाचे छोटे खेडे हा त्यांच्या आजीची जन्मभूमी होती. शिंदे यांच्या घराण्याची कुलदेवता तुळजापूरची अंबाबाई ही होती. येथील भाऊराव कदम (भोपे) हे त्यांचे आश्रीत होते. त्याच्या वहीमध्ये विठोबाच्या आजोबाचे नाव बसवंतराव व आजीचे नाव संताबाई असे होते. भोपे मंडळींनी स्वतः विठ्ठलजीला सांगितले होते. या कानडी मुलूखात त्यांच्या आजोबांना बसप्पा व आईच्या आईला आजी सत्यव्वा असे म्हणत. त्यांच्या आजीचा स्वभाव करारी व काही प्रमाणात तामसी होती. ती वर्णाने काळी, रुपाने राकट पण संसारात चतुर उद्योगी व कर्तृत्ववान स्त्री होती. आजीचा भाऊ (व्यंकप्पा) गरीबीमुळे आपल्या मुलाबाळासह बसवंताच्या घरी राहण्यास आला होता. आजीची माहेरची कुलदेवता सौंदत्तीची यल्लमादेवी होती. आजीचा स्वभाव कष्टाळू कर्तृत्ववान व देवधर्म करणारी असल्यामुळे आजोबांनी सर्व जबाबदारी तिच्याकडे सोपविली होती. तिने मोठ्या धाडसाने ती पेलली होती.

आजोबात मराठ्यांची तर आजीत कर्नाटकी लक्षणे फार दिसून येतात, असे विठ्ठल रामजीने म्हटले आहे. आजी खेडवळ, राकट व कुणबास तर आजोबा नागरिक, दरबारी व गुलहौशी दिसत आजी यल्लमाची भक्ती मनोभावे करीत असे. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला जमखिंडीतील लोक यल्लमाची मूर्ती सौंदत्तीला घेऊन मोठ्या थाटामाटात यात्रा साजरी केली जाई. नंतर मूर्ती परत देवळात आणून ठेवली जात असत. या उत्सवाच्या दिवशी घरात गोडधोड खावयास मिळत असत. असे शिंदे लहानपणीच्या आठवणी सांगतात. याकाळात आजी देखील फार आवडत असे. धर्माचे संस्कार माझ्या कोवळ्या मनावर आजीच्या द्राविडी देवतेने उमटविले. आठवण झाल्यावर अजून ते मला रमणीय वाटतात. तुळजापूरची भवानीमाता व सौदत्तीची यल्लमा व कुंचनूरच्या महादेवाची यात्रा करीत असे. तसेच कर्नाटकातील ताईबाई उर्फ येळमक्कळताई (म्हणजेच सात मुलांची माता) नावाच्या देवीची स्थापना करीत असे. द्राविडी संस्कृतीचा व द्रविडी देवतांचा परिचय लहानग्या विठ्ठलाला झाला. विठ्ठल रामजींवर त्यांच्या आजी–आजोबा यांचे संस्कार झाले. त्याचप्रमाणे आईवडिलांचे व आजोळच्या माणसांचे संस्कार त्यांच्यावर झाले. जमखिंडीच्या पूर्वेस सहा मैलावर असलेल्या आलनुर हे छोटेसे खेडेगाव विठ्ठल रामजीचे ते आजोळ गाव होते. त्यांच्या आईचे नाव यमुनाबाई, आजीचे नाव गंगाबाई व वडिलांचे नाव कृष्णराव काळे असे होते. गुडगीच्या रोगाने त्यांचा एका पाय वाकडा झाला होता. लोक त्यांना कुटकृष्णप्पा (लंगडा कृष्णराव) म्हणत असे.[५]

बसवंतराव व संताबाई या आजा–आजीच्या नेमकी विरुध्द जोडीचे वैशिष्ट्ये त्यांच्या आजोबाच्या गंगाबाई व कृष्णराव या आजी–आजोबामध्ये होती. इकडे बसवंतराव मराठी व संताबाई कानडी तर तिकडे गंगाबाई मराठी व कृष्णराव कानडी असे हे जोडपे होते. कृष्णराव हे गुडगेदुखीच्या आजारपणामुळे अंथरुणावर खिळून होते. तेव्हा मोठ्या भक्तीने व श्रद्धेने गंगाबाईने त्यांची रात्रंदिवस सेवा सुश्रुषा केली. आलमूरच्या गोविंद आप्पा कुलकर्णी या वैष्णव ब्राह्मण कुटुंबाचा लोभ (मामा शिंदगाच्या आजोळच्या कुटुंबावर होती.)

शिंदे यांची आजी जशी धार्मिक प्रवृत्तीची होती. तशी आईची आई धार्मिक वृत्तीची दिसत नव्हती. पण ती स्वतःच धर्माची मूर्ती होती. गंगाबाईचा देव म्हणजे तिचा लंगडा नवरा होय. आपल्या दोन आजीमधील फरक सांगताना शिंदे म्हणतात. माझ्या बाबांची आई उघड्यात वाढलेली रानदांडगेबाई होती. पण गंगाबाई सावलीतील तुळस होती. आजोबांना कुलकर्णी

परिवारांचा आश्रय होता. त्या घराण्याला वैष्णव धर्माचा वारसा लाभलेला. असल्यामुळे ते मोठे धार्मिक प्रवृत्तीचे होते. मूळात वैष्णव धर्म कर्मठ प्रवृत्तीचा होता. त्यात विधी, संस्कार, उपवास, वृत्तवैकल्ये व सौभाग्य लेणी इ. गोष्टीची येथे आराधना चालत होती. या सर्व प्रथांचा पगडा माझ्या आईच्या हाडामांसात व रोमारोमात रुजला होता. ती एखाद्या वैष्णव ब्राम्हणीप्रमाणे दिसत होती. पण माझी आजी अगदी साधी, भोळी व धर्मावर पगडा कोठेही तिच्यात दिसत नाही. कर्मठपणाही जाणवत नव्हता. आपल्या आजी व आईबद्दल विठ्ठल रामजी लिहितात. की, 'माझी आजी व तिची नमुनेदार मुलगी म्हणजे माझी आई ही दोन माणसे साऱ्या आलनूर गावाला प्रतिव्रताच्या व हिंदू स्त्रियांच्या चांगुलपणाचा एक अनुपम नमुनाच वाटत होता. जमखिंडीचे आजी आजोबा वारल्यावर लवकरच १८८२–८३ मध्ये आलनुरचे आजोबा कृष्णराव वारले आणि त्यांच्या आईची आई (गंगाबाई) १९०१ च्या सुमारास जमखिंडीला शिंद्याच्या घरी वारली. आलनूरातील एकुलता एक मामा रामजी हा मात्र दिवाळखोर, कर्जबाजारी निघाला. त्यांची एकुलती एक मुलगी मथुराबाई ही पोरकी होऊन जमखिंडीस शिंद्याच्या घरीच वारली. तिचे लग्न विठ्ठल रामजी शिंदे यांचे धाकटे बंधू एकनाथराव यांच्याबरोबर झाले.

शिंदे घराण्याचा नावलौकिक व प्रतिष्ठा मोठी होती. त्यामुळे आलनूर येथे आजोळी मोठा मान सन्मान मिळत असे. यामुळे ते आपल्या तोऱ्यातच वागत असत. खाणे–पिणे, शिक्षण, पोषाख, मराठी बोलणे, सरकारी दरबारात वजन असलेली सुप्रसिध्द व तापट बापाची मुले असा त्या भावंडाचा रुबाब असे. सर्व चोचले आजोळी पुरविले जात असल्यामुळे आलनूर गाव त्यांना फार आवडत असत. बसवंतराव (आजोबा) यांना दोनच अपत्ये होती. वडील मुलगा रामजीबाबा व धाकटी मुलगी अंबाबाई ही होती. रामजीबाबांचा जन्म अदमासे १८३५ च्या सुमारास झाला. बसवंतरावचा पेशा शेतकऱ्याचा असला तरी रामजीबाबा मात्र शेतीकडे वळाले नाहीत. शास्त्रींच्या सान्निध्यात येऊन ते लिहायला–वाचावयास शिकले. बसवंतराव दप्तरदारांचा मळा सांभाळत होते. त्यांच्या घरी रामजी फुले देण्याचे काम करीत असत. तेथे शिकत असलेल्या दप्तरदारांच्या मुलांमुळे त्यांनाही शिक्षणाची गोडी लागली. असे विठ्ठल रामजींच्या भगिनी जनाक्का शिंदे यांनी आपल्या आठवणी मध्ये लिहून ठेवले आहे. एवढेच सांगता येईल की, त्यांनी चांगल्या प्रकारचे कारकुनीचे शिक्षण घेतले. त्यांचे मोडी अक्षर सुंदर होते. ते शिकणाऱ्या मुलांना कित्ते घालून देत असत. मुलकी परीक्षा पास झाल्यावर संस्थानातील बिद्री

या गावी त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली. पुढे संस्थानिकांनी त्यांना संस्थानाच्या कारभारासाठी बदलून घेतले. जमखिंडी दरबारात जमाखर्चाबाबत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. अशी त्यांची ख्याती होती. केवळ कारकुनी शिक्षण झाले नव्हते तर धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यकशास्त्र व तांत्रिक विषयाची त्यांना बरीच माहिती होती. मराठी पोथ्यांचे वाचन तसेच शास्त्रीय वाङ्मयाचा संग्रह त्याने चांगला केला होता. विठ्ठलच्या लहानपणीच एक शास्त्री जो पुराण सांगण्यास घरी येत असत. आजोबाप्रमाणेच त्यांच्या मराठेशाही वळणाचा पोषाख नसायचा. त्यावेळच्या रुढीप्रमाणे ब्राह्मणासारखे दहा हात लांब धोतर नेसत असत. त्यांचा अंगरखा मात्र मराठा बाण्याचा असे. सर्व जातीधर्मातील लोकांबाबत त्यांच्या मनात स्नेहभाव असत. जमखिंडीत प्रथमतः मुलींची शाळा सुरू करण्याचा पुढाकार कोणी घेतला असेल तर तो रामजीबाबांनी असे भगिनी जनाबाई यांनी आपल्या आठवणीमध्ये या गोष्टीची नोंद मोठ्या अभिमानाने नमूद केलेली आहे. बाबांच्या अंगी स्वावलंबीपणा, निर्लोभीपणा व खाणदानीपणा या गुणांमुळे जमखिंडी गावातील लोक त्यांच्याकडे आदराने बघत असे. संस्थानिक श्रीमंत आप्पासाहेब हे त्यांचे बालमित्रच होते. कारण त्यांच्या बालपणीचे मित्र आप्पा यादवाडकर यांनाच गोपाळराव पटवर्धनांनी दत्तक घेऊन पुढे तेच संस्थानचे अधिपती झाले.

इ. स. १८७० च्या सुमारास शाळेच्या स्थापनेसाठी श्रीमंताचे मन वळविण्यास रामजी यशस्वी ठरले. शाळा स्थापन झाल्यावर श्रीमंताच्या आप्तांपैकी रास्ते वगैरे मुलीनाही शाळेत पाठविण्यात येऊ लागले. संस्थानचे अधिपतीही शिक्षणाच्या प्रसारासाठी झटत होते. परंतु तो काळच असा होता की, मुलींना शाळेमध्ये पाठविण्याची मानसिक तयारी आई–वडिलांची नसत. ब्राम्हणेत्तरांची तर बाब निराळीच होती. त्यांच्यासाठीची शिक्षणाची कवाडे पूर्ण बंद होती. हजारो वर्षापासून हा उपेक्षित घटक म्हणून ओळखला जात असत. ब्राह्मणांच्या मुलींना देखील शाळेत पाठविण्यास पालक सहसा उत्सुक नसे. मुलींना शाळेत पाठविण्याकामी पालकवर्गाची मनधरणी करावी लागत होती. असे अवघड धनुष्यबाण पेलण्याचे काम रामजीबाबांनी शीरावर घेतले. शाळेतील पटावरील मुलींची संख्या फार तर सतरा अठरा इतकी होती. त्यात ब्राह्मणांच्या सात–आठ मुली, मराठ्यांच्या तीन–चार मुली, मुसलमान जातीतील दोन–तीन, साळी, माळी, वडार अशा जातीतील मुलींचा भरणा केवळ रामजीबाबांच्या प्रेमाखातर पालकांनी घातला असावा, असे एकंदरीत वरील चित्र दिसते. त्या काळात सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात

पाळली जात होती. अस्पृश्य जातीतील मुलींना शिक्षण घेण्यासाठी वेगळे बसविले जात होते. त्यांच्या एकत्रित बसण्याने विटाळ होत असावा असे संशोधकाचे मत आहे. या अस्पृश्य वर्गातील मुली शाळेत कधीतरी येत असल्यामुळे पटावरील त्यांची हजेरी अल्प जेमतेम पाच-सहा एवढीच रहात असे. भगिनी जनाक्का शिंदे यांनी नमूद करुन ठेवले आहे.[६]

**विठ्ठल रामजी शिंदे व वडील रामजी शिंदे**

रामजीबाबांचा स्वभाव हा बोलका होता. ते आपल्या मित्राबरोबर बोलत असताना लहानग्या विठूला त्यांचे बोलणे ऐकण्याची फार मोठी गंमत वाटत असे. अशावेळी बाबांचे भाषण ऐकण्यास मिळावे म्हणून विठू तेथेच घुटमळत असे. कानडी, मराठी व मुसलमानी ते सहजपणे बोलत असे व ऐकणाऱ्याला तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडत असत. म्हणींचा बोलण्यात सर्रास वापर केला जाई. विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हटले आहे. मला वाटते माझ्या अंगी जर काही वक्तृत्व आले असेल तर त्याचे प्रथम बीजारोपण बाबांच्या अकृत्रिम साध्या व जोमदार रसवंतीने केले असावे.

रामजींचा स्वभाव तापट, रागीट व भांडखोर प्रवृत्तीचा होता. श्रीमंताशी भांडून सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन घरी बसून दिवस काढीत होते. सरकारी कामकाजासाठी त्यांनी पंधरा-सोळा वर्षे स्वतःजवळील पैसा खर्च केला. परंतु दारिद्र्याने घराला वेढल्यामुळे पैशाची चणचण भासू लागली. म्हणून श्रीमंत आप्पासाहेबांकडून एक कवडीही परत मिळाली नाही. रामजी बाबा पैशाच्या तालात ऐषारामी जीवन जगत होते. परंतु नंतर त्यांचा धर्माकडे ओढा अधिक वाढत गेला. पंढरपूरच्या वारकरी संप्रदायाबद्दल त्यांच्या मनात गूढश्रध्दा निर्माण झाली. पंढरपूरची भजनी संप्रदाय जमखिंडीत रुजण्यामागे रामजीबाबांचा पुढाकार होता. विठोबाचा सप्ताह फाल्गुन वद्य द्वितीया पासून म्हणजेच तुकाराम बीजेपासून षष्ठीअखेर हा सप्ताह विठोबाच्या मठात साजरा होत असे. आरती करण्याचे काम रामजीबाबांकडे होते. या धार्मिक सप्ताह सोहळ्याचा परिणाम विठ्ठल रामजी यांनी नमूद केला आहे. एकंदरीत रामजी बाबांच्या घरचे बरे चालले होते. पण अचानक नियतीच्या फेऱ्यात घर अडकले जमखिंडीतील माणसांबरोबर त्यांचे भांडण झाल्यामुळे शेवटी त्यांना घरी बसावे लागले. अनेकवेळा बोलविले गेले पण ते गेले नाहीत. ते बाणेदार स्वभावाचे होते. तब्बल सोळा वर्षे त्यांनी कामधंद्याशिवाय काढली होती. त्याकाळात देवधर्माचे कर्मकांड फार माजले होते. लिंगायत स्वामीजींचे बबलादीचे

येणे–जाणे त्यांच्या घरी असे. ते नावाजलेले संत होते. धर्माच्या नावाखाली वाईट प्रकार चालत असे. रामजींच्या घरी अठरा विश्व दारिद्र्य नांदत असतानाही त्यांच्याकडे माणसांचा राबता सतत असत. या लोकांच्या खाण्या–पिण्याची व्यवस्था केली होती. यासाठी त्यांना सावकारी कर्ज काढण्याचा खटाटोप करावा लागला होता. अंबाबाई, यल्लमा, विठोबा व महालक्ष्मी या देवतांचे पुजारी तसेच बबलादी स्वामी रामदासी पंथ, गोसावी, वैरागी, अतिथी इ. अनेक लोकांचे सतत ये–जा चालू असे. मात्र तेथे येणे काहीच नव्हते. खर्चाला सीमाच उरली नव्हती. या खर्चापायी शेतीवाडी, गुरे ढोरे, घरदार सर्व काही गेले होते. अशा बिकट परिस्थितीत दारिद्र्याशी तोंड देत, घरचा प्रपंच सांभाळणारी साध्वी यमुनाबाई (आई) हिचे प्रेम होते. असे विठ्ठल रामजी यांनी म्हटले आहे. विठ्ठल रामजींच्या आईचा जन्म १८४० ला झाला. लग्नाच्या वेळी रामजीबाबाचे वय बारा वर्षाचे होते. तर आईचे (यमुनाबाई) सात वर्षाचे वय होते. तिला लिहिता–वाचता येत नसे. परंतु तिच्या अंगी वैष्णव ब्राह्मणांचे वळण, सात्विक राहणे, शाकाहारी, घरकामात निपुण इ. अनेक गुण तिच्या ठायी होते. दोन्ही कुटुंबात धार्मिक वारसा रुजला होता. आईची शुध्द कानडी भाषा, वैष्णव ब्राह्मणांची तर त्यांच्या बाबांची मराठी भाषा शुद्ध देशस्थ ब्राह्मणांची होती. पेहराव वळण शुध्द ब्राह्मणी धाटीचे होते. गोपी कृष्णावर तिने सुंदर सुंदर कानडी गोष्टी सांगत असे. लहान मुलांना छान छान गाणे, गोष्टी ऐकवून झोजवत असत. तिचा गळा करुण रसाने भरलेला ठेवा होता. विठ्ठल रामजीने नमूद केले की, मोठेपणी ही ती गाणी ऐकवून गोष्टी कृष्णाच्या गोपी सांगून ती आम्हा भावंडांना दारिद्र्याच्या कठीण वेदना हळूवार करीत असे. तिच्या अंगी व्रत उपवास व इतर गृहकृत्ये ब्राह्मणांप्रमाणे करण्यात ती पटाईत होती.

रामजीबाबा वडिलांपेक्षाही अधिक श्रीमंत झाले. परंतु विठ्ठलजींच्या जन्मापासून चित्र बदलले गेले. जमखिंडीतील लोकांशी त्यांचे भांडण झाले. पुढे साधू वैराग्याच्या फेऱ्यात अडकले गेले. हे साधू नशापाणी करीत असत. बबलादी लिंगायत साधूच्या ताफ्यात काही काळ त्यांनी घालविला या सर्व प्रकारांमुळे रामजींचे घराकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे मुले अन्नाला देखील महाग झाले. विठ्ठल रामजी शिंदे लिहितात की, 'आईची जोड व एक प्रकारचा निर्बंध नसता तर बाबा आम्हांस कोणावर तरी टाकून वैरागी होऊन गेले असते. म्हणून आम्ही सर्वस्व आईचे ऋणी आहोत. शिंदे यांनी आपल्या आईच्या अंगी दैवी पात्रता येण्याची तीन कारणे सांगितली आहेत.

पहिले कारण, माहेरच्या दारिद्र्यामुळे व बाप (लंगडा) व आई कर्तृत्वहीन असल्यामुळे त्यांच्या आईचे झालेले हाल. दुसरे कारण वैष्णव ब्राह्मणांचे लागलेले वळण आणि तिसरे कारण तिला झालेला कठीण सासूरवास हा सासूरवास आमच्या आईने लहानपणी उठता–बसता सांगितलेल्या गोष्टी ऐकून आमचे कोवळे हृदय हेलावून जात असत.[७]

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या वडीलांनी संस्थानात नोकरी केली त्यांना प्राकृत पोथ्यांचा व्यासंग होता. त्यांचे राहणीमान ब्राम्हणासारखे होते. त्यांची वृत्ती धार्मिक होती. ते वारकरी संप्रदायाकडे आकर्षित झाले होते. ते पंढरपूरच्या नियमित वाऱ्या करीत असत. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भावी समाजसुधारणेचा पाया त्यांच्या वडिलांच्या भागवत धर्मातून घातला गेला होता. त्यांच्या आईवडिलांनी विठ्ठलजीच्या मनावर संत तुकारामाच्या अभंगाचा ठसा उमटविला होता.

'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।

कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।'

कोणाही जीवाचा मत्सर न घडू देणे हे ईश्वरपूजनाचे खरे मर्म आहे असा विचार त्यांच्या मनावर घरातून आई वडिलांच्याकडून बिंबवले होते. ते स्वतःच म्हणतात की, 'आपण ब्राम्होसमाजात गेल्याने सुधारक झालो नाही, तर सुधारक म्हणून ब्राम्होसमाजात गेलो.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या घरी सुधारकांचे वातावरण होते. त्यातूनच ते घडले होते. त्यांच्या घरी पडदा पद्धती नव्हती. जातीभेद पाळला जात नव्हता. जातिभेदाचा संस्कारच मनावर झाला नसल्याने समाजसुधारकाप्रमाणेच आधुनिक सुधारकाप्रमाणे जातिभेद मोडण्याचा खटाटोप करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. मराठयांच्या घरी न जेवणारी ब्राम्हण लिंगायत मंडळी त्यांच्या विश्वकुटुंबी घरी जेवत असत. न्हावी, धोबी, मुसलमान यांच्याशी कधी त्यांच्या घरात पंक्तिभेद केला जात नसे त्यांच्या घरात सहाजिकपणेच समाजिक सुधारणेची तत्त्वे पाळली जात होती.[८]

विठ्ठल रामजी आपल्या आजीविषयी माहिती सांगताना ते म्हणतात की, आईची सासू (संताबाई) ही स्वभावाने हेकेखोर, सहानुभूतीशून्य आणि पक्षपाती स्वभावाची होती. गरीबीमुळे आईची नणंद (अंबाबाई) ही रामजी बाबांच्या घरीच येऊन राहिली होती. घराला मोठे वैभव प्राप्त झाले होते. आठ बैले, गायी, म्हशी व खिलार वासरांची पैदासही होत होती. या सर्व

घरकामाचा पसारा त्यांच्या आईवरच पडत असे. नणंदेचा उपयोग चहाड्या लावण्यात जात असे. घरामध्ये पंधरा ते वीस माणसांचे खटले होते. त्यात अतिथी, वैरागी, पाहुणे यांची भर पडत असत. पहाटे उठल्यापासून गुरांचे शेण, पाणी, दळण दळणे पासून ते संध्याकाळच्या स्वयंपाकापर्यंतची कामे त्या माऊलीला करावी लागत होती. या कामात भर म्हणून सासूसही छळ करीत असे. सुनेचे कौतुक करणे सोडाच पण माणुसकीने वागविण्याची वृत्ती तिच्या अंगी नसे. सासुबाई सुनेला पाण्यात पहात असे. तिच्या विषयी सहानुभूती कोठेच दिसत नव्हती.[९]

**विठ्ठल रामजी शिंदे व आई यमुनाबाई शिंदे**

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनाच्या विकासात आईचा मोठा वाटा होता. आजारपण दारिद्रयाच्या वेदना सहन करूनही तिच्या मनाची शांती, रसिकता, आनंदीवृत्ती, कमी झाली नाही. शिंदे यांच्या धार्मिक व सामाजिक विचार व कार्यात स्त्रियांना महत्त्वाचे स्थान मिळालेले होते. स्त्रियांच्याबद्दलच्या दाक्षिण्यभावाचा उत्तम सहवास मातृप्रेमात होते. निसर्गाच्याही आधी आपण पहिले हृदयदान केले ते आईलाच असे ते म्हणत असत.[१०]

विठ्ठल रामजी शिंदे आपल्या आईची महती सांगताना म्हणतात की, आईला एकंदर वीस मुले झाली. परंतु त्यातील पाचच मुले जगली होती. म्हणजे पंधरा मुलांचा शोक या माऊलीला करावा लागला होता. आजी असेपर्यंत म्हणजे १८८० पर्यंत त्यांच्या आईला स्वातंत्र्य म्हणजे काय हे माहित नव्हते. परंतु आजीनंतर लवकरच घराची सुबत्ता ही गेली. स्वातंत्र्य मिळाले ना मिळते तोच अठरा विश्वे दारिद्र्याने तिला गाठले. विठ्ठल रामजी म्हणजे आईचा पाचवा मुलगा सातवी मुलगी जनाक्का ही घरातील पहिलीच मुलगी असल्यामुळे ती सर्वांची लाडकी होती. विठ्ठलजीचा मोठा भाऊ (एकनाथराव) पावसाळ्यातील पटकीमुळे मरण पावला. कारण ते ज्या घरात रहात होते ती जागा आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक होती. यावर भाष्य करताना विठ्ठल रामजी लिहितात की, अशा स्थितीत इतकी मुले लहानपणीच वारली हे आश्चर्य नसून आम्ही पाच सातजण कसे वाचलो हेच आश्चर्य होय. त्यांच्या आईचे बाळंतपण दरवर्षी होत असे. परंतु मागील मूल जीवंत रहात नसत. बाळंतपण, मुलांचे आजार किंवा मृत्यू इ. कारणांमुळे आईची सर्व शक्ती क्षीण झाली होती. तरीपण मुलांचा कंटाळा, संसाराचा तिटकारा किंबहुना दुःखाचा किंवा निराशेचा शब्द कधीही आपल्या आईच्या तोंडून मुलांच्या कानावर पडला नव्हता. आपल्या आईबद्दल विठ्ठल रामजी लिहितात, दारिद्र्याच्या असहाय्य

वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही आम्हा लहानग्यांना नेहमी आपल्या माहेरच्या सुख दुःखाच्या गोष्टी रसिकपणाने सांगून आई आमची गोड करमणूक करीत असे. आईच्या गोष्टी व गाणी हाच आमचा मोठा मेवा होता. तिचे आनंदी आणि विनोदी वृत्ती हीच आमची विश्रांती होती. तिच्या गोष्टीची आम्हांला पुढे पुढे इतकी चटक लागली की जर भूक लागली, स्वयंपाकात वेळ असेल तर किंबहुना भाकरीबरोबर द्यावयास चांगली भाजी नसेल तर आम्ही आईच्या काठवटीभोवती गोळा होऊन तिला गोष्टी सांगण्यास लावीत असू. मग तिचे आम्हांस अशा प्रेमळ कहाणीत गुंतवावे की स्वयंपाक केव्हा झाला, आम्ही काही खाल्ले की मुळीच काही खाल्ले नाही, याचे आम्हांस भान राहत नसे. बाबांना एखाद्यावेळेस उशीर झाल्यास आमच्या गोष्टी मेजवाणीपुढे लांबत असे. केव्हा केव्हा आम्ही वन्समोअर ही म्हणत असू. एकंदरीत आईच आमची खेळगडी होती. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत दारिद्र्याशी सामना देत आम्हा भावंडांना आनंदी ठेवत, स्वतः मात्र दुःखाशी दोन हात करीत असत. बाबा घरात नसल्यावर आई आम्हा चौघा पिलांस एखाद्या पक्षिणीप्रमाणेच पंखाखाली घेऊन आनंदाने बसे व आम्हांलाही तिच्या पंखाशिवाय दुसरा उबारा नको असे विठ्ठलजीच आजा आजी असेपर्यंत वाड्यात जो मोठा थाटमाट चालू असे नंतर थोड्याच दिवसात वर्षभरात हे सर्व वैभव नष्ट झाले. रानात शेत नाही गोठ्यात गुरे नाहीत, घरात माणसे नाहीत अशी ओसाड स्थिती निर्माण झाली. तरीही रामजी बाबांना संस्काराची काळजी म्हणून कसली ही आस नव्हती आईच्या स्वभावात कटूपणा दिसला नाही. आईबाबांच्या या संतोषीवृत्तीचे संस्कार विठ्ठल रामजींच्या मनावर खोलवर झाले होते. भयानक दारिद्र्याच्या बिकट संकटातून वेदनेतून या भावंडांना कोणी तारले असेल व सुसंस्कृत केले असेल ती महामाया म्हणजे आईचे प्रेम होय. आईला सासूचा अनेक जाच त्रास सहन करावा लागला होता. विठ्ठल रामजी शिंदे आईबद्दल बोलतात की, तिने भोगलेल्या त्रासाचे मासले ते आम्हांस बालपणी सांगू लागली म्हणजे आमच्या कोमल अंतःकरणाला घरेच पडत. पुढे विठ्ठल रामजी शिंदे असेही नमूद करतात की, माझ्यामुळे पुढे जे स्त्री दाक्षिण्य आणि हिंदू विवाह पध्दती संबंधीची कायमची तेढ उत्पन्न झाली. तिचे पहिले बीज ह्या आईच्या खडतर सासूरवासातच आहे.[११]

आईविषयी त्यांच्या मनात खूप आदरभाव होता. स्त्रीच्या ठिकाणी मोठी शक्ती असते ती म्हणजे तिची सहनशीलता होय. या सहनशिलतेच्या जोरावर पती, पुत्र आणि पिता या

तिघांची ही तिला आज्ञा पाळावी लागते. एवढेच नव्हे तर त्यांचे लाड ही पुरवत असत. स्त्रीच्या थोरवीचे वर्णन महर्षींनी पुढील केले आहे. स्त्रीची थोरवी केवळ माता या नात्यापुरती मर्यादित नसून पती, पिता व पुत्रादिकांचे ती सर्वच काळी अपराध सहन करुन सेवासुश्रुषा व लाड पुरविते. म्हणून ती सर्वांची माता आहे. आपण केवळ 'मातृ देवो भव' असे न म्हणता 'स्त्री देवो भव' म्हणावयास हवे. पण म्हणत नाहीत कारण आपणांस त्यांची लज्जा वाटत असते हे वास्तव नाकारुन चालणार नाही. हे ध्यानात घ्यावे लागेल.

वि. रा. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणेत मातोश्री यमुनाबाई हिचा मोलाचा वाटा होता. त्यामुळेच त्यांच्या मनात स्त्री जातीबद्दल अपरंपार करुणा व भक्ती होती हे दिसून येते. विठ्ठल रामजी शिंदे यांचे हायस्कूलचे शिक्षण होत होते त्यावेळी इंग्रजी आणि संस्कृत साहित्याची ओळख झाली होती. मराठीचे साहित्य त्यांच्या वडिलाच्या धार्मिकतेमुळे घरताच होते. ते चौथीत असतानाच रामविजय, हरिविजय या पोथ्यांचा अर्थ मित्रांना सांगत असत. याचे श्रेय ते त्यांच्या बुद्धीपेक्षा रसिकेतेला देतात. ही रसिकता त्यांनी शाळेपेक्षा घरातच अधिक आणि गुरूपेक्षा आईवडिलांकडूनच मिळविली होती. असे त्यांनीच आपल्या आठवणीत स्पष्ट केले आहे.[१२]

अशाप्रकारे विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्या कार्यातून आणि विचारातून झालेला आढळतो. त्यांची घडण अशाप्रकारे त्यांच्या बालपणीच झाली होती. घरातील वातावरणाचा परिणाम त्यांच्या ग्रहणशील मनावर होऊन त्यांची बैठक अध्यात्मप्रवण बनली. मनाला उदारपणा, व्यापकपणा आला. संमिश्र संस्कृतीत वाढल्याने भेद जाणवण्याऐवजी ऐक्य भावनाच जोपासली गेली होती. मन भावनाप्रवण बनले होते. म्हणूनच त्यांनी १९०३ मध्ये ब्राम्होधर्मप्रचारक म्हणून जिवितकार्याला प्रारंभ केला.[१३] विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनात वैचारिक भावनिक प्रतिक्रिया व्यक्त होते. वाचन, निरीक्षण आणि चिंतन यांतून मनास प्रगल्भता आलेली होती. काहीतरी करावे ही उर्मी दांडगी होती. मूळचीच वृत्ती भावनाप्रधान आणि बाहय वास्तवाबद्दलचे असमाधान या सर्व कारणांचा परिणाम म्हणून वृत्तीची ही तीव्रता निर्माण झालेली होती. काही चांगले दिसले की ते मनःपूर्वक कौतुक करतात. त्याविषयी आदरभाव दाखवितात आणि वाईट दिसले की तीव्र निषेध करतात. मात्र ही भावनिक तीव्रता असली तरी ते चांगल्या वाईटाचा निवाडा यथायोग्य

करतात. त्यांच्या आकलनात आणि प्रतिक्रिया प्रकट करण्यात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. तीव्रता असली तरी मानसिक प्रगल्भपणामुळे विवेक सुटला नाही.[१४]

वरील सर्व गोष्टीतून विठ्ठल रामजी शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व समाजसुधारकाचे घडले होते. मनाची आध्यात्मिक ठेवण, व्यापकपणे विचार करणारी जीवनदृष्टी, तरल संवेदनशीलता, सुक्ष्म सौंदयदृष्टी, भाषेच्या सामर्थ्याची यथोचित जाण इत्यादी वैशिष्टे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सांगता येतील.

**विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावरील प्रार्थना समाजाचा प्रभाव –**

वि. रा. शिंदे यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी एक महत्त्वाची घटना म्हणजे त्यांनी घेतलेली प्रार्थना समाजाची दीक्षा होय. आगरकरांचा 'सुधारक' वाचावयास मिळाल्यावर त्यांचा कल सुधारणावादी विचारांकडे झुकू लागला. एकूणच ते नास्तिककाकडे झुकू लागला. फर्ग्युसन कॉलेजमध्ये आल्यानंतर मिल् आणि स्पेन्सर यांचे ग्रंथ वाचल्यानंतर हा परिणाम तीव्र झाला.[१५] मिल स्पेन्सरच्या विचारांमुळे जो बंडखोरपणा माझ्या मनात व भोवताली माजला होता. या माझ्या आत्म्याची भूक क्षमविण्याची शक्ती नव्हती. नास्तिकपणाच्या वाळवंटात मनाची तहान भागविणे शक्य नव्हते.[१६] म्हणजेच विठ्ठलरावांच्या मनात धर्माचा फेरविचार आतून जाणवणारी गरज होती. धर्मावरील त्यांची विस्तृत व्याख्याने, भाषाशास्त्राचे अलोट ज्ञान पौर्वात्य विचारांबद्दलची त्यांची समतोल वृत्ती यामुळे ते त्यांना आत्मपुरुष वाटू लागले आणि धर्मामध्ये महत्त्वाची नवी दृष्टी निर्माण झाली. विठ्ठलरावांच्या मनात धर्माविषयी विचारांचे काहूर निर्माण झाले. असले तरी त्याचे सखोल चिंतन करत होते. बारामतीचे समाजसुधारक रामचंद्र आण्णाजी कळसकर व विठ्ठलरावांची भेट झाली. कळसकर याने त्याकाळात बारामती परिसरामध्ये सहा खेड्यामध्ये उद्योग, शाळा स्थापन करुन महार, मांग या जातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचे व त्यांच्यात सुधारणा करण्याचे काम तळमळतेने चालविले होते. त्यांच्या या त्यागपुर्ण व्यक्तीमत्त्वाचा प्रभाव विठ्ठलरावांवर पडला होता. म्हणूनच त्यांच्याविषयी त्यांनी असे लिहिले आहे की, 'त्यांचे साहस, उद्योग व स्वार्थत्याग ऐकूनच होतो. त्यांचे स्वतः भाषण ऐकून तर त्यांनी महार, मांग ह्या अति नीच जातीचे किती किती कळकळ दाखिवली. त्यांनी काय काय केले पण आणखी कितीतरी करण्यासारखे आहे, हे सर्व मनात येऊन मला स्वतःची मनःपूर्वक लाज वाटली व तिटकारा आला.[१७] एकूणच एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस

अस्पृश्यांसाठी कार्य करणारे महात्मा फुले यांच्यानंतर कळसकर हे व्यक्तीमत्त्व होते. त्यांच्याकडूनच विठ्ठलरावांना प्रेरणा मिळाली. कळसकर ह्या कामासाठी न्या. रानडे यांची मदत घेत असत. त्यांच्या संस्थेसाठी पैशाची मदत मिळविण्याकामी न्या. रानड्यांचा उपयोग होत असत. रानड्यांच्या सहवासामुळे कळसकर पुण्यात आले. त्यामुळे प्रार्थना समाजात ते जात होते असे दिसते. विठ्ठलरावांनी २९ मे १८९८ रोजनिशीत पुढील नोंद आढळते. 'आज सकाळी आठ वाजता रा कळसकर, हुल्ल्याळ व मी प्रार्थना समाजातील उपासना पहावयास गेलो होतो. पुण्यातील मंदिरातील उपासना मी आजच प्रथम पाहिली. गेल्या डिसेंबरात मुंबईतील देवळातील ढग पाहून मला मुळीच बरे वाटले नाही. पूज्यभाव दूर राहून समाजाविषयी तेव्हापासून माझा किंचित दुराग्रह झाला होता. समाजाचे उद्देश भाषण व मेंबरची कृती अथवा वागणूक यामधील विरोध पाहून तर मला अद्यापही चीड येत आहे. समाजाला कसल्याही प्रकारे जातिभेद असता कामा नये असे असतां इतर सुधारकात व समाजात मला काही भेद दिसत नाही. म्हणजे दोघेही अद्याप जातिभेद उघड उघड झुगारण्यास तयार आहे. तसे दिसत नाही. मुंबई प्रार्थना समाजाच्या तुलनेत पुणे मंदिरातील उपासना पाहून विठ्ठलरावांची अनुकुल भावना निर्माण झाली, याचे कारण मुंबईच्या मंदिरापेक्षा पुण्यातील मंदिर साधे होते. मुंबईतल्या प्रार्थना मंदिरात ते प्रथमच गेले असल्यामुळे त्यांना तेथील प्रार्थना ख्रिस्ती चर्चमधल्या प्रेयरची हुबेहुब नक्कल वाटली. तेथील भपकाही त्यांच्या मनात रुचला नाही. त्यांनी असे म्हटले की, माझ्यासारख्या गावंढळास जर नव्याने दीक्षा घ्यावयाची असली तर माझी खात्री आहे की तो मुंबईच्या रंगमहालात कधीच दीक्षा घेणार नाही.[१८] यावरुन प्रार्थना समाजाची दीक्षा घेण्याविषयी त्याच्या मनाची अनुकुलता दिसून येते. रावबहादूर का. बा. मराठे यांच्या पुणे येथील प्रार्थना समाजाचे व्यक्तीमत्त्व विठ्ठलरावांना चिंतबंधन म्हणजे प्रपंच करुन परमार्थ साधणारे वारकरी पंथाच्या आचार विचारांना जुळणारे असे वाटले.

विठ्ठलरावांच्या भगिनी जनाक्काबाई या पुण्यात आल्यावर पहिल्यांदा ख्रिश्चन शाळेत शिकत होत्या. पण एकूणच हिंदू धर्म देवदेवतांविषयी हीन वागणूक, अपशब्द, हेटाळणी वाचक शब्द उल्लेखले जाऊ लागले. पुढे त्या हुजुरपागेत आल्या त्याचे चालक भांडारकर होते. त्या काळात मैत्रिणीबरोबर हायस्कूलमधील प्रार्थना समाजात जाण्याचा विचार केला. पण त्या आधी विठ्ठलरावांना परवानगी मागितली. या गोष्टीस विठ्ठलरावांने त्यांना परवानगी दिली. पण त्यामुळे

जनाक्काबाईच्या मनात भांडारकरासारख्या विद्वानांचे उपासना ऐकून समाजाबद्दल गोडी निर्माण झाली. दर रविवारी त्या प्रार्थना समाजाला जात असत, पुढे स्वत: वि. रा. शिंदे या समाजात दर रविवारी जाऊ लागले. यावरुन त्यांच्या प्रार्थना समाजाकडील ओढा वाढलेला दिसून येतो. ते स्वत: प्रार्थना समाजात आवडीने जाऊ लागल्याने तेथील प्रार्थना तल्लीन होऊन ऐकत, म्हणत असत. धर्माच्या बाबतीत केवळ बुध्दीच्या जोरावर विचार करण्याचा त्यांचा पुर्वीचा आग्रह कमी पडून श्रध्दा वाढली. त्यातून त्यांच्या मनोवृत्तीत बदल झाला. कळसरकराप्रमाणेच आपणही महार, मांग अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करावेत, अशी प्रबळ इच्छा विठ्ठलरावांच्या मनात निर्माण झाली. त्यांनीच पुढाकार घेऊन स्थापन केलेल्या त्यांच्या मंडळामध्ये त्याविषयी चर्चा केली. विठ्ठलराव, माधवराव हुल्याळ, गोविंदराव सासने, केशवराव कानिटकर हे आपण भावी काळात सामाजिक कार्य करण्यासाठी एखादी मंडळी स्थापन करावी यासंबंधी तासन्तास बसून वाटाघाटी करु लागले.[१९] विठ्ठलरावांच्या प्रार्थना समाजाविषयीचा ओढा वाढत गेला व त्या समाजाच्या उत्सवास ते रोज जाऊ लागले. त्या समाजातील एक वृध्द पेन्सनर गृहस्थ गणपत भास्कर कोटकर यांचा परिचय तेथे होऊन त्यांचा प्रेमळपणा, कळकळीमुळे त्यांच्या उपासना विठ्ठलरावांना आवडू लागल्या. डॉ. भांडारकरांचा प्रभाव विठ्ठलरावांच्या मनावर अधिक झालेला दिसून येतो. याशिवाय समाजाचे प्रचारक शिवराम पंत गोखले यांचा अनुभव ऐकायला मिळत. समाजाचे सेक्रेटरी केशवराव गोडबोले यांचा नियमितपणा, कार्यतत्परता चोख होती. एकूणच प्रार्थना समाजातील विविध मंडळीचा प्रभाव विठ्ठलरावांवर झाला. याविषयी ते असे लिहितात' या सर्व वृध्द मंडळीने मला भारुन टाकुन माझ्या तारुण्याचा आडमुठेपणा, विचारांचा उच्छृंखलेपणा व अनुभवाचा हिरवटपणा या भोवऱ्यातून माझी सुटका शुध्द उदार धर्माच्या शांत प्रवाहात मला आणून सोडले.'[२०] विठ्ठलराव प्रार्थना समाजाचे सभासद नसतानाही बोटॅनिकल गार्डन जवळ शांतीकुटीर नावाच्या गणपतराव कोठेकरांच्या झोपडीत प्रीतिभोजनाचे आमंत्रण त्यांना देण्यात आले. यासाठी पुणे प्रार्थना समाजातील वृध्द मंडळी, मुंबई प्रार्थना मंडळी, तरुण मंडळी फराळ, भजन, प्रार्थना, उपदेश, भोजन, संभाषण व सहल इत्यादी प्रकार दिवसभर झाले. हे सर्व प्रकार विठ्ठलरावांनी अनुभवले. त्यातून त्यांना असे वाटले की, नुसते एक रविवारची सभा नसून देवाच्या कन्यापुत्राचे एक शुध्द कुटुंब आहे. यातूनच त्यांच्या मनातील तेढ कमी झाली. गणपतराव कोठकर व सातारच्या

समाजाचे सितारामपंत जव्हेरी यांच्या सहवासाने समाजाचा इतिहास व तत्त्वज्ञानाचा परिचय झाला. विठ्ठलरावांच्या जीवनाला प्रार्थना समाजाची दीक्षा देणारी एक विलक्षण घटना म्हणजे केशवचंद्र सेन यांचे इंग्रजीत लिहिलेल्या चरित्राचे वाचन होय. विशेषत: या चरित्राच्या अखेरीस जोडलेला केशवचंद्राच्या जीवनवेध या आत्मचरित्राच्या भागाचे वाचन करताना व त्यातील व्याष्टीझमचा–ऑफ फायर हे वाचून तर आपण प्रार्थना समाजाचे केवळ सभासद होऊ नये. तर आजन्म वाहून घेणार प्रचारक व्हावे, अशी अनिवार वेढ विठ्ठलरावांना लागून राहिले.[२१]

महर्षी शिंदे यांच्या मनावर केशवचंद्र सेन यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. भावना व मनोवृत्तीने त्यांचे अंत:करण भरून गेले होते. त्यांच्या जीवनाला कलाटणी देण्यासाठी प्रचंड ऊर्जा ताकद होती. कार्यप्रवणतेवर भर दिला. केशवचंद्र सेनच्या विचाराचा पगडा विठ्ठलरावजीच्या ठायी असला तरी जीवनासाठी ऊर्जेचा संयोग साधुन भावी आयुष्यात ध्येय गाठण्याची इर्षा आणि रात्रंदिवस तोच विचार त्यांच्या मनात घोळू लागला. त्यात तरुण आणि वृध्द मंडळींच्या गाठीभेटी होऊन समाजाविषयी काही तरी करण्याची धडपड सुरू झाली. डेक्कन महाविद्यालयाचा विद्यार्थी श्री. नाना लाला दलजपतराय कवी, न्यू इंग्लिश स्कूल मारवाडी जातीचे पदवीधर तरुण शिक्षक मोती बुलासा, भांडारकरांचे धाकटे चिरंजीव देवदत्त, वासुदेव अनंत सुखटणकर, लक्ष्मण ठोसर इत्यादीसारखे तरुण मंडळी एकत्र जमत असत. त्यात कोटकरांसारखी वृध्द मंडळी सहभागी होत असत. याचा परिणाम असा झाला की, ही सर्व तरुण मंडळी समाजाची दीक्षा घेऊन सभासद झाली. अशा तऱ्हेने त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेऊन रीतसर ब्राम्हो समाजाचे अनुयायी झाले.

**उदारमतवादी ख्रिस्त धर्म पंथाकडे मत आकर्षीत** :

महर्षी शिंदे यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा अतिशय गांभीर्याने घेतली होती. हे १८९८ च्या रोजनिशीतील नोंदीवरुन दिसते. ब्राम्हो धर्माचे केवळ त्यांच्या अनुयायी बनणे त्यांना मान्य नव्हते. धर्म प्रसारक या नात्याने आपले आयुष्यच उन्नत धर्मकार्यासाठी व्हावे अशी त्यांच्या मनाची धारणा होत चालली होती. असे त्यांच्या मित्र जनुभाई करंदीकर यांच्या अभिप्रायावरुन दिसून येते.[२२] हिंदुस्थानात १९ व्या शतकात ते ब्राम्हो समाज व प्रार्थना समाज हे एकेश्वरवादी पंथ हिंदु धर्माचे कार्य करु लागले तर १६ व्या शतकात इंग्लंड, अमेरिकेत सार्वत्रिक स्वरुपात ख्रिस्ती ज्ञानापासून विकास पावलेला युनिटेरियन धर्मपंथ कार्यप्रवण होता. आधुनिकता

आत्मसात करत आधुनिक व तत्त्वज्ञान, विचारपध्दती याला विरोध न करता कार्य करणारा असा हा धर्मपंथ होता. युनिटेरियन या पदाचा अर्थ एकवादी असा होतो. ख्रिस्ती पंथात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्यावर हे नाव मोठ्या प्रमाणात प्रचलीत झाले. पारंपरिक ख्रिस्तीत सिध्दातानुसार देव एकच आहे. पण त्याचे स्वरुप त्रिविद आहे. पिता असलेला देव पुत्र असलेला देव (प्रभू येशू ख्रिस्त) आता पवित्र चैतन्य पण देव म्हणजे मानलेल्या भिन्न व्यक्ती असल्या तरी देव म्हणजे या भिन्न व्यक्तींचे त्रिकुट नाही समुदाय नाही. या तीन व्यक्तीचे सत्त्व एकच आहे. हा सिध्दांत म्हणजे देवांच्या त्रित्वाचा (Trimity) सिध्दांत[२३] ख्रिश्चन धर्म आणि आधुनिक विवेकवादाचा उदय नवभारत डिसे. १९७८. जाने. १९७९ अथवा त्रयवाद या सिध्दांतानुसार पित्याच्या स्वरुपातील देव हा आपला निर्माणकर्ता आहे. पुत्राच्या स्वरुपातील देव म्हणजे येशू ख्रिस्त हा आपला तारणकर्ता आहे व पवित्र आत्म्याच्या स्वरुपातील देव हा उर्फ चैतन्य ही आपली शक्ती आहे.[२४] या त्रयवादावर विश्वास म्हणजे ख्रिस्ती अशा कडव्या ख्रिस्तीचे मत तर याउलट युनेटिरियन लोक परमेश्वर हा एकच आहे व ख्रिस्ती हा केवळ पवित्र साधू पुरुष असून इतरांसारखा साधा मनुष्य होता असे समाजात सेंट पॉलने ख्रिश्चनाची शिकवण यथार्थ स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न केला तरी ही ख्रिश्चनानंतरच्या तीन शतकात ख्रिश्चन व ख्रिश्चनांची शिकवण याबद्दल मते व पंथे निर्माण झाली. ख्रिस्ती धर्म हल्लीच्या काळात कोणताही युनिटेरियन बायबलचा अनादर करीत नसला तरी बायबलवर शंभर टक्के विश्वास ठेवत नाही. बायबलची तो चिकित्सा करतो. धर्म ही बाब शास्त्र चिकित्सेची नव्हे केवळ मानसिक विश्वासाचीही नव्हे तर ती अंत:करणाच्या उच्च भावनेची आहे. अशी त्यांची दृढ समजूत होऊ लागली आहे. हल्लीच्या युनिटेरियन समाज म्हणजे सुधारलेला पाश्चात्य जगाचे प्रबुध्द अंतर्याम (Enlightened Conscience) होय.[२५] युरोपमध्ये एकोणीसाव्या शतकात मानवी विचार व शोधाच्या झालेल्या अभूतपूर्व प्रगतीचे प्रतिक म्हणजे युनिटेरियन धर्मपंथास विसाव्या शतकात प्राप्त झालेले उदार प्रगत रुप होय. या विचारांची गती चार निरनिराळ्या दिशांना झाली. याचे विवेचन विठ्ठल रामजी शिंदे करतात. शास्त्र तत्त्वज्ञान मीमांसा व इतिहास या चारही बाजूने विचार करता हा सिध्दांत स्थापन झाला की रानटी अवस्थेतील मानवी आत्म्यात प्रथम जागृती झाल्यापासून आतापर्यंत धर्मबुध्दीचा सारखा विकास होत आहे. या

चारही प्रकारे झालेल्या वैचारिक पंथातून युनिटेरियन धर्म विचाराला सध्याचे विवेकशील स्वरुप प्राप्त झाले आहे.

पाश्चात्य जगात ज्याप्रमाणे ख्रिश्चन धर्मातून युनिटेरियन धर्म पंथ उदयास आला. त्याप्रमाणे हिंदुस्थानात पारंपरिक हिंदू धर्मातून ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज हे एकेश्वरवादी धर्मपंथ उदयास आले. पाश्चात्य जगातील हिंदू धर्म, ख्रिश्चन धर्म व हिंदुस्थानातील हिंदू धर्म यांच्या स्वरुपात फरक आहे. काही धर्मग्रंथ पुज्यनीय असले तरी बायबल किंवा कुराणासारखा एकच एक धर्म निखालस प्रमाण मानला जात नाही. हिंदू धर्मात प्रमाण मानण्यात येणारे ग्रंथ संस्कृत असल्यामुळे धर्मवेडे लोक व त्यांचा (धर्मग्रंथाचा) वेगवेगळा अर्थ काढतात. सामान्य लोकांच्या घरात वेगवेगळे देव उपासनेच्या वेगवेगळ्या प्रथा असून त्यामुळेच या धर्माची एकसंघ संस्था कधीच बनली नाही. प्राचीन काळापासून परंपरा, आताचे शासन व त्याचे नियम व त्यांच्या जाती इत्यादींद्वारे हिंदू धर्माची व्यूहरचना बनली आहे. याचा पाया आध्यात्मिक तत्त्वानुसार सामाजिक, कौटुंबिक हितसंबधावर आधारित आहे. आठव्या शतकाच्या सुमारास पहिले मोठे आचार्य पद स्थापण्यात आले. परंतु त्यांची कामगिरी लोकांच्या अध्यात्मिक गरजा समजावून घेऊन ही भागविण्याची नसून केवळ जातिबंधनाच्याद्वारे हिंदू धर्माच्या जुन्या समजुती आणि विधी यांची परंपरा शाबूत ठेवणे एवढेच आहे. हिंदुस्थानात जे जुलमी साम्राज्य चालते ते आचार्य, आध्याय किंवा धर्मग्रंथ यांच्यापैकी कोणाचेही नसून ते फक्त वहिवाटीने चालते. बाहेरुन आलेल्या ख्रिस्ती व इस्लामी धर्माची रुढ हिंदू धर्मावर फारसा परिणाम झाला नाही.[२६]

इ.स.१८२८ मध्ये राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेला ब्राम्हो समाज म्हणजे आधुनिक काळातील धर्मसुधारणेचा भारतातील महत्त्वपूर्ण प्रयत्न होय. इंग्रज सरकार बरोबर विरोध आणि सहकार्य या दुहेरीतून इंग्रजी शिक्षण, स्त्रीशिक्षण, जातिनिर्मुलन, सतीची चालबंद इत्यादी विविध अंगानी कल्याण साधण्याचा प्रयत्न पण या सर्वच कार्याला व सुधारणांना धर्म हाच पाया होता. म्हणूनच महर्षी शिंदे त्यांचा धर्म म्हणजे केवळ मत किंवा मनोवृत्ती नसेल तर साक्षात जीवन होते व ते जीवन हे सर्व बाजूचे असे राजकारण आणि आर्थिक अभ्युदय धर्म सुधारणा, समाजसुधारणा या सर्वासाठी त्याचे जीने त्याचा प्रयत्न व त्यांचे मरण ही घटना.[२७]

राजा राममोहन रॉय यांनी अरेबिक, संस्कृत, इंग्रजी या भाषांचा अभ्यास करुन त्यातील धर्मग्रंथ व जगातील इतर धर्मग्रंथाचा अभ्यास केला. त्यामुळे त्यांची धर्मकल्पना,

व्यापक, उदार पुर्वग्रहीत झाली. समाजाचे सामाजिक, नैतिक पातळी खालावली असताना त्यांनी हिंदू धर्माचे उज्ज्वल रुप ध्यानात घेवून ब्राम्हो मतांची मांडणी केली. परमेश्वर एक आहे आम्ही त्याचे सर्व बालके आहोत. आम्हांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव राखण्याची आवश्यकता नाही. परमेश्वराची मानसिक, भजन पूजन करणे हाच त्यांच्या भक्तीचा योग्य मार्ग आहे. ही ब्राम्हो समाजाची तत्त्वे उद्‌घोषित केली. राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेला ब्राम्हो समाजाच्या कार्याचा फारसा विस्तार झाला नाही. कारण पुढे ते विलायतेला गेले व तिकडेच निधन झाले. त्यांचा वारसा आचार्य पंडित विद्या बाळशास्त्री यांच्यामार्फत चालू ठेवले. देवेंद्र प्रणीत ब्राम्होसमाजाला आदि ब्राम्हो समाज असे अभिधान मिळाले.

पाश्चात्यांच्या युनिटेरियन समाज व हिंदूस्थानातील ब्राम्हो समाज या एकेश्वरी पंथाच्या उभारणीमध्ये काही समाज तत्त्व आढळतात. त्याचे विवरण महर्षी शिंदे यांनी ब्राम्ह तत्त्वांच्या अनुरोधाने केले. पहिले तत्त्व म्हणजे मोकळा श्वास याप्रमाणे प्रत्येक मनुष्यामध्ये बुध्दी अथवा विवेक म्हणून एक शक्ती असते. त्याप्रमाणे त्यांच्यामध्ये सुध्दा अथवा विश्वास अशी एक शक्ती असते. ब्राम्हो समाजाचे तत्त्व असे ही आहे की या विश्वासाला कोणत्याही प्रकारचा प्रबंध अथवा दडपण असू नये. स्वाभाविक कारणांनी विश्वास कमी होत असे अथवा नष्ट होत असेल तर होऊ द्यावा अन्य काही कारणांनी नवा विश्वास उत्पन्न होत असेल तर तो मोकळ्या विश्वासाचे लक्षण होय. ब्राम्हाचे दुसरे तत्त्व म्हणजे आपले ज्ञान सतत वाढत राहील आदि अद्वैतवाद्यांचा अद्वैत सिध्दांत हे वाढते ज्ञान नव्हे. प्रत्येक व्यक्तीला जे नवे नवे अनुभव येतात. आजुबाजुच्या वातावरणात जे नाना प्रकारचे शोध लागतात. या सर्वांचा सुसंस्कार होऊन व्यक्तीची जी प्रज्ञा तयार होते ती प्रगमनशीलच असणार असे नवे ज्ञान सतत आत्मसात करणाऱ्या ब्राम्हधर्मात महत्त्व वाटते. शुध्द प्रीती हे ब्राम्हो धर्माचे तिसरे तत्त्व ही प्रीती कोणत्याही लाभाच्या अपेक्षेशिवाय असावी लागते. निरंतर आणि निर्लोभ प्रेम हे ब्राम्हो धर्माचे तिसरे आवश्यक लक्षण होय. ब्राम्ह धर्माचे चौथे लक्षण सात्वीक सेवा अपेक्षारहित प्रेमभावनेने सेवा केली म्हणजे निराशा आणि शीण येण्याचा संभव नसतो. उलट सात्विक सेवा करीत असताना प्रतिक्षेने आनंदच होत असतो.[२८] एकूणच पाश्चात्त्य जगातील युनिटेरियन समाज हा परमेश्वर एकच आहे. ख्रिश्चन हा केवळ अतिपवित्र साधू  पुरुष असून इतरांसारखा साधा मनुष्य आहे, असे समजतात. सेंट पॉलने ख्रिस्ताची शिकवण यथार्थ स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न

केला आहे. युनिटेरियन बायबलचा अनादर करत नसला तरी शंभर टक्के विश्वास ठेवता येत नाही. बायबलची तो चिकित्सा करतो. धर्माबाबतची ही चिकित्सा मानसिक विश्वासाची नसून ती उच्च भावनिकतेची आहे अशी त्याची दृढ समजुत झाली होती. युनिटेरियन समाज हा सुधारलेला पाश्चात्य जगाचे प्रबुध्द अंतर्याम होय. युनिटेरियन समाजाचे अनुकरण करुन ब्राम्हो व आर्य समाजाच्या कार्यास वाहवून घेतले. ब्राम्हो समाजात चिंतन, मनन याला महत्त्व दिले होते.

धर्म शिक्षणासाठी परदेशी गमन–मुंबई पुण्यात प्रार्थना समाजाच्या उपासनेचे काम महर्षी शिंदे यांनी केले. संत तुकारामांचा अभंग 'धायी अंतरीच्या सुखे दंड । काम बडबड वाचा मुखे' या अभंगाचे विवेचन पुणे येथील प्रार्थना समाजाच्या उपासनेत केले.[२९] मुंबई येथील प्रार्थना समाजाच्या उपासनेत 'काइ कीर्ती करु लोक दंभ । मान दंड दाखवर चरण तुझे मज।।' या अभंगाचे विवेचन केले. जमखिंडीला सुट्टीच्या काळात दर रविवारी घरी ते उपासना करु लागले. यांचा त्यांच्या आई–वडिलांना खूप आनंद झाला.

मुंबई प्रार्थना सामाजाची इतर कामे पाश्चात्यांना आवड वाटू लागली. थीईस्टीफ मिशनच्यावतीने चालविला जाणाऱ्या रात्रशाळा चेऊलवाडी, गिरगाव, गावदेवी, डोंगरी, खेतवाडी, भायखळा येथील वस्ती मधील रात्रशाळेची व्यवस्था प्रार्थना समाजाकडे होती. याशिवाय महार, मांग, चांभार इत्यादीं अस्पृश्य जातींच्या लोकांकरिता डोंगरानजीक मदत पुण्यात १८४० मध्ये शाळा चालविली जात होती. या शाळांवर देखरेख ठेवण्याचे काम वि. रा. शिंदे, बा. ह. सोहनी, अे. बी. ओळकर करीत असत.[३०] मुंबईत असताना महर्षी शिंदेची आर्थिक परिस्थिती ही सुधारलेली होती अशी नव्हे तर त्याकाळात आपल्या कुवतीप्रमाणे प्रार्थना समाजाच्या दुष्काळ फंडास मदत करीत होते. त्यांनी दुष्काळ फंडास १ रु. मदत दिल्याचा उल्लेख पहावयास मिळतो.[३१]

पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल मधील श्री.मोती बुलास हे अत्यंत बुध्दीमान पदवीधर शिक्षक प्रार्थना समाजाची त्यांनी दीक्षा घेतली. १९०० मध्ये धर्म शिक्षणासाठी श्री. मोती बुलास यांची निवड ऑक्सफर्डला पाठविण्यासाठी झाली. प्रार्थना समाजाच्या मंडळींना या घटनेच्या अभिनंदन पित्यर्थ पुण्यात विविध ठिकाणी सभा घेतल्या. श्री. मोती बुलास हे १५ सप्टेबर रोजी बोटीने विलायतेला जाण्यास पोर्टसर येथे ताप ज्वराच्या विकाराने त्याचे आकस्मित निधन

झाले. या दुर्दैवी घटनेमुळे प्रार्थना समाजाला फार वाईट वाटले. त्यामुळे पुणे प्रार्थना समाजात डॉ. भांडारकरांनी दुखवट्याची एक विशेष उपासना चालावी यासाठी वि. रा. शिंदे यांनी डॉ. भांडारकरांजवळ जाऊन म्हणाले. “याप्रसंगी मोती बुलासंच्या निधनाने रिकाम्या पडलेल्या जागेसाठी मला जर गुरुवर्यांनी पात्र ठरविले तर मी विलायतेस जाण्यास तयार आहे.”[३२] ग्रामीण भागात धर्माच्या नावाखाली अंधश्रध्दा, धर्मकल्पना यांना ऊत आला होता. समाज या धार्मिक रुढीमध्ये गुरफटला गेला होता. त्यांची अनेक प्रकारची छळवणूक होत होती. कित्येक मुलींना देवाच्या नावाने मुरळी म्हणून सोडले जात होते. त्याचे आयुष्य निंदनीय स्वरुपाचे बनले होते. धर्माविषयीची नीतीकल्पना नव्हती. सर्वसामान्य लोकांमध्ये धर्मसुधारणेची जाणीव निर्माण व्हावी यासाठी महर्षी शिंदे यांनी प्रयत्न केले. धर्म जीवनाच्या सर्व अंगाला व्याप्ती. राजा राममोहन रॉय यांच्या कर्तृत्त्वाचे आकलन करताना १९०३ सालच्या ॲमस्टरडॅम येथील उदार धर्मपरिषदेत प्रकट केले. नवसारी येथील वार्षिक महोत्सवाच्या वेळी भाषणात धर्मसुधारणा केवळ एक सुधारणा नसून सर्व चांगल्या मुळांशी असणारी ती गोष्ट आहे. म्हणूनच उदारधर्म हा विश्वधर्म बनू शकतो. धर्माच्या नावाखाली ज्या काही रुढी परंपरा चाललेल्या आहेत. त्या नष्ट करुन मानवाचा सर्वांगीण स्तर उंचावण्यास मदत होईल. त्यांना नैतिक अधिष्ठान प्राप्त होईल, असे शिंदे यांचे मत आहे. डॉ. भांडारकरांनी मनात आणल्यावर प्रांतिक समाजाची कलकत्याच्या समितीची नंतर ब्रिटिश कमिटीची व हेरीस मॅचेस्टर कॉलेजची पसंती या ओघा–ओघानेच मिळाल्या. हे नमूद करताना शिंदे यांनी एक व्यत्यय घडल्याचा निर्देश केला न्या. रानडे यांनी श्रीधर विष्णू परांजपे या तरुणाची शिफारस केली. याविषयी गं. त्र्यं. माडखोलकर म्हणतात की, त्यांच्या या विविध गुणांचा इतका परिणाम डॉ. भांडारकर व न्या. रानडे यांच्यावर झाला. इंग्लंड, अमेरिका युनिटेरियन पंथाने तुलनात्मक धर्मशिक्षणासाठी ठेवलेल्या शिष्यवृत्तीकरिता या दोघांनीही डिसेंबरमध्ये त्यांने शिफारस केली. एकेश्वरवादाचे प्रसारक म्हणून ते उत्तम काम करतील असा विश्वास प्रार्थना समाजाच्या त्या दोघांही धुराणांनी या शिफारशीच्या पत्रात त्याच्याविषयी व्यक्त केला होता. तथापि ती शिष्यवृत्ती युनिटेरियन पंथाचे प्रमुख डॉ. सँडर लँड यांच्या कर्मवीर वि. रा. शिंदे यांच्यावरील लोभामुळे अखेर त्यांना मिळाले. परदेशात जाऊन तौलनिक धर्मशास्त्राचा अध्ययन करण्याचा श्रीधररावांचा योग हुकला.[३३]

श्री. शिंदे यांची निवड परदेशी धर्मशास्त्राच्या अध्ययनासाठी झाली असली तरी त्यांच्यापुढे अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यात प्रवास खर्च, पोशाख खर्च, कुटुंबाचा खर्च इत्यादीं बरोबरच बडोदा संस्थानचे श्रीमंत सयाजीराव बरोबर केलेला करार यासारखे प्रश्न सोडविणे त्यांच्या दृष्टीने निकडीचे होते. म्हणूनच ते बडोद्याच्या महाराजांकडे भेटीसाठी फेब्रु. १९०१ मध्ये गेले. भेट झाली. महाराज मोठे दिलदार ते हसून म्हणाले 'काय शिंदे आमच्या पैशाची काय वाट ' मी अत्यंत नम्रपणाने उत्तर दिले. 'महाराज पत्करलेले कार्य ईश्वराचे आहे आणि ते आपल्यास पसंत पडल्यासारखेच आहे. धर्म सुधारणा, समाज सुधारणा इत्यादी प्रांगतिक गोष्टीचे बाळकडू आपण आजपर्यंत पुष्कळच पाजीत आलेले आहात. आता तर विलायतेतील युनिटेरियन समाजाने माझा अर्ज पसंत केल्यावर ही चालून आलेली संधी आपण दवडणार नाही. अशा भरवशावरच आपणांकडे आलो. मला प्रवासात लागणारे सुमारे दीड हजार रुपये जर आपण कृपाळुपणे द्याल तर अर्थातच माझ्या मागचे दीड हजार रुपयांचे ऋण फिटले असेच मी समजेन.' ऋण फेडण्याचा हा अजब प्रकार पाहून दयाळू महाराज हसले आणि म्हणाले, बरे आहे. शिंदे तुम्ही यशस्वी होऊन या. सेकंड क्लास डेकचे जाण्या-येण्याचे भाडे देण्याची हुजुराज्ञा झाली.[३४]

श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांची वि. रा. शिंदे यांना मदत झाली तरी त्यांचे परदेश गमन त्यांच्या आई-वडिलांना आवडणार नाही. या विचारांनी त्यांचे मन दु:खी झाले. पण त्यातही त्यांच्या आईनेच वडिलांना धीर देवून समजूत घातली व एक प्रकारे त्यांच्या या कार्यास प्रोत्साहन दिले. धर्मशिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याअगोदर महर्षी शिंदेनी लो. टिळकांची भेट घेऊन त्यांचे विचार ऐकण्याची इच्छा होती. त्यांची टिळकांबद्दची विरोधपूर्ण भक्तीची भावना विद्यार्थी दशेपासूनच होती. रोजनिशी काळ या वृत्तपत्राबद्दल लिहीत असताना त्यांनी केसरी संबंधी लिहिले आहे. त्यातूनच केसरीचे नेमके गुण व खटकणारे नेमके वैगुण्ये मार्मिकपणे नमूद केले आहेत.[३५] धर्म शिक्षणासाठी परदेश गमनास निघालेल्या वि. रा. शिंदे यांना पुणे प्रार्थना समाजात डॉ. भांडारकर यांनी एक विशेष उपासना चालवून एक कार्यक्रम केला. या कार्यक्रमानिमित्त भांडारकरांनी अत्यंत महत्त्वाचे उपयुक्त विचार प्रकट केले. सर्व शक्तिमान परमेश्वराचर मृत्यू बनून त्याप्रमाणे आपल्यापैकी एक समजून त्याचे माणूसकीकरण करण्यामुळे आपली अशी अध्यात्मिक अधोगती होते. याचा त्यांनी उल्लेख केला होता. त्याचप्रमाणे सर्व

देशातल्या धर्माच्या तत्त्वाचे एकीकरण करुन त्यांना फुटलेले आडफाटे तोडून काढून तो नीट विकसित करण्यासाठी History and Philosopy of religion याचे अध्ययन उपयोगी पडणार आहे. याचा उल्लेख केला होता.[३६] वि. रा. शिंदे हे धर्मशिक्षणासाठी परदेशगमनासाठी मुंबईहून २१ सप्टेंबर १९०१ रोजी पर्शिया या बोटीने इंग्लंडला जाण्यास निघाले. त्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी डॉ. भांडारकरांसह इतर प्रार्थना समाजातील जेष्ठ व तरुण मंडळी शुभेच्छा देण्यासाठी पुढे आली. आई–वडिलांसह भाऊ (एकनाथ) व बहिण जनाक्कासह ते मुंबईस आले. त्याची आई जनाक्काबाई यांच्याकडे पाहून महर्षी शिंद्यांना आपल्या भावना आवरता येत नव्हत्या. बँलाडपियर येथे मित्रमंडळी प्रार्थना समाजाचे सभासद व नातेवाईक यांना बघून गोळा येत. त्यातही वि. रा. शिंदे खिन्न मनाने उभे होते. जेव्हा त्यांची बोट हालली तेव्हा थरथर कापत असलेली आई स्वत:शी उद्‌गारली 'बाळा जातोस खरं पण तु पोटात असताना मला जसे फिरल्यासारखे होत होते तसेच आताही माझ्या पोटात फिरल्यासारखे होत आहे रे.'[३७] वि. रा. शिंदे त्यांची आई वडील व जनाक्काबाई या सर्वांनाच विरह सहन न होणारा असा वाटू लागला. बोटीत बसलेल्या विठ्ठलरावांनी आपल्या मनाची हळूहळू तयारी केली व मनाच्या या भावनामय अवस्थेत मुंबई युनिव्हर्सिटीवरचा शिक्षण पध्दतीवरील राग नाहीसा व पाहून जसे दूर जावू लागले तसे त्यांच्या मनात या प्रवासाची मनात प्रेरणा होण्यास जी पर्यायाने कारण झाले आहे मी मुंबई युनिव्हर्सिटी जणू हात वर करुन आशीर्वाद ही देत आहे.[३८]

पर्शियन बोटीने वि. रा. शिंदे चौदा दिवसाच्या जल प्रवासानंतर मार्सेमावा बोटीवर त्यांच्या बरोबर लंडनला जाणार होते. त्यामुळे व्यवसायाबरोबर लंडनला हे दुसऱ्या क्रमांकाचे शहर. येथे इतर भाषेत बोलायचे नाही. असा प्रघात होता. त्याच्या बरोबरीला मिस्टर कोतवाल यांना थोडीफार भाषा अवगत होती. यासंबंधी वि. रा. शिंदे लिहितात, आमच्या व्यापारी पारसी सोबत्यास फ्रेंच भाषेत थोडी जीभ हालविता येत होती. त्याचा आम्हांस अतोनात फायदा झाला.[३९] इतक्या थोड्याशा कालावधीत मार्सेय शहराचे सौंदर्य व स्वच्छता नटवेपणा सोबत्याबरोबर हिंडून पाहिला. रात्रीचे जेवण आटपून ते रेल्वेने पॅरिसला पोहचले पॅरिसचा मुक्काम ही दहा तासाचा होता. तेवढ्याही कालावधीत त्यांनी मोठ–मोठे सुंदर महाल, ऐतिहासिक राजकोशांची थडगे स्मशान भूमी, नेपोलियनचे भव्य कब्रस्तान, द विंग व्हील नावाचे राक्षसी चक्र एफेल टॉवर इत्यादीं महत्त्वपूर्ण ठिकाणे पाहिली. रात्री साडेबारा वाजता पॅरिस

मुक्काम संपवून बोटीने लंडन गाठले ते सकाळी सात वाजता लंडनला तालबट रोड वरील सोमेश्वरचंद्र दत्त यांच्या घरी वि. रा. शिंदे उतरले. या काळात दत्त कुटुंबीय बाहेर गावी गेले असल्यामुळे दोन दिवसांच्या मुक्कामानंतर महर्षी शिंदे रेल्वेने ऑक्सफर्डला रवाना झाले.

इच्छा तेथे मार्ग या युक्तीप्रमाणे वि. रा. शिंदे यांच्या जीवनात परदेश गमनाचा हा प्रवास सुखावह झाल्यामुळे ते परमेश्वर चरणी आभार मानतात. आर्य समाजाचे काम पुणे, मुंबईत करत असताना त्यांची एकूणच परदेश गमनाची इच्छा तीव्र झाली होती. त्यामुळेच ते ऑक्सफर्डला सहज पोहोचले.

हिंदुस्थानातील एका जमखिंडीसारख्या एका छोट्याशा खेड्यातील खेडवळ मुलगा जगातील नावाजलेल्या विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी आला. याविषयी महर्षींना धन्यता वाटत होती. आपले जुने इतिहासातील टिकवून ठेवलेले ऑक्सफर्ड शहरातील मँचेस्टर कॉलेजची भव्य इमारत शिलालेखात कोरलेले सत्य, स्वातंत्र्य व धर्म यास वाहिलेले ब्रीद पाहून महर्षींचे अंत:करण आदराने भरून आले. त्याचवेळी वयाने व विद्येने वाकलेले मूर्ती लहान असेच कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. एड्मंडसाहेब यांनी महर्षींच्या मनातील परकेपणाची भावना काही क्षणातच नाहिशी केल्याने महर्षींना आपल्या कुटुंबात आहे असे वाटले. इतर विद्यार्थ्यांप्रमाणे दुसऱ्या दिवसापासून त्यांचा दिनक्रम सुरु झाला. धर्मशिक्षणासाठी हिंदुस्थानात आले. महर्षी शिंदे हे चौथे विद्यार्थी त्यांच्या आधी बंगालमधून प्रथम लालसेन (१८९८), बिपीनचंद्र पाल (१८९८) व हेमचंद्र सारस्वत (१८९८) हे तीन विद्यार्थी आले होते.[४०] कॉलेजमध्ये पाच कायम दोन हंगामी प्राध्यापक होते. ते सर्वच त्यांच्या विषयातील पंडीत होते. प्रो. कारपेंटर हे विठ्ठल रामजीचा तुलनात्मक धर्म या ऐच्छिक विषयाचे गुरु होते. पाली भाषा व बौध्द धर्म या विषयाचा विशेष अभ्यास त्यांच्याजवळ केला. एकूणच कॉलेजमध्ये महर्षी शिंदे अध्यापकांचे व्याख्याने मन लावून ऐकणे, अवांतर वाचन असा नित्यक्रमाबरोबरच नव्या संस्कृतीचा परिचय ही करुन घेत होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांचे व्यक्तिमत्व वरीलप्रमाणे घडल्यामुळेच ते शेवटपर्यंत समाजसुधारणेचे कार्य केले होते. त्यांचे सामाजिक कार्य हे विशिष्ट जडणघडणीतूनच झाले होते. विशेष म्हणजे त्यांच्या सामाजिक सुधारणा कार्याची चौकट त्यांच्या कुटुंबातच झाली होती. त्यांच्या आजोबा आजी व वडिलापासूनच त्यांना वारसा मिळाला होता. त्यांना त्यांच्या आईनेही

चांगले सुसंस्कृत संस्कार केले होते. पुढे त्यांच्यावर प्रार्थना समाजाचा प्रभाव पडला होता. तसेच ख्रिस्ती धर्मातील उदार तत्वांचाही त्यांच्यावर प्रभाव पडलेला होता. हे स्पष्ट होते.

## ३.३ राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण

आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले होते. या काळात महाराष्ट्रात उच्च वर्णीयांनी आपले सर्वांगीण वर्चस्व निर्माण केले होते. ते टिकविण्यासाठी बहुजन समाजावर निरनिराळी बंधने लादली जात होती. ही बंधने झुगारून, बहुजन समाजाला मुक्त करून, त्याला जागृत करण्याचे व त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य त्यांनी केले.

राजर्षी शाहू महाराजांचा कालखंड (इ.स.१८९४ ते १९२२) हा अल्प म्हणजेच केवळ २८ वर्षांचा आहे. केवळ वयाच्या विसाव्या वर्षी ते राजे झाले. त्यांचे राज्य हे कोल्हापूर जिल्हयापुरतीच लाभलेली सत्ता व संपत्ती, स्वातंत्र्य  आजच्या स्वतंत्र राष्ट्राच्या मानाने खूपच अल्प होते. त्यांनी कोल्हापूर राज्यात शिक्षणाचा प्रसार, विषमतेचा नाश, न्याय, शेती, उद्योग साहित्य, क्रीडा, कला, सहकार, संगीत नाटय, चित्रपट, सामाजिक नव–नवे उपक्रम, सामाजिक संघर्ष इत्यादी प्रत्येक बाबतीत राजर्षी शाहू महाराजांनी घेतलेली भूमिका आणि झेप असामान्यच होती. ब्रिटिश प्रतिनिधीचे 'रिजन्सी प्रशासन' संपुष्टात येऊन राजर्षी शाहू महाराजांचे 'प्रत्यक्ष शासन' सुरू झाले होते. बहुजन समाजाचा विकास हा ध्यास डोळयांसमोर ठेवून निष्ठापूर्वक व नियोजनबद्ध रीतीने प्रशासन केले.

राजर्षी शाहू महाराज हे आपल्या घराण्यातील इतर सर्व राजांपेक्षा वेगळे होते. हे त्यांच्या सामाजिक कार्यातून दिसून येते. त्यांनी सत्तेवर येताच प्रथमतः आपल्या राज्यापासूनच त्यांनी समाजसुधारणेस सुरूवात केली होती. अशा या थोर राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची वैचारिक जडणघडण कशाप्रकारे झाली होती. याची माहिती यामध्ये नमूद केलेली आहे.

### राजर्षी शाहू महाराजांचा जन्म व घाटगे घराण्याचा वारसा

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून, १८७४ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे, तर आईचे नाव श्रीमंत राधासाहेब असे होते. राजर्षी

शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. यावरूनच ते मूळ कागलच्या घाटगे घराण्यातील होते. ते कोल्हापूरच्या राजघराण्यातील नव्हते. त्यांना कोल्हापूरचे चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीसाहेब यांनी १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले होते. दत्तकविधानानंतर ते शाहू महाराज या नावाने ओळखले गेले व कोल्हापूरच्या संस्थानाचे वारसदार बनले होते.[४१]

**कागलच्या घाटगे घराण्याचा वारसा**

उत्तरेकडे पराक्रम गाजवून त्याच्या जोडीला मुत्सद्देगिरी असणारी अनेक रजपूत घराणी दक्षिणेकडे आली होती. त्यामध्ये कागलकर घाटगे घराणे अग्रेसर होते. या घराण्याचे मूळ आडनाव राठोड होते. १४ व्या शतकात या घराण्यातील कामराज राठोड हे नशीब काढण्यासाठी विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेकडे बिदरला आले होते. त्यांनी दक्षिणेतील बरीदच्या बिदरशाहीमध्ये मोठा पराक्रम गाजविला होता. बिदरच्या सुलतानाने कामराज यांना सरदारपद बहाल केले होते. त्यावेळी कामराज राठोड याने खूप उंचीवर टांगलेली घंटा हवेत दोन वेळा वरच्यावर कोलांटी उडया घेऊन वाजविली. त्या दिवसापासून घाट वाजविणारे ते घाटगे, असे संबोधन त्यांना मिळाले. बिदरच्या सुलतानासह सर्वजण त्यांना कौतुकाने 'घाटगे' म्हणू लागले. त्यांचे मूळ आडनाव राठोड हे मागे पडले व 'घाटगे' हे नाव पुढे आले.

घाटगे नावाच्या उत्पत्तीविषयी आणखी सांगितले जाते ते म्हणजे राठोड कुळातील लखमोजी व रामाजी बिदरास रसद घेऊन चालले होते. वाटेत एक अवघड घाट होता. रसद लुटण्याच्या उद्देशाने शत्रूचे सैनिक घाटात व खिंडीत दबा धरून बसत. शत्रुसैन्याने रसद अडवताच राठोडांच्या सैन्याने समशेरीच्या साहाय्याने हल्ला चढविला. त्यावेळी मोठी लढाई झाली. त्यात शत्रुसैन्याचा निःपात झाला. या हत्याकांडाचा शत्रूने एवढा धसका घेतला की, त्यानंतर घाटात लूटालूट झाली नाही. घाट दळणवळणासाठी आता धोका उरला नाही. हे केवळ घाटगेंनी गाजविलेल्या पराक्रमामुळे शक्य झाले. म्हणूनच राठोडांना घाट घे, घाटगे–घाडगे असे नाव पडले एक अत्यंत वजनदार व पराक्रमी सरदार, असा लौकिक घाटगे घराण्यातील पुरूषांनी बिदरच्या दरबारात संपादित केला होता. अशी नोंद इतिहासकार फेरिस्त याने नमूद केले आहे.[४२]

बिदर व गुलबर्गा या सत्तांचा शेवट झाल्यानंतर घाटगे घराणे आदिलशाहीच्या आश्रयास आले. भीम पराक्रमी भानजी घाटगे आदिलशाहीत आपल्या पराक्रमाने चमकले. कागलचे

बंडखोर देसाई आदिलशाहीला सतत सतावीत होते. भानजी घाटगे यांनी हिमतीने लढाई करून शौर्याची पराक्रमाची शर्थ करून बंडखोर देसायांचा बीमोड केला. त्यांच्या या पराक्रमावर आदिलशहा खूश झाला. १७५२ मध्ये त्याने कागल परगणा घाटगे यांना बहाल केला. त्याचवेळी निजामशहाचा एक रजपूत सरदार आदिलशहावर चालून आला. त्याचा पराभव भानजी घाटगे याने केला त्यामुळे आदिलशहाने खूश होऊन त्यास सर्जेराव हा किताब बहाल केला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्जेराव घाटगे यांच्या घराण्यातील विठोजीराव घाटगे यांना अभयदान देणारे पत्र पाठविले. तेव्हा विठोजीराव घाटगे यांनी शिवाजी महाराजांना साहय करण्याचे ठरविले. त्यावेळेपासून हे घराणे स्वराज्य संस्थापनेच्या कार्याकडे वळले. शिवाजी महाराजांनी विठोजी घाटगे यांचे पुत्र पिराजीराव घाटगे यांना कागल परगण्याची वतनदारी एका सनदेद्वारा दिली. करवीरचे दुसरे शिवाजी महाराजांची कन्या आऊबाई यांचा विवाह यशवंतराव घाटगे यांच्याशी सन १७९२ मध्ये झाला. त्यामुळे घाटगे भोसले स्नेही झाले होते.

पेशवेकाळात सखाराम घाटगे हा आपल्या पराक्रमाने गाजला होता. त्यांचा पेशवे दरबारी मोठा दरारा होता. सखाराम घाटगे यांनी दुसऱ्या बाजीरावास पेशवेपद मिळविण्यासाठी मदत केली होती. परंतु दुसऱ्या बाजीराव पेशव्याने ठरलेली रक्कम सखाराम घाटगे यांना न दिल्याने सखाराम घाटगे यांनी पुणे हस्तगत करून त्यावरून गाढवाचा नांगर फिरविला होता. इ.स.१८०९ मध्ये सखाराम घाटगे यांचा खून झाला. तेव्हा त्यांचा मुलगा जयसिंगराव घाटगे कागलचा अधिपती बनला. करवीर छत्रपतींनी त्यांनी केलेल्या कार्याचे कौतुक म्हणून 'हिंदुराव' व 'वजारत मा–आब' असे दोन किताब दिले. जयसिंगराव यानंतर 'हिंदुराव बाबा' या नावाने ओळखले जाऊ लागले.

हिंदूराव यांनी पुढे ग्वाल्हेरच्या शिद्यांकडे नोकरी केली. पुढे ते दिल्लीला गेले व शेवटपर्यंत तेथेच राहिले. त्यांचा मृत्यूही तेथेच झाला. त्यांना मुलबाळ नसल्याने त्यांच्या पत्नी पार्वतीबाईने सन १८६० मध्ये सखाराम बापूसाहेब यांना दत्तक घेतले होते. ते ही सन १८६४ मध्ये निपुत्रिक मरण पावले. म्हणून त्यांची पत्नी सुंदराबाई हिने करवीर दरबारच्या मंजुरीने १८६८ मध्ये एक मुलगा दत्तक घेतला. त्याचे नाव जयसिंगराव आबासाहेब ठेवले होते.[४३]

## राजर्षी शाहू महाराजांचे वडील जयसिंगराव घाटगे यांचा वारसा

जयसिंगराव आबासाहेब यांचा जन्म १ मार्च १८५६ रोजी करवीर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नारायणराव घाटगे आणि आई बाळाबाई तथा आक्कासाहेब महाराज होय. ही बाबासाहेब महाराजांची बहिण होती. जयसिंगरावाचे बालपण मामांच्या राजवाडयात गेले होते. त्यांचा विवाह वयाच्या आठव्या वर्षी मुधोळच्या राजघराण्यातील राधाबाईशी झाला होता. ते वयाच्या बाराव्या वर्षी सखाराम बापुसाहेब यांची पत्नी सुंदराबाईकडे दत्तक गेले होते. त्यामुळे कागलचे सीनिअर अधिपती बनले. कुस्ती, क्रिकेट व शिकार हे त्यांचे आवडते खेळ होते. त्यांनी संपूर्ण भारतभर दौरा केला होता. त्यावेळी ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना भेटी दिल्या होत्या. त्यातून त्यांना लोकजीवन समजले. त्यांना वाचनाची खूप आवड होती. त्यांचे वक्तृत्त्वही चांगले होते.

सन १८७८ मध्ये त्यांच्याकडे कागल सिनिअर जहागिरीच्या कारभाराची सूत्रे आली. त्यावेळी त्यांनी जहागिरीची पाहणी करून त्यामध्ये आर्थिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. चोर व दरोडेखोरांचा बंदोबस्त केला. पोलीस खात्याची पुनर्रचना केली. सरकारी कचेरीतील कामकाज स्वतः पाहू लागले. सरकारी अधिकाऱ्यांच्या कामातील कुचराई बंद करून त्यांना नियमाप्रमाणे कारभार करण्याची सक्ती केली. त्यामुळे जहागिरीतील कामे चांगल्या प्रकारे जलदपणे होऊ लागली. अल्पकाळातच ते लोकप्रिय झाले. त्यांनी शेतकरी व शेतीसुधारणेकडे लक्ष घातले. त्यानंतर जहागिरीतील शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणला. त्यामुळे जहागिरीतील अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाचा प्रकाश प्रजेस दाखविण्यासाठी तळमळणारा अधिपती म्हणून त्यांचा नावलौकिक सरकार दरबारी तसेच सर्वत्र झाला. त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केल्याने करवीर दरबाराने त्यांचे कौतुक केले. जयसिंगराव घाटगे व राधाराणी यांच्या पोटी २६ जून १८७४ रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी यशवंतराव घाटगे यांचा जन्म झाला.[४४]

यशवंतराव घाटगे यांचा जन्म झाला त्यावेळी त्यांचे वडील जयसिंगराव घाटगे हे कागलच्या सिनिअर जहागिरीचे अधिपती होते. यशवंतराव यांच्या घाटगे घराण्यास ऐतिहासिक परंपरा होती. या परंपरेचे संस्कारच त्यांच्या मनावर घडून आले होते. त्यांच्या पूर्वजांनी बरीदची बिदरशाही, निजामशाही, आदिलशाही, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापनेकामी,

ग्वाल्हेरचे शिंदे यांच्याकडे, पेशवे काळात फार मोठी कामगिरी बजावली होती. त्याच्याच जोरावर त्यांना कागलची जहागीर मिळविण्याकामी उपयोग झाला होता. जयसिंगराव घाटगे यांनी करवीरच्या छत्रपतींच्या दरबारात आपला मोठा नावलौकीक मिळविला होता. त्याच्याच जोरावर त्यांचा मुलगा यशवंतराव यांना कोल्हापूरचे छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांनी दत्तक घेतले होते.

यशवंतराव घाटगे यांच्यावर त्यांच्या वडीलांचा कर्तृत्त्वाचे व पराक्रमाचा वारसा चालून आलेला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही त्यांच्या वडीलांकडून झालेली दिसून येते. वडीलांच्या अंगचे गुण यशवंतराव यांच्या अंगी असलेले दिसून येतात. त्यांच्या वडीलांनी कागल जहागिरीत लोकोपयोगी कामे करून लोकप्रियता मिळविली होती. त्यांचाच वारसा पुढे चालवून यशवंतरावांनी कोल्हापूर जहागिरीचा विकास केलेला दिसून येतो.

**राजर्षी शाहू महाराजांचे दत्तकविधान**

सन १७०८ मध्ये कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले. तेव्हापासून कोल्हापूर येथे छत्रपती दुसरा शिवाजी, छत्रपती संभाजी, छत्रपती तिसरे शिवाजी, छत्रपती आबासाहेब महाराज, छत्रपती बुवासाहेब महाराज, छत्रपती बाबासाहेब महाराज, छत्रपती राजाराम महाराज व छत्रपती चौथे शिवाजी हे सत्ताधिश बनले. छत्रपती चौथे शिवाजी यांना वेडसर ठरवून इंग्रजांनी अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवले व तेथेच त्यांच्या जीवनाचा शेवट झाला. कोल्हापूरचे छत्रपती चौथे शिवाजी यांच्या अकाली निधनापूर्वी कागलेचे अधिपती श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब यांची कोल्हापूरचे रीजंट म्हणून नेमणूक झाली. छत्रपतींचा राज्यकारभाराशी संबंध तुटलेला असल्याने ही नेमणूक झालेली होती. रीजंट म्हणून काम करताना आबासाहेबांनी जमीन महसूलविषयक कामे, शेतीला पाणीपुरवठयाची सोय, शाळांची निर्मिती व आर्थिक साहाय्य या कार्याला महत्त्व दिले. कोल्हापूर संस्थानात शांतता व सुव्यवस्था स्थापन केल्यामुळे त्यांच्या कार्याविषयी समाजात विश्वास निर्माण झाला. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांचा इंग्रजांनी केलेल्या प्रचंड छळामुळे अहमदनगरच्या किल्ल्यात सन १८८३ मध्ये निपुत्रीक मृत्यू झाला. त्यामुळे कोल्हापूर संस्थानचा कारभार चालविण्यासाठी दत्तक घेण्याची गरज निर्माण झाली. छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचा ज्येष्ठ पुत्र यशवंतराव

याला दत्तक घेण्याचे ठरविले. १७ मार्च १८८४ रोजी दत्तकविधान झाले. दत्तकविधानानंतर यशवंतराव हे शाहू महाराज या नावाने ओळखले जाऊ लागले. ते कोल्हापूर संस्थानचे वारसदार बनले. दत्तकविधानाच्या वेळी कोल्हापूरच्या नागरीकाकडून व पुण्याच्या सार्वजनिक सभेतर्फे शाहू महाराजांना मानपत्रे अर्पण करण्यात आली.[४५]

या राज्यारोहणाप्रसंगी पोलिटिकल एजंट कर्नल एच.ए.रीव्हज आणि इतर युरोपियन अधिकारी, दक्षिणी संस्थानांपैकी अक्कलकोट, मुधोळ, मिरज, कुरूंदवाड, रामदुर्ग इत्यादी संस्थानिकांचे अधिपती उपस्थित होते. करवीर नगरपालिका आणि राजकीय क्षेत्रातील पुण्याची सार्वजनिक सभा आदी लोकप्रतिनिधिक संस्थांची प्रतिनिधी मंडळे समारंभास उपस्थित होती. करवीर राज्यातील सर्व जहागीरदार, सरदार, दरकदार, सरंजामदार, मानकरी व अधिकारी हेही या समारंभास उपस्थित होते. कर्नल रीव्हज यांनी दहा वर्षाच्या यशवंतरावास सिंहासनावर बसविले. अशाप्रकारे यशवंतरावाचे नाव बदलून शाहू ठेवून ते सिंहासनारूढ झाल्याची घोषणा देण्यात आली.[४६]

राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही आपल्या पूर्वजांच्या वारसातून घडलेली असली तरी त्यांचे दत्तकविधान झाल्यानंतर सहाजिकच ते छत्रपती बनल्याने त्यांची वैचारिक जडणघडण ही राजाप्रमाणे झाली. त्यांच्या कार्यावरून हे स्पष्ट होते की, त्यांनी कोल्हापूरच्या पूर्वीच्या छत्रपतींना जे शक्य झाले नाही त्या पद्धतीचे कार्य त्यांनी केले. हे केवळ त्यांच्या बुद्धिमत्तेतून शक्य झाले होते. त्यांच्या विचाराची जडणघडण ही घाटगे व भोसले या दोन्ही घराण्याकडून झालेली दिसते. त्यामुळे दत्तकविधान झाल्यानंतर त्यांनी भोसले घराण्यातील संस्कारानुसारच आपले कार्य केलेले दिसून येते.

### राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण

#### प्रारंभीचे शिक्षण व्यवस्था

राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणाची सुरूवात ते दत्तक होण्यापूर्वीच झाली होती. राजप्रतिनिधी आबासाहेब घाटगे यांनी शाहू व आपला दुसरा पुत्र बापूसाहेब, कागलचे काकासाहेब आणि दत्ताजी इंगळे यांच्या शिक्षणाची योग्य अशी व्यवस्था करण्यात आली होती. कृष्णाजी भिकाजी गोखले आणि हरिपंत गोखले यांची शिक्षक म्हणून निवड झाली. त्यांचे शिक्षण कोल्हापूर येथे सुरू झाले होते. पण शिक्षणाची सर्व व्यवस्था ब्रिटिश राजनैतिक

उपप्रतिनिधी फिटझिराल्ड यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. आबासाहेब घाटगे हे १८८५ च्या मार्चमध्ये मुंबईचे माजी राज्यपाल सर जेम्स फर्ग्युसन या मित्राबरोबर लंडनला गेले होते. तेथून कोल्हापूरास सप्टेंबरमध्ये परत आल्यावर त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयीचे आपले धोरण बदलले आणि शाहूंना इंग्लंडला एवढया अल्पवयात पाठवायचे नाही असा निर्णय घेतला.[४७]

नोव्हेंबर १८८५ मध्ये फिटझिरॉल्ड यांना आपली अधिकाराची जागा सोडावी लागली. त्यांनी शाहूंच्या शिक्षणाबद्दल ब्रिटिश शासनाला अहवाल पाठवला होता. त्यात ते म्हणतात, 'शाहूंनी आपला प्राथमिक शाळेचा अभ्यास पूर्ण केला असून इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू केला आहे. तरीसुद्धा त्यांनी अभ्यासात अधिक कष्ट घेणे गरजेचे आहे. शाहू जरी शिक्षणात उत्सुकता दाखवत असले तरी ते लाजाळू आहेत. त्यांनी अधिक मेहनत घेणे गरजेचे आहे.'[४८]

**राजकोट महाविद्यालयातील शिक्षण**

आबासाहेब घाटगे आणि कर्नल जे.डब्ल्यू.वॉटसन यांनी शाहूंना राजकोटच्या राजकुमार महाविद्यालयात पाठविण्याचे ठरविले. १८८६ च्या जानेवारीत शाहू व त्यांचे सहकारी राजकोटला गेले. त्यांच्यासोबत त्यांचे शिक्षक गोखले व बुवासाहेब इंगळे हे होते. बुवासाहेब इंगळे हे अनेक खेळांत प्रवीण होते. ते साधेपणा व पौरूष यांचे प्रतीक होते.

त्या काळात राजकुमार महाविद्यालयाचे प्राचार्य मॅक्नॉक्टन हे होते. ते अत्यंत दयाळू होते. शाहू महाराजांना इयत्ता पाचवीमध्ये प्रवेश देण्यात आला. त्यावेळी त्याच वर्गात काकासाहेब, बापूसाहेब व बापूजी इंगळे यांनाही तेथे प्रवेश देण्यात आला. राजकुमार महाविद्यालयात शाहूचे शिक्षण सुरू झाले की लगेचच म्हणजे १९ मार्च १८८६ रोजी बातमी आली की, आबासाहेब घाटगे हे आजारी पडले आहेत. त्यामुळे ते आपल्या सहकाऱ्यासमवेत तातडीने कोल्हापूरला निघाले. ते राजकोटहून निघाले त्यावेळी त्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणाले की, 'कोल्हापूरकर आणि कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांना कोल्हापूरास तातडीने बोलावण्यात आले. मला अशी भीती वाटते की, बहुधा ते आता परत येणार नाहीत. कोल्हापूर ते राजकोट हा प्रवास अडचणीचा व दगदगीचा आहे. हे सर्व मुलगे चांगले होतकरू होते. त्यांपैकी दत्ताजी इंगळे हा बुद्धीने असामान्य होता.'[४९]

इंग्लडहून कोल्हापूरला परत आल्यावर आबासाहेब घाटगे यांना कागल व कोल्हापूर येथे सार्वजनिकरीत्या मानपत्रे अर्पण करण्यात आली होती. कारण आबासाहेब घाटगे सर्व जहागिरदापैकी लंडनला जाणारे पहिले जहागिरदार होते. लंडनहून परत आल्यावर आबासाहेब हे दारूच्या व्यसनात बुडाले होते. त्यांना हृदयविकार झाला होता. त्यांनी मृत्यूसमयी विल्यम लीवॉर्नर या हंगामी ब्रिटिश राजनैतिक प्रतिनिधीच्या देखत एक इच्छा व्यक्त केली होती की, शाहू आणि बापूसाहेब यांना इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान राजकोट येथे मिळाल्यावर लंडनला पाठवावे. आबासाहेबांचे निधन वयाच्या तिसाव्या वर्षी २० मार्च १८८६ रोजी झाले. राजकोटहून शाहू महाराज २२ मार्चला कोल्हापूरला पोहचले. त्यावेळी जहागीर कागल व कोल्हापूर संस्थानात मोठे दुःख झाले होते. तर शाहू महाराजांचा कोवळ्या वयातच नैतिक, राजनैतिक आणि निसर्गदत्त असा आधार कोसळल्यामुळे त्यांना विद्यार्थीदशेपासूनच एकालकोंडेपणाची व एकांताची सवय जडली.[५०]

ज्या कारणामुळे शाहूंच्या वडिलांचा मृत्यू त्यांच्या ऐन तारूण्यात ओढवला होता. त्या कारणांचा त्यांच्या मनावर कायमचा ठसा उमटला. त्यांच्या मनात दारूविषयी घृणा निर्माण झाली. त्यांच्या जहागीरदारांपैकी कोणी लहान मुलगे मागे ठेवून मरण पावला तर त्या मुलाविषयी शाहू महाराजांना अतिशय कळवळा वाटत होता. ते अशा मुलांना आर्थिक सहाय्य करीत असत. अशाप्रकारे कोल्हापूर संस्थान हे अल्पवयी संस्थानिकांचे व अल्पवयी जहागीरदारांचे मातृगृह म्हणून पुढे प्रसिद्ध झाले. शाहू महाराज विद्यार्थीदशेत त्यांचे शिक्षक कृष्णाजीपंत गोखले हे आपापल्यापरीने त्यांना समुदेश करीत. शाहू महाराजांनी कनिष्ठ समाजातील लोकांची संगत करण्यापेक्षा त्यांनी आपल्या वडिलांच्या प्रतिष्ठित मित्रजनांच्या संगतीत राहावे अशी त्यांनी सूचना केली. त्यावर शाहू महाराज म्हणाले की, 'वडीलांच्या, मित्रांच्या संगतीपासून कोणते फळ मिळाले हेही मला माहित आहे. मला त्या मित्रांची संगत नको. त्यांचे दुर्गुणही मला नको.'[५१]

शाहू महाराजांना उन्हाळा संपल्यानंतर शिक्षणासाठी पुन्हा राजकोटला पाठविण्यात आले. त्यावेळी त्यांनी हिंदुस्थानचे गव्हर्नर लॉर्ड डफरीन यांची भेट घेतली व आपल्या निष्ठा ब्रिटिश शासनाशी राहतील असे आश्वासन दिले. राजकोटच्या महाविद्यालयात शाहू महाराजांना जी वागणूक मिळत होती ती पसंत नव्हती. त्यामुळेच त्यांनी आपले असे मत प्रकट केले की,

कोणत्याही राजपुत्राचे शिक्षण हे संस्थानात व प्रजेमध्ये झाले पाहिजे. शिष्याला युरोपियन मालकाच्या स्वाधीन करू नये. विशेषतः स्थानिक माणसांच्या अनुपस्थितीत त्याचे शिक्षण कधीही करू नये. थोडक्यात राजकोटला त्यांना वाईट वागणूक मिळाली असा त्याचा अर्थ आहे. म्हणूनच त्यांनी एप्रिल १८८९ मध्ये राजकोट सोडले.[५२]

शाहू महाराजांना राजकोट येथील शिक्षणात एक नवीनच अनुभव आला होता. तो म्हणजे तेथे मुलांना चांगल्याप्रकारची वागणूक मिळत नव्हती.

### स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखालील शिक्षण

शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण ही विशेषतः फ्रेजरसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर तयार झाली होती. हिंदुस्थानामधील हंगामी ब्रिटिश राजप्रतिनिधी विल्यम लूवॉर्नर हे रजेवर इंग्लडला गेले. त्यांनी जाताना ४ मार्च १८८९ रोजी राजकोट येथे शिक्षण घेत असलेल्या शाहू महाराजांना पत्र पाठविले. त्यामध्ये पुढील मजकूर होता. 'आपल्या वडिलांच्या इच्छेनुसार आपल्या शिक्षणाची व्यवस्था एक नवीन अधिकारी नेमून मी केली आहे. तो शिक्षक इतका सज्जन आहे की, त्याचे पालकत्व आणि मैत्री मी माझ्या मुलांकरीताही मिळविण्यात आनंद मानला असता.' शेवटी ते म्हणाले की, 'आपण आपल्या वडीलांप्रमाणे खाजगी व सार्वजनिक आयुष्यात प्रजेची प्रचीती आणि त्यांचे यथोचित प्रेम संपादन कराल असा माझा विश्वास आहे.' हे पत्र वाचल्यावरच शाहू महाराजांनी राजकुमार महाविद्यालय सोडले होते.

नवीन नेमलेल्या शिक्षकाचे नाव होते स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेझर असे होते. ते इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा उत्तीर्ण झालेले असून, शाहूराजे यांचे शिक्षक म्हणून नेमणूक होण्यापूर्वी ते नाशिकचे सहाय्यक जिल्हाधिकारी व दंडाधिकारी होते. तसेच डांग आणि सुरगाना यांचे ब्रिटिश राजप्रतिनिधीही होते. या शिक्षकाच्या देखरेखीखाली शाहू महाराजांचे शिक्षण सुरू होणार होते. त्यांचा विचारमग्न आणि दयाळू चेहरा, त्यांचे सरळ नाक , मागे वळलेले कपाळ, खोल पण चमकणारे नेत्र, यांमुळे फ्रेझर यांचे व्यक्तिमत्व तेजस्वी बनले होते. ते उदारमतवादी नि कर्तव्यनिष्ठ होते. त्यांनी शाहू महाराजांना शिक्षणासाठी २२ मे १८८९ रोजी कोल्हापूर येथे घेतले. तर त्यांच्या अध्ययनास सुरूवात धारवाड येथे झाली.[५३]

प्रथमतः फ्रेझर आणि त्यांचे विद्यार्थी यांना राहावयास योग्य असे बंगले न मिळाल्याने ते धारवाडच्या किल्ल्यात साध्या घरात राहू लागले. फ्रेझरसाहेबांच्या जोडीला सहाय्यक शिक्षक

म्हणून प्रभा संकर महणी व केशवराव गोखले यांची नियुक्ती झाली. गोखले हे शाहूंच्या प्रकृतीकडे आस्थापूर्वक लक्ष देत होते. ते कर्तृत्त्ववान आणि चारित्र्यवान शिक्षक होते. १८८९ ते १८९२ या तीन वर्षाच्या काळात इंग्रजी, गणित, भूगोल व अर्थशास्त्र या विषयाचे शिक्षण देण्यात आले. त्याचप्रमाणे दांडपट्टा, व्यायाम व खेळाचे शिक्षण दिले जाई. त्यांना अभ्यासास वेळ जास्त देण्यात आला होता. रविवारी त्यांना शिकारीसाठी मोकळीक दिली होती.

शाहू महाराजांच्या प्रगतीविषयी फ्रेझरसाहेब आपल्या अहवालात म्हणतात, "शाहू महाराज शिक्षणात थोडे मागे पडत असले तरी लवकरच प्रगती करतील. ते फार हुशार आहेत असे नाही. मात्र त्यांचे व्यावहारिक ज्ञान व स्मरणसक्ती अधिक चांगली आहे. ते इंग्रजी बोलू शकतात. त्यांची प्रगती वाढत जाणार आहे. शाहू महाराजांचा दोष सांगताना ते म्हणतात की, शाहूराजे निष्काळजी आहेत. टापटीपपणाकडे दुर्लक्ष करतात. हा दोष शुद्धलेखनात व निबंधात दिसून येतो. १८९१ मध्ये त्यांनी इतिहास व प्राथमिक ज्ञान  या विषयात चांगली प्रगती केली. गणित विषयात ते कच्चे राहिले. १८ व्या वर्षी त्यांना ब्रिटनला पुढील शिक्षणासाठी पाठविण्याची ब्रिटिश सरकारची इच्छा होती. पण त्याला शाहू महाराजांनी नकार दिला. त्याचे कारण त्यांच्या आजीसाहेब व आईसाहेब यांचे म्हणणे असे होते की, या वयात शाहू इंग्लंडला गेले तर त्यांचे शील बिघडेल. कारण ते स्वभावाने अस्थिर असल्याने अनेक मोहांना बळी पडतील. या कारणासाठी शाहू महाराजांना ब्रिटनला पुढील शिक्षणासाठी पाठविण्यास नकार दिला."

इ.स.१८९२ मध्ये पुन्हा त्यांचे शिक्षण फ्रेझरसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली धारवाड येथेच सुरू झाले. याकाळात त्यांनी तीन वेळा हिंदुस्थानचा प्रवास केला. त्यामुळे त्यांच्या ज्ञानात आणि अनुभवात भर पडली. मनुष्य स्वभाव, मनुष्याच्या रूढी, त्यांची वागण्याची पद्धत याचे सम्यक दर्शन शाहू महाराजांना झाले. त्यांची बुद्धीची व राज्यकर्ता म्हणून पर्यटन त्यांना उपयुक्त ठरले.[५४]

फ्रेझर निष्ठावान मार्गदर्शक, उत्कृष्ठ गुरू होते. फ्रेझर यांनी शिकवणीच्या शेवटच्या वर्षी शाहू महाराजांना राज्यकारभाराची तत्वे, कायदा करण्याचे ज्ञान आणि शासनाला उपयुक्त अशा नियमांचे शिक्षण दिले. त्यांनी हिंदी राजनैतिक संबंधाविषयी बरीच व्याख्याने दिली. कोल्हापूर संस्थांनाबरोबर ब्रिटिश शासनाचे झालेले करार, ऐतिहासिक घडामोडी यांचाही अभ्यास करून घेतला. शेवटच्या टप्प्याात शाहू महाराजांना ग्रामीण व जिल्हा पोलिस पद्धत, भारतीय दंड

विधान, फौजदारी प्रक्रिया, संहिता याविषयी फ्रेझर यांनी ज्ञान दिले. त्यानुसार सरन्यायाधीशाच्या शेजारी बसून तेथे चालणाऱ्या अभियोगातील व दाव्यातील पुरावे, साक्षी यांची स्वतंत्रपणे त्यांनी टिप्पणी काढली. त्यांना जुन्या व नवीन जमीनधारा पद्धतीची माहिती तसेच संस्थानातील एलिएनशेन सेटलमेंटची माहिती देण्यात आली. शिवाय ग्रामीण भागातील धान्याचा हिशोब कसे ठेवतात आणि खाजगीतील हिशोब कसे ठेवावेत याचाही त्यांनी अभ्यास केला. शिक्षणातील सर्वसाधारण महत्त्वाच्या इतर विषयाचे ज्ञानही त्यांना त्यातून मिळाले होते. अशारीतीने चार वर्षाचा शैक्षणिक अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला. उत्तम राज्यकर्त्याला आवश्यक असणारे शिक्षण पूर्ण केले. फ्रेझरसाहेबांनी शाहू महाराजांना अनेक सद्गुण शिकविले. फ्रेझरसाहेबाचा लोभ, सहानुभूती, शिस्त आणि पित्यासारखी त्यांनी घेतलेली काळजी यामुळे त्यांच्या जीवनावर सुसंस्कार झाले. त्यांचे मन, बुद्धी आणि विचारांची चांगली प्रगती घडून आली.[५५]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण ही फ्रेझरसाहेबांनी घडविली होती. फ्रेझरसाहेबांनी दिलेल्या शिक्षणाचा परिणाम शाहू महाराजांच्या जीवनात चिरकाल टिकून राहिला. फ्रेझर हेच त्यांचे खरे मार्गदर्शक, मित्र, तत्त्वज्ञानी होते. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या गुरूविषयी इतका आदर, सद्भावना क्वचितच एखाद्या राजाने दाखविली असेल. गुरू फ्रेझर यांच्यापासून त्यांना एक अमोल ठेवा प्राप्त झाला तो म्हणजे मानवी जीवनात सहानुभूती हाच परवलीचा शब्द ठरतो आणि तोच जीवनातील वाटचाल करत असताना आपणास नैतिक ऊर्जा पुरविण्याचे काम करीत असतो. शाहू महाराजांनी आयुष्यात फ्रेझरसाहेबांच्या शिक्षणापासून घेतलेली हीच जीवनाची गुरूकिल्ली होती. त्यांच्या वैचारिक जडणघडणीत फ्रेजरसाहेबांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यांनीच त्यांच्या वैचारिकतेला खतपाणी घालण्याचे काम केले होते. त्यांनी कोल्हापूर राज्यात ज्या सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणल्या होत्या त्याचे सर्व श्रेय त्यांचे मार्गदर्शक फ्रेझरसाहेबांना जाते. फ्रेझरसाहेबांनी दिलेल्या शिक्षणातूनच शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण झालेली दिसून येते.

### राजर्षी शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व व छंद

शाहू महाराजांचे शरीर हे निरोगी असून त्यांनी बालवयातच हे शरीर कमविले होते. त्यांच्या या शरीरयष्टीवर फ्रेझरसाहेबांचे लक्ष होते. शाहू महाराजांची शरीरयष्टी धिप्पाड होती.

त्याचप्रमाणे त्यांची बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती तीव्र व तरल होती. अविरत काम करण्याची त्यांची मोठी क्षमता होती. एकाचवेळी अनेक लोकांशी संवाद साधण्याचे कौशल्य त्यांच्याकडे होते. त्यांची वागणूक ही निगर्वी व नम्रतेची होती.

लहानपणापासूनच त्यांना कुस्तीची आवड होती. ते स्वतः उत्तम कुस्तीगीर होते. त्यांनी स्वतः अनेक नामांकित मल्ल उदयास आणले होते. ते नेहमी म्हणत असत. 'पहिली शरीर संपत्ती, दुसरी पुत्रसंपत्ती, तिसरी धनसंपत्ती असेल तोच खरा पुण्यवान असेल.' कुस्ती हा त्यांच्या वडीलांकडूनच मिळालेला वारसा होता. त्यांचे दत्तक वडील चौथे शिवाजी महाराज यांच्या आजारपणाचा फायदा घेऊन सार्जंट ग्रीन याने त्यांच्या पोटात लाथ मारली होती. त्यातच त्यांचा मृत्यू झाला होता. म्हणून उद्या आपल्यावर वेळ आली तर त्याचा सामना करता यावा. यासाठी ते कुस्ती व शरीरसंपत्तीकडे लक्ष देत होते.

राजर्षी शाहू महाराजांना आपल्या वडीलांकडूनच शिकारीच्या छंदाचा वारसा चालून आलेला होता. शिकार व घोडयावर बसण्यात संपूर्ण महाराष्ट्रात त्यांना जोड नव्हती. कोल्हापूर ते महाबळेश्वर हे अंतर ते आठ तासात पार करीत असत. बारा घोडे रथाला जुंपून ते तो रथ रोखून धरत असत. अस्वलाशी जीवघेणी झुंज देत असत. ते पाण्याने भरलेली चार बैलाची मोट स्वतः ओढत असत. आखाडयात एखादा पैलवान वाद घालत असेल तर महाराज त्याला उचलून सहज बाजूला करत असत. खवळलेल्या वाघावर निःशस्त्र चाल करून केवळ त्याच्या नरडीचा गळा घोटून टाकत असे. क्लोरोफॉर्म न वापरता दीड ते दोन तासाचे टॉन्सिलचे ऑपरेशन महाराजांनी डॉक्टरकडून करवून घेतले होते. अशी अनेक साहसी उदाहरणे त्यांची देता येतील. हा सर्व वारसा त्यांना त्यांच्या वडीलांच्याकडून चालून आलेला होता.[५६]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज यांचे व्यक्तिमत्त्व हे बालपणापासूनच घडले होते. त्याला वडीलांचा वारसा मिळालेला होता. पुढे ते कोल्हापूरच्या छत्रपतीस दत्तक गेल्यावर त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला. त्याच्याच जोरावर त्यांनी कोल्हापूर राज्यात अनेक सामाजिक व इतर सुधारणा केलेल्या होत्या.

**महादेव गोविंद रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सामाजिक विचारतेचा प्रभाव**

राजर्षी शाहू महाराज यांनी नवसमाजप्रबोधनाचे स्वागत केले होते. राजर्षी शाहू महाराज हे जातीनिर्मूलक व अस्पृश्योद्धारक वगैरे सर्व फुले–लोकहितवादी–आगरकर पुरस्कारीत

सुधारणांचे सक्रीय पुरस्कर्ते होते. राजर्षी शाहू महाराजांनी याबाबतीत महादेव रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांचा गुरू म्हणून स्वीकार केला होता. राजर्षी म्हणतात, मागासलेल्या लोकांच्या उन्नतीकरीता माझे कैलासवासी मित्र न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व गोपाळराव गोखले यांनी पुष्कळ श्रम केले. मागासलेल्या लोकात विद्येचा प्रसार होण्याकरिता विशेष प्रयत्न केले पाहिजेत, ही मूळ कल्पना मला त्यांच्यापासूनच आली.[५७]

रानडे यांना राजर्षी शाहू महाराजांनी गुरू मानले होते. याचे कारण मराठा तत्सम विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उत्तेजन द्यावे या मताचे रानडे होते. बहुजन समाज सुधारल्याशिवाय लहानशी ब्राम्हण जात काय करू शकेल? असा विचार व्यक्त करून न्यायमूर्ती रानडे यांनी ८ जानेवारी १८८३ रोजी गंगाराम भाऊ म्हस्के वकीलांच्या नेतृत्त्वाखाली डेक्कन एज्युकेशन असोसिएशन(पुणे) ही संस्था स्थापन केली. तिला सयाजीराव गायकवाड यांनी केलेली मदत व साहय मिळवून दिले व न्यायमूर्ती रानडे यांनी स्वतःही पुष्कळ द्रव्यसाहय केले.[५८] या संस्थेला राजर्षी शाहू महाराजानी मोठया प्रमाणात मदत केली. सन १८८७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ व प्लेगची साथ पसरली होती. त्यावेळी या संस्थेने फार मोठे कार्य केले. या संस्थेची पहिली मोठी वार्षिक सभा ५ डिसेंबर १८८७ रोजी झाली. रानडे यांनी असोशिएसनची आवश्यकता सांगितली. गंगाराम भाऊनी मांडलेल्या विद्यार्थ्यासाठी फ्रीशिपच्या मागणींना पाठिंबा दिला. न्यायमूर्ती रानडे या संस्थेचे ट्रस्टी होते.[५९]

न्यायमूर्ती रानडे यांचे सर्व मित्र डॉ.भांडारकर, लोकहितवादी देशमुख वगैरे सर्व प्रागतिक मोठे पुण्यातील पुढारी असून ते या संस्थेचे सहाय्यक व हितचिंतक होते. मराठा तत्सम विद्यार्थ्यांच्या उन्नतीप्रित्यर्थ रानडे–गोखले यांनी जो महत्त्वाचा पायाभूत भाग घेतला होता. तोच भाग पुढे राजर्षी शाहू महाराज यांनी वर्धमान केला होता. रानडे–गोखले यांनी जनता शिक्षणविषयक सक्रिय कळकळ अनुभविल्यामुळे त्यांना राजर्षीनी आपले गुरू मानले होते. रानडे–गोखले हे दोघेही तत्त्वतः जातीभेदाचे व जातीसंस्थाचे पुरस्कर्ते नव्हते. तरी विद्येत मागासलेला बहुजन समाज आहे, त्याच्यासाठी जातीशः शैक्षणिक संघ काढून उन्नती घडवावी अशा मताचे रानडे व गोखले होते.[६०]

## राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक संस्थाशी आलेला संबंध

राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक विचारसरणी  ही विविध सामाजिक संस्थाशी आलेल्या संबंधातून त्यांची वैचारिक जडणघडण झाली होती, हे स्पष्ट करता येते. मराठे–पेशवाईचा अस्त कशामुळे झाला तर त्याचे कारण नव्या विचारवंतांनी जातीभेद हे सांगितले आहे. राजर्षी शाहू महाराजांची विचारसरणी कशी उद्‌गम व विकास पावली. त्यातूनच सामाजिक विचारसरणीची जडणघडण झाली. त्यांचा ज्या संस्थांशी जास्तीत जास्त संबंध आला. त्याची माहिती पुढीलप्रमाणे

## डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी व राजर्षी शाहू महाराज

गंगाराम भाऊ म्हस्के वकीलांच्या नेतृत्त्वाखाली न्यायमूर्ती रानडे यांनी ८ जानेवारी १८८३ रोजी डेक्कन एज्युकेशन असोसिएशन ही पहिली स्थिर अशी मोठी संस्था पुणे येथे स्थापन केली. या संस्थेने मराठा तत्सम विद्यार्थ्याना उत्तेजन दिले. या संस्थेस बडोदयाच्या सयाजीराव गायकवाड यांनी आर्थिक सहाय्य केले. पुढे श्री. भास्करराव जाधव यांनी या संस्थेस मोठी आर्थिक मदत केली. या संस्थेची तिसरी सर्वसाधारण सभा आल्बर्ट एडवर्ड इन्स्टिटयूट पुणे येथे राजर्षी शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली भरली त्यावेळी या सभेत त्यांचे अध्यक्षीय भाषण झाले. न्यायमूर्ती रानडे यांचे सर्व मित्र डॉ.भांडारकर, लोकहितवादी देशमुख वगैरे सर्व प्रागतिक पुण्यातील पुढारी असून ते या संस्थेचे सहाय्यक व हितचिंतक होते. शाहू महाराज १८८४ साली गादीवर आले नंतर सार्वजनिक कार्यात पुण्यास येऊन भाग घेण्याचा, त्यांचा हा पहिला प्रसंग होता. रानडे यांनी स्थापन केलेली डेक्कन एज्युकेशन असोशिएशन या संस्थेकडे राजर्षी शाहू महाराज आकर्षित झाले कारण या संस्थेला जनता शिक्षण विषयक सक्रिय कळकळ होती. ती त्यांनी जवळून अनुभवली होती. त्यामुळे या संस्थेतूनच त्यांची सामाजिक सुधारणेची वैचारिक जडण घडण झालेली दिसून येते. [६१]

## सत्यशोधक समाज व राजर्षी शाहू महाराज

राजर्षी शाहू महाराज यांनी सत्ता ग्रहण केली तेव्हा महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नेतृत्त्वाखाली सत्यशोधक समाज कार्य करीत होता. हा समाज कनिष्ठ वर्ग, कामगार आणि शेतकरी यांच्यात सुधारणेसाठी कार्य करीत होता. न्याय व समानता याविषयी प्रबोधन करीत होता. सार्वत्रिक शिक्षण, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व याविषयी जागृती करीत होता. या समाजाची

उद्दिष्ट महिलांना सामाजिक अन्यायापासून मुक्त करणे तसेच कामगार व शेतकरी यांना पुरोहित वर्ग आणि नोकरशाही यांच्या हुकुमशाहीपासून मुक्त करणे तसेच विविध क्षेत्रातील धर्मशिक्षण व प्रशासन यामधील वर्ण वर्चस्व झुगारून देणे हे होते. महात्मा फुले यांनी सामाजिक अत्याचाराविरूद्ध चळवळ उभी केली. सामाजिक न्याय आणि समानता यासाठी त्यांनी आग्रह धरला होता. असमानता, आणि स्त्रियांवरील अन्याय या सर्व बाबींचा धिक्कार केला.[६२]

महात्मा फुले यांनी इ.स.१८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ग्रामीण भागातील जनतेच्या इच्छा सत्यशोधक समाजाने अचूक ओळखल्या होत्या. म्हणूनच शेतकरी, बहुजन, कष्टकरी समाजाने त्यास पाठिंबा दिला होता. सत्यशोधक समाज जातीविरहित आणि वर्गविरहित समाजाच्या स्थापनेसाठी उभा राहिला. महात्मा फुले यांचे अनुयायी नारायण मेघाजी लोखंडे, भालकर इ.नी ही चळवळ पुढे वाढविली. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रभर पसरली. या चळवळीचे वैशिष्टये म्हणजे ब्राम्हणी व्यवस्थेला विरोध करणे, बहुजन समाजात शैक्षणिक सुधारणा करणे, शुद्रांची गुलामगिरीतून मुक्तता करणे व धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे इ. होती.[६३]

प्रारंभीच्या काळात राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाकडे लक्ष दिले नव्हते. म्हणूनच त्यांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व, अस्पृश्यता इ.बाबीवर त्यांची श्रद्धा होती. यासंबंधी १९२० मध्ये नाशिक येथे उदाजी मराठा विद्या वसतिगृहाची कोनशिला बसविण्याचा समारंभ प्रसंगी ते म्हणाले होते की, ‘मी प्रथम पुराणमतवादी होतो. जातीभेद कायम राहिले पाहिजेत असेच माझे मत होते.’[६४] सामाजिक प्रश्नाबाबत राजर्षी शाहू महाराजांचे विचार नंतर उत्क्रांत बनत गेले. याचे कारण भोवतालच्या ब्राम्हणी वर्चस्वामुळे आणि वेदोक्त प्रकरणातील कटू अनुभवामुळे त्यांच्यातील श्रद्धा कमी होत चालल्या होत्या. टिळक पंथीय ब्राम्हण वर्गाने केलेल्या टिकेमुळे राजर्षी शाहू महाराज सत्यशोधक समाजाकडे ओढले गेले आणि या प्रकरणामध्ये त्यांची बाजू सत्यशोधक समाजाने उचलून धरली असे म्हणावे लागेल. कारण कोल्हापूरात त्यांच्या सहानुभूतीने व साहयाने सन १९११ मध्ये सत्यशोधक समाजाच्या साहाय्याने पुनरूज्जीवन करण्यात आले.

सत्यशोधक समाजाची विचारसरणी त्यांनी पूर्णपणे स्वीकारली नाही. महात्मा फुल्यांचे सामाजिक सुधारणेविषयीचे विचार व राजर्षी शाहू महाराजांचे विचार यात साम्य होते. महात्मा

फुल्यांच्या विषयी त्यांच्या मनात आदर होता. तरीदेखील त्यांनी फुले यांना आपल्या गुरूस्थानी मानल्याचा त्यांच्या भाषणात कोठेच उल्लेख आढळत नाही. परंतु सत्यशोधक समाजाने वर्णव्यवस्थेच्या विरूद्ध चालविलेल्या लढयाविषयी त्यांना आदर होता. म्हणून ही चळवळ बंद पडावी अशी कृती त्यांनी कधी केली नाही व तिला पूर्ण प्रोत्साहन दिले नाही.[६५]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांना सत्यशोधक समाजाची तत्त्वे उशिरा समजली असली तरी त्यातूनच त्याच्या वैचारिकतेची जडणघडण झालेली दिसून येते. त्यांनी सत्यशोधक समाज समजून घेतल्यानंतर त्यानुसारच कृती करण्यास सुरूवात केली. सत्यशोधक समाजातील जी विचारसरणी होती. त्यामध्ये आणि राजर्षी शाहू महाराजांचे विचार यामध्ये बरेचसे साम्य होते. यातूनच त्यांची विचारसरणी ही सत्यशोधक समाजाच्या तत्वातून घडलेली होती, हे स्पष्ट होते. त्यांचे देव आणि भक्त या दोघांच्यामध्ये पुरोहित, दलाल नको याविषयी दोघांचेही मत एकच होते. सन १९१३ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाला वर्षासने बांधून दिले होते.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कार्याच्या सुरूवातीपासून आपल्या अनुभवाने त्यांची जी मनोवृत्ती तयार झाली होती. ती सत्यशोधकाची होती आणि विचारांची बैठक आर्य समाजाची होती. शाहू महाराजांचे कार्य व महात्मा फुले यांचे कार्य यात फारसा फरक नाही. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील ब्राम्हणी मक्तेदारी मोडून काढणे, जातीभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, शिक्षण प्रसार यासाठी महाराजांनी सक्ती पणास लावली होती. अर्थातच हे काम सत्यशोधक समाजाचे होते, म्हणूनच सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते शाहू महाराजांची वेदनिष्ठा व मूर्तीपूजा मान्य करुनही त्यांना सत्यशोधक मानत होते. यात महाराजांच्या कार्याचे वास्तव मूल्यमापन होते. ते स्वतःस आर्यसमाजी म्हणवत असता ते प्रत्यक्ष सत्यशोधक समाजाचे खरे कार्य करीत राहिले. सत्यशोधक चळवळीत काम करणारे कार्यकर्ते भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, महादेव डोंगरे, श्रीपतराव शिंदे, खंडेराव बागल इत्यादीनी सत्यशोधक समाजाचे कार्य चालविले परंतु ते आर्यसमाजी बनले नाहीत. तर स्वतः शाहू महाराजही आपण सत्यशोधक समाजाचे अनुयायी आहोत असे म्हणत नव्हते. दोघांच्याही विचार व कृतीमधील मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी सत्यशोधक समाजाच्या प्रसाराची गरज शाहू महाराजांना वाटत होती. असे त्यांच्या कृतीवरून लक्षात येते.[६६] यावरूनच

हे स्पष्ट होते की त्यांना सत्यशोधक समाजाविषयी जिव्हाळा होता. त्यातूनच त्यांची विचारसरणी घडली असून त्यांनी कोल्हापूर राज्यात त्याविषयी सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतले होते, हे स्पष्ट होते.

**राजर्षी शाहू महाराज व आर्य समाज**

राजर्षी शाहू महाराजांना सत्यशोधक समाजाबद्दल आदर होता. परंतु सत्यशोधक समाजात काही उणिवा होत्या या उणीवा लक्षात घेऊन व्यक्तीच्या धार्मिक जीवनातील भावविश्व पूर्ण करण्यास त्यांनी आर्यसमाजाची मदत घेतली असे म्हणणे उचित ठरेल. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, जैन व लिंगायत धर्मपंथ थिऑसॉफिस्ट पंथ यांचाही अभ्यास राजर्षी शाहू महाराज यांनी केला होता. परंतु या सर्व धर्माच्या व पंथाच्या मर्यादा त्यांच्या लक्षात आल्यामुळे ते आर्य समाजाकडे आकर्षित झाले. या आर्य समाजातील सर्वच तत्त्वे त्यांनी स्वीकारली नाहीत. पण त्यांची वैचारिक जडणघडण या समाजातूनही होत गेली, हे सत्य आहे. आर्य समाज हा वेदावर आधारीत आहे. मानवाच्या कृत्रिम बंधनात आर्यसमाज जखडू इच्छित नव्हता. जन्माऐवजी गुणांवर मनुष्याचे मोठेपण अवलंबून असावे, अशी आर्य समाजाची धारणा होती.

राजर्षी शाहू महाराज यांना धर्मश्रद्धेविषयी असणारी ओढ आर्य समाज पूर्ण करू शकत होता. त्याचबरोबर ब्राम्हणी वर्चस्वाचे धार्मिक मुखवटे काढून टाकण्यास व त्यांचे खरे अंतरंग उघड करण्यास काही अतिरेकी आर्य समाजी मंडळीचा व्यावहारिक उपयोग होईल हे त्यांनी हेरुन ठेवले होते. सामाजिक सुधारणा, शिक्षण प्रसार, समाज जागृती हे त्यांचे साध्य होते. यासाठी आर्य समाज उपयोगी पडेल असी त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली असावी. शाहू महाराजांना हिंदू धर्मातील जळमट काढून त्याचे शुद्धीकरण करावयाचे होते. त्यांना धर्म हा ब्राम्हणी वर्चस्वाऐवजी शुद्ध नैतिक स्वरूपाचा हवा होता. म्हणून त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न केले होते.[६७]

राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची जडणघडण ही आर्य समाजातून झाली हे स्वतः त्यांनी २८ नोव्हेंबर १९१८ च्या मुंबई येथील जाहीर सभेत स्पष्ट केले होते. ते म्हणतात की, सर्व समाजात मिळून मिसळून वागणे हे सुशिक्षिताच काम आहे. ऐक्य व प्रेमाचे ते प्रतिक आहे. परंतु तसे ते वागत नाहीत. हे काम आर्य समाजाने हाती घेतले आहे. मी आर्य समाजाची तत्त्वे

अभ्यासली आहेत. स्वामी बिरजानंद, पंडित आत्माराम आणि स्वामी परमानंद यांनी त्या वैदिक तत्त्वाचा प्रचार केला. आपल्या धर्मग्रंथात नंतरच्या काळात जे विचार आले आहेत ते काढून टाकण्याचा प्रयत्न या विभूती करत आहेत. मी आर्य समाजाचा अनुयायी कसा झालो ते सांगतो. ज्या बोटीने मी इंग्लडला जात होतो. त्याच बोटीत महाराज प्रतापसिंह होते. क्षत्रिय कुलाचे मोठे सामर्थ्यशाली असे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यांनीच मला आर्य समाजाची तत्त्वे शिकविली. त्यानंतर काही वर्षानी पंडित आत्मारामाची भेट झाली तेव्हापासून मी आर्य समाजी बनलो.[६८]

प्रतापसिंह महाराज हे जोधपुरच्या राठोड घराण्यातील होते. ते स्वामी दयानंद सरस्वती यांना आपले गुरू मानत होते. याच प्रकारचे विचार शाहू महाराजांनी मार्च १९१९ मध्ये भावनगर येथे भरलेल्या तिसऱ्या आर्यसमाज अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानावरून भाषण करताना व्यक्त केले. या भाषणात ते म्हणाले, मी आर्य समाजाची विचारसरणी स्वीकारली. त्याचे कारण म्हणजे वैदिक धर्म इतर कोणत्याही धर्मश्रद्धेपेक्षा श्रेष्ठ आहे. असा माझा विश्वास आहे. मी राजाराम कॉलेज, हायस्कूल, गुरूकूल, अनाथाश्रम, सरदार बोर्डिंग या संस्था आर्य प्रतिनिधीकडे सोपविल्या. त्यामागे माझी अशी श्रद्धा आहे की, या सर्व संस्थांची नैतिक प्रगती व्हावी. आर्य समाजाचे शिक्षक व विचारवंत माझा उद्देश सफल करतील. म्हणून संस्था मी त्यांच्याकडे सोपविल्या. या परिषदेत जमलेल्या प्रतिनिधी व प्रमुख सूत्रधारांनी तशाच प्रकारच्या संस्था महाराष्ट्रात जोतिबा व पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी स्थापन कराव्यात. त्यांना माझे साहाय्य राहील.[६९]

शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण आर्य समाजातून झाली असल्यानेच त्यांनी कोल्हापूर येथे १९१८ मध्ये आर्य समाजाची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना वेदाविषयी नितांत आदर होता. म्हणूनच ते म्हणतात की, आर्य समाज वेदांच्या पायावर स्थापला आहे. वेदा इतका जुना ग्रंथ कोणताही नाही. वेदाविषयी पुज्य बुद्धी बहुतेक लोकांच्या मनात आहे. अशाप्रकारे ते वेदाचे समर्थन करू लागले.[७०] आर्य समाजातील सदसदविवेक बुद्धिला पटणाऱ्या गोष्टीतून शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण झाली. त्याविषयी य.दि. फडके म्हणतात की, "वेदकाळात अस्पृश्यता नष्ट करण्याचा आग्रह आर्य समाज धरतो. शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारणासाठी केलेला प्रयत्न, जातीभेद नष्ट करणे व

शिक्षणाचा प्रसार करणे, बालविवाह, भृणहत्या व पडदापद्धती इ. अनिष्ठ रूढींना केलेला विरोध, स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, गोरक्षण यांचा केलेला पुरस्कार या गोष्टी आर्य समाजाच्या विचारसरणीशी सुसंगत आहेत. आर्य समाज मूर्तीपूजा मानत नाही. शाहू महाराज मूर्तीपूजा करीत होते. मात्र आर्य समाजास आवडणाऱ्या होमहवनासारख्या कर्मकांडात ते कधीच गुरफटले नाहीत."[७१]

शाहू महाराज यांनी आर्य समाजाला प्रोत्साहन दिले यामागची भूमिका कर्नल वुडहाउस या राजनैतिक प्रतिनीधीसमोर व्यक्त केली तेव्हा ते म्हणाले, आर्य समाजाला वेदांचे अधिष्ठान आहे इतर जातींना वेद शिकविण्याचा, धर्म शिकविण्याचा माझा विचार आहे. आर्य समाज राजकारणात ढवळाढवळ करत नसल्याने सरकार त्यास मदत करीत आहे. आर्य समाज ही सामाजिक व धार्मिक संस्था आहे. जहाल अधिकाऱ्यांना शह देण्यात सरकारला त्याची मदत होते म्हणूनच कोल्हापूर येथे मला आर्य समाजाचे लोक हवेत.[७२]

मी सत्यशोधक नव्हतो व नाही अशासारखे वक्तव्य करणे शाहू महाराजांना आवश्यक वाटत होते. या संबंधी शंकरराचार्य डॉ.कुर्तकोटी नाशिकहून प्रसिद्ध करत असलेल्या स्वधर्म साप्ताहिकामध्ये सन १९२२ मध्ये म्हणतात, छत्रपती आणि सत्यशोधक या दोघांचेही कार्यक्षेत्र एक असले तरी त्यांचे कार्ययोग अगदी भिन्न आहेत. सत्यशोधक समाजाचा कार्ययोग हिंदू धर्माच्या मूळ धर्मावर आधारित असल्याने त्याचा विशेष खळखळाट ऐकू येतो. परंतु छत्रपतीचा हा प्रवाह प्रत्यक्ष हिंदू धर्मावर आघात न करता परिस्थितीप्रमाणे वळणे घेत चालला असल्याने तो शांत व गंभीर दिसतो. प्रचलित हिंदू धर्मात क्रांती घडवून आणण्याचे ध्येय दोघांच्याही पुढे असल्याने प्राचीन मताभिमानी हिंदूना हे दोन्ही प्रवाह सारखेच आहेत असे वाटते.[७३]

शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण आर्य समाजाच्या प्रभावातून झाली होती. ते आपले कार्य करीत असताना ब्रिटीश शासनव्यवस्थेला दुखवू शकत नव्हते ही त्यांची मर्यादा लक्षात घेऊन त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करावा लागतो. सुरूवातीच्या काळात सत्यशोधक समाजाच्या कार्याकडे शाहू महाराज ओढले गेले कारण वेदोक्त प्रकरणात शाहू महाराजांची बाजू सत्यशोधक समाजाने घेतली होती. दोघांचाही उद्देश ब्राम्हणी संस्कृती नष्ट करणे हा होता. मानवी जीवनातील धर्माचे अधिष्ठान नष्ट करणे हे शाहूसारख्या बुद्धिमान व्यक्तीच्या बुद्धीला पटत नव्हते. महात्मा फुले यांचे महत्त्व निर्विवादपणे मान्य होते. पण सामान्य

माणसाला शुद्ध धर्माचे आचरण कसे करावे हे सांगण्यास सत्यशोधक समाज व महात्मा फुले अपुरे पडले. म्हणून शाहू महाराजांनी फुले यांच्या सत्यशोधक समाजाबद्दल आदर असूनही त्यात मानवी जीवनातील शुद्ध विवेकनिष्ठ धार्मिकतेचा आधार त्यांना सापडत नव्हता. महात्मा फुले व सत्यशोधक समाजात अपुरेपणा आहे. हा अपुरेपणाच आर्य समाजाने भरून काढला. त्याचप्रमाणे दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सत्यशोधक समाजापासून शाहू महाराजांनी फारकत घेण्याचे कारण म्हणजे सन १९२० नंतर सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रभर पसरली होती. त्यातून ब्राम्हणवर्ग व बहुजनवर्ग असा संघर्ष सुरू झाला होता. बहुजन वर्गाला शाहू महाराजांची चिथावणी आहे अशी ब्राम्हणी वृत्तपत्रांनी ओरड सुरू केली होती. ब्रिटिश मुलुखात शांतता व सुव्यवस्थेची जबाबदारी ब्रिटिशांची आहे. या भूमिकेतून ब्रिटिश शासनाने काही पत्रे शाहू महाराजांना पाठविली होती. या पार्श्वभूमीवर आपण सत्यशोधक समाजाचे पुरस्कर्ते हे जाहीर करणे. शाहू महाराजांना अवघड जात होते

शाहू महाराजांना वैदिक हिंदू धर्म अभिप्रेत असल्याने त्यांचा ओढा सहाजिकच तिकडे जास्त होता. उलट सत्यशोधक हा हिंदू व्यवस्था उखडून टाकण्यावर भर देत होता. म्हणून शाहू महाराज सत्यशोधक समाजाच्या तत्वापासून थोडे दूर होते. हे लक्षात घेतले म्हणजे शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण लक्षात येण्यास फारसा वेळ लागत नाही. यातून त्यांचे वैचारिक अधिष्ठान निर्माण झाले.

आर्य समाज व सत्यशोधक समाज यातील आपल्या विवेकबुद्धीला पटतील त्या चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांनी आपल्या विचारांची बैठक निश्चित केली होती. त्यामध्ये सर्वांगीण धर्मसुधारणा घडवून आणणे, धर्माला सार्वत्रिक नीतीचे अधिष्ठान देऊन पुरोहितशाहीचे वर्चस्व नष्ट करणे. सर्वसामान्यापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचविणे, त्यासाठी प्राथमिक व मोफत शिक्षणाचा आग्रह धरणे. मागास जातींच्या जातीनिहाय चळवळी बांधणे. क्षत्रियत्वाची मागणी करत त्यांच्यामध्ये लोकशाही आकांक्षा निर्माण करणे. त्यांची अस्मिता जागृत करणे, मागास जातीचे ब्राम्हणेतराचे पक्ष स्थापून समाजसुधारणा व शेतीसुधारणा याचा आग्रह धरणे यासाठी इंग्रज सरकारची मदत घेणे याच शाहू महाराजांच्या विचारधारेच्या आधारावर विसाव्या शतकाच्या पूर्वाधात राजकीय, सामाजिक जीवनात क्रांती घडवून आणली.

**मार्क्सवादाची वैचारिकता**

युरोपात १८व्या शतकात औद्योगिक क्रांती घडून आली. त्यातूनच कामगार व भांडवलदार(कारखानदार) असे दोन वर्ग उदयास येऊन त्यांच्यात संघर्ष सुरू झाला. यातूनच मार्क्सवादी तत्वज्ञानाचा उदय झाला. हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या नेतृत्त्वाखाली औद्योगिक क्रांतीने प्रवेश केला. मुंबई, कलकत्ता शहरात पारशी, इंग्रज, खोजा, भाटिया यांच्या मालकीचे कारखाने निघाले. या कारखान्यात कामगारांचे शोषण होऊ लागले. मात्र हिंदुस्थानात कामगारांचे हक्क सांगणारा कोणी मार्क्स नव्हता. त्याप्रमाणे हिंदुस्थानातील कामगार असंघटित, दुर्बल व राजकीयदृष्टया जागरूक नव्हता.

शाहू महाराजांचा जागतिक परिस्थितीचा, युरोपीय वर्ग लढ्याचा अभ्यास होता. युरोपियन कामगारांनी प्राप्त करून घेतलेल्या अधिकारांची त्यांना जाणीव होती. शोषित, वंचितांचा विकास करणे हे त्यांनी आपल्या आयुष्याचे मिशन बनविले होते. गिरणीतील कामगार हा शोषित होता. तेव्हा या समाजास वगळून वंचितांचा व उपेक्षितांचा विकास होणार नाही. याची त्यांना जाणीव होती. म्हणून कामगारांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यास त्यांनी विशेष प्रयत्न केले होते.[७४]

हिंदुस्थानात युरोपच्या धर्तीवर राज्य स्थापन होणे आवश्यक असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत होते. यासंबंधी ते म्हणतात, पाश्चात्य देशात भांडवलदार व कामगार असा संघर्ष चालू आहे. रशिया, जर्मनी येथे कामगारांची सत्ता येत आहे. इंग्लडमध्ये मजूर पक्षाचा प्रभाव वाढत आहे. मतदानाचा अधिकार तिथे सर्वांना प्राप्त झाल्याुळे बहुजनांच्या मताप्रमाणे राज्य चालले. अल्पसंख्याकांची सत्ता कमी होणार हिंदुस्थानातसुद्धा हे बदल होणार आहेत. अल्पसंख्यांकांची सत्ता कमी होणार असले पाहिजे.[७५]

हिंदुस्थानातील कामगारांनी आपली स्थिती सुधारण्यासाठी काम केले पाहिजे याचा सल्ला देताना शाहू महाराज म्हणतात, ब्रिटनच्या कामगारांनी स्वावलंबन व संघ स्थापन केले. त्याप्रमाणे हिंदुस्थानातील कामगारांनी स्थापन करून आपले आरोग्य संपन्न ठेवून, मुलांना शिक्षण दिले पाहिजे. आपली प्रगती आपणच केली पाहिजे दुसरा आपली प्रगती करेल ही अपेक्षा ठेवू नये. त्यासाठी कामगारांनी प्रगतीच्या लढयाचे ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीने सतत प्रयत्न केले पाहिजेत. ही आपली शस्त्रे बनली पाहिजेत आणि 'सहकार' हे प्रगतीचे मुख्य

साधन बनले पाहिजे. 'अडाणी' व 'अशिक्षित' कामगाराला सहकारात सुव्यवस्थित रीतीने काम करण्याची सवय लागते. त्यासाठी 'सहकाराची पहिली शाळा' म्हणून प्रत्येक कारखान्यात कामगारांनी सहकारी पतसंस्था निर्माण केल्या पाहिजेत.[७६]

शाहू महाराजांचे हे विचार मार्क्सवादी आहेत. ब्रिटिशांचे साम्यवाद विरोधी धोरण आणि त्यांच्या संस्थानातील एक मांडलिक राजा कामगारांना न्याय हक्क मिळावा यासाठी आपले राजेपण पणास लावून धडपडत आहेत. अखिल भारतीय कामगार संघटना, आयटक व भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना होण्यापूर्वी सन १९१८ मध्ये कामगारासंबंधी शाहू महाराजांचे विचार द्रष्टेपणाचे आहेत. कामगारांच्या वर्गीय लढयाचा अर्थ समजावून घेऊन वंचिताना संघटित होण्याचा, कामगारांना रशिया व जर्मनीच्या मजुरांचा आदर्श सांगितला होता. तसेच कामगारांना क्रांतीचे महत्त्व सांगून भावी लोकशाहीनिष्ठा, कामगार राज्याचे स्वप्न कामगारांच्यापुढे शाहू महाराजांनी ठेवले होते. त्यामुळे त्यांची वैचारिक जडणघडण ही मार्क्सवादी होती. त्यातूनच त्यांनी कामगारांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला होता.

**राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणिक विचारांची जडणघडण**

महात्मा फुले यांनी बहुजन समाज व स्त्रियांच्या शिक्षणाची ज्योत पेटविण्याचे काम केले. प्राथमिक व मोफत शिक्षणाची मागणी फुले यांनी ब्रिटिश शासनाकडे केली होती. महात्मा फुले यांचा हा विचार शाहू महाराजांच्या काळात प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, ब्राम्हो समाज व आर्य समाज या परिवर्तनाच्या चळवळीत कार्य करणाऱ्या संस्थांमधून सक्रिय झाला होता. शाहू महाराज स्वतः प्रज्ञावंत व जाणते राजे असल्यामुळे या परिवर्तनवादी चळवळीचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता. त्यांनी या सर्व विचारातून व्यापक मानवी हिताची बाजू लक्षात घेतली. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा आणि शिक्षणविषयक विचारांचा त्यांनी अभ्यास केला होता. महात्मा फुले यांच्या शिक्षण विचाराची पक्की बैठक शाहू महाराजांच्या मनात स्थिर झाली होती. मात्र आर्य समाजाच्या वैचारिक बैठकीचा प्रभाव शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक कार्यावर झाला. सर्व मानव जातीच्या विकासासाठी झटणारा आर्य समाजाचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला होता. कारण समाजसुधारणा, शिक्षण प्रसार आणि त्यातून समाज जागृती या विचाराची व्यापक बैठक आर्य समाजाला लाभली होती. ती मानव जातीच्या विकासाला साद घालीत होती. ती शाहू महाराजांना महत्त्वाची वाटली म्हणून ते आर्य

समाजाकडे जास्त आकर्षित झाले. धर्म, शिक्षण, संस्कृत या विद्यासंबंधी आर्य समाजाने जे विचार व्यक्त केले, त्याकडे शाहू महाराज स्वाभाविकपणे आकर्षित झाले आणि आर्य समाजाच्या विचारानुसार शिक्षण प्रसाराचे कार्य शाहू महाराजांनी सुरू केले.[७७]

ब्रिटिश काळात भारतात समानतेचे उदारमतवादाचे तत्त्व राबविण्यात आले होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी समतेचा नवा संदेश भारतीयांच्या घरोघरी पोहचवला. अशी शाहू महाराजांची श्रद्धा होती. सर्वांना समान शिक्षणाचा प्रघात त्यांनी चालू केला होता. महात्मा फुल्यांनी सामाजिक विषमता आणि जातीभेद यांना मूठमाती देऊन समता, बंधुभाव आणि स्वातंत्र्य या त्रिसूत्रीवर नवसमाज निर्मिती करून सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून अस्पृश्यांची मुक्तता फक्त शिक्षणच करू शकेल असा विश्वास त्यांना वाटत होता. त्यांनी अंगिकारलेला हा मार्ग प्रशस्त करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला.[७८]

स्त्री–शिक्षण विषयक कार्याचा आरंभ महात्मा फुले यांनी केला. त्याकाळात स्त्रियांनी शिक्षण घेणे पाप समजले जात होते. धर्मविरोधी कृती समजली जात होती. या वैचारिक गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. तेच काम शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात केले. परंतु शिक्षण प्रसाराच्या कार्यात शाहू महाराजांनी कामगार, शेतकरी, शूद्र यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी जेवढी मेहनत घेतली तेवढे स्त्रियांच्या शिक्षणासाठी खास प्रयत्न शाहू महाराजांकडून झाले नाहीत. याचे कारण त्याकाळात पडदा पद्धत, बालविवाह याचे प्रमाण जास्त होते. त्यासाठी स्त्रीशिक्षणविषयक समाज जागृतीची अधिक गरज होती. त्यामुळे समाज जागृती करुन स्त्रियांना शिक्षणासाठी उद्युक्त करणे अशा दोन्ही बाजूंनी आघाडी उघडणे आवश्यक होते. त्यादृष्टीने शाहू महाराजांनी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते.[७९]

आर्य समाज व सत्यशोधक समाज यातील आपल्या विवेकबुद्धीला पटतील त्या चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांनी आपल्या विचारांची बैठक निश्चित केली होती. त्यामध्ये सर्वांगीण धर्मसुधारणा घडवून आणणे, धर्माला सार्वत्रिक नीतीचे अधिष्ठान देऊन पुरोहितशाहीचे वर्चस्व नष्ट करणे. सर्वसामान्यापर्यत शिक्षणाची गंगा पोहचविणे, त्यासाठी प्राथमिक व मोफत शिक्षणाचा आग्रह धरणे. मागास जातींच्या जातीनिहाय चळवळी बांधणे. क्षत्रियत्वाची मागणी करत त्यांच्यामध्ये लोकशाही आकांक्षा निर्माण करणे. त्यांची अस्मिता जागृत करणे मागास जातीचे ब्राम्हणेतराचे पक्ष स्थापून समाजसुधारणा व शेतीसुधारणा याचा आग्रह धरणे यासाठी

इंग्रज सरकारची मदत घेणे, याच शाहू महाराजांच्या विचारधारेच्या आधारावर विसाव्या शतकाच्या पूर्वाधात राजकीय व सामाजिक जीवनात क्रांती घडवून आणली.

अशाप्रकारे शाहू महाराजांचे शिक्षणविषयक वैचारिक जडणघडण ही सत्यशोधक समाज व आर्यसमाज या दोन्हीतून झालेली दिसून येते. दोन्ही समाजातील जी शिक्षणविषयक तत्त्वे त्यांना योग्य वाटली त्याचाच स्वीकार त्यांनी केलेला दिसतो. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर त्यांचे अस्पृश्य दलित समाजाच्या दारापर्यत शिक्षण पोहचविण्याचे कार्य शाहू महाराज यांनी केले. म्हणून ते महात्मा फुले यांचे वारसदार मानले जातात. श्री.स्वामी दयानंद सरस्वती यांच्या आर्यसमाजी शिकवणीचा त्यांच्यावर प्रभाव होता. खरी धर्मविद्या लोकमनात रूजली पाहिजे असे शाहू महाराजांना वाटत होते. यासाठी सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यानी मानव मनोभूमीत मेहनत घेऊन ती कसदार करावी. अशा कसदार मानवी मनात आर्य समाजाने आपल्या अखंड मानवजातीच्या कल्याणाचे बीजारोपण करावे अशी शाहू महाराजांची श्रद्धा होती. शाहू महाराज हे सत्यशोधनाच्या दृष्टीने सत्यशोधक समाजाचे अनुयायी वाटतात. वेदनिष्ठा आणि समतेच्या आधारावर शिक्षण देण्याच्या उपक्रमासाठी त्यांनी आर्यसमाजाचा उपयोग करून घेतला. म्हणूनच ते 'सर्वाना विद्येचा अधिकार आहे' असे ते म्हणतात. अस्पृश्य शिक्षण व स्त्रीशिक्षणविषयक समाजजागृती हे विचार महात्मा फुले यांचेकडून शाहू महाराजांनी घेतले होते.

**सामाजिक सुधारणेच्या विचारांची जडणघडण**

राजर्षी शाहू महाराज यांच्या मनात सामाजिक सुधारणा करण्याचे विचार कोठून व कसे आले. याविषयी चर्चा करताना स्पष्टपणे जाणवते की, सन १९१८ पासून शाहू महाराजांचे कार्य सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेत्तर प्रश्नांची चळवळ, अस्पृश्योद्धार चळवळीत तर त्यांनी एकामागून एक क्रांतिकारी पावले उचलून अस्पृश्य समाजास युगानुयुगाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी अविरत कष्ट घेतले. या प्रयत्नाच्या मागे शाहू महाराजांच्या हृदयातील अस्पृश्यांच्याविषयी कारूण्याची जशी भावना होती तशी त्याच्या तळाशी या सुमारास त्यांच्या वैयक्तिक जीवनातील नियतीच्या एक कठोर हल्ल्याने निर्माण झालेली विशेष मानसिकता कार्यरत होती.[८०]

**ब्राम्हणेत्तर चळवळीचे विचार**

शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला त्यावेळी सत्यशोधक व ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेतृत्त्व नाममात्र होते. महात्मा फुले यांचा मृत्यूनंतर सत्यशोधक समाज जरी खेडोपाडी पोहचत असला तरी महाराष्ट्राच्या तत्कालिन जीवनावर त्याचा प्रभाव अल्पच झालेला होता. ब्राम्हणेत्तर नेतृत्त्व राष्ट्रवादी चळवळीपासून दूर जात होते. सन १८९५ मध्ये पुणे काँग्रेसमध्ये या नेतृत्त्वाने आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे तेव्हापासून १९१७ सालापर्यंत ब्राम्हणेत्तर नेतृत्त्व राष्ट्रवादी चळवळीपासून अलिप्त राहिले होते. या काळात शिवाजी महाराजांच्या दोन परस्पर विरोधी प्रतिमा पुढे आल्या होत्या त्या म्हणजे टिळक पुरस्कृत 'गोब्राम्हण प्रतिपालक' ही एक आणि दुसरी फुले पुरस्कृत 'शेतकऱ्यांचा तारणहार' परंतु यातील फुले पुरस्कृत प्रतिमा मागे पडून टिळक पुरस्कृत प्रतिमा पुढे आली. तिला महत्त्व प्राप्त झाले. शाहू महाराज शिवाजी महाराजांचे थेट वंशज असल्याने संपूर्ण महाराष्ट्रात त्यांना एक प्रतिकात्मक महत्त्व प्राप्त झाले होते.

ब्राम्हणेत्तर चळवळीची बीजे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत आहेत. ब्राम्हण पुरोहितशाहीविरूद्ध बंड करणारी ही महाराष्ट्रातील पहिली चळवळ होय. सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी घातला. वेदोक्त प्रकरणातून त्याला लढाऊ स्वरूप दिले.[८१]

अशाप्रकारे शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण ही ब्राम्हणेत्तर चळवळीतून घडत गेली होती.

## ३.४ समारोप

विठ्ठल रामजी शिंदे त्यांचे जे व्यक्तिमत्त्व घडले व भावी आयुष्यात त्यांच्या हातून जे कार्य घडले ते महत्वपूर्ण असून खोलवर परिणाम जाणवतो. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भावी समाजसुधारणेचा पाया त्यांच्या वडिलांच्या भागवत धर्मातून घातला गेला होता. समाजसुधारकांचे विचार त्यांच्या मनावर घरातून आई वडिलाकडून आले होते. वि. रा. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणेत मातोश्री यमुनाबाई हिचा मोलाचा वाटा होता. त्यामुळेच त्यांच्या मनात स्त्री जातीबद्दल अपरंपार करुणा व भक्ती होती हे दिसून येते. ते ब्राम्हो समाजात गेल्याने सुधारक झाले नव्हते, तर सुधारक म्हणून ब्राम्हो समाजात गेले होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या घरी सुधारकांचे वातावरण होते. त्यातूनच ते घडले होते. जातिभेदाचे संस्कारच मनावर झाला नसल्याने समाजसुधारकाप्रमाणेच आधुनिक सुधारकाप्रमाणे जातिभेद मोडण्याचा खटाटोप करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. त्यांच्या घरात सहाजिकपणेच समाजिक सुधारणेची तत्त्वे पाळली जात होती.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्या कार्यातून आणि विचारातून झालेला आढळतो. त्यांची घडण अशाप्रकारे त्यांच्या बालपणीच झाली होती. घरातील वातावरणाचा परिणाम त्यांच्या ग्रहणशील मनावर होऊन त्यांची बैठक अध्यात्मप्रवण बनली. मनाला उदारपणा व्यापकपणा आला. संमिश्र संस्कृतीत वाढल्याने भेद जाणवण्याऐवजी ऐक्य भावनाच जोपासली गेली होती. मन भावना प्रवण बनले होते. म्हणूनच त्यांनी १९०३ मध्ये ब्राम्होधर्मप्रचारक म्हणून जिवितकार्याला प्रारंभ केला.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनात वैचारिक भावनिक प्रतिक्रिया व्यक्त होते. वाचन, निरीक्षण आणि चिंतन यातून मनास प्रगल्भता आलेली होती. काहीतरी करावे ही उर्मी दांडगी होती. मूळचीच वृत्ती भावना प्रधान आणि बाहय वास्तवाबद्दलचे असमाधान या सर्व कारणांचा परिणाम म्हणून वृत्तीची ही तीव्रता निर्माण झालेली होती. काही चांगले दिसले की, ते मनःपूर्वक कौतुक करतात. त्याविषयी आदरभाव दाखवितात आणि वाईट दिसले की तीव्र निषेध करतात. मात्र ही भावनिक तीव्रता असली तरी ते चांगल्या वाईटाचा निवाडा यथायोग्य करतात. त्यांच्या आकलनात आणि प्रतिक्रिया प्रकट करण्यात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. तीव्रता असली तरी मानसिक प्रगल्भपणामुळे विवेक सुटला नाही. मनाची आध्यात्मिक ठेवण, व्यापकपणे विचार करणारी जीवनदृष्टी, तरल संवेदनशीलता, सुक्ष्म सौंदयदृष्टी, भाषेच्या सामर्थ्याची यथोचित जाण इत्यादी वैशिष्टे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सांगता येतील.

विठ्ठल रामजी शिंदे सामाजिक कार्य हे विशिष्ट जडणघडणीतूनच झाले होते. त्यांच्या सामाजिक सुधारणा कार्याची चौकट त्यांच्या कुटुंबातच झाली होती. त्यांच्या आजोबा, आजी व वडिलापासूनच त्यांना वारसा मिळाला होता. त्यांना त्यांच्या आईनेही चांगले सुसंस्कृत संस्कार केले होते. पुढे त्यांच्यावर प्रार्थना समाजाचा प्रभाव पडला होता. तसेच ख्रिस्ती धर्मातील उदार तत्वांचाही त्यांच्यावर प्रभाव पडलेला होता.

महर्षी शिंदे यांच्या मनावर केशवचंद्र सेन यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. केशवचंद्र सेनच्या विचाराचा पगडा विठ्ठलरावजीच्या ठायी असला तरी जीवनासाठी ऊर्जेचा संयुग साधुन भावी आयुष्यात ध्येय गाठण्याची इर्षा आणि रात्रंदिवस तोच विचार त्यांच्या मनात घोळू लागला. त्यात तरुण आणि वृध्द मंडळींच्या गाठीभेटी होऊन समाजाविषयी काही तरी करण्याची धडपड सुरू झाली. म्हणूनच त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेऊन रीतसर ब्राम्हो समाजाचे अनुयायी झाले. महर्षी शिंदे यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा अतिशय गांभीर्याने घेतली होती. धर्मप्रसारक या नात्याने आपले आयुष्यच उन्नत धर्मकार्यासाठी व्हावे, अशी त्यांच्या मनाची धारणा होत चालली होती.

महर्षी शिंदे त्यांचा धर्म म्हणजे केवळ मत किंवा मनोवृत्ती नसेल तर साक्षात जीवन होते व ते जीवन हे सर्व बाजूचे असे राजकारण आणि आर्थिक अभ्युदय धर्म सुधारणा, समाज सुधारणा या सर्वासाठी त्याचे जगणे त्याचा प्रयत्न व त्यांचे मरण ही अविस्मरणीय ठरले. धर्म शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याअगोदर महर्षी शिंदेनी लो. टिळकांची भेट घेऊन त्यांचे विचार ऐकण्याची इच्छा होती. वि. रा. शिंदे हे धर्मशिक्षणासाठी परदेशात गेले होते.

राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही आपल्या पूर्वजांच्या वारसातून घडलेली होती. यशवंतराव घाटगे यांच्याकडे त्यांच्या वडीलांच्याकडून कर्तृत्त्वाचा व पराक्रमाचा वारसा चालून आलेला होता. त्यांचे दत्तकविधान झाल्यानंतर सहाजिकच ते छत्रपती बनल्याने त्यांची वैचारिक जडणघडण ही राजाप्रमाणे झाली. त्यांच्या विचाराची जडणघडण ही घाटगे व भोसले या दोन्ही घराण्याकडून झालेली दिसते. राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण ही फ्रेझरसाहेबांनी घडविली होती. फ्रेझरसाहेबांनी दिलेल्या शिक्षणातूनच शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण झालेली दिसून येते.

राजर्षी शाहू महाराजांना सत्यशोधक समाजाची तत्त्वे उशिरा समजली असली तरी त्यातूनच त्याच्या वैचारिकतेची जडणघडण झालेली दिसून येते. सत्यशोधक समाजाची विचारसरणी व राजर्षी शाहू महाराजांचे विचार यामध्ये बरेचसे साम्य होते. आर्य समाज व सत्यशोधक समाज यातील आपल्या विवेकबुद्धीला पटतील त्या चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांनी आपल्या विचारांची बैठक निश्चित केली होती. शाहू महाराजांची वैचारिक जडणघाडण

ही मार्क्सवादातून झालेली दिसते. त्यांनी हिंदुस्थानातील क्रांतीचे महत्त्व सांगून भावी लोकशाही निष्ठा, कामगार राज्याचे स्वप्न कामगारांच्यापुढे शाहू महाराजांनी ठेवले होते.

शाहू महाराजांचे शिक्षणविषयक वैचारिक जडणघडण ही सत्यशोधक समाज व आर्यसमाज या दोन्हीतून झालेली दिसून येते. अस्पृश्य शिक्षण व स्त्रीशिक्षणविषयक समाजजागृती हे विचार महात्मा फुले यांचेकडून शाहू महाराजांनी घेतले होते. ब्राम्हणेत्तर चळवळीची बीजे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत आहेत. सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी घातला. शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण ही ब्राम्हणेत्तर चळवळीतून घडत गेली होती.

## संदर्भ


१. शिंदे वि.रा., माझ्या आठवणी व अनुभव, लेखन वाचन भांडारगृह, पुणे, १९५८, पृ.८१

२. पवार गो. मा., महर्षी वि. रा. शिंदे जीवन व कार्य लोकवाङ्मयगृह प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती ४ मे २००४ पृष्ठ ४,

३. कित्ता, पृष्ठ ५

४. . शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ.८१

५. पवार गो. मा., उपरोक्त, पृ.८२

६. कित्ता, पृ. ८२

७. कित्ता, पृ. ८३

८. शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ.८३ ते ८५

९. पवार गो. मा., उपरोक्त, पृ.८४

१०. शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ.६४

११. पवार गो. मा., उपरोक्त, पृ.८४

१२. शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ.४६

१३. पवार गो.मा.(संपा.), महर्षी शिंदे रोजनिशी, मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद, पृ.१३

१४. कित्ता, पृ. ३ ते ७

१५. पवार गो. मा., महर्षी वि. रा. शिंदे जीवन व कार्य, पृ. ५१

१६. शिंदे वि.रा., माझ्या आठवणी व अनुभव, पृ. ९

१७. कित्ता, पृ. २१

१८. कित्ता, पृ . २८, २९

१९. शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ. ११०

२०. कित्ता, पृ. ११०

२१. पवार गो. मा., उपरोक्त, पृ. ५४

२२. कित्ता, पृ. ५५

२३. कित्ता, पृ. ९०

२४. आयरन जे. डब्ल्यू., लेख–ख्रिस्ती धर्म, मराठी विश्वकोश, खंड ४, पृ. ७५३

२५. शिंदे विठ्ठल रामजी, युनिटेरियन समाज लेख, व्याख्याने व उपदेश, पृ. ४१, ४७
२६. वि. रा. शिंदे यांचे ॲमस्टरडॅम येथे १९०३ मध्ये भरलेल्या उदार धर्माच्या सभेवर भाषण, लेख, व्याख्याने व उपदेश, पृ. १५६
२७. कित्ता, पृ. १५७
२८. शिंदे वि. रा., ब्राम्हधर्म ब्राम्होसमाज, पृ. १४३
२९. कित्ता, पृ. १४५
३०. सुबोध पत्रिका, पृ. १९०
३१. कित्ता, पृ. १९०
३२. पवार गो. मा., उपरोक्त, पृ. ८११.
३३. माडखोलकर गं. त्र्यं., श्रध्दांजली, नागपूर प्रकाशन नागपूर, १९७४, पृ. १६७
३४. शिंदे वि. रा. यांची रोजनिशी, पृ. १६
३५. कित्ता, पृ. १६
३६. कित्ता, पृ. १७
३७. साप्ताहिक तरुण महाराष्ट्र, जनाबाई स्मृती चित्रे,(लेख) १७ जून १९०४
३८. कित्ता, पृ. ८
३९. शिंदे वि. रा., मासेय शहर, लेख, व्याख्याने व उपदेश, पृ. ९
४०. मँचेस्टर कॉलेज ऑफ फर्म येथे आलेले अनुभव,(लेख नोंदवही)
४१. सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. २२
४२. कित्ता, पृ.१८
४३. कित्ता, पृ.१९
४४. कित्ता, पृ.२०
४५. भिडे जी.एल., पाटील एन.डी., थोरात डी.एस., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, (इ.स.१८०० ते १९६०), फडके प्रकाशन कोल्हापूर, ऑगस्ट २०११, पृ.९८
४६. सूर्यवंशी कृ.गो., उपरोक्त, पृ.२२, २३

४७. कीर धनजंय, राजर्षी शाहू एक समाजक्रांतिकारक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११,पृ.१७
४८. पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे, २६ जून २०१२, पृ. १५
४९. DPR- Report of the Director of Public Instruction, Bombay Presidency for the year 1885, P.85
५०. कीर धनजंय, उपरोक्त, पृ.१८, १९
५१. LAB – Latthe, memoirs of his Highness Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, vol. 1, P.36
५२. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.१६
५३. कीर धनजंय, उपरोक्त, पृ. २२, २३
५४. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.१७
५५. कित्ता, पृ.१८
५६. कित्ता, पृ.२१
५७. पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, सुमेरू प्रकाशन डोंबिवली, २००८, पृ.१६
५८. चव्हाण रमेश, (संपा.), राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, रा.ना.चव्हाण जन्मशताब्दी वर्ष प्रकाशन पुणे, एप्रिल २०१३, पृ.११
५९. डेक्कन एज्युकेशन असोसिएशन(पुणे), हीरक महोत्सव अहवाल, १९४५
६०. चव्हाण रमेश, (संपा.), उपरोक्त, पृ. ११
६१. कित्ता, पृ. १२
६२. कीर धनंजय, शाहू छत्रपती A Royal Revolutionery, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६, पृ. ३८
६३. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.६४
६४. कीर धनंजय, उपरोक्त, पृ.३९
६५. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.६५

६६. कित्ता, पृ.७०, ७१

६७. कित्ता, पृ.६६

६८. कित्ता, पृ.६७

६९. कित्ता, पृ.६८

७०. कित्ता, पृ.६९

७१. फडके य.दि.,शाहू छत्रपती आणि लोकमान्य, विद्या प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. १८८

७२. राजर्षी शाहू महाराजांचे राजनैतिक प्रतिनिधी कर्नल वुडसाहेब यांना पाठविलेले पत्र, १९ जानेवारी १९१८

७३. साप्ताहिक स्वधर्म, कोल्हापूर, २७ जुलै, १९२२

७४. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.९८

७५. जाधव स.बा, राजर्षी शाहू महाराज भाषणे, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९७१, पृ.१४, १६

७६. कित्ता, पृ.२६

७७. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.१२६

७८. कित्ता, पृ.१३८

७९. कित्ता, पृ.१५४, १५५

८०. कित्ता, पृ.१६२

८१. कित्ता, पृ. १८६

# प्रकरण चौथे

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा आढावा

## ४.१ प्रास्ताविक

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात प्रबोधनास सुरूवात झाली. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही अनेक समाजसुधारक समाजसुधारणा करण्यास पुढे सरसावले. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचा फार मोठा वाटा आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारताच्या राजकीय व सामाजिक इतिहासाला ज्या थोर व्यक्तींनी आपल्या कर्तृत्त्वाने नवी दिशा दिली. त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांचे नाव फार महत्त्वाचे आहे. राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळींचा महर्षी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारावर फार मोठा प्रभाव पडलेला होता. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करीत असताना या विविध चळवळीतील विचारांचा वापर कशाप्रकारे करावा आणि या विचारांना आचारांची जोड कशाप्रकारे द्यावी याबाबत त्यांनी आयुष्यभर चिंतन केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा प्रभाव त्यावेळच्या समाजावर होऊन समाजसुधारणा होण्यासाठी फार मोठया प्रमाणावर मदत झाली होती. तेव्हा त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

## ४.२ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी समाजात राष्ट्रीयत्त्वाची भावना निर्माण झाल्यानंतर समाजसुधारणेस प्रारंभ केला. तो काळ भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा असल्याने त्यांना वाटत होते की, राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक सुधारणा होणे महत्त्वाचे आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समाजसुधारणेसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणजे मानवी मूल्यांची जोपासना करण्यासाठी अविरत प्रयत्न करणारे त्यागाचे व निष्ठेचे प्रतिक अज्ञानाच्या पूजेविरूद्ध वैचारिक बंड पुकारून जुन्या धार्मिक चालीरिती, रूढी परंपरांचे जोखड फेकून देणारे समाजसुधारक होते. त्यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वाचा प्रसार केला. माणसामाणसामध्ये समानता निर्माण व्हावी, यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले.

आजच्या आधुनिक युगात वावरताना त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांचे कार्य पुढे आणले पाहिजे. त्यातून समाजाचा विकास होण्यास मदत होईल.

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा प्रार्थना समाजात प्रवेश –(२९ मे १८९९)

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे पुण्यात कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना त्यांच्या विचारावर मिल, स्पेन्सर, आगरकर आदिंचा वैचारिक प्रभाव पडला. त्यातूनच ते नास्तिकतेकडे झुकले. शेवटी सन १८९८ मध्ये ते बी.ए.ची परीक्षा पास झाल्यावर प्रार्थना समाजाकडे आकर्षित होऊन त्यांनी २९ मे १८९८ रोजी प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. त्यांनी प्रार्थना समाजाचा आजन्म धर्मप्रचारक होण्याचा निर्णय घेतला. यावेळी मोती बुलासा, वासुदेव सुखटणकर, डॉ.भांडारकर यांचे चिरंजीव हे सर्वजण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याबरोबर होते.[१]

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या प्रार्थना समाजाच्या कार्याची सुरूवात गुजरात येथे नवसारीत केली. तेथे प्रार्थना समाजाची स्थापना करून ते कामात सहभागी झाले. पुढे ते एल.एल.बी.करण्यासाठी मुंबई येथे राहिले होते. तेथेही त्यांची उपासना चालू होती. याच व्यासपीठावरून त्यांनी आपले विचार व्यक्त करण्यास सुरूवात केली. यामुळे प्रार्थना समाजाचे विचारवत डॉ.रा.गो.भांडारकर यांचे त्यांच्याकडे लक्ष वेधले गेले. डॉ.रा.गो.भांडारकर यांच्या शिफारशीमुळेच ते धर्मशास्त्राचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी परदेशात जाणे निवडले होते.[२]

## इंग्लडमधील धर्मशास्त्र शिक्षणाचा प्रभाव

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी इंग्लडमध्ये तौलनिक अभ्यास केल्यानंतर त्यांच्या मते धर्म ही बाब मुळात पढीक शिक्षणाची नव्हे, तेथे परमेश्वर हाच गुरू, विश्व हीच शाळा व सृष्टी हेच पुस्तक. मैचेस्टर येथील कॉलेजमध्ये सत्य, धर्म व स्वातंत्र्य यांचा ते पुरस्कार करीत होते. व्यक्तीने सत्याचा व धर्माचा शोध घेण्यासाठी आपल्या क्षमतांचा विकास करावा असे त्या कॉलेजमधील प्राध्यापकांचे विचार महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनावर रूजले होते. त्यांनी सन १९०३ मध्ये युनिटेरियन पंथाच्या सभासदांची आठवी परिषद भरली होती. या परिषदेत भाग घेतला. युनिटेरियन पंथाचे दुसरे आंतरराष्ट्रीय संमेलन ॲमॅस्टरडॅम येथे भरले. या परिषदेत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी, 'भारतातील उदार धर्म' या विषयावर निबंध वाचला. या निबंधात त्यांनी ब्राम्हो समाज, आर्य समाज व थिऑसॉफिकल सोसायटी या तीन उदार

धर्मवादी चळवळींची माहिती दिली. या तिन्ही चळवळीत ब्राम्हो समाजात उदार धर्माचे पूर्ण प्रतिबिंब पडलेले आपणास दिसते, असे मत व्यक्त केले.[३]

### महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक कार्यास प्रार्थना समाजातून प्रारंभ

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे भारतात परत आल्यावर प्रार्थना समाजाचे मिशनरी म्हणून प्रार्थना समाजाचे कार्यास सुरूवात केली. प्रार्थना समाजाने उदार धर्माचा व एकेश्वराचा पुरस्कार केला होता. हा समाज परमहंस सभेच्या वैचारिक मुशीतून तयार झाला होता. पण रानडे व भांडारकर यांच्या नेतृत्त्वाखाली समाजाने नेमस्तपणाचे धोरण स्वीकारले. सुधारणेच्या बाबतीत ब्राम्हो समाजाइतका आक्रमक नव्हता. रानडे यांनी सर्वांगीण सुधारणांचा आग्रह धरला. सन १९०१ मध्ये या समाजात मिशनर म्हणून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे दाखल झाले. हे काम कसे करायचे याचे त्यांना मॅचेस्टर कॉलेजात प्रशिक्षण मिळालेले होते. त्यामुळे त्यांनी समाजाचे काम मोठया प्रमाणात वाढविले. प्रार्थना समाजाचे विचार त्यांनी वेगवेगळया थरातील लोकापर्यत पोहोचविण्यासाठी त्यांनी धार्मिक वाचन वर्ग, पोस्टल मिशन, प्रार्थना करण्यासाठी सुलभ संगीत पुस्तिका इत्यादी उपक्रम सुरू केली. या काळात त्यांनी ३,४३८ पुस्तके, १२,७०० लेख आणि युनिटेरियन समाजाची ६३९ पुस्तके व ५००० पुस्तके समाजातील वेगवेगळया वर्गात वितरीत केली. कारण शिंदे यांच्या दृष्टीने ब्राम्हो समाज आणि प्रार्थना समाज यांच्या कार्यात वैचारिक सामंजस्य होते.[४]

### अस्पृश्यता निवारणाचे कार्य

पुणे येथे महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास प्रारंभ केला होता. हे कार्य विस्तारीत करण्याचे महान कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. जातिभेद, दास्य, वर्णश्रेष्ठत्त्व यामुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करण्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रयत्न केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी हिंदुस्थानातील विविध प्रांतांचा दौरा केला. मात्र या पहिल्या दौऱ्यात प्रथमच त्यांना भारतीय जीवनाचे, तेथील लोकस्थितीचे जे स्वरूप पाहावयास मिळाले ते त्यांना निश्चितपणे बोधकारक वाटले. त्यांच्या मते, 'भारतातील अस्पृश्यता केवळ स्थानिक अथवा धार्मिक नसून ती जातीय व नित्य स्वरूपाची आहे.' ते अहमदनगर जिल्हयातील भिंगार गावी अस्पृश्यांच्या सभेला हजर राहिले. त्यांच्या हालअपेष्टा ऐकून त्यांनी अस्पृश्योद्धाराला वाहून घेण्याचे ठरविले. सर्वसामान्य माणसे धर्माच्या बाबतीत,

मूर्तीपूजेच्या बाबतीत कसा विचार करतात. हे दिसून आले. हिंदुस्थानातील लोकजीवनात झालेले विविध संस्कृतीचे मिश्रण व त्यावर पडलेले पाश्चात्य संस्कृतीचे आवरण ध्यानात आले.[५]

प्रार्थना समाज व ब्राम्हो समाजाचे कार्य करीत असताना संपूर्ण भारत पायी फिरल्यामुळे खेडेगावातील अस्पृश्य समाजाची दयनियता अनुभवण्यास मिळाली होती. भारतीय समाज आणि समाजव्यवस्था समजून घेतली होती. याचवेळी त्यांनी अस्पृश्यतेचे मूळ शोधण्याचे ठरविले. केवळ वर्णव्यवस्थेच्या काल्पनिक धोरणावरून समकालीन अस्पृश्यतेची उत्पत्ती लावत न बसता तिचे ग्रामव्यवस्थेशी असलेले नाते, धार्मिक ताणतणावाचे त्या अमानुष प्रथेला मिळालेले योगदान, समाजाने हीन मानलेल्या या जातींच्या पुर्वसंचिताची चिकित्सा, अस्पृश्यतेच्या प्रथेचा विकासक्रम, ग्रंथामधून करण्यात आलेले वर्णन इत्यादी सर्व गोष्टीमधून अस्पृश्यतेचा जन्म शोधण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला.[६]

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यतेविषयीचे विचार व कार्य

### १) अस्पृश्यता ही आर्यपूर्व संस्कृतीतून भारतात आली असावीः–

भारतीय अस्पृश्यतेचे मूळ शोधीत असताना ही अस्पृश्यता आर्यपूर्व असावी, असे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना वाटत होते. याला पुरावे म्हणून त्यांनी दोन गोष्टींचा उल्लेख केला आहे. पहिला पुरावा असा की, आपण उत्तरेकडून दक्षिणेकडे जसेजसे जातो. तसतशी अस्पृश्यतेला अधिक धार प्राप्त होते यावरून अस्पृश्यता ही मुळांत दक्षिणेकडे व आर्यपूर्व असावी, असे त्यांना वाटते. शिवाय वाङ्मयीन पुरावे शोधले तरी आर्याच्या आदी प्रारंभीच्या वाङ्मयाकडून अलीकडे बुद्धकाळाकडे येऊ लागतो तसतसे यासंबंधीचे उल्लेख जास्त प्रमाणावर आढळून येतात. यावरूनही अस्पृश्यता आर्यपूर्व असावी, असे त्यांनी सूचीत केले.[७]

### २.अस्पृश्य एके काळाचे राज–वैभव भोगलेले राजे आहेतः–

भारतीय अस्पृश्यांची मीमांसा करताना ते असे म्हणतात की, येथील अस्पृश्य मूळचे येथील राजवैभव भोगलेले मोठमोठे राजे असले पाहिजेत. परंतु केवळ जेत्यांनी त्यांचा पराभव केल्यामुळे त्यांच्या कपाळी ही अस्पृश्यता आलेली असावी. आजचे अस्पृश्य हे एकेकाळचे मोठे राजे होते असे त्यांना अनेक पुराव्यावरून वाटते. ब्रम्हदेशातील बहिष्कृत जमाती या आपल्या लेखातून त्यांनी हाच विचार मांडला आहे. अस्पृश्य मानलेले वंश सारे संस्कृतिहीन होते, असे

मुळीच नाही. ब्रम्हदेशात तुहा याजा फयाचुन वगैरे जे अस्पृश्य वंश आढळत आहेत. ते जिंकून घेण्यापूर्वी राजवंश होते असे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आपल्या अस्पृश्यांचे राजकारण या लेखांतूनही सांगतात. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मांडलेला हा विचार पुढे डॉ.आंबेडकर यांनी "who were the shudras ? How they came to be the furth in the Indu-Aryan society' या १९४६ साली प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथात मांडलेला आहे.[८]

३. अस्पृश्य लोक धर्माने बौद्ध आहेत. हे सांगताना त्यांनी अस्पृश्य समाजातील लोकगीतांचा आधार घेतला आहे.

४. भारतीय संस्कृती म्हणजे आर्य संस्कृती हे चुकीचे आहे. भारतीय लोकांची कुलदैवते आर्यपूर्व संस्कृतीतील आहेत.

या निष्कर्षतेच्या माध्यमातून अस्पृश्यतेचे मूळ जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी अस्पृश्य मानले गेलेल्या लोकांच्या घरी स्वतः राहून त्यांच्या जगण्याची, घरगुती चालीरीतींची व्यक्तीगत आवडीनिवडींची खाण्यपिण्यांची, कपडया लत्यांची, चांगल्यावाईट सवयींची, परंपरांची अनुभूती घेऊन आपल्या संशोधनात्मक सर्वेक्षणाला प्रत्यक्षार्थवादी सुक्ष्म अध्ययनाची जोड दिली. अस्पृश्यता निवारण हे धर्म कार्य आहे असे समजून मी ते स्वीकारले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मराठा समाजातील होते. त्यांच्या या कार्यामुळे, वागण्यामुळे मराठा समाजाला अपमानीत झाल्यासारखे, भ्रष्ट झाल्यासारखे वाटू लागले. मराठा समाजाने शिंदे यांना बहिष्काराची भीती घातली. तरीसुद्धा न डगमगता कार्य चालूच ठेवले.[९]

**अस्पृश्यांची स्थिती**

राष्ट्रसभेच्या वार्षिक अधिवेशनाच्यावेळी एकेश्वरी धर्मपरिषद आयोजित करण्याचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिसेंबर १९०३ पासून सुरू केले होते. त्या निमित्ताने भारताच्या अनेक प्रांतांत त्यांना प्रवास करावा लागला. भारताच्या विविध प्रांतात अस्पृश्यता किती काटेकोरपणे पाळली जाते आणि अस्पृश्य मानलेल्या लोकांवर किती भयंकर अन्याय केला जातो याचे विदारक चित्र त्यांना पहावयास व ऐकावयाला मिळत होते. जुन्या मलबार प्रांतात अस्पृश्य वर्गीयांना साक्षात पशूचे अथवा गुलामांचे जिणे जगावे लागत असे. चेरूमा या जातीचे अस्पृश्य लोक मालकाच्या शेतात वस्ती करून पशूप्रमाणे राबत असत. शेताच्या विक्रीबरोबरच

त्यांची मालकी नवीन शेतमालकाकडे जात असे. ही कुळे जनावरांप्रमाणे इतरांना भाडयाने दिली जात असत. एवढेच नव्हे तर अशा गुलामांची रीतसर खरेदी–विक्री होत असे. कर्नल ऑलकॉट यांनी 'पुअर पारिया' या पुस्तकात १९०० सालचा एक कर्ज रोख्याचा उताराच दिलेला आहे. त्रिचनापल्ली येथे शिंदे यांना एक भयंकर दृश्य दिसले. म्युनिसिपालीटीच्या केराच्या अवजड गाडीला एका बाजूला एक रेडा जुंपलेला होता तर दुसऱ्या बाजूला एका तरूण मजूरानेच आपली मान लावली होती. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी चौकशी केली तेव्हा तो रोमन कॅथॉलिक असलेला तरूण पूर्वाश्रमीचा पारिया होता असे त्यांना समजले. धर्मातंरानेसुद्धा त्यांच्या पशुवत जिण्यात फरक पडलेला नव्हता. असे त्यांना आढळले. काठेवाडातील आगगाडीमध्ये धेंडांना डबा राखून ठेवीत असत. त्यांना इतरांच्या डब्यात प्रवेश करता येत नसे हे शिंदे यांनी स्वतः पाहिले होते.[१०]

अशाप्रकारे त्यांना हिदुस्थानात फिरत असताना अस्पृश्य लोकांच्या स्थितीचे विदारक चित्रण आढळून आले. म्हणून त्यांनी यावर उपाय शोधून काढण्याचे ठरविले.

## डिप्रेस्ड क्लास मिशनमार्फत अस्पृश्यता निवारणाचे केलेले कार्य (All India Depressed Class Mission)

### डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य वर्गाची स्थिती जाणून घेण्यासाठी २८ ऑक्टोबर १९०५ रोजी अहमदनगरला गेले होते. नगर जिल्हयातील श्रीपतराव थोरात, श्री पांडुरंग लक्ष्मण डांगळे इत्यादी अस्पृश्य वर्गातील पुढाऱ्यांनी भिंगार या गावी सभा बोलाविली होती. त्या सभेत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यापुढे नागपूराकडील श्री किसन फागूजी बनसोड यांनी स्थापन केलेल्या 'सोमवंशी हितचिंतक समाजा'चे छापील पत्रकातील उद्देश सांगितले होते. हजारो वर्षे वरिष्ठ जातीचा जुलूम सहन करणाऱ्या या मंडळींच्या पत्रकातील एक उद्देश, वरिष्ठ वर्गाची मने न दुखविता अस्पृश्यानी आपल्या उद्धाराचा प्रयत्न करावा असा होता. तेव्हा 'हे उद्धाराचे काम आपण स्वतः अंगावर घेऊन या कामात स्वतःचे भावी चरित्र वाहून घ्यावे' अशी प्रेरणा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना झाली. त्याच रात्रीच्या मुहूर्तावर 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' सारख्या संस्थेची स्थापना करण्याची अंतःप्रेरणा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना मिळाली होती.[११] त्याचप्रमाणे त्यांनी अस्पृश्योद्धारासाठी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'(निराश्रीत

सहाय्यकारी मंडळ) ची स्थापना १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे एल्फिन्स्टन रोडवर शेठ दामोदरदास सुरवडवाला यांच्या उदार देणगीतून केली.[१२]

'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या मंडळाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष न्या.चंदावरकर हे असून त्यांनी आपले विचार स्पष्ट करताना म्हटले की, हया नीच मानल्या गेलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्यात आम्ही स्वतःलाच वर आणीत आहोत. हे पवित्र कार्य करीत असता आम्ही लोकांचा उद्धार करणार हा घमेंडीचा विचार आमच्या अंतःकरणात न शिरो. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेची स्थापना केली. त्याचे कार्यकारी मंडळ बनवून स्वतःकडे सेक्रेटरी पद घेऊन आजन्म या संस्थेचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले.[१३]

**डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे कार्य**

डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्यावतीने प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा सुरू करणे, गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनाची तयारी करण्यासाठी उद्योगशाळा चालविणे, विद्यार्थी वसतिगृहे, मोफत दवाखाने, धर्म व नीती शिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, जातिभेद व मूर्तीपूजा यांना वगळून चालविण्यात येणारी उपासनालये असे अनेक उपक्रम मिशनच्यावतीने चालविण्याचे निश्चित झाले. त्याचाच पहिला भाग शेठ दयाराम यांच्यासारख्या उदार लोकांच्या देणगीतून मुंबईत सुरू झालेले 'निराश्रीत सेवासदन' होय.[१४] मिशनची पहिली शाळा १९०६ मध्ये एल्फिन्स्टन रोडवर सुरू झाली. मिशनने सुरूवातीपासूनच कटाक्षाने एक दंडक पाळला होता आणि तो म्हणजे मिशनमध्ये काम करणाऱ्यांनी अस्पृश्य लोक राहतात. तेथेच आपल्या कुटुंबासह त्या सर्व लोकांशी मिळूनमिसळून राहावे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या संदर्भात त्याकाळात दाखविलेले धाडस, त्यांच्या कार्यात सहभागी झालेली त्यांच्या कुटुंबातील माणसे, त्या सर्वांनी अत्यंत थोर अंतःकरणांनी अस्पृश्यांची केलेली सेवा-सुश्रुषा तर सर्वश्रुत व आदरणीय अशी आहे. विशेष म्हणजे या कामात सहभागी झालेले त्यांचे साथीदार सय्यद अ.कादर, त्यांची बहीण व तिचे पती यांच्यासह ते ग्लोब मिलच्या परिसरात अस्पृश्यांच्या वस्तीत राहू लागले.[१५]

या संस्थेमार्फत वरील संस्थेचे काम करण्यासाठी वरीष्ठ वर्गातील जे कोणी पुरूष किंवा स्त्री या कामासाठी तयार असतील त्यांच्यामध्ये या अस्पृश्य वर्गातील गरीब स्त्रियांबरोबर काम

करण्याची पात्रता यावी म्हणून त्यांच्या प्रशिक्षण वर्गाची सोय करणे. या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात व्याख्याने, कीर्तने, उपासना, लहान मुलांसाठी सहलीचे आयोजन, त्यांना मिठाई वाटप, वडीलधाऱ्यांच्या सहलीची योजना, गावातील लोकांकडून नवे जुने कपडे गोळा करून त्यांचे गरजूना वाटप करणे, गरीब स्त्रियांसाठी विशेषतः विधवांसाठी शिवणकामाचे वर्ग, लोकांना स्वच्छतेचे शिक्षण देणे, मुलांना आंघोळ घालणे इत्यादी उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. असे योजनाबद्ध व सेवाभावीवृत्तीने प्रेरित होऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कामाला प्रारंभ केला.

मुंबई शहरात परळ, देवनार, मदनपूरा, कामाठीपुरा या ठिकाणी मराठी व इंग्रजी चौथी इयत्तेपर्यंतच्या शाळा सुरू करण्यात आल्या. यातील कामाठीपुऱ्यातील शाळा भंगी समाजासाठी होती, तर परळ व मदनपुरा येथील शाळा नीती शिक्षणासाठी होत्या. तसेच परळ व मदनपुरा येथे भजनीमंडळे चालविली जात होती. याबरोबरच चामडयाचे बूट तयार करण्याचा एक कारखाना उघडून अल्पसा रोजगार मिळवून दिला जात होता. अस्पृश्य लोकांच्या वस्तीत घरोघर जाऊन आजारी लोकांची सुश्रुषा केली जात. मद्यपान व इतर दुष्ट सामाजिक रूढींचा परामर्श घेणारे एक मासिकही चालविले जात होते. हा सर्व कामाचा पसारा मुंबई शहरात वाढत होता, तर मुंबईबाहेर पुणे, मनमाड, इगतपुरी, इंदूर, अकोला, अमरावती, दापोली, मंगरूळ, मद्रास, महाबळेश्वर इत्यादी ठिकाणी प्राथमिक शाळा, वसतिगृहे, विद्यार्थीवेतने, भजनी समाज, चर्चामंडळे, हातमागाचा कारखाना एवढे प्रचंड काम डिप्रेस्ड क्लास मिशनने अल्प काळातच उभे केले. महिलासांठी सेवासदन तर पुरूषांसाठी मुंबई येथे 'सोमवंशीय मित्र समाजाची' स्थापना मिशनच्यावतीने केली. या सर्व कामाची पाहणी केली तर लक्षात येते की, अज्ञानात व गरिबीत अडकलेल्या अस्पृश्यांना शिक्षण, आश्रय, रोजगार, औषधोपचार, त्यांची व्यसनातून सुटका करण्यासाठी भजनीमंडळे मनोरंजनाचे इतर प्रकार अशी सर्वांगाने तयारी केली होती. कारण मिशनचा प्रमुख हेतू हा होता की, अस्पृश्य लोकांत त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नाने सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणाव्यात. बहीण जानाक्का हिने पनवेल येथील मुख्याध्यापिका पदाचा राजीनामा देवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुरू केलेल्या कार्यात सहभागी झाल्या. तर आई-वडील जमखंडीवरून आपल्या मुलाने सुरू केलेल्या कार्यात सहभागी होण्यासाठी मुंबईला आले.[१६]

संस्थेच्या कामासाठी आर्थिक मदत म्हणून सर्वसामान्य माणसाकडून निधी जमा करण्यासाठी रूपी फंड, कापड फंड, तांदूळ फंड, पेटी फंड इत्यादी अभिनव व लोकांच्या संवेदना प्रत्यक्ष कृतीत रूपांतरित करणारे उपक्रम सुरू केले. या उपक्रमाबरोबरच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनच्या मदतीसाठी अनेक प्रतिष्ठित लोकांच्याकडून देणग्या मिळविल्या.[१७]

अशाप्रकारे डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केल्यानंतर तिने ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे अस्पृश्यांच्या जीवनामध्ये क्रांतीकारी परिवर्तन घडवून आणून त्यांचा विकास साधला होता. अस्पृश्यता नष्ट करून अस्पृश्य आणि दलित समाजाची गरीबी दूर व्हावी म्हणून शिक्षण प्रसार, नोकरी मिळवून देणे, सामाजिक समस्या सोडविणे, सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत धर्म व नागरिकता इत्यादी गुणांचा प्रसार करून डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारण व दलितोद्धार कार्य सुरू केले.

## अस्पृश्यता निवारक संघामार्फत केलेले कार्य :–

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे जे कार्य सुरू केले होते. या कामासाठी पुणे येथे सन १९१७ मध्ये 'अस्पृश्यता निवारक संघाची' स्थापना करण्यात आली. हा संघ स्थापन करण्यापाठीमागचा हेतू म्हणजे मुंबई–पुणे येथे अस्पृश्यतेच्या संदर्भात काम करणाऱ्या सर्वच कार्यकर्त्यांचे संमेलन व्हावे आणि या कार्यात बहुजन समाज आणि अस्पृश्य बांधवांनी सहकार्याने प्रयत्न करावेत, हा होता. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी संघाच्या स्थापनेनंतर अस्पृश्य वर्गाच्या पुढाऱ्यांची एक अखिल भारतीय परिषद २३ मार्च १९१८ रोजी मुंबईला घडवून आणली. या परिषदेचे अध्यक्ष श्री.सयाजीराव गायकवाड हे होते. देशाच्या विविध भागातून ना.सी.व्ही.मेहता, व्ही.जे.पटेल, बाबू बिपीनचंद्र पाल, एस.आर.बमनजी, जमनादास द्वारकादास, पी.के.तेलंग, आर.जी.प्रधान, लक्ष्मीदास तेरसी, बॅ.जयकर, भुलाभाई देसाई इत्यादी मान्यवर नेते मंडळी या परिषदेला उपस्थित होते. परिषद तीन दिवस चालली सुमारे सात हजार लोक हजर होते. स्वागताध्यक्ष न्या.चंदावरकर म्हणाले, 'इतिहास आपणास असे सांगतो की, ज्यापासून राष्ट्राचा विकास होतो. अशा सर्व प्रकारच्या प्रागतिक चळवळींचा उगम थोडयाशा व्यक्तींच्या कार्यात आढळतो. प्रस्तुतच्या बाबतीत त्या व्यक्ती म्हणजे ज्यांची प्रथम अत्यंत हेटाळणी झाली. ते डी.सी.मिशनचे कार्यकर्ते होत. त्यांच्या कार्याने प्रचंड हिंदू समाजाची सद्सद्विवेकबुद्धी जागृत झाली.'[१८]

या परिषदेत पुढील ठराव पास करण्यात आले होते. पहिला ठराव हा निकृष्ठ वर्गावर लादलेली अस्पृश्यता यापुढे ताबडतोब काढून टाकण्यात यावी आणि या कार्यासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी एक अस्पृश्यता निवारक जाहिरनामा काढून निकृष्ट वर्गास शाळा, दवाखाने, न्याय कचेऱ्या सर्व सार्वजनिक संस्थांत तसेच विहीरी, तळी, पाणवठे, देवालये, करमणुकीची ठिकाणे येथे कोणत्याही प्रकाराचा प्रतिबंध न राहता पूर्ण मोकळीक करून द्यावी, असे या परिषदेचे मत होते. या परिषदेने अस्पृश्यता निवारक जाहिरनाम्याचा मसुदा तयार करण्याचे व त्यावर राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सहया घेण्याचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे  यांच्यावर सोपविण्यात आले होते.

या परिषदेतील दुसरा ठराव पास झाला तो म्हणजे निकृष्ट वर्गावर लादलेले धार्मिक निर्बंध ज्यावेळी नाहीसे होतील त्याचवेळी त्यांच्या उन्नतीचे कार्य अत्यंत झपाटयाने व यशस्वीपणे पार पडेल. याकरिता ही सभा हिंदू धर्मसंस्थाधिपतीकडून पुढील कामे करून घेत आहे. अस्पृश्यता नाहिशी करण्याकरिता धार्मिक आज्ञापत्रे काढणे, हिंदू धर्मावर अस्पृश्यांची श्रद्धा दृढ करण्याकरिता धर्मशिक्षक नेमून त्यांच्यात हिंदू धर्मतत्त्वांचा प्रसार करणे, हिंदू लोकांकडून सर्वसाधारण धार्मिक सभांत भाग घेण्याची अस्पृश्यांना परवानगी देणे.'[१९]

सन १९१७ नंतर विविध प्रांतात या संघाच्या परिषदा होऊ लागल्या. सन १९१८ सालच्या परिषदेत भाषण करताना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे  म्हणाले होते की, परमेश्वराच्या घरचा दरवाजा कोणासाठीही लावलेला नाही आणि तो दरवाजा लावून टाकणारा तो परमेश्वरच नाही, असे मी समजेन. जी अस्पृश्यता मेल्यावर राहत नाही, जी अस्पृश्यता परमेश्वराच्या घरी जाताना आड येत नाही' ती अस्पृश्यता आपण आपल्या समाजात वावरू देणे म्हणजे परमेश्वराच्या घरी पाप केल्यासारखे आहे.[२०]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्थापन केलेला अस्पृश्यता निवारक संघास राष्ट्रीय नेत्यांनीही पाठिंबा दिला होता. या संस्थेमार्फत अस्पृश्यता निवारणाचे कार्य फार मोठया प्रमाणावर करण्यात आले होते.

### अस्पृश्यांच्या उन्नतीकरीता सरकारकडे निवेदन :-

सन १९१६ साली सरकारकडे अस्पृश्य मंडळीच्या सुधारणेकरीता महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी वाङ्मयीन शिक्षणाबरोबरच औद्योगिक शिक्षणाची जोड दिली पाहिजे, स्वाभिमान,

आत्मसन्मान व आत्मविश्वास तयार होईल. असे नैतिक शिक्षण दिले पाहिजे, अस्पृश्याकरीता स्वतंत्र शाळा चालविण्यातील अनेक गैरफायदे नाहीसे करण्यासाठी सामान्य घटकातून त्यांना हक्काने प्रवेश दिला गेला पाहिजे. खेडयात व शहरात वाढत्या प्रमाणावर प्राथमिक शाळा, किमान एक औद्योगीक शाळा, मुख्य केंद्रात वसतिगृहे, उच्च शिक्षणाकरिता खास शिष्यवृत्त्या या संस्था सरकार, नगरपालिका, लोकल बोर्ड अगर खाजगी संस्था यांच्यामार्फत चालवण्यास खाजगी अनुदाने द्यावीत, सर्व प्रयत्नात परस्पर सहकार्य तयार करणे अशा सुचना केल्या. तसेच अस्पृश्यांच्या शाळांची चौकशीसाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. अस्पृश्य वर्गात 'सहकारी सोसायटी'ची वाढ करावी, त्यांना सरकारने सवलती द्याव्यात, महत्त्वाच्या ठिकाणी संस्थेच्या प्रतिनिधीची एकत्र कमिटी नेमावी, या कमिटीत म्युनिसिपालिटी, लोकल बोर्ड, सहकारी शिक्षण खाते, वैद्यकीय खाते, यांनी एकत्रित बसून अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीसाठी उपाययोजना सुचवाव्यात, त्यांची अंमलबजावणी करावी. यातून महर्षी शिंदेनी अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी उन्नतीसाठी अस्पृश्यांची प्रगती होणे महत्त्वपूर्ण मानले. त्याच प्रगतीतून अस्पृश्यता नष्ट होवू शकते असा त्यांचा विश्वास होता. त्याच विश्वासाची व अस्पृश्य मुक्तीची कास मनात धरून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सरकारला निवेदने देवून सरकारचे लक्ष अस्पृश्यतेकडे खेचून अस्पृश्य मुक्तीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.[२१]

वरील प्रश्नाशिवाय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सन १९१३ मध्ये एक शिष्टमंडळ गव्हर्नरसाहेबांच्या भेटीसाठी घेऊन गेले होते. या शिष्टमंडळात मांग जातीचे श्रीपतराव चांदणे यांचा समावेश होता. त्याकाळात कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली सरकार कष्टकरी वर्गाच्या चळवळी चिरडून टाकत होते. त्यावेळच्या इंग्रज पोलीस अधिकाऱ्यांनी मांग व इतर काही जमातींना गुन्हेगार ठरवून त्यांच्या पाठीमागे हजेरीचा ससेमिरा लावला होता. या हजेरीच्या जाचातून मांग जातीची सुटका व्हावी यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे श्री. चांदणे त्यांच्यासह पुणे मुक्कामी गव्हर्नरची भेट घेऊन त्यांच्यापुढे या जमातीच्यावतीने खालील तक्रार मांडली व त्यांना या जाचातून सोडविण्याची रास्त मागणी केली. ते म्हणतात, मांग गरीब आहेत. त्यांना कसलाही धंदा नाही, उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हेगारीचा शिक्का लोकांना मारला गेला आहे. यातून जर या जमातीची सुटका करावयाची असेल तर या लोकांना जगण्यासाठी शेतीचा तुकडा द्यावा. कारण तो धंदा जमण्यासारखा आहे. सातारा

जिल्हयात बरीच पडीक जमीन आहे. तेथे जर या मांगांची वसाहत केली. त्यांना उपजीवीकेचे साधन म्हणून जर जमिनीचा तुकडा दिला तर निश्चितच त्यांच्यावरील गुन्हेगारीचा शिक्का जाईल. गव्हर्नरने या कामाची दखल घेऊन त्यासाठी एक डी.सी.कमिशन नेमले. या कमिशनने १९१४ साली एक ठराव केला. त्यानुसार निदान शंभर कुटुंबाची सोय होईल अशी एक वसाहत प्रयोगादाखल सातारा जिल्हयात उघडावी. त्यासाठी सलग ४०० एकर जमीन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दाखवावी व शासनाने ती जमीन मांगांच्या वसाहतीसाठी द्यावी. अशाप्रकारे गव्हर्नरच्या समितीने सोपवलेली जबाबदारी त्यांनी मोठया तत्परतेने पार पाडली. या कामी त्यांनी आपल्या सेवाभावी, कार्यतत्पर व चिकाटीच्या स्वभावाला अनुसरून जिल्हयाच्या अधिकाऱ्यापासून ते गव्हर्नरापर्यत अनेकांची सहानुभूती मिळविली. आपल्या या कामात त्यांनी श्री.चांदणे यांना तेवढयाच सन्मानाने घेतले होते. परंतु सरकारने या कामात पुढे लक्ष न घातल्याने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केलेले प्रयत्न वाया गेले.[२२]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या परंपरेतील काम केल्याचे दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी वेठबिगारीची पद्धत बंद केली होती. त्याचप्रमाणेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मांग वसाहत करण्यासाठी फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते.

## राखीव मतदार संघांचा पुरस्कार

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण कार्य करताना सर्वाचे सहकार्य घ्यावे व समन्वय साधून एकतेतून या प्रश्नाची उकल करावी याचदृष्टीने १९१९ साली साक्ष दिली. त्यानुसार सर्वसाधारण मतदार संघासाठी मतदान पात्रतेबाबत पुरूषाचे वार्षिक उत्पन्न ३०० रूपये व व्हर्नाक्युलर फायनल पर्यंतचे पुरूषांचे शिक्षण असावे, हया अटी होत्या. परंतु अस्पृश्य वर्गाची बिकट अवस्था लक्षात घेऊन त्यांच्यासाठी हया अटी शिथिल कराव्यात असे त्यानी प्रतिपादन केले. अस्पृश्यांसाठी वार्षिक उत्पन्न रू.१४४ अथवा इयत्ता मराठी चौथी पर्यतचे शिक्षण एवढयाच अटी मतदान पात्रतच्या असाव्यात अशी मागणी करून पुढे ते म्हणतात की, हया वर्गातील प्रतिनिधीची प्रांतिक कायदे कौन्सिल व स्थानिक स्वराज्य संस्था यावर त्यांच्या स्वतंत्र राखीव मतदार संघातून त्याच जातीच्या प्रतिनिधीची निवड केली तर त्यांच्या दृष्टीने फारच हितावह ठरेल.[२३]

मुंबई इलाख्यात कायदे कौन्सिलात १५० जागा असतील असे गृहित धरले तर पाच जागा या वर्गासाठी राखीव असाव्यात. कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, सिंध आणि मुंबई शहर या पाच विभागातून पाच प्रतिनिधींची निवड व्हावी. ही निवड अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गातील प्रतिनिधीच्या मुद्दाम तयार केलेल्या त्या वर्गातील मतदारांच्या मतदारसंघातून करण्यात यावी. अशा प्रकारचे स्वतंत्र राखीव मतदारसंघ निर्माण करणे हे अशक्य नाही. उलट त्या वर्गाच्या दृष्टीने ते हितावह होते. त्याचप्रमाणे त्यांना राजकीय शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने तसेच सामाजिक उन्नती होण्यासाठी ते एक पुढचे पाऊल ठरेल.[२४]

## व्हायकोम सत्याग्रह

उत्तर व मध्य भारताच्या तुलनेत दक्षिण भारताचा भाग आचारविचारांच्या बाबतीत अत्यंत सोवळा होता. त्यातल्या त्यात पूर्वीच्या मलबार प्रांतात तर अस्पृश्य गणल्या गेलेल्या लोकांवरच फारच जाचक अटी लादलेल्या होत्या. त्रावनकोर संस्थानच्या व्हायकोम गावातील देवळात व जाण्यायेण्याच्या रस्त्यावर अस्पृश्य लोकांना जाण्यास कायदेशीर मनाई होती. मात्र देवळाच्या रस्त्यावरील असणाऱ्या ख्रिस्ती व मुसलमान वगैरे परधर्मीयांना कोणतीही मनाई नव्हती. एवढेच नव्हे तर देवळाच्या बाहेरच्या व आतील मंडपात अशा परकीयांना मोठया प्रतिष्ठितपणे नेण्यात येत असे. हा मंदिरप्रवेश फक्त हिंदूमधील अस्पृश्यांचा प्रश्न होता. हा अन्यायकारक प्रश्न सोडवावा म्हणून व्हायकोमला ३० मार्च १९२४ रोजी मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रहाला प्रारंभ झाला होता. लाहेरचे स्वामी श्रद्धानंद हे आर्य समाजाच्यावतीने सत्याग्रह करण्यासाठी आले होते. कालिकतचे मंजिरी रामय्या हे थिऑसॉफीच्यावतीने सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आले होते हा सत्याग्रह होण्यापूर्वी ब्राम्होसमाजाच्यावतीने हे धुरीणत्व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याकडे आले.[२५]

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे व्हायकोमच्या सत्याग्रहासाठी मलबारचा दौरा करीत नव्हते. ते ब्राम्हो समाजाचा प्रचार करीत होते. व्हायोकाम येथील परिस्थिती सुधारण्यासाठी ब्राम्हो समाजाचे साधू आपल्या प्रचारासाठी तेथे गेले होते. ते पूर्वाश्रमीचे अस्पृश्य होते. इतर अस्पृश्याप्रमाणेच त्यांनाही व्हायकोमच्या मंदिरात जाण्यास मनाई करण्यात आली. त्यामुळे साधारण ब्राम्हो समाजाचे अध्यक्ष डॉ. प्राणकृष्ण आचार्य यांनी त्रावणकोर संस्थानाकडे याबाबत दाद मागितली. तसेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी व्हायकोमला जावे असे कळविले.

त्याप्रमाणे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शिवप्रसाद यांच्यासह व्हायकोमला येऊन दाखल झाले. व्हायकोम येथील एका प्रचंड जाहीर सभेत इतर राजकीय पुढाऱ्याबरोबर म.शिंदे यांचेही या संदर्भात भाषण झाले. या भाषणाला मद्रासकडील वृत्तपत्रांनी चांगली प्रसिद्धी दिली. त्यामुळे शीख समाजातील लोकांनी अस्पृश्य समाजांनी, नायर व नुंबद्री समाजातील जे तरूण या सत्याग्रहात सहभागी झाले होते. त्या सर्वानी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे मनापासून स्वागत केले. त्यांनी इतर अनेक सभांमधून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची व्याख्याने घडवून आणली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी व्हायोकमच्या मंदिरात प्रवेश केला. परंतु शिवप्रसाद यांना ते अस्पृश्य असल्याने मंदिर प्रवेश नाकारला. तेव्हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे अस्वस्थ झाले. त्यांनी दुसऱ्या दिवशी या प्रकरणाबद्दल महाराजाकडे धाव घेतली. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. तेव्हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महाराजांचा निषेध केला. आपल्या भाषणात त्यांनी हे स्पष्टपणे सांगितले की, त्रावणकोर, कोचीन संस्थानातील हिंदूच्या मंदिरात जाण्यास स्पृश्य हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन अथवा दुसऱ्या कोणत्याही परधर्मीय माणसाला मज्जाव केला जात नाही. परंतु अस्पृश्य कितीही सुशिक्षित, प्रतिष्ठित असो त्याला मात्र मंदिरात प्रवेश न देणाच्या बाबतीत सर्व धर्माची एकजूट आहे आणि या 'पवित्र' एकजुटीला दोन्ही संस्थानाचा आणि अप्रत्यक्षरीत्या ब्रिटिश सरकारचाही पाठिंबा होता.[२६]

अशाप्रकारे रूढीग्रस्त जनता, धर्ममार्तंड आणि कावेबाज ब्रिटिश सरकार यांच्या विरोधात सामाजिक सुधारणेसाठी संघर्ष करीत होते. त्यांना वरील वर्गाचा विरोध झाला. हे आपण समजू शकतो. परंतु प्रत्यक्ष ब्राम्हो समाजातील बिल्लव जातीच्या पुढाऱ्यानी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना विरोध सुरू केला. तेव्हा त्यांनी तेथील महाराजांकडे तक्रार केली परंतु महाराजांनी त्याची दखल घेतली नाही. शेवटी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना या भागात प्रचाराव्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम करता आले नाही.

### अस्पृश्यांची शेतकी परिषद पुणे(१९२६)

३० ऑक्टोबर १९२६ रोजी पुणे येथे भरलेल्या शेतकी परिषदेचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे अध्यक्ष होते. सरकारने भरविलेल्या शेतकी प्रदर्शनाच्या जोडीनेच ही अस्पृश्यांची शेतकी परिषद भरविण्यात आली होती. या अस्पृश्यांच्या शेतकी परिषदेच्या हेतूबद्दल त्यांनी साशंकता प्रकट केली. कारण जमिनीचे मालक अथवा शेती कसणारे यापैकी कोणत्याही नात्याने

अस्पृश्यांची गणना शेतीसंबंधीच्या वर्गामध्ये करता येत नाही. एवढेच नव्हे तर त्यांची गणना शेतमजूरामध्ये होत नाही. असे त्यांनी निक्षून सांगितले. इतर इलाख्यात अस्पृश्य समाजाची स्थिती शेतीवरच्या बिनमुदतीच्या गुलामासारखीच आहे असे नमूद करून अस्पृश्याला शेतकरी म्हणणे म्हणजे त्याच्या दुःखावर डागण्या देण्यासारखे आहे, असे त्यांनी विधान केले. अस्पृश्यांचा मूलतः प्रश्न सामाजिक–धार्मिक व विशेषतः राजकीय स्वरूपाचा आहे, असे त्यांनी सांगितले. मात्र प्रांतातल्यापेक्षा महाराष्ट्रात अस्पृश्यांची जमीन मालकीसंबंधी स्थिती किंचित बरी आहे. असे त्यांनी भाषणात नमूद केले. वस्तुतः अस्पृश्य हे दंडकारण्याचे मूळ मालक होते, ही जाणीव त्यांना देऊन तुम्ही सर्वानी एकी करून जमिनीवरील गेलेली सत्ता मिळविली पाहिजे. असे त्यांना आवाहन केले.[२७]

अशा प्रकारे या शेतकी प्रदर्शनात जी शेतकी परिषद आयोजित करण्यात आलेली होती. या परिषदेमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विद्यमान समाजस्थितीची चर्चा केली. त्याचबरोबर दलित उद्धाराच्या चळवळीची भावी दिशाही त्यांनी आपल्या भाषणात सूचित केली. या परिषदेत त्यांनी अस्पृश्यता ही प्रधान आणि शेतकी ही गौण गोष्ट आहे अशी मांडणी केली. महाराष्ट्रात जमिनीवर मालकी हक्क मिळविण्यास अस्पृश्यांना बंदी नसली तरी अडसर आहे. दारिद्र्याचा व धंदेवाईक सवलतीच्या अभावाचा. या संदर्भात जे त्याला साक्षीदार आहेत. असे एक बोलके उदाहरण ते देतात. ती घटना म्हणजे १९१४ साली मांग लोकांची वसाहत स्थापन करण्यासाठी म.शिंदे यांनी जिवापाड कष्ट घेतले परंतु या मांग लोकांना पाय टेकविण्यासाठी आपल्या हक्काची जमीन मिळाली नाही. तसेच या परिषदेचेही होणारे सरकार नुसते नोकरशाही व जमिनदारांचा खेळ निमूटपणाने पहात बसणार.[२८]

**शेतकऱ्याविषयीचे कार्य**

शेतकरी वर्गाची हलाखीची स्थिती कशी सुधारावी हा एक विठ्ठल रामजी शिंदे यांच्या काळातील प्रमुख विषय बनला होता. इ.स.१९२६ ते ३२ या कालखंडात शेतकऱ्यांच्या सभा भरवून, परिषदामध्ये भाषणे करून त्यांच्यामध्ये जागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले होते. ते स्वतः शेतकरी वर्गातील होते. जमखंडी येथे गरीब शेतकऱ्यांची स्थिती किती हलाखीची होती. याचे त्यांनी लहानपणी निरीक्षण व अनुभव घेतला होता. शेतकरी वर्गाबद्दल आस्था

असल्याने ते युरोपला गेले असता इंग्लंड, फ्रान्स व स्वित्झर्लंडमधील शेतकरी वर्गाची स्थिती कशी आहे, याचे त्यांनी निरीक्षण केले होते. सन १९२० मध्ये निवडणूकीच्या वेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या बहुजन पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यामध्ये एक पीडित शोषित वर्ग म्हणून शेतकरी वर्गाच्या दारूण अवस्थेचा निर्देश करून आपला पक्ष त्याचा कैवार घेणार असे आश्वासन दिले होते. सन १९२६ ते ३० या काळात त्यांनी शेतकऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या हिताची वस्तुनिष्ठ भूमिका मांडली आहे. ही भूमिका मांडीत असताना स्वातंत्र्य लढयामध्ये अग्रेसर असणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या शेतकऱ्यांच्या भूमिकेबाबत असलेल्या उणिवांचीही मार्मिकपणे निर्देश केला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या वास्तवस्थितीची कल्पना देऊन त्यांचे शत्रू कोण आहेत याचे यथायोग्य विश्लेषण त्यांनी केले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या चळवळीमध्ये हा जो मनःपूर्वक सहभाग घेतला आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या हिताबद्दल त्यांना असलेली आंतरिक तळमळ दिसून येते.

अस्पृश्यांची शेतकी परिषद, पुणे(१९२६), मुंबई इलाखा शेतकरी परिषद पुणे (१९२८), वाळवे तालुका शेतकरी परिषद, बोरगाव (१९३१), संस्थानी शेतकी परिषद, तेरदाळ व चांदवड तालुका शेतकरी परिषद, वडणेर (१९३२) या पाच परिषदामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भाग घेऊन शेतकऱ्यांच्यात जागृती निर्माण केली.[२९]

मुंबई सरकारने तुकडेबंदीचे व सारावाढीचे बिल मंजूर करून घेण्याचा विचार चालविला होता. या कायद्याच्या आधारे शेतकऱ्यांची पिळवणूक करणे हा हेतू होता. मुंबई सरकारच्या या संकल्पित बिलाला विरोध करण्याच्या हेतूने पुण्यात २५ व २६ जुलै १९२८ रोजी मुंबई इलाखा शेतकरी परिषद भरविण्यात आली. या परिषदेला महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी यशस्वीपणे मार्गदर्शन केले. १९२६-२७ मध्ये गुजरातेत सरदार वल्लभााई पटेल यांनी साराबंदीची अभूतपूर्व चळवळ मुंबई सरकारच्या विरोधात सुरू केली होती. तिला यश मिळवून देण्याचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. त्यामुळे मुंबई इलाख्यातील शेतकऱ्यांच्यात मोठया प्रमाणावर जागृती झाली. या परिषेदेचे अध्यक्षस्थान महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना देण्यात आले होते.[३०]

देशी संस्थानिकांच्या अन्यायाखाली दबलेल्या शेतकऱ्यांना एकत्र करून संघटना बांधण्याचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. त्यासाठी सांगली जिल्हयातील तेरदाळ येथे एक परिषद घेतली. या परिषदेच्या निमित्ताने एकूण शेतकरी वर्गाची हलाखीची स्थिती, त्या

ही संस्थानातील शेतकऱ्याची अस्पृश्यापेक्षाही दयनीय अशी अवस्था, त्यांची कारणमीमांसा, शेतकऱ्यांच्या चळवळीचे अर्थशास्त्र, या चळवळीकडे काँग्रेस व पांढरपेशा वर्गाचा पहाण्याचा दृष्टिकोण, शेतकऱ्यांची संघटना बांधताना करावयाचा प्रयत्न इत्यादीचे चित्र महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी उभे केले.

या चळवळीच्यावेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात की, आज देशात सर्वत्र शेतकरी साधेपणा, भोळेपणा व अडाणीपणा यामुळे कंगाल झालेला दिसत आहे. याचे कारण त्याला या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी त्याच्याजवळ संघटनेचे प्रभावी साधन नाही. परिणामी हा शेतकरी भांडवलदार, सावकार, सरकारी अधिकारी यांच्या दृष्टीने एक गुलामांचा वर्ग बनला आहे. देशातील व संस्थानातील या स्थितीला हातभार लावणार. तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे जागतिक मंदी होय. या मंदीमुळे शेतमालाचा बाजारभाव झपाटयाने खाली घसरत आहे. मंदीचा फटका व्यापारी, नोकरदार, मजूर यांना जितका बसतो त्यापेक्षा शेतकऱ्यांना तो अधिक जबरदस्त बसत असतो. कारण इतर वर्गाच्या हातात काही ना काही तरी चलन असते. शेतकऱ्याचे तसे नसते. असे असूनही शेतसारा धान्याच्या स्वाभाविक रूपाने घ्यावा की नाण्यांच्या कृत्रिम रूपाने घ्यावा हे कोणत्याही संस्थानिकांनी विवेकाला धरून ठरविले नाही. अर्थशास्त्राचे हे कोडे शेतकऱ्याला समजत नाही, आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांचे सरकार येईपर्यंत ते त्याला समजणेही शक्य नाही. बजेटाची तोंडमिळवणी सरकार करते. त्याचा फायदा श्रीमंताना होतो. सत्ताधाऱ्यांना होतो. मात्र तोटयाच्या सर्व भाराखाली एकटा शेतकरी चिरडला जातो. म्हणूनच यातून बाहेर पडण्यासाठी केवळ भाबडेपणाने एकत्र येऊन भागणार नाही. तर डोळसपणे अर्थशास्त्राच्या पायावर शेतकऱ्यांची संघटना उभी करावी लागणार आहे. तसेच अर्थशास्त्राच्या तत्त्वावर चालणारी शेतकऱ्यांची चळवळ राजकारणापासून दुर ठेवली तर काहीही कार्यभाग साधणार नाही. अर्थशास्त्राचा उल्लेख केला की, शेतकऱ्याला लुबाडणारे वर्ग या चळवळीला राजद्रोही असा शिक्का मारून मोकळे होतात.

अशाप्रकारे या परिषदेत सरकारी साऱ्यात शेतकऱ्याला सूट व तहकुबी द्यावी, जमीनदारांच्या खंडाबाबतही अशीच भूमिका स्वीकारावी व सावकारांचा व्याजाचा दर याच न्यायाने कमी करावा, असे ठराव मांडले गेले आणि शेवटचा महत्त्वाचा ठराव होता की, शेतकऱ्यांची संघटना बांधण्याच्याही बाबतीत विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांची झेप

निश्चितच लक्ष वेधून घेते. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांचे संघटन उभे करताना हिंदू–मुस्लिम, ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर, स्पृश्य–अस्पृश्य, संस्थानिक–खालसा यांसारखे सर्व भेद मिटवून टाकले पाहिजेत. एवढेच नव्हे तर ही संघटना बांधण्यासाठी सुशिक्षित–पांढरपेशा वर्गाने पुढे आले पाहिजे. त्यांनी या चळवळीला अर्थसाहय केले पाहिजे. कारण फाटक्या शेतकऱ्यांजवळ द्रव्य कोठून असणार ? थोडक्यात, कॉंग्रेस व पांढरपेशा वर्गाने हे लक्षात घ्यावे की, शेतकऱ्यांची संघटना उभी करणे हे केवळ फावल्या वेळात करावयाचे काम नाही.[३१]

सांगली संस्थानातील तेरदाळ येथील परिषदेप्रमाणे भोर संस्थानतील, वाळवा तालुका व चांदवड तालुका येथील शेतकरी परिषदामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सहभाग घेतला होता. भोर परिषदेत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे अध्यक्ष होते. तर वाळवे येथील शेतकरी परिषदेत विशेष म्हणजे या परिषदेत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भांडवलशाहीची चर्चा करून तिचा आपल्या चळवळीशी असलेला संबंध स्पष्ट केला होता.[३२]

**श्री.म.माटे व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे**

**श्री.म.माटे यांचे अस्पृश्यांच्या विषयीचे कार्य**

श्री.म.माटे यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याप्रमाणेच अस्पृश्योद्धाराचे कार्य हाती घेतले होते. इ.स.१९१७ पासून त्यांनी आपल्या कार्यास प्रारंभ केला. ते पुण्यातील नव्या पेठेत मांगवाडयात जात होते. तेथे साक्षरता व स्वच्छता यांची शिकवण तेथील लोकांना द्यायचे. सुखदुःखाची चर्चा करायचे, आपापसातील भांडणे सोडवायची, रूग्णांना औषधोपचार करून आधार द्यायचा. अस्पृश्य समाजाला सध्याच्या हलाखीतून बाहेर कसे पडता येईल या विषयाचा उहापोह करायचा. अशा पद्धतीने श्री.म.माटे यांचे हे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कामास अनुसरून होते.

श्री.म.माटे यांनी सुरू केलेल्या कामाचे फलित म्हणजे पुणे शहरात सर्व दलित वस्त्यामधून शाळा सुरू झाल्या. निरनिराळया अस्पृश्य व उपेक्षित समाजाची माहिती गोळा झाली, तिचे संकलन करून श्री.म.माटे यांनी 'अस्पृश्यांचा प्रश्न' यासारखे संशोधन प्रकाशित केले. महाराष्ट्रभर व्याख्याने दिली. परिषदांचे आयोजन केले.[३३]

वरील कार्यातून श्री.म.माटे यांच्याबाबत हे स्पष्ट होते की, अस्पृश्यता हा अन्याय आहे व तो दूर होण्यासाठी सवर्णांनी अस्पृश्यांना सक्षम करण्यासाठी पाऊल उचलले पाहिजेत. एवढाच श्री.म.माटे यांचा आग्रह होता.

**श्री.म.माटे यांचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याविषयीचे मत**

श्री.म.माटे यांनी इ.स.१९१७ ते १९३७ या काळात वीस वर्षे अस्पृश्यांच्या प्रश्नावर काम लिहिले. म्हणूनच त्यांचे संबंध हे समाजसुधारकांशी येणे सहाजिकच आहे. त्यांचे हे संबंध महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी आलेले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याविषयी श्री.म.माटे यांनी अत्यंत आत्मीयतेने व आदराने लिहिले आहे, ते लिहितात की, 'श्री. विठ्ठलराव शिंदे हे तरूणपणीच ब्राम्होसमाजात शिरलेले होते, धार्मिक तत्वज्ञानाच्या अभ्यासासाठी विलायतेत गेलेले, युरोपच्या भूमीवरील सभांतून काही प्रबंध वाचलेले, असे एक सारासार विवेकी आणि सत्प्रवृत्त गृहस्थ असत. पण केवळ ब्राम्होसमाजाच्या तत्वज्ञानाने त्यांना समाधान होईना आणि नगरच्या एका छोटयाशा सभेत रात्रीच्या वेळी तेथील अस्पृश्य समाजाच्या पुढाऱ्यांनी आपल्या परिस्थितीचे जे दारूण वर्णन त्यांच्यापुढे केले, ते त्यांना तेथल्या तेथे इतके पटले की, ब्राम्होसमाजाच्या समतत्व प्रतिपादनाचे खरे सार हया अस्पृश्य समाजाच्या उद्धारात दिसून येणार आहे, असे त्यांच्या मनाने घेतले आणि लगोलग ते त्या कामाला लागले. शिंदे यांच्या बोलण्यात आणि लिहिण्यात सद्भिरूची कधीही सुटली नाही, इतकेच काय पण त्यांच्या वाणीत आणि लेखणीत विशेष प्रकारची महानुभाविता होती. शिंदे हयांनी आपल्या कर्तव्याचा पसारा मोठाच केला. आणि एका नव्या विषयाचे उत्थान त्यांच्या हातून होत आहे, हे तेव्हाच्या लोकांना स्वच्छ दिसून आले.'

'इंग्रजांनी जातवार प्रतिनिधित्व द्यावे, असा बूट(पहिल्या महायुद्धानंतर बक्षीसे देण्यासाठी) काढला. हयाने राष्ट्राच्या चिंध्या होतील, हे पुढाऱ्यांनी ओळखले आणि जातवार प्रतिनिधित्वाच्या तत्वाला विरोध आरंभिला. शनिवारवाडयापुढे शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड मोठी सभा झाली. जवळजवळ प्रत्येक जातीच्या प्रतिनिधीने जातवार प्रतिनिधीत्वाच्या तत्वाचा जोराने निषेध केला. 'स्वराज्याच्या चळवळीचे आचार्य' अशा शब्दात टिळकांचे आवाहन करून विठ्ठल शिंदे यांनी त्यांना भाषण करण्यास सांगितले आणि त्यांनी हे तत्व आम्हाला नको, हे लोकांना परोपरीने समजावून सांगितले.

श्री.विठ्ठलराव शिंदे हे जातपात मानीत नसत. त्यांचे राहणे, जेवण, खाणे सारे अस्पृश्य लोकांच्या सानिध्यातच होत असे. या प्रश्नाला त्यांनी स्वतःला सर्वस्वी वाहून घेतले होते. अस्पृश्योद्धाराच्या कामी महाराष्ट्रात जी थोडी लहान मोठी माणसे या वेळी झगडली, त्यात विठ्ठलराव शिंदे हे सर्वश्रेष्ठ होत.'

मात्र ब्राम्होसमाजाचा मूर्तीपूजेला विरोध होता आणि अस्पृश्य मुळात हिंदूच असल्यामुळे सगुणभक्तीच्या परंपरेतच वाढलेले होते, हा पेच माटयांना पडला. एरवी शिंदे यांच्या मनातली स्वतःच्या मराठापणाची जाणीव पूर्णपणे कधीच गेली नाही. ही स्वतःची टिप्पणी एकवेळ बाजूला ठेवूनही माटयांनी त्यांच्याबरोबर काम केले असते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे लोकमान्य टिळकांना मानत होते. ही फार मोठी जमेची बाजू होती.

श्री.म.माटे यांनी लोकमान्य टिळकांना दैवत, आगरकर हे वैचारिक स्फूर्तीस्थान मानले होते.त्यांच्या मनात महादेव गोविंद रानडे यांच्याबद्दल पूज्यभाव होता. तर चिपळूणकर यांच्याबद्दलही प्रेम होते. अशी माटयांची कात्रीत सापडलेली अवस्था होती.[३४]

**मुलींचे सक्तीचे शिक्षणविषयक धोरण**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्थापन केलेल्या डिप्रेस्ड मिशन क्लासच्यावतीने शिक्षण सुरू केले होते. हे शिक्षण अस्पृश्य, बहुजन यांच्या सर्वांगीण विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून उपयोगात आणले. यासाठी त्यांनी अनेक उपक्रमाची उभारणी केली. त्यात स्त्रियांचे शिक्षण, उद्योगशाळा, नीतीशाळा, महिला मंडळे, विविध परिषदा, वसतिगृहे अशा अनेकांची सुरूवात त्यांनी केली होती. त्याचवेळी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केवळ बहुजन समाजाच्या शिक्षणाला प्रारंभ केला होता. त्याचबरोबर मुलींना सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणून शिक्षण हे सार्वत्रिक व्हावे, यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे शासन दरबारी गेले होते. शिक्षणाच्या हंटर कमिशनच्या नियुक्तीनंतर या विचाराला अधिक चालना मिळाल्याचे दिसते. ब्रिटिश सरकार जरी शहाण्याचे होते तरी बहुजनांच्या शिक्षणाचा विचार त्याला करावयाचा नव्हता. केवळ मध्यवर्गीयांना शिक्षण देऊन राज्यकारभार चालवायचा होता. त्यामुळे हे सरकार सार्वत्रिक शिक्षण व सक्तीचे शिक्षण याकडे दुर्लक्ष करीत होते.[३५]

पुणे नगरपालिकेत १९१९ साली सक्तीच्या शिक्षणाची मोठी चळवळ झाली. पुणे नगरपालिकेत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची चर्चा चालू होती. पण या चर्चेत एक प्रभावी सूर असा होता की, सध्या आपण फक्त मुलांच्या सक्तीच्या शिक्षणाचा विचार करावा. या चर्चेत एका चळवळीच्या रूपाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे दाखल झाले. सक्तीच्या शिक्षणात मुलींचा समावेश करण्यात येऊ नये, असे मत लोकमान्य टिळक यांचेही होते. त्यावेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भूमिका मांडली की, मुलींनाही सक्तीचे मोफत शिक्षण चालू केले पाहिजे. या प्रश्नाचा निर्णय घेण्यासाठी नगरपालिकेची सभा भरली होती. या सभेवर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली एक स्त्रियांचा मोर्चा आला. त्यात 'भारतीय निराश्रीत साहयकारी मंडळा'तील बहुसंख्य स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. तर दुसरा मोर्चा पंडिता रमाबाई रानडे यांच्या नेतृत्त्वाखाली आला होता. असा हा स्त्री शक्तीचा अपूर्व देखावा तिथे झाला होता. परंतु लोकमताच्या रेटयामुळे नगरपालिकेची ही सभा बरखास्त झाली.

या प्रश्नाचा विचार करण्यासाठी प्राचार्य राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली नगरपालिकेने एक समिती नेमली. या समितीनेही महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मताला दुजोरा दिला. पण नगरपालिकेत पुराणमतवादी सत्ताधाऱ्यांना हा निर्णय पचला नाही. पुन्हा एकदा लोकमत जाणून घेण्याच्या बहाण्याने किर्लोस्कर थिएटरमध्ये नगरपालिकेचे चीफ ऑफिसर श्री.भागवत यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरविली. लोकांवर दडपण टाकण्यासाठी लोकमान्य टिळाकांना त्यांच्या सहकाऱ्यासह मुद्दाम बोलावण्यात आले. लोकमान्य टिळकांनी आपली बाजू मांडली त्यावेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांना कडाडून विरोध केला. त्यावेळी लोकमत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बाजूने होते. तेथे लोकमान्य टिळकांच्या विरूद्ध वातावरण निर्माण झाल्याने ती सभा तहकूब करावी लागली.

पुढे या चळवळीला महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी व्यापक स्वरूप दिले. या प्रश्नावर लोकमत जागृत करण्यासाठी दक्षिण महाराष्ट्राचा दौरा काढला. आपल्या भूमिकेचा व्यापक प्रमाणावर लोकांनी विचार करावा म्हणून 'ज्ञानप्रकाशात' लोकमान्य टिळकांच्या विरोधात लेखमाला प्रसिद्ध केली. त्यांच्या या चळवळीत प्राचार्य कानिटकर, श्री. ह.ना.पटवर्धन, श्री.केशवराव जेधे, श्री.रामराव बर्गे व मराठी समाजातील तरूण वर्गही चांगल्या संख्येने सहभागी झाला. महात्मा फुल्यांपासून सुरू झालेल्या शिक्षणाच्या लढाईतील हा एक महत्त्वाचा टप्पा

होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या चळवळीचा परिणाम पुणे शहरात पुढे दिसून आला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे स्नेही रँग्लर र.पु.परांजपे हे जेव्हा शिक्षणमंत्री झाले. तेव्हा त्यांना पुणे शहरात नगरपालिकेच्या कायद्याच्या आधारे सक्तीचे मोफत शिक्षण सुरू करावे लागले व त्यात मुलींचाही समावेश करावा लागला.[३६]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना या कार्यात उशिरा का होईना यश मिळालेले दिसून येते. त्यांच्या या कार्यामुळे महात्मा फुले यांनी पुणे येथे व राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर येथे सुरू केलेले मुलीचे शिक्षण यास कायद्याने सक्तीचे करण्यास परवानगी मिळाली. त्यातून सर्वत्र स्त्रियांना शिक्षण मिळण्यास सुरूवात झाली.

### मद्यपान निषेधाची चळवळ

सन १९०६–०७ सालापासून मद्यपानबंदीच्या चळवळीकडे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लक्ष गेले होते. पुण्यातही लोकमान्य टिळक यांनी ही चळवळ सुरू केली होती. लोकमान्य टिळकांच्याबरोबर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे या चळवळीत सहभागी होऊ लागले. त्यांच्याबरोबर सभामध्ये जाऊन व्याख्यानेही देत असत. सन १९२० च्या असहकार आंदोलनात व १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सहभाग घेऊन मद्यपाननिषेधाच्या घोषणा दिल्या होत्या. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मद्यपान बंदीबाबत आपली आग्रही भूमिका मांडत होते. सन १९२२ साली वसंत व्याख्यानमालेत त्यांनी 'दारूचा व्यापार, सरकार आणि बहुजन समाज' या विषयावर व्याख्यान दिले व सरकारच्या दुटप्पी आणि दांभिक भूमिकेवर परखड शब्दात टीका केली.[३७]

ते आपल्या भाषणात म्हणाले की, सुशिक्षित वर्ग, भांडवलवाले वगैरे वर्ग आपल्या हिताची काळजी घेण्यास समर्थ आहेत. या विषयाचा बहुजन समाजाच्या हिताच्यादृष्टीने आपल्याला विचार करावयाचा आहे. पुढारलेल्या वर्गात दारू पिणाऱ्या काही अपवादात्मक व्यक्ती असू शकतात. उलटपक्षी बहुजन समाजात अशा कित्येक जाती आढळतील की, या प्रकारची सक्ती केल्याशिवाय त्यांची दारूच्या व्यसनातून मुक्तता होणार नाही. दारूसारख्या निषिद्ध वस्तूचा उघडया छातीने व्यापार चालविण्याचा अधिकार सरकारला आहे किंवा नाही, असा माझा मुख्य मुद्दा आहे. त्यावर मत मांडताना ते म्हणतात की, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दारूचे दुकान उघडण्याचा अधिकार जसा कोणत्याही संस्थेला नाही. तसाच तो सरकारलाही

नाही. कारण सरकार ही केवळ एक मानवी संस्था आहे. एकाच्या दारूबाजीचा फायदा दुसऱ्याने घेणे हे जर उघड उघड अनीतीचे आहे. तर ही अनीती राजकारणाच्या सबबीवर सरकारलाही आचरण्याचा अधिकार नाही व असू नये. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की, सरकार हा व्यापार ताबडतोब बंद करीत नसेल तर लोकांनी घनघोर प्रयत्न करून त्यास तसे करण्यात भाग पाडण्याचा अधिकार सर्व जनतेला, एवढेच काय कोणाही एका व्यक्तीस आहे. आधुनिक राजकारण म्हणजे भांडवलवाल्यांचा धुडगूस होय. जगात अद्याप खरी लोकशाही कोठेच अवतीर्ण झाली नाही आणि ती बसल्या बसल्या कोणाच्याही खाटल्यावर लवकरच उतरणार नाही म्हणून आधुनिक राजकारणात दारूच्या व्यापाराचा व्यभिचार शिरला आहे. हल्ली दारूचे दुकान उघड मांडून त्याच्या बळावर सरकार दरबारात सरदारी पटकावणारे लोकच सरकारचे मुख्य आश्रयदाते झाले आहेत.

व्याख्यानाच्या शेवटी ते असे म्हणतात की, गरीब लोकांच्या आरोग्याची हानी आणि द्रव्याची हानी होते. हयाचा निर्देश करून मूळ दोन–चार आणे किमतीच्या दारूवर कर बसवून सरकारने तिची किमंत दोन–चार रूपयावर नेलेली असूनही दारूबाजीचा विस्तार इतका अवाढव्य झाला आहे हे सरकार कबूल करीत आहे. सरकारने दारूची पैदाशीच बंद करावी म्हणजे विक्रीचा प्रश्नच रहाणार नाही. केवळ औषधोपचारासाठी लायसन्स देऊन इतर विषाप्रमाणे दारू हा एक पदार्थ विष समजून औषधापुरता त्याचा खप सरकारने चालू ठेवावा. या प्रश्नांची मांडणी त्यांनी प्राधान्याने बहुजन समाजाचे हित डोळयासमोर ठेवून केली व ती करीत असताना सरकारचा दांभिकपणा, दुटप्पीपणा सडेतोडपणे उघडा पाडला.[३८]

## शिमग्याच्या सणातील अनिष्ठ प्रथा बंद केल्या

खेडेगावात शिमग्याच्या दिवसात रूढीच्या नावाखाली होणारे अनाचार, अत्याचार होळीच्या दिवशी तर अभद्र, अश्लील बोलण्याला व ओंगळपणाचे घाणेरडी कृत्ये केली जात होती. मद्यपानाचा अतिरेक होऊन दारू पिणे हा केवढा अनिष्ट प्रकार आहे. त्यामुळे माणसाचे माणूसपण जाऊन पशुत्व निर्माण होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे लहान असताना जमखंडीसारख्या गावी शिमग्याच्या दिवसात इतर मुलांसमवेत या गोंधळामध्ये सामील होत असत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे शिमग्यातले अनाचार व अत्याचार बंद करून त्या दिवसाला होलिका संमेलन मंगल स्वरूप महाराष्ट्रभर देणारे समाजसुधारक ठरले. हा यातील गमंतीचा

विरोधाभास आहे. धर्माच्या व रूढीच्या नावाखाली शिमग्याच्या सणाला आलेले गलिच्छ, हिडीस व ओंगळ स्वरूप नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केला. सन १९०७ मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य वस्तीतील ग्लोबल मिलच्या मैदानात पहिले 'होलिका संमेलन' भरविले. त्यासाठी सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांना अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले. या प्रसंगी मुलांच्यामध्ये खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या. इतर मनोरंजक कामगार पुढारी नारायण मल्हार जोशी यांच्यामार्फत ही चळवळ चालविली. १९१३ पासून म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुण्यास आल्यापासून त्यांनी या चळवळीकडे जातीने लक्ष दिले. महाराष्ट्रात होळीच्या दिवशी ओंगळ प्रकार बंद करून त्याला सुसंस्कृत कार्यक्रमाचे स्वरूप मिळावे, अशा प्रकारची चळवळ महाराष्ट्रभर चालविली. मुंबई इलाख्याचे विद्याधिकारी यांची त्यांनी भेट घेऊन व त्यांच्यामार्फत खेडयापाडयातील शाळेतील शिक्षकांपर्यत हया चळवळीचे लोन पोहोचविण्यात आले. त्यामुळे शिमग्याच्या सणाच्या दिवशी मुलांकरवी सभा भरवून, त्यात भाषणे व संवाद करवून, मर्दानी खेळाच्या स्पर्धा आयोजित करून शिमग्याच्या सणाला चांगले स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरू झाला.[३९]

## दुष्काळ आपत्ती निवारक समिती –

सन १९२० मध्ये असाच नगर व पुणे जिल्हा मोठया दुष्काळाच्या तडाख्यात सापडला. या दुष्काळात शेतकरी तर बेजार झालाच परंतु खेडयापाडयात शेतमजुरी व इतर व्यवसाय करणारा अस्पृश्य समाज अक्षरशः उघडयावर पडला. मातंग समाजाची जवळ–जवळ एक हजार मंडळी पुण्याच्या मिशनच्या मैदानात आश्रयाला आली. अंगावर धड कपडा नाही, खायला अन्न नाही आणि कडाक्याच्या थंडीपासून संरक्षण करण्यासाठी डोक्यावर छप्पर नाही. अशी दयनीय अवस्था या मंडळीची झाली होती. त्यामुळे त्यांच्यात आजाराचा जोर वाढला होता. काहीजण मृत्यूमुखी पडले होते. अशा परिस्थितीत इतरांकडून मदतीची अपेक्षा करण्यापूर्वी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या मिशनच्यावतीने त्यांना तातडीची मदत केली. संकट मोठे होते, तात्पुरत्या मदतीने भागणार नव्हते. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी तातडीने पुणे नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या नेतृत्त्वाखाली 'दुष्काळ आपत्ती निवारक समिती' ची स्थापना केली. याद्वारे स्वयंसेवकांचे दल स्थापून लोकांकडून कपडा, धान्य, पैसे जमा करण्यासाठी पुणे शहरात तात्काळ एक मोठा मंडप उभारला व त्याबरोबर कच्च्या भिंतीची एक चाळ बांधण्यास

सुरूवात केली. ज्यांना कसलीही शारीरिक कष्ट सहन न करण्याचे त्राण नाही आशा वृद्धांना व लहान मुलांना ज्वारी, बाजरी, तांदूळ यांचे मोफत वाटप सुरू केले. तर जे अनाथ होते, ज्यांना स्वयंपाक करणे शक्य नव्हते. अशांना अन्न शिजवून नियमित वाटप केले. तसेच जे धडधाकट होते त्यांना त्यांचा पारंपरिक स्वरूपाचा ताग व वाख यांपासून दोर बनविण्याचा रोजगार उपलब्ध करून दिला. या सर्व दुषकाळग्रस्ताना कसलाही भेदभाव न करता औषध व कपडे यांचे वाटप सुरू केले. आपल्या भगिनी जनाक्का, पुण्यातील डॉ.गोखले, डॉ.सुश्रूषा यांनी व्यवस्था सुरू केली. या अन्नधान्याचे वाटप हे मामलेदार, कलेक्टर, कमिशनर या सरकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्याची पद्धत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्वीकारली. याचे कारण आपल्या राज्यात लोक कोणत्या भयानक परिस्थितीला तोंड देत आहेत. याची अप्रत्यक्ष का होईना शासनाला जाणीव व्हावी, हे होय.[४०]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या दुष्काळप्रसंगी एक समिती स्थापन करून त्या समितीमार्फत या कामात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून घेतले. मोठमोठया वृत्तसंस्थाचे सहकार्य घेतले. अनेकांच्या सहकार्यावर व स्वतः निरलसपणे केलेल्या अतोनात प्रयत्नामुळे दुष्काळाचे हे संकट निवारले गेले.

## मुरळी प्रतिबंधक चळवळ :-

मुरळी प्रतिबंधक चळवळ ही सन १९०४ साली जमखंडीच्या प्राथमिक शाळेत एक दहा वर्षाची महार समाजाची मुलगी शिक्षण घेत होती. तिला मुरळी म्हणून सोडण्यात आले होते. हे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना सहन झाले नाही. त्यांनी त्या मुलीच्या आईवडिलांना तिच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यास सांगितले. तसेच येथून पुढे या मुलीला मुरळीचा व्यवसाय करावयास लावू नका अशी ताकीद दिली. या जमखंडीच्या प्रकारानंतर मिशनच्या प्रयत्नाने सन १९१० मध्ये पुणे जिल्हयातील जेजुरीच्या यात्रेत मुरळी प्रतिबंधक सभा भरविली. अज्ञानी, गरीब व तथाकथित संस्कृतीच्या रिंगणाबाहेर फेकलेल्या हिंदू धर्मातील तळागाळाच्या लोकांमध्ये जेजुरीच्या यात्रेला अनन्यसाधारण महत्व होते. अशा ठिकाणी रूढी परंपराना अधिकच चेव चढत असतो. असे असूनही महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या कामासाठी या यात्रेची निवड केली. कारण मुरळी सोडण्याचे व तिचा धार्मिक विधी करण्याचे स्थळ म्हणजे जेजुरी येथील खंडेरायाचे मंदिर होय. सुधारणेचे पाऊल येथे पडणार असल्यामुळे रूढीग्रस्त लोक

धावून येणे सहाजिकच होते. या लोकांनी दारू पिऊन सभेत गोंधळ घालण्यास सुरूवात केली. तरीही सहकाऱ्यासह जोमाने व युक्तीने प्रयत्न करून ही सभा चालू ठेवली व लोकांना आपल्या विचारांकडे खेचले. अशारीतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी चळवळीचा हा दुसरा प्रयत्न केला.

या चळवळीत प्रत्यक्ष कृतीला विचारांचे समर्थन देण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला. लोकांना जागृत करण्यासाठी या प्रथेच्या इतिहासाबद्दल त्यांनी अनेक संशोधनात्मक लेख लिहिले. मुंबई येथे 'निराश्रीत बाल संरक्षक मंडळी' या नावाची संस्था यासंबंधी कार्य करीत होती. या संस्थेच्या कार्यात काही इंग्रज लोकांबरोबर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे कार्यरत होते. ते पतित स्त्रियांचा शोध घेऊन सांताक्रुझ येथील आश्रमात त्यांची काळजी घेतली जात होती. या आश्रमाची व्यवस्था महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भगिनी जनाक्का यांनी काही दिवस पाहिली होती. या चळवळीचे वैशिष्टये म्हणजे ही सामान्य स्तरातील मंडळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रेरणेने या मुरळयांशी स्वतः लग्न करून त्यांना या रूढीच्या फेऱ्यातून बाहेर काढण्याचे काम करीत होते.[४१]

अशाप्रकारे देवदासी किंवा मुरळीच्या मुक्तीच्या किंवा एकूणच स्त्रीमुक्तीच्या चळवळीतील कार्यकर्त्यांनीच नव्हे तर परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी चांगल्याप्रकारे कार्य करून त्या कामामध्ये यशही मिळविले होते.

## इन्फ्लुएंझाग्रस्ताना मदत

विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात प्लेग, मलेरिया, इन्फ्लुएंझा यासारख्या साथीच्या आजारांनी धुमाकूळ घातला होता. त्याचे मुंबई व पुणे येथे प्रमाण जास्त होते. या आजाराने अनेक लोकांचा मृत्यू झालेला होता. मुलांना पुरण्यासाठी स्मशानभूमीत खड्डे मिळेनात अशी अवस्था झालेली होती. 'वणव्यात गवत जळावे तशी माणसे जळू लागली.' असे या संकटाचे स्वतः महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी वर्णन केले आहे. या संकटातून लोकांना वाचविण्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर प्रथम पुण्यात सुरूवात केली. एखादी चळवळ उभी करावी त्याप्रमाणे आपल्या सहकाऱ्याबरोबर पुणे नगरपालिकेच्या दवाखान्यातून इन्फ्लुएंझा मिश्चरच्या बाटल्या मिळवावयाच्या व त्या घरोघरी जाऊन लोकांना वाटायच्या, त्यांना ते औषध प्यायला लावायचे असा क्रम सुरू केला. या

साथीचा संसर्ग महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या घरापर्यंत पोहोचला. घरातील बहुतेक मंडळी आजारी पडली. तरीही त्यांनी लोकांच्या सेवेच्या कार्यात खंड पडू दिला नाही.[४२]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी एन्फ्लुएंझाच्या साथीच्यावेळी फार मोलाचे काम केले होते. त्यातून मुंबई व पुणे येथे जाऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी रोग्यांना मदत केली होती.

## राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केवळ २८ वर्षाच्या कारकिर्दीत(१८९४–१९२२) राज्यकारभार करीत असताना त्यांनी आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याच्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणली. म्हणून त्यांना प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. भारताला लोकशाही स्वराज्य तर हवेच, पण त्याआधी ते उपभोगण्यासाठी व राबविण्यासाठी प्रथम जनतेत पात्रता आली पाहिजे व त्यासाठी बहुजन समाजात जागृती झाली पाहिजे. या उद्देशाने प्रेरित होऊन खास करून वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक कार्याकडे प्रकर्षाने लक्ष घातले. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्य निवारणाचे कार्य मोठया प्रमाणावर केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अस्पृश्य निवारण कार्यास गती मिळाली. राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य पुढीलप्रमाणे–

## दुष्काळावर उपाययोजना

इ.स.१८९६ मध्ये महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला होता. गावेच्या गावे ओस पडू लागली होती. जीव जगविण्यासाठी लोक वाट दिसेल तिकडे जाऊ लागले. गुरेढोरे चारा नसल्याने उपाशी मरू लागली. कोल्हापूर संस्थानात दुष्काळाची चाहूल लागताच राजर्षी शाहू महाराजांनी अंमलदाराकडून अपेक्षित दुष्काळी भागाची परिस्थिती आणि ती सावरण्यासाठी करावयाच्या तरतुदी याची माहिती मागविली. नोव्हेंबर १८९६ मध्ये त्यांनी गडहिंग्लज, रायबाग व कटकोळ या दुष्काळग्रस्त भागात दौरा केला. त्यावेळी गावातील लोकांना अन्नधान्य मिळावे यासाठी गावातील पाटलापासून ते सर्वसामान्य जनतेच्या कणगीतील धान्य गोळा करून गरजेनुसार त्याचे वाटप केले. गावाला धान्य कमी पडणार नाही, असे वचन राजर्षी शाहू महाराजांनी लोकांना दिले. गावांगावात धान्य वाटपाची दुकाने सुरू केली. हे धान्य स्वस्त दराने

देण्याचे व्यवस्था केली. ज्या गावात दुष्काळ पडला नाही तेथील लोकांकडून अन्नधान्य आणून ते दुष्काळग्रस्त भागात वाटले. त्यासाठी कर्नाटक व म्हैसूर येथूनही धान्य आणले होते. अशाप्रकारे अन्नधान्याचा प्रश्न राजर्षी शाहू महाराजांनी मातब्बर शेतकरी, व्यापारी व दरबार या तिघांच्या सहकार्याची सांगड घालून समाधानकारकरीतीने सोडविला. या प्रश्नाहून बिकट प्रश्न पाण्याचा होता. त्यासाठी नदीकाठच्या गावालगत विहीरी खोदल्या. त्यासाठी खर्च दरबारचा होता. श्रमदान गावकऱ्यांचे होते. गावच्या पाण्याचा प्रश्न गावाने व दरबाराने संयुक्तरीत्या सोडवावयाचा असल्यामुळे लोकांनी त्यात मोठया प्रमाणावर सहभाग घेतला. तसेच पाण्याची तळी, तलाव निर्माण केले. त्यामुळे बऱ्याच ठिकाणचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यश लाभले.

दुष्काळात जनावरांच्या बाबतीत नाममात्र दराने गुरांसाठी चारा–वैरण देण्याची सोय दरबारामार्फत केली. 'ज्याला आपली जनावरे पोसण्याचे सामर्थ्य नाही, त्यानी ती संस्थानच्या थट्टीत पाठवावीत तेथे ती पाळली जातील आणि जेव्हा मालकाला ती न्यावीसी वाटतील त्यावेळी त्यानी ती परत न्यावीत' राजर्षी शाहू महाराजांनी अशी आज्ञा केली. याशिवाय माफक दराने गवत विकण्यास सुरूवात केली. संस्थानची जंगले चराईसाठी खुली करण्यात आली.

राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळ निवारण कार्यालय उघडून त्याद्वारे गावागावातील दुष्काळाची माहिती मिळविली. दुष्काळी कामाना प्राधान्य दिले. त्यामध्ये जुने रस्ते दुरूस्त करणे, नवीन रस्ते बांधणे, पूल बांधणे, विहीरी खोदणे, तलाव बांधणे इत्यादी कामे सुरू केली.

दुष्काळ काळात राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्याबरोबरच नोकरदार वर्गाकडेही लक्ष दिलेले दिसून येते. दरबारातील नोकरांना त्यांनी दुष्काळी भत्ता दिला. या भत्त्याची सांगड मात्र जोंधळयाच्या दराशी घातली होती. जेवढया प्रमाणात जोंधळयाच्या दरात वाढ होते. तेवढया प्रमाणात भत्त्यात वाढ केली जात होती.[४३]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात दुष्काळावर उपाययोजना करण्यासाठी अनेक कल्याणकारी कामे काढली. त्यामुळे लोकांनाही त्याचा फायदा झाला. मुंबई इलाख्यात दुष्काळाने अगणित 'भूकबळी' घेतले, परंतु करवीर राज्यात एकही भूकबळी पडला नाही. याचे सर्व श्रेय राजर्षी शाहू महाराजांना जाते. संस्थानालाही त्याचा फार मोठया प्रमाणावर उपयोग झाला.

## प्लेगवर उपाययोजना

सन १८९८ व १८९९ मध्ये करवीर नगरीत प्लेगने मोठया प्रमाणात सतावले होते. त्यावेळी करवीरनगरीत ३१,१३१ लोक प्लेगच्या रोगाने ग्रस्त झाले होते. प्लेगच्या निवारणासाठी त्यांनी ठिकठिकाणी हॉस्पिटले काढली. प्लेग रोगातून खात्रीने वाचवू शकतील अशी औषधे त्याकाळात नव्हती. त्यामुळे रोग्याला घरातून हलविल्याशिवाय घरातील माणसांना इतरत्र हलविता येणार नाही. तसेच घरही निर्जतुक करता येणार नाही. त्यासाठी हॉस्पिटलचा आधार घेतला जात होता. तेव्हा रोग्यांना दरबाराच्या आदेशानुसार हॉस्पिटलमध्ये न्यावे लागत होते. या दरबाराचा आदेश पाळला नाही तर त्या गावातील ग्रामाधिकाऱ्याची वतने काढून घेतली जातील असेही त्यांनी सांगितले होते. त्यामुळे आदेशाचे पालन केले जात होते. याशिवाय राजर्षी शाहू महाराजांनी प्लेगचा प्रादुर्भाव झालेल्या गावातील लोकांनी रानोमाळात वस्ती करावी. गावाबाहेर झोपडया बांधाव्यात असा आदेश काढला. कोल्हापूर शहरात प्लेगने प्रवेश केला त्यावेळी राजर्षी शाहू महाराजांनी तातडीची उपाययोजना केली. करवीरनगरीच्या प्रवेशद्वारानजीक निरनिराळया दिशांच्या वेशीजवळ मोक्याच्या जागी त्यांनी क्वारंटाईन बसविले. त्याद्वारे आत व बाहेर जाणाऱ्या लोकांची वैद्यकीय तपासणी होऊ लागली. रेल्वे स्टेशनवर क्व ारटाईन बसविले. करवीरनगरीच्या परिसरातील कोटीतीर्थाजवळ प्लेगचे खास हॉस्पिटल सुरू केले. डॉ.बोमानजी दोराबजी यांची नगरीचे खास वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली. प्लेग हॉस्पिटल्स व प्लेगाच्या छावण्या यासाठी आवश्यक असलेला डॉक्टर, परिचारिका, आया, इतर पुरूषवर्ग इत्यादी नोकरवर्ग राजर्षी शाहू महाराजांनी नियुक्त केला. ४ सप्टेबर १८९९ रोजी भास्करराव विठोजी जाधव यांची प्लेग उपायुक्त म्हणून खास नियुक्ती केली. त्यामुळे प्लेग आयुक्त कर्नल रे यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांना अवलंबून राहावे लागत होते ते टळले.[४४]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी प्लेगच्या निवारणासाठी खास उपाययोजना केल्याने करवीरनगरीत नाममात्र प्लेगबळी गेले होते. मुंबई इलाख्यापेक्षा करवीरनगरीत ही संख्या अत्यल्प होती.

**वसतिगृहाची स्थापना:-**

राजर्षी शाहू महाराज यांनी करवीरनगरीत अनेक वसतिगृहे उघडली त्या पाठीमागचा उद्देश सामाजिक उच्चनीच भावनेची धार बोथट करणे आणि जे आपल्या समाजाच्या उद्धारासाठी अशी वसतिगृहे व शाळा काढतील असे कार्यकर्ते तयार करणे हा होय.[४५]

**मराठा वसतिगृह**

राजर्षी शाहू महाराजांनी न्यायमूर्ती रानडे व गोपाळ कृष्ण गोखले या दोन विचारवंतांच्या सल्ल्यावरून मराठा वसतिगृहाची स्थापना करण्याचे ठरविले. शाहू महाराज हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष असल्यामुळे शिक्षण प्रसारासंबंधीच्या त्यांच्या भावना तीव्र होत्या. त्यामुळेच त्यांनी राजनैतिक प्रतिनिधी सर डब्ल्यू.टी.मॉरिसन यांच्या हस्ते १८ एप्रिल १९०१ रोजी मराठा वसतिगृहाचे उद्घाटन करण्यात आले. या वसतिगृहाचे नामकरण 'महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग इन्स्टिटयूशन' असे करण्यात आले. राजर्षी शाहू महाराज यांचे जनक वडील जयसिंगराव तथा आबासाहेब घाटगे यांना महाराणी व्हिक्टोरिया हिने आपल्या दरबारात मानसन्मानाने वागविले होते. राजर्षी शाहू महाराजांना महाराज ही पदवी दिली होती. तसेच तिच्या कारकिर्दीत सर्वसामान्य जनतेला शिक्षणाचे दरवाजे खुले झाले होते. शेवटच्या या अभूतपूर्व सत्कृत्याबद्दल वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिक्षण वंचितासाठी उघडलेल्या वसतिगृहास तिचे नाव देऊन राजर्षी शाहू महाराजांनी औचित्य साधले.[४६]

हे वसतिगृह मराठयासाठी निर्माण केले असले तरी त्यामध्ये इतर जातीतील मुलांनाही प्रवेश दिला जात होता. वसतिगृह स्थापनेनंतर प्रारंभी या वसतिगृहात दहा मुसलमान विद्यार्थी द्यावेत असा आदेश राजर्षी शाहू महाराजांनी सन १९०२ मध्ये दिला होता. १९१३-१४ च्या अहवालानुसार या वसतिगृहात मराठयाबरोबरच गवळी, माळी, भोई आणि धनगर इत्यादी जातीचे विद्यार्थी होते. सन १९०१ मध्ये केवळ पाच ते दहा विद्यार्थ्यावर सुरू झालेल्या या वसतिगृहात १९२२ मध्ये ९२ विद्यार्थी राहत होते. या वसतिगृहात मराठयांपासून ते महारापर्यंतचे समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थी राहत असल्याने हे जातीनिरपक्षेतेचे उदाहरण आहे. राजर्षी शाहू महाराज वारंवार या वसतिगृहास भेट देत असत.[४७]

## जैन वसतिगृह

राजर्षी शाहू महाराजांनी मराठा वसतिगृहाबरोबरच जैन वसतिगृह स्थापन केले. निपाणीजवळ स्तवननिधी तीर्थाच्या ठिकाणी जैन धर्म परिषद पार पडली होती. या धर्मपरिषदेस राजर्षी शाहू महाराजांच्या आदेशानुसार रायबागचे पाटील गेले होते. या जैन परिषदेने कोल्हापूर येथे एक जैन वसतिगृह उघाडण्याचे ठरविले आणि एप्रिल १९०१ मध्ये सुरूही केले. या वसतिगृहाचे नाव 'दिगंबर जैन वसतिगृह' असे ठेवण्यात आले. १९०५ मध्ये या वसतिगृहाची इमारत बांधेपर्यत विद्यार्थ्यांची सोय जैन मंदिरात करण्यात आली होती. त्यावेळी केवळ सहाच विद्यार्थी होते. दक्षिण महाराष्ट्र जैनसभेच्या प्रेरणेतून हे वसतिगृह चालविले जात होते. जैन वसतिगृहाला इमारत नव्हती. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी व्हिक्टोरिया मराठा वसतिगृहासमोरील प्रशस्त विस्तीर्ण चौफाळा माळ दक्षिण महाराष्ट्र जैन सभेस वसतिगृहासाठी दिला. या गोष्टीस मराठयांनी विरोध केला. त्यावेळी राजर्षी शाहू महाराजांनी स्पष्ट केले की, 'मी केवळ मराठयांचा राजा नव्हे, तर साऱ्या जनतेचा राजा आहे.' राजर्षी शाहू महाराजांनी राजनैतिक प्रतिनिधींना पत्र पाठविले व या वसतिगृहासंबंधीचा वाद मिटविला. या वसतिगृहाची इमारत तयार झाल्यावर विद्यार्थी संख्या ६ वरून ४० झाली. या वसतिगृहाने १९०८-०९ पासून खास मुलींसाठी एक विभाग उघडला. या मुलींच्या वसतिगृहाच्या विभागास 'श्रमिकाश्रम' असे नाव देण्यात आले. यामध्ये १६ विद्यार्थिनी होत्या.[४८] या वसतिगृहातील दोन विद्यार्थ्यांना युरोप खंडातील इटली देशात पाठविण्यात आले होते.[४९] अशाप्रकारे जैनधर्मीयापैकी परदेशी प्रयाण केलेले जैन वसतिगृहाचे दोन विद्यार्थी हे पहिलेच उदाहरण होय.

## मुसलमान वसतिगृह

सन १९०२ मध्ये राजर्षी शाहू महाराज विलायतेहून परत आल्यावर मोहमेडन समाजाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला होता. याच वेळी राजर्षी शाहू महाराजांनी मोहमेडन समाजातील लोकांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे स्पष्ट केले. जर मुसलमान समाज विद्यार्थ्यासाठी वसतिगृह काढण्याचा विचार करील तर आपण सर्वतोपरी साहय करू, असे जाहीर अभिवचन दिले. मुसलमान समाज हा मागासलेला आहे. त्यांच्यात शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून त्यांनी मुसलमान बांधवापैकी काहीजण शिकल्याशिवाय समाज संघटन व वसतिगृह स्थापना या गोष्टी होणे शक्य नाही. लागलीच राजर्षी शाहू महाराजांनी व्हिक्टोरिया

मराठा वसतिगृहात १० मुसलमान विद्यार्थ्यांना मुसलमान स्थापन होईपर्यंत मुक्त प्रवेश देण्याची राजज्ञा काढली. ब्रिटिश हद्दीतील, कानडी प्रदेशातील अथणी गावचा एक मुसलमान मुलगा शेख युसूफ अब्दुल्ला हा पुढे मामलेदार झाला. तो पुढे प्रांत, ट्रेझरी ऑफिसर आणि शेवटी असिस्टंट दिवाणही झाला. पदवीधर होताच या शेख अब्दुल्लावर राजर्षी शाहू महाराजांनी समाज संघटन करून मुसलमान समाजास शिक्षणाभिमुख करण्याची कामगिरी सोपविली.[५०]

पुढे राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने मुस्लिम समाजाच्या प्रमुखांनी १५ नोव्हेंबर १९०६ रोजी 'दि. मोहमेडन एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली व तिच्यावतीने मोहमेडन वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी राजर्षी शाहू महाराजांनी या वसतिगृहासाठी कोल्हापूर येथील दसरा चौकालगत २५००० चौरस फूट जागा त्यांनी दिली. तसेच या वसतिगृहाच्या इमारतीस फंडास ५५०० रूपये देणगीही दिली. वार्षिक उत्पन्न ६७४५ रूपये येत असलेल्या जमिनीही दान दिल्या. याशिवाय संस्थेला वार्षिक २५० रूपये अनुदान मंजूर केले. याशिवाय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या बहाल करण्यासाठी वार्षिक दोनशे रूपयाची देणगीही दिली. राजर्षी शाहू महाराजांचे मित्र भावनगरचे भावसिंगजी महाराज करवीरी आले होते. त्यांनी वसतिगृहास भेट दिली आणि शंभर रूपयांची देणगी दिली.[५१]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे ३१ जानेवारी १९२० रोजी मुसलमान वसतिगृहाच्या इमारतीचा कोनशिला समारंभ मोठया थाटामाटाने साजरा केला. १९२२ मध्ये या वसतिगृहात ६० विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांमध्ये काही मराठे व काही अस्पृश्यही होते. किंग एडवर्ड मोहमेडनच्यावतीने या वसतिगृहाच्या आवारात 'जवाहरलाल नेहरू उर्दू मराठी हायस्कूल' या नावाचे एक हायस्कूलही चालविले जाते.[५२]

**लिंगायत वसतिगृह**

कोल्हापूरजवळ सिद्धगिरी या तीर्थस्थळी फेब्रुवारी १९०७ मध्ये लिंगायत परिषद भरली होती. या परिषदेस राजर्षी शाहू महाराज आवर्जुन उपस्थित होते. एवढेच नव्हे तर त्यांनी वसतिगृह काढण्याबाबत कळकळीचे आवाहन केले. त्यांच्या या आवाहानाचा लिंगायत समाजातील लोकांच्यावर इतका परिणाम झाला होता की, या परिषदेत लिंगायत वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. रंकाळा तलावाच्या पश्चिम तीरावरील 'गोलकर बंगला' राजर्षी शाहू महाराजांनी लिंगायत सोसायटीस दिला. अशाप्रकारे 'वीरशैव लिंगायत

वसतिगृह' १९०७ साली सुरू केले. प्रारंभी या वसतिगृहात १६ विद्यार्थी होते. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणने या वसतिगृहासाठी कायम निधी जमविण्याच्या कार्याला जोरदार सुरूवात केली. ४०, ००० रूपयाचा निधी जमला होता.[५३]

**मिस क्लार्क हॉस्टेल (१९०८)**

कोल्हापूर म्हणजे विद्यार्थी वसतिगृहाची माता असे म्हणतात. असे म्हणण्यात राजर्षी शाहू महाराजांना आनंद व अभिमान वाटत असे. मागासलेल्या समाजात उच्च शिक्षणाविषयी आस्था निर्माण करण्याची एक महत्त्वाची उपाययोजना होती आणि ती म्हणजे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या राहण्या-जेवणाच्या सोयीसाठी वसतिगृहे निर्माण करणे आणि या विचारातून त्यांनी १४ फेब्रुवारी १९०८ रोजी मिस क्लार्क हॉस्टेलची स्थापना केली. येथील जैन बोर्डिगात दिवाण बहाद्दूर आण्णासाहेब लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली १४ फेब्रुवारी १९०८ रोजी सभा भरून विद्याप्रसारक मंडळ नावाची संस्था स्थापन केली. जिच्या विद्यमाने राजर्षी शाहू महाराजांच्या इच्छेप्रमाणे वसतिगृहे काढण्याचे ठरले. नामदार भास्करराव जाधव, रावबहाद्दूर महादेव डोंगरे, गणपतराव कदम, श्रीपतराव शिंदे, खंडेराव बागल यांनी बोर्डिंगच्या स्थापनेच्यावेळी व पुढेही बरेच परिश्रम घेतले. राजर्षी शाहू महाराजांनी बोर्डिंगास रविवार पेठेतील २०० X १५० जागा खोल्यांच्या इमारतीसह दिली. ते संस्थेस दरवर्षी ५५ रूपये ग्रँट देत असत.

मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या मिस व्हायलेट क्लार्क अस्पृश्यता निवारणासाठी अंत:करणपूर्वक प्रयत्न करीत असत. त्यांनी हॉस्टेलच्या मदतीसाठी एक नृत्याचा प्रयोग करून त्याचे आलेले ५०००/- रूपयांचे उत्पन्न हॉस्टेलला दिले या मानवतावादी कुमारिकेची ही तळमळ पाहून राजर्षी शाहू महाराजांनी तिचे नाव हॉस्टेलला दिले. राजर्षी शाहू महाराजांच्या मृत्यूसमयी २२ विद्यार्थी या वसतिगृहाचा फायदा घेत होते. संस्थेच्या सन १९२२ च्या अहवालात संस्थेच्या उद्देशात दलित वर्गासाठी दलितातूनच सुशिक्षित व सुधारणावादी पुढारी निर्माण व्हावेत. असाही एक उद्देश देण्यात आला आहे. तो इतर मागासवर्गीय वसतिगृहांना अनुकरणीय आहे. बोर्डिंगमधील एक विद्यार्थी दत्तोबा संताराम पोवार हे कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीचे चेअरमन होते.[५४]

**इतर समाजातील वसतिगृह**

२४ डिसेंबर १९०८ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी 'दैवज्ञ शिक्षण समाजाची' स्थापना झाली. त्याद्वारे सन १९१४ मध्ये सोनार समाजाचे वसतिगृह स्थापन केले गेले. शिंपी समाजातील विद्यार्थ्यांसाठी २ एप्रिल १९११ रोजी 'श्रीनामदेव वसतिगृहा'ची स्थापना करण्यात आली. कायस्थ प्रभू समाजाचे 'रावबहाद्दूर रघुनाथ व्यंकोजी सबनीस, चांद्रसेनीय कायस्थ प्रभू वसतिगृह' सुरू केले. वैश्य समाजाचे वसतिगृह(१९१८), ढोर-चांभार वसतिगृह(१९१९), शिवाजी वैदिक वसतिगृह(६ जुलै १९२०), आर्यक्षत्रिय(जिनगर) विद्यावर्धक समाजाचे वसतिगृह (१९२०) श्री.प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंग हाऊस'(१ जुलै १९२०) इत्यादी प्रत्येक जातीधर्माची वसतिगृहे कोल्हापूर शहरात सुरु केली होती.[५५] त्यातूनच शैक्षणिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला होता.

**राजर्षी शाहू महाराजांचा आरक्षणविषयक जाहिरनामा(१९०२)**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील मागासलेल्या जाती-जमातीच्या लोकांसाठी ५० टक्के राखीव जागा ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय २६ जुलै १९०२ रोजी घेऊन तो प्रत्यक्ष राबविण्यास सुरूवात केली. राखीव जागाचा जाहिरनामा काढणारा हा पहिला दूरदृष्टीचा राजा होता. ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारशी या जातींना फक्त आरक्षण नव्हते. इतर सर्व जातींना राखीव जागा देण्यात आल्या होत्या.[५६]

कोल्हापूर संस्थानातील धर्मकारणात व प्रशासनात ब्राम्हणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. आता त्यांच्या धार्मिक वर्चस्वाबरोबरच या ऐहिक वर्चस्वासही महाराजांनी शह देण्याचे ठरविले. या जाहिरनाम्याच्या विरोधात विजापूरकरांचे समर्थ पत्रक, लोकमान्य टिळकांचे केसरी पत्रकातून टिका होऊ लागली. लोकमान्य टिळक केसरीमध्ये म्हणतात, हजारो रूपये खर्च केले तरी त्याला मराठा पत्राचा विरोध नाही. तथापि एकाच जातीच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे याला आपला विरोध आहे.

**राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण प्रसाराचे कार्य**

महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे धोरण स्वीकारले होते. इ.स.१९०८ त्यांनी भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, बागल, शिंदे इत्यादी आपल्या निकटवर्ती लोकांना पुढे करून कोल्हापूरमध्ये त्यांनी

दलितांचे एक हॉटेल काढले होते. त्यासाठी दलित मानलेल्या जातीत 'विद्याप्रसारक मंडळी' नावाची संस्थाही स्थापन केली होती. भास्करराव जाधव त्यांचे प्रमुख होते. राज्यारोहणाच्या प्रसंगी(१८९४) संस्थानात दलितांच्या ५ शाळा होत्या. त्यामधील विद्यार्थी संख्या १६८ होती. १९०७–०८ साली शाळांची संख्या १६ व विद्यार्थी संख्या ४१६ झाली. १९१२ साली शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ इतकी झाली. संस्थानात महार, मांग, चांभार, ढोर या प्रमुख जाती होत्या. त्यांची संस्थानातील लोकसंख्या या शतकाच्या प्रारंभी एक लाखाहून अधिक होती. अशा लोकसंख्येत हे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प वाटत असले तरी लक्षणीय होते. त्याचे श्रेय राजर्षी शाहू महाराजांच्या दलितविषयक उद्धार शैक्षणिक धोरणास जाते.[५७]

त्यांनी अस्पृश्य लोकांचा प्रामुख्याने उद्धार केला. शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी सर्व जाती–जमातीसाठी शाळा काढल्या. वसतिगृहाची निर्मिती केली, अस्पृश्य लोकांसाठी अनेक सवलती देऊन त्यांनी आदेशांची अमंलबजावणी करून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. अस्पृश्याना मोफत शिक्षण, अस्पृश्यता निवारणाचे कार्य, गुलामगिरी पद्धत, हजेरी वेठबिगार पद्धत बंद, महार वतन खालसा केली. राजर्षी .शाहू महाराजांनी सामाजिक विषमता नष्ट करून सामाजिक समता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये प्रामुख्याने अस्पृश्य वर्गाचा उद्धार केल्याचे दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यासाठी कोल्हापूरमध्ये वेगवेगळया जातींच्या विद्यार्थ्यासाठी वसातिगृहे स्थापन केली. त्यामध्ये अस्पृश्यांचे वसतिगृह सुरू करण्यात आले. त्यासाठी 'अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्याप्रसारक मंडळी' नावाची संस्थाही स्थापन केली. त्याचे भास्करराव जाधव हे प्रमुख होते. इ.स.१९०७–०८ मध्ये अस्पृश्य शाळांची संख्या १६ व विद्यार्थ्यांची संख्या ४१६ होती. पुढे इ.स.१९१२ मध्ये अस्पृश्य शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ होती. अस्पृश्यामध्ये महार, मांग, चांभार व ढोर या प्रमुख जाती होत्या. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा इ.स.१९१२–१३ च्या कोल्हापूर संस्थानच्या प्रशासकीय अहवालात स्पष्ट उल्लेख केलेला दिसून येतो. पददलित जाती–जमातीना छत्रपती महाराजांनी ज्या विशेष सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या आणि अस्पृश्यामध्ये शिक्षण प्रसार करण्यासाठी स्थानिक लोकांच्या संघटनेने जे कमालीचे परिश्रम घेतले. त्याचा संकलीत

परिणाम म्हणजे अस्पृश्यांच्या शिक्षण प्रसार कार्याची झालेली लक्षणीय वाढ होय. अमानुष वागणूकीचे दुर्दैवी बळी बनलेल्या अतिशय अतिशूद्र धर्म बांधवांना अल्प प्रमाणात का होईना सहानुभूतीचा आणि सहकार्याचा हात देण्यासाठी उच्च वर्णीय लोक पुढे येत आहेत, हे उच्च वर्णीयांच्या मनाला चिकटलेली अपसमाजाची किल्मिषे करवीर दरबाराच्या शहाणपणाच्या व उदार धोरणाच्या प्रभावाने विरघळून जात असल्याचे द्योतक होय.[५८]

### दलितासाठी रात्र शाळा

दलित समाजातील शिक्षण प्रसारासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आदेश केला. १९०६ च्या आदेशात त्यावेळी कोल्हापूरात चांभार, महार इत्यादीसाठी एक 'रात्रीची शाळा' होती. २८ नोव्हेंबर १९०६ च्या आदेशान्वये ती कायम केली. ४ ऑक्टोबर १९०७ च्या एका आदेशान्वये कोल्हापूरातील चांभार व ढोर समाजातील मुलींच्या शाळेसाठी मंजूरी देण्यात आली. तसेच त्या शाळेसाठी दरसाल रू.९६ खर्चाची तरतूद शाहू स्मारक संस्थानच्या स्त्री शिक्षणाच्या अंदाजपत्रकात करण्यात आली.[५९]

### दलितांना मोफत शिक्षण(२४ नोव्हेंबर १९११)

२४ नोव्हेंबर १९११ रोजी सर्वात महत्त्वाचा आदेश काढला या आदेशानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले याशिवाय अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना खास शिष्यवृत्त्या दिल्या जाऊ लागल्या. ७ एप्रिल १९१९ च्या एका आदेशान्वये अस्पृश्य लोकांची दैन्यावस्था ध्यानी आणून त्यांच्या शिक्षणास उत्तेजन द्यावे. या हेतूने महाराजांनी त्यांना पुस्तके, पाटया, पेन्सिली मोफत देण्यासाठी अडीच हजार रूपये मंजूर केले. त्याच महिन्यात महाराजांनी सुरू केलेल्या तलाठी वर्गातील अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी दरमहा आठ रूपये प्रमाणे खास शिष्यवृत्त्या जाहीर करण्यात आल्याचे दिसून येते.[६०]

### दलितांसाठी चालणाऱ्या शाळामधील दलित मुलांची संख्या

| वर्ष | शाळा | मुले | मुली |
|---|---|---|---|
| १९००-१९०१ | ६ | - | - |
| १९०६-०७ | १२ | - | - |
| १९०९-१० | २२ | - | - |
| १९१२-१३ | २७ | - | - |
| १९१७-१८ | २२ | ३७८ | २३ |
| १९१८-१९ | १९ | ४४५ | ३३ |

(संदर्भ - कोल्हापूर संस्थानचा सर्वसाधारण प्रशासन अहवाल- १९००-१९०१ ते १९१८-१९)

## दिल्ली दरबार पाटील शाळा–

सन १९११ च्या दिल्ली दरबारच्या स्मृतीप्रित्यर्थ राजर्षी शाहू महाराजांनी एक पाटील शाळा काढली. गावचा प्रमुख पाटील होता. परंतु तो अशिक्षित असे तर कुलकर्णी हा लिहिता वाचता येणारा अधिकारी होता. त्यामुळे गावच्या पाटलाला कुलकर्ण्यांच्या आधारावर रहावे लागत होते. तेव्हा ब्रिटिशांच्या कारभाराला कागदपत्रांचा आधार होता. गाव पाटलाचा आणि कारभार कुलकर्ण्यांचा अशी अवस्था झालेली होती. त्यामुळे कुलकर्णी त्याचा गैरफायदा घेत असे यावर उपाय म्हणून पाटलाला पाटीलकीचे शिक्षण देण्याची शाळा राजर्षी शाहू महाराजांनी काढण्याचे ठरविले. या शाळेत जमीन महसूल व मुलकी महसूल यासंबंधी साद्यंत कायदेशीर माहिती, फौजदारी काम, गुन्हेगाराबद्दलच्या कायदे–कानूचे ज्ञान गावपातळीवर त्यासबंधी करावयाचे काम, गावाचे हिशेब म्हणजे गावाची जमाबंदी, गावाचे आरोग्य, हे विषय होते. या शाळेचा हेतू गावच्या कारभाराची गावप्रमुख पाटलास सशास्त्र ओळख करून देणे, संबंधी कायद्याचे कर्तव्याचे शिक्षण देणे व स्वतःच समर्थपणे ग्रामकारभार करण्यास त्यास पात्र करणे हा होता. 'दिल्ली दरबार मेमोरियल पाटील स्कूल' स्थापन करण्याचा निर्णय राजर्षी शाहू महाराजांनी २ फेब्रुवारी १९१२ रोजी घेतला आणि ही शाळा प्रत्यक्षात १२ मे १९१२ रोजी सुरू झाली.[६१]

## सत्यशोधक शाळा

राजर्षी शाहू महाराज यांनी जुलै १९१३ मध्ये शाळा स्थापन केली. ही शाळा सुरू करण्यापाठीमागचा उद्देश हा होता की, ब्राम्हण व पंडित वर्गाला वाटत होते की, आमच्याशिवाय कोणतेही धार्मिक विधी केले तर ते मान्य होत नाहीत. यावर ब्राम्हणेत्तर मंडळींनी आपल्यातीलच लोकांकडून लग्न, मुंजी, श्रावणी आदी सर्व संस्कारविधी व पूजा करून घेऊ लागले. 'ते धर्मविधी कसे पार पाडावेत' याचे सशास्त्र शिक्षण देणारी सत्यशोधक शाळा राजर्षी शाहू महाराजांच्या पाठिंब्याने सुरू झाली. अशाप्रकारे ही शाळा अनुदान पात्र पुरोहितशाळा काढली होती. इतर शाळेपेक्षा या शाळेचे स्वरूप वेगळे होते. धार्मिक विधीचे प्रशिक्षण देणे हे या शाळेचे कार्यक्षेत्र होते.

बडोदा दरबाराने एक हुकूम काढला की, पुरोहितांच्या शाळेचे अधिकृत प्रमाणपत्र असल्याशिवाय कोणालाही पुरोहिताचे काम करता येणार नाही. जर कोणी प्रमाणपत्र नसताना

पुरोहिताचे काम करीत असेल तर त्यास २५ रूपये दंड भरावा लागेल. त्यामुळे बडोदा व महाराष्ट्र येथून अनेक ब्राम्हणेत्तर तरूण पुरोहिताचे शाळेत दाखल झाले होते. या शाळेतून अभ्यासक्रम पुर्ण करून जे ब्राम्हणेत्तर तरूण परत गेले त्यांनी आपापल्या भागात धर्मविधी पार पाडण्यास सुरूवात केली.[६२]

### प्राथमिक शिक्षण

समाजातील निरक्षरता नष्ट करण्यासाठी सन १९१५–१६ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीचे शिक्षण देण्याचे ठरविले. त्यासाठी मोफत सक्तीचे शिक्षण योजना तयार करण्याच्या कार्यास चालना दिली. इचलकरंजी व विशाळगड या दोन जहागिऱ्यामध्ये 'सक्ती–शिक्षणाचा' प्रयोग सुरू झाला होता. त्याचे त्यांनी निरीक्षण केले. त्यावेळी त्या शाळेत फारसे विद्यार्थी आलेले नव्हते. याचे कारण पालकांचे अज्ञान व रूढ समजुती हे होय.[६३] लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी सत्यशोधक जलशाचा वापर सुरू केला. या जलशातून लोकशिक्षणाचे अभूतपूर्व कार्य करून सामाजिक परिवर्तनाचे चक्र फिरविले व महाराष्ट्राला कायमचे ऋणी करून ठेवले. अशाप्रकारे सत्यशोधक जलशांनी ग्रामीण भागातील लोकांच्या लोकशिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर केला. तसेच प्राथमिक शिक्षणाला चालना देणारा दुसरा घटक म्हणजे प्राथमिक शिक्षकाच्या पगार श्रेणीत केलेली वाढ होय. त्यामुळे शिक्षक उत्साही राहून तो आपले कार्य चांगल्याप्रकारे करू लागला.[६४]

### मोफत सक्तीचे शिक्षण

मानवी समाजात चैतन्य निर्माण करणारी संजीवनी म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांनी करवीर राज्यात मोफत सक्तीचे शिक्षण सुरू केले. ३० सप्टेबर १९१७ रोजी या शिक्षणाच्या मोहिमेस सुरूवात झाली. मार्च १९१८ पर्यत या खात्याने एकूण २७ सक्ती शाळा उघडल्या. पहिली सक्ती शाळा चिखली, पेटा करवीर येथे काढण्यात आली. या शाळेचे उद्‌घाटन १८ मार्च १९१८ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते झाले.[६५] या शाळांची संख्या १९१८–१९ मध्ये २७ वरून ९५ वर गेली. या शाळांच्या स्थापनेमुळे ७५,८५४ लोकसंख्येच्या ग्रामीण भागात मोफत सक्ती शिक्षण योजनेखाली आला. या शाळातील एकूण पटसंख्या ४६३१ होती आणि त्यावर झालेला खर्च ५८९६ रूपये होता.[६६]

शाळांची वाढती संख्या लक्षात घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी एका नव्या अध्यापक विद्यालयाची तातडीने उभारणी केली. सक्तीचे शिक्षणाचे कार्यक्षेत्र करवीर शहर व तालुका यापुरते मर्यादित होते. ते संबंध करवीर राज्यभर पसरले. ५०० लोकवस्तीच्या वरची गावे सक्ती शिक्षण शाळेसह एकूण प्राथमिक शाळांची संख्या ५५९ च्या वर गेली. तर विद्यार्थी संख्या ३१.९६ झाली.[६७]

**शालान्त परीक्षा –**

मुंबई विद्यापीठाकडून मॅट्रीक परीक्षेचे केंद्र कोल्हापूरास राजर्षी शाहू महाराजांनी घेतले. परीक्षेला येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहणे, भोजन यांची मोफत सोय व्यवस्था केली. त्यांची दिवाबत्तीची व परीक्षा केंद्रापर्यत जाण्यासाठी वाहनांची सोय केली. परीक्षेसाठी एक सुरेख परंतु भव्य मंडप खासबाग मैदानावर उभारला. परीक्षार्थी व परीक्षक व्यवस्थापक आदी सर्वाच्या दृष्टीने सोयीचे व सुखकारक होईल अशीच सर्व व्यवस्था राजर्षी शाहू महाराजांनी केली हा सर्व खर्च राजर्षी शाहू महाराजांच्या खाजगी खात्याने केला.[६८]

**स्त्रीशिक्षण**

त्या काळात स्त्रियांचे विवाह हे लहान वयातच होत होते. तसेच उच्च वर्गीयामध्ये पडदा पध्दत होती. या प्रथा जर नष्ट करावयाच्या असतील तर स्त्रीयांना शिक्षण देणे आवश्यक आहे. तेव्हा स्त्रीशिक्षण सुरू केले. स्त्रीया शिकल्यावर त्या मुलांच्या संगोपनाबरोबरच कौटुंबिक स्वावलंबनास ही हातभार लावतील असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते.[६९] राजर्षी शाहू महाराजांच्या काळात मुलींच्या शिक्षणाची पायाभरणी सुरू झाली. ट्रेंड शिक्षिकाही तयार होऊ लागल्या होत्या. त्यांच्या स्त्रीशिक्षण समर्थन व प्रोत्साहनामुळे रखमाबाई केळवकर, डॉ.कृष्णाबाई केळवकर, यमुनाबाई व द्वारकाबाई केळवकर यांचे आयुष्य आकारास आले. रखमाबाईचे पती वसईचे ते डॉक्टर होते. रमाबाई रानडे, भांडारकर, रावबहाद्दूर पटवर्धन, आगरकर, यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले. १८८७ मध्ये केसरीचे संपादक पद लोकमान्य टिळकांच्याकडे आले. तेव्हा पुण्यातील मुलींच्या शाळेवर टिळकांनी टिकेची झोड उठविली. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांची सून इंदुमती राणीसाहेब(युवराज शिवाजीच्या विधवा पत्नी) यांनाही शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. त्या पुढे डॉक्टर झाल्या.[७०] त्यांनी राजाराम कॉलेजातील मुलींना शिक्षण फी माफ केली होती.[७१]

**राजर्षी छ.शाहू महाराजांच्या कारकीर्दीतील करवीर राज्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख**

**शाळा असलेल्या खेडयांची संख्या**

| अ.क्र. | वर्ष | खेडी |
|---|---|---|
| १. | १८९३–९४ | १९८(पैकी ३० नाममात्र) |
| २. | १९०९–१० | २९३ |
| ३. | १९१०–११ | ३०१ |
| ४. | १९१३–१४ | ३६९ |
| ५. | १९२१–२२ | ४७६ |
| ६. | १९२२–२३ | ५५९ |

(संदर्भ :– कोल्हापूर आणि एस.एम.सी. संस्थानांचा शिरगणती अहवाल, १८९१ व १९२१)

**लोकसंख्येशी विद्यार्थी संख्येचे प्रमाण**

१८९४ मध्ये १.६२ टक्के, १९११–१२ मध्ये १.८९ टक्के आणि १९२१–२२ मध्ये ३.७२ टक्के.

**साक्षरतेत झालेली वाढ**

| अ.क्र. | वर्ष | लोकसंख्येशी साक्षरांचे प्रमाण टक्के | पुरूषसंख्येशी साक्षर पुरूषांचे प्रमाण टक्के | स्त्रीसंख्येशी साक्षर स्त्रियांचे प्रमाण टक्के | इंग्रजी बोलू शकणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १८९३–९४ | २.८० | ५.६० | ०.१० | ३१ |
| २. | १९२१–२२ | ४.४० | ७.४५ | ०.३५ | ३६०० (पैकी २५० स्त्रिया)[७२] |

(संदर्भ :– कोल्हापूर आणि एस.एम.सी. संस्थानांचा शिरगणती अहवाल, १८९१ व १९२१)

करवीर राज्यात शाहूकालात शैक्षणिक क्षेत्रात संख्यात्मक बदल किती झाला होता. याची माहिती पुढीलप्रमाणे– सन १८९४ साली राज्यातील एकूण विद्यार्थी संख्या १०,८४४ तर १९२१–२२ साली ती संख्या २७,८३० होती. इ.स.१८९४ मध्ये ब्राम्हणेत्तर विद्यार्थी संख्या ८०८८ तर १९२१–२२ साली ती २१,०२७ आणि अस्पृश्य विद्यार्थी संख्या १८९४ साली ही संख्या २३४ व १९२१–२२ मध्ये २१६२ होती. ब्राम्हणेत्तर व अस्पृश्य समाजामध्ये किती झपाटयाने आणि किती मोठया प्रमाणावर बदल झाला, हे सहज दिसून येते. १८९४ साली ब्राम्हण विद्यार्थी संख्या २५२२ होती. ती १९२२ मध्ये २७२२ झाली. म्हणजे सर्व ब्राम्हण मुले पूर्वीपासून शिक्षण घेत असल्यामुळे २८ वर्षातही विद्यार्थी संख्येत फारसा फरक पडला नाही.

जो अल्पसा फरक पडला आहे. तो लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे होय.

### राज्याबाहेरील शैक्षणिक कार्य

राजर्षी शाहू महाराजांनी करवीर सोबतच नाशिक येथे १९१३ मध्ये मराठा वसतिगृहाची स्थापना केली. नाशिक येथेच नाभिक वसतिगृहाची स्थापना केली. पंढरपूर येथे एक मराठा व एक अस्पृश्य अशी दोन वसतिगृह स्थापन करण्यात आली. धारवाड शहरात लिंगायत, मुसलमान, भावसार क्षत्रिय(शिंपी) व मराठा इत्यादी समाजाची वसतिगृहे स्थापन केली. अहमनगर येथे आपले वडील छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मृती चिरंतन राहण्यासाठी त्यांच्या नावे एक वसतिगृह काढले. त्याचे नाव 'छत्रपती चौथे शिवाजी महाराज बोर्डिंग हाऊस अहमदनगर' हे होय.[७३]

नागपूर येथे ३० मे १९२० रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यासाठी खास वसतिगृह काढण्यासाठी ५ हजार रूपये देणगी दिल्याचे राजर्षी शाहू महाराजांनी या परिषदेत जाहीर केले.[७४] पुणे येथे मराठा सोशल क्लबची स्थापना केली यामध्ये मराठा समाजाच्या शिक्षणाचा व त्याच्या खालावलेल्या सामाजिक परिस्थितीची चर्चा होत असे. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने अमरावती येथे पंजाबराव देशमुख यांनी जनसामान्यांच्या शिक्षणासाठी एक शाळा काढून शिक्षण कार्याची मुहूर्तमेढ रोवली. तसेच विदर्भात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना विदर्भात केली.[७५]

**शिक्षणावरील खर्च (१८९४ ते १९२२) (रुपये हजारात)**

| वर्ष | एकूण खर्च | प्राथमिक, दुय्यम व खास शाळांवरचा खर्च | माध्यमिक, महाविद्यालय व तांत्रिक शाळांवरचा खर्च | शैक्षणिक इमारती भांडवली व दैनंदिन दुरुस्तीसाठी खर्च |
|---|---|---|---|---|
| १८९३–९४ | १३९.६ | ६३.० | ५९.०(३.५) | १७.६ |
| १८९६–९७ | १३७.२ | ८१.४ | ४८३ | ७.५ |
| १८९८–९९ | १३०.५ | ६५.४ | ६१.२(८.५) | ३.९ |
| १८९९–१९०० | १२७.६ | ७५.० | ४८.२(७.०) | ४.४ |
| १९००–०१ | १३०.८ | ७९.० | ४८.० | ३.८ |
| १९०१–०२ | ११८.९ | ७०.३ | ४३.६ | ५.० |

| वर्ष | एकूण खर्च | प्राथमिक, दुय्यम व खास शाळांवरचा खर्च | माध्यमिक, महाविद्यालय व तांत्रिक शाळांवरचा खर्च | शैक्षणिक इमारती भांड्वली व दैनंदिन दुरुस्तीसाठी खर्च |
|---|---|---|---|---|
| १९०३–०४ | ११३.७ | ५४.८ | ५१.०(३.७) | ७.९ |
| १९०५–०६ | १३६.५ | ६४.८ | ६६.२ | ५.५ |
| १९०६–०७ | १४२.५ | ७१.७ | ६२.४(३.५) | ८.४ |
| १९०९–१० | १५१.५ | ८२.८ | ६०.७(६.१) | ८.० |
| १९१०–११ | १४१.३ | ७७.१ | ५७.९(८.८) | ६.३ |
| १९१२–१३ | २००.० | १४०.३ | ५८.३ | १.४ |
| १९१३–१४ | १४३.० | ७२.८ | ६५.४(८.३) | ४.८ |
| १९१५–१६ | १७४.९ | १०५.९ | ६७.१(८.७) | १.९ |
| १९१६–१७ | १३२.३ | ५५.२ | ७४.२ | २.९ |
| १९१८–१९ | १८०.७ | १०२.३ | ७४.३(८.२) | ४.१ |
| १९१९–२० | २३५.० | १६०.९ | ६९.५(७.१) | ४.६ |
| १९२०–२१ | २२४.५ | १५१.६ | ६८.६(६.८) | ४.३ |
| १९२१–२२ | २१७.१ | १४१.८ | ७३.८(७.२) | १.५ |

(संदर्भ– कोल्हापूर संस्थानचा सर्वसाधारण प्रशासन अहवाल– १८९४ ते १९२२)

**अस्पृश्यता निवारणाचे कार्यः–**

इ.स.१९१८–१९ या कालखंडात आपल्या संस्थानातून अस्पृश्यता उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारणाचे अनेक आदेश काढण्यास सुरूवात केली. त्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रातही झाला २८ सप्टेंबर १९१९ रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्याचा आदेश जारी करण्यात आला. त्यात ते म्हणतात, करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात. त्या सर्व दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलास सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घेतले जावे. सरकारी शाळांतून शिवा–शिव पाळावयाची नसल्याने सर्व जातीच्या व धर्माच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे. याशिवाय आर्थिक मदतीसाठी इ.स.१९२० साली अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजनाकरिता दरमहा पाच रूपये प्रमाणे आठ शिष्यवृत्त्या सुरू केल्या. त्यापैकी तीन शिष्यवृत्त्या अस्पृश्य मुलींच्यासाठी ठेवल्या गेल्या होत्या.[७६]

### अस्पृश्य समाजासाठी सवलती व आदेशांची अंमलबजावणी–

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजातील शिक्षण प्रसार करण्यासाठी निवडक आदेशाद्वारे प्रयत्न केले. इ.स.१९०६चा एक आदेश सांगतो की, त्यावेळी कोल्हापूरात चांभार, महार वगैरे अस्पृश्य लोकांसाठी एक 'रात्रीची शाळा' होती. २८ नोव्हेंबर १९०६ च्या आदेशाने महाराजांनी ती शाळा कायम केली. ४ ऑक्टोबर १९०७ च्या एका आदेशान्वये कोल्हापूरातील चाांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील 'मुलींच्या शाळेसाठी' मंजूरी देण्यात आली. तसेच त्या शाळेसाठी दरवर्षी रू.९६ खर्चाची तरतूदही संस्थानच्या स्त्रीशिक्षणाच्या अंदाज पत्रकात करण्यात आली. सन १९०९ भास्करराव जाधव यांनी स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वसतिगृहास इमारतीसाठी जागा उपलब्ध करून दिली गेली. त्या संदर्भात काढलेल्या आदेशात महाराज म्हणतात, सर्व मागासलेल्या जातीत अस्पृश्य मानलेल्या जाती इतकी इत–दैवी इतर जाती नाहीत व या लोकांची स्थिती सुधारण्यास विद्या प्रसाराशिवाय दुसरे बलवान साधन नाही. जातीत विद्या प्रसारक मंडळीच्या कार्यकारी मंडळाचे प्रमुख रावसाहेब भास्करराव जाधव यांनी शैक्षणिक कार्याची अंमलबजावणी केलेली दिसून येते.[७७]

### अस्पृश्यांची गुलामगिरीतून मुक्ती कार्य

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य सुरू केले. कारण मागासवर्गीयांना दारिद्रयाच्या आणि दुःखाच्या प्रसंगातून बाहेर काढणे हे माझे पवित्र कार्य आहे. दलित पतितांची सेवा हीच खरी मानवतेची सेवा. या थोर मानवतावादी विचारसरणीतून त्यांनी प्रत्यक्ष अस्पृश्य उद्धाराच्या कार्याला सुरूवात केली. अस्पृश्यांना म्हणजे मानव जातीला लागलेला कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने हानिकारक आहे. याची जाणीव महाराजांना होती. मानवतेच्या व सामाजिक समतेच्या दृष्टीने कलंक असलेली ही अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते.[७८]

### हजेरी व वेठवरळा पद्धती बंद

अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ रोजी मंजूर होऊन कोल्हापूर गॅझेटमध्ये ३ ऑगस्ट १९१८ रोजी प्रसिद्ध झाला. त्यामध्ये अस्पृश्यांवर लादलेली अमानुष अशा हजेरीच्या पद्धतीचे निर्मुलन करण्यात आले. यामध्ये हुकूम काढण्यात आला, की महार–मांग, रामोशी व बेरड या चार जातीच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी. यातील जे कोणी

गुन्हयात सापडून शिक्षा झालेली असतील. त्यांना मात्र या हुकूमाने हजेरीची माफी नाही या हुकूमाचा अंमल ताबडतोब करण्यात यावा. हजेरी बंद केल्यापासून गुन्हयांची संख्या कमी झालेली होती.[७९]

हजेरी प्रमाणेच अस्पृश्याच्यांत सुरू असणारी वेठवरळा (वेठबिगार)ही अमानुष पद्धती सुरू होती. यामध्ये सरकारी अधिकारी गावच्या महारास अनेक प्रकारची कामे सांगून विना मोबदला राबवून घेत असत. ही जी वेठबिगारीची पद्धत सुरू होती. ती नष्ट करण्यासाठी २६ जून १९१८ रोजी वटहुकूम काढून महारांच्या वतनी जमिनी रयतवारी केल्या गेल्या. त्यामुळे वेठवरळा पद्धत बंद झाली.[८०]

**महार वतन खालसा**

संस्थानातील सर्व महारकीचे वतन खालसा करून त्यांच्या जमिनी रयतवारी करून त्यांच्या नावे करून देणे आणि त्यांना वतनाच्या जबाबदारीतून कायमचे मुक्त करणे. राजर्षी शाहू महाराजांनी हा निर्णय लगेच अंमलात आणला. प्रत्येक गावच्या वतनदार महार व्यक्तीकडून एक अर्ज भरून घेतला व त्यावर तातडीने कार्यवाही करून त्या त्या गावचे महार वतन खालसा करून टाकले. (४मे १९२१)[८१] अशा प्रकारचा एक अर्ज गंगाराम कांबळे यांच्या कागदपत्रात सापडला. प्रत्येक गावचे महार वतन खालसा करून राजर्षी शाहू महाराजांनी पुन्हा एकदा सर्व गाव कामगार मंडळींना व सरकारी नोकरांना महाराकडून वेठवरळा न घेण्याचा व घेतल्यास कडक शिक्षा केली जाण्याचा हुकून काढला.[८२] महार वतन खालसा करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी महार समाजाचे प्रबोधन करीत टप्याटप्याने केले. ती प्रक्रिया १९१८ साली सुरू झाली व १९२१ च्या मध्यावर पूर्ण झाली.

**राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर संबंध**

राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या दलित चळवळीत काही सुशिक्षित तरूण होते. दत्तोबा पोवार हा त्यापैकीच एक असून ते राजर्षी शाहू महाराजांचे निष्ठावंत सेवक होते. त्यांनी सन १९१७ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांशी आपला परिचय करून घेतला होता. याचे दत्तोबांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांविषयी माहिती राजर्षी शाहू महाराजांना सांगितली होती. तेव्हा दलित समाजातील एक तरूण मुलगा शिक्षण घेऊन तयार झाला आहे. हे ऐकून राजर्षी शाहू महाराजांना आनंद झाला होता. बाबासाहेबांचा परिचय व त्यांची ओळख करून घेण्याची इच्छा

राजर्षी शाहू महाराजांनी तेव्हा व्यक्त केली होती आणि उभयतांच्या भेटीचा योग १९१९ मध्येच आला. राजर्षी शाहू महाराज सन १९१९ मध्ये कोल्हापूरहून मुंबईला गेले. त्याठिकाणी या दोघांची भेट झाली. राजर्षी शाहू महाराजांनी डॉ.आंबेडकरांना कोल्हापूरला येण्याचे निमंत्रण दिले.

### तलाठी क्लासमध्ये येणाऱ्या दलित विद्यार्थ्यांकरिता स्कॉलरशीप(२५ जून १९१९)

तलाठी क्लासमधील दलित जातींच्या विद्यार्थ्यांना तलाठी क्लासमध्ये शिक्षण घेण्यासाठी स्कॉलरशिप देण्याचा आदेश २५ जून १९१९ मध्ये दिला. ठराव नं ६२१ मध्ये राजर्षी शाहू महाराज म्हणतात, "तलाठी क्लासात येणाऱ्या अस्पृश्य जातीच्या विद्यार्थ्यांकरिता १० स्कॉलरशीप दरमहा ८ रूपये पगाराच्या तीन महिने मंजूर केल्या आहेत. तरी विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घ्यावा."[८३]

## मुकनायकास आर्थिक मदत

दलितांची बाजू जनतेसमोर आणि भारत दौऱ्यावर आलेल्या साऊथबरो समितीसमोर मांडण्यासाठी बाबासाहेबांना वर्तमानपत्राची गरज भासू लागली. बाबासाहेबांच्या प्रेरणेने काही त्यांचे सहकारी राजर्षी शाहू महाराजांना मुंबई येथे भेटले. आणि एका वर्तमानपत्राची योजना त्यांच्यासमोर ठेवली. राजर्षी शाहू महाराजांना ही योजना पसंत पडली. त्यांनी तात्काळ वर्तमानपत्र, काढण्यासाठी अडीच हजार रूपयांचा चेक दिला. राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या या पैशातूनच ३१ जानेवारी १९२० रोजी मुकनायक पाक्षिक काढले.

मूकनायकचे संपादक पांडुरंग नंदराम भटकर यांना नेमले होते. ते महार असून पुण्यातील डी.सी.मिशनमधून त्यांचे मॅट्रिकपर्यत शिक्षण झाले होते. त्यांची पत्नी ब्राम्हण समाजाची होती.  त्यापायी त्यांना बराच छळ सोसावा लागला होता. त्या पाक्षिकावर आंबेडकरांचे संपादक म्हणून नाव नसले तरी ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या चळवळीचे मुखपत्र होते.[८४]

## सनदी वकील(११ मार्च १९२०)

वकीलीच्या क्षेत्रात उच्च वर्णीयांची असलेली मक्तेदारी मोडून काढण्यासाठी व अशी क्षेत्रे सामान्य जनांना खुली करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी खास प्रयत्न केले होते. त्यांनी ११ मार्च १९२० रोजी एका हुकुमान्वये खालील लोकांना करवीर इलाख्यातील सर्व कोर्टात वकीली

करण्याच्या सनदा दिल्या. त्यामध्ये रामचंद शिवराम कांबळे, रामचंद्र सखाराम कांबळे, दत्तात्रय संताराम पोवार, तुकाराम आप्पाजी गणेशाचार्य, कृष्णराव भाऊसाहेब शिंदे, विश्वनाथ नारायण कुंभार या सर्वांना दोन वर्षाची फी माफ करून सनदा दिल्याबद्दल व यांनी पेपर निघाल्यापासून दीड वर्षात परीक्षेस बसून पास झाले पाहिजे, असा हुकूम दिला होता. पुढे धोंडदेव रामचंद्र व्हटकर आणि ककोश यशवंत ढाले यांनाही कोर्टात वकीली करण्याची सनद दिली होती.[८५]

## माणगाव परिषद(२१ व २२ मार्च १९२०)

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या रूपाने दलित चळवळीला दोन खंबीर वैचारिक आधारस्तंभ लाभले होते. ही चळवळ गतीमान करण्यासाठी उभयताना जनतेसमोर पुन्हा पुन्हा एकत्र येऊन त्यांना जागृत करणे गरजेचे होते. आणि नेमके तसेच घडत गेले 'माणगाव परिषद' हे त्याचेच उदाहरण आहे. दत्तोबा पोवार, गंगाराम कांबळे, तुकाराम गणेशाचार्य, शिवराम कांबळे, रामचंद्र कांबळे, निंगाप्पा ऐदाळे या सर्वाशी चर्चा करून माणगाव परिषदेची तारीख निश्चित केली. याच ऐतिहासिक परिषदेमध्ये राजर्षी शाहू महाराजांनी भाषण केले. ते म्हणाले, "तुम्ही तुमचा पुढारी शोधून काढलात याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील." यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषण केले त्यावेळी ते म्हणाले की, 'शाहू महाराजांनी जे कार्य केले आहे. ते अलौकिक आहे.' सभा संपल्यानंतर राजर्षी शाहू महाराज कोल्हापूरास गेले.[८६]

## राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक कार्य

महाराष्ट्रात मध्ययुगीन काळापासून स्त्रियांच्यात बालविवाह, विधवापुनर्विवाह प्रतिबंध, केशवपन, शिक्षणबंदी, पडदापद्धती, सांपत्तिक वारसा हक्क नकार इत्यादी अनिष्ठ चालीरिती व रूढी परंपरा सुरू होत्या. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात या अनिष्ट प्रथा व परंपरा बंद व्हाव्यात, यादृष्टीने फार मोठे कार्य केलेले दिसून येते.

### १) स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन –

'स्त्री व पुरूष दोघांनाही समाजात समान स्थान असले पाहिजे.' असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. स्त्रीया शिकल्यावर त्या मुलांच्या संगोपनाबरोबरच कौटुंबिक स्वावलंबनास ही हातभार लावतील असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते.[८७] राजर्षी शाहू महाराजांच्या

काळात मुलींच्या शिक्षणाची पायाभरणी सुरू झाली. ट्रेंड शिक्षिकाही तयार होऊ लागल्या होत्या. त्यांच्या स्त्रीशिक्षण समर्थन व प्रोत्साहनामुळे रखमाबाई केळवकर, डॉ.कृष्णाबाई केळवकर, यमुनाबाई व द्वारकाबाई केळवकर यांचे आयुष्य आकारास आले. रखमाबाईचे पती वसईचे ते डॉक्टर होते. कृष्णाजी दादाजी त्यांचे नाव प्रार्थना समाजाशी होते. आपल्या पत्नीसह त्यांनी शिक्षण दिले. अलिबाग ते पनवेल येथे त्यांची डॉक्टरी चाले. रखमाबाई उच्चश्रेणीत फिमेल ट्रेनिंग स्कूल परीक्षा उत्तीर्ण झाल्या होत्या. कोल्हापूर संस्थानाने ब्रिटिश सरकारकडे प्रशिक्षित शिक्षिकेची मागणी केली. तेव्हा रखमाबाईच्या नावाची शिफारस झाली. चौथे शिवाजीराजे(१८८३) यांच्या पत्नीला शिकविण्याचे काम त्यांनी केले. या काळात आबासाहेब घाटगे कागलकर संस्थानाचे रीजन्ट होते. (१८८३ ते १८९५) दरमहा ५५ रूपये पगारावर रखामाबाईंनी ट्रेनिंग स्कूलचा कारभार सांभाळला. सुरूवातीस लेडी सुपरिटेंडेट मिस लिटल यांच्या हाताखाली काम करीत होत्या. मिस लिटल मायदेशी गेल्यानंतर सन १८८५ मध्ये संस्थानामार्फत त्या ठिकाणी रखमाबाईंची निवड झाली. 'लेडी सुपरिटेंडेट ऑफ दि मेन स्कूल' असा हुद्दा देण्यात आला.

काशिबाई कानिटकर यांनी 'आनंदीबाई जोशी चरित्रात' कोल्हापूर कारभारी मंडळावर दोषारोप केले. त्या म्हणतात. कोल्हापूर कारभारी मंडळ अगदी जुन्या मताचे व कुत्सित होते. तेव्हा 'केरळ कोकीळ' मासिकात (वर्ष १० वे , अंक ८वा) रखमाबईच्या नेमणूकी संदर्भात लिहिले आहे. रमाबाई रानडे, भांडारकर, रावबहाद्दूर पटवर्धन, आगरकर, यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले. १८८७ मध्ये केसरीचे संपादक पद लोकमान्य टिळकांच्याकडे आले. तेव्हा पुण्यातील मुलींच्या शाळेवर टिळकांनी टिकेची झोंड उठविली. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांची सून इंदुमती राणीसाहेब(युवराज शिवाजीच्या विधवा पत्नी) यांनाही शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. त्या पुढे डॉक्टर झाल्या.[८८] त्यांनी राजाराम कॉलेजातील मुलींना शिक्षण फी माफ केली होती.[८९] राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री मुक्ती, स्त्रीविकास विधायक आचरण त्यांच्या पुरोगामीत्वाची साक्ष देते.

**२)जोगत्या मुरळी प्रतिबंध कायदा**

भारतीय समाजव्यवस्थेने स्त्रीस अत्यंत हीन दर्जाची वागणूक दिली. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू असा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. खालच्या जातीतील मुली व मुले देवाला

सोडण्याचा प्रघात होता. त्यामुळे जोगता, जोगतीन, देवदासी, मुरळी इत्यादी वर्ग तयार होत असत.[९०] जोगतीन, देवदासी, मुरळी या स्त्रियांचा त्यांच्या घरातील संपत्तीवर कोणताच अधिकार राहत नसे. देवस्थानात परंपरेने तिला हक्क मिळत, परंतु तो हक्क आणि दर्जा हीन असे. यास तरीही समाजमान्यता होती. राजर्षी शाहू महाराजांनी त्यास पायबंद घालण्यासाठी 'जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा' केला. अशा स्त्रियांना जनक आई बापाच्या मिळकतीत वारसाने अधिकार प्राप्त करून दिले. देवदासी प्रथा उखडून टाकण्याचे प्रयत्न केले.[९१]

ही प्रथा त्या कालखंडात समूळ नष्ट जरी झाली नसली तरी राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केलेल्या या कायद्यास महत्त्वाचे स्थान आहे.

**आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह कायदेशीर मान्यताः**

१२ जुलै १९१९ मध्ये कोल्हापूर इलाख्यातील कायदा कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. त्यानुसार हिंदु व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांनी जाती निर्बंध न पाळता सदरहू दोहोपैकी आपापल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा दिली गेली. या कायद्यान्वये विवाहाच्यावेळी पुरूषाचे वय १८ वर्षे व स्त्रीचे वय १४ पूर्ण असले पाहिजे, असा निर्बंध घातला गेला. पूर्वी मुलींचे विवाह १० वर्षाच्या आतच केले जात. 'वाढीव वयाचा दंडक' हिंदू धर्मात ढवळाढवळ करणारा आहे. अशी भूमिका लोकमान्य टिळकांनीही घेतली. १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या स्त्रीला विवाहासाठी पित्याच्या परवानगीची आवश्यकता नाही असे कलमही या कायद्यात होते. या विवाहाची नोंदणी होणार होती. हे शाहू राजांचे क्रांतिकारी पाऊल होते.[९२] यामुळे बालविवाहास आळा बसणार होता. यामुळे विवाह परस्पर संमतीने होणार होते. तसेच विवाहास कायदेशीरपणाही प्राप्त होणार होता. स्त्रीच्या शारीरिक सक्षमतेचा विचारही होता. सन १९१७ मध्ये वल्लभभाई पटेल यांचे वडील विठ्ठलभाई पटेल यांनी केंद्रीय मंत्री मंडळात आंतरजातीय विवाहविषयक बिल (पटेल बिल) मांडले होते. असे विवाह कायदेशीर मानले जात नसत..संततीसंबंधीही प्रश्न निर्माण होत असे. 'पुरीचे शंकराचार्य' आणि करवीर संस्थानातील धार्मिक नेते यांचा या कायद्याला विरोध होता. राजर्षी शाहू महाराजांनी मात्र या बिलास जोरदार पाठिंबा दिला.[९३] 'राजर्षी शाहू महाराजांनी आपली बहीण राजकन्या चंद्रप्रभाबाई यांचा विवाह तुकोजीराव होळकर(इंदूर) यांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी करण्याचे योजले होते. मराठा राजघराणातील कन्या पाऊणशे वर्षापूर्वी धनगर घराण्यात देणे हे मोठे क्रांतिकारी पाऊल होते.

परंतु हा विवाह होण्यापूर्वीच राजर्षी शाहू महाराजांचा मृत्यू झाला. (६ मे १९२२) परंतु चिरंजीव राजाराम महाराजांनी स्थगीत झालेला हा विवाह इंदूर मुक्कामी घडवून आणला.[९४]

सत्यशोधक समाजाने राजर्षी शाहू महाराजांच्या आंतरजातीय विवाहविषयक धोरणाचे समर्थन केल्याचे दिसते. राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुले यांचे सच्चे शिष्य असल्याचे सिद्ध केले. कालखंड जरी वेगळा असला तरी त्यांनी सत्यशोधक विचारांना पाठिंबा दिला आणि सत्यशोधक समाजानेही राजर्षी शाहू महाराजांच्या या धोरणाचे समर्थन केले.[९५] राजर्षी शाहू महाराजांनी जातीचा कोता अभिमान बाळगला नाही. ब्राम्हणेत्तर चळवळीचे सामाजिक ध्येय जातीभेद मोडणे हेच होते. १९२० मध्ये एका ब्राम्हण मुलीचा विवाह मि.अरूंडेल यांच्याशी घडवून आणला. तेव्हा राजर्षी शाहू महाराज म्हणतात. पूर्व आणि पश्चिम यांच्यात विवाह घडून यावेत, हे अत्यंत इष्ट आहे. असल्या सुधारणेशिवाय त्यांना विभागणारी खाच भरून येणार नाही. मी जातीभेद मुळीच मानत नाही.[९६] यावरून असे दिसते की, फक्त आंतरजातीय नव्हे तर आंतरधर्मीय विवाहासही शाहू महाराजांनी समर्थन दिले होते.

**क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :**

२ ऑगस्ट १९१९ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणारे कायदे केले गेले. कुटुंबात नवरा व इतर नातेवाईक यांच्याकडून स्त्रीचा छळ होत असतो. अशा छळांना इंडियन पिनलकोडच्या मर्यादेत आणता येत नसते. या कायद्याच्या प्रास्ताविकात म्हटले आहे की, हिंदुस्थानात लोकांचे अनेक समज आहेत. त्यामध्ये हिंदू शास्त्रकारांनी हिंदू कुटुंबाच्या पुढाऱ्यांना स्त्रियांना हलकेसे शासन करण्याचा अधिकार दिला होता. त्याचा दुरूपयोग होऊन स्त्रियांना वाटेल तसे वागविण्याचा परवाना मिळाला असे पुरूषांना वाटते. याविरोधी कायद्यात क्रूरपणाची वागणूक या शब्दाची व्यापक व्याख्या केलेली आहे. शारीरिक छळाबरोबर मानसिक छळ, अवहेलना करणे, सतत उभे करणे, स्त्रीचा सहवास टाळणे अशा गोष्टी आहेत.[९७] एकूण ११ कलमांच्या या कायद्यानुसार स्त्रीला क्रुरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्यास ६ महिने कारावास २००० रूपयापर्यंत दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली. यामुळे छळ जरी थांबले नसले, तरी समाजात जाणीव जागृतीचे कार्य सुकर झाले.

**घटस्फोटाचा व वारसाचा कायदा**

स्त्री हक्क संरक्षणासाठी तिच्या अन्न, वस्त्र, खर्चाची तरतूद, संततीचा ताबा, पोटगी व शिक्षणाबाबत तरतूद राजर्षी शाहू महाराजांच्या घटस्फोटासंबंधी कायद्याने केली. पती–पत्नीमधील संबंध काडीमोड घेऊन संपुष्टात आणावेत. यात जातपंचायतीच्या पंचाचा हस्तक्षेप लहरीपणा अमान्य करण्यात आला. सर्व कामे कोर्टात केली जाणार होती. करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये १७ जानेवारी १९२० रोजी हिंदू वारसाच्या कायद्याच्या दुरूस्तीचा कायदा केला. सर्व वर्णाच्या संततीना जनक बापाच्या मिळकतीतील वारसा हक्क दिला गेला. हे कलम स्त्रीउद्धारच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.[९८] हे कायदे करताना महाराजांनी तज्ञांचा सल्ला घेतला होता. मुंबई हायकोर्टाचे एक निवृत्त न्यायाधीश आणि मद्रास हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या सल्ल्याने महाराजांनी हे नियम केले. मुस्लिम पतीला आपल्या पत्नीबरोबर तलाक देण्याचा अधिकार होता. जबर मारहाण, महारोगी नवरा, वेडा, असल्यास स्त्रीस घटस्फोट घेता येत होता.(१७ जानेवारी १९२०)

**विधवा पुनर्विवाह कायदा**

लहानपणी मुलांची लग्न केली जात असत. साथीचे रोग किंवा अन्य कारणाने नवरा मरण पावला, तर विधवेस पुन्हा विवाह करण्याची प्रथा नव्हती. ताराबाई शिंदे यांनी आपल्या स्त्री–पुरूष तुलना या निबंधात म्हटले आहे की, या प्रांती असे जे मराठे मऱ्हाटेशाहीला मरतात त्यांचे कुळात तर ब्राम्हणापेक्षाही पुनर्विवाह न होणाची सक्ती दिसून येते. जुलै १९१७ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी विधवा पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा केला. या कायद्यामुळे पुनर्विवाहामधील अडथळा दूर होऊन विधवा पुनर्विवाहास कायदेशीरपणा प्राप्त झाला व संभाव्य अडचणी दूर झाल्या. १९१९ मध्ये कानपूरमधील कुर्मी क्षत्रियात विधवा पुनर्विवाह प्रचलित असलेला पाहून ते आनंदी झाले. मनुष्य समाज निर्दोष राखण्यासाठी वेदादी शास्त्रांचे पाठबळ त्यांना मान्य होते. परंतु ज्या जातीमध्ये भ्रुणहत्या व्यभिचार पाप करून हजारो मुले मरतात. ही दुःखाची गोष्ट आहे, असे ते म्हणतात. या ठिकाणी राजर्षी शाहू महाराज पडदा पद्धती, विधवा पुनर्विवाह बंदी सर्वांनी मिळून भोजन न करणे या भारतातील अंधश्रद्धा कल्पनांचा निषेध करतात. राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर, कमलाबाई यांनी रणांगणी विजय मिळविले, पडदा पद्धतीत हे शक्य होणार नव्हते असे ते म्हणतात.[९९] राजर्षी

शाहू महाराजांनी स्त्रियांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून स्त्री संरक्षणाचे कायदे केले. ब्रिटिश काळात पुरोगामीत्व जपणारे लोकराजा राजर्षी शाहू महाराज हे स्वभावाने वेगळेच होते. ते केवळ बोलके सुधारक नव्हते तर त्यांनी प्रत्यक्ष कृतीच केली होती.

### शेती व शेतकऱ्याविषयीचे कार्य

राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्याविषयी कार्य करताना शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. कारण त्या काळात शेतकऱ्यांना शेती पिकविण्यासाठी पावसावर अवलंबून रहावे लागत होते. दुष्काळामुळे त्यांची अवस्था बिकट होत होती. जरी पाऊस वेळेवर पडला आणि पीक चांगले आले असेल तर व्यापारी आणि सावकार हे शेतकऱ्यांना लुबाडत असत. कारण व्यापारी लोक हे भरपूर पीक आले म्हणून आनंदी झालेल्या शेतकऱ्यांकडून ते कमी दरात पीक घेत असत. त्यातून शेवटी शेतकऱ्यांच्या जीवावर सावकार व अडत्या गब्बर होणार आणि शेतकरी मात्र दरिद्रीच राहिलेला पाहावयास मिळतो. म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी त्यावर उपाययोजना करण्याचे ठरविले.

### स्पिनींग अँड वीव्हिंग मिलची स्थापना

राजर्षी शाहू महाराजांना वाटत होते की, शेतमालाला रास्त भावात घेण्याची सोय केल्याशिवाय शेतकरी मुळीच सावरणार नाही, शेतमालाला खात्रीची मागणी असल्याशिवाय भावाची हमी देता येणार नाही, खात्रीच्या मागणीसाठी शेतमालावर आधारीत उद्योग सुरू केल्याशिवाय आणि तोही उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण झालेल्या नगरीत नव्हे तर त्या भागात, दुसरा प्रभावी पर्याय नाही. म्हणूनच शाहू महाराजांनी शेतीमालाला रास्त भावाचा दिलासा दिला तरच शेतकरी तरेल, या ठाम विचाराप्रत येऊन आणि शेतीमालावर आधारीत असा एक उद्योग कोल्हापूरात काढावयाचा त्यांनी ठरविले. त्यादृष्टीने त्यांनी स्पिनींग अँड वीव्हिंग मिल हे त्या उद्योगाचे मूर्त स्वरूप होय.[१००]

शेतकऱ्यांचीही परिस्थिती सुधारण्यासाठी व स्पिनींग अँड वीव्हिंग मिल कोल्हापूर येथे सुरू करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी मुंबईच्या गव्हर्नरला न भेटता थेट सिमला येथे जाऊन व्हॉईसरॉयची भेट घेतली. त्यांच्याशी चर्चा करून परत आल्यानंतर त्यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर १७ सप्टेंबर १९०६ रोजी 'स्पिनींग अँड वीव्हिंग मिलची कोनशिला कोल्हापूर येथे बसविली. अशाप्रकारे एका राजाने जनेतच्या हितासाठी शेतमालावर आधारीत अशा एका

उद्योगाची उभारणी केली. 'शाहू मिल' ही भारतातील सरकारी क्षेत्रातील पहिला उद्योग होय किंवा पहिली गिरणी होय. हा उद्योग व्यवस्थित चालावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी ही कापड गिरणी काही सरकारी मालकीची केली नाही. प्रारंभी तिची उभारणी सार्वजनिक क्षेत्रात केली. संयुक्त भांडवलावर ही गिरणी एक वर्षभर चालली. खंडेराव गायकवाड हे तिचे पहिले कार्यवाह होते आणि तेच गिरणीचे सरव्यवस्थापक होते. तरीही म्हणावी तशी व्यवस्थितपणे ती गिरणी चालली नाही. ती व्यवस्थित चालावी यासाठी ती गिरणी भागधारकांची केली. तरीही ती सुरळीत होईना म्हणून शेवटी ती दरबारामार्फत चालविली. त्यामुळे या गिरणीत पुरेशे भांडवल व उत्तम व्यवस्थापन करून चांगल्या प्रकारे चालण्यास मदत झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना कापूस या गिरणीकडे नेण्याची सोय झाली. शेतकऱ्यांना मालाच्या खपाची शाश्वती मिळाली. दराबाबत दलाल व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक टळली. दरबाराचीच शाहू मिल असल्याने दराबाबत दिलासा मिळाला.[१०१]

अशाप्रकारे शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या मालाचा प्रश्न सोडविण्यासाठी व व्यापाऱ्याच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी हा धाडशी निर्णय घेऊन तो यशस्वी केला. यातच या राजाचे मोठेपण दिसून येते.

**शेतीचे आधुनिकीकरण**

राजर्षी शाहू महाराजांनी ध्येयवादी दृष्टिकोनातून नियोजनपूर्वक केलेल्या बहुविध सर्वकष सुधारणामुळे कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे परिणाम झाले. विशेषतः शेती आणि कृषी औद्योगिक धोरणामुळे फक्त कोल्हापूर संस्थानावरच परिणाम झाला असे नाही तर त्याचा प्रभाव महाराष्ट्रावर झाला. हिंदुस्थान कृषीप्रधान देश आहे. शेती हा मुख्य व्यवसाय आहे. ज्यांना देशाचा विकास करावयाचा आहे त्यांनी आपली शेती प्रथम सुधारली पाहिजे. इतर देशाच्या तुलनेने भारताचे सरासरी उत्पन्न फारच कमी आहे हे वाढविण्यासाठी पुष्कळ करता येण्यासारखे आहे. सुधारीत व आधुनिक शेतीचा पुरस्कार सर्वांनी केला पाहिजे. यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. शाहू महाराजांनी आर्यक्षत्रिय समाज परिषदेच्या अध्यक्षपदावरून आपले कृषीविषयक धोरण निश्चित केले होते ते पुढीलप्रमाणे होते.

१) वनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करून त्यातून उत्पन्न मिळविणे.

२) कृषी शिक्षणाला उत्तेजन देऊन त्या अनुषंगाने कृषी विस्तार योजना आखणे.

३) सहकार, कृषी उत्पन्नावर आधारित उद्योग व्यापार, शेतकरी सहकारी पतपेढ्या यांचा विस्तार करणे.

४) विहिरी खणण्यासाठी व सुधारलेल्या औजारासाठी शेतकऱ्यांना बिनव्याजी आणि स्वस्त दराने कर्ज पुरवठा करणे.

५) दुष्काळात कायम पाणीपुरवठा व्हावा, पिण्याचे पाणी व बागायती शेती वाढावी म्हणून लहान–मोठया पाटबंधाऱ्यांच्या योजना तयार करून त्यांची कार्यवाही करणे.

अशा प्रकारची पंचसूत्री योजना शाहू महाराजांनी आखून घेतली होती. ब्रिटिश व इतर संस्थानात शेती सुधारणेसंबंधी कसलेही धोरण अस्तित्त्वात नव्हते. शाहू महाराजांनी शेती सुधारणेला बहुजन विकासवादाची जोड दिली. हे त्यांच्या धोरणाचे वेगळेपण आपणास दिसून येते.[१०२]

दुष्काळाची तीव्रता व शेतीला बारमाही पाणीपुरवठा व्हावा म्हणून ३ डिसेंबर १९०२ रोजी आर.व्ही.सबनीस यांच्या सहीने एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात कोल्हापूर संस्थानातील सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणानुसार संस्थानातील सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत पाटबंधारे विभाग वेगळा करण्यात आला. शंकर सिताराम गुप्ते यांना ‘इरिगेशन ऑफिसर’ म्हणून नेमण्यात आले. संस्थानातील गाववार पाटबंधाऱ्यांची पाहणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. संस्थानातील गाववार तलाव खाजगी विहिरी याचा तक्ता करण्यास सांगितले व त्याची यादी पाटबंधारे विभागास पाठविण्यास सांगितले. याची पूर्तता करण्यास एक ड्राफ्टसमन, एक मिस्त्री व एका कारकुनाची नियुक्ती केली. साहित्यासाठी ६०० रू ग्रँट मंजूर केली. इरिगेशन ऑफिसरला मदत करण्यास प्रत्येक तालुक्यातील रेव्हेन्यू ऑफिसरवर जबाबदारी टाकण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत पहिल्या दहा वर्षात हा खर्च रूपये २७.६ हजार ते ७५.१ हजारापर्यंत झाला. पुढील दशकात बरीच वाढ झाली. शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या विहीरीवर खास लक्ष देण्यात आले.[१०३]

**राजर्षी शाहू महाराजांच्याकारकिर्दीत शेतीयोग्य जमिनीत केलेल्या सुधारणेचा तक्ता:–**

| वर्ष | शेतीयोग्य जमीन(एकर) | प्रत्यक्ष शेतीखाली आणलेली जमीन (एकर) |
|---|---|---|
| १८९३–९४ | १४,४९,९४९ | १२,९४,१९६ |
| १८९४–९५ | १४,३८,८०९ | १२,८९,१०१ |
| १८९५–९६ | १४,२८,८२७ | १२,९४,८७० |
| १८९६–९७ | १४,२८,०१० | १२,९२,१६९ |
| १८९७–९८ | १४,२८,२६३ | १२,८८,५६३ |
| १८९८–९९ | १४,२८,९०९ | १२,८६,६३० |
| १८९९–१९०० | १४,४२,८३७ | १२,८७,९९० |
| १९००–०१ | १४,९६,७५६ | १४,९३,१३० |
| १९०१–०२ | १४,९३,५१८ | १२,९२,२६५ |
| १९०२–०३ | १४,९६,८७५ | १२,९२,१४८ |
| १९०३–०४ | १५,०६,३५९ | १२,९२,४७२ |
| १९०४–०५ | १५,०६,२७५ | १२,८८,०६२ |
| १९०५–०६ | १६,२४,००० | १३,२९,६५० |
| १९०६–०७ | १५,५१,३०६ | १३,३१,९५९ |
| १९०७–०८ | १५,७३,०९० | १३,३२,७१३ |
| १९०८–०९ | १५,७५,५२८ | १३,३८,६८८ |
| १९०९–१० | १५,८६,२८९ | १३,४७,६७९ |
| १९१०–११ | १५,८६,९६३ | १३,५५,९१५ |
| १९११–१२ | १५,८६,४९४ | १३,५८,९५७ |
| १९१२–१३ | १५,८८,१७८ | १३,६३,०३२ |
| १९१३–१४ | १५,२५,५०९ | १३,६३,९६२ |
| १९१४–१५ | १६,६३,८८१ | १३,६६,०२३ |
| १९१५–१६ | १७,२६,३३६ | १४,२५,३९२ |
| १९१६–१७ | १७,३२,२१३ | १४,३०,८५८ |
| १९१७–१८ | १७,३०,४८९ | १४,२७,०२१ |
| १९१८–१९ | १७,२९,४१६ | १४,१७,६७२ |
| १९१९–२० | १७,३४,२९९ | १४,३१,१७९ |
| १९२०–२१ | १७,३६,५७८ | १४,२३,६५२ |
| १९२१–२२ | १७,३५.८५१ | १४,२६,५३५० [१०३अ] |

(**संदर्भ–** Administrative Reports from 1893 to 1922)

वरील तक्त्यावरून आपणास हे स्पष्ट होते की, प्रतिवर्षी दोन्ही प्रकारच्या जमिनीचे प्रमाण महाराजांच्या कारकिर्दीत वाढत होते. शेतीसासाठी कुरणासाठी, जंगलासाठी राजर्षी शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले होते. त्याचा हा परिणाम झालेला असावा.

## पाणीपुरवठयाच्या छोटया योजना

सन १८९६–९७ व १८९९–१९०० या वर्षी दुष्काळ पडला होता. शिरोळ, रूकडी, जोतिबा, कळंबे, बालिंगे, निगवे, भेडसगाव, रायबाग व इतर ठिकाणी नवे तलाव बांधणे व जुने दुरूस्त करण्याची मोहीम हाती घेण्यात आली. या काळात तीन लाख लोकांना रोजगार उपलब्ध झाला. चाळीस हजार रूपये खर्च करण्यात आले. १९०६–०७ साली रंकाळा, अतिग्रे, शिरोळ, काळेश्वर या तलावांचा पाणलोट विभाग वाढविण्यात आला होता. कायम पाणीपुरवठा व्हावा, म्हणून महाराजांनी मोठया धरणाची योजना आखली.[१०४]

## धरण प्रकल्प – महाराणी लक्ष्मीबाई तलावाची उभारणी

शेतकरी अवर्षणाच्या संकटापासून मुक्त झाल्याशिवाय त्याची प्रगती होणार नाही. त्यावर उपाय म्हणून शेतीला बारमाही पाणीपुरवठा व्हावा, यादृष्टीने मोठा धरण प्रकल्प आणि कालवे, पाटबंधारे योजना राजर्षी शाहू महाराजांनी आखली. जून ते ऑगष्ट १९०२ अखेर तीन–चार महिने राजर्षी शाहू महाराजांनी इंग्लड व युरोपीय देशाचा दौरा केला. त्यावेळी अनेक ठिकाणी प्रचंड तलाव व कालव्यांचे जाळे पसरलेले त्यांनी पाहिले. युरोपीय लोकांच्या सुखी व समृद्ध जीवनाची गुरूकिल्ली त्यांना सापडली आणि ते प्रभावीत झाले. जनतेला दुष्काळाच्या छायेतून सोडविण्यासाठी आणि शेतकऱ्यास सुख–समृद्धीच्या मार्गावर नेण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी धरण बांधण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पडणारा प्रचंड आर्थिक खर्च घेण्याचाही निर्धार त्यांनी केला.

धरण बांधण्याच्या दृष्टीने कोल्हापूर राज्याची भौगोलिक स्थिती पाहणीच्या कार्यास त्यांनी जोराची चालना दिली. त्यासाठी सरकारमार्फत पाहणी पथक आले. त्यांनी पाहणी करून जो अहवाल दिला होता. त्यानुसार दरबाराची सांपत्तिंक स्थिती मोठया कालव्याची योजना असमर्थ आहे. तेव्हा पुढे दरबाराने ही योजना हाती घ्यावी असे ठरले.[१०५]

राजर्षी शाहू महाराजांचा हा पहिला प्रयत्न तूर्त थांबविला व तोपर्यत त्यांनी विहिरीच्या व मातीच्या बंधाऱ्याची, धरणाची वाढती संख्या हे जनतेच्या गरजेचे आहे. तसेच ती गरज भागविण्यासाठी जनता सदैव सिद्ध असल्याचे प्रतीकच होय. म्हणून महाराजांनी 'ओलिताखाली जमीन' आणण्याच्या कार्यक्रमास पायरीपायरीने सुरूवात केली. प्रथमतः त्यांनी जुन्या तलावात सुधारणा करून ते वाढविले. त्यांची डागडुजी व्यवस्थितपणे केली. नंतर ठिकठिकाणी नवीन

तलाव बांधले.

सन १८९६ मध्ये कोल्हापूर राज्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळात जनतेला धान्यपुरवठा करताना राजर्षी शाहू महाराजांना खूप कटू अनुभव आला होता. म्हणूनच महाराजांनी असे ठरविले की, अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी मोठी कालवेयोजना हाती घेण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. हे ओळखून त्यांनी ही योजना हाती घेतली. त्यासाठी त्यांनी कोल्हापूर राज्यातून वाहणाऱ्या नद्यांचा सर्व्हे करून त्यादृष्टीने कालवे योजना अमलात आणली.

राजर्षी शाहू महाराजांनी भोगवती नदीवर २६०० फूट लांबीचे व ११० फूट उंचीचे धरण बांधण्यासाठी जागा निवडली. या धरणाखाली वीस हजार एकर जमीन ओलिताखाली आणता येईल असे नियोजन केले. तसेच खर्चही तीस लाखापर्यत येणार होता. धरणाच्या जागेसाठी बुडालेल्या शेतीचे उत्पन्न फक्त ३००० रूपयेच होते. एवढयाच रकमेस मुकावे लागणार होते. कालवे काढण्यास जागा योग्य होती. या सर्व स्थितीचे निरीक्षण करून राजर्षी शाहू महाराजांनी ही जागा धरणासाठी निवडली होती. या धरणात ८८८० मिलियन घनफूट पाण्याची क्षमता साठवता येणार होते.[१०६]

धरणाची ही जागा कोल्हापूरपासून ३१ मैलावर असून फेजिवडे गावच्या सीमेत आहे. या धरणाला दोन्ही बाजूंनी कालवे काढण्याचा संकल्प केला होता. त्यापैकी उजवा कालवा फेजिवडे धरणापासून तो थेट नरसोबाच्या वाडीनजिक भोगावती–पंचगंगा कृष्णा नदीत विलीन होईपर्यंत सलग नदीकाठाने १२० मैल लांबीचा आणि डावा कालवा मात्र भोगावतीला तुळशी नदी मिळते तिथपर्यत म्हणजेच ४० मैलांचा काढण्याचे ठरविण्यात आले. हे ठरविताना किती जमीन ओलिताखाली येईल याचा विचार केला गेला त्याची माहिति पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| कालवा | मैल अंतर | उपलब्ध जिराईत जमीन | ओलिताखाली येणारी जमीन |
|---|---|---|---|
| उजवा | ० – ५० | ७५९८ एकर | ३७९९ एकर |
| | ५० – ८० | १०५९६ एकर | ३५३२ एकर |
| | ८० – १०० | ११०५४ एकर | ३६८५ एकर |
| | १०० – १२० | १२००० एकर | ४००० एकर |
| डावा | ० – ४० | १०३२८ एकर | ५१६४ एकर |
| **एकूण उजवा कालवा** | १२० मैल | ४१२४८ एकर | १५०१६ एकर |
| **डावा कालवा** | ४० मैल | १०३२८ एकर | ५१६४ एकर |
| **एकूण** | १६० मैल | ५१५७६ एकर | २०१८० एकर[१०७] |

(संदर्भ :– Kolhapur State P.W.D. Repoer on the Maharani Laxmibai Tank at Fejivada, 1909**)**

अशाप्रकारे धरण बांधण्यापूर्वी सन १९०९ मध्ये या धरणामुळे किती जमीन ओलिताखाली येईल. याचा आराखडा तयार केला होता. या धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यामुळे किती एकर जमीन बागायती होणार होते. याचाही तपशील सविस्तरपणे दिला गेला. उजव्या कालव्याची लांबी जास्त असून त्याखालील क्षेत्रही जास्त प्रमाणात ओलीताखाली आणले जाणार होते.

त्याचप्रमाणे धरण व कालवे बांधण्यासाठी एकूण किती खर्च येईल याचाही अंदाज केला गेला. त्याची माहिती पुढीलप्रमाणे –

| बाबी | खर्च(रूपये) |
|---|---|
| धरण बांधणी | १६,०२,५५२ |
| कालवे | २,९४,४५१ |
| रस्ता वळवून घेणे | ६१,८१५ |
| बुडणाऱ्या शेतीचे उत्पन्न | ९४,४१७ |
| बुडीत जमीन मोबदला देणे | ५९,४६७ |
| बुडीत घरे मोबदला | १०,२०० |
| विश्रांतीगृहे बांधणे | २५,००० |
| एकूण | २१,४७,९०२[१०८] |

(संदर्भ :– कोल्हापूर संस्थान सर्वसाधारण अहवाल, १९१६–१९१७, पृ.२८)

दाजीपूरजवळील फेजिवडे येथे भोगावती नदीवर धरण बांधण्याचे काम सुरू झाले. धरणामुळे होणाऱ्या जलाशयाला नाव देण्यात आले 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव'. महाराजांच्या कन्या आक्कासाहेबमहाराज यांच्या विवाहाच्या सोहळयासाठी मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क

आले होते. राजर्षी शाहू महाराज यांच्या इच्छेप्रमाणे त्यांनी धरण योजना फेजिवडे येथे जाऊन पाहिली व समाधान व्यक्त केले होते.

धरणाचा प्रत्यक्ष बांधकामाचा मुहूर्त महाराणी लक्ष्मीबाई तथा आईसाहेबमहाराज यांच्या हस्ते सन १९०९ साली झाला. सन १९०९–१० च्या दरबारच्या अहवालात म्हटले आहे की, श्री महाराणी लक्ष्मीबाई तलावासंबंधीच्या कामाला नोव्हेंबर १९०९ मध्ये सुरूवात झाली. हे काम काही अंशी मक्ते देऊन व काही अंशी महाराजांचे बंधू बापूसाहेब महाराज यांच्या खास देखरेखीखाली खात्यामार्फत होत आहे. ते तलावाच्या कामाचे डायरेक्टर म्हणून दरबाराला मदत करीत आहेत. असिस्टंट इंजिनियर मि.गुप्ते व सुपरव्हायझर मि.अत्तर यांना डायरेक्टरच्या हाताखाली दिले आहे.[१०९]

या धरण प्रकल्पाने हरितक्रांती झाली, कोल्हापूर राज्याचा कायापालट झाला. शेतकरी वर्गाला सुखी व समृद्ध जीवनाचा मार्ग मिळाला. करवीर राज्यातील कष्टाळू व कल्पक शेतकऱ्यांनी जिकडे तिकडे ऊसाची लागवड केली. कोल्हापूर ही केवळ भारतातील नव्हे तर जगातील उत्तम गुळाची अव्वल दर्जाची बाजारपेठ ठरली. एवढेच नव्हे तर प्रगतीपर व पुरोगामी विचाराच्या राजाराम छत्रपतींनी कोल्हापूर शुगर मिल्स सुरू करून महाराष्ट्रात साखर कारखान्याची नांदी केली. श्री.शाहू स्पिनिंग अँड वीव्हिंग मिलच्या कोनशिला समारंभाच्या संदर्भात कुत्सित बुद्धीने विजापूरकरांनी आपल्या नियतकालिकात म्हटले होते की, पुढे साखरेचे पेढे जगदंबेस अर्पण करण्याचा सुयोग प्राप्त झाला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना साखर कारखानदार बनण्याचा मार्ग खुला झाला.

**राजर्षी शाहू महाराजांच्याकारकिर्दीतील पाणीपुरवठ्याच्या योजनेवरील खर्चाचा तक्ता:–**

| वर्ष | पाणीपुरवठा खर्च(रुपये हजारात) |
|---|---|
| १८९३–९४ | २९.६ |
| १८९६–९७ | ३१.० |
| १८९८–९९ | ६४.९ |
| १८९९–१९०० | ६०.३ |
| १९००–०१ | ४३.० |
| १९०१–०२ | ७५.१ |
| १९०३–०४ | २७.६ |
| १९०५–०६ | ५५.७ |
| १९०६–०७ | ९१.० |

| वर्ष | पाणीपुरवठा खर्च(रुपये हजारात) |
|---|---|
| १९०९–१० | ७७.९ |
| १९१०–११ | ८१.९ |
| १९१२–१३ | १५३.० |
| १९१३–१४ | ३१२.२ |
| १९१५–१६ | ३३८.२ |
| १९१६–१७ | २२३.५ |
| १९१८–१९ | ३.४ |
| १९१९–२० | ३१९.५ |
| १९२०–२१ | १०३.७ |
| १९२१–२२ | ६७.८ |

(**संदर्भ** :– कोल्हापूर संस्थान सर्वसाधारण अहवाल, १८९४–१९२२)

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात शेतकऱ्यांसाठी फार मोठे कार्य केले होते. शेतकऱ्यांची फार मोठया संकटातून सुटका केली होती. त्यामुळेच शेतकरी हा सावकार व व्यापारी यांच्या कचाटयातून सुटला होता. तसेच दुष्काळातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी, त्याला शेतीसाठी बारमाही पाणीपुरवठा व्हावा, यादृष्टीने कालवे व धरण योजना अमलात आणून कोल्हापूर राज्यात हरितक्रांती घडवून आणण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले होते.

**वेदोक्त प्रकरण**

राजर्षी शाहू महाराजांनी सुरूवातीपासूनच जातिभेदाला विरोध करून समाजाभिमुख धोरणाचा स्वीकार केलेला होता. सनातनी प्रवृत्तीचा स्वीकार करून समाजातील आपले स्थान टिकविण्याचा प्रयत्न करणाऱ्या ब्राम्हणांना हे मान्य होण्यासारखे नव्हते. महाराजांचे धोरण सामाजिक समता व देशोन्नतीस उपयुक्त असले तरी, अज्ञानी व अंधश्रद्धा समाजावर निरनिराळी बंधने ठेवून आपले वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या ब्राम्हणांच्या प्रवृत्तीला हे धोरण मान्य होणारे नव्हते. अधिकार ग्रहण केल्यानंतर महाराजांना जाणवले की, संस्थानच्या राज्यकारभारात ब्राम्हण किंवा उच्च जातीच्या व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. बहुजन समाजाचे प्रमाण अतिशय अल्प आहे. त्यामुळे सन १८९४ पासूनच त्यांनी अब्राम्हणांना नोकऱ्या देण्यास सुरूवात केली. अब्राम्हणाला प्रतिष्ठेची नोकरी म्हणजे आपले आर्थिक नुकसान व सामाजिक समता निर्माण करण्याच्या प्रयत्नांना विरोध केला. प्राचीन काळापासून समाजातील इतर

जातींच्या हिताची पर्वा न करता केवळ आपले कल्याण साधण्याची ही ब्राम्हण प्रवृत्ती आधुनिक काळाच्या संदर्भात प्रतिगामी आहे. असे महाराजांना वाटू लागले. त्यामुळेच पुढील काळात या दोन भिन्न प्रवृत्तीमध्ये संघर्ष होणे अटळ होते. राजर्षी शाहू महाराज म्हणतात की, "ब्राम्हणांची कारस्थाने कधी बंद होणार नाहीत असे मला वाटते. धर्माच्या बाबतीत उत्पन्न झालेल्या मतभेदांची ब्राम्हणांना विशेष दिक्कत वाटत नाही. परंतु मागासलेल्या वर्गाना पुढे आणण्याचे माझे धोरण मात्र पुष्कळ ब्राम्हणांना आवडत नाही हीच गोष्ट खरी असावी. कालचक्राच्या फेऱ्यामुळे जी नवीन परिस्थिती उत्पन्न झाली आहे. तिला तोंड देणे त्यांना प्राप्त आहे. अशा या परिस्थितीतच वेदोक्त प्रकरणाची भर पडली. महाराष्ट्राच्या सर्व सामाजिक जीवनाला वेगळे वळण देण्याला व इतिहासाला कलाटणी देण्याला समर्थ ठरली असे दिसते. या वेदोक्त प्रकरणाने त्या काळात महाराष्ट्रात खळबळ निर्माण झाली.[११०]

राजर्षी शाहू महाराज ऑक्टोबर, नोव्हेंबर १९०० मध्ये कार्तिक महिन्यात पवित्र स्नान करण्यासाठी पंचगंगेच्या घाटावर गेले. त्यांच्याबरोबर त्यांचे बंधू बापूसाहेब व मेहुणे मामासाहेब खानविलकर व इतर मंडळी होती. समंत्रक धार्मिक विधी करण्यासाठी नारायण भट्ट यांनाही पंचगंगेवर आणण्याची व्यवस्था केली होती. राजर्षी शाहू महाराज पंचगंगेत भक्तिभावाने आंघोळ करत होते. नारायण भट्ट मंत्र म्हणत होते. असा हा क्रम चालला होता. मुंबईचे प्रसिद्ध बंडखोर राजारामशास्त्री भागवत हे त्या दिवशी महाराजांच्या समवेत होते. हे मंत्र पुराणोक्त होते. हे राजारामशास्त्र्यांनी पटकन निदर्शनास आणून दिले. त्याचप्रमाणे ब्राम्हणाने स्नान करून मंत्रपठण करणे आवश्यक होते. पण राजोपाध्ये स्नान न करताच मंत्रपठण करत होते.[१११]

तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी नारायण भट्टास विचारले की, 'स्नान का केले नाही?' त्यावेळी नारायण भट्ट यांनी असे उत्तर दिले की, 'वेदोक्त रीतीने विधी करताना स्नान करावे लागते. पुराणोक्त पद्धतीने विधी करताना स्नान करावे लागत नाही.' यावरूनच हे स्पष्ट होते की, महाराज हे क्षत्रिय नसल्याने त्यांना वैदिक पद्धतीच्या मंत्रांचा अधिकार नाही. म्हणूनच शूद्रांसाठी असलेले मंत्र तो म्हणत होता. या ब्राम्हणी प्रवृत्तीची खरी कल्पना यामुळे महाराजांना आली. प्रत्यक्ष राजाबरोबर असे वर्तन करणाऱ्या या भिक्षुकांचे सर्वसामान्य समाजाबरोबर किती कठोर वर्तन असेल याची जाणीव झाली. त्यामुळेच त्यांनी या भिक्षुकशाहीबरोबर संघर्ष करण्याचा निश्चय केला. मध्ययुगीन काळात कलियुग अवतरले व सर्व क्षत्रिय नष्ट झाले. केवळ

ब्राम्हण व शूद्र या दोनच जाती अस्तित्त्वात आहेत, असे भासविण्यात धर्ममार्तंड यशस्वी झाले होते. हा वाद जुनाच होता. छत्रपती शिवाजी महाराजांनाही त्याचा त्रास सहन करावा लागला. शाहू महाराजांवरही ही पाळी आली होती. मात्र त्यांनी ब्राम्हणांच्या या प्रवृत्तीला प्रखर विरोध केला व अतिशय धीरोदत्तपणे हा संघर्ष चालविला. बहुजन समाजाने यावेळी महाराजांना साथ दिली.

राजर्षी शाहू महाराजांनी सन १९०१ मध्ये वैदिक वाङ्मय प्रविण अशा नारायण भट्ट सेवेकरी या ब्राम्हणाकडून वेदोक्त पद्धतीने श्रावणी केली. त्यामुळे कोल्हापूरातील ब्राम्हण वर्गाने त्यांना बहिष्कृत केले. राजवाडयात जाऊन त्यांचे पौराहित्य केले हा त्याचा गुन्हा समजण्यात आला. महाराज त्यावेळी पन्हाळगडावर मुक्कामी होते. त्यांच्या मातोश्रीचे वर्षश्राद्ध होते. राजोपाध्ये यांना निमंत्रित करण्यात आले होते. परंतु त्यास त्यांनी नकार दिला. याच वर्षी त्यांनी आप्पासाहेब राजोपाध्ये यांना वेदोक्त विधी करण्यासाठी वारंवार कळविले. राजोपाध्यानी नकार दिला.[११२]

छत्रपती जरी क्षत्रिय असले तरी महाराज हे कागलच्या घाटगे घराण्यात जन्मलेले असल्यामुळे वेदोक्त विधी करता येत नाही, असे मत त्यांनी दिले, लोकमान्य टिळकांनी यावेळी ब्राम्हणांची बाजू घेतली. लोकमान्य टिळकांनी केसरीतून दोन अग्रलेख लिहिले. २२ ऑक्टोबर १९०१ रोजी पहिला अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्याचा विषय होता 'वेदोक्ताचे खूळ – १' आणि २९ ऑक्टोबर १९०१ रोजी त्यांनी दुसरा लेख प्रसिद्ध केला त्याचाही विषय होता 'वेदोक्ताचे खूळ– २' हे होत. या दोन्ही अग्रलेखात लोकमान्य टिळकांनी राजोपाध्ये यांचीच बाजू घेतली. त्याकाळी केसरीतून लेख येणे याचा अर्थ वेदोक्त प्रकरणाचा महाराष्ट्रभर प्रसार होणे. त्यासाठी या अग्रलेखाचे सार समजल्याशिवाय टिळकांची भूमिका लक्षात येणार नाही. पहिल्या अग्रलेखात ते म्हणतात, 'बडोदा व कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाचे खूळ निर्माण झाल्यामुळे त्याविषयी लिहिणे क्रमप्राप्त आहे. कारण या संस्थानातील प्रजेला आपल्या हक्कांसंबंधी ब्रिटिश शासनाकडे दाद मागावी लागत आहे. म्हणून आजपर्यंत वेदोक्त पद्धती कशी होती, याचा विचार लेखात मांडला आहे. आत्म्यास परमेश्वराची प्राप्ती कशी होईल एवढाच धर्माचा अर्थ धरला तर हिंदू धर्मात जातीचा अगर खाणे, पिणे याचा संबंध नाही. धर्मात वसिष्ठास जेवढया लवकर परमेश्वर प्राप्त होतो. तेवढया लवकर चोखामेळयासही प्राप्त होतो.

यात धर्म, जातीचा विचार केला जात नाही. परंतु हिंदू धर्मातील 'आचार आणि व्यवहार' स्वतंत्र आहेत. ते स्मृती ग्रंथातून आले आहेत. हिंदूची जातीव्यवस्था दृढ पायावर उभी आहे. ती मोडता येणार नाही. तिच्यात बदल करावयाचा असेल तर तो टप्प्याटप्प्याने केला पाहिजे आणि बदल करावयाचा असेल तर बदलाची उपयुक्तता समाजास पटली पाहिजे. सध्या वेदोक्ताची जी चळवळ सुरू झालेली आहे ती तशा प्रकारची नाही.

ज्ञातिधर्माप्रमाणे समाजात चार वर्ण आहेत. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यांना वेदोक्त पद्धतीने मंत्र म्हणावेत म्हणून स्मृतीवचने आहेत. परंतु धर्मशास्त्रातील जे ग्रंथकार आहेत. त्यांच्या मते क्षत्रिय व वैश्य या जाती नामशेष झाल्या आहेत. ब्राम्हण व शूद्र या दोनच जाती आहेत. आता प्रश्न असा आहे की मराठे हे शूद्र की क्षत्रिय आहेत, याचा निकाल लावला पाहिजे. पूर्व–पश्चिम दृष्टिकोनातून मराठे हे क्षत्रिय होते व त्यांची धार्मिक कार्य वेदोक्त पद्धतीने केली पाहिजेत. परंतु क्षत्रिय जातच नामशेष झाल्यामुळे तो प्रश्न येत नाही. हिंदु धर्माचे रक्षण शिवाजी महाराजांनी केले. म्हणून त्यावेळी गरज असल्यामुळे तत्कालीन ब्राम्हण समाजाने शिवछत्रपतींना क्षत्रिय म्हणून धर्मामध्ये असणारे सर्व अधिकार दिले. उलट काकणभर जास्तच दिले.

अशा स्थितीत भोसल्यांच्या कुलापेक्षा ज्यांचे कुळ कर्तबगारीने, ज्ञातीने व मानाने कमी आहे. अशा मराठी लोकांनी तक्रार करण्यात काही अर्थ नाही. शिवाजी महाराजांइतके त्यांचे कर्तृत्त्व नाही किंवा तेवढा त्यांचा पराक्रम नाही. श्री.शिवाजी महाराजांच्या वेळच्या मराठे लोकांच्या हल्लीच्या वंशजानी अशी काय थोर कृत्ये केली आहेत किंवा पुरावा मिळविला आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांना संतोषाने जे जातिधर्मासंबंधी अधिकार देण्यात आले. त्यापेक्षा अधिक अधिकार हल्लीच्या पुरूषांस महाराष्ट्रीयनांनी देण्यास कबूल व्हावे. हल्लींचा मनु फिरला आहे आणि परधर्मी सार्वभौम छत्राखाली एवढेच कार्य करणे आमच्या हाती आहे, असल्या समजुतीवर ही चळवळ चालली आहे. त्याचा विचार निराळा केला पाहिजे. आजच्या लेखात परंपरा कशी आहे हे सांगून हल्लीची चळवळ पूर्व निर्णयाशी किती विसंगत आहे व विरूद्ध आहे. एवढेच दाखवते आहे.[११३]

लोकमान्य टिळकांच्या २९ ऑक्टोबर १९०१ च्या दुसऱ्या लेखात ते म्हणतात की, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक व व्रतबंध वेदोक्त पद्धतीने झाला. परंतु त्यांच्या

घरातील सर्व संस्कार वेदोक्त पद्धतीने होत होते. यासंबंधी काही पुरावा नाही. सातारच्या महाराजांच्या घरात परंपरा आहे. मध्यंतरी विच्छिन्न झाली होती, असे म्हणण्यास पुरावा नाही. तिच्यावरून भोसले घराण्यातील संस्कार पुराणोक्त पद्धतीने होत होते असे दिसून येते. असे असताना सध्याच्या संस्थानिकांनी शिवछत्रपतींच्यापेक्षा आपली जातकुळी श्रेष्ठ समजून संस्थानात बेशिस्त निर्माण करणे गैर आहे.[११४] यासंबंधी टिळकांनी ब्राम्हण स्त्रियांचे संस्कार पुराणोक्त होतात, असे स्पष्ट केले असून त्यांना कुणी शूद्र म्हणत नाहीत असे म्हणतात. शिवछत्रपतीच्याप्रमाणे पराक्रम गाजवून आपण क्षत्रिय आहोत हे सध्याच्या संस्थानिकांनी सिद्ध करावे असे टिळकांना वाटत होते.

अशा संघर्षामुळे जातीत संघर्ष निर्माण होत जातील असी भीती टिळकांना वाटत होती. म्हणून वेदोक्त व पुराणोक्त वाद चुकीचा आहे, असे त्यांचे मत होते. वेदोक्त पद्धतीला मराठयांनी शास्त्र व सर्वमान्यता घेतली नाही, तर युरोपियन लोक जे वेदपठण करतात तशी मराठयांची अवस्था होईल, याला काही अर्थ राहणार नाही. असे टिळकांना यातून सूचित करावयाचे होते.

शाहूसारख्या छत्रपतींनी ब्रिटिशांचे मांडलिकत्व पत्करून राहावे हेही कदाचित लोकमान्य टिळकांना मान्य नसावे. म्हणूनच लोकमान्य टिळक म्हणतात की, महाराष्ट्रात मराठे लोकांना जो मान आहे. तो वाडवडिलांच्या शौर्यामुळे आहे. तसे शौर्य आज ते दाखवत नाहीत. देशाभिमान, धाडस असे गुण त्यांनी दाखविले तर त्यांना क्षत्रियाप्रमाणे मान मिळेल.[११५]

ब्राम्हण समाजाला हा अधिकार वर्णसंस्कारावर कसा मिळाला हे सांगताना टिळकांची भूमिका प्रतिगामी वाटते. ते म्हणतात, संस्काराच्या वेळी वैदिक मंत्र म्हणणे, ही ब्राम्हण समाजाची परंपरा आहे. हा जो काही त्यांना मान मिळतो. तो त्या समाजातील कार्यकर्ते पुरूष ज्या प्रमाणावर निपजतात त्या प्रमाणावर आहे, ही गोष्ट इतिहासावरून सिद्ध झाली आहे. असे असता केवळ अज्ञानाने किंवा मत्सराने एका जातीने दुसऱ्या जातीच्या विशिष्ट लक्षणाचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करावा. त्यास शहाण्या माणसांनी उत्तेजन देणे योग्य नाही. ब्राम्हणांनी वेदोक्त विधी केला नाही म्हणून त्याची इनामे वतने जप्त करणे न्यायास धरून नाही असे टिळकांना वाटत होते. हा निवाडा हिंदुस्थानातील राजाने निःपक्ष करावा, अशी अपेक्षा त्यांनी धरली आहे.[११६]

अशा प्रकारचा या दोन लेखाचा आशय होता, यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक टिळक स्वतः राष्ट्रीय वृत्तीचे, राष्ट्राभिमानी व स्वातंत्र्य चळवळीतील एक नेते असल्यामुळे राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीस सहकार्य करावे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी जसा आपला क्षत्रिय धर्म पणास लावला तसा सध्याच्या संस्थानिकांनी लावावा. त्यांना आपोआप वेदोक्त पद्धतीने संस्कार करण्याचा अधिकार प्राप्त होईल असे त्यांना सूचित करावयाचे होते.

अशारीतीने उघडपणे टिळकांनी राजोपाध्यांचा पक्ष घेतला. एक महारथी ब्राम्हण पक्षास मिळाला आणि वेदोक्तचा प्रश्न 'राजगृहापुरता' मर्यादित होता. त्याला सार्वजनिक स्वरूप आले. छत्रपतींना दिलेल्या धमकावणीच्या भाषेमुळे तर ब्राम्हण कोणत्या थरापर्यंत जाऊ पाहात आहेत, हे दिसून आले आणि गुंतागुंत अधिक झाली. एकंदर मराठे लोकांविषयी हेटाळणीची भाषा जरी कौशल्याने वापरली असली तरी ती मराठयांना चांगलीच बोचली. ते बिथरले होते. वास्तविक शिवाजी महाराजांच्या काळात वेदोक्ताबद्दलचा निर्णय लागला होता.

वेदोक्तचा अधिकार शिवाजी महाराजांच्या कुळास व त्यांच्याशी शरीरसंबंध असलेल्या कुळास असल्याचे सिद्ध झाले होते. शिवाजी महाराजांना क्षत्रियत्वाचे अधिकार दिले ते चुकीचे होते असे 'केसरी'चे म्हणणे असते तर मग अर्थातच त्यांच्या वंशजांना, नातलगांना ते मिळू शकत नाहीत. हे म्हणणे सरळ होते. परंतु शिवाजी महाराजांचे क्षत्रियत्व मान्य केल्यावर कोल्हापूर वा बडोदे या संस्थानांच्या अधिपतींनी वेदोक्ताचा अधिकार घेतला त्यावेळेस त्यांच्या कृत्याला खूळ म्हणणे हे तर्कविरोधी आहे. हा प्रश्न मुख्यतः समानत्वाच्या हक्काबद्दल व न्यूनगंड काढून टाकण्याबद्दलचा होता.[११७]

शृंगेरीच्या जगद्गुरु शंकरचार्यांनीही हेच मत दिले. केसरी व इतर वृत्तपत्रातून महाराजांच्यावर टिका होऊ लागली. तथापि महाराजांनी माघार घेतली नाही. लोकमान्य टिळकांनीही तडजोडीचा प्रयत्न केला. 'शिवछत्रपती क्षत्रिय ठरले होते, तर त्यांच्या गादीवर येणारा घाटगे घराण्यातील पुरूष असला तरी तो भोसले ठरतो. तेव्हा जो छत्रपतींच्या गादीवर बसेल तोच क्षत्रिय राजाचा दुसरा बंधू असेल तर तो क्षत्रिय नाही.' ही तडजोड महाराजांनी अमान्य केली. महाराष्ट्रातील इतर मराठा घराणी व छत्रपती यांच्यात दरी निर्माण करणारा विचार त्यांनी स्वीकारला नाही. या पुरोहितांनी महाराष्ट्रात महाराजांच्या विरूद्ध फळी तयार केली.

तथापि, महाराजांनी ही तडजोड स्वीकारली नाही. ब्राम्हण प्रवृत्तीला शरण जाणे म्हणजे आपण सुरू केलेल्या कार्यात अवसान घातकीपणाने माघार घेणे त्यांना वाटत होते. त्यामुळे सन १९०५ मध्ये त्यांनी राजोपाध्ये यांची सर्व इनामी गावे, जमिनी व वंशपरंपरागत असलेले हक्क काढून घेतले. जप्तीचे हुकूम दिले. दरबारी असलेल्या धर्मपंडित, पुरोहित, जोशी यांना धर्मादाय म्हणून दिलेली निरनिराळया गावांतील इनामी जमीन महाराजांनी जप्त केली. पुरोहित वर्गाने महाराजांना त्यांच्या या कृत्याबद्दल शाप लागण्याची भीती दाखविली. पण महाराज डगमगले नाहीत. राजोपाध्ये यांनी पोलिटिकल एजंट, मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकारकडे दाद मागण्याचा प्रयत्न केला. तथापि, त्यांना कोठेही यश आले नाही. या संघर्षात शृंगेरीच्या जगद्‌गुरू शंकराचार्यांनी ब्राम्हणांची बाजू घेतली तथापि, थोडयाच काळात महाराजांना क्षत्रिय म्हणून सांगण्यात, या गुरू–शिष्य शंकराचार्याची स्पर्धा सुरू झाली. महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शंकराचार्यांचे इनाम जप्त केले. त्यांची क्षात्रजगद्‌गुरूचे नवे पीठ निर्माण केले. त्या पीठावर मराठा जातीतील एका व्यक्तींची नेमणूक केली. 'पुरोहिताची शाळा' काढली. निरनिराळया जातीचे पुरोहित तयार केले. या नवीन शिकलेल्या पुरोहिताकडून निरनिराळे धार्मिक विधी करून घेण्यास सुरूवात केली. राजर्षी शाहू महाराजांच्या खंबीर नेतृत्त्वाखाली महाराष्ट्रातील बहुजन समाज एकत्र आला. ब्राम्हणांचे श्रेष्ठत्त्व नष्ट होत असल्याचे पाहून ब्राम्हण वर्ग संघटित झाला. यातूनच महाराष्ट्रात पुढील काळात ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर वादाला प्रारंभ झाला. हिदू धर्मातील आत्मघातकी संकुचितपणा सोडून देऊन सर्व जातीचा वेदविद्येचा अधिकार आपण मान्य केला पाहिजे. अशी शाहू महाराजांची धारणा होती. मात्र या बाबतीतील शाहू महाराजांची कार्यपद्धती अधिक वास्तववादी व व्यवहारनिष्ठ होती. जोतिबा फुले यांची पुरोहितच नको, ही सुधारणा लोकांच्या कितपत पचनी पडेल, याविषयी ते साशंक होते. म्हणूनच प्रथम धर्मकृत्यातील ब्राम्हणांची मक्तेदारी नाहीशी करण्याचे त्यांनी ठरविले. प्रत्येक जातीचा स्वतंत्र पुरोहित तयार केला. क्षात्रजगद्‌गुरू पीठाच्या स्थापनेतही त्यांची हीच मध्यममार्गी मक्तेदारीविरोधी दृष्टी होती.[११८]

या सर्व वेदोक्त प्रकरणात शाहू महाराजांनी आपल्या संयमाने व साध्या आणि मोकळया स्वभावाने मात केली. त्यांनी राजोपाध्यांची वारंवार समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तथापि, ब्राम्हणी पाठिंब्याच्या आधारावर केलेल्या वर्तनाने राजोपाध्यांनी आपल्या पायावर दगड

मारून घेतला. शंकराचार्य वादाविषयी महाराजांच्या भूमिकेचा विचार करता गुरू–शिष्यांच्या वादात धार्मिक प्रश्नाबाबत अंतिम निर्णय घेण्याच्या महाराजांच्या अधिकारावरच आक्रमण झाले होते. हे ध्यानात घेतले पाहिजे. महाराष्ट्राच्या वर्तनात संस्थानिकांची अरेरावी नाही किंवा धार्मिक श्रद्धाळू माणसांचा भोंगळ भाविकपणाही नाही. त्यांच्या संयमाची बीजे तत्कालिन सामाजिक परिस्थितीच्या व्यापक आकलनात आहेत. काळाची जी चाहूल लोकमान्य टिळकांना लागली नाही, ती राजर्षी शाहू महाराजांना लागली होती, असे मानता येते. हा वाद जुनाच असला तरी वेदोक्त प्रकरणातून जातिभेदाचे व जातिद्वेषाचे तसेच जाती निर्मूलनाच्या कार्याच्या आवश्यकतेचे समाजाला ज्ञान झाले. स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील सर्व जातींना समान अधिकार मिळण्यासाठी बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास होण्याची गरज तीव्रतेने भासू लागली. आपल्या अधिकारासाठी बहुजन समाज राजर्षी शाहू महाराजांच्या खंबीर नेतृत्त्वाखाली एकत्र आला. त्यातून समाजात सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रगती व जागृती होत गेली. बहुजन समाजाला निरनिराळी संधी व अधिकार पदे देऊन त्यांचा विकास घडवून आणण्याचे धोरण महाराजांनी पुढेही चालविले. या संघर्षात त्यांनी ब्राम्हण जातीला विरोध केला नाही तर ब्राम्हणाच्या प्रवृत्तीला प्रमुख विरोध केला असे दिसते.

**ताई महाराज प्रकरण**

राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक या दोघांच्या जीवनातील ताई महाराज प्रकरण ही एक महत्त्वाची घटना मानली जाते. या घटनेमुळे पुढे या दोघांच्यात मैत्री घडून आलेली होती. या प्रकरणामुळे लोकमान्य टिळकांनी आपल्या आयुष्यातील अखेरची वीस वर्षे सतत दडपणाखाली घालविली. यात त्यांना अतिशय मानसिक आणि शारीरिक कष्टात आर्थिक विवेचन व ब्रिटिश सरकारच्या अपमानकारक दडपणाखाली काढावा लागला होता.

वासुदेव हरी उर्फ बाबामहाराज पंडित हे पुण्यातील एक जहागीरदार होते. त्यांची मालमत्ता व जमीन पुणे, बेळगाव, रत्नागिरी व कोल्हापूर येथे होती. वासुदेव हरी व लोकमान्य टिळक यांची मैत्री १८८८ पासून होती. बाबा महाराज पंडित यांचा पहिला विवाह औंधच्या पंतप्रतिनिधीच्या कन्येबरोबर झाला होता. त्यांना दोन मुली होत्या. त्यातील एक मुलगी टिळकांचे जवळचे सहकारी दादासाहेब खापर्डे याच्या मुलाला दिली होती. पहिल्या पत्नीच्या

अकाली मृत्यूनंतर बाबा महाराजांनी सिन्नरकर यांच्या मुलीशी विवाह केला. सिन्नरकर यांच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. त्यांच्याच मुलीचे नाव ताई महाराज होते.

बाबा महाराज हे कॉलेऱ्याने आजारी पडले. त्यावेळी ५ ऑगस्ट १८९७ रोजी लोकमान्य टिळक त्यांना भेटण्यासाठी गेले. ७ ऑगस्ट रोजी बाबा महाराजांची तब्बेत खूपच बिघडली. आपला मृत्यू त्यांना समोर दिसू लागला. त्यावेळी त्यांची पत्नी गरोदर होती. तिला मुलगा होईल व संपत्तीला वारस मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु ती आशा फलद्रूप झाली नाही. अशा वेळी बाबा महाराजांनी टिळकांना आपले मृत्यूपत्र तयार करण्यास सांगितले. हे मृत्यूपत्र लोकमान्य टिळकांनी तयार केले. त्यामध्ये पुढील मजकूर होता, 'आमचे कुटुंब सौ सकवारबाई हल्ली गरोदर आहे. तिस पुत्र न झाल्यास किंवा होऊन तो अल्पायुषी झाल्यास आमचे घराण्याचे नाव चालविण्यासाठी यथाशास्त्र जरूर लागेल तितक्या वेळेस आमचे कुटुंबाने मांडीवर दत्तक वर लिहिलेल्या गृहस्थाचे विचार घेऊन त्या मुलाचे वतीने तो वयात येईपर्यंत सदर पंचानी(ट्रस्टी) स्थावर जंगम इस्टेटची व्यवस्था करावी.' विश्वस्त म्हणून टिळकांनी काम पहावे. अशी बाबा महाराजांची इच्छा होती. शेवटी इच्छा नसतानाही टिळकांनी त्यास होकार दिला. त्यामुळेच या प्रकरणात ते शेवटपर्यंत गुंतुन राहिले. शेवटी सकाळी बाबांनी टिळकांच्याबरोबर व्याही गणेश श्रीकृष्ण खापर्डे बळवंत मार्तंड नागपूरकर, श्रीपाद सखाराम कुंभोजकर आणि रावसाहेब कीर्तीकर यांनीही विश्वस्त राहावे, अशी इच्छा व्यक्त केली. रावसाहेब किर्तीकरांनी त्यास नकार दिला. त्यामुळे बाकीचे चार विश्वस्त शेवटपर्यंत राहिले.[११९]

७ ऑगस्ट १८९७ या दिवशी बाबा महाराजांचा मृत्यू झाला. त्यांचा मृत्यू म्हणजेच लोकमान्य टिळक आणि राजर्षी शाहू या दोन महापुरूषांच्या आयुष्यातील एक महाभयंकर दिव्याचा जन्म होता, असेच म्हणावे लागेल. बाबा महाराजांच्या मृत्यूनंतर लगेच पाच महिन्यानी १८ जानेवरी १८९८ रोजी ताई महाराजांना मुलगा झाला. परंतु तो ९ मार्च १८९८ रोजी मरण पावला. त्यामुळे आता वारसच उरला नाही. तेव्हा ताई महाराजांभोवती संपत्तीच्या लोभाने स्वार्थी लोक जमा होऊ लागले. ताईंनी कोल्हापूर शाखेतील दत्तक घ्यावा असे कोल्हापूर संस्थानचे दिवाण कुवरजी यांच्यामार्फत मुद्दा पुढे आला परंतु त्यांचे नावास ताईनी नकार दिला. ताईंनी आपला मुलगा दत्तक घ्यावा. यासाठी गणेश श्रीकृष्ण खापर्डे, नागपूरचे कुंभोजकर,

कोल्हापूर संस्थानातील रघुपती पंडित महाराज हे आपल्या धाकटया भावास दत्तक घ्यावे म्हणून प्रयत्न करीत होते.

वरील प्रकरण घडले त्यावेळी लोकमान्य टिळक हे राजद्रोहाखाली अटक होऊन ते तुरूंगात होते. त्यांची ७ सप्टेंबर १८९९ रोजी सुटका झाली. त्यामुळे या प्रकरणात आणखीची भर पडली. टिळकांनी ताई महाराजांना कोल्हापूर संस्थानातील मुलगा दत्तक घ्यावयाचा नाही असे स्पष्ट केले. कारण संस्थानातील वातावरण सामान्यतः दूषित आहे. त्यातूनही कोल्हापूरात ती आपत्ती विशेष. कोल्हापूर शाखापैकी एक–दोघा प्रौढ मुलांनी अगोदरच अपकीर्ती करून ठेवलेली होती आणि अशा गोतावळयातल्या व गुंतागुंतीतला मुलगा दत्तक घेतला तर तो पुढे–मागे वाईट सल्लागारांच्या हाती पडून इस्टेटीचे वाटोळे करील. आपल्या मित्राचे घर निष्कर्जी करून सुशिक्षित लौकिकवान अशा मुलाच्या आधारावर उभे राहून त्याला शक्य तितके देशसेवेला लावावी ही तर टिळकांची इच्छा, अर्थात निष्फळ होईल या भीतीने त्यांनी दूर निजामशाहीतील मुलगा दत्तक घ्यावा, असा मनाशी विचार केला होता.

ताई महाराजांना क्षयाची लागण होताच टिळकांनी आपल्या नेतृत्त्वाखाली विश्वस्त मंडळीच्या हालचाली वाढल्या. आता दत्तक मुलगा निवडण्यासाठी गडबड केली पाहिजे. असे सर्वांना वाटू लागले टिळकांनी निजामशाहीतील मुलगा दत्तक घेण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली होती. १८ जून १९०१ रोजी विश्वस्तांची बैठक होऊन त्या औरंगाबाद येथील दत्तक मुलगा निवडण्यासाठी गेले असता तेथे पाच मुले ताई महाराजांना दाखविण्यात आली. त्यातील जगन्नाथ नावाचा मुलगा दत्तक घेण्यासाठी निवडण्यात आला. २४ जून रोजी दादासाहेब खापर्डे हे अमरावतीस निघून गेल्याने दत्तक विधानाची जबाबदारी लोकमान्य टिळकांच्यावर येऊन पडली. २७ जून १९०१ रोजी सहा वर्षाचा मुलगा जगन्नाथ यास ताईसाहेबांना दत्तक देण्यात आला. दत्तक विधानाच्या कागदपत्रावर जगन्नाथाचे वडील भाऊसाहेब देव व ताई महाराज यांच्या सहया झाल्या. या कार्यक्रमासाठी औरंगाबादमधील प्रतिष्ठित व्यक्ती हजर होत्या.[१२०]

बाबासाहेबांच्या मालमत्तेतील बराचसा भाग कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीत होता आणि ती मालमत्ता कोल्हापूरच्या छत्रपतींच्या घराण्याला देणगी दिलेली होती. त्यामुळे ताई महाराज यांनी औरंगाबादमध्ये जो दत्तक घेतला त्याला कोल्हापूर छत्रपतींची म्हणजेच राजर्षी शाहू महाराजांची मान्यता घेणे आवश्यक होते. त्यासाठी टिळकांनी दिवाण सबनीस यांना पुण्याहून

पत्र पाठविले. ते पत्र दिवाण सबनीसांनी राजर्षी शाहू महाराजांना दाखविले. राजर्षी शाहू महाराजांना या प्रकरणात अजिबात स्वारस्य नव्हते.

औरंगबादचे जगन्नाथ याचे दत्तकविधान ताईमहाराजांनी पुण्यात आल्यावर नाकारण्यास सुरूवात केली. यास कारकून बळवंतराव नागपूरकर यांचा हात होता. असे करण्यामागे हा दत्तक विधी ताई महाराजांना मान्य नव्हता त्यांना कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांचे राजगुरू रघुपती पंडित यांचे धाकटे बंधू बाळामहाराज यांना दत्तक घ्यायचे होते. त्यापूर्वी ताई महाराजांनी ६ जुलै १९०१ रोजी ऑस्टन यांना भेटून टिळक आणि इतर विश्वस्तांचे बाबा महाराजांच्या मालमत्तेचे विश्वस्त म्हणून असणारे हक्क रद्द करावेत अशी मागणी केली होती. लगेच दुसऱ्या दिवशी त्यांनी टिळकासंहित सर्व विश्वस्तांना तशी नोटीस दिली होती. त्यात लिहिले होते की, ‘मला मुलगा होऊन तो वारला म्हणून बाबामहाराजांचे मृत्यूपत्र यापुढे रद्द ठरते. त्यामुळे विश्वस्तांनी माझ्या मालमत्तेत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप यापुढे करू नये.’ तशा प्रकारचा अर्जदेखील त्यांनी डिस्ट्रीक्ट जज्ञ ॲटन यांच्याकडे केला.

१० जुलै १९०१ रोजी ताई महाराजांनी कोल्हापूर दरबाराकडे बाळामहाराजांना दत्तक घेण्याची परवानगी मागितली होती. कोल्हापूर दरबाराने त्यांना तारेने मंजूरी दिली. त्याप्रमाणे ताईमहाराजांनी बाळामहाराज व त्यांच्या मातोश्री यांना आपल्या पुण्यातील वाडयात बोलावून घेतले. १३ जुलै १९०१ रोजी ताई महाराजांच्या वाडयात बाळामहाराजांचा दत्तकविधान समारंभ पहाटे उरकून घेण्याचे ठरले. कारण टिळक आणि इतर विश्वस्तांना हे जर माहीत झाले तर, हा समारंभ होऊ देणार नाहीत. याची खात्री झाली होती. शेवटी ही बातमी टिळकांना समजताच त्यांनी हा कार्यक्रम उधळून लावण्यासाठी आपल्याबरोबर काही व्यक्ती घेऊन वाडयात आले.

ताई महाराज यांच्या पुण्यातील वाडयात एका बाजूस ताई महाराज, बळवंतराव नागपूरकर, राजगुरूरघुपती पंडितमहाराज, बाळामहाराज आणि दुसऱ्या बाजूस बाळ गंगाधर टिळक, दादासाहेब खापर्डे आणि पुण्यातील इतर काही आसामी असे दोन पक्ष एकमेकासमोर उभे राहिले. ताई महाराजांनी, हा वाडा माझा असल्यामुळे येथे कोणास बोलवावयाचे हे मी ठरवणार, अशी आक्रमक भूमिका स्वीकारली. परंतु शेवटी टिळक पक्षाचीच सरशी होऊन कोल्हापुरकर मंडळींना ताई महाराजांचा वाडा सोडावा लागला. कोल्हापूकरांनी हा वाडा सोडल्यावर तीन दिवस कडक पहारा बसविला होता. हे सर्व नाटय घडण्यापूर्वी ताई महाराज हे

जे दुसरे दत्तकविधान करीत आहेत, ते पूर्ण बेकायदेशीर आहे, अशा तारा व पत्रे टिळकांनी राजर्षी शाहू महाराजांच्या दिवाण सबनीसास पाठविली होती.[१२१]

ताई महाराजांनी बाळामहाराजांना दत्तक घेण्यापूर्वी शाहू महाराजांची परवानगी मागितली होती. आपले राजगुरू आणि परममित्र असणाऱ्या रघुपतीमहाराजांचा भाऊ दत्तक घेतला जातो आहे, हे पाहिल्यावर शाहू छत्रपतींनी त्याला आनंदाने परवानगी दिली. त्यामुळे हा दत्तक समारंभ कोल्हापूर येथे घडवून आणण्याची तयारी सुरू झाली. ही बातमी लोकमान्य टिळकांना समजली. म्हणून लोकमान्य टिळक १५ ऑगस्ट १९०१ रोजी कोल्हापूरात शाहू छत्रपतींची भेट घेण्यासाठी आले. ताई महाराज पुण्याहून कोल्हापूरात येण्यापूर्वीच टिळकांनी १६ ऑगस्ट रोजी शाहू महाराजांची भेट घेतली व सांगितले की, ताई महाराजांनी बाळा महाराज यांना दत्तक घेण्याचा जो प्रयत्न सुरू केला आहे तो शाहू महाराजांनी थाबवावा. १८ ऑगस्ट रोजी पुन्हा शाहू महाराजांची भेट घेऊन तेच सांगितले. तरीही १९ ऑगस्ट १९०१ रोजी ताईमहाराजांना बाळा महाराज दत्तक देण्याचा समारंभ कोल्हापूरात शाहू महाराजांच्या उपस्थितीत पार पडला. १५ ऑगस्टपासून चार–पाच दिवस टिळक तेथे राहिले.

ताई महाराजांनी शाहू महाराजांच्या पाठिंब्याने बाळा महाराजांना दत्तक घेतले होते व हा कार्यक्रम व्यवस्थितरित्या पार पाडला होता. तेव्हा लोकमान्य टिळकांनी ताई महाराजांचे हे दुसरे दत्तकविधान बेकायदेशीर आहे, असा दावा २३ सप्टेंबर १९०१ रोजी दिवाणी कोर्टात केला. यापूर्वीच ताई महाराजांनी टिळक, खापर्डे, कुंभोजकर, यांचा खटला रद्द करावा. असा अर्ज २९ जुलै १९०१ रोजी न्यायाधीश ॲस्टन यांच्याकडे केला होता. त्याचा निकाल ताई महाराजांच्याप्रमाणे लागला होता. म्हणून लोकमान्य टिळकांनी त्याविरूद्ध मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली. या न्यायालयातील न्यायाधीश क्रो आणि बॅटी यांनी ॲस्टन यांचा निकाल फिरवून टिळकांच्या बाजूने १९ ऑगस्ट १९०२ रोजी निर्णय दिला. या खटल्यातील टिळकांचा हा पहिलाच दिवस होता. परंतु ॲस्टन यांची शिफारस मान्य करून टिळकांच्यावरील फौजदारी खटला तसाच चालू ठेवला. यावेळी टिळकांच्यावर दोन आरोप लावण्यात आले होते ते म्हणजे टिळकांनी औरंगाबाद येथे झालेल्या दत्तकविधानासंबंधी खोटी साक्ष दिली आणि त्यांनी ताई महाराजांना कोंडून ठेवले होते. टिळकांच्यावतीने सातारचे वकील दादासाहेब करंदीकर हे वकीली करीत होते. या खटल्यात टिळकांना मोठा आर्थिक खर्च आलेला होता.

शेवटी न्यायाधीश क्लेमेंट यांनी २४ ऑगस्ट १९०३ रोजी या खटल्याचा निकाल टिळकांच्या विरोधातच दिला. त्यांनी खोटी साक्ष दिली आणि ताई महाराजांना कोंडून ठेवले या आरोपाबद्दल दोषी ठरवून टिळकांना दीड वर्षाची सक्तमजूरीची आणि एक हजार रूपये दंडाची शिक्षा झाली. थोडयाच वेळात त्यांचा जामीन मंजूर होऊन सुटका झाली.

पुढे लोकमान्य टिळकांनी सत्र न्यायाधीश ल्यूकस यांच्या न्यायालयात टिळकांनी केलेल्या अपिलासंबंधीचा खटला सुरू होण्यापूर्वी ३० सप्टेबर १९०३ रोजी ताई महाराजांचा मृत्यू झाला. ताई महाराजांचा शाहू महाराजांना पूर्ण विश्वास होता. म्हणून त्यांनी आपल्या मृत्यूपूर्वी लिहिलेल्या पत्रात ताई महाराजांच्या एकूण उत्पन्नातून ५००० रूपये देण्याची व्यवस्था करावी, असे कळकळीने सांगितले होते.[१२२]

ल्यूकस यांच्या सत्र न्यायालयात ४ जानेवारी १९०४ रोजी टिळकांनी दाखल केलेल्या अपिलाचा निकाल लागून टिळकावरील खोटी साक्ष दिल्याचा आरोप सिद्ध होऊन त्यांना ६ महिन्यांची शिक्षा व १००० रू.दंड करण्यात आला. ते चार दिवस तुरूंगात होते. पुढे टिळकांनी उच्च न्यायालयाकडे धाव घेतली. येथे मात्र टिळकांची सर्व आरोपातून निर्दोष मुक्तता झाली. तसेच टिळकांनी २३ सप्टेंबर १९०१ रोजी कोल्हापूरात झालेले बाळा महाराजांचे दत्तकविधान बेकायदेशीर ठरविण्यासाठी टिळकांनी दावा केला होता. त्याचा निकाल ३१ जुलै १९०६ रोजी टिळकांच्या बाजूने झाला. त्या निकालात न्यायाधीश जव्हेरीलाल ठाकोर यांनी जगन्नाथ महाराज यांच्या औरंगाबाद येथे झालेल्या दत्तकविधानाला मान्यता दिली. या निकालावर बाळा महाराज पंडित यांनी  मुंबई येथील उच्च न्यायालयात दाद मागितली. न्यायमूर्ती नारायण चंदावरकर आणि हिटन यांनी फिरवून त्यामध्ये ताई महाराजांच्यावर जगन्नाथ यास दत्तक घेण्यास टिळक आणि खापर्डे यांनी दडपण आणले होते, असा निष्कर्ष काढला.

शेवटी टिळकांनी न्यायमूर्ती नारायण चंदावरकर आणि हिटन यांनी दिलेल्या निकालाविरूद्ध आपले हिंदू धर्मशास्त्र आणि कायद्याचे ज्ञान पणास लावले व प्रीव्ही कौन्सिलकडे दाद मागितली. प्रीव्ही कौन्सिलने २६ मार्च १९१५ रोजी न्यायमूर्ती नारायण चंदावरकर आणि हिटन यांचा निकाल रद्द ठरवून या खटल्यात टिळकांचा अंतिम विजय झाला. अशाप्रकारे टिळकांची या भयंकर दिव्यातून सुटका झाली. लोकमान्य टिळकांच्या बाजूने लागलेला हा निकाल शाहू महाराजांना खूप त्रासदायक आणि अपमानकारक ठरला.

थोडक्यात या प्रकरणात टिळकांना न्यायदेवतेने न्याय दिला असला तरी त्यांची या प्रकरणातील भूमिका सर्वस्वी योग्य होती असे म्हणता येणार नाही. कोणत्याही परिस्थितीत कोल्हापूर संस्थानातील मुलगा दत्तक घ्यावयाचा नाही, कारण तो बाबा महाराजांची मालमत्ता व्यवस्थित सांभाळणार नाही, तिची विल्हेवाट लावून टाकील हा टिळकांचा विचार होता. त्यामुळे दत्तक मुलगा हा कोल्हापूर संस्थानाबाहेरचाच घ्यायचा हा हट्ट कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरत नाही. तसेच हिंदू धर्मशास्त्राचा अभ्यासाच्या जोरावर औरंगाबाद येथे जगन्नाथ महाराज यांचा दत्तकविधान समारंभ घडून आणला होता. हे टिळकांनी सिद्ध केले होते.

शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक या उभयतांना परस्परांबाबत आदर होता. इतकेच नव्हे, तर त्यांनी परस्परांना एकमेकांच्या अडचणीच्या प्रसंगी मदत केल्याचे काही उदाहरणे प्रबोधनकार ठाकरेसारखे समकालीन लेखक देतात. दुर्दैवाने शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक या महापुरूषांच्या आयुष्यात 'वेदोक्त प्रकरण' व 'ताई महाराज प्रकरण'हे जे दोन महत्त्वाचे अध्याय घडून आले त्यामध्ये यांच्यातील तणाव आणि गैरसमज वाढतच गेला. त्याचे वाईट परिणाम केवळ या पुरूषांच्या व्यक्तिगत आयुष्यापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्राला, नव्हे तर देशालाही सहन करावे लागले, हे मान्य करावे लागते.[१२३]

या प्रकरणात शाहू महाराज व लोकमान्य टिळक या दोघाही महापुरूषांना कसलाही व्यक्तिगत स्वार्थ नव्हता. उलट लोकमान्य टिळकांच्याप्रमाणेच शाहू महाराजांनाही आपला खूप पैसा खर्च करावा लागला होता. त्याचबरोबर त्यांना मानसिक आणि शारीरिक त्रासही सहन करावा लागला होता. परंतु या संपूर्ण प्रकरणात त्यांना स्वतःला कसलाही लाभ झाला नाही. लोकमान्य टिळकांनी आपले मित्र बाबा महाराज यांच्याशी असलेल्या मैत्रीचे पालन करण्यासाठी या प्रकरणात सर्वस्व झोकून दिले होते. हे जसे खरे, तसेच शाहू महाराजांनीही आपले राजगुरू रघुपती पंडित उर्फ पंडित महाराज यांच्याशी असलेल्या अतूट मैत्रीखातर या प्रकरणात सर्व शक्ती एकवटून संघर्ष करीत होते. शाहू महाराजांचे या बाळा महाराजांच्या कुटुंबाशी जिव्हाळयाचे संबंध होते.

## ४.४ समारोप

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर सातत्याने वेगवेगळया सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळीमध्ये भाग घेऊन भारतीय लोकांच्या जीवनामध्ये बदल घडवून

आणण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारणासाठी उभी केलेली डिप्रेस्ड क्लास मिशनची चळवळ ही त्यातील सर्वात मोठी चळवळ होती व ते शिंदे यांचे जिवितकार्य ठरले. त्यांनी लोकमान्य टिळक व विशेषतः महात्मा गांधी यांच्या चळवळींना पाठिंबा दिला. महात्मा गांधीजीनी सुरु केलेल्या चळवळीत भाग घेऊन कारावास सोसला. व्हायकोम सत्याग्रहासारख्या महत्त्वाच्या सत्याग्रहात त्यांची प्रखर नैतिक भूमिका स्पष्ट झाली. शेतकरी चळवळीत भाग घेऊन त्यात नवे राजकीय विचार आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेतकरी हा एक समग्र समाजघटक नसून त्यात वर्गीय विभाजन होत आहे, हे त्यांनी जाणले होते.

या महत्त्वाच्या सामाजिक व राजकीय चळवळीबरोबरच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रीशिक्षण, होलिका उत्सव, मद्यपान बंदी व मुरळी प्रथा या विषयावरही चळवळी करून आपले सांस्कृतिक जीवन जास्त शुद्ध आणि आनंददायी करण्याचा प्रयत्न केला. मद्यपानामुळे समाजाच्या नैतिकतेचा ऱ्हास होतो. पण त्याचे काही आर्थिक पैलू आहेत. हे त्यांनी ओळखले होते. होळीचा सण हा खरे तर निरामय आनंदाचा सण पण त्यात बीभत्सपणा निर्माण झाला आहे. तो दूर करून त्यात शुद्ध आनंद देणारा सांस्कृतिक आशय समाविष्ट करावा, असे शिंदे यांचे सांगणे होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे केवळ एकाच गोष्टीवर किंवा एकाच सुधारणेवर भर देणारे सुधारक नव्हते. तर ते जीवनाकडे समग्र दृष्टिकोणातून पहात होते, हे त्यांच्या वेगवेगळया चळवळीवरून आपल्या लक्षात येईल.

राजर्षी शाहू महाराज हे नुसतेच बोलके समाज सुधारक नव्हते तर त्यांनी प्रत्यक्ष कृती करून अस्पृश्यांच्या सुधारणा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासाठी त्यांनी अस्पृश्यांना संस्थानच्या नोकरीत सहभागी करून घेतले. प्रगतीची संधी देऊन व सामाजिक प्रतिष्ठा देण्यास सुरूवात केली. महार समाजातील काहींना माहूत म्हणून कामावर घेतले. आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या विवाह सोहळयाच्यावेळी वरातीत सरकारी घोडागाडीवर अस्पृश्य व्यक्तीला कोचमन म्हणून बसविले. तसेच बलुतेदाराची व वेठबिगाराची पद्धत कायद्याने बंद केली. गंगाराम कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापूरात मध्यवस्तीत चहाचे दुकान काढून दिले. अशा प्रकारच्या अनेक समाजसुधारणा करून राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाबरोबरच महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारण चळवळ तेवत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक व धार्मिक सुधारणाबरोबरच स्त्री उन्नतीसाठी अनेक कायदे केले. न्या.रानडे, लोकहितवादी, लोकमान्य टिळक यांच्या तुलनेत राजर्षी शाहू महाराज हे कर्ते सुधारक ठरतात. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाचे समर्थन करून न थांबता राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कुटुंबात तसा विवाह करण्याचे धाडस केले. विवाहाचे वय, शारीरिक सक्षमता, यांचा विचार करून बालविवाह थांबविले. मुलींच्या शिक्षणाचा विचार करून स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले राजाराम कॉलेजमध्ये मुलींना फी माफ केली होती. वारसाहक्क, घटस्फोटाचे हक्क, परंपरेने स्त्रीला नाकारले. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी असे हक्क बहाल करणारा कायदा केला. व स्त्रीमुक्ती स्त्रीदास्य अंतास हातभार लावला. विधवा पुनर्विवाह करण्याचे धाडस करून त्यासही कायदेशीरपणा प्राप्त करून दिला.

## संदर्भ

१. पवार बा.ग., एक उपेक्षित महामानव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, मातृभूमी प्रकाशन, पुणे, २०१०, पृ.२३

२. ठोंबरे तानाजी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी, लोकवाङ्मयगृह मुंबई, फेब्रुवारी २००९, पृ.३,४

३. कित्ता, पृ. ७, ८

४. चौसाळकर अशोक, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे धर्मविषयक विचार, लोकवाङ्मयगृह मुंबई, फेब्रुवारी २००९, पृ. ९, १०

५. पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, लोकवाङ्मयगृह, मुंबई, मे २००४, पृ. १७२

६. भोळे भा.ल., महर्षी शिंदे यांचे विचार विश्व, प्रकाशन रयत शिक्षण संस्था, सातारा, २००१, पृ.४१

७. पवार गो.मा., उपरोक्त, पृ.१७३

८. शिंदे भानुदास(संपा.), महाराष्ट्रः काल, आज आणि उद्या, मधील चोरगे वैशाली दशरथ यांचा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य हा शोधनिबंध, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, २००४, पृ.१७२

९. गाठाळ एस.एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, २००५, पृ. ४१

१०. पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, नॅशनल ट्रस्ट बुक इंडिया, नवी दिल्ली, २००७, पृ. २९, ३०

११. मुलाखत–शेख इकबाल जहांगीर, मुख्याध्यापक, म.न.पा.शाळा नानापेठ पुणे शहर

१२. पवार बा.ग., उपरोक्त, पृ.२३

१३. मुलाखत–प्रा.म्हस्के जे.के., पुणे शहर व मानिक दशरथ, नाना पेठ, पुणे

१४. भोसले एस. एस. आणि सावंत (संपा.), कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे जन्मशताब्दी स्मृतिग्रंथ,श्री.रा.शं. माने, कोल्हापूर, १९७४ पृ.११८

१५. मुलाखत–तायडे संभाजी सुदाम, प्रभारी प्राचार्य, पुणे शहर

१६. मुलाखत–शेवाळे मधुकर धर्माजी, जनरल सेक्रेटरी, डी.सी.एम. सोसायटी, पुणे महाराष्ट्र
१७. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, १९९९, पृ. १९९
१८. ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.१९
१९. कित्ता, पृ.२०
२०. नाईकवाडे अशोक(संपा.), महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शोध व बोध, ज्ञानेश प्रकाशन औरंगाबाद, पृ.१०५
२१. बांगर राहूल कैलास, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्पृश्य मुक्ती मार्ग एक चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित एम.फिल. लघु शोधप्रबंध, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पृ.१०५
२२. ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.२३, २४
२३. पवार गो.मा., उपरोक्त, पृ. ३२४
२४. The Reformrs Committee(Franchyaes) Vol.II, Superitedent printing Press, India, 1919, P.6754, 6733
२५. पवार गो.मा., उपरोक्त, पृ. ३९६
२६. ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.२७, २८
२७. पवार गो.मा., उपरोक्त, पृ. ४४७
२८. ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.४०, ४१
२९. पवार गो.मा., उपरोक्त, पृ. ४४७
३०. कित्ता, पृ.४४७, ४४८
३१. ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.३५, ३६
३२. कित्ता, पृ.३६, ३७
३३. देशमुख रा.ज. व देशमुख सुलोचना, निवडक : श्री.म.माटे, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., पुणे, २५ डिसेंबर २००७, पृ. प्रास्ताविक १४
३४. कित्ता, पृ. प्रास्ताविक ११
३५. ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.५५
३६. कित्ता, पृ.५५, ५६

३७. कित्ता, पृ.५७

३८. पवार गो.मा., उपरोक्त, पृ. ३५९, ३६०

३९. कित्ता, पृ.३५९, ३६०

४०. ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.४४, ४५

४१. कित्ता, पृ.५८, ५९

४२. कित्ता, पृ.६२

४३. सूर्यवंशी कृ.गो. राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी १९८४, पृ.११७ ते १२४

४४. कित्ता, पृ. १२७, १२८

४५. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतिकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११ पृ.११४

४६. मुलाखत–चौले डी.आर., अधिक्षक, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, कोल्हापूर

४७. मुलाखत–मुजावर मुस्ताक चाँदसो, सिनीयर लिपीक, मोहमेडन मुस्लिम बोर्डिंग, कोल्हापूर

४८. मुलाखत–चौगुले आर.अे., अधिक्षक, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर

४९. कोल्हापूर संस्थान, प्रशासकीय अहवाल, १९१२–१३, पृ. ३

५०. मुलाखत–कांबळे राजाराम वसंत, अधिक्षक, श्री इंदुमती विद्यार्थी वसतिगृह, कोल्हापूर

५१. दि. मोहमेडन एज्युकेशन सोसायटी, प्रशासकीय अहवाल, १९०७–०८,पृ.२

५२. मुलाखत–मुजावर मुस्ताक चाँदसो, सिनीयर लिपीक, मोहमेडन मुस्लिम बोर्डिंग, कोल्हापूर

५३. कोल्हापूर संस्थान, प्रशासकीय अहवाल, १९०७–०८, पृ. २

५४. Report on the General Administration of the Kolhapur state : 1907-08, P.70¸ 71 व

विणकरे सुधाकर संभाजी, अधिक्षक, मिस क्लार्क होस्टेल, कोल्हापूर

५५. मंगुडकर मा.प.(संपा.) महाराष्ट्रातील समाज–प्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य, प्रकाशक ग.ज.अभ्यंकर, कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७५, पृ.५१ ते ५४

५६. करवीर सरकारचे गॅझेट, भाग – १, शनिवार दि. २६ जुलै १९०२, पृ. १७६

५७. Report on the General Administration of the Kolhapur state : 1906-07, P.72¸ 73

५८. साळुंखे नानासाहेब– शाहूच्या आठवणी, कृष्णाली प्रकाशन कोल्हापूर, २०१२, पृ. ७२

५९. धाटावडकर भास्कर(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई, १९८८, पृ. ४१, ४५

६०. पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू ग्रंथ, प्रकाशक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २६ जून २००७, पृ. ७४

६१. दिल्ली दरबार मेमोरियल पाटील स्कूल, प्रशासन अहवाल, १९१२–१३, पृ.५५

६२. कित्ता, पृ.१७६

६३. कोल्हापूर संस्थान, प्रशासकीय अहवाल, १९१५–१६, पृ.४२

६४. कित्ता, पृ.४३

६५. कोल्हापूर संस्थान, प्रशासकीय अहवाल १९१८–१९, पृ. ४५

६६. कित्ता,पृ.४५

६७. कोल्हापूर संस्थान, प्रशासकीय अहवाल, १९२१–२२, पृ.५२

६८. कोल्हापूर संस्थान, प्रशासकीय अहवाल, १९१९–२०, पृ.५३

६९. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.६०८

७०. कित्ता, पृ.६१२ ते ६१७

७१. संगवे विलास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कार्य व प्रभाव, एक्सप्रेस पब्लिसिंग हाऊस सोलापूर, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर २००१, पृ.३२

७२. कोल्हापूर संस्थानांचा शिरगणती अहवाल, १८९१ व १९२१

७३. सूर्यवंशी कृ.गो. उपरोक्त, पृ.१९२ ते १९८

७४. कोल्हापूर रेकॉर्ड ऑफिस फाईल नं. ४३, शाहूची आज्ञा, १२ जून १९२०

७५. सूर्यवंशी कृ.गो. उपरोक्त, पृ. १९९

७६. कित्ता, पृ.३६९ ते ३७५

७७. सूर्यवंशी ग.सु. , राजा शाहू व समाज प्रबोधन– पृ.३८

७८. लठ्ठे आ.ना., श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, बेळगाव १९२५, पृ.९१ ते ९४

७९. पाटील शामराव, धाटावडकर भास्कर, राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश भाग–१, मुंबई १९८८, पृ.१३९
८०. डॉ.पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.७१ ते ८४
८१. साळुंखे पी.बी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ मुंबई १९७६, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, पृ.१६५
८२. आढाव विलास, समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २८ नोव्हेंबर २००३, पृ.१७
८३. करवीर सरकारचे गॅझेट, भाग – १, १२ जुलै १९१९, पृ. १००
८४. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दहावी आवृत्ती, १९९३, पृ.४५
८५. करवीर सरकारचे गॅझेट, भाग – १, २० मार्च १९२०, पृ. ४०
८६. मून वसंत(संपा.), डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९०, पृ.१ व ९
८७. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.६०८
८८. कित्ता, पृ.६१२ ते ६१७
८९. संगवे विलास, उपरोक्त, पृ.३२
९०. चौथाईवाले सुरेश यशवंतराव, शाहू महाराजांचे आरक्षणाचे धोरण व सद्यास्थिती, कैलास पब्लिकेशन्स, औरंगापुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,जानेवारी २००४, पृ.३०
९१. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.११५, ११६
९२. कित्ता, पृ.११५, ११६
९३. कित्ता, पृ.११६
९४. साप्ताहिक, विजयी मराठा, मुंबई, २१ जानेवारी १९२४
९५. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.७०४
९६. बागल माधव खंडेराव, सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ १९३०, प्रथमावृत्ती, १९३३, पृ. १३४
९७. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.७१६

९८. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ.११५

९९. चौथाईवाले सुरेश यशवंतराव, उपरोक्त, पृ.२७

१००. सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी १९८४, पृ.६४०

१०१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २०११, पृ.१८६

१०२. पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन, पुणे, २६ जून २०१२, पृ.१०४

१०३. कित्ता, पृ.१०४

१०३अ) Administrative Reports from 1893 to 1922

१०४. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.१०५

१०५. कित्ता, पृ.१०५

१०६. सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी १९८४, पृ.६४०

१०७. Kolhapur State P.W.D. Report on the Maharani Laxmibai Tank at Fejivada, 1909

१०८. कोल्हापूर संस्थान सर्वसाधारण अहवाल, १९१६–१९१७, पृ.२८

१०९. Kolhapur Archives Series Descriptive Catalogue: Vol. 4.

Kunte B.G.(Ed.), Descriptive Catalogue of Papers Relating to Rajarshi Shahu Chhatrapati of Kolhapur (1884-1922 A.D) Vol.1, Department of Archives Government of Maharashtra., P.90

११०. भिडे जी.एल., पाटील एन.डी, थोरात डी.एस., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑगस्ट २०११, पृ. १०७, १०८

१११. पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन, पुणे, २६ जून २०१२, पृ.४०

११२. सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी १९८४, पृ.२३०, २३१

११३. दै.केसरी, पुणे आवृत्ती, २२ ऑक्टोबर १९०१, पृ.१, २

११४. दै. केसरी, पुणे आवृत्ती, २९ ऑक्टोबर १९०१, पृ.१, २

११५. पवार शिरीष, उपरोक्त, पृ.४५

११६. कित्ता, पृ.४५

११७. आपटे दाजी नागेश, श्री महाराज सयाजीराव गायकवाड(तिसरे) यांचे चरित्र, खंड २ रा, पृ.६२३

११८. भिडे जी.एल., पाटील एन.डी, थोरात डी.एस., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑगस्ट २०११, पृ. १०९

११९. जाधव रमेश, शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक : एक शोध, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २७ मार्च २००७, पृ.८१

१२०. कित्ता, पृ.८२ ते ८४

१२१. कित्ता, पृ.८४, ते ८७

१२२. कित्ता, पृ.८८ ते ९१

१२३. कित्ता, पृ.९२ ते ९५

## प्रकरण पाचवे
# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांचे संस्थात्मक कार्य

## ५.१ प्रास्ताविक

महाराष्ट्रातील समाजाला एकत्र येऊन लढाई व शेती व्यतिरिक्त सामाजिक कार्य करायचे हे माहीत नव्हते. एखाद्या समाजाचे मंडळीकरण घडून यायला अवकाश होता. चार लोकांनी एकत्र विधायक गोष्टी सुरू करायच्या असतात या गोष्टींचा परिचय आपणास मिशनच्या माध्यमातून झाला. त्यातूनच पुढे समाजसुधारकांची मिशनरी फौज आपल्या समाजात निर्माण झाली. येथील समाजसुधारकांनी समाजात प्रबोधन घडवून आणण्याचे प्रयत्न केले. इंग्रजी विद्या व आक्रमणापुढे महाराष्ट्रातील समाज संपुष्टात येऊ नये म्हणून नियतीला शरण न जाता बदलत्या काळाप्रमाणे आपण बदललो तरच टिकून राहू अन्यथा आपण नष्ट होऊ ही भावना समाजसुधारकामुळे महाराष्ट्रात आली. त्यांनी धार्मिक, सामाजिक, राजकीय बदल घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यातूनच अविरत धर्मसुधारणा सुरू झाल्या. या समाजसुधारकात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी बहुजन समाजासाठी फार मोठया प्रमाणावर कार्य केलेले आहे. त्यांच्या या कार्याचा उद्देश बहुजन समाजाला शिक्षण मिळून सर्व हक्क प्राप्त झाले पाहिजेत, तसेच या लोकांनी आपल्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचारासाठी जागरूक करून आपल्या हक्कासाठी पेटून उठविणे हे होय. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या संस्थात्मक कार्याचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

## ५.२ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे संस्थात्मक कार्य–

### प्रार्थना समाज व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

हिंदू धर्म व हिंदू समाज यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात प्रार्थना समाजाची स्थापना झालेली आहे. प्रार्थना व सेवा यांच्याद्वारेच ईश्वराची पूजा करावी, अशी या चळवळीची धारणा असल्याने तिच्या प्रवर्तकानी या चळवळीला प्रार्थना समाज हे नाव दिले. ब्राम्हो समाजाचे नेते केशवचंद्र सेन सन १८६४ मध्ये महाराष्ट्रात आले होते. त्यांनी पुणे व मुंबई येथे धर्म व समाज सुधारणेवर व्याख्याने दिली होती. या व्याख्यानांनी परमहंस सभेचे सदस्य

प्रभावित झाले होते. त्यापैकी डॉ.आत्माराम पांडूरंग यांनी पुढाकार घेऊन ३१ मार्च, १८६७ रोजी प्रार्थना समाजाची स्थापना केली. त्यात प्रारंभी रामलालकृष्ण, भाऊ महाजन, नवरंगी इत्यादी सदस्य होते. सन १८७० मध्ये न्यायमूर्ती रानडे व डॉ.रा.गो.भांडारकर हे प्रार्थना समाजाचे सभासद झाले होते. त्यानंतर वामन आबाजी मोडक, नारायण गणेश चंदावरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व सुखटणकर इत्यादी कार्यकर्ते या समाजाला लाभले.[१]

**प्रार्थना समाजाची तत्वे**

न्यायमूर्ती रानडे यांनी 'एकेश्वरनिष्ठाची कैफियत' हा लेख इंग्रजीत लिहून हिंदू रिफॉर्मर या वृत्तपत्रात प्रसिद्ध केला. रानडे यांच्या या लेखामध्ये प्रार्थना समाजास मान्य असणाऱ्या धार्मिक कल्पनांचे ३९ कलमात विवेचन केले आहे. रानडे यांनी मांडलेल्या या ३९ कलमांचे एक प्रकारे सार काढून सन १८७३ मध्ये डॉ.भांडारकर यांनी सहा तत्त्वे मांडली. ती पुढीलप्रमाणे दिलेली आहेत.

१) परमेश्वर एक असून तो विश्वाचा निर्माता आहे तो निराकार व दयाळू असून सर्वावर प्रेम करतो.

२) सत्य, सदाचार व भक्ती हे परमेश्वराच्या उपासनेचे खरे मार्ग आहेत. या मार्गाने गेल्यावर तो प्रसन्न होतो.

३) प्रतिमा व इतर सृष्ट पदार्थ यांची पूजाअर्चा किंवा आराधना करणे हा ईश्वरोपासनेचा खरा प्रकार नाही.

४) परमेश्वर अवतार घेत नाही. त्याने कोणताही धर्मग्रंथ लिहिला नाही.

५) मूर्तिपूजा परमेश्वरास मान्य नाही.

६) सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. म्हणूनच सर्वांनी बंधुत्वाच्या भावनेने एकमेकांशी व्यवहार करावा.[२]

प्रार्थना समाजास मूर्तिपूजा, बहुदेवतावाद, कर्मकांड, अवतारवाद इत्यादी गोष्टी मान्य नाहीत. ईश्वराची अनन्य भक्ती हीच परमार्थ साधना म्हणून या समाजाने स्वीकारली व त्या दृष्टीने प्रार्थना पद्धती सुरू केली. प्रार्थना समाज सगुणाचीच उपासना करतो पण भौतिकरूप हा ईश्वराचा गुण नाही. ईश्वर केवळ चैतन्यमय आहे असे समाज मानतो. प्रत्येकाने ईश्वराच्या ठायी पूज्य बुद्धी ठेवून भक्तिभावाने उपासना करावी. सत्य व धर्मास अनुसरून आपले आचरण

ठेवावे. ईश्वराचे प्रेमस्वरूप आपल्या अंतःकरणात विकसित करून सर्व गोष्टीत त्याला प्रमाण मानून त्याला स्वात्मा अर्पण करणे हीच त्याची उपासना आहे. अशी प्रार्थना समाजाची धारणा होती.

**प्रार्थना समाजातील विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य**

महर्षी शिंदे यांनी विलायतेहून परत आल्यानंतर नोव्हेंबर १९०३ मध्ये प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून आपल्या कार्यास सुरूवात केली. त्यावेळी प्रार्थना समाजाची स्थापना करणाऱ्यांपैकी डॉ.भांडारकर हेच फक्त या समाजात राहिले होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस डॉ. आत्माराम पांडूरंग, भास्कर हरी भागवत, तुकाराम पडवळ, शंकर पांडुरंग पंडित, न्यायमूर्ती रानडे, मामा परमानंद व वामन आबाजी मोडक ही पहिल्या पिढीतील सर्व मंडळी परलोकवासी झाली होती. डॉ.भांडारकर हे पुण्यात राहत होते. सर नारायणराव चंदावरकर हे एकटेच मुंबई प्रार्थना समाजाचे काम पाहत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या तत्त्वाने तल्लीन होऊन 'प्रार्थना समाजाचे धर्मप्रचारक' म्हणून विलक्षण जिद्दीने कार्य केले. त्यांनी प्रार्थना समाज अधिक क्रियाशील बनविण्याची, त्यास बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी समर्थपणे पेलण्यासाठी स्वतःस वाहून घेतले.[३]

प्रार्थना समाजाच्या मुंबई साप्ताहिक उपासना, धर्माचरण, नामकरण, उपनयन इत्यादी विधीसोबत त्यांनी नव्या उपक्रमांची भर घातली. अभिनव योजना आखल्या आणि पार पाडल्या. युरोपमध्ये पोस्टल मिशनचे कार्य त्यांनी पाहिले होते. समाजाचे जे सभासद नाहीत त्याच्याकडे स्वखर्चाने समाजाची माहिती देणारे वाङ्मय पाठविणे, पत्रव्यवहार करणे, वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देणे म्हणजे पोस्टल मिशन ही योजना होय. ही योजना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबई प्रार्थना समाजात सुरू केली. त्यातील उपक्रम पुढीलप्रमाणे होते.

**१) उदार धर्मग्रंथ वाचन वर्ग–**

दर बुधवारी सायंकाळी प्रार्थना मंदिरात हा वर्ग चालत असे. हायस्कूल, कॉलेजमधील, भिन्न भाषिक विभिन्न जातीय विद्यार्थ्यांचा त्यात समावेश होत असे. आर्मस्ट्राँग, इमर्सन, प्रो.जायसन यांच्या ग्रंथाचे अध्ययन या वर्गात चालत असे.

२) तरूण ब्राम्हसंघ–

ब्राम्ह कुटुंबातील तरूणांना एकत्र जमवून त्यांच्यामध्ये आपसात सामंजस्य वाढविणे, त्यांना उपासना चालविण्यास उद्युक्त करणे, ब्राम्ह पद्धतीचे आचार आणि संस्कार याविषयी त्यांनी घरी आग्रह धरणे इत्यादी हेतूंनी हा संघ कार्य करीत असे.

३) कौटुंबिक उपासना मंडळ–

ब्राम्ह धर्माचा प्रचार समाजात घरोघरी बायकामुलांत व्हावा या हेतूने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी हे मंडळ सन १९२५ नंतर पुणे मुक्कामी प्रथम वेताळ पेठेत आणि नंतर शुक्रवार पेठेत चालविले. जेव्हा ते १९३६ मध्ये शिवाजीनगर भागात स्वतःच्या घरी राहायला गेले, तेव्हा त्यांनी तेथेही हे मंडळ स्वतःच्याच घरी चालविले.[४]

मुंबई समाजाचे अधिकृत प्रचारक म्हणून काम करताना पुढील दहा वर्षाच्या काळात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी ब्राम्हो धर्मावरील ३४३८ पुस्तके, १२७०० पत्रके, ६३३ युनिटेरियन पुस्तके व ५००० युनिटेरियन पत्रके प्रसृत केली. प्रार्थना समाजाचे मुखपत्र ‘सुबोधपत्रिका’ साप्ताहिक(मुंबई) मध्ये ते लेखन करीत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन या ‘सुबोधपत्रिकेत’ जास्तीत जास्त आढळते. ‘पंढरपूर’ येथे समाजाने चालविलेल्या ‘बालकाश्रम’ची धुरा ते सांभाळीत होते. मुंबई येथील समाजाने सुरू केलेल्या रात्रीच्या शाळांवर देखरेख करीत होते. ही सर्व कामे करीत असताना बाहेर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही धर्मप्रचारासाठी दौरे करीत होते. न्यायमूर्ती रानडे यांनी सभेच्या वेळेस ‘भारतीय एकेश्वरी परिषद’ भरविली जावी यासाठी प्रयत्न केलेले होते. पण त्यात सातत्य राहिले नव्हते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी १९०४ ते १९१३ पर्यत ‘भारतीय एकेश्वरी परिषद’ भरविण्यासाठी अतिशय निष्ठेने काम केले. या निमित्ताने मुंबई, बनारस, सुरत, मद्रास, लाहोर, अलाहाबाद, कराची इ.ठिकाणी आपला ‘धर्मविचार’ पोहोचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सर्व देश त्यांनी जवळून पाहिला व अनुभविला.

भारतातील ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज अशा एकेश्वरी धर्माची माहिती एकत्र करून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी इंग्रजी भाषेत ३७५ पानांचा ‘ब्राम्हधर्म सूचिग्रंथ’(थीईस्टिक डिरेक्टरी) १९१२ मध्ये प्रसिद्ध केला. भारतातील वेगवेगळया स्थानिक समाजाचीही माहिती त्यात ग्रंथीत केली आहे. या ग्रंथाच्या पहिल्या भागात ‘जगातील उद्धार धर्माच्या’ निरनिराळया

पंथांची माहिती व कार्य यासंबंधी लेख आहेत व दुसऱ्या भागात भारतातील एकूण १६८ संस्थांची तपशीलवार माहिती दिली आहे. श्री.रा.ना.चव्हाण म्हणतात, थ्रीईस्टिक डिरेक्टरी नामक भारतातील सर्व ब्राम्हो समाजाची व जगातील सर्व उदार व सहिष्णू धर्म सुधारक चळवळीची माहिती व इतिहास इंग्रजीत संग्रहित करून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी फार मोठी जागतिक धर्मासंबंधीची कामगिरी केली आहे.[५]

प्रार्थना समाजाचे प्रचारकपद स्वीकारल्यापासून सन १९१२ सालापर्यतचे त्यांचे आध्यात्माविषयकचे विचार, धर्मपर दिलेली व्याख्याने व त्यांनी जे लेख लिहिले आहेत ते सर्व रा.रा.बी.बी.केसकर यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख व्याख्याने व उपदेश या ग्रंथात सन १९१२ मध्ये प्रसिद्ध केले. या ग्रंथावरील आपला अभिप्राय व्यक्त करताना डॉ.गो.मा.पवार म्हणतात, या ग्रंथावरून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा धर्मविचार किती प्रगल्भ आहे, त्यांची प्रतिपादनाची हातोटी किती परिणामकारक आहे, याची तर कल्पना येतेच, शिवाय सहा, आठ वर्षाच्या काळात त्यांनी किती प्रवास केला. किती व्याख्याने दिली हे लक्षात येऊन त्यांची उद्योगशीलता व कामावरची अनन्यनिष्ठा यांचाही प्रभाव आपल्या मनावर होताच.[६]

**निराश्रीत सेवा सदनाची स्थापना व कार्य(२१ मे १९०७)**

प्रार्थना समाजाच्या मुंबई विविध शाखेत विविध उपक्रमांच्या जोडीने स्त्रियांच्यामध्ये जागृती करण्यासाठी प्रथमतः त्यांनी 'महिला समाजाची' स्थापना केली. तसेच पुढच्या वर्षी म्हणजेच २१ मे १९०७ रोजी 'निराश्रित सेवासदनाची स्थापना केली. त्यात दलित स्त्रियांचा, विधवा स्त्रियाचा उद्धार हा प्रमुख विचार त्यांनी कार्यवाहीत आणण्यास सुरूवात केली. त्या काळात अण्णासाहेब कर्वे यांच्या अनाथ महिलाश्रमास बरीचशी प्रसिद्धी मिळाली होती.

याचवेळी सुरत येथील प्रागतिक विचारांचे डिस्ट्रिक्ट जज्ञ व प्रसिद्ध सिंधी सुधारक दयाराम गिडुमल यांनीदेखील स्त्रियांच्या उन्नतीसाठी कार्य करावे अशी तळमळ वाटू लागली होती. निराश्रीत साहयकारी मंडळीचे नाव त्यांनी ऐकले होते. म्हणून त्यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना बोलावून अस्पृश्य महिलांच्या सेवेसाठी काय करता येईल असा प्रश्न केला. तेव्हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रियांच्या प्रश्नाचे स्वरूप समजून सांगितले आणि दयाराम गिडुमल यांचेकडून आर्थिक साहाय्य मिळविले.

अशारीतीने दयाराम गिडुमल यांनी आर्थिक साहाय्याचा हात दिल्यानंतर दि. २१ मे १९०७ रोजी निराश्रीत सेवा सदन सुरू करण्यास अधिकच उत्साह वाढला. पुढे या सदनाची जबाबदारी जनाबाई शिंदे यांच्यावर येऊन पडली. श्रीमती वेणूताई, द्वारकाबाई, कल्याणीबाई सय्यद यांनी जनाबाईंना सतत सहकार्य केले. इतर गरीब गरजू स्त्रियांना कशी मदत करता येईल यांचे धडे त्यांना दिले गेले.

या सेवासदनामार्फत पुढील गोष्टीवर भर देण्यात आलेला होता.

१) या सदनामध्ये गरीब स्त्रिया, विशेषतः कुमारी व विधवा यांच्यासाठी शिवणकामाचा वर्ग सुरू करण्यात आला.

२) 'स्त्रीउद्धार विषयक' कामे करण्यासाठी आवर्जुन सुशिक्षित स्त्रियांना पाचारण करण्यात येत असून त्यांचे प्रबोधन केले जाई. त्यामुळे स्त्रियांनीच स्त्रियांचे काम करण्यात पुढाकार घेतल्याने सेवासदनाच्या हेतूंचा प्रचार होण्यास मदत झाली.

३) सदनातील स्त्रिया आजारी स्त्रियांची सुश्रूषा करीत आणि बाळंतपणातही सर्व कष्ट घेत असत.

४) सदनातील स्त्रीप्रचारक अडाणी स्त्रियांना शिक्षणाची अभिरूची लावण्यासाठी त्यांच्या घरोघरी जात असत.

अशाप्रकारे प्रारंभीच्या काळात वरील सर्व कामे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची बहीण जनाबाई शिंदे यांच्या साहाय्याने करीत असत. सदन निघाल्यावर त्याची व्यवस्था चांगली झाली. सणाच्या दिवशी सामाजिक मेळे होत. त्यात अस्पृश्यवर्गीय तसेच वरिष्ठ वर्गातील स्त्री पुरूष समानतेने भाग घेत असत.[७]

**निराश्रीत महिला समाज :-**

प्रथम महिला समाज, नंतर निराश्रीत सेवासदन व कामाचा व्याप वाढल्यावर 'निराश्रीत महिला समाज' ही वेगळीच संस्था महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व जनाबाई शिंदे यांनी विचार विनिमयाद्वारे सुरू केली. त्याच्या दोन शाखा भायखळा व परळ या ठिकाणी काढण्यात आल्या. या 'निराश्रीत महिला समाजाचा' वार्षिकोत्सव मदनपुरा मोरलँड रोडवरील इंप्रव्हमेंट ट्रस्टच्या चार वाडयासमोरील मंडपात सौ.लेडी लक्ष्मीबाई चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा

करण्यात आला. त्यासाठी अनेक प्रतिष्ठित स्त्रिया हजर होत्या या वार्षिकोत्सवाबद्दल सौ.रूक्मिणीबाई सय्यद यांनी वाचलेला रिपोर्ट पुढीलप्रमाणे आहे.

घरातील वर्ग सुमारे ६ महिने चालले गेल्या वर्षी एकंदर १३ बायकांची प्रसुती करण्यात आली. पुष्कळांना दवाखान्याचा लाभ देण्यात आला. पोलीस कमिशनरकडून बेवारशी मुले व बायका मिळून पाच झाली. त्यांची निगा ठेवण्यात आली. हया कामातून मनुष्य स्वभावाचा जो अनुभव आला तो महत्त्वाचा वाटला.[८]

पुष्कळ स्त्रियांना गरोदरपणी व बाळंतपणी फार नाजूक उपचार करण्याची वेळ येत असे. त्यावेळी मिशनचे हितचिंतक मोठमोठे स्त्री डॉक्टर असत. ते औषधोपचार सांगत असत. परंतु सुश्रूषेची कामे सदनातील स्त्रियांवर पडत असत. एनिमा देणे इत्यादी नवीन उपचाराचे काम आल्यास जुन्या मताच्या रोग्यांना आवरणे फार कठीण होत असे. ते अत्यंत बीभत्स शिव्या देऊन बाहेर निघून जात असते.

**प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी**

निराश्रित महिलाची कामे करण्यासाठी पुरूषांपेक्षा स्त्रियांच्या अंतःकरणाची जोड मिळविण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला. त्यासाठी सन १९०८ मध्ये खालील प्रतिष्ठित स्त्रियांची एक कमिटी स्थापन करण्यात आली.

| अ.क्र. | स्त्रियांचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | लेडी म्यूर मॅकेंझी | अध्यक्ष |
| २. | लेडी चंदावरकर | उपाध्यक्ष |
| ३. | मिसेस स्टॅनले रीड | चेअरमन |
| ४. | सौ.सीताबाई सुखटणकर | जॉईंट सेक्रेटरी |
| ५. | सौ.लक्ष्मीबाई रानडे | जॉईंट सेक्रेटरी |
| ६. | कु.एस.के.काब्रीज | खजिनदार |

(संदर्भ :- कदम शंकरराव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, जुलै, २०००, पृ. १६४)

या सर्वच स्त्रियांनी निराश्रीत सेवासदन, निराश्रीत महिला समाज, संस्थेतील अनाथ, विधवांच्यासाठी अपार कष्ट घेतले. नव्या शाळा काढण्यास मदत केली. शिवणकामाचे वर्ग चालविण्यात सक्रिय सहभाग घेतला. गरीब गरजू अनाथ महिला, मुली यांच्यासाठी प्रयत्न करून गिरण्यातून कामे उपलब्ध करून दिली.

सन १९१२ मध्ये मिशनच्या परिषदेत स्त्रियांच्या विविध शाखांच्यावतीने स्त्रियांची खास सभा ठेवण्यात आली. त्यात त्या काळातील मराठीतील प्रसिद्ध लेखिका काशीताई कानिटकर व न्यायमूर्ती रानडे यांच्या स्त्री उद्धारवादी पत्नी श्रीमती रमाबाई रानडे या आवर्जून उपस्थित होत्या. श्रीमती रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथील लष्कर शाळेत सभा झाली. सौ.लक्ष्मीबाई रानडे, सौ.सीताबाई रानडे, सौ.काशिताई कानिटकर या प्रमुख ठिकाणी बसल्या होत्या.[९]

अशाप्रकारे जनाबाई शिंदे यांनी सावित्रीबाई फुले यांच्याप्रमाणे कामगिरी केलेली दिसून येते. जनाबाई या स्त्रियांच्यामध्ये प्रचार करत असत. तर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे पुरूषांमध्ये प्रचार करत असत. परंतु स्त्रीकडून होऊ शकणारा कार्यभाग करणे त्यांना अर्थात अशक्य होते. ही उणीव जनाबाई शिंदे यांनी त्यांच्या बरोबरीने कार्य करून दाखविली. असे या दोघांचे कार्य होते.

**पश्चिम हिंदुस्थानातील मुलांचे रक्षण करणारी संस्था :-**

धर्मवेडे देवभोळेपणा, अज्ञान, अंधश्रद्धा, दैववाद, दारिद्रय अशा विविध कारणातून हिंदूधर्मीय समाजामध्ये पुरातन काळापासून प्रचलित असलेली मुरळी प्रथा ही वाईट व निंदनीय प्रथा नष्ट व्हावी यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर अनन्यसाधारण प्रयत्न केले. केवळ कायद्याने हा प्रश्न सुटणार नाही याची जाणीव असल्यामुळे सन १९०७ मध्ये त्यांनी 'पश्चिम हिंदुस्थानातील मुलांचे रक्षण करणारी संस्था' स्थापन केली. या संस्थेत न्यायमूर्ती चंदावरकर, सर बालकृष्ण, एच.आर.वुर्पल किन्सन इ.व्यक्ती होत्या. ते स्वतः या संस्थेत चिटणीस म्हणून काम पाहू लागले. तर डॉ.मॅन यांनी त्यांना मौलिक सहकार्य केले.

देवाला वाहिलेल्या मुलींच्याप्रमाणेच वाघ्या, आराध्य, पोतराज, जोग्या अशी नावे धारण करून वाममार्गाने बीभत्स जीवन जगणाऱ्या आणि देवाला वाहिलेल्या मुलांनाही वरील संस्थेत आश्रय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या भयावह, विचित्र, विकृत, रूढीत सापडलेल्या मुलींना शोधून काढण्यासाठी या संस्थेने दरमहा ६० रूपये वेतन देऊन दोन इन्स्पेक्टर नेमले. दि.२५ एप्रिल १९१० रोजी जेजुरी यात्रेत मुरळी प्रतिबंधक सभा घेण्यात आल्या. कित्येक लोकांनी दारू पिऊन सभेला विरोध केला होता. पण मिशनधील विद्यार्थ्यांच्या साहाय्याने ही सभा

व्यवस्थित पार पडली. इ.स.१९११ मध्ये याच प्रश्नावर त्यांनी मुंबई मुरळी प्रतिबंधक परिषद भरविली.

या कामासाठी त्यांना सातत्याने जनाबाई शिंदे यांनी साथ दिली. समाजसुधारणेचे असे अवघड काम करताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. एका अस्पृश्य मुरळीचा विवाह खडकी येथे घडवून आणण्यात आला होता. त्यावेळी त्यांच्या जिवावरचा प्रसंग गुदरला. या विवाहास जाताना ते होळकर पुलावरून गेले. येताना ते तिकडून येतील अशा अंदाजाने विरूद्ध पक्षाकडून काही मारेकरी पुण्यात ठेवण्यात आले होते असे नंतर त्यांना समजले. सुदैवाने ते परत येताना बंडगार्डनच्या पुलावरून घरी परतले म्हणून ही संकट टळले.[१०]

**प्रार्थना समाजाचा राजीनामा**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना समाजाचे धर्मप्रचारकपद स्वीकारल्यापासून संपूर्ण भारतातील अस्पृश्यांची दयनीय स्थिती पाहावयास मिळाली. त्यातूनच त्यांना अस्पृश्याच्या उन्नतीचा ध्यास लागला. पददलित अस्पृश्य माणसांच्या जोडीनेच स्त्रियांची दयनीय स्थिती पाहावयास मिळाली. या सर्वांचा उद्धार झाला पाहिजे म्हणून ते झाले. या लोकांच्या उन्नतीसाठी त्यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीची स्थापना १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे केली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या संस्थेचा झपाटयाने विस्तार केला. ही गोष्ट प्रार्थना समाजिस्ट लोकांना पटली नाही. त्यांना वाटत होते की, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनच्या कामाऐवजी प्रार्थना समाजाचेच कार्य करावे. हे काम म्हणजे आठवडयातून एकत्र जमावे, उपासना चालवाव्या, सरकार, समाज, यांची कोणतीही इतराजी होऊ न देता सुधारणा कराव्या आणि या सुधारणा हया मध्यमवर्गीय पांढरपेशा वळणाच्या होत्या. त्यामुळे प्रार्थना समाजिस्टांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा हा समाजसुधारणेचा क्रांतिकारी प्रयोग आवडला नाही. पारंपरिक धर्मविधीऐवजी प्रार्थना समाजाच्या पद्धतीनुसार धर्मविधी पार पाडणे, स्त्री शिक्षणाला व विधवा विवाहांना प्रोत्साहन देणे, त्यावर चर्चा घडवून आणणे, समाजिस्टांच्या कुटुंबातील स्त्रियांच्या इंग्रजी शिक्षणासाठी वर्ग चालविणे इत्यादी सुधारणांच्या मर्यादित वर्तुळात त्यांचे धर्मकार्य सुरू होते. नव्हे तर आपल्या धर्म व समाज कार्याची सीमा चार भिंतीच्या बाहेर पडू नये अशीच ते दक्षता घेत होते. तथापि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा धर्मविचार हा असा

बंदिस्त आणि विशिष्ट तंत्राच्या चौकटीत बसणारा नव्हता. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याविषयीच्या प्रार्थना समाजिस्टाकडून तक्रारी येऊ लागल्या.[११]

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना यातून एक मार्ग दिसला तो म्हणजे प्रार्थना समाज त्यांना दरमहा साठ रूपये वेतन देत असे, ते न स्वीकारणे. त्यानंतर नोव्हेंबर १९१० मध्ये 'समाजाच्या कमिटी'ने ठराव करून त्यांचा समाजाशी प्रचारक म्हणून असलेला संबंध संपल्याचे कळविले. 'प्रार्थना समाजाने' त्यांना देण्यात येणारे वेतन बंद केले असले, तरी त्यांच्या अंगी वसत असलेल्या 'उदारधर्म विचाराचा' प्रचार त्यांनी चालूच ठेवला होता.

थोडक्यात चार भिंतीच्या आत आपले धर्म व समाज कार्य करू इच्छिणाऱ्या मवाळ पांढरपेशा समाज कार्यकर्त्यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा हा झंझावती व स्वतंत्र बाण्याचा 'उदारधर्म विचार आणि प्रचार' पेलला नसावा असे म्हणता येईल. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रार्थना समाजातून बाहेर पडले. सन १९२३ मध्ये मिशनच्या कामाच्या जबाबदारीतून औपचारिकपणे मोकळे झाले. कलकत्ता ब्राम्हो समाजाने सन १९२४ मध्ये मंगलोर येथील ब्राम्हो समाजाचे अधिकृत आचार्य पदावर त्यांची निवड केली. त्यांनी मंगलोरास गेल्यावरही उदार धर्म प्रसाराचे काम उपासना, व्याख्याने यांच्याद्वारे सुरू ठेवले. तेथे ख्रिश्चनांची संख्या जास्त होती. त्यांच्यामध्ये जाऊनही ते एखाद्या रोमन कॅथॉलिक संताचे आख्यान लावीत. हिंदू पद्धतीच्या कीर्तनाद्वारेही ते आपले धर्मकार्य करीतच होते. तथापि डोक्यावर गांधी टोपी घालणारा आचार्य तेथील बिल्लव जातीच्या पुढाऱ्यांना परवडला नाही. सुमारे एका वर्षाच्या वास्तव्यानंतर तसेच पुणे येथील अहिल्याश्रमाच्या उद्घाटनासाठी म्हणून ते कायमचे पुण्यात राहण्यासाठी आले.[१२]

**वाईच्या ब्राम्हो समाजाची स्थापना व कार्य**

सन १९२५ नंतर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'कौटुंबिक उपासना मंडळा'च्याद्वारे ब्राम्हधर्माचा प्रसार बहुजन समाजात आणि विशेषतः कुटुंबातील स्त्रिया व मुले यांच्यात व्हावा, म्हणून विविध उपक्रम चालू ठेवले. वाईमध्ये पुण्याप्रमाणेच प्रार्थना समाजाची सन १९३३ मध्ये स्थापना झाली होती. यावेळी मुंबईच्या प्रार्थना समाजाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची धर्मप्रचारक म्हणून नियुक्ती केली होती. या प्रार्थना समाजाचा संबंध मुंबईशी आलेला होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सांगण्यावरून वाईच्या प्रार्थना समाजाचे ब्राह्मो समाजात नामकरण करण्यात आले होते. या समाजाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली वाई

व परिसरात फार मोठे सामाजिक कार्य केले आहे. यामध्ये खेडेगावात जाहीर सभा, उपासना व एकत्र जेवण नंतर गावकऱ्यांची बैठक व हरिजन वस्तीस भेट, स्पृश्य–अस्पृश्य भेद दूर करणे, स्त्री शिक्षण, समानता, अंधश्रद्धा नष्ट केली पाहिजे. सत्य आणि निर्भय वृत्ती अंगी आली पाहिजे. कार्यावर श्रद्धा मनःपूर्वक असली पाहिजे. प्रपंचाची चिंता करू नका. सर्वाची चिंता परमेश्वराला आहे. दैवी गुण आणण्याचे प्रयत्न करा. शांत चित्ताने त्याचे स्मरण करा. याचप्रकारे कार्य करून समाजसुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यामध्ये काही प्रमाणात यश ही मिळाले आहे.

**वाईतील प्रार्थना समाजाचे ब्राह्मो समाजात नामकरण**

वाईत दि.४ जुलै, १९३३ रोजी प्रार्थना संघाची स्थापना झाली. श्री.नारायणराव चव्हाण यांना अध्यक्ष व श्री.रामराव बाबर यांना सेक्रेटरी निवडण्यात आले. वाईत प्रार्थना संघाची स्थापना झाल्याचे विठ्ठल रामजी शिंदे यांना समजले. तेव्हा त्यांनी वाईच्या कार्यकर्त्यांना पत्र पाठविले व त्यात म्हटले की, 'मुंबईकडील प्रार्थनासमाज व कलकत्त्याकडील ब्राह्मोसमाज या दोन्ही समाजाची मूलतत्त्वे एक आहेत'. पण तत्त्वाप्रमाणे आचरण बंगालमध्ये होते, तसे महाराष्ट्रात होत नाही. मूर्तीपूजा व्यवहारात कधीच न करणे व जातीभेद न पाळणे या गोष्टी मुंबईकडे सांगण्यात येतात. तेवढया आचरणात येत नाहीत. आपण प्रार्थना समाज नाव ठेवूनही मताप्रमाणे आचरण केले नाही. तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. कोणत्याही गोष्टीचे महत्त्व नावात नाही, आचरणात व प्रदीर्घ प्रयत्नात आहे. मताप्रमाणे आचरण ठेवून आपल्या समाजास ब्राह्मोसमाज हे नाव द्यावे, अशी माझी विनंती आहे. प्रार्थना संघाचा चौथा वार्षिकोत्सव २४ मे ते २७ मे १९३७ पर्यंत उत्साहाने पार पडला. बुधवार दि.२६ मे, १९३७ रोजी प्रार्थना समाजाची साधारण सभा झाली. त्यात सर्वानुमते या समाजाला 'ब्राह्मोसमाज' हे नाव देण्यात आले.[१३]

अशाप्रकारे आजपर्यंत प्रार्थना संघ या नावाने ओळखला जाणारा समाज येथून पुढे ब्राह्मोसमाज या नावाने ओळखला जाऊ लागला. गुरूवार २७ मे, १९३७ रोजी श्री.नारायणराव चव्हाण यांचे ज्येष्ठ चिरंजीव रामचंद्रराव यांचा विवाह ब्राह्मविधीप्रमाणे झाला. हा विधी श्री.बी.वी.केसकर व श्री.रा.गो.वैद्य यांनी केला. यावेळी झालेल्या सहभोजनास वाईतील हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, हरिजन वगैरे सर्व धर्माचे स्त्रीपुरूष उपस्थित होते.[१४]

### ब्राह्मोसमाजाचे वाई तालुक्यातील कार्य

ब्राह्मोसमाजाने धर्मप्रचारासाठी वाई तालुक्यातील खेडेगावात दोन दौरे काढले. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

### अ) पहिला दौरा (१४ मे ते १६ मे, १९३६)

या दौऱ्यामध्ये धर्मप्रचारासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, य.वा.भांडारकर, ज.ना.वैद्य, भगिनी जनाक्का शिंदे, ताईसाहेब बाबर, पां.मा.येवले, यशोदाबाई चव्हाण, शंकरराव नायकवडी इत्यादी मंडळी होती. पहिल्या दौऱ्यात केंजळ, गुळूंब व ओझर्डे या तीन गावात कार्यक्रम घेतले गेले. तेथे रात्री जाहीर सभा, दुसऱ्या दिवशी सकाळी उपासना व जेवण नंतर गावकऱ्यांची बैठक व हरिजन वस्तीस भेट, सायंकाळी पाच वाजता पुढील गावी प्रयाण अशा पध्दतीने कार्यक्रमाचे स्वरूप ठरवून पहिला दौरा पूर्ण केला होता.[१५]

### ब) दुसरा दौरा

मुंबई प्रार्थना समाजाकडून वाईच्या ब्राह्मोसमाजास मदत मिळाल्यामुळे व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रेरणेने ७ मे, ते १२ मे, १९३७ मध्ये धर्मप्रचाराकरिता दौरा काढला. या दौऱ्यात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, श्री.नारायणराव चव्हाण, मामासाहेब गरूड, शंकरराव जेजुरीकर, भगिनी जनाक्का शिंदे, वगैरेनी दौऱ्याबरोबर दोनतीन दिवस भाग घेतला होता.

या दौऱ्यामध्ये सुरूर, कवठे, भुईंज, पसरणी, धोम इत्यादी खेडेगावांचा समावेश केला होता. या दौऱ्यात कार्यकर्त्यांनी बहुजन समाजाची सुधारणा व्हावी, यासाठी सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'ज्या मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नसेल, अशा मुलांच्या पालकांनी माझ्याकडे मुले आणून द्यावीत. त्यांच्या राहण्यासाठी बोर्डींगची सोय केलेली आहे. याशिवाय कष्ट करण्यास लाजू नका, व्यसने सोडा'. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रचारार्थ भाषणात सांगत असत, 'आपण सर्वजण एक आहोत. आपल्यामध्ये बंधुभाव दिसला पाहिजे. स्पृश्य–अस्पृश्य हा भेद प्रथम दूर झाला पाहिजे. स्त्रियांना शिक्षण देऊन आपल्याबरोबर समान वागण्याची संधी दिली पाहिजे. महात्मा फुले यांच्या कार्याचे अनुकरण केले पाहिजे. अंधश्रद्धा नष्ट केली पाहिजे. सत्य आणि निर्भय वृत्ती अंगी आली पाहिजे. कार्यावर श्रद्धा मनःपूर्वक असली पाहिजे. प्रपंचाची चिंता करू नका. सर्वाची चिंता परमेश्वराला आहे. दैवी गुण आणण्याचे प्रयत्न करा. शांत चित्ताने

त्याचे स्मरण करा. अशाप्रकारे महर्षि विठ्ठल रामजी शिंदे व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खेडेगावातील लोकांपुढे आपले विचार मांडले होते.[१६]

## वाई ब्राह्मोसमाजाचे काही उपक्रम

### १. बोपेगाव येथील हरिजन वस्तीस मदत

२८ मार्च, १९४१ रोजी बोपेगाव येथील हरिजन वस्तीस आग लागली. त्यामुळे काही कुटूंबे निराधार झाली. त्यावेळी गरजू हरिजन कुटूंबाला साहित्याचे वाटप करण्यात आले.

### २. श्री शिवाजी वाचनालयाची निर्मिती

९ जुलै, १९३७ रोजी ब्राह्मोसमाजात श्री शिवाजी वाचनालय हे नवीन वाचनालय सुरू करण्यात आले; व श्री.मामासाहेब गरूड वाचनालयाची व्यवस्था पाहत होते.[१७]

### ३. श्री.एकनाथराव घोरपडे यांचा ब्रह्मविवाह

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची पुतणी छबूताई व रयत शिक्षण संस्थेच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकणारा वर्धनगडचा प्राथमिक शिक्षक यांचा विवाह ठरवून तारीख निश्चित केली. हा विवाह वाई येथे ब्राह्मपध्दतीने लावला गेला. हा विधी पाहून कर्मवीर भाऊरावांनीही येथून पुढे आपल्या संस्थेतील प्राध्यापकांचे ब्राह्मविवाह करण्यासाठी महर्षी शिंदे यांनी यावे असे स्पष्ट केले.

### ४. राममोहन विद्यार्थी गृह

गरीब व होतकरू हरिजन विद्यार्थ्यांसाठी प्रार्थना समाजाच्यावतीने ५ जानेवारी, १९३५ रोजी विद्यार्थीगृह सुरू केले होते. शैक्षणिक व स्वावलंबन या बाबीकडे लक्ष पुरविण्यात आले होते. प्रारंभी या विद्यार्थीगृहात फक्त वाई शहर व तालुक्यातील मुले होती. पुढे इतर तालुक्यातून मुले राहण्यासाठी आली होती. प्रार्थना समाजाच्या तत्त्वांचा बालमनावर चांगला संस्कार झाला होता. या गृहाचे सुपरिटेंडेंट म्हणून श्री.रा.कृ.बाबर, श्री.शं.द.जेजुरीकर, श्री.ए.के.घोरपडे काम पाहत होते. याच जागेत १९५६ मध्ये 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हायस्कूल' समाजाच्या सहाय्याने सुरू केले आहे.[१८]

### ५. चौक, रस्ता, मंडई, सभागृह व उद्यान याचे नामकरण

सन १९४१ साली वाई नगरपालिकेने चावडीसमोर चौकास 'महर्षी शिंदे चौक' व समाजमंदिरापुढील जाण्याऱ्या रस्त्यास 'कर्मवीर पथ' अशी नावे दिली. भाजी मंडईस 'महात्मा

फुले मंडई', नगरपालिकेच्या सभागृहास 'महात्मा गांधी सभागृह', तसेच ब्राह्मणशाही कृष्णा नदी काठावर 'छत्रपती शिवाजी उद्यान' अशी नावे देण्यासाठी ब्राह्मोसमाजाने नगरपालिकेत प्रयत्न केले.[१९]

### ६. महर्षी शिंदे स्मारक निधी

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे निधन २ जानेवारी, १९४४ रोजी झाले. त्यांच्या स्मरणार्थ ब्राह्मोसमाजाने एक शैक्षणिक केंद्र सुरू करावे, या कार्यासाठी इमारत उभारण्यासाठी निधी जमविण्याचे ठरले त्याप्रमाणे अल्पावधीत दोन हजाराहून अधिक रक्कम जमा केली. या निधीसाठी पुणे, सातारा व इतर ठिकाणी दौरे काढले.

### ७. महात्मा गांधीजींची वाई ब्राह्मोसमाजास भेट

महात्मा गांधीजी पाचगणीस आले त्यावेळी श्री.नारायणराव चव्हाण व श्री.शंकरराव जेजुरीकर यांनी भेट घेवून सांगितले की, आपण वाईत स्थापन झालेल्या ब्राह्मोसमाजास भेट द्यावी. त्यानुसार महात्मा गांधीजींनी १ ऑगस्ट, १९४४ रोजी पाचगणीहून जाताना वाईच्या ब्राह्मोसमाजास भेट दिली. महात्मा गांधीजींनी समाजाच्या व्यवस्थेबद्दल व कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.[२०]

### ८. जीर्णोद्धार फंड

श्री.य.वा.भांडारकर यांनी इमारतीसाठी जीर्णोद्धार फंड उभारला होता. या फंडातून जमा झालेल्या रकमेतून सन १९५० साली श्री. स. ब. पाटणे यांच्या मार्गदर्शनाखाली सोळा खण इमारत बांधली. ती मराठी शाळेस दरमहा पंचवीस रूपये भाडयाने दिली.[२१]

### ९. महर्षी शिंदे विद्यामंदिर

वाई ब्राह्मो समाजाने खेडयापाडयातील मुलांची शिक्षणाची सोय व्हावी. या उद्देशाने वाई ब्राह्मो समाजाच्या इमारतीत 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे विद्यामंदिर' ११ जून, १९५६ पासून सुरू झाले. यावेळी प्रारंभी लागणाऱ्या सर्व खर्चाची मदत ब्राह्मोसमाजाने केली होती.[२२]

वरील उपक्रमाव्यतिरिक्त वाई ब्राह्मोसमाजाने वाईमध्ये पूर्वप्राथमिक शाळा सुरू केली होती. इ.स.१९७३ साली महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची जन्मशताब्दी साजरी केली. यज्ञेश्वरपंत वासुदेव भांडारकर स्मृतीगृह उभारले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या छायाचित्रांचे अनावरण समारंभ साजरा केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे स्मारक इमारत उभारली गेली.

काशिनाथपंत यशवंत भांडारकर स्मृतिगृह उभारले आणि प.वा.गणपतराव कदम यांच्या छायाचित्राचा अनावरण समारंभ साजरा झाला.[२३]

वाई येथे स्थापन झालेल्या प्रार्थना संघाचे पुढे ब्राह्मो समाजात रूपांतर होऊन वाई तालुक्यात धर्म व समाजसुधारणा घडून आल्या. यासाठी सर्वात महत्वपूर्ण भूमिका व मार्गदर्शन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. प्रारंभी ते प्रार्थना संघास केवळ भेट देऊन मार्गदर्शन करीत. परंतु पुढे ते वाईत राहण्यासाठी आले. प्रार्थना संघाच्या कार्यकर्त्यांना एकत्र करून प्रार्थना संघाची इमारत उभारली. प्रार्थना संघाचे वार्षिकोत्सव व व्याख्यानांचे उपक्रम राबविले. पुढे वाई तालुक्यातील काही खेडेगावात ब्राह्मो धर्मप्रचारार्थ दौरे काढले. या दौऱ्यातून त्यांनी कार्यकर्त्यांसहित स्त्रीपुरूषांना एकत्र करून उपासना व प्रार्थना यावर भर दिला. याशिवाय जाहीर व्याख्यान ठेवून समाजात जागृती केली.

## डिप्रेस्ड क्लास मिशन(**All India Depressed Class Mission**)

प्रार्थना समाजाचे धर्मप्रचारक पद स्वीकारल्यापासून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना भारताचे जे वास्तव दर्शन झाले त्याने ते विषण्ण झाले. त्यातही अस्पृश्य मानल्या गेलेल्या बांधवांच्या उन्नतीचा त्यांना ध्यास लागला होता. देशामध्ये देवाधर्माच्या नावावर भोळया भाबडया जनतेची फसवणूक चालली होती. जगन्नाथपुरीसारख्या ठिकाणी धर्माच्या नावाखाली भक्तमंडळी कुजका भात स्वीकारीत होती, कलकत्त्याच्या कालीमातेपुढे रेडयांचे व कोकरांचे बळी दिले जात होते. देशातील धर्मव्यवस्था, जातिभेदाचे विदारक स्वरूप, खोटया देवकार्यात गुंतून अंधश्रद्धेच्या गर्तेत चाचपडत असलेली असंख्य माणसे व समाज त्यांनी पाहिला. पद्दलित अस्पृश्य माणसांच्या जोडीनेच स्त्रियांची दैन्यावस्था पाहून त्यांचे अंतःकरण पिळवटून निघाले. या सर्वाचा उद्धार केला पाहिजे म्हणून ते झाले. आपण धर्म मानत असू आणि तो जर मंगलदायी आहे ,तर समाजातील या सर्व अमंगलाचा नाश केला पाहिजे. कारण धर्माचा संबंध हा कोठेतरी माणसां–माणसामधील नात्याचाही संबंध आहे. ही नाती विकृत झाली असतील, तर ही विकृती दूर करणे हाच धर्माचा गाभा होय. अशी त्यांची खात्री पटली आणि आपल्या या विचारांना मूर्तरूप देण्यासाठी त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना केली.[२४]

या मिशनने खऱ्या अर्थाने कृतिशील पध्दतीने वंचितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. हे एक ऐतिहासिक कार्य आहे.

संपूर्ण हिंदुस्थानात फिरत असताना अस्पृश्य वर्गाची दयनीय स्थिती त्यांच्या अंतःकरणाला झोंबलेली होती. या वर्गातील स्थिती सुधारण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. अशी त्यांच्या मनाला ओढ लागून राहिली. मनाच्या या अवस्थेत त्यांच्या जीवितकार्याची दिशा निश्चित करणारा एक प्रसंग घडला. २८ ऑक्टोबर १९०५ रोजी अमावस्येच्या रात्री त्यांचा अहमदनगरला मुक्काम होता. नगर जिल्हयातील श्रीपतराव थोरात, श्री पांडुरंग लक्ष्मण डांगळे इत्यादी अस्पृश्यवर्गातील पुढाऱ्यांनी भिंगार या गावी सभा बोलाविली होती. त्या सभेला अण्णासाहेब शिंदे यांना बोलावून घेतले. नागपूराकडील श्री किसन फागूजी बनसोड यांनी स्थापन केलेल्या 'सोमवंशी हितचिंतक समाजा'चे छापील पत्रक वाचून त्यातील उद्देश ते सभेला समजावून सांगत होते. हजारो वर्षे वरीष्ठ जातीचा जुलूम सहन करणाऱ्या या मंडळींच्या पत्रकातील एक उद्देश, वरिष्ठ वर्गाची मने न दुखविता अस्पृश्यांनी आपला उद्धाराचा प्रयत्न करावा असा होता. हा उद्देश समजवून सांगताना मनाची स्थिती कशी झाली, त्याचे वर्णन अण्णासाहेब पुढीलप्रमाणे करतात, 'हे उद्धाराचे काम आपण स्वतः अंगावर घेऊन या कामात स्वतःचे भावी चरित्र वाहून घ्यावे, अशी प्रेरणा मला जोराने होऊ लागली. इतर सर्व कामे टाकून एका घडीचाही वेळ न दवडता हया कार्यास लागावे असे संकल्प परमेश्वरास स्मरून हयाच रात्रीच्या मुहूर्तावर केल्याचे मला पक्के आठवते.' 'डिप्रेस्ड क्लासेस  मिशन' सारख्या संस्थेची स्थापना करण्याची अंतःप्रेरणा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना या क्षणी झाली, असे म्हणावे लागेल.[२५] त्याचप्रमाणे त्यांनी अस्पृश्योद्धारासाठी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'(निराश्रीत सहाय्यकारी मंडळ) ची स्थापना १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे एलफिन्स्टन रोडवर शेठ दामोदरदास सुरवडवाला यांच्या उदार देणगीतून केली.[२६]

'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष न्या.चंदावरकर हे असून त्यांनी आपले विचार स्पष्ट करताना म्हटले की, हया नीच मानल्या गेलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्यात आम्ही स्वतःलाच वर आणीत आहोत. हे पवित्र कार्य करीत असता आम्ही लोकांचा उद्धार करणार हा घमेंडीचा विचार आमच्या अंतःकरणात न शिरो. या उद्घाटनाच्या कार्यक्रमातच मंडळाची पहिली कार्यकारिणी पुढीलप्रमाणे निवडण्यात आली.

| पद | नाव |
|---|---|
| अध्यक्ष | सर नारायण गणेश चंदावरकर, |
| उपाध्यक्ष | शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुरवडवाला, |
| जनरल सेक्रेटरी | विठ्ठल रामजी शिंदे, |
| खजिनदार | रा.रा.भास्कर नारायण पंडित, |
| सुपरिंटेडेंट | डॉ. संतुजी रामचंद्र लाड, |
| पहिले शिक्षक | लक्ष्मणराव मलकू सत्तूर इत्यादी.[२७] |

(संदर्भ :- ठोंबरे तानाजी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी, लोकवाङ्मयगृह मुंबई, फेब्रुवारी २००९, पृ.१०)

मिशनरीवृत्तीने या कार्याचा झपाटयाने विस्तार केला. पहिल्या तीन वर्षात मुंबई येथे अस्पृश्यांसाठी परळ, देवनार, मदनपूरा, कामठीपुरा येथे व मुंबईच्याबाहेर नाशिक, महाबळेश्वर येथे मिशनच्या शाखा काढून वेगाने काम सुरू केले. मिशनरमध्ये व मिशनच्यावतीने विविध उपक्रम राबविले. सन १९०९ मध्ये पुण्यात मिशनची प्रांतिक परिषद घेतली त्यात सर्व जातिधर्माच्या लोकांनी अस्पृश्यांच्या समवेत भोजन घेतले. अस्पृश्यांना स्वतःचे घर मिळाले.[२८]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेची स्थापना केली. त्याचे कार्यकारी मंडळ बनवून स्वतःकडे सेक्रेटरी पद घेऊन आजन्म या संस्थेचे कार्य या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले.

**डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेची उद्दिष्टे :**

डिप्रेस्ड क्लासेस मिशन संस्थेने आपली उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली होती.

१. अस्पृश्यात शिक्षणाविषयी आस्था निर्माण करणे, त्यांच्यासाठी शाळा, उद्योग शाळा, दवाखाने, वसतिगृहे काढणे.

२. स्पृश्य समाजाचे परिवर्तन करणे, अस्पृश्य निवारणासाठी सर्व स्तरातून पाठिंबा मिळविणे.

३. अस्पृश्यांना नोकऱ्या मिळवून देणे.

४. सार्वजनिक धर्माची शिकवण देणे.

५. अस्पृश्यांच्या सामाजिक अडचणींचे निवारण करणे.

६. सामाजिक धर्म, व्यक्तिगत शील व नागरीकता या गुणांचा प्रसार गरीब लोकांत करणे.[२९]

अशाप्रकारे डिप्रेस्ड क्लासेस मिशनने आपली उद्दिष्टे तयार केली. त्याचप्रमाणे आपले कार्य सुरू केले. या वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचे प्रयत्न काहीएक प्रमाणात स्थानिक पातळीवर केले जात असत. मात्र शेवटचे तीन हेतू मिशन निघाल्यामुळेच साधणे शक्य होणार होते. मिशनचे काम उदार धर्माच्या पायावर उभारण्यात आले. त्यासाठी दर शनिवारी व्याख्याने आणि कीर्तने होत असत. रविवारी सकाळी धार्मिक शिक्षणाचे वर्ग आणि सायंकाळी उपासना होत असत. प्रारंभी हे काम स्वतः महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व त्यांच्या भगिनी जनाबाई करीत असत. सणाच्या दिवशी सामाजिक मेळे भरविण्यास त्यांनी सुरूवात केली. अस्पृश्यवर्गीय स्त्री–पुरूषांमध्ये समानतेच्या नात्याने भाग घेत. पहिल्या वर्षी ९ जाहीर व्याख्याने, ४ कीर्तने, ५ पुराणवचने असे कार्यक्रम झाले.[३०]

**डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे कार्य**

'भारतीय निराश्रित साहयकारी मंडळी'ची मध्यवर्ती शाखा मुंबई शहरात ठेवण्यात आली. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा सुरू करणे, गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनाची तयारी करण्यासाठी उद्योगशाळा चालविणे, विद्यार्थी वसतिगृहे, मोफत दवाखाने, धर्म व नीती शिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, जातिभेद व मूर्तिपूजा यांना वगळून चालविण्यात येणारी उपासनालये असे अनेक उपक्रम मिशनच्यावतीने चालविण्याचे निश्चित झाले. त्याचाच पहिला भाग शेठ दयाराम यांच्यासारख्या उदार लोकांच्या देणगीतून मुंबईत सुरू झालेले 'निराश्रीत सेवासदन' होय. मिशनची पहिली शाळा १९०६ मध्ये एल्फिन्स्टन रोडवर सुरू झाली. मिशनने सुरूवातीपासून कटाक्षाने एक दंडक पाळला होता आणि तो म्हणजे मिशनमध्ये काम करणाऱ्यांनी अस्पृश्य लोक राहतात. तेथेच आपल्या कुटुंबासह त्या सर्व लोकांशी मिळूनमिसळून राहावे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या संदर्भात त्या काळात दाखविलेले धाडस, त्यांच्या कार्यात सहभागी झालेली त्यांच्या कुटुंबातील माणसे, त्या सर्वांनी अत्यंत थोर अंतःकरणांनी अस्पृश्यांची केलेली सेवा शुश्रुषा तर सर्वश्रुत व आदरणीय अशी आहे. विशेष म्हणजे या कामात सहभागी झालेले त्यांचे साथीदार सय्यद अ.कादर, त्यांची बहीण व तिचे पती यांच्यासह ते ग्लोब मिलच्या परिसरात अस्पृश्यांच्या वस्तीत राहू लागले.[३१]

मिशनने प्रारंभीच्या काळात पुढील संस्था सुरू केल्या होत्या.

१) मुलांसाठी एक व मुलीसाठी एक अशा मोफत दिवसाच्या २ शाळा(मराठी ५ वी आणि इंग्रजी तिसरीच्या वर्गापर्यत)

२) नोकरी करणाऱ्या लोकांसाठी रात्रशाळा

३) धर्मार्थ दवाखाना,

४) वाचनालय व ग्रंथालय,

५) मुलांसाठी तालीम,

६) महिलासाठी शिवणवर्ग, प्रार्थना व व्याख्याने इत्यादी

याचवेळी जो अहवाल प्रसिद्ध केला. त्यामध्ये मुलांसाठी माध्यमिक शाळा, मुलीसाठी माध्यमिक शाळा, उद्योगशाळा व ग्रामीण भागातून आलेल्या गरीब होतकरू मुलांसाठी वसतिगृहे असे नवीन उपक्रम सुरू करण्याचा मनोदय प्रकट केला.[३२]

फेब्रुवारी १९०७ अखेरपर्यत दिवसाच्या शाळेत विविध जातीतील विद्यार्थी खालीलप्रमाणे येत होते.

| विद्यार्थी | महार | मांग | चांभार | इतर हिंदू | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| मुले | ७७ | ५ | २३ | ३७ | १४२ |
| मुली | १८ | ० | ४ | ८ | ३० |
| एकूण | ९५ | ५ | २७ | ४५ | १७२ |

(संदर्भ :– पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, नॅशनल ट्रस्ट बुक इंडिया, नवी दिल्ली, २००७)

ही विद्यार्थी संख्या १८ ऑक्टोबर १९०६ रोजी दिवसाच्या शाळेतील आहे.[३३]

डिसेंबर १९०६ पासून मिशनच्यावतीने एक रात्रशाळा सुरू करण्यात आली. त्याचप्रमाणे दर रविवारी सकाळी धार्मिक व नैतिक शिक्षण देण्यासाठी मुलांचे वर्ग भरविण्यात येत होते. त्यात सुमारे २५ मुले हजर असत. ही नीतिशिक्षणाची शाळा १८ ऑक्टोबर १९०६ रोजी सुरू करण्यात आली. २२ नोव्हेंबर १९०६ पासून मिशनच्यावतीने मोफत दवाखाना सुरू करण्यात आला. ४ महिन्याच्या अवधीत महार, चांभार, इतर हिंदू, मुसलमान व ख्रिश्चन वर्गातील १०९ आजारी व्यक्तींनी औषधोपचाराचा लाभ घेतला. डॉ.संतुजी रामजी लाड हे दररोज सकाळी

ठाण्याहून येऊन चार तास रोगी पाहण्याचे काम करीत असत. ते दवाखान्यातच काम करीत असताना आजूबाजूच्या गरीब वस्तीतील घरांमध्ये जाऊन गरीब रोग्यांना मोफत औषधोपचार करीत असत.

या मिशनच्यावतीने जानेवारी १९०७ मध्ये एक ग्रंथालय उघडण्यात आले. त्यात २३२ पुस्तके जमा झाली. या ग्रंथालयासाठी सेठ तुकाराम जावजी, बाबाजी सखाराम आणि कंपनी व मनोरंजक प्रसारक ग्रंथ मंडळ यांनी मदत केली होती.[३४]

डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या स्थापनेपासून तीन वर्षाच्या अवधीत कामाचा मोठा विस्तार केला. मिशनचा त्रैवार्षिक अहवाल १७ ऑक्टोबर १९०९ रोजी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रसिद्ध केला असून त्यामध्ये तीन वर्षातील कामाचा आढावा घेतला असता मुंबईतील मध्यवर्ती शाखेच्या संस्था पुढीलप्रमाणे :

१) **परळ येथील शाळा :–** मराठी ४ थी व इंग्रजी ४ थी, शिक्षक ७, पटावरील मुलांची संख्या २७५, पुस्तके बांधणे आणि शिवणकामाचा वर्ग.

२) **देवनार येथील प्राथमिक शाळा :–** मराठी ४ थी, २ शिक्षक, ४७ मुले.

३) **मदनपुरा प्राथमिक शाळा :–** मराठी ५ वी, ४ शिक्षक, १५० विद्यार्थी

४) **कामाठीपुरा गुजराथी शाळा :–** ही भंगी लोकांसाठी मुंबई येथील पहिली शाळा होय. शिक्षक मिळणे अवघड होते. तरी एक शिक्षक आणि ५१ विद्यार्थी होते.

५) **रविवारच्या शाळा :–** एक परळ येथे व दुसरी मदनपुरा येथे शाळा काढली. यात धर्मशिक्षण आणि नीतिशिक्षण दर रविवारी दिले जाते.

६) **भजनसमाज :–** एक परळ येथे व दुसरी मदनपुरा येथे स्थापन केला. यास ज्येष्ठ मंडळी भजनासाठी आणि उपदेशासाठी जमत असत. तसेच उपासना करीत असत.

७) **व्याख्याने :–** वेळोवेळी उपयुक्त विषयांवर विविध ठिकाणी व्याख्याने होत.

८) **परस्पर सहाय्यक चामडयाचा कारखाना :–** शशिभूषण रथ व दुसऱ्या एका जर्मन तज्ज्ञांच्या नेतृत्त्वाखाली नवीन प्रकारचे बूट तयार करण्याचा कारखाना काढला. त्यासाठी प्रारंभी २००० रूपये भांडवल घातले होते.

९) **निराश्रीत सेवासदन :–** दोन तरूण व ३ स्त्रिया यामध्ये प्रारंभी काम करीत होते. या तीन स्त्रिया गरीब लोकांच्या घरी समाचाराला जात असत. आजाऱ्यांची शुश्रुषा करीत. निराश्रीत लोकांना या सदनात आणत असत. त्यांना शिवण वर्गात प्रवेश दिला जात होता. दोन तरूण सर्व संस्थांची देखरेख करीत असत. परळ शाखेतील सुमारे १२ मुलांची निवासाची व्यवस्था व चौघाची जेवण्याची व्यवस्था सदनातील कार्यकर्त्यांच्या देखरेखीखाली करण्यात आली होती. प्युरिटी सर्व्हंट या नावाचे मिशनचे मुखपत्र दर महिन्याच्या १५ तारखेला प्रसिद्ध होत असे. त्यामध्ये मिशनची सर्व बातमी प्रसिद्ध होत असे व मद्यपाननिषेध व इतर सामाजिक विषयांवर लेख येत असत. मिशनच्या विविध शाखांची त्याचप्रमाणे भारतातील निराश्रीत वर्गासंबंधी माहिती येत असे. त्याचे संपादक व सेक्रेटरी श्री. वा.स.सोहोन हे होते.

**मिशनच्या अन्य शाखा–**

१) **पुणे :–** दिवसाची एक शाळा, रात्रीच्या दोन शाळा, भजनसमाज, चर्चामंडळ, शाळांमधील पटावरील संख्या अनुक्रमे १४९, २५ आणि ३३, भजन समाज आणि चर्चामंडळ येथील सरासरी उपस्थिती ५०. या शाखेचे सेक्रेटरी ए.के.मुदलियार हे होते.

२) **मनमाड :–** एक रात्रीची शाळा, विद्यार्थी संख्या ४५, मद्यपान निषेध मंडळ कार्यरत, वडीलधाऱ्यांनी दारू पिण्यास प्रवृत्त केले, तरी आपण दारू घेणार नाही अशी शपथ हया मंडळातील सदस्यांनी घेतली होती.

३) **इगतपुरी :–** एक दिवसाची शाळा, ६८ मुले. दोन महार तरूणांनी सुरू करून मुंबई प्रार्थना समाजाच्या मार्गदर्शनाखाली चालविली. रविवारचा नीतिशिक्षणाचा वर्ग व भजनसमाजही चालू आहे. या शाखेचे सेक्रेटरी जी.व्ही.भटवडेकर हे होते.

४) **इंदूर :–** एक रात्रशाळा, २० मुले व एक शिक्षक. या शाखेचे सेक्रेटरी आर.जी.मिटबावकर हे होते.

५) **अकोला :–** दोन रात्रीच्या शाळा, ७२ विद्यार्थी, एक भजनसमाज. या शाखेचे सेक्रेटरी एस.सी.होसल्ली हे होते.

६) **अमरावती :–** दोन रात्रीच्या शाळा, ५३ विद्यार्थी. या शाखेचे सेक्रेटरी जी.एन.काणे वकील हे होते.

७) **दापोली :–** एक दिवसाची शाळा, ३७ विद्यार्थी, ही शाखा गरजू मुलांना स्कॉलरशिप, पुस्तके व कपडे पुरविते. या शाखेचे सेक्रेटरी डॉ.वा.अ.वर्टी हे होते.

८) **मंगळूर :–** सन १८९७ पासून ब्राम्हो समाजाचे पुढारी के. रंगराव हे पारिया जातीतील लोकांची स्थिती सुधारण्यासाठी एकाकीपणे प्रयत्न करीत आहेत. एक दिवसाची शाळा, ४९ विद्यार्थी, सहा हातमागाची विणकामसंस्था, सात मुले असलेले बोर्डिंग, सर्व विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण दिले जाते. के.रंगराव यांनी २० गरीब पारिया कुटुंबांची मंगळुरजवळच्या टेकडीवर वसाहत वसविली आहे. ही मंगळूरची संस्था मिशनशी संलग्न केली आहे. या शाखेचे सेक्रेटरी के.रंगराव हे होते.

९) **मद्रास :–** पारिया जातीच्या अस्पृश्यांसाठी दिवसाची शाळा, २३ विद्यार्थी व चांभार जातीच्या मुलांसाठी शाळा, विद्यार्थी २९, नीतिशिक्षणाचे वर्ग व भजनवर्ग नियमितपणे भरतात. या शाखेचे सेक्रेटरी व्ही.गोविंदन हे होते.

**नवीन शाखा :–**

१०) **महाबळेश्वर :–** मे १९०९ मध्ये गव्हर्नरच्या बंगल्यावर लेडी म्यूर मॅकेझी यांच्या आश्रयाखाली मिशनच्या हितचिंतकांची सभा भरली. मेजर जेम्सन हे अध्यक्ष होते. पूर्वी जमलेल्या ९०० रूपयेचा फंड मिशनला देण्यात आला व ही शाखा उघडली. दोरखंड तयार करणे, वेताचे विणकाम करणे ही कामे येथे केली जात होती.

११) **नाशिक :–** सन १९०९ च्या सप्टेबरमध्ये मिशनचे जनरल सेक्रेटरी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे इगतपुरी, मनमाड या ठिकाणी पाहणी करून नाशिक येथे गेल्यावर जाहीर सभा होऊन जिल्हयाची कमिटी नेमण्यात आली. जिल्हयाचे कलेक्टर मि.जॅक्सन यांना अध्यक्ष नेमण्यात आले.[३५]

अशाप्रकारे तिसऱ्या वर्षाच्या अखेरीस मिशनच्या कामाची झपाटयाने वाढ झाली. मिशनच्या १२ शाखा, १६ दिवसाच्या प्राथमिक शाळा चालू होत्या. त्यातून १०१८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सहा रविवारच्या शाळा, पाच भजनसमाज धर्मशिक्षणाचे व नीतिरक्षणाचे काम करीत होते. चार उद्योगशाळा चालू होत्या. मिशनच्या कामाला वाहून घेतलेले ७ कार्यवाह मिळाले व मिशनचे एक मुखपत्र सुरू झाले. तीन वर्षाच्या अवधीत एवढया कामाचा उठाव झाला, ही गोष्ट स्वतः शिंदे यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना निश्चितच उत्साहवर्धक वाटली.

या संस्थेमार्फत 'निराश्रीत सेवासदन' संस्थेचे काम करण्यासाठी वरीष्ठ वर्गातील जे कोणी पुरूष किंवा स्त्री या कामासाठी तयार असतील, त्यांच्यामध्ये या अस्पृश्य वर्गातील गरीब स्त्रियांबरोबर काम करण्याची पात्रता यावी म्हणून त्यांच्या प्रशिक्षण वर्गाची सोय करणे. या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात व्याख्याने, कीर्तने, उपासना, लहान मुलांसाठी सहलीचे आयोजन, त्यांना मिठाई वाटप, वडीलधाऱ्यांच्या सहलीची योजना, गावातील लोकांकडून नवे जुने कपडे गोळा करून त्यांचे गरजूना वाटप करणे, गरीब स्त्रियांसाठी विशेषतः विधवांसाठी शिवणकामाचे वर्ग, लोकांना स्वच्छतेचे शिक्षण देणे, मुलांना आंघोळ घालणे इत्यादी उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. असे योजनाबद्ध व सेवाभावीवृत्तीने प्रेरित होऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कामाला प्रारंभ केला.

पहिल्या तीन वर्षाच्या शेवटी संस्थेच्या कामाचा जो अहवाल प्रसिद्ध करण्यात आला त्यावरून कामाचा व्याप अल्पवाधीत किती वाढला, हे दिसून येते. या अहवालानुसार मुंबई शहरात परळ, देवनार, मदनपूरा, कामाठीपुरा या ठिकाणी मराठी व इंग्रजी चौथी इयत्तेपर्यतच्या शाळा सुरू करण्यात आल्या. यातील कामाठीपुऱ्यातील शाळा भंगी समाजासाठी होती, तर परळ व मदनपुरा येथील शाळा नीती शिक्षणासाठी होत्या. तसेच परळ व मदनपुरा येथे भजनीमंडळे चालविली जात होती. याबरोबरच चामडयाचे बूट तयार करण्याचा एक कारखाना उघडून अल्पसा रोजगार मिळवून दिला जात होता. अस्पृश्य लोकांच्या वस्तीत घरोघर जाऊन आजारी लोकांची शुश्रुषा केली जात होती. मद्यपान व इतर दुष्ट सामाजिक रूढींचा परामर्श घेणारे एक मासिकही चालविले जात होते. हा सर्व कामाचा पसारा मुंबई शहरात वाढत होता, तर मुंबईबाहेर पुणे, मनमाड, इगतपुरी, इंदूर, अकोला, अमरावती, दापोली, मंगरूळ, मद्रास, महाबळेश्वर इत्यादी ठिकाणी प्राथमिक शाळा, वसतिगृहे, विद्यार्थीवेतने, भजनी समाज, चर्चामंडळे, हातमागाचा कारखाना एवढे प्रचंड काम डिप्रेस्ड क्लास मिशनने अल्प काळातच उभे केले. महिलासांठी सेवासदन तर पुरूषांसाठी मुंबई येथे 'सोमवंशीय मित्र समाजा'ची स्थापना मिशनच्यावतीने केली. या सर्व कामाची पाहणी केली तर लक्षात येते की, अज्ञानात व गरिबीत अडकलेल्या अस्पृश्यांना शिक्षण, आश्रय, रोजगार, औषधोपचार, त्यांची व्यसनातून सुटका करण्यासाठी भजनी मंडळे मनोरंजनाचे इतर प्रकार अशी सर्वांगाने तयारी केली होती. कारण मिशनचा प्रमुख हेतू हा होता की, अस्पृश्य लोकांत त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नाने सामाजिक व

धार्मिक सुधारणा घडवून आणाव्यात. बहीण जानाक्का हिने पनवेल येथील मुख्याध्यापिका पदाचा राजीनामा देवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुरू केलेल्या कार्यात सहभागी झाल्या. तर आई–वडील जमखंडीवरून आपल्या मुलाने सुरू केलेल्या कार्यात सहभागी होण्यासाठी मुंबईला आले.[३६]

या संस्थेमार्फत अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या, तरी त्यावेळी मुलांना शाळेत रोजच्या रोज जाण्याची सवय नव्हती. शिक्षणाची आवड लावून देण्यासाठी स्त्रीपरिचारिकांना घरोघरी पालकांच्या भेटी घ्याव्या लागत होत्या. हे काम ख्रिस्ती लोकांचे आहे, असे समजून या स्त्रिया ख्रिस्ती मिशनरी असल्याचा गैरसमज होऊ लागला. म्हणून प्रचारकांनी भारत, भागवत, रामायण इत्यादी ग्रंथाचे अस्पृश्यांच्या घरी वाचन सुरू केले. मुलांच्यामध्ये स्वच्छतेच्या सवयी वाढाव्यात म्हणून दर शनिवारी सदनात स्नान घालण्याची सोय करण्यात आली. या गोष्टींचाही लोकांचा पहिल्यांदा गैरसमज निर्माण झाला. परंतु आजाऱ्यांची सुश्रुषा करण्यासाठी आणि बाळंतपणात मदत देण्यासाठी सदनातील स्त्रियांना शिक्षण देऊन तयार करण्यात आले होते. अशा कामासाठी 'निराश्रीत महिला समाज' या संस्थेचा उपयोग होऊ लागला.[३७]

मिशनमधील विविध संस्थांच्याकडे त्यांचे आईवडीलही लक्ष देण्यासाठी दक्ष असत. त्रास सोसत, पडेल ते काम करत. हया समाजसेवेपायी त्यांच्या मातापित्यांना अनेक दिव्यातून जावे लागत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची भगिनी जनाबाई इतरांच्या घरी समाचाराला, मदतीला गेल्या असता ख्रिश्चन समजून त्यांची अवहेलना होत असे. पण त्या तसूभरही मागे हटल्या नाहीत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे वडीलही हिशेब लिहिणे वगैरेसारख्या कामात मिशनला साहय करीत असत.[३८]

संस्थेच्या कामासाठी आर्थिक मदत प्रारंभीस शेठ दयाराम यांनी तीन वर्षे द.म.रू.१०० ची केली. पुढे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी नवीन कल्पक योजना आखल्या. त्यामध्ये सर्वसामान्य माणसाकडून निधी जमा करण्यासाठी रूपी फंड, कापड फंड, तांदूळ फंड, पेटी फंड इत्यादी अभिनव व लोकांच्या संवेदना प्रत्यक्ष कृतीत रूपांतरीत करणारे उपक्रम सुरू केले. या उपक्रमाबरोबरच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनच्या मदतीसाठी पुण्यात गव्हर्नरच्या कन्येचा करमणुकीचा कार्यक्रम सादर केला यातून कायम स्वरूपाचा रू.५०००/– चा निधी उभा करण्यात आला. मुंबईच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत एक प्रचंड सभा करण्यात आली.

त्यांनी मिशनला २०००/- रू.ची देणगी दिली. यातून प्रेरणा घेऊन मिशनचे उपाध्यक्ष शेठ दयाराम यांनी उदार हस्ते.५०००/- ची देणगी संस्थेला दिली. पुढे लॉर्ड हार्डिंग्ज (व्हाईसराय) यांनी रू.२०००/- ची तर वाडिया ट्रस्टने रू.१८,०००/- च्या देणग्या दिल्या.[३९]

अशाप्रकारे डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केल्यानंतर तिने ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे अस्पृश्यांच्या जीवनामध्ये क्रांतीकारी परिवर्तन घडवून आणून त्यांचा विकास साधला होता. अस्पृश्यता नष्ट करून अस्पृश्य आणि दलित समाजाची गरीबी दूर व्हावी म्हणून शिक्षण प्रसार, नोकरी मिळवून देणे, सामाजिक समस्या सोडविणे, सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत धर्म व नागरिकता इत्यादी गुणांचा प्रसार करून डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारण व दलितोद्धार कार्य सुरू केले. या कार्यासाठी त्यांना तळमळीने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज भासत होती. ती मिळवण्याची सुरूवात त्यांनी आपल्या घरापासून केली. यानंतर अनेक कार्यकर्ते सहभागी झाले. तशी पैशांची गरज भासू लागली. ती गरज त्यांनी विविध प्रकारचे फंड उभारून भागविली. तसेच ठिकठिकाणी उद्योगधंदे उभे केले. उदा. महाबळेश्वर येथे काथ्यापासून दोरखंड, पुस्तक बांधणी, वेताच्या टोपल्या बनविणे इत्यादीच्या माध्यमातून पैसा उभा केला. डिप्रेस्ड क्लास मिशनचे कार्य चांगल्याप्रकारे चालविले.

**पुणे शाखेचे कार्य**

मुंबईनंतर २२ जून १९०८ रोजी पुणे लष्करात दिवसाची पहिली शाखा उघडून मिशनच्या कार्याचा प्रारंभ केला. तेथे शिकविण्यास कोणी शिक्षक मिळत नव्हता, म्हणून मुंबईतील ए.व्ही.गुर्जर यांना पाठविले. खर्चाची रात्र-दिवस तळमळ लागली असता पुणे शाखेचे चिटणीस रा.मुदलियात यांनी त्यावेळचे गव्हर्नर क्लार्क यांना एक विनंतीपत्र पाठविले. ही शाखा मदतीस लायक आहे. असे गव्हर्नरचे मत झाले, एवढेच नव्हे तर त्यांनी या शाखेच्या मदतीकरिता स्वतःच्या कन्येला, मिस व्हायोलेट क्लार्क, यांना जलशाचा कार्यक्रम आयोजित करण्यास अनुमती दिली.

सन १९०८ अखेर हया शाखेच्या पुढील उपशाखा सुरू झाल्या. त्या पुढीलप्रमाणे-

१) पुणे, लष्कर दिवसांची शाळा.

२) पुणे, लष्कर रात्रीची शाळा.

३) पुणे, लष्कर वाचनालय.

४) गंजपेठ, रात्रीची शाळा.

५) मंगळवार रोड, रात्रीची शाळा. ही शाळा सन १९०५ साली महर्षींनी उघडली होती.

पुणे शाखेचा पहिला बक्षिस समारंभ १६ सप्टेंबर १९०९ रोजी बडोदा संस्थानाचे संस्थानिक महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. दि. १८ ऑक्टोबर १९०९ हा मिशन स्थापनेचा दिवस पुणे शहरी किर्लोस्कर थिएटरमध्ये साजरा झाला. रँ.र.पु.परांजपे अध्यक्षस्थानी होते. ल.ब.भोपटकर, न.चि.केळकर, इस्माईल बहाद्दूर, हंपीच्या शंकराचार्यांचे एजंट श्री हरकारे, प्रो.धर्मानंद कोसंबी, प्रो.धोंडो केशव कर्वे अशा विविध धर्माच्या, विविध मतप्रणालीच्या आपापल्या क्षेत्रात गाजलेल्या मंडळींनी जोरदार भाषणे केली व देणगीतही पुढाकर घेतला.[४०]

**राष्ट्रीय पातळीवर मिशन परिषदा :-**

मिशनच्या तृतीय संस्थापन दिनाच्या निमित्ताने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महाराष्ट्रात आणि भारतातील इतर प्रांतात दौरे काढले. 'भारतीय राष्ट्रीय सभेच्या' म्हणजे काँग्रेसच्या वार्षिक परिषदांच्या वेळेला त्यांनी मिशनच्याही परिषदा भरवायला सुरूवात केली. मिशन सन १९०६ मध्ये स्थापन झाल्यानंतर १९०७ मध्ये सुरत, सन १९०८ मध्ये मद्रास, १९०९ मध्ये लाहोर, सन १९१० मध्ये अलाहाबाद, सन १९१२ मध्ये बाकीपूर, तसेच सन १९१३ मध्ये कराची काँग्रेसच्या वेळी त्यांनी परिषदा भरविल्या. काँग्रेसच्या अधिवेशनाला लागूनच अशा परिषदा बोलाविण्याचा त्यांचा हेतू दुहेरी होता. एकतर अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे जनतेचे लक्ष वेधावे व दुसरे म्हणजे काँग्रेसच्या प्रत्यक्ष कार्यात त्याला स्थान मिळवून काँग्रेसच्या चळवळीचे ते एक अंग व्हावे. पण हा प्रश्न धार्मिक असल्याने त्याची भेसळ राजकारणात नको असे सांगून त्यावेळचे जहाल आणि मवाळ पुढारीही हा प्रश्न सफाईदारपणे टाळीत. हा प्रश्न राजकारणात घुसडला तर लोकमत काँग्रेसविरूद्ध होईल अशी भीती वाटे. पण त्यांनी आपली चिकाटी सोडली नाही.

**महाराष्ट्र परिषद :-**

सन १९१२ पर्यत मिशनचे कार्य दूरवर पसरले होते. शाळा, दवाखाने, वसतिगृहे, उद्योगालये चालविणे, त्यासाठी सहकारी मिळविणे, देणग्या गोळा करणे, लहानमोठया परिषदा भरविणे असा मोठा व्याप त्यांनी वाढविला. ही जटील समस्या राजकीय आणि राष्ट्रीय पातळीवर

नेण्यासाठी भारतभर प्रयत्न केले. हे कार्य करीत असताना त्यांचे आकलन दुहेरी होते. वरीष्ठ समजल्या जाणाऱ्यांनी ही अस्पृश्यता मानली. याचा अर्थ अस्पृश्यतेचे अस्तित्त्व त्या वरीष्ठ वर्णीयांच्या जाणिवेमुळे निर्माण झाले आहे असे ठरते. तेव्हा अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर तथाकथित वरीष्ठ वर्णीयांच्या मनामधील ही भ्रामक जाणीव नष्ट करणे हा त्यांच्या कार्याचा एक भाग तर शतकानुशतके बहिष्कृत अवस्था लादल्यामुळे अस्पृश्य ठरवल्या गेलेल्या वर्गाला प्राप्त झालेला निकृष्ठपणा नाहीसा करणे, त्यांच्या मनात स्वाभिमान निर्माण करणे, त्यांना सुशिक्षित व उद्योगी बनविणे हा त्यांनी आपल्या कार्याचा दुसरा भाग मानला होता.

मिशनला सन १९१२ मध्ये ६ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त दि.५ ते ७ ऑक्टोबर रोजी पुणे येथे महाराष्ट्र परिषद या नावाखाली मोठी अस्पृश्यता निवारण परिषद घेतली. तिच्यामध्ये सर्व धर्माच्या, जातीच्या लोकांनी सक्रीय सहभाग घेतला. या परिषदेस 'महार, मांग, चांभार, ढोर, भंगी, ब्राम्हण, मद्रासी, ब्राम्हो, ख्रिस्ती, मुसलमान अशा १० गावातून १० समाजाचे मुंबई इलाख्यातून, बाहेरच्याही निरनिराळया १७ जिल्हयातील ५४ गावातून २६० प्रतिनिधीनी परिषदेत भाग घेतला. जे मुख्य सहभोजन झाले त्यात ३५० 'अस्पृश्य' वर्गाचे आणि ५० निरनिराळे ब्राम्हणादी वरीष्ठ वर्गाचे लोक एकाच पंक्तीस होते.'[४१]

या परिषदेत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनच्या कार्याचा आढावा घेतला.

| अ.नं. | ठिकाणे | संस्था |
|---|---|---|
| १. | मुंबई | ५ दिवसाच्या शाळा व १ रात्रीची शाळा<br>५०० विद्यार्थी, १ वसतिगृह व त्यातील २६ मुले, २ भजनसमाज, १ धंदेशिक्षणाची शाळा |
| २ | पुणे | एक २०० मुलांची शाळा, १ भजनसमाज, १ वाचनालय, क्रिकेट क्लब वगैरे |
| ३ | हुबळी | १ दिवसाची शाळा, १ रात्रीची शाळा, १ वसतिगृह |
| ४ | सातारा | १ रात्रीची शाळा, १ भजनसमाज |
| ५ | ठाणे | गरीब विद्यार्थ्यांना मदत करणारी स्थानिक मंडळी. |
| ६ | दापोली | गरीब विद्यार्थ्यांना मदत करणारी स्थानिक मंडळी. |
| ७ | मालवण | गरीब विद्यार्थ्यांना मदत करणारी स्थानिक मंडळी. |
| ८ | मंगलोर | १ दिवसाची शाळा, १ रात्रीची शाळा, १ वसतिगृह, १ हातमागाचा वर्ग. |
| ९ | मद्रास | २ दिवसाची शाळा, २ रात्रीची शाळा, एकंदर मुले १३०. |
| १० | अकोला | ३ रात्रीच्या शाळा, १ वसतिगृह |
| ११ | अमरावती | २ रात्रीच्या शाळा |
| १२ | इंदूर | १ रात्रीची शाळा |
| १३ | भावनगर | १ दिवसाची शाळा |
| १४ | कोल्हापूर | १ वसतिगृह[४२] |

(संदर्भ :- पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, नॅशनल ट्रस्ट बुक इंडिया, नवी दिल्ली, २००७)

अशाप्रकारे मुंबई महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, खानदेश, कोकण, कानडा, मद्रास, कौर भागातील एकंदर १४ ठिकाणी २३ शाळा, ५५ शिक्षक, ११०० मुले, ५ वसतिगृहे इतर १२ संस्था आणि ७ आजन्म वाहून घेतलेले प्रचारक असून एकंदर वार्षिक खर्च २४,४८५ रूपये होते.[४३]

यावेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सांगितले की, 'निरनिराळ्या ४ भाषा चालू असलेल्या ७ प्रांतातून मिशनला आपले प्रयत्न करावयाचे आहेत. असे सांगून त्यासाठी हल्ली भरलेल्या परिषदेसारख्या निरनिराळ्या ठिकाणी प्रांतिक परिषदा भरविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.' प्रस्तुत परिषदेमध्ये कामाचा विस्तार परिणामकारकरीतीने करता यावा यासाठी कोणते प्रश्न आहेत. या प्रश्नावर कोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे. इत्यादी बाबींचा प्रामुख्याने व्यावहारिक अंगाने विचार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

प्रस्तुत परिषदेचा वेगळेपणा सांगताना शिंदे यांनी म्हटले की, आजकाल आपल्या देशात विवक्षीत जातीच्या अनेक परिषदा भरत आहेत, पण त्या परिषदेपेक्षा ही परिषद अगदी भिन्न स्वरूपाची आहे. अनेक जाती हया परिषदेत एकत्रित आल्यावर अखेर सरकार संस्थानिक, म्युनिसिपालटया आणि परोपकारी संस्था, सर्व जाती आणि सर्वधर्म एकूण हया प्रचंड देशातील सर्व शुभशक्ती हयांचे केंद्र हया कार्यात जितक्या अंशाने जास्त साधेल तितक्याच अंशाने अधिक यश येईल.' असा आशावाद प्रकट केला.[४४]

या परिषदेत एकंदर १९ व्याख्याने झाली व परिषद उत्साहाने पार पडली. यातील पहिले व्याख्यान देणारे श्री गणेश आकाजी गवई हे काही दिवस मुंबई येथे मिशनच्या निराश्रीत सदनामध्ये वसतिगृहातील विद्यार्थी म्हणून राहिले होते. त्यांनी आपल्या भाषणात 'वऱ्हाडात ख्रिश्चन मिशनने अस्पृश्यांसंबधी केलेले काम व त्याची मिशनच्या कार्याशी तुलना' या विषयावर त्यांनी विवेचन केले. याशिवाय बी.एस. कामत, सौ.लक्ष्मीबाई रानडे, रा.गोपाळराव देवधर, रा.केशव रामचंद्र कानिटकर, रा.भास्करराव जाधव, रा.नाथामहाराज(भंगी पुढारी), नामदार बाबासाहेब इचलकरंजीकर, प्रो.गो.चि.भाटे, न.चि.केळकर, रा.आर.जी.प्रधान, प्रो.हरिभाऊ लिमये, रा.जोग – इचलकरंजीकरांचे चिटणीस, रा.वि.रा.शिंदे, एल.बी.नायक, श्री महाभागवत(भावी शंकराचार्य), प्रो.लक्ष्मणशास्त्री लेले व अध्यक्षीय भाषण भांडारकर यांनी केले.

इत्यादी १९ वक्त्यांनी १९ भाषणे करून बहुमोल असे मार्गदर्शन केले.[४५]

**कर्नाटक व मध्यप्रांतातील शाखा–**

सन १९१२ मध्ये मुंबई येथे भारतीय निराश्रीत साहयकारी मंडळीचे काम करीत असतानाच विठ्ठल रामजी शिंदे यांना जाणवत होते की, कर्नाटक प्रांतामध्ये मिशनचे काम वाढविणे आवश्यक आहे. कर्नाटक प्रांतामध्ये अस्पृश्योद्धाराचे व अस्पृश्यता निवारणाचे कार्य करायचे असेल तर हुबळीसारख्या ठिकाणी मिशनची एक अंगभूत शाखा स्थापन करणे फार उपयुक्त होईल, असे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना वाटत होते.

हुबळी येथे मिशनची शाखा सन १९१२, बेळगाव येथील शाखा सन १९१५, तर गोकाक येथे सन १९१८ मध्ये शाखा स्थापन करण्यात आली. हुबळी शाखेमध्ये दिवसाच्या शाळांच्या जोडीनेच रात्रीच्या शाळा चालविल्या जात. दिवसा भरणाऱ्या शाळेत पुस्तकी शिक्षणाबरोबरच शिवणकाम व सुतारकाम इत्यादी धंद्याचे शिक्षण दिले जात असे. सन १९१८ मधील खर्च विचारात घेतला तर सुमारे ३५०० रूपये एवढा खर्च सुमारे २२५ मुलांवर दरसाल होत असे. हुबळी येथील मिशनच्यावतीने चालविलेले धंदेशिक्षणाचे महत्त्व ध्यानात घेऊन तेथील दक्षिण भागाचे कमिशनर मि.माऊंट फोर्ट यांनी डिस्ट्रिक्ट बोर्डाला सूचना केली, की दर जिल्हयात खालच्या वर्गातील मुलांना धंदेशिक्षण देण्यासाठी एक शाळा असावी. त्याप्रमाणे धारवाडच्या डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या सूचनेवरून हुबळी शाखेच्या सुपरिटेंडेंटनी एक योजना तयार करून पाठविली. हया शैक्षणिक कामाबरोबरच मिशनची शाखा परोपकाराची कामे करत होती. नोव्हेंबर १९१८ मध्ये हुबळी येथे इन्फ्लुएंझाची मोठी साथ आली. त्यावेळेला शाळा बंद कराव्या लागल्या. मात्र मिशनच्या शाळेतील शिक्षकांनी गोरगरिबांना औषधे पुरविण्याचे काम या साथीमध्ये केले. गोकाक येथील शाळेत रात्रीची एक शाळाही सुरू करण्यात आली.[४६]

अशाप्रकारे कर्नाटक शाखेने अस्पृश्य वर्गासाठी वरील प्रकारचे कार्य सुरू करून एक नवी जागृती निर्माण केली. कर्नाटक प्रांतात सुखवस्तू लोक बरेच आहेत. मात्र हया कामाकडे त्यांचे अद्यापि जावे तसे लक्ष गेलेले नव्हते. या सुखवस्तू लोकांच्या सहानुभूतीचा ओघ अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांच्या उन्नतीसाठी वळविण्यात कर्नाटक शाखेला बरेच यश मिळाले होते. सय्यद यांनी घालून दिलेली घडी व नंतरच्या काळात श्री.दा.ना.पटवर्धन यांनी शिस्तशीरपणे व कळकळीने केलेले कार्य यामुळे हुबळी शाखा कर्नाटक प्रांतामध्ये उत्तम प्रकारे

कार्य करू शकली.[४७]

## गुन्हेगार जातीच्या विकासासाठी केलेले कार्य

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनद्वारे गुन्हेगार जातीच्या विकासासाठी कार्य केले होते. या जातीमध्ये मांग, रामोशी, मांग,गारूडी, बेरड वगैरे कित्येक 'अस्पृश्यवजा' मानलेल्या जातीची गणना सरकारदृष्टया गुन्हेगार जातीत होत होती. त्यांना स्वाभिमानाने व स्वावलंबनाने जगता यावे इकडे त्यांनी लक्ष दिले होते. पुणे येथे महाराष्ट्र परिषदेत मांग जातीचे पुढारी श्री.श्रीपतराव चांदणे यांच्याशीही त्यांनी वरील प्रश्नावर चर्चा केली होती. मुंबई इलाख्यात गुन्हेगार गणल्या गेलेल्या जाती आहेत. त्यांच्या उन्नतीसाठी एक योजना त्यांनी तयार केली. ती एका शिष्टमंडळातर्फे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्यापुढे ऑगस्ट १९१५ मध्ये ठेवण्यात आली. गुन्हेगार जातीची एक वसाहत स्थापन करावी, अशी ती योजना होती. या योजनेस २०,००० रूपये खर्च येणार होता.[४८]

विशेषतः त्यासाठी सातारा, सांगली, बुधगाव इत्यादी भागात त्यांनी शेकडो मैलांचा पायी प्रवास केला. त्यावेळी हा सर्व परिसर जंगली प्रदेशच होता. तरीही गुन्हेगार जातींच्या कल्याणाचा ध्यास घेऊन त्यांनी जागा निवडण्याचे काम केले. तथापि पुढे लवकरच पहिले महायुद्ध सुरू झाले. सरकारने निवडलेली ही आयती जागा सैनिकांच्यासाठी राखून ठेवली. कालांतराने या जागेवरच विलिंग्डन कॉलेज उभे राहिले. या गोष्टीची खंत त्यांनी आपल्या आठवणीमधे नोंदविलेली आहे. ते म्हणतात, 'आमच्या चौकशीचा फायदा सरकारला मिळाला. उन्हातान्हातून चौकशीची धावपळ केली कुणी? आणि अखेरीस नशिबाने माळ कोणाच्या गळयात घातली.'[४९]

गुन्हेगार लोकांच्यासाठी शेतकी खेडे वसविण्याची शिंदे यांची कल्पना त्यावेळेला मूर्त झाली असती, तर या बाबतीत एका अभिनव प्रयोगाचे दर्शन घडून गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जातींच्या भवितव्याला वेगळे वळण मिळाले असते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतातील अस्पृश्यता निवारण्यासाठी आपली मते व सूचना हिंदुस्थान सरकारला खलित्याद्वारे २७ ऑक्टोबर १९१६ रोजी पाठविली होती. त्यात त्यांनी अस्पृश्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षण, सहकार, स्वावलंबन इत्यादी तत्वांचा पुरस्कार केला होता. त्यांनी दिलेली मते व सूचना खालीलप्रमाणे होत्या.

१) शहरे व खेडेगावी अस्पृश्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी ताबडतोब अधिक शाळा काढाव्यात.

२) अशा शाळेला जोडूनच 'टेक्निकल'(औद्योगिक) शिक्षण देणारे वर्ग निदान जिल्हयात एका ठिकाणी तरी असावेत.

३) विद्यार्थ्यांची बेसिक प्रगती व कल्याण साधण्यासाठी महत्त्वाच्या केंद्रात छात्रालये(आश्रम) स्थापावीत.

४) विद्यार्थ्यांना त्यांच्या भागांत ट्रेनिंग कॉलेज व टेक्निकल हायस्कूल यामध्ये शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून त्यांना शिष्यवृत्त्या देण्याची सोय करावी व याची जाहिरात करावी.

५) 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' सारख्या खाजगी संस्थांना सरकारने उत्तेजन द्यावे व संस्थेतील विद्यार्थी ट्रेनिंग कॉलेज व टेक्निकल हायस्कूलमध्ये सरकारने पाठवावेत.

६) अस्पृश्य वर्गाच्या शाळांसाठी सरकारने स्वतंत्र अशा चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करावी, म्हणजे त्या अधिकाऱ्याला स्वतंत्र जबाबदारीची जाणीव वाटेल व त्यातून चांगला कार्यभाग साधेल.

७) अस्पृश्य वर्गात सहकारी सोसायटयांची वाढ होण्यासाठी सरकारने त्यांना खास सवलती द्याव्यात.

८) अस्पृश्य वर्गात अधिक कार्य करण्यासाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या संस्थेला सरकारने आर्थिक मदत करावी.

९) महत्त्वाच्या ठिकाणी संस्थांच्या प्रतिनिधींची एकत्र कमिटी नेमावी. या कमिटीत खालील संस्था असाव्यात. डिप्रेस्ड क्लासेस मिशन, म्युनिसिपालिटी, लोकल बोर्डस, सरकारी शिक्षण खाते व वैद्यकीय खाते यांचे त्यात प्रतिनिधी असावेत. यांनी वेळोवेळी एकत्रित बसून अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीसाठी काही उपाययोजना सुचवाव्यात आणि त्यांची अंमलबजावणी होते की नाही ते पहावे.

१०) या वर्गाच्या प्रश्नावर लोकमत तयार करण्यासाठी या कमिटीने प्रांतिक परिषद व व्याख्याने संघटित करावी.[५०]

अशाप्रकारे भारत सरकारला पाठविलेल्या खलित्यात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांच्या संर्वागीण उद्धाराची सनदच जाहीरपणे प्रकट केली होती.

## अस्पृश्यता निवारक संघाची स्थापनाः–

हिंदुस्थानातील लोकांत राष्ट्रीय जागृती घडून येऊ लागली होती. अशावेळी डिप्रेस्ड क्लासेस मिशनला कोणत्याही राजकीय पक्षाशी समरस न होता केवळ स्वतंत्रपणे मागासलेल्या लोकांच्या हितसंबंधाचा पुरस्कार करणे भाग पडले. हे राजकरणाचे काम मिशनच्या शैक्षणिक कामापासून वेगळे ठेवून स्वतंत्ररीतीने चालविणे इष्ट होते. त्यासाठी एक निराळीच सहकारी संस्था काढण्याची आवश्यकता वाटू लागली. तसेच त्यांनी या कार्याकडे राजकारणातील राष्ट्रीय पक्षाचे लक्ष वेधणे आवश्यक होते. तेव्हा राजकारणाशी संबंधित असलेले काम स्वतंत्ररीतीने चालविण्याची गरज निर्माण झाली. या कामासाठी पुणे येथे सन १९१७ मध्ये 'अस्पृश्यता निवारक संघाची' स्थापना करण्यात आली.

या संघाच्याद्वारे अस्पृश्यांसंबंधी वेळोवेळी जे राजकीय प्रश्न निघत त्यावर विचार करण्याची गरज होती. त्यात मिशनवर कोणतेही संकट येऊ नये, अशी त्यांची मूलतः दृष्टी होती. प्रा.गं.बा.सरदार म्हणतात, "अस्पृश्य समाजात राजकीय जागृती होत असलेली पाहून शिंदे यांना खरोखरच समाधान वाटले आणि त्यांच्या हितसंबंधाचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी एक व्यासपीठ उभे केले. या राजकीय चळवळीची 'निराश्रीत साहयकारी मंडळी'च्या शैक्षणिक कार्याला झळ लागू नये म्हणून त्यांनी 'अस्पृश्यता निवारक संघ' स्थापन केला."[५१]

या संघामार्फत काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात 'अस्पृश्यता निवारणा'चा ठराव पास करून घेण्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. त्याच्याही अगोदर काँग्रेसने हा प्रश्न आपल्या कार्यक्रमाचा भाग बनवावा म्हणून ते १९०६ सालापासून सर्व काँग्रेस अधिवेशनाला हजर होते. दि. ११ जानेवारी १९१७ रोजी मुंबई डी.सी.मिशन सोसायटीच्यावतीने त्यांनी जी अस्पृश्यांची सभा घेतली, त्या सभेतही ही समस्या राष्ट्रीय सभेने हाती घ्यावी, असा ठराव पास केला होता. राष्ट्रीय सभेने अस्पृश्यतेसंबंधी स्वतंत्र ठराव करावा असा त्यांनी अनेक वर्षे काँग्रेस नेत्यामागे तगादा लावला होता. अखेर सन १९१७ मध्ये डिसेंबरच्या शेवटी कलकत्यास ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास अस्पृश्यतेबद्दलचा ठराव मंजूर करण्यात आला. डॉ.ॲनी बेझंट या मिशनच्या सभासद हितचिंतक होत्या. मिशनच्या कार्याची त्यांना जवळून माहिती होती.[५२]

अस्पृश्य वर्गावर जो अन्याय होत होता. तो बंद करण्यात यावा यासाठी मद्रासचे जी.ए.नटेशन यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये ठराव मांडला. काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याच्यादृष्टीने केलेला हा पहिलाच ठराव होता. त्यादृष्टीने या ठरावाला काँग्रेसच्या इतिहासात तसेच अस्पृश्यांच्या चळवळीच्या इतिहासातही महत्त्व आहे. काँग्रेस हा देशव्यापी असा सामर्थ्यशाली सुसंघटीत राजकीय पक्ष आहे. काँग्रेसनेच आपल्या अधिकृत अधिवेशनात अस्पृश्यतेविरूद्ध व अस्पृश्यता निवारण्यास पोषक असा हा ठराव करून अस्पृश्यता निवारण्याच्या प्रश्नाला महत्त्व दिले. या ठराव मांडण्याच्या प्रक्रियेमागे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अथक प्रयत्न होते. अशाप्रकारे एकदा राष्ट्रीय सभेनेच असा ठराव संमत केल्यानंतर प्रांतिक शाखानीही या ठरावाला अनुमती दिली व अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला राष्ट्रीय मान्यता मिळून गती आली.[५३]

**अस्पृश्यता निवारक परिषद :**

अस्पृश्यता निवारक संघ स्थापन करण्यापाठीमागचा हेतू म्हणजे मुंबई–पुणे येथे अस्पृश्यतेच्या संदर्भात काम करणाऱ्या सर्वच कार्यकर्त्यांचे संमेलन व्हावे आणि या कार्यात बहुजन समाज आणि अस्पृश्य बांधवांनी सहकार्याने प्रयत्न करावेत, हा होता. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी संघाच्या स्थापनेनंतर अस्पृश्य वर्गाच्या पुढाऱ्यांची एक अखिल भारतीय परिषद २३ मार्च १९१८ रोजी मुंबईला घडवून आणली. या परिषदेचे अध्यक्ष श्री.सयाजीराव गायकवाड हे होते. देशाच्या विविध भागातून ना.सी.व्ही.मेहता, व्ही.जे.पटेल, बाबू बिपीनचंद्र पाल, एस.आर.बमनजी, जमनादास द्वारकादास, पी.के.तेलंग, आर.जी.प्रधान, लक्ष्मीदास तेरसी, बॅ.जयकर, भुलाभाई देसाई इत्यादी मान्यवर नेते मंडळी या परिषदेला उपस्थित होते. परिषद तीन दिवस चालली सुमारे सात हजार लोक हजर होते. स्वागताध्यक्ष न्या.चंदावरकर म्हणाले, 'इतिहास आपणास असे सांगतो की, ज्यापासून राष्ट्राचा विकास होतो. अशा सर्व प्रकारच्या प्रागतिक चळवळींचा उगम थोडयाशा व्यक्तींच्या कार्यात आढळतो. प्रस्तुतच्या बाबतीत त्या व्यक्ती म्हणजे ज्यांची प्रथम अत्यंत हेटाळणी झाली. ते डी.सी.मिशनचे कार्यकर्ते होत. त्यांच्या कार्याने प्रचंड हिंदू समाजाची सद्सद्विवेकबुद्धी जागृत झाली.'[५४]

या परिषदेत पुढील ठराव पास करण्यात आले होते. पहिला ठराव हा निकृष्ठ वर्गावर लादलेली अस्पृश्यता यापुढे ताबडतोब काढून टाकण्यात यावी आणि या कार्यासाठी प्रत्येक

प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी एक अस्पृश्यता निवारक जाहिरनामा काढून निकृष्ठ वर्गास शाळा, दवाखाने, न्यायकचेऱ्या सर्व सार्वजनिक संस्थांत तसेच विहीरी, तळी, पाणवठे, देवालये, करमणुकीची ठिकाणे येथे कोणत्याही प्रकाराचा प्रतिबंध न लावता पूर्ण मोकळीक करून द्यावी, असे या परिषदेचे मत आहे. या परिषदेने अस्पृश्यता निवारक जाहिरनाम्याचा मसुदा तयार करण्याचे व त्यावर राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या सहया घेण्याचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावर सोपविण्यात आले होते.

या परिषदेतील दुसरा ठराव पास झाला, तो म्हणजे निकृष्ट वर्गावर लादलेले धार्मिक निर्बंध ज्यावेळी नाहीसे होतील त्याचवेळी त्यांच्या उन्नतीचे कार्य अत्यंत झपाटयाने व यशस्वीपणे पार पडेल. याकरीता ही सभा हिंदू धर्मसंस्थाधिपतीकडून पुढील कामे करून घेत आहे. अस्पृश्यता नाहिशी करण्याकरीता धार्मिक आज्ञापत्रे काढणे, हिंदू धर्मावर अस्पृश्यांची श्रद्धा दृढ करण्याकरीता धर्मशिक्षक नेमून त्यांच्यात हिंदू धर्मतत्त्वांचा फैलाव करणे, हिंदू लोकांकडून सर्वसाधारण धार्मिक सभांत भाग घेण्याची अस्पृश्यांना परवानगी देणे.'[५५]

सन १९१७ नंतर विविध प्रांतात या संघाच्या परिषदा होऊ लागल्या. सन १९१८ सालच्या परिषदेत भाषण करताना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणाले होते की, परमेश्वराच्या घरचा दरवाजा कोणासाठीही लावलेला नाही आणि तो दरवाजा लावून टाकणारा तो परमेश्वरच नाही, असे मी समजेन. 'जी अस्पृश्यता मेल्यावर राहत नाही, जी अस्पृश्यता परमेश्वराच्या घरी जाताना आड येत नाही.' ती अस्पृश्यता आपण आपल्या समाजावर वावरू देणे म्हणजे परमेश्वराच्या घरी पाप केल्यासारखे आहे.[५६]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्थापन केलेला अस्पृश्यता निवारक संघास राष्ट्रीय नेत्यांनीही पाठिंबा दिला होता. या संस्थेमार्फत अस्पृश्यता निवारणाचे कार्य फार मोठया प्रमाणावर करण्यात आले होते.

**अहिल्याश्रमाची उभारणी–**

अस्पृश्यता निवारणाचे कार्य विविध संस्थात्मक माध्यमातून सुरू असताना सन १९१२ मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनचे ठाणे पुण्यास आणले. त्यावेळी महात्मा फुले यांनी सन १८५२ मध्ये ज्या जागेत अस्पृश्य वर्गासाठी शाळा काढली होती. ती जागा व तिच्याजवळ असलेली भोकरवाडीची आठ एकर जागा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी निश्चित केली. प्रदीर्घ

परिश्रम करून दि. १८ जून १९१४ पासून ९९ वर्षाच्या कराराने पुणे म्युनिसिपालटीतून ती मिळविली.[५७]

ही जागा अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसाठी आणि अस्पृश्यता निवारणाचे कार्य करणाऱ्या मिशनसाठी निवडण्याचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या दृष्टीने एक महत्त्वाचे कारण होते. ही जागा महात्मा जोतिबा फुले यांनी अस्पृश्य वर्गासाठी शाळा चालविण्याच्या हेतूने आपल्या संस्थेसाठी सरकारकडून घेतलेली होती. ती पुढे सरकारकडे जाऊन म्युनिसिपालटी स्थापन झाल्यानंतर म्युनिसिपालटीकडे गेली होती. महात्मा जोतिबा फुले यांचे कार्य चालविण्यासाठी मिशनला जागा पाहिजे, अशी ऐतिहासिक परंपरा सिद्ध करून दाखविल्यानंतर पुणे शहर म्युनिसिपालटीने एवढी मोठी जागा मिशनला देण्यासाठी आढेवेढे घेतले नाहीत आणि कार्याचे महत्त्व ध्यानात घेऊन सरकारनेही या व्यवहाराला मंजुरी दिली.[५८]

श्रीमंत तुकोजीराव होळकर यांच्याकडून वीस हजार रूपयांची आरंभी मिळालेली देणगी व त्यानंतर पुणे शहर म्युनिसिपालटीकडून मिळालेली जागा या क्रमानंतर इमारत बांधण्यासाठी सरकारकडून आर्थिक साहाय्य मिळविणे हे ओघानेच येत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी संकल्पित इमारतीचे नकाशे व खर्चाची अंदाजपत्रके वगैरे जोडून सरकारी विद्याखात्याकडे अर्ज पाठविला. जुलै १९१३ मध्ये लॉर्ड विलिंग्डन यांच्याकडे एक खास डेप्युटेशन नेण्यात आले. त्यावरून संकल्पित अहिल्याश्रमाची इमारतीसाठी वीस हजार रूपयांची मदत देण्याचा सरकारी ठरावही झाला. पण पुढे सन १९१४ मध्ये आकस्मिकपणे महायुद्धाचे संकट ओढवल्यामुळे परिस्थितीत बदल झाला. सरकार इमारतीसाठी लगेच आर्थिक साहाय्य करू शकत नव्हते. म्हणून इमारतीचे बांधकामही पुढे ढकलण्यात आले. मात्र वरील शिष्टमंडळाने मिशनच्या मुंबई, पुणे, हुबळी येथील शाखांतील विद्यार्थी वसतिगृहाचे काम कसे चालले आहे व मुंबई आणि पुणे येथील वाडिया ट्रस्टीच्या देणगीतून औद्योगिक शिक्षणाचे काम कसे चालले आहे. हे लॉर्ड विलिंग्डन यांना नीट समजावून सांगितले. मिशनच्या कामाचे महत्त्व त्यांना भावले असल्यामुळे त्यांनी मिशनला विशेष सवलतीचे 'ग्रँट इन एड' देण्याचे आश्वासन दिले व वसतिगृहाच्या मदतीसाठी दोन हजार रूपयापर्यंतची मदत युद्धाची अथवा अन्य कोणतीही सबब न सांगता दरसाल करण्याचे मान्य केले व ही मदत वर्षानुवर्षे पुढे मिळत राहिली.[५९]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अहिल्याश्रमाची उभारणी केली. पुण्यासारख्या वाढत जाणाऱ्या अफाट शहरात अस्पृश्य बांधवांचे 'आधारकेंद्र व्हावे', अहिल्याश्रमातील भव्य इमारतीत अस्पृश्यांच्यासाठी शिक्षणकेंद्र, विद्यार्थी वसतिगृह त्यांना रोजगार मिळून स्वाभिमानाने जीवन जगता यावे. अशी उदात्त भूमिका घेऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना अनेक अडचणी आल्या असतानाही झपाटयाने अहिल्याश्रमाचे बांधकाम पूर्ण केले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना करून त्याद्वारे अस्पृश्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केला होता. त्यात त्यांना यशही मिळालेले दिसून येते. मिशनचे काम प्रत्यक्ष पाहून काही नामांकित व्यक्तींनी या कामाबद्दल प्रोत्साहनपर अभिप्राय प्रकट केला होता. लाला लजपतराय म्हणतात की, "धार्मिक आणि परोपकारी मंडळीनी देशामध्ये चालविलेले हे अत्यंत पवित्र कार्य आहे." डॉ.भांडारकर म्हणतात की, "विवेकशिलता ही अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हयांच्या प्रांतावर हल्ला करण्याचा जो सांप्रत काळ आहे. त्याचे निदर्शक म्हणजे ही संपूर्ण संस्था होय." टाइम्स ऑफ इंडियाचे संपादक स्टॅन्ले रीड यांनी म्हटले आहे, "संस्थेच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या शाळांचे काम हे विशेषत्वाने स्तुत्य आहे. अस्पृश्यवर्ग हया शब्दप्रयोगापेक्षा अधिक महाभयंकर शब्दप्रयोग भाषेमध्ये असू शकत नाही. मिशनने चालविलेले उदात्त कार्य अंतःकरणातील मर्माला स्पर्श करणारे आहे."

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे मिशनच्या सर्व कामात संघटना कौशल्य दिसून येते. समाजातील सर्वच प्रतिष्ठित लोकांचे सहाय्य मिशनच्या कामासाठी मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न असे. हया कामी त्यांना यशही मिळत असे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशन जरी अस्पृश्य वर्गासाठी काढले असले तरी पटावरील संख्यापैकी निदान एकचतुर्थांश मुले स्पृश्य वर्गातील घेण्याची परवानगी ठेवली होती. त्यापाठीमागे त्यांचा दुहेरी हेतू होता. स्पृश्य मुलांशी मिळून–मिसळून वागावे, त्यांच्याशी अभ्यासात चढाओढ करून, त्यांच्या सवयीचे अनुकरण करून अस्पृश्य वर्गातील मुलांनी आपला फायदा करून घ्यावा. उलटपक्षी अस्पृश्यांविषयी जो तिटकारा स्पृश्यांमध्ये असतो तो निराधार आहे. हे त्यांच्या समवेत राहिल्यानेच स्पृश्य मुलांना

कळावे व त्यांचा अस्पृश्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा. केवळ मुलांशी वागण्यातच नव्हे, तर मोठया माणसामध्ये प्रचार करताना, पुढारलेल्या व मागासलेल्या समाजाशी वागताना, व्याख्यान पीठावरून बोलताना प्रचारकांना हा दुहेरी हेतू साभांळावा लागतो असे शिंदे यांनी ध्यानात घेतले होते. इतकेच नव्हे तर अस्पृश्यांपेक्षा स्पृश्यांनाच शिक्षण देण्याचे काम कित्येक वेळा अवघड असते, याचाही त्यांना अनुभव येत असे.

डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे उत्तम प्रकारे संघटीत करू शकले. या कामाचा भारतभर विस्तार करू शकले व अस्पृश्यतेच्या प्रश्नाबद्दल अखिल भारतीय पातळीवर जागृती करू शकले, ही त्या काळामध्ये घडलेली अपूर्व गोष्ट म्हणावी लागेल. मिशनला जे यश मिळाले. त्याचे कारण वि.रा.शिंदे हे हया कामी मदत करणाऱ्या धुरिणांचे, कर्तबगार व्यक्तींचे सहाय्य घेऊ शकले. हया साहाय्यकर्त्यांमध्ये सर नारायणराव चंदावरकर यांचा सिंहाचा वाटा होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिसेंबर १९०५ मध्ये 'इंडियन सोशल रिफॉर्मर' या वृत्तपत्रात भारतामध्ये अस्तित्त्वात असलेल्या अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे गांभीर्य लोकांच्या लक्षात यावे. या विचारातून काही फलनिष्पत्ती व्हावी, यादृष्टीने शिंदे यांच्या या लेखाला व्यापक पातळीवर प्रसिद्धी मिळण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन दिले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपले सर्व तारूण्य अस्पृश्यामध्ये शिक्षणप्रसार व जागृती करण्यात खर्च केले त्यांचे कार्य नावारूपास आलेले दिसून येते. वास्तविक मिशनही. तिचे जाळे सर्व भारतभर पसरले होते. त्याच्या कार्यापुढे लीन होण्याऐवजी समाजाच्या सर्व क्षेत्रात खेळू लागलेले स्वातंत्र्याचे वारे स्वैराचाराच्या रूपाने अवतरले. त्यांच्यासारख्या स्थितप्रज्ञाकडून जे घडणे अपेक्षित होते तेच घडले होते.

निराश्रीत साहयकारी मंडळीचा उद्देश अस्पृश्यात स्वाभिमान उत्पन्न करून त्यास स्वावलंबी करण्याचा हेतू होता. हे मिशन याच मंडळीसाठी आहे व त्यांनीच ते चालवावे अशी स्पष्ट भूमिका घेऊन त्यांनी मिशनची सूत्रे खाली ठेवतानाही मिशन अस्पृश्यांच्या ताब्यातून जाणार नाही, याची काळजी घेतली. त्यासाठी त्यांनी मिशनची पुनर्घटना मंजूर करून घेतली होती. या नव्या घटनेत पदाधिकाऱ्यात दोन तृतियांश अस्पृश्य असावेत व महार, चांभार, मांग, भंगी मुसलमान या वर्गाचे प्रत्येकी दोन व पारशी, मराठा, ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर यांचे प्रत्येकी एक असे प्रतिनिधी असावेत अशी व्यवस्था केली. तथापि त्यांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य

अखंडपणे सुरू होते. ते त्यांचे जिवितकार्य व धर्मकार्य होते. त्यामुळेच ते म्हणतात की, "अस्पृश्यतेचा छडा लावण्यात, निवारणाचा भाग तर राहू द्या. मला स्वतःला जो अनुभव आला आणि आनंद झाला तो लक्षात घेता आला मला आणखी जन्म मिळाले तरी ते याच शोधनात आणि सेवाशुश्रूषेत खर्चीन." थोडक्यातच ब्राम्हणधर्मापासून जशी सुटका करून घेऊ शकत नव्हते. त्याचप्रमाणेच अस्पृश्यता निवारणाच्या कार्यापासूनही ते दूर जाऊ शकत नव्हते.

## ५.३ राजर्षी शाहू महाराजांचे संस्थात्मक कार्य–

ब्रिटिशांनी १८४८ पर्यत भारतातील एकूण साडेसातशे देशी लहानमोठी संस्थाने जिंकून त्यांना मांडलिक बनवले. त्यापैकी कोल्हापूर हे एक छोटे पण महत्त्वाचे ऐतिहासिक संस्थान होते. राजर्षी शाहू महाराज यांचे गाजलेले संस्थानही इतिहास जमा झाले. राजर्षी शाहू महाराज लोकनेते म्हणून सर्व महाराष्ट्रीयनांच्यापुढे स्मृतिरूपाने राहिले आहेत. व्यक्ती गेली पण कीर्ती आहेच. हे कार्य इंग्रजांच्या राज्यात झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजकीय स्वराज्य आणले. शाहू महाराजांच्यामुळे धार्मिक स्वराज्य निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याची निकड होती. शाहू काळात जी गरज होती. ती धार्मिक, सामाजिक क्षेत्रातील होती. लोक म्हणजे शेतकरी, बहुजन लोक निरक्षर, दरिद्री, विद्याहीन होते. विद्याक्रांती होणे गरजेचे होते. आधी सामाजिक? का आधी राजकीय? हा जो वाद टिळक–आगरकरात चालला होता त्या वादात न पडता राजर्षी शाहू महाराजांनी 'आधी सामाजिक' म्हणून स्वतःच्या मनात निर्णय घेऊन, सामाजिक–धार्मिक क्रांती करुन राजकीय स्वातंत्र्याच्या लढयाला समर्थ अशी महाराष्ट्रीय जनता बनविली. म्हणून शाहू महाराज हे लोकजीवन घडविणारे लोकनेते ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी जवळजवळ पंचवीस ते तीस वर्षे महाराष्ट्रातील समाजाचे नेतृत्त्व केले. ते सर्व दक्षिणेत पसरले होते. मद्रास, नागपूर, पुणे, मुंबई, पंजाबातील आर्य समाज वगैरे ठिकाणी जाऊन राजर्षी शाहू महाराजांनी उद्‌बोधक भाषणे केली. महाराष्ट्रात ठिकठिकाणी संस्था उभ्या केल्या. दातृत्त्वाचा ओघ सर्व समाज स्तरामध्ये पसरविला व सर्वांगीण प्रगती केली. तेव्हा त्यांचे संस्थात्मक कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### आर्य समाजातील कार्य

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील महत्वाची चळवळ म्हणजे आर्य समाज होय. आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १०

एप्रिल, १८७५ रोजी केली. या समाजाने आपली तत्त्वे मांडताना वेदांना अंतिम प्रमाण मानले, या समाजाचे सदस्य झालेल्या प्रत्येकाने आपल्या उत्पन्नाचा ०.०१ वा भाग समाजकल्याण, आर्य विद्यालय व आर्य प्रकाश या वृत्तपत्राकरीता द्यावा, तसेच आर्य विद्यालयात स्त्री–पुरूषांना वेदनिष्ठ शिक्षण देणे. या तीन मुख्य तत्त्वास अनुसरूनच आर्य समाजाने कार्य केले होते.

आर्य समाजाने धार्मिक सुधारणामध्ये हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, पौराणिक अनुष्ठाने या गोष्टी नाकारल्या. राम–कृष्ण हे ईश्वरी अवतार नसून श्रेष्ठ मानव आहेत असे सांगितले. ब्राम्हण पुरोहिताचे श्रेष्ठत्व नाकारले. परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी पुरोहिताची गरज नाही, असे सांगितले. सत्कर्म हाच खरा धर्माचा आधार असून सदाचार, परोपकार, सेवा व दया ही धर्माचरणाची अंगे आहेत. स्त्री–पुरूष व शूद्रादी हे सर्व समान असून सर्वांना वेदांचा अभ्यास करण्याचा हक्क आहे असे सांगितले. वेदांना प्रमाण मानताना समृतिग्रंथ, अठरा पुराणे, सहा शास्त्रे व ब्राम्हण ग्रंथाना नाकारले. हिंदू धर्मातील कर्मकांड, संकुचितपणा घालवला. शुद्धीकरण चळवळ हाती घेतली.

आर्य समाजाने सामाजिक चळवळ हाती घेतली. जातिव्यवस्था, जातिभेद व अस्पृश्यता पालन यास आर्य समाजाने विरोध केला. समाजातील वर्ण हा जन्मावर नव्हे तर गुणकर्मावर अवलंबून असतो, असे आग्रहाने सांगितले. शूद्र व स्त्रियांना वेदाचे अध्ययन करण्याचा व उच्च शिक्षण घेण्याचा अधिकार आहे, असे सांगून त्यासाठी चळवळ उभारली. बालविवाह, कायम वैधव्य, विधवांना हीन मानणे, पडदा–पद्धती, हुंडा पद्धती, बहुपत्नी विवाह, देवदासी प्रथा अशा वाईट प्रथांवर कठोर प्रहार करीत आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. शैक्षणिक कार्यामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर केला. उत्तर भारतात गुरुकुल पद्धतीच्या शाळा सुरू केल्या. महाराष्ट्रात कोल्हापूर, सोलापूर व मुंबई येथे या समाजाच्यावतीने आजही शैक्षणिक कार्य चालू आहे.[६०]

राजर्षी शाहू महाराज यांनी आर्य समाजास कोल्हापूर येथे उदार हस्ते आर्थिक मदत केली. याचे कारण आर्यसमाजाने वेदोक्त व वेद सर्वांना खुले केले. डॉ.बाळकृष्ण हे प्रमुख होते. आर्य समाजामार्फत कोल्हापूर येथे हायस्कूल व कॉलेज दीर्घकाळपर्यंत चालले होते. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला.[६१]

राजर्षी शाहू महाराज हे विचार–आचाराने आर्य समाजी होते. असे मत स.मा.गर्गे, डॉ.य.दि.फडके यांनी मांडले आहे. इतिहास संशोधन क्षेत्रात अस्सल कागदपत्रांच्या पुराव्याचे महत्त्व लक्षात घेता ते आर्य समाजी होते. तसेच राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या अनेक जाहीर भाषणात आणि खाजगी पत्रव्यवहारात 'मी आर्य समाजाचा कसा झालो' किंवा 'मी स्वतः हृदयाने आर्य समाजवादी कसा आहे' याचे विवेचन केलेले आढळते.[६२]

गर्गे स.मा.यांनी म्हटले आहे की, 'राजर्षी शाहू महाराजांनी आर्य समाजाची तत्वे आणि ध्येयधोरणे पुरस्कारिली' यावरून हे लक्षात येते की, राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे आर्य समाजासाठी फार मोठे कार्य केले होते. सन १९२१ मध्ये बडोद्याच्या 'जागृती' पत्रात राजर्षी शाहू महाराजांचे एक पत्र प्रसिद्ध झाले होते. त्यात ते म्हणतात, मी सत्यसमाजिस्ट केव्हाही नव्हतो व नाही..कोल्हापूरात आर्य समाज, थिऑसॉफी वगैरे पुष्कळ पंथ आहेत. त्यांच्यापैकीच सत्यसमाज एक आहे. मला वेद मान्य असून मी वेदास चिकटून राहणारा आहे. असे असता माझ्यावर हल्ला का?[६३] अशाच आशयाची विधाने अनेक पत्रातून आढळतात. यावरून डॉ.य.दि.फडके म्हणतात की, शाहू छत्रपती हे सत्यशोधक नसून आर्य समाजाचे पुरस्कर्ते होते. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.[६४]

मार्च १९१९ मध्ये भावनगर येथे भरलेल्या तिसऱ्या आर्य समाज अधिवेशनाच्या अध्यक्ष स्थानावरून भाषण करताना व्यक्त केले. या भाषणात स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाजाबद्दल धन्यवाद देऊन ते म्हणाले की, मी आर्य समाजाची विचारसरणी स्वीकारली. त्याचे कारण म्हणजे वैदिक धर्म इतर कोणत्याही धर्मश्रद्धेपेक्षा श्रेष्ठ आहे, असा माझा विश्वास आहे. मी राजाराम हायस्कूल, गुरूकूल, अनाथाश्रम, सरदार बोर्डिंग या संस्था आर्य प्रतिनिधीकडे सोपविल्या. त्यामागे अशी माझी श्रद्धा आहे की या सर्व शैक्षणिक संस्थांची नैतिक प्रगती व्हावी. आर्य समाजाचे शिक्षक व विचारवंत माझा उद्देश सफल करतील म्हणून मी संस्था त्यांच्याकडे सोपविल्या. या परिषदेला जमलेल्या प्रतिनिधींनी आणि प्रमुख सूत्रधारांनी तशाच प्रकारच्या शिक्षणसंस्था महाराष्ट्रात जोतिबा, पंढरपूर इत्यादी धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी स्थापन कराव्यात. त्यांना माझे साहय राहील.[६५]

राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१८ च्या आरंभी कोल्हापूर येथे आर्य समाजाची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले होते. बडोद्याहून पंडित आत्माराम यांना त्यासाठी आमंत्रित

केले होते. आर्य समाजाकडे राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल चालविण्यासाठी दिले होते. कोल्हापूरातील काही शाळेत महर्षी दयानंदाचा 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ मराठी विद्यार्थ्यांना सक्तीचा म्हणून त्यांनी सुरु केला. कोल्हापूर व जोतिबाच्या रस्त्यावर केर्ली येथे गुरुकूल स्थापन केले. त्याचवर्षी राजाराम अनाथाश्रम ही संस्था आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांना चालविण्यास दिली. त्यांच्या आर्थिक मदतीची सोय केली. अशा प्रकारे आर्य समाजाच्या कार्याला चालना देऊन आपल्या धार्मिक सुधारणेच्या कार्याची दिशा त्यांनी स्पष्ट केली.[६६]

गुजरातमध्ये नवसारीत दि. १४ डिसेंबर १९१८ रोजी आर्य समाजाचे ११ वे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी केलेले भाषण फारच गाजले होते. या भाषणात त्यांनी सध्याच्या ब्राम्हण वर्गाचे अधःपतन कसे झाले आहे. हे सांगून ब्राम्हणांनी आपल्या बनावटी धर्माने ब्राम्हणेत्तरांना कोणत्या हीन अवस्थेत आणून ठेवले आहे. याचे चित्र रंगविले आहे. या अवस्थेतून बहुजन समाजास वर काढण्याचे प्रयत्न स्वामी दयानंद, बाबू केशवचंद्र सेन व महात्मा जोतिबा फुले यांनी कोणत्या परिस्थितीत कसे केले याची चर्चा करून महाराज ब्राम्हणेत्तरांना वेदाचा अधिकार देऊन सर्वत्र समता निर्माण करु पाहणाऱ्या आर्य धर्माचा गौरव करतात. त्यांच्या मते आर्य धर्माच्या प्रसारामुळे भिन्न भिन्न जाती, पंथ व धर्म यामध्ये एकोपा निर्माण होऊन भारतात राष्ट्रीय ऐक्याची भावना वाढीस लागणार आहे. महायुद्धानंतर सर्व जग आता एक होण्याच्या मार्गावर असता आमची नजर एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेनेही कुंठीत होता कामा नये. असा विचार या भाषणातून राजर्षी शाहू महाराज यांनी मांडलेला होता.[६७]

याच भाषणात ते आर्य धर्माबद्दल म्हणतात की, दक्षिण हिंदुस्थानची धार्मिक व सामाजिक स्थिती मोठी शोचनीय आहे, यातही जास्त फूट पाडण्यास ब्राम्हण म्हणविणारे कसा प्रयत्न करतात याचे उदाहरण म्हणजे राज असल्याने आपण विष्णूचा अंश आहात, म्हणून आपण क्षत्रिय आहात. आपल्या घरी वेदोक्त कर्मे करण्यास तयार आहोत, असे धूर्त ब्राम्हण मला म्हणतात. या युक्तीने माझ्या ज्ञातिबंधांत व माझ्यात फूट पाडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याचप्रमाणे मराठे लोकांतही निरनिराळे कारणे लावून अमूक श्रेष्ठ, अमूक कनिष्ठ असे सांगून ते फूट पाडीत असतात. यासाठी आर्यसमाजाचे प्रयत्न प्रांतात विशेष झाले पाहिजेत. बनावटी धर्मगुरूंचा सुळसुळाट नाशिक, पंढरपूर या क्षेत्रातच असतो. तेव्हा त्या त्या ठिकाणी आपल्या

शाळा, गुरूकुले, उपदेश मंदिरे झाली पाहिजेत. खऱ्या धर्माचे ज्ञान वाढविले पाहिजे. नामदार पटेल यांनी हिंदुस्थानच्या कायदे कौन्सिलात आणलेल्या बिलास पुष्टी देण्याचा ठराव आपल्या अधिवेशनात आपण आणणार आहात, हे फार चांगले आहे. जातिभेदामुळे रोटीबेटी व्यवहारास फार अडचण येऊन समाजात फार फूट झाली आहे. त्यामुळे बहुतेक सगळा ब्राम्हणेत्तर समाज या कामी या बिलास अनुकूल आहे. त्याप्रमाणे सभा भरून ठिकठिकाणी ठराव होत आहेत. शेवटी ते म्हणतात की, 'आर्यधर्माचे ज्ञान सर्वत्र प्रसार होऊन, त्या योगाने या देशाची चिरकाल उन्नती होवो व सर्व जगात शांती आणि आनंद दरवळत जावा अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.[६८]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी आर्य समाजाच्याबाबतीत आपले विचार परखडपणे मांडून त्या समाजासाठी कोल्हापूर येथे मोठया प्रमाणावर कार्य केलेले दिसून येते.

**सत्यशोधक समाजातील राजर्षी शाहू महाराजांचे कार्य :-**

राजर्षी शाहू महाराज यांनी सत्तेवर आले तेव्हा कोल्हापूर येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नेतृत्त्वाखाली सत्यशोधक समाज कार्य करत होता. या समाजामार्फत शेतकरी, कामगार व कनिष्ठ वर्ग यांच्या सुधारणेचे कार्य चालू होते. या वर्गात समानता व न्याय याविषयी जागृती चालू होती. स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व व सार्वत्रिक शिक्षण याविषयी या समाजात प्रबोधनाचे कार्य सुरू केले होते. सत्यशोधक समाजाची तत्त्वे ही 'मनुष्याचे श्रेष्ठत्व जन्मावर नसून कर्मावर आहे. पुनर्जन्म, कर्मकांड, जपतप, थोतांड आहे.' ही होती. ती एक राजकीय, सामाजिक, व धार्मिक वर्चस्वाविरूद्धची चळवळ होती. फुले ब्राम्हणद्वेषी नव्हते तर सनातनी ब्राम्हण्याविरूद्ध होते. कारण मुलींच्यासाठी व अस्पृश्यांच्यासाठी शाळा काढताना त्यांना काही वेळा ब्राम्हण मित्राची मदत घेतल्याचे दिसते. सत्यशोधक समाजाची उद्दिष्ट महिलांना सामाजिक अन्यायापासून मुक्त करणे तसेच कामगार व शेतकरी यांना पुरोहित वर्ग आणि नोकरशाही यांच्या हुकुमशाहीपासून मुक्त करणे तसेच विविध क्षेत्रातील धर्मशिक्षण व प्रशासन यामधील वर्ण वर्चस्व झुगारून देणे हे होते. महात्मा फुले यांनी सामाजिक अत्याचाराविरूद्ध चळवळ उभी केली. सामाजिक न्याय आणि समानता यासाठी त्यांनी आग्रह धरला होता. असमानता आणि स्त्रियांवरील अन्याय या सर्व बाबींचा धिक्कार केला.[६९]

ग्रामीण भागातील जनतेच्या इच्छा सत्यशोधक समाजाने अचूक ओळखले होते. म्हणूनच शेतकरी, बहुजन, कष्टकरी समाजाने त्यास पाठिंबा दिला होता. सत्यशोधक समाज जातीविरहित आणि वर्गविरहित समाजाच्या स्थापनेसाठी उभा राहिला. महात्मा फुले यांचे अनुयायी नारायण मेघाजी लोखंडे, भालकर इ.नी ही चळवळ पुढे वाढविली. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रभर पसरली. या चळवळीचे वैशिष्टये म्हणजे ब्राम्हणी व्यवस्थेला विरोध करणे, बहुजन समाजात शैक्षणिक सुधारणा करणे, शूद्रांची गुलामगिरीतून मुक्तता करणे व धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे इ. होती.[७०]

प्रारंभीच्या काळात राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाकडे लक्ष दिले नव्हते. म्हणूनच त्यांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व, अस्पृश्यता इ.बाबीवर त्यांची श्रद्धा होती. यासंबंधी १९२० मध्ये नाशिक येथे उदाजी मराठा विद्या वसतिगृहाची कोनशिला बसविण्याचा समारंभ प्रसंगी ते म्हणाले होते की, 'मी प्रथम पुराणमतवादी होतो. जातीभेद कायम राहिले पाहिजेत, असेच माझे मत होते.'[७१] सामाजिक प्रश्नाबाबत राजर्षी शाहू महाराजांचे विचार नंतर उत्क्रांत बनत गेले. याचे कारण भोवतालच्या ब्राम्हणी वर्चस्वामुळे आणि वेदोक्त प्रकरणातील कटू अनुभवामुळे त्यांच्यातील श्रद्धा कमी होत चालल्या होत्या. टिळक पंथीय ब्राम्हण वर्गाने केलेल्या टीकेमुळे राजर्षी शाहू महाराज सत्यशोधक समाजाकडे ओढले गेले आणि या प्रकरणामध्ये त्यांची बाजू सत्यशोधक समाजाने उचलून धरली असे म्हणावे लागेल. कारण कोल्हापूरात त्यांच्या सहानुभूतीने व साहयाने सन १९११ मध्ये सत्यशोधक समाजाचे पुनरूज्जीवन करण्यात आले.

आधुनिक महाराष्ट्रात बुद्धिप्रामाण्यावर अधिष्ठित समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे असे मानणाऱ्या महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. जातीभेद पाळणे हा धर्म नव्हे. निर्मिकाला नैवेद्याची किंवा मध्यस्थांची जरूरी नाही. शूद्र किंवा अतिशूद्र पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद झाली पाहिजे असे या सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण होते. शाहू महाराजांनाही वेदोक्त प्रकरणानंतर भट–भिक्षुकांच्या प्रवृत्तीची जाणीव झाली होती. त्यामुळेच ते या समाजाच्या विचारसरणीकडे आकर्षित झाले. ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात महाराजांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.[७२]

राजर्षी शाहू महाराजांच्या चळवळीला राजाश्रय मिळाला. सत्यशोधक समाजाच्या कार्यालयासाठी राजर्षी शाहू महाराजांनी गंगावेशीतील जागा दिली. या समाजाचे स्वतंत्र कार्यकारी मंडळ निवडले. समाजातर्फे चालविल्या जाणाऱ्या पुरोहित शाळेला महाराजांनी अनुदान दिले. धार्मिक विधी करण्यासाठी निरनिराळी पुस्तके तयार केली गेली. सन १९१२ मध्ये ब्राम्हणेत्तरांची पहिली श्रावणी वेदोक्त पद्धतीने मराठा पुरोहिताने केली. सन १९१३ मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक समाज शाळा सुरू झाली. या शाळेत शिक्षण पूर्ण केलेल्या निरनिराळया जातीच्या पुरोहितांनी त्याचवर्षी कोल्हापूरात १५१३ धार्मिक विधी केले. त्यात २२६ विवाह विधी होते. या समाजाच्या प्रसारकांना खेडया-पाडयात जाऊन सत्यशोधक समाजाचा प्रसार केला. या समाजाच्या पुरोहिताकडून धार्मिक विधी खेडयातून मोठया प्रमाणावर होऊ लागले. त्यामुळे चिडलेल्या ब्राम्हण वर्गाने केलेल्या प्रयत्नांचाही काही उपयोग झाला नाही. त्यांचा विरोध निष्फळ ठरला. धर्मसत्तेत व राजसत्तेत झालेली फारकत महाराजांनी भरून काढली. महाराजांच्या प्रोत्साहनामुळे सत्यशोधक समाजाला महात्मा फुले यांच्यानंतर आलेली मरगळ दूर झाली. महाराष्ट्रात त्यांच्या प्रसाराला चालना मिळाली. शाहू महाराजांनी संघटित होऊन आर्थिक उन्नती करून घेण्याचे व पर्यायाने बहुजन समाजाच्या विकासाचे आवाहन केले. सत्यशोधक समाजाच्या या प्रसाराच्या कामी महाराजांना अनेक सहकाऱ्यांनी मदत केली.

राजर्षी शाहू महाराजांची आपल्या कार्याच्या सुरूवातीपासून आपल्या अनुभवाने त्यांची जी मनोवृत्ती तयार झाली होती. ती सत्यशोधकाची होती आणि विचारांची बैठक आर्य समाजाची होती. शाहू महाराजांचे कार्य व महात्मा फुले यांचे कार्य यात फारसा फरक नाही. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील ब्राम्हणी मक्तेदारी मोडून काढणे, जातीभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, शिक्षण प्रसार यासाठी महाराजांनी शक्ती पणास लावली होती. अर्थातच हे काम सत्यशोधक समाजाचे होते, म्हणूनच सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते शाहू महाराजांची वेदनिष्ठा व मूर्तीपूजा मान्य करुनही त्यांना सत्यशोधक मानत होते. यात महाराजांच्या कार्याचे वास्तव मूल्यमापन होते. ते स्वतःस आर्यसमाजी म्हणवत असता ते प्रत्यक्ष सत्यशोधक समाजाचे खरे कार्य करीत राहिले. सत्यशोधक चळवळीत काम करणारे कार्यकर्ते भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, महादेव डोंगरे, श्रीपतराव शिंदे, खंडेराव बागल इत्यादीनी सत्यशोधक समाजाचे कार्य चालविले परंतु ते आर्य समाजी बनले नाहीत. तर स्वतः

शाहू महाराजही आपण सत्यशोधक समाजाचे अनुयायी आहोत असे म्हणत नव्हते. दोघांच्याही विचार व कृतीमधील मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी सत्यशोधक समाजाच्या प्रसाराची गरज शाहू महाराजांना वाटत होती. असे त्यांच्या कृतीवरून लक्षात येते.[७३] यावरूनच हे स्पष्ट होते की त्यांना सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी कोल्हापूर राज्यात सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतले होते, हे स्पष्ट होते.

२० ऑगस्ट १९२० रोजी शाहू महाराजांनी मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार ॲडॅम यांना महाराष्ट्रातील ब्राम्हणांच्या कुटील कारवायाच्या संदर्भात पत्र लिहिले होते. त्यात सत्यशोधक जलशाच्या संदर्भात महाराज म्हणतात, सत्यशोधक जलशामुळे ब्राम्हण लोक माझा पूर्वीपेक्षा अधिक द्वेष करीत आहेत. अर्थात माझा सत्यशोधक जलशांशी प्रत्यक्ष संबंध नाही. पण ज्या तत्त्वांवर ते जलसे चालतात, ती तत्त्वे सर्वत्र पसरावीत असे माझे मत आहे. जरी ब्राम्हणांना ते जलसे अश्लील वाटत असले तरी ते स्वतः प्रत्येक दिवशी पुराण आणि कीर्तन यातून त्याच गोष्टींचा धर्माच्या नावाखाली प्रचार करीत असतात. जर अशा अश्लील गोष्टी कथा–कीर्तनातून कथन केलेल्या चालतात, तर त्याच गोष्टी जलशातून साांगितल्या तर हरकत का असावी ? जलसेवाल्याविषयी आपणास सहानुभूती वाटते, ते आपण मान्य करतो. निवडणुकीच्या काळात जलसेवाले हे ब्राम्हणेत्तरांना साहय करतात. तर कीर्तनकार ब्राम्हणांना साहय करतात.[७४] या पत्रात राजर्षी शाहू महाराजांनी मांडलेल्या मतावरून हे स्पष्ट होते की, जलशाची तत्त्वे, म्हणजेच सत्यशोधक समाजाची तत्त्वे, सर्वत्र पसरावीत हे आपले मत आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचाच अधिक पुरस्कार करून त्यांचे कार्य पुढे कसे चालविले, हे अधिक स्पष्ट करताना डॉ.जाधव यांनी म्हटले आहे की, महात्मा फुले यांनी आयुष्यभर जे 'बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।' या सूत्राप्रमाणे कार्य केले त्याच कार्याची धुरा शाहू छत्रपतींनी मनःपूर्वक स्वीकारलेली आढळते. राजर्षी शाहू जीवन आणि कार्य यांचा मागोवा घेतला की, त्यांनी महात्मा फुले यांच्या बहुजन उद्धाराची कार्यपरंपरा समर्थपणे पुढे नेली, हे मान्य करावे लागते. सत्यशोधक समाजाचे पहिल्या तीन वर्षाचे जे अहवाल उपलब्ध आहेत. त्यावरूनही सत्यशोधक समाजाच्या कार्याची दिशा लक्षात येते. राजर्षींनी आयुष्यभर जे कार्य केले ते याच दिशेने केले. म्हणून महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज हा विग्रह नसून तो समासच आहे हे प्रांजळपणे मान्य केले पाहिजे. उभयतांच्या

कार्याचा डोळसपणे अभ्यास आणि परीक्षण केले की, राजर्षी शाहू महाराज हे सत्यशोधकी विचारांची बांधिलकी अधिक मानीत होते.[७५] याचाच अर्थ महात्मा फुल्यांची सत्यशोधक समाजाची चळवळ राजर्षी शाहू महाराजांच्या कणखर नेतृत्त्वामुळे महाराष्ट्रात सर्वत्र पसरली. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर काही काळ ही चळवळ अक्षरशः मृतवत झाली होती. परंतु या चळवळीला लाभलेले राजर्षी शाहू महाराजांचे नेतृत्त्व संजीवनी ठरले. त्यांच्यामुळे हया चळवळीत प्राण ओतला गेला.[७६]

सन १९२० नंतर सत्यशोधक चळवळ महाराष्ट्राभर पसरत गेली. सातारा, सोलापूर, नगर इत्यादी जिल्हयात सत्यशोधकाचा जोर मोठा होता. सत्यशोधक जलशातून ब्राम्हणशाहीचे दंभस्फोट करणारे जहाल कार्यक्रम सादर केले जात होते. याचा थेट परिणाम ब्राम्हणेतर समाजावर होत होता. खेडया–पाडयातून ब्राम्हण विरोधी वातावरण तयार होत होते. सातारा जिल्हयात तर काही ठिकाणी ब्राम्हणावर बहिष्कार टाकला जात होता. ब्राम्हणांच्या जमिनी खंडाने कसण्यास नकार दिला जात होता. ब्राम्हण भटजीस धार्मिक विधीस न बोलावणे, एवढेच नव्हेतर कुंभार, न्हावी इत्यादी बलुत्यांनी ब्राम्हणांची कामे करण्यास नकार देणे अशा बहिष्काराच्या घटना घडू लागल्या. अनेक ठिकाणी उत्साही सत्यशोधकांनी आक्रमक पवित्रे घेतले. परळीला दासनवमीच्या उत्सवात ब्राम्हणांच्या व ब्राम्हणेत्तरांच्या वेगवेगळया पंगती बसवल्या जात होत्या. सत्यशोधकांनी या पंगती पद्धती मोडावयाचे ठरवून तेथे ब्राम्हण–ब्राम्हणेत्तरांना एकाच पंगतीचा आग्रह धरला. तो ब्राम्हणांनी मानला नाही. परिणामी उभयपक्षी चकमक उडून ‘ब्राम्हणांना भरल्या ताटावरून उठून जावे लागले.’ अशा प्रसंगांच्या बातम्या ब्राम्हणी वृत्तपत्रात ‘सत्यशोधकांचे अत्याचार’ अशा भडक शब्दात प्रसिद्ध केल्या जाऊ लागल्या. ठिकठिकाणी या ‘अत्याचारा’ची चौकशी करणाऱ्या ‘ब्राम्हण्य–संरक्षक सभा’ स्थापन झालेल्या होत्या. काही ठिकाणी उभय पक्षी मारामाऱ्या होऊन परस्परावर खरेखोटे फौजदारी खटले भरले जाऊ लागले. आणि हे जेथे जेथे घडत होते. तेथे तेथे कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या या सत्यशोधकांना पाठिंबा असल्यामुळे हे घडत आहे. असे एकच गिल्ला महाराष्ट्रातील ब्राम्हणी वृत्तपत्रे सातत्याने करीत होती. एवढेच नव्हे तर खालसा मुलखात शांतता व सुव्यवस्था यांची जबाबदारी असलेल्या इंग्रज सरकारने महाराजांचा बंदोबस्त करावा, अशी त्यांची आग्रही मागणी होती. इंग्रज सरकारही ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर संघर्षातून निर्माण होणाऱ्या

अशांततेमुळे अस्वस्थ बनत होते. आणि प्रसंगी महाराजांच्याकडे चौकशीची पत्रे पाठवीत होते.[७७]

कोल्हापूर संस्थनातील संस्था व चळवळी यावर शाहू महाराज नियंत्रण ठेवू शकत होते. ती त्यांच्या सत्तेच्या अधिकारातील बाब होती. पण संस्थानाबाहेरच्या चळवळीवर त्यांचे नियंत्रण ते ठेवू शकत नव्हते. अशा परिस्थितीत आक्रमक सत्यशोधकांनी ब्राम्हण मंडळीशी केलेल्या संघर्षाची जबाबदारी एक संस्थानिक या नात्याने महाराज घेऊ शकत नव्हते. खालसा मुलखात अनेक ठिकाणी ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर वाद विकोपाला जाऊन फौजदारी गुन्हे सरकारात दाखल होत होते. इंग्रज सरकारपुढेही प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत होते. या पार्श्वभूमीवर आपण सत्यशोधक समाजाचे पुरस्कर्ते आहोत असे जाहीर करणे म्हणजे सर्व महाराष्ट्रातील सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या कृत्यांची नैतिक जबाबदारी महाराजांनी स्वीकारण्यासारखे होते. कारण सर्व महाराष्ट्र त्यांना सत्यशोधक चळवळीचा आधारस्तंभ मानत होता. अशा परिस्थितीच्या विचित्र कोंडीत महाराज सापडल्यामुळे ‘मी सत्यसमाजिस्ट केव्हाही नव्हतो व नाही’ अशा सारखी जाहीर वक्तव्ये त्यांना करावी लागली होती. ही त्यांची व्यवहारनीती अथवा समाजकारणातील ‘राजनीती’च होती. असे मानावे लागेल. उपरोक्त स्वरुपाचे उद्‌गार सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्यांच्या कृत्यांना जेव्हा जेव्हा महाराजांना जबाबदार धरून हल्ले केले तेव्हा त्यांनी काढलेले आहेत, हेही ध्यानात घेतले पाहिजे. तेव्हा असे उद्‌गार वाच्यार्थाने घेतले तर राजर्षी शाहू महाराजांच्या सत्यशोधकी कामगिरीविषयी अभ्यासकाची दिशाभूल होण्याची मोठी शक्यता आहे.[७८]

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्य यात बरेचशे साम्य होते. ब्राम्हणांची धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढणे, जातिभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, अज्ञानी जनतेमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणे, यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. एका अर्थाने हे कार्य सत्यशोधक समाजाचेच कार्य होते आणि म्हणूनच त्या समाजाचे अनुयायी महाराजांच्या वेदनिष्ठेचा बाऊ न करता त्यांना सत्यशोधकी मानत होते. यात समाजाच्या अनुयायांच्या विचारांची गफलत नव्हती. तर महाराजांच्या कार्याचे वास्तव मूल्यमापन होते. याचा अर्थ असा होतो की, स्वतःस आर्यसमाजी म्हणवीत असता महाराज प्रत्यक्षात सत्यशोधक

समाजाचे खरे कार्य करीत राहिले होते. पण तसे करीत असता आपल्या कार्यास सत्यशोधक समाजाचे लेबल लावण्याचे त्यांनी जाणीवपूर्वक टाळले होते.[७९]

### जैन, लिंगायत व थिऑसॉफिकल सोसायटी यांच्या सामाजिक संस्थाना सहकार्य

कोल्हापूर संस्थानात जैन व लिंगायत या धर्मातील लोकसुद्धा मोठया प्रमाणावर होते. या दोन्ही समाजांच्या धार्मिक गरजांकडे राजर्षी शाहू महाराजांनी लक्ष पुरविले होते. त्यांच्या मठांसाठी आणि मंदिरासाठी त्यांनी जागांच्या देणग्या दिलेल्या आहेत.[८०] संस्थानातील जैन समाज नववे तीर्थकर पुष्पदंत स्वामी यांच्या निर्वाणदिनी मोठा सण साजरा करीत असत. सन १९२१ मध्ये या समाजाने त्या दिवशी सार्वत्रिक सुट्टी जाहीर करण्याची महाराजांना विनंती केली. ती मंजूर करण्यात आली. त्या दिवशी संस्थानात कोणतीही हिंसा होऊ नये, अशी दुसरी मागणी जैन लोकांनी केली होती. यावर राजर्षी शाहू महाराजांनी आदेश दिला की, ‘सर्व प्रजा सारखी असल्याने कोणाचेही भक्ष बंद करण्याकरीता कायदा करता येणार नाही. तथापि जैनांनी प्रयत्न करून सर्व जातींच्या व धर्माच्या लोकांची आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ सहानुभूती मिळविल्यास व सर्व प्रजेनेही जैनांच्या इच्छेकडे लक्ष देऊन शक्य तितकी हिंसा बंद केल्यास इकडे आनंद होणार आहे . (३ सप्टेबर १९२१)[८१]

लिंगायत समाजाच्या संदर्भात दोन महत्त्वाचे संदर्भ म्हणजे सन १९१० मध्ये एका पाटीलकीच्या वतनाचा निवाडा करताना ‘लिंगायत समाज हा शूद्र नाही’ असा महत्त्वाचा निकाल महाराजांनी दिला. यापूर्वी ब्राम्हण पंडितांच्या मतावर भिस्त ठेवून पूर्वीच्या हायकोर्टानी हा समाज शूद्र असल्याचा जो निर्णय केला होता. तो महाराजांनी अमान्य केला.’[८२] दुसरा संदर्भ म्हणजे म्हैसूर राज्यातील चित्रदुर्ग मठाच्या लिंगायत स्वामींच्या बाबतीतील आहे. हे स्वामी सर्व लिंगायत समाजाचे जगद्गुरू समजले जात. शृंगेरी मठाच्या जगद्गुरू शंकराचार्याप्रमाणेच त्यांनाही अड्डापालखी, पंचकलश, श्वेतछत्री इत्यादी सन्मानचिन्हे वापरण्याचा पूर्वापार हक्क होता. विशेष म्हणजे हे स्वामी संस्कृतचे मोठे पंडित होते आणि मागासलेल्या समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा, म्हणून त्यांचे प्रयत्न चालू असत. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांना त्यांच्याविषयी आस्था वाटत होती. सन १९१३ मध्ये स्वामींची राजर्षी शाहू महाराजांशी भेट झाली. शाहू महाराजांनी म्हैसूरचे दिवाण सर विश्वेश्वरअय्या यांना खास वैयक्तिक पत्र लिहून म्हैसूरच्या महाराजांकडून हा अन्याय दूर करण्याची विनंती केली होती.[८३]

कोल्हापूर संस्थानात ज्याप्रमाणे आर्य समाज, सत्यशोधक समाज व इतर सामाजिक व धार्मिक चळवळी चालवणाऱ्या संस्थाना राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय दिला होता. त्याचप्रमाणे त्यांना काही दिवस थिऑसॉफिकल सोसायटीचेही आकर्षण निर्माण झाले होते. परंतु 'थिऑसॉफी'मधील तत्त्वज्ञान त्यांच्या मनाचे पूर्ण समाधान करू शकले नाही. कोल्हापूरात थिऑसॉफिकल सोसायटीस त्यांनी जागा उपलब्ध करून दिली असली तरी तिच्याशी त्यांनी फारसे संबंध वाढवले नाहीत. 'थिऑसॉफी'च्या कार्यकर्त्यांच्या, विशेषतः डॉ.ॲनी बेंझट यांचा, हिंदी राजकारणातील सक्रिय सहभाग हा कदाचित महाराजांना या सोसायटीशी घनिष्ठ संबंध वाढविण्यात अडचणीचा वाटला होता की काय म्हणूनच सन १९२१ मध्ये सोसायटीस जागेची देणगी देताना कोल्हापूर दरबाराने काही अटी घातलेल्या दिसून येतात. त्यामध्ये 'सदर सोसायटी करवीर दरबारास व ब्रिटिश सरकारास सदैव राजनिष्ठ राहिली पाहिजे' ही प्रमुख अट आहे. सोसायटीने कोल्हापूर संस्थानात आपल्या तत्वज्ञानाच्या प्रचाराचे काम करावे, राजकीय हालचाली करू नयेत, अशी दरबाराची अपेक्षा होती. तथापि शिक्षण प्रसार, ग्रंथालयाची उभारणी इत्यादी सामाजिक कार्ये त्यांनी हाती घ्यावीत यासाठी उपरोक्त जागेबरोबर दरबारास सोसायटीने ३००० रूपयाची भरघोस देणगीही दिली होती.[८४]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी धर्मजिज्ञासेपोटी अनेक धर्मांना, पंथाना, धार्मिक सुधारणावादी संघटनाना जवळ केले. त्यांना राजाश्रयही दिला. त्यांच्या तत्वज्ञानाचा परिचय करून घेतला. 'धर्म' या विषयासंबंधी त्यांचे विचार म्हणजे त्यात सुधारणा झाल्या पाहिजेत. तो अधिकाधिक समतावादी झाला पाहिजे. अशी त्यांची तळमळ होती. म्हणूनच त्यांनी 'वैदिक स्कूल' किंवा 'क्षात्रजगद्गुरू' यासारखे प्रयोग धर्माच्या क्षेत्रात केले होते. असेच काही धर्मासंबंधी मूलगामी विचार मांडले होते. महाराजांचे गुरू सर फ्रेझर यांनी म्हटले आहे की, 'अकबर बादशहाप्रमाणे एखादा नवीन धर्मपंथ स्थापन करता येतो की काय याची चाचपणी महाराजांनी केली होती.'[८५] परंतु राजर्षी शाहू महाराजांना असे ही वाटत होते की, जसा सम्राट अकबराचा दिने ईलाही पंथ सम्राट अकबरानंतर अस्ताला गेला तसा आपलाही पंथ आपल्याबरोबर अस्ताला जाईल. म्हणूनच त्यांनी नवीन धर्मपंथ स्थापन करण्यापेक्षा अस्तित्त्वात असलेल्या आर्य समाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी आदी सुधारणावादी धर्मपंथांना राजाश्रय देऊन त्यांच्यामधील चांगल्या तत्वांचा पुरस्कार समाज सुधारणेसाठी

करण्याचे त्यांनी योजिले आणि त्याला अनुसरून त्यांनी आपल्या स्वतःच्या पद्धतीने त्यांची अंमलबजावणी केली.[८६]

## राजर्षी शाहू महाराजांचे ब्राम्हणेत्तर चळवळीतील कार्य

### ब्राम्हणेत्तर चळवळीचा उदय :–

महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीचा उदय हा सन १९१७ च्या सुमारास झाला. या चळवळीचा उद्‌गाता म्हणून राजर्षी शाहू महाराज यांच्याकडे पाहिले जाते. तिचा उदय झाला त्यावेळी तिचे स्वरूप राजकीय हक्कांच्या मागणीसाठी सुरू केलेली चळवळ असे वाटत असले तरी तिची बीजे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीत व राजर्षी शाहू महाराजांच्या वेदोक्त चळवळीत पेरली गेली होती. ब्राम्हणशाहीच्या सर्वंकष जुलमी सत्तेविरूद्ध संघर्ष करणारी सत्यशोधकांची चळवळही महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तरांची पहिली चळवळ होती. तर राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केलेली वेदोक्ताची चळवळ ही ब्राम्हणशाहीच्या मक्तेदारीविरूद्ध व अन्यायाविरूद्ध सुरू केलेली ब्राम्हणेत्तराची दुसरी चळवळ होती. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजानी वेदोक्त चळवळीबरोबर महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचेही पुनरूज्जीवन करून सन १९१७ मध्ये प्रकट झालेल्या ब्राम्हणेत्तर चळवळीची पार्श्वभूमी तयार करून ठेवली होती.[८७]

महाराष्ट्रात ब्राम्हणेत्तर समाजाच्या जागृतीची अनेक केंद्रे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याच्या प्रेरणेने उभी राहिली होती. या केंद्राकडून ब्राम्हणेत्तर समाजासाठी शैक्षणिक संस्था व वसतिगृहे स्थापन झाली. या शैक्षणिक कार्याबरोबर समाजजागृतीचेही अनेक सत्यशोधकी उपक्रम हाती घेतले गेले. यातून कार्यकर्त्यांची एक पिढी तयार झाली. नाशिक, नगर, खानदेश, वऱ्हाड इत्यादी भागात राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने ब्राम्हणेत्तरांच्या जागृतीची केंद्रे स्थापन झाली होती. या केंद्रातील कार्यकर्ते स्वतःला सत्यशोधक म्हणवून घेत होते. या सर्व सत्यशोधकांना राजर्षी शाहू महाराजांनी ब्राम्हणेत्तर चळवळीच्या प्रवाहात आणले.[८८]

### प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापण्याचा हेतू

गुणवत्ता धारण केल्याशिवाय ब्राम्हणेत्तरांना ब्राम्हणांशी स्पर्धा करता येणार नाही व खऱ्या अर्थाने समतेची लढाई यशस्वी होणार नाही, याची राजर्षी शाहू महाराजांना जाणीव होती. त्यासाठी त्यांनी ब्राम्हणेत्तरांना शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखला. त्यासाठी शाळा व मोफत

वसतिगृहाची योजना आखली. त्यांनी जातिनिहाय वसतिगृहे उघडली. अस्पृश्यांसाठी वेगळया शाळा व वसतिगृहे उघडली. त्यांनी जातिनिहाय वसतिगृहे उघडण्याचे कारण म्हणजे त्यावेळची वास्तव परिस्थिती होती. आपल्या कारकिर्दीच्या प्रारंभी त्यांनी जातवार वसतिगृहे स्थापन केलेली नव्हती. सन १८९६ मध्ये त्यांनी स्थापन केलेले पहिले वसतिगृह हे सर्व जाती–जमातीकरीताच होते. कोणत्याही जातीच्या विद्यार्थ्यावर अन्याय होऊ नये म्हणून एका न्यायाधीशाची वसतिगृहाच्या प्रमुखपदी नियुक्ती केली होती. ब्राम्हणासहित सर्व जातींची मुले आलेली पाहून राजर्षी शाहू महाराजांना आनंद वाटत होता. परंतु काही दिवसानी वसतिगृहातील उच्चवर्णीय ब्राम्हण विद्यार्थी इतरवर्णीय विद्यार्थ्यांना हीन लेखू लागले. त्यांचा विटाळ मानू लागले. वेगवेगळया पक्तींची मागणी करू लागले. परिणामतः ही मानहानी नको म्हणून इतर जातींच्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह सोडले. सन १९०० मध्ये वसतिगृहात फक्त ब्राम्हणजातीचेच विद्यार्थी उरले होते. या वसतिगृहासंबंधी १३ एप्रिल १९१९ रोजी राजर्षी शाहू महाराज लिहितात, 'जे वसतिगृह सर्व जातिधर्माच्या विद्यार्थ्यासाठी उघडले होते, त्या वसतिगृहात दहा वर्षात ब्राम्हणाखेरीज इतरपैकी एकही विद्यार्थी मला आढळला नाही. माझे मनोरथ पूर्णपणे विफल झाल्यामुळे मी हे वसतिगृह आता बंद केले आहे.' याचा अर्थ जातिनिरपेक्षपणे सर्वाकरिता एकच संस्था वा वसतिगृह असणे सर्वोत्तम, पण तीव्र जातिभेद शिल्लक असेपर्यंत प्रगतीसाठी प्रत्येकाच्या वेगळया व्यवस्था हाच सामाजिक समतेकडे पाहणारा व्यावहारिक मार्ग अशी ही राजर्षी शाहू महाराजांची भूमिका होती. याच भूमिकेमुळे त्यांनी सन १९०१ नंतर जातिनिहाय स्वतंत्र वसतिगृहाचा प्रयाोग सुरु केलेला होता. ही वसतिगृहे ब्राम्हणाव्यतिरिक्त इतर प्रत्येक जातीची होती. केवळ मराठयांची नव्हती. हेही लक्षात घेतले पाहिजे.[८९]

### अस्पृश्य मानलेल्या जातींत विद्याप्रसार करणारी मंडळी संस्था

सन १९०८ मध्ये 'अस्पृश्य मानलेल्या जातींत विद्याप्रसार करणारी मंडळी' या नावाची संस्था राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने स्थापन करण्यात आली. संस्थानाचे दिवाण सबनीस हे या संस्थेचे अध्यक्ष होते. संस्थेच्यावतीने लगेच अस्पृश्यांसाठी 'मिस क्लार्क वसतिगृह' सुरू करण्यात आले. परंतु या वसतिगृहाचा राजर्षी शाहू महाराजांना असा अनुभव आला की, ढोर, चांभार, महार व मांग या अस्पृश्य मानलेल्या जातींचे विद्यार्थीही परस्परांत अस्पृश्यता पाळू लागले आहेत. ढोर व चांभार इतर दोन जातींपेक्षा स्वतःला श्रेष्ठ मानू लागले. शेवटी राजर्षी

शाहू महाराजांनी ढोर–चांभारांसाठी स्वतंत्र वसतिगृह काढण्याचा निर्णय घेतला. सन १९१९ मध्ये ढोर–चांभारांसाठी वसतिगृह सुरू केले. पुढे त्याचे नाव 'इंदुमती राणीसाहेब वसतिगृह' असे ठेवण्यात आले.[९०]

**ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांना दिलेले उत्तेजन :–**

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात वृत्तपत्रांच्या क्षेत्रात ब्राम्हणांची मक्तेदारी होती. आणि बहुतेक सर्व ब्राम्हणी वृत्तपत्रे ही ब्राम्हणांच्या हिताची जपणूक करणारी होती. तसेच कोल्हापूर संस्थानाच्या कारभारावर कठोर टिका करण्याचेही काम ती करीत होती. अशावेळी ब्राम्हणेत्तर पक्षाची बाजू समर्थपणे मांडणाऱ्या ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांची गरज राजर्षी शाहू महाराजांना वाटत होती. त्यावेळी म्हणजेच सन १९१७ मध्ये मुकुंदराव पाटील यांचे 'दीनमित्र' हे एकच वृत्तपत्र ब्राम्हणेत्तराच्या बाजूने लढत होते. तेव्हा त्याच वर्षी पुणे येथे वालचंद कोठारी यांनी 'जागरूक' तर बडोदा येथे भगवंतराव पाळेकरांनी 'जागृती' असी ब्राम्हणेत्तरांची दोन वृत्तपत्रे सुरू केली. त्यानंतर राजर्षी शाहू महाराजांच्या प्रत्यक्ष सहकार्याने अथवा उत्तेजनाने अनेक वृत्तपत्रे निघाली. त्यामध्ये लठ्ठे आणि कोठारींचे 'डेक्कन रयत' हे इंग्रजीतील वृत्तपत्र निघाले. बळवंत पिसाळ यांचे 'विश्वबंधु', दत्ताजीराव कुरणे यांचे 'भगवा झेंडा', दिनकरराव जवळकर यांचे 'तरूण मराठा', बाबूराव यादव यांचे गरीबांचे कैवारी', श्रीपतराव शिंदे यांचे 'विजयी मराठा', दत्तात्रय रणदिवे यांचे 'संजीवन', शामराव देसाई यांचे 'राष्ट्रवीर' केशवराव बगाडे यांचे व कीर्तिवामनराव निंबाळकर यांचे 'शिवछत्रपती', गणेश आकाई गवई यांचे 'बहिष्कृत भारत', डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 'मूकनायक' अशी काही प्रमुख वृत्तपत्रे होती. या सर्व वृत्तपत्रांना राजर्षी शाहू महाराजांनी आपले नैतिक व आर्थिक बळ दिले होते. काही वेळेला या वृत्तपत्रात आपापसात संघर्षाची पार्श्वभूमी तयार होत होती. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी मध्यस्थी करून तो तंटा सोडविण्याचेही काम केले होते. तसेच या ब्राम्हणेत्तर पुढाऱ्यांच्यातही होणारा वाद मिटविण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली होती.[९१]

**मद्रासकडील ब्राम्हणेत्तर चळवळीशी (जस्टीस चळवळ) साधलेला संपर्क :–**

सन १९१९ ते १९२१ या कालखंडात राजर्षी शाहू महाराजांचे मद्रासच्या ब्राम्हणेत्तर चळवळीचे डॉ.माधवन नायर, सर पी.त्यागराज चेट्टी, सी.नटेश मुदलियार, सर शंकरन नायर आदी नेत्यांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित झाले होते. हिंदुस्थानातील अखिल ब्राम्हणेत्तर आणि

पद्दलित जनतेच्या हक्काविषयी झगडणारा हा महान नेता म्हणून डॉ.माधवन नायर यांचा देशातच नव्हे तर इंग्लंडमध्ये लौकिक झाला होता. महाराष्ट्रात जसे शाहू छत्रपती तसे मद्रासकडे डॉ.माधवन नायर यांना ब्राम्हणेत्तर चळवळीचे अग्रणी मानले जात असे. धनंजय कीर यांनी देखील या दोन थोर पुरूषांचा 'भारतीय सामाजिक लोकशाहीचे व समतावादी समाजाचे अग्रप्रवर्तक' असा यथार्थ गौरव केलेला आहे.[९२] डॉ.माधवन नायर जानेवारी १९१९ मध्ये महाराजांनी भेट घेतली व आपला त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त केल्याची आणि भावी सुधारणातील ब्राम्हणेत्तरांच्या हितसंबंधाच्या संरक्षणाविषयी चर्चा केली होती. डॉ.माधवन नायर त्याच वर्षी एप्रिलमध्ये ब्राम्हणेत्तर पक्षाचे शिष्टमंडळ घेऊन पुन्हा इंग्लंडला गेले. परंतु दुर्दैवाने तेथे जुलैमध्ये निधन झाले.[९३]

मद्रासच्या ब्राम्हणेत्तर चळवळीचे दुसरे नेते म्हणजे सर पी.त्यागराज चेट्टी यांची शाहू महाराजांशी कर्नाटक ब्राम्हणेत्तर सामाजिक परिषदेच्या निमित्ताने हुबळी येथे जुलै १९२० मध्ये भेट झाली होती. या काळात ब्राम्हणेत्तर चळवळीस मोठया प्रमाणावर भरभराट आली होती. या परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना राजर्षी शाहू महाराजांनी सुरूवातीलाच सर चेट्टी यांचा 'या प्रसंगामुळे त्यांच्यासारख्या महापुरूषांची प्राप्ती झाली आहे' असे गौरवोद्गार काढले होते.[९४] पुढे ते म्हणाले होते की, 'आता आम्ही काय करावे हे थोडक्यात सांगतो. येथे भरल्या तशा ब्राम्हणेत्तरांच्या सभा जागोजागी भरल्या पाहिजेत. ब्राम्हणेत्तरांची चळवळ यशस्वीपणाने कशी चालवावी, हे आपणास मद्रासकडून शिकले पाहिजे. यासाठी मद्रासचे वक्ते आणूया व पुण्या–मुंबईस, त्यांनी केलेल्या कामाची जाणीव करुन देऊया व ते येतील अशी माझी खात्री आहे. ब्राम्हणेत्तरांची परिषद भरवा, मुंबई व पुणे वगैरे ठिकाणी लवकरच भरवा. मुंबई, पुणे येथील ब्राम्हणेतर या चळवळीच्या चिकाटीत मद्रासपेक्षा फारच मागे आहेत. तेथील ब्राम्हणेत्तरांचे पुढाऱ्यांच्या शिक्षणापुढे आमचे पुढारी म्हणजे केवळ मुलांप्रमाणे शोभतील.'[९५]

जानेवारी १९२१ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी 'तंजावर केस'बाबत मद्रासला भेट दिली होती. त्यावेळी राजर्षी शाहू महाराजांनी 'जस्टिस'च्या कार्यालयास भेट दिली होती. तेथील ब्राम्हणेत्तर पक्षाच्या नेत्यांशी विचारविनिमय केला. मद्रासकडे ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर वाद महाराष्ट्रातील वादापेक्षा तीव्र स्वरूपाचा असून ब्राम्हण वर्गाच्या वर्चस्वास ब्राम्हणेत्तर समाजाचा कडवा विरोध आहे, हे त्यांच्या लक्षात आले. आर्य संस्कृतीचा द्वेष व त्याचबरोबर अनार्य

संस्कृतीचा अभिमान या मद्रासच्या ब्राम्हणेत्तर चळवळीच्या शिकवणुकीमुळे हा विरोध अधिकच जहाल बनला होता. ब्राम्हण वर्गाची प्रतिक्रियाही तेवढीच तीव्र होती. या पार्श्वभूमीवर राजर्षी शाहू महाराज ब्राम्हणेत्तरांचे पुढारी असल्याने तेथील तंजावरच्या खटल्यात मद्रासकडील सर्व ब्राम्हणी वृत्तपत्रांनी त्यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. या खटल्यात ब्राम्हणी वृत्तपत्रांचा विरोधी प्रचार व न्यायालयीन क्षेत्रात असणारा बलिष्ट ब्राम्हणी प्रभाव यामुळे राजर्षी शाहू महाराजांना या खटल्यात मोठया प्रमाणावर पैसे खर्च करूनही यश मिळाले नाही.[९६]

अशाप्रकारे मद्रासच्या ब्राम्हणेत्तर चळवळीविषयी व तिच्या नेत्यांविषयी राजर्षी शाहू महाराजांच्या मनात मोठी आदर भावना होती. हुबळीत भरलेल्या उपरोक्त सामाजिक परिषदेच्या समारोपाच्यावेळी त्यांनी केलेल्या भाषणात दिसून येते.

मद्रासच्या ब्राम्हणेत्तर नेत्यांनाही राजर्षी शाहू महाराजांच्या मुंबई इलाख्यात ब्राम्हणेत्तर समाजात केलेल्या सामाजिक व राजकीय जागृतीची आणि ब्राम्हणेत्तर चळवळीच्या बांधणीसाठी केलेल्या प्रयत्नांची पूर्ण कल्पना होती आणि म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर आपले दुःख व्यक्त करताना त्यांनी त्यांच्या कार्याबद्दल मनापासून धन्यतेचे उद्‌गार काढलेले होते. सर पी.त्यागराज चेट्टी म्हणतात की, ‘श्री शिवाजी महाराजांचे एक वंशज या नात्याने शाहू छत्रपती महाराज जरी एक राजे होते., तरी ते लोकसत्तावाद्यांतील लोकसत्तावादी आणि खालच्या जातीचे पाठीराखे होते. त्यांचे चरित्र असे काही अलौकिक होते की, ते ब्राम्हणेतरांच्या आणि अस्पृश्य मानलेल्या वर्गाच्या चळवळीतील एक दांडगी शक्ती होऊन बसले होते. ब्राम्हणेत्तरांच्या चळवळीची सर्व हिंदुस्थानभर प्रसार करून तिला राष्ट्रीय स्वरूप देणे हे महाराजांचे ध्येय होते.’[९७] अशाच प्रकारचे उद्‌गार डॉ.नटेश मुदलियार यांनी काढलेले आहेत. ‘महाराजांच्या ठिकाणी जगनियंत्याचे पितृप्रेम आणि मानवांचे बंधुप्रेम ही केंद्रिभूत झाली होती आणि या दोन्हींचा उपयोग त्यांनी मानवजातीची अंतःकरणपूर्वक सेवा करण्यात केला. जरी ते आज शरीररूपाने आमच्यातून नाहीसे झाले आहेत, तरी त्यांचा आत्मा येथे, नव्हे सर्व हिंदुस्थानातील ब्राम्हणेत्तरांमध्ये घुटमळत आहे. ब्राम्हणेत्तरांच्या चळवळीस जर कोणी जोराने गती दिली असेल तर ती राजर्षी शाहू महाराजांनीच.’[९८]

अशाप्रकारे महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीला राजर्षी शाहू महाराजांचे नेतृत्त्व लाभले होते. स्वतः राजर्षी शाहू महाराजांचा प्रयत्न हा ब्राम्हणेत्तर चळवळीची सूत्रे आपल्या हाती

ठेवण्याचा होता. पण असे करीत असताना आपण ब्राम्हणेत्तर चळवळीचे प्रमुख नेते आहोत, असे कधी भासवून दिले नाही. तसेच भास्करराव जाधव, आण्णासाहेब लट्ठे, वालचंद कोठारी, मुंकुदराव पाटील, श्रीपतराव शिंदे, महादेवराव डोंगरे, सी.के.बोले, केशवराव बगाडे, के.सी.ठाकरे, लट्ठे इत्यादी ब्राम्हणेत्तर पुढाऱ्यांना कल्पना होती की, राजर्षी शाहू महाराजांच्याशिवाय अन्य कोणाकडूनही सर्व ब्राम्हणेत्तरांना एकत्र आणण्याचे अवघड कार्य होणार नाही. यावरूनच राजर्षी शाहू महाराजांचे ब्राम्हणेत्तर चळवळीच्या कार्याचे महत्त्व समजते.

**राजर्षी शाहू महाराज व कामगार चळवळ**

एकोणिसाव्या शतकात औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलदार व कामगार वर्गाचा उदय झाला. भारतात मुंबई, कलकत्ता यासारख्या शहरात कारखाने व कापड गिरण्या मोठया प्रमाणावर सुरू झाल्या. या गिरण्या इंग्रज, पारसी, भाटिया व खोजा या लोकांच्या होत्या. तेथे काम करणारा कामगार हा मोठया प्रमाणावर महाराष्ट्रातील होता. हा कामगार वर्ग युरोपियन कामगार वर्गाप्रमाणे संघटीत झालेला नव्हता. राजर्षी शाहू महाराजांचा युरोपातील कामगार लढयाचा अभ्यास होता. म्हणून शाहू महाराजांना वाटत होते की, युरोपातील कामगार वर्गाप्रमाणे भारतातील कामगारही संघटीत होऊन आपल्या हक्कासाठी लढला पाहिजे. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी ज्यावेळी बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले होते. त्यात कामगार वर्गाची चळवळही हाती घेतली. जेव्हा त्यांनी मुंबईच्या कामगारांच्या सभेपुढे दोन भाषणे दिली होती. त्यात कामगार वर्गाच्या हितासंबंधी आपले विचार व्यक्त केलेले होते. त्यांनी जागतिक घडामोडीच्या पार्श्वभूमीवर कामगार वर्गास मार्गदर्शन केले होते.[९९]

या कामगार वर्गाचे नेतृत्त्व करणारे सी.के.बोले, वंडेकर व तालचेलकर इत्यादींनी मुंबईच्या परळ भागात १० नोव्हेंबर १९१८ रोजी दहा हजार कामगारांची व पददलित लोकांची सभा आयोजित केली होती. तिचे अध्यक्षपद राजर्षी शाहू महाराजांच्याकडे दिले होते. तेव्हा या सभेच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना राजर्षी शाहू महाराज म्हणाले होते की, पाश्चात्य देशात भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग आहेत. तिकडेही भांडवलदार लोकांची मजूरदार लोकांवर बेसुमार सत्ता आहे. पण आता मजूरदार लोकांनी आपले संघ बनविले आहेत. गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते. पण अशा अनेक काडयांचा एक वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येते. मजूरदार लोकांनी विलायतेत मजूरी वाढवावी एवढयाकरीताच झगडावे लागते.

तेथील समाजामध्ये कोणत्याही दर्जास पोहचण्यास जन्मसिद्ध अडचण मुळीच नाही. त्यामुळे ते उच्च वर्गात सहजरीतीने मिसळतात. तशी स्थिती आमच्या इकडे नाही. विलायतेत मजूरदार लोकांच्या संघाना पुष्कळ महत्त्व आले आहे. पार्लमेंटसारख्या संस्थांत व प्रधान मंडळात त्या लोकांतील प्रतिनिधी शिरले असून ते आपल्या वर्गाच्या हिताचे योग्यरीतीने संरक्षण करीत आहेत.[१००]

अशाप्रकारे आपल्या भाषणातून राजर्षी शाहू महाराजांनी युरोपातील कामगार वर्गाचा आदर्श आपल्या देशातील कामगारांनी डोळयासमोर ठेवून आपण संघटीत व्हावे. आणि भांडवलदार वर्गास वठणीवर आणावे, असे कामगार वर्गास आवाहन केले.

कामगार वर्गाचे शोषण हे भांडवलदार करीत आहेत. त्यामुळे कामगार वर्गाची दयनीय स्थिती झालेली आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी कामगारांनी संघटितपणे जोरदार व स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी कामगार वर्गानी संघटना स्थापन करणे आवश्यक असे स्पष्ट केले. कामगारांनी आपल्या प्रगतीच्या लढ्याची 'ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीने सतत प्रयत्न' ही आपली शस्त्रे बनविली पाहिजेत आणि सहकार हे आपल्या प्रगतीचे मुख्य साधन केले पाहिजे. 'अडाणी' व 'अशिक्षित' कामगाराला सहकारात सुव्यवस्थितरीतीने काम करण्याची सवय लागते. त्यासाठी 'सहकाराची पहिली शाळा' म्हणून प्रत्येक कारखान्यात कामगारांनी सहकारी पतसंस्था स्थापन करायला हव्यात, अशी उपाययोजना त्यांनी सुचविली होती.[१०१]

कामगारांच्या पहिल्या सभेत त्यांनी कामगार संघ स्थापन करण्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन राजर्षी शाहू महाराज यांनी केले. त्यांचा प्रभाव पडून मुंबईतील सी.के.बोले व त्यांच्या सहकाऱ्यानी एकत्र येऊन कामगारांची 'लोकसंघ' ही संघटना स्थापन केली आणि या संघटनेमार्फतच महाराजांची दुसरी कामगार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत राजर्षी शाहू महाराज म्हणाले होते की, इंग्लंडमध्ये भांडवलदार व मजूरदार असे दोन प्रबळ पक्ष आहेत. त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत. अशी आजपर्यंतची समजूत आहे. वास्तविक पाहता ज्याने त्याने आपले वाजवी हक्क तेवढेच सांभाळले व दुसऱ्यांच्या वाजवी हक्कास विरोध केला नाही. म्हणजे तंटयास जागा राहात नाही. तशी बुद्धी वरिष्ठ लोकांस होईल, दाबून

टाकलेल्यांना मान वर करण्यास संधी मिळेल, तो सदिन होय. हा सुदिन लवकरच उगवेल अशी आशा वाटत आहे.[१०२]

राजर्षी शाहू महाराज यांनी कामगार वर्गाच्या संदर्भात दोन मते मांडली आहेत. पहिले म्हणजे हिंदुस्थानात मुख्य मागासलेला वर्ग हा शेतकऱ्यांचा असून कामगार हा शेतकरी वर्गातूनच शहरात आलेला कष्टकरी वर्ग आहे. तो शेतकऱ्याहून वेगळा नाही. कारखान्यात काम करणारे कामगार हे मूळचे शेतकरीच असल्याने कामगार व शेतीवर अशा दोन्ही वर्गाच्या हिताचा एकत्र विचार करणे गरजेचे आहे. तर दुसरे मत खेडयातून शहराकडे रोजगारासाठी लागलेल्या लोकांच्या लोंढयाविषयी व्यक्त केलेले आहे. खेडयातील शेतकरी हा शेतीवर पोट भरत नाही म्हणून तो शहराकडे धाव घेऊ लागला आहे. त्यामुळे तो पोट भरण्यासाठी कारखान्यातील कामगार बनला आहे. ही गोष्ट देशाच्या विकासाच्यादृष्टीने स्पृहणीय तर नाहीच उलट अनेक समस्या निर्माण करणारी आहे. त्यासाठी खेडयातील शेती व्यवसाय आधुनिक होणे गरजेचे आहे.[१०३]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज यांनी कामगार वर्गास ऐक्याचे व संघटीत होण्याचे आवाहन केले. कारण त्यावेळी देशात कामगारांच्या संघटना व्यापक पायावर उभ्या राहिलेल्या नव्हत्या. राजर्षी शाहू महाराज यांनी व्यक्त केलेल्या विचारातूनच पुढे सन १९२० मध्ये 'अखिल भारतीय कामगार संघटने'ची (आयटक) स्थापना झाली. तिचे अध्यक्ष म्हणून काँग्रेसचे नेते लाला लजपतराय यांची निवड झाली. तसेच सन १९२५ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. तसेच कॉ.श्रीपाद अमृत डांगे व कॉ.मिरजकर यांचा कामगार नेते म्हणून उदय झाला.

## ५.४ समारोप

धर्म व सुधारणा हा महर्षी शिंदे यांच्या विचाराचा व जीवनाचा पाया होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या सामजिक संस्थांच्या कार्यामार्फत अनिष्ठ चालीचा प्रतिबंध केला. मुलांप्रमाणेच मुलींना सक्तीचे शिक्षण मिळावे म्हणून चळवळ केली. त्यांनी त्यामार्फत प्रार्थना समाजाच्या मुंबई साप्ताहिक उपासना, धर्माचरण, नामकरण, उपनयन इत्यादी विधीसोबत त्यांनी नव्या उपक्रमांची भर घातली. अभिनव योजना आखल्या आणि पार पाडल्या. युरोपमध्ये पोस्टल मिशनचे कार्य त्यांनी पाहिले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबई प्रार्थना

समाजामार्फत जे उपक्रम सुरू केले होते त्यामध्ये उदार धर्मग्रंथ वाचन वर्ग, तरूण ब्राम्हसंघ, कौटुंबिक उपासना मंडळ, प्रार्थना समाजाचे मुखपत्र 'सुबोधपत्रिका' साप्ताहिक(मुंबई) मध्ये ते लेखन करीत होते. 'पंढरपूर' येथे समाजाने चालविलेल्या 'बालकाश्रम'ची धुरा ते सांभाळीत होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी २१ मे १९०७ रोजी निराश्रीत सेवा सदनाची स्थापना केली व त्यामार्फत दलित स्त्रियांचा, विधवा स्त्रियाचा उद्धार हा प्रमुख विचार त्यांनी कार्यवाहीत आणण्यास सुरूवात केली. इतर गरीब गरजू स्त्रियांना कशी मदत करता येईल यांचे धडे त्यांना दिले गेले. तसेच निराश्रीत महिला समाजामार्फत ही समाजातील स्त्रियांची सेवा केली. ही कामे करण्यासाठी एक प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटीची स्थापना केली. या सर्वच स्त्रियांनी निराश्रीत सेवासदन, निराश्रीत महिला समाज, संस्थेतील अनाथ विधवांच्यासाठी अपार कष्ट घेतले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सन १९०७ मध्ये त्यांनी 'पश्चिम हिंदुस्थानातील मुलांचे रक्षण करणारी संस्था' स्थापन केली. देवाला वाहिलेल्या मुलींच्याप्रमाणेच वाघ्या, आराध्य, पोतराज, जोग्या अशी नावे धारण करून वाममार्गाने बीभत्स जीवन जगणाऱ्या आणि देवाला वाहिलेल्या मुलांनाही वरील संस्थेत आश्रय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण मिशनधील विद्यार्थ्यांच्या साहाय्याने ही सभा व्यवस्थित पार पडली. इ.स.१९११ मध्ये याच प्रश्नावर त्यांनी **'मुंबई मुरळी प्रतिबंधक'** परिषद भरविली.

वाईच्या ब्राम्हो समाजाची स्थापना करण्यास त्यांनी मदत केली व त्यामार्फत वाई तालुक्यात कार्य केले. त्यामध्ये त्यात वाई तालुक्यातील गावामध्ये कर्मवीर भाऊरव पाटील व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्योद्धाराचे व अंधश्रद्धा दूर व्हावी, यासाठी ठिकठिकाणी भाषणे केली. त्यामुळे लोकांच्यात जागृती होण्यास मदत झाली. तसेच या समाजामार्फत राबविलेल्या उपक्रमात बोपेगाव येथील हरिजन वस्तीस मदत, श्री शिवाजी वाचनालयाची निर्मिती, श्री.एकनाथराव घोरपडे यांचा ब्रह्मविवाह, राममोहन विद्यार्थी गृह, वाईतील चौक व रस्त्याचे नामकरण, महर्षी शिंदे स्मारक निधी, महर्षी शिंदे विद्यामंदिर, जीर्णोद्धार फंड इ.कामे केली. तसेच वाईतील या ब्राम्हो समाजास महात्मा गांधी यांनी भेट देऊन गौरवोद्‌गार काढले.

डिप्रेस्ड क्लासेस मिशनची सन १९०६ मध्ये स्थापना करून त्याद्वारे जे उपक्रम राबविले त्यामध्ये प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा सुरू करणे, गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या

भावी जीवनाची तयारी करण्यासाठी उद्योगशाळा चालविणे, विद्यार्थी वसतिगृहे, मोफत दवाखाने, धर्म व नीती शिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, जातिभेद व मूर्तिपूजा यांना वगळून चालविण्यात येणारी उपासनालये असे अनेक उपक्रम मिशनच्यावतीने चालविण्याचे निश्चित झाले. मिशनने प्रारंभीच्या काळात पुढील संस्था सुरू केल्या होत्या. मुलांसाठी एक व मुलीसाठी एक शाळा, नोकरी करणाऱ्या लोकांसाठी रात्रशाळा, धर्मार्थ दवाखाना, वाचनालय व ग्रंथालय, मुलांसाठी तालीम, महिलासाठी शिवण वर्ग, प्रार्थना व व्याख्याने इत्यादीचा समावेश होत होता.

या डिप्रेस्ड क्लास मिशनचा विस्तार मोठया प्रमाणावर होऊन त्याच्या शाखा परळ, देवनार, मदनपुरा, कामाठीपुरा, पुणे, मनमाड, इगतपूरी, इंदूर, अकोला, अमरावती, दापोली, मंगळूर, मद्रास, महाबळेश्वर व नाशिक इत्यादी ठिकाणी झाला. तर कार्याचा विस्तार हा मुंबई, पुणे, हुबळी, सातारा, ठाणे, दापोली, मालवण, मंगलोर, मद्रास, अकोला अमरावती, इंदूर, भावनगर व कोल्हापूर याठिकाणी अस्पृश्यासाठी शाळा काढल्या होत्या. शाळा, दवाखाने, वसतिगृहे, उद्योगालये चालविणे, त्यासाठी सहकारी मिळविणे, देणग्या गोळा करणे, लहानमोठया परिषदा भरविणे असा मोठा व्याप त्यांनी वाढविला. ही जटील समस्या राजकीय आणि राष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी भारतभर प्रयत्न केले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुणे येथे सन १९१७ मध्ये ‘अस्पृश्यता निवारक संघाची’ स्थापना करण्यात आली. या संघाच्याद्वारे अस्पृश्यांसंबंधी वेळोवेळी जे राजकीय प्रश्न निघत त्यावर विचार करण्याची गरज होती. त्यात मिशनवर कोणतेही संकट येऊ नये अशी त्यांची मूलतः दृष्टी होती. या संघामार्फत काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात ‘अस्पृश्यता निवारणा’चा ठराव पास करून घेण्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. त्यासाठी अस्पृश्यता निवारक परिषद घेतली. या परिषदेत दोन ठराव पास केले होते. त्यात अस्पृश्यांच्या कल्याणासाठी विविध योजनाची दखल घेतली गेली होती.

अस्पृश्यता निवारणाचे कार्य विविध संस्थात्मक माध्यमातून सुरू असताना सन १९१२ मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनचे ठाणे पुण्यास आणले. तेथे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अहिल्याश्रमाची उभारणी केली. पुण्यासारख्या वाढत जाणाऱ्या अफाट शहरात अस्पृश्य बांधवांचे ‘आधार केंद्र व्हावे’, अहिल्याश्रमातील भव्य इमारतीत अस्पृश्यांच्यासाठी

शिक्षणकेंद्र, विद्यार्थी वसतिगृह त्यांना रोजगार मिळून स्वाभिमानाने जीवन जगता यावे यासाठी याची स्थापना केली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना करून त्याद्वारे अस्पृश्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केला होता. त्यात त्यांना यशही मिळालेले दिसून येते. मिशनचे काम प्रत्यक्ष पाहून काही नामांकित व्यक्तींनी या कामाबद्दल प्रोत्साहनपर अभिप्राय प्रकट केला आहे. लाला लजपतराय म्हणतात की, धार्मिक आणि परोपकारी मंडळीनी देशामध्ये चालविलेले हे अत्यंत पवित्र कार्य आहे. डॉ.भांडारकर म्हणतात की, विवेकशिलता ही अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हयांच्या प्रांतावर हल्ला करण्याचा जो सांप्रत काळ आहे. त्याचे निदर्शक म्हणजे ही संपूर्ण संस्था होय. टाइम्स ऑफ इंडियाचे संपादक स्टॅन्ले रीड यांनी म्हटले आहे, संस्थेच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या शाळांचे काम हे विशेषत्वाने स्तुत्य आहे. अस्पृश्यवर्ग हया शब्द प्रयोगापेक्षा अधिक महाभयंकर शब्दप्रयोग भाषेमध्ये असू शकत नाही. मिशनने चालविलेले उदात्त कार्य अंतःकरणातील मर्माला स्पर्श करणारे आहे.

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्रत्यक्ष मुख्यतः हिंदू धर्मसुधारक नेते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या धार्मिक व सामाजिक अशा क्रांतिकारक सुधारणांची त्यांनी प्रशंसा केली. सत्यशोधक समाजाला लागलेले अनिष्ठ वळण नाहीसे होऊन त्याला उदात्त स्वरूप यावे असा त्यांचा प्रयत्न होता. ज्याप्रमाणे ते ब्राम्हो व प्रार्थना समाज हे खेडयापाडयात जावेत म्हणून झटले, तसेच सत्याग्रहाची चळवळ बहुजन समाजात पसरावी म्हणूनही त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. यशापयशाला ते समान मानीत होते. अंधश्रद्धा नाहीशी होऊन डोळस श्रद्धा वाढावी यासाठी त्यांनी अध्यात्मप्रधान ब्राम्हो समाजाचे माध्यम उपयोगात आणले. शिंदे हे धर्मशास्त्रज्ञ समाजशास्त्रज्ञ, विविध भाषा व्युत्पत्तीतज्ञ होते. ऋषितुल्य व्यक्तित्व व परमेश्वरावर निष्ठा लोकांच्या प्रचितीस आल्यामुळे लोक त्यांना महर्षी म्हणू लागले. प्रभावी वक्ते, मार्मिक लेखक, इतिहास संशोधक, वगैरे अनेक दृष्टीने ते अष्टपैलू होते. कोणत्याही समकालीन विचार प्रवाहाला सर्वथा प्रमाण न मानता शिंदे स्वतंत्र व स्वावलंबी विचार आणि आचाराचे राहिले. तुलनात्मक व समन्वयक पद्धतीचे पुरस्कर्ते असल्यामुळे कुशल संघटकही होते. असा हा धर्मचिंतक, तत्त्वचिंतक व कर्ता समाजसुधारक हा एकमेव वाटतो.

आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल, १८७५ रोजी केली. या समाजाने आपली तत्त्वे मांडताना वेदांना अंतिम प्रमाण मानले होते. आर्य समाजाने धार्मिक सुधारणामध्ये हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, पौराणिक अनुष्ठाने या गोष्टी नाकारल्या. आर्य समाजाने सामाजिक चळवळ हाती घेतली. जातिव्यवस्था, जातिभेद व अस्पृश्यतापालन यास आर्य समाजाने विरोध केला. आर्य समाजाने बालविवाह, कायम वैध्यव्य, विधवांना हीन मानणे, पडदा पद्धती, हुंडा पद्धती, बहुपत्नी विवाह, देवदासी प्रथा अशा वाईट प्रथांवर कठोर प्रहार करीत आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. राजर्षी शाहू महाराज यांनी आर्य समाजास कोल्हापूर येथे उदार हस्ते आर्थिक मदत केली. याचे कारण आर्य समाजाने वेदोक्त व वेद सर्वांना खुले केले. आर्य समाजामार्फत कोल्हापूर येथे हायस्कूल व कॉलेज दीर्घकाळपर्यत चालले होते. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला. राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१८ च्या आरंभी कोल्हापूर येथे आर्य समाजाची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले होते. आर्य समाजाकडे राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल चालविण्यासाठी दिले होते. कोल्हापूरातील काही शाळेत महर्षी दयानंदाचा 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ मराठी विद्यार्थ्यांना सक्तीचा म्हणून त्यांनी सुरू केला. कोल्हापूर व जोतिबाच्या रस्त्यावर केर्ली येथे गुरूकूल स्थापन केले. त्याचवर्षी राजाराम अनाथाश्रम ही संस्था आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांना चालविण्यास दिली. त्यांच्या आर्थिक मदतीची सोय केली. अशाप्रकारे आर्य समाजाच्या कार्याला चालना देऊन आपल्या धार्मिक सुधारणेच्या कार्याची दिशा त्यांनी स्पष्ट केली. राजर्षी शाहू महाराजांनी आर्य समाजाच्याबाबतीत आपले विचार परखडपणे मांडून त्या समाजासाठी कोल्हापूर येथे मोठया प्रमाणावर कार्य केलेले दिसून येते.

प्रारंभीच्या काळात राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाकडे लक्ष दिले नव्हते. म्हणूनच त्यांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व, अस्पृश्यता इ.बाबीवर त्यांची श्रद्धा होती. आधुनिक महाराष्ट्रात बुद्धिप्रामाण्यावर अधिष्ठित समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे असे मानणाऱ्या महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. जातीभेद पाळणे हा धर्म नव्हे. निर्मिकाला नैवेद्याची किंवा मध्यस्थांची जरूरी नाही. शूद्र किंवा अतिशूद्र पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद झाली पाहिजे असे या सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण होते. शाहू महाराजांनाही वेदोक्त प्रकरणानंतर

भट–भिक्षुकांच्या प्रवृत्तीची जाणीव झाली होती. त्यामुळेच ते या समाजाच्या विचारसरणीकडे आकर्षित झाले. ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात महाराजांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

राजर्षी शाहू महाराजांच्या चळवळीला राजाश्रय मिळाला. सत्यशोधक समाजाच्या कार्यालयासाठी राजर्षी शाहू महाराजांनी गंगावेशीतील जागा दिली. शाहू महाराजांनी संघटीत होऊन आर्थिक उन्नती करून घेण्याचे व पर्यायाने बहुजन समाजाच्या विकासाचे आवाहन केले. सत्यशोधक समाजाच्या या प्रसाराच्या कामी महाराजांना अनेक सहकाऱ्यांनी मदत केली. राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचाच अधिक पुरस्कार करून त्यांचे कार्य पुढे चालविले होते. महात्मा फुल्यांची सत्यशोधक समाजाची चळवळ राजर्षी शाहू महाराजांच्या कणखर नेतृत्त्वामुळे महाराष्ट्रात सर्वत्र पसरली. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर काही काळ ही चळवळ अक्षरशः मृतवत झाली होती. परंतु या चळवळीला लाभलेले राजर्षी शाहू महाराजांचे नेतृत्त्व संजीवनी ठरले. त्यांच्यामुळे हया चळवळीत प्राण ओतला गेला.

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य  व महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्य यात बरेचशे साम्य होते. ब्राम्हणांची धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढणे, जातिभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, अज्ञान जनतेमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणे, यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. एका अर्थाने हे कार्य सत्यशाोधक समाजाचेच कार्य होते आणि म्हणूनच त्या समाजाचे अनुयायी महाराजांच्या वेदनिष्ठेचा बाऊ न करता त्यांना सत्यशोधकी मानत होते. यात समाजाच्या अनुयायांच्या विचारांची गफलत नव्हती. तर महाराजांच्या कार्याचे वास्तव मूल्यमापन होते. याचा अर्थ असा होतो की, स्वतःस आर्य समाजी म्हणवीत असता महाराज प्रत्यक्षात सत्यशोधक समाजाचे खरे कार्य करीत राहिले होते. पण तसे करीत असता आपल्या कार्यास सत्यशोधक समाजाचे  लेबल लावण्याचे त्यांनी जाणीवपूर्वक टाळले होते.

कोल्हापूर संस्थानात जैन व लिंगायत या धर्मातील लोकसुद्धा मोठया प्रमाणावर होते. या दोन्ही समाजांच्या धार्मिक गरजांकडे राजर्षी शाहू महाराजांनी लक्ष पुरविले होते. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी धर्म जिज्ञासेपोटी अनेक धर्मांना, पंथाना, धार्मिक सुधारणावादी संघटनाना जवळ केले. त्यांना राजाश्रयही दिला. त्यांच्या तत्वज्ञानाचा परिचय करून घेतला.

'धर्म' या विषयासंबंधी त्यांचे विचार म्हणजे त्यात सुधारणा झाल्या पाहिजेत. तो अधिकाधिक समतावादी झाला पाहिजे. अशी त्यांची तळमळ होती. म्हणूनच त्यांनी 'वैदिक स्कूल' किंवा 'क्षात्रजगद्‌गुरू' यासारखे प्रयोग धर्माच्या क्षेत्रात केले होते. असेच काही धर्मासंबंधी मूलगामी विचार मांडले होते. महाराजांचे गुरू सर फ्रेझर यांनी म्हटले आहे की, 'अकबर बादशहाप्रमाणे एखादा नवीन धर्मपंथ स्थापन करता येतो की काय याची चाचपणी महाराजांनी केली होती.' परंतु राजर्षी शाहू महाराजांना असे ही वाटत होते की, जसा सम्राट अकबराचा दिने ईलाही पंथ सम्राट अकबरानंतर अस्ताला गेला तसा आपलाही पंथ आपल्याबरोबर अस्ताला जाईल. म्हणूनच त्यांनी नवीन धर्मपंथ स्थापन करण्यापेक्षा अस्तित्त्वात असलेल्या आर्य समाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी आदी सुधारणावादी धर्मपंथांना राजाश्रय देऊन त्यांच्यामधील चांगल्या तत्वांचा पुरस्कार समाज सुधारणेसाठी करण्याचे त्यांनी योजिले आणि त्याला अनुसरून त्यांनी आपल्या स्वतःच्या पद्धतीने त्यांची अंमलबजावणी केली.

महाराष्ट्रात ब्राम्हणेत्तर समाजाच्या जागृतीची अनेक केंद्रे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याच्या प्रेरणेने उभी राहिली होती. या केंद्राकडून ब्राम्हणेत्तर समाजासाठी शैक्षणिक संस्था व वसतिगृहे स्थापन झाली. या शैक्षणिक कार्याबरोबर समाज जागृतीचेही अनेक सत्यशोधकी उपक्रम हाती घेतले गेले. अस्पृश्यांसाठी वेगळया शाळा व वसतिगृहे उघडली. त्यांनी जातिनिहाय वसतिगृहे उघडण्याचे कारण म्हणजे त्यावेळची वास्तव परिस्थिती होती. ब्राम्हणासहित सर्व जातींची मुले आलेली पाहून राजर्षी शाहू महाराजांना आनंद वाटत होता. परंतु काही दिवसानी वसतिगृहातील उच्चवर्णीय ब्राम्हण विद्यार्थी इतरवर्णीय विद्यार्थ्यांना हीन लेखू लागले.

सन १९०८ मध्ये 'अस्पृश्य मानलेल्या जातींत विद्याप्रसार करणारी मंडळी' या नावाची संस्था राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने स्थापन करण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात वृत्तपत्रांच्या क्षेत्रात ब्राम्हणांची मक्तेदारी होती. अशावेळी ब्राम्हणेत्तर पक्षाची बाजू समर्थपणे मांडणाऱ्या ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांची गरज राजर्षी शाहू महाराजांना वाटत होती. सन १९१९ ते १९२१ या कालखंडात राजर्षी शाहू महाराजांचे मद्रासच्या ब्राम्हणेत्तर चळवळीचे डॉ.माधवन नायर, सर पी.त्यागराज चेट्टी, सी.नटेश मुदलियार, सर शंकरन नायर आदी नेत्यांशी संबंध प्रस्थापित करून त्यास सहकार्य केले होते. मद्रासच्या ब्राम्हणेत्तर

चळवळीविषयी व तिच्या नेत्यांविषयी राजर्षी शाहू महाराजांच्या मनात मोठी आदर भावना होती. महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीला राजर्षी शाहू महाराजांचे नेतृत्त्व लाभले होते. स्वतः राजर्षी शाहू महाराजांचा प्रयत्न हा ब्राम्हणेत्तर चळवळीची सूत्रे आपल्या हाती ठेवण्याचा होता. पण असे करीत असताना आपण ब्राम्हणेत्तर चळवळीचे प्रमुख नेते आहोत, असे ही भासवून दिले नाही.

राजर्षी शाहू महाराज यांनी कामगार वर्गास ऐक्याचे व संघटीत होण्याचे आवाहन केले. कारण त्यावेळी देशात कामगारांच्या संघटना व्यापक पायावर उभ्या राहिलेल्या नव्हत्या. राजर्षी शाहू महाराज यांनी व्यक्त केलेल्या विचारातूनच पुढे सन १९२० मध्ये 'अखिल भारतीय कामगार संघटने'ची (आयटक) स्थापना झाली. तिचे अध्यक्ष म्हणून काँग्रेसचे नेते लाला लजपतराय यांची निवड झाली. तसेच सन १९२५ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. तसेच कॉ.श्रीपाद अमृत डांगे व कॉ.मिरजकर यांचा कामगार नेते म्हणून उदय झाला. यावरूनच राजर्षी शाहू महाराजांनी संस्थात्मक कार्य केलेले दिसून येते.

## संदर्भ


१) पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, लोकवाङ्मयगृह मुंबई, मे २००४, पृ.६९, ७०

२) वैद्य द्वा.गो., प्रार्थना समाजाचा इतिहास, प्रार्थना समाज, मुंबई, १९३५, पृ.३८

३) कदम शंकरराव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, जुलै, २०००, पृ.८७, ८८

४) कित्ता,.८८

५) चव्हाण रा.ना., कर्मवीर शिंदे आणि प्रार्थना समाज, सावंत/भोसले(संपा.), कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे जन्मशताब्दी समृतिग्रंथ, पृ.९२

६) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.८७, ८८

७) कित्ता, पृ. १६१, १६२

८) शिंदे विठ्ठल रामजी, माझ्या आठवणी व अनुभव, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९९, पृ.२२८

९) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.१६४

१०) कित्ता, पृ.१६७, १६८

११) कित्ता, पृ.९१

१२) कित्ता, पृ.९२

१३) ब्राह्मोसमाज वाई, अहवाल व पंचवार्षिक कामगिरी, २६ मे, १९३८, पृ.२

१४) ब्राह्मोसमाज वाई, ट्रस्ट रजिस्टर, १९३८, पृ.४, ५

१५) पाटणे संभाजीराव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: एक धगधगीत व्यक्तिमत्व, सौ.नंदिनी.गवळी, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, १९८१, पृ.६८

१६) चौसाळकर अशोक, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची अप्रकाशित रोजनिशी; ब्राह्मो समाज शतसंवत्सरी सफर, रणधीर शिंदे, एप्रिल ते जून, २०१२, पृ.१३

१७) ब्राह्मो समाज वाई, वार्षिक अहवाल, १९६९, पृ.५

१८) ब्राह्मो समाज वाई, वार्षिक अहवाल, १९३८, पृ.९

१९) वाई नगरपरिषद, वार्षिक अहवाल, १९३९–४०, पृ.९

२०) पाटणे संभाजीराव, उपरोक्त, पृ.६८

२१) ब्राह्मोसमाज वाई, वार्षिक अहवाल, १९५०, पृ.३

२२) श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९५७, पृ.१३

२३) बाबर रा.कृ., महर्षी शिंदे आणि वाई ब्राम्हो समाज, साकेत प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९१, पृ.८८

२४) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.८९, ९०

२५) पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, नॅशनल ट्रस्ट बुक इंडिया, नवी दिल्ली, २००७, पृ. ३१

२६) पवार बा.ग., एक उपेक्षित महामानव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, मातृभूमी प्रकाशन, पुणे, २०१०, पृ.२३

२७) ठोंबरे तानाजी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी, लोकवाङ्मयगृह मुंबई, फेब्रुवारी २००९, पृ.१०

२८) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.८९, ९०

२९) भोसले एस.एस.आणि सावंत, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे जन्मशताब्दी स्मृतिग्रंथ, पृ.११८

३०) ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.१२

३१) पवार गो.मा., उपरोक्त, पृ.२२८, २२९

३२) कित्ता, पृ. २२९

३३) तायडे संभाजी सुदाम, प्रभारी प्राचार्य, पुणे शहर

३४) शेवाळे मधुकर धर्माजी, जनरल सेक्रेटरी, डी.सी.एम. सोसायटी, पुणे महाराष्ट्र

३५) प्रा.म्हस्के जे.के., पुणे शहर

३६) माणिक दशरथ, नाना पेठ, पुणे

३७) शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ.२२७

३८) मंगुडकर मा.प. व पवार गो.मा.(संपा.), भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, नवभारत ग्रंथमाला नं.६, प्रकाशक वे.शा. बलकुंदी, नागपूर, १९३३, पृ.२३८

३९) कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९९, पृ. १९९

४०) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.११८

४१) मंगुडकर मा.प. व पवार गो.मा.(संपा.), उपरोक्त, पृ.२३८

४२) पवार गो.मा., उपरोक्त, पृ.२७९

४३) मंगुडकर मा.प. व पवार गो.मा.(संपा.), उपरोक्त, पृ.२३८

४४) शिंदे विठ्ठल रामजी, माझ्या आठवणी व अनुभव, श्रीलेखन वाचन भांडार, पुणे, १९५८, पृ.२६१

४५) पवार गो.मा., उपरोक्त, २८०, २८१

४६) सुबोधपत्रिका, पुणे २९ जून १९१९

४७) पवार गो.मा., उपरोक्त, ३६३, ३६४

४८) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.१२०

४९) पवार गो.मा., उपरोक्त, ३६५

५०) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.१२१, १२२

५१) फडकुले निर्मलकुमार(संपा.), प्रबोधनातील पाऊलखुणा, पृ.१०९

५२) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ. १२२

५३) कित्ता, पृ.१२३

५४) ठोंबरे तानाजी, उपरोक्त, पृ.१९

५५) कित्ता, पृ.२०

५६) नाईकवाडे अशोक(संपा.), महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शोध व बोध, ज्ञानेश प्रकाशन औरंगाबाद, पृ.१०५

५७) कदम शंकरराव, उपरोक्त, पृ.१२५

५८) शिंदे विठ्ठल रामजी, माझ्या आठवणी व अनुभव, उपरोक्त, पृ.२७९

५९) पवार गो.मा., उपरोक्त, पृ. २९०, २९१

६०) सरदेसाई बी.एन. व नलावडे व्ही.एन., आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोबर २००४, पृ.३३३, ३३४

६१) चव्हाण रमेश(संपा.), राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, रा.ना.चव्हाण जन्मशताब्दी वर्ष प्रकाशन, पुणे,, पृ.१०१

६२) जाधव भ.बा.(संपा.), राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.२१, २२

६३) फडके य.दि. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, पुणे, १९८२, पृ.१८६

६४) कित्ता, पृ.१८७

६५) पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे, २६ जून २०१३, प्रथमावृत्ती, पृ.६८

६६) कित्ता, पृ.६८

६७) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, १५ जुलै २००८, पृ. १९

६८) कित्ता, पृ. २५, २६

६९) कीर धनंजय, शाहू छत्रपती A Royal Revolutionery, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६, पृ. ३८

७०) डॉ.पवार शिरीष, उपरोक्त, पृ.६४

७१) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, उपरोक्त, पृ.४५

७२) पवार शिरीष, उपरोक्त, पृ.६५

७३) कित्ता, पृ.७०, ७१

७४) शाहू महाराजांचे अॅडॅम्सना अप्रकाशित पत्र, कोल्हापूर पुराभिलेख संग्रहालय, क्र.आर.१२३१४, २० ऑगस्ट, १९२०

७५) साळुंखे पी.बी.(संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, १९७६, पृ. ४४३, ४४४

७६) कित्ता, पृ. ४४७

७७) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रकाशक, डॉ.जयसिंगराव पवार संचालक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर , २५ मे, २००१, पृ.१५२

७८) कित्ता, पृ.१५२

७९) कित्ता, पृ.१५३

८०) Pawar A.G.(Ed.), Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Kolhapur, 1978, P.130

८१) पाटील शामराव, धाटावडकर भास्कर(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे आदेश, भाग १, मुंबई, १९८८, पृ. १३१

८२) Pawar A.G.(Ed.), Op.Cit., P.4,5

८३) Ibid, P.321

८४) Ibid, P.321

८५) Latthe A.B., Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, Vol. I, Bombay, 1924, P.5

८६) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ.१९५

८७) कित्ता, पृ.१६४

८८) कित्ता, पृ.१६५

८९) पवार जयसिंग(संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, (छत्रपती शाहू महाराज : एक अभ्यास प्रा.शेषराव मोरे, नांदेड यांचा लेख), प्रकाशक, डॉ.जयसिंगराव पवार संचालक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर , २५ मे, २००१, पृ.३६८

९०) कित्ता, पृ.३६९

९१) फडके य.दि., शाहू छत्रपती आणि लोकमान्य, पुणे, १९८२, पृ.२३३,२३४

९२) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती –एक समाजक्रांतिकारक राजा, मुंबई, १९७९, पहिली आवृत्ती, पृ.४१०

९३) कित्ता, पृ. ३७३

९४) जाधव भ.बा.(संपा.), राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, १९७१–७२, प्रथमावृत्ती, पृ. १०२

९७) जाधव भ.बा.(संपा.), उपरोक्त, पृ. ११३, ११४

९६) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती –एक समाजक्रांतिकारक राजा, उपरोक्त, पृ. ४८६, ४८७

९७) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ.१७०

९८) कित्ता, पृ. १७१

९९) कित्ता, पृ. १९७, १९८

१००) जाधव भ.बा.(संपा.), उपरोक्त, पृ.१४

१०१) कित्ता, पृ.२६

१०२) कित्ता, पृ.१९, २०

१०३) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, उपरोक्त, पृ.२००

## प्रकरण सहावे

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा तौलनिक अभ्यास

### ६.१ प्रास्ताविक –

राजर्षी शाहू आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे समकालीन समाजसुधारक होते. या दोघांनी अस्पृश्यता आणि जाती विषमतेच्या निर्मूलनासाठी मोठे प्रयत्न केले होते. त्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावले होते. सामाजिक समता व न्यायासाठी संघर्ष करणारे दोन्ही समाजसुधारक होते. 'बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।' हे या उभयतांच्या जीवनाचे सूत्र होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोघांच्या विचारांचा तुलनात्मक आढावा घेत असताना प्रामुख्याने या दोघांचा परिचय, त्यांनी प्रार्थना समाजाला केलेली मदत, सत्यशोधक चळवळ व प्रार्थना, ब्राम्हो समाजाशी असलेला संबंध, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचा अस्पृश्यतेविरूद्धचा लढा, क्षात्रजगद्गुरूपदाला झालेला विरोध व त्यातून ऐतिहासिक असे वेदोक्त प्रकरण उद्भवले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा परामर्ष या प्रकरणात घेतलेला आहे.

### ६.२ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे बालपणीचे संस्कार

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या घरी सुधारकांचे वातावरण होते. त्यातूनच ते घडले होते. त्यांच्या घरी पडदा पद्धती नव्हती. जातीभेद पाळला जात नव्हता. जातिभेदाचा संस्कारच मनावर झाला नसल्याने समाजसुधारकाप्रमाणेच आधुनिक सुधारकाप्रमाणे जातिभेद मोडण्याचा खटाटोप करण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. मराठयांच्या घरी न जेवणारी ब्राम्हण लिंगायत मंडळी त्यांच्या विश्वकुटुंबी घरी जेवत असत. न्हावी, धोबी, मुसलमान यांच्याशी कधी त्यांच्या घरात पंक्तिभेद केला जात नसे, त्यांच्या घरात सामाजिक सुधारणेची तत्त्वे पाळली जात होती.[१]

विठ्ठल रामजी शिंदे यांचे व्यक्तिमत्व कुटुंबातच घडल्यामुळे ते शेवटपर्यत समाजसुधारणेचे कार्य करीत राहिले होते. त्यांचे सामाजिक कार्य हे विशिष्ट जडणघडणीतूनच झाले होते. विशेष म्हणजे त्यांच्या सामाजिक सुधारणा कार्याची चौकट त्यांच्या कुटुंबातच झाली

होती. त्यांच्या आजोबा आजी व वडिलापासूनच त्यांना वारसा मिळाला होता. त्यांना त्यांच्या आईनेही चांगले सुसंस्कृत संस्कार केले होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भावी समाजसुधारणेचा पाया त्यांच्या वडिलांच्या भागवत धर्मातून घातला गेला होता. समाजसुधारकांचे विचार त्यांच्या मनावर घरातून आई वडिलाकडून आले होते. त्यांच्या मनात स्त्री जातीबद्दल अपरंपार करुणा व भक्ती होती हे दिसून येते.[२]

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्या कार्यातून आणि विचारातून झालेला आढळतो. त्यांची घडण अशाप्रकारे त्यांच्या बालपणीच झाली होती. घरातील वातावरणाचा परिणाम त्यांच्या ग्रहणशील मनावर होऊन त्यांची बैठक अध्यात्मप्रवण बनली. मनाला उदारपणा व्यापकपणा आला. संमिश्र संस्कृतीत वाढल्याने भेद जाणवण्याऐवजी ऐक्य भावनाच जोपासली गेली होती. मन भावनाप्रवण बनले होते.[३]

राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही आपल्या पूर्वजांचा वारसा यातून घडलेली असली तरी त्यांचे दत्तकविधान झाल्यानंतर सहाजिकच ते बनल्याने त्यांची वैचारीक जडणघडण ही संस्थानिकाप्रमाणे झाली. त्यांच्या कार्यावरून हे स्पष्ट होते की, त्यांनी कोल्हापूरच्या पूर्वीच्या  छत्रपतींना जे शक्य झाले नाही त्यापद्धतीचे कार्य त्यांनी केले. हे केवळ त्यांच्या बुद्धीमत्तेतून शक्य झाले होते. त्यांच्या विचाराची जडणघडण ही घाटगे व भोसले या दोन्ही घराण्याकडून झालेली दिसते. त्यामुळे दत्तकविधान झाल्यानंतर त्यांनी भोसले घराण्यातील संस्कारानुसारच आपले कार्य केलेले दिसून येते.[४]

राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण ही फ्रेझरसाहेबांनी घडविली होती. त्यांचे पूर्ण नाव स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेझर असे होते. ते इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा उत्तीर्ण झालेले असून, शाहूराजे यांचे शिक्षक म्हणून नेमणूक होण्यापूर्वी ते नाशिकचे सहाय्यक जिल्हाधिकारी व दंडाधिकारी होते. तसेच डांग आणि सुरगाना यांचे ब्रिटिश राजप्रतिनिधीही होते. फ्रेझरसाहेबांनी दिलेल्या शिक्षणाचा परिणाम शाहू महाराजांच्या जीवनात चिरकाल टिकून राहिला. फ्रेझर हेच त्यांचे खरे मार्गदर्शक, मित्र, तत्त्वज्ञानी होते. गुरू फ्रेझर यांच्यापासून त्यांना एक अमोल ठेवा प्राप्त झाला तो म्हणजे मानवी जीवनात सहानुभूती हाच परवलीचा शब्द ठरतो आणि तोच जीवनातील वाटचाल करत असताना आपणास नैतिक ऊर्जा पुरविण्याचे काम

करीत असतो. शाहू महाराजांनी आयुष्यात फ्रेझर साहेबांच्या शिक्षणापासून घेतलेली हीच जीवनाची गुरूकिल्ली होती. त्यांच्या वैचारिक जडणघडणीत फ्रेझरसाहेबांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यांनीच त्यांच्या वैचारिकतेला खतपाणी घालण्याचे काम केले होते. त्यांनी कोल्हापूर राज्यात ज्या सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणल्या होत्या त्याचे सर्व श्रेय त्यांचे मार्गदर्शक फ्रेझरसाहेबांना जाते. फ्रेझरसाहेबांनी दिलेल्या शिक्षणातूनच शाहू महाराज यांची वैचारीक जडणघडण झालेली दिसून येते.[५]

अशाप्रकारे या दोन समाजसुधारकांच्या सामाजिक कार्यास त्यांच्या कुटुंब व आप्तेष्टांची पार्श्वभूमी होती. त्यातूनच त्यांच्यावर झालेल्या संस्कारातून त्यांचा पिंड समाजसुधारकाचा बनलेला होता. राजर्षी शाहू महाराज यांना तर कोल्हापूर येथील भोसले घराण्यात दत्तक घेतल्याने त्यांच्यावर राजघराण्यातील संस्कार झालेले असतानाही त्यांनी समाजसुधारणेचे संस्कार होऊन सहाजिकच ते समाजसुधारणेकडे आकर्षित झाले होते. या दोन्ही समाजसुधारकाचे कार्य महान होते. शाहू महाराजांना राजाश्रय व लोकाश्रय मिळाला होता. वि.रा.शिंदे यांना फक्त लोकाश्रय मिळाला होता.

## ६.३ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचे परस्पर संबंध–

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज हे दोघेही समवयस्क होते. त्या दोघांच्यामध्ये केवळ एक वर्षाचा फरक होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे राजर्षी शाहू महाराजांच्यापेक्षा एक वर्षानी मोठे होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोघांच्यामध्ये परस्पर संबंध प्रदीर्घ काळ होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांचा प्रथम परिचय १८९५ मध्ये झालेला होता. तो म्हणजे २७ मार्च १८९५ रोजी पुण्यात कॉलेजचे उद्घाटन राजर्षी शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. त्या समारंभास विठ्ठल रामजी शिंदे हजर होते. ही माहिती शिंदे यांनी आपल्या 'माझ्या आठवणी आणि अनुभव' या आत्मचरित्रात सांगितले आहे. याचवेळी महर्षी शिंदे यांनी सन १८९५ मध्ये शाहू छत्रपतींना प्रथम पाहिले होते. त्यानंतर १८ एप्रिल १८९९ रोजी विठ्ठल रामजी शिंदे कोल्हापूरात आले होते. महर्षी शिंदे यांना निसर्गातील सृष्टी–सौंदर्य पाहण्याची आवड होती. तसेच त्यांना इतिहास विषय हा आवडीचा होता. त्यामुळे ते कोल्हापूरला आले त्यावेळी १८ एप्रिल ते २९ एप्रिल १८९९ रोजीपर्यंत या परिसरातील

कोल्हापूर, पन्हाळा, पावनगड आणि विशाळगड इत्यादी ठिकाणे फिरले होते. याची माहिती त्यांच्या रोजनिशीत सापडते. १८ एप्रिल १८९९ रोजी राजर्षी शाहू महाराजांचे दुसरे पुत्र प्रिन्स शिवाजी यांच्या जन्माच्या वेळी कोल्हापूरात जो आनंदोत्सव साजरा झाला होता. तो त्यांनी स्वतः अनुभवला होता. त्याची माहिती त्यांनी रोजनीशीत दिलेली आहे. त्यावेळीही त्यांचा संबंध हा राजर्षी शाहू महाराजांशी आलेला होता.[६]

अशाप्रकारे या वरील दोन प्रसंगातून असे स्पष्ट होते की, हे दोन समाजसुधारक हे एकमेकांना सन १८९५ पासून ओळखत होते. त्यावेळी त्यांचे विशेष असे काही बोलणे झालेले नाही.

## ६.४ व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनात वैचारिक भावनिक प्रतिक्रिया व्यक्त होते. वाचन, निरीक्षण आणि चिंतन यांतून मनास प्रगल्भता आलेली होती. काहीतरी करावे ही उर्मी दांडगी होती. मूळचीच वृत्ती भावनाप्रधान आणि बाहय वास्तवाबद्दलचे असमाधान या सर्व कारणांचा परिणाम म्हणून वृत्तीची ही तीव्रता निर्माण झालेली होती. काही चांगले दिसले की, ते मनःपूर्वक कौतुक करतात. त्याविषयी आदरभाव दाखवितात आणि वाईट दिसले की तीव्र निषेध करतात. मात्र ही भावनिक तीव्रता असली तरी ते चांगल्या वाईटाचा निवाडा यथायोग्य करतात. त्यांच्या आकलनात आणि प्रतिक्रिया प्रकट करण्यात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. तीव्रता असली तरी मानसिक प्रगल्भपणामुळे विवेक सुटला नाही. मनाची आध्यात्मिक ठेवण, व्यापकपणे विचार करणारी जीवनदृष्टी, तरल संवेदनशीलता, सूक्ष्म सौंदर्यदृष्टी, भाषेच्या सामर्थ्याची यथोचित जाण इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सांगता येतील. पुढे त्यांच्यावर प्रार्थना समाजाचा प्रभाव पडला होता. तसेच ख्रिस्ती धर्मातील उदार तत्वांचाही त्यांच्यावर प्रभाव पडलेला होता. हे स्पष्ट होते. ते ब्राम्हो समाजात गेल्याने सुधारक झाले नव्हते, तर सुधारक म्हणून ब्राम्होसमाजात गेले होते.[७] अशाप्रकारे संस्थात्मक कार्यामुळेच खऱ्या अर्थाने नियोजनबध्द, रचनात्मक कार्य होत असते.

शाहू महाराजांचे शरीर हे निरोगी असून त्यांनी बालवयातच हे शरीर कमविले होते. शाहू महाराजांची शरीरयष्टी धिप्पाड होती. त्याचप्रमाणे त्यांची बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती तीव्र व तरल होती. अविरत काम करण्याची त्यांची मोठी क्षमता होती. एकाचवेळी अनेक लोकांशी संवाद

साधण्याचे कौशल्य त्यांच्याकडे होते. त्यांची वागणूक ही निगर्वी व नम्रतेची होती. ते उत्तम कुस्तीगीर होते. ते नेहमी म्हणत असत. 'पहिली शरीर संपत्ती, दुसरी पुत्रसंपत्ती, तिसरी धनसंपत्ती असेल तोच खरा पुण्यवान असेल.' राजर्षी शाहू महाराजांना शिकार व घोडयावर बसण्याची आवड होती. ते साहसी होते. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज यांचे व्यक्तीमत्त्वाची वैशिष्टये होत. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वावर डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी, प्रार्थना समाज, आर्य समाज व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव पडलेला होता. त्यातूनच ते सामाजिक सुधारणा चळवळीकडे वळलेले दिसून येतात.[८]

## ६.५ प्रार्थना समाजास सहकार्यः–

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रार्थना समाजाचे प्रभावी प्रचारक होते. महर्षी शिंदे यांच्या मनावर केशवचंद्र सेन यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. केशवचंद्र सेनच्या विचाराचा पगडा विठ्ठलरावजीच्या ठायी असला तरी, जीवनासाठी ऊर्जेचा संयोग साधून भावी आयुष्यात ध्येय गाठण्याची इर्षा आणि रात्रंदिवस तोच विचार त्यांच्या मनात घोळू लागला. त्यात तरुण आणि वृध्द मंडळींच्या गाठीभेटी होऊन समाजाविषयी काही तरी करण्याची धडपड सुरू झाली. म्हणूनच त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेऊन रीतसर ब्राम्हो समाजाचे अनुयायी झाले. धर्मप्रसारक या नात्याने आपले आयुष्यच उन्नत धर्मकार्यासाठी वहावे अशी त्यांच्या मनाची धारणा होत चालली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या प्रार्थना समाजाच्या कार्याची सुरूवात गुजरात येथे नवसारीत प्रार्थना समाजाची स्थापना करून ते कामात सहभागी झाले. डॉ.रा.गो.भांडारकर यांच्या शिफारशीमुळेच ते धर्मशास्त्राचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी परदेशात जाणे निवडले गेले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे भारतात परत आल्यावर प्रार्थना समाजाचे मिशनरी म्हणून प्रार्थना समाजाचे कार्यास सुरूवात केली. प्रार्थना समाजाने उदार धर्माचा व एकेश्वराचा पुरस्कार केला होता. प्रार्थना समाजाचे विचार त्यांनी वेगवेगळया थरातील लोकापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी धार्मिक वाचनवर्ग, पोस्टल मिशन, प्रार्थना करण्यासाठी सुलभ संगीत पुस्तिका इत्यादी उपक्रम सुरू केले.[९] मिशनरी वृत्तीने नव्या ज्ञानाचा आधार घेवून समाज व धर्म यांची चिकित्सा सुरु केली.

अभिजन वर्गाच्या सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक गुलामगिरीतून बहुजनांची सुटका व्हावी, म्हणून राजर्षी शाहू महाराज विविध व्यक्तींची, वेगवेगळया प्रचार साधनांची आणि भिन्न भिन्न सामाजिक संस्थांची आपल्या इच्छेनुसार मदत घेत होते. त्यामुळेच आर्य समाजाचे अभिमानी असणारे राजर्षी शाहू महाराज आर्य समाजाचे चाहते होण्याआधीपासून म्हणजे १९११ पासून सत्यशोधक चळवळीच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे दिसतात. याच दृष्टिकोनातून राजर्षी शाहू महाराज यांनी प्रार्थना समाजालाही मदत केलेली दिसते. कोल्हापूर येथे गणपत कृष्णाजी कदम, गोविंदराव सासने आदींनी प्रार्थना समाजाच्या कार्यात लक्ष घातले होते. त्यामुळे प्रार्थना समाजाच्या प्रमुख नेते मंडळींनी कोल्हापूरात येऊन प्रार्थना समाजाच्या कार्याला अधिक चालना द्यावी, असे कोल्हापूरातील कार्यकर्त्यांना वाटत होते. राजर्षी शाहू महाराजांनाही असेच वाटत होते. त्यांना आर्य समाजाप्रमाणेच प्रार्थना समाजाचा कोल्हापूर येथील समाजकार्यात प्रयोग करून पाहावयाचा होता. सन १९११ मध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी प्रार्थना समाजाला मदत केलेली दिसते. त्यामध्ये अस्पृश्यता निवारण्याचे काम त्यांनी या समाजाच्या माध्यमातून केलेले दिसते. तसेच त्यांनी प्रार्थना समाजाला योग्य ती मदत केल्याचे दिसते. ज्यावेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना इंग्लडला जाण्यासाठी शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली होती. यावरूनच राजर्षी शाहू महाराजांनी प्रार्थना समाजास मदत केलेली होती. हे स्पष्ट होते. [१०]

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोघांनीही प्रार्थना समाजासाठी मदत केलेली होती. त्यामुळे त्यांच्या या मदतीमुळे प्रार्थना समाजास चालना मिळण्यास मदत झाली होती. धर्मशास्त्रातील क्लिष्टता, कर्मकांडे, अंधश्रध्दा, कालबाहय रुढी, परंपरा नष्ट करण्याचे कार्य सुरु केले होते.

## ६.६ सत्यशोधक विचारप्रणालीचे चाहते :-

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्रार्थना व ब्राम्हो समाजाचे तर राजर्षी शाहू महाराज हे आर्य समाजाचे चाहते होते. तरीदेखील ते दोघेही महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचार प्रणालीचे मनस्वी चाहते होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची तत्वप्रणाली म्हणजे दुसरे तिसरे काही नसून दीन-दलित बहुजनांची अभिजनांच्या आर्थिक, सामाजिक आणि

धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्याचा जाहीरनामा होता, असा दोघांचाही ठाम विश्वास होता.[११]

शाहू महाराजांचे शिक्षणविषयक वैचारिक जडणघडण ही सत्यशोधक समाज व आर्य समाज या दोन्हीतून झालेली दिसून येते. दोन्ही समाजातील जी शिक्षणविषयक तत्त्वे त्यांना योग्य वाटली त्याचाच स्वीकार त्यांनी केलेला दिसतो. अस्पृश्य शिक्षण व स्त्रीशिक्षणविषयक समाजजागृती हे विचार महात्मा फुले यांचेकडून शाहू महाराजांनी घेतले होते. ब्राम्हणेत्तर चळवळीची बीजे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत आहेत. सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी घातला. शाहू महाराजांची वैचारीक जडणघडण ही ब्राम्हणेत्तर चळवळीतून घडत गेली होती. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर त्यांचे अस्पृश्य दलित समाजाच्या दारापर्यत शिक्षण पोहचविण्याचे कार्य शाहू महाराज यांनी केले. म्हणून ते महात्मा फुले यांचे वारसदार मानले जातात. शाहू महाराज हे सत्यशोधनाच्या दृष्टीने सत्यशोधक समाजाचे अनुयायी वाटतात. म्हणूनच ते 'सर्वांना विद्येचा अधिकार आहे' असे ते म्हणतात. अस्पृश्य शिक्षण व स्त्रीशिक्षणविषयक समाजजागृती हे विचार महात्मा फुले यांचेकडून शाहू महाराजांनी घेतले होते.[१२]

पुणे येथे महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास प्रारंभ केला होता. हे कार्य विस्तारित करण्याचे महान कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. जातिभेद, दास्य, वर्णश्रेष्ठत्त्व, यामुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करण्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रयत्न केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी हिंदुस्थानच्या विविध प्रांतांचा दौरा केला. मात्र या पहिल्या दौऱ्यात प्रथमच त्यांना भारतीय जीवनाचे, तेथील लोकस्थितीचे जे स्वरूप पहावयास मिळाले ते त्यांना निश्चितपणे बोधकारक वाटले. त्यांच्या मते, 'भारतातील अस्पृश्यता केवळ स्थानिक अथवा धार्मिक नसून ती जातीय व नित्य स्वरूपाची आहे.' ते अहमदनगर जिल्हयातील भिंगार गावी अस्पृश्यांच्या सभेला हजर राहिले. त्यांच्या हालअपेष्टा ऐकून त्यांनी अस्पृश्योद्धाराला वाहून घेण्याचे ठरविले. सर्वसामान्य माणसे धर्माच्या बाबतीत, मूर्तीपूजेच्या बाबतीत कसा विचार करतात. हे दिसून आले. हिंदुस्थानातील लोकजीवनात झालेले विविध संस्कृतीचे मिश्रण व त्यावर पडलेले पाश्चात्य संस्कृतीचे आवरण ध्यानात आले.[१३] बुध्दीप्रामाण्य जपल्याशिवाय आधुनिकता रुजणार नाही. याची जाण या सुधारकांना

होती.

अशाप्रकारे या दोन्ही समाजसुधारकांनी सत्यशोधक समाजास विरोध न करता उलट त्याचे अनुकरण करून सत्यशोधक समाजाचे कार्य आपापल्यापरीने चालू ठेवले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना व ब्राम्हो समाजाचे कार्य करताना सत्यशोधक समाजातील तत्वांचा प्रसार केलेला दिसून येतो. त्यामध्ये अस्पृश्यता निवारणासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना करून त्याद्वारे अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक समाजाचे कार्य चालू ठेवले होते. त्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबलिले होते. त्यामध्ये अस्पृश्यता निवारण, वसतिगृहाची स्थापना, वेदोक्त प्रकरण, ब्राम्हणेत्तर चळवळीस मदत वगैरे गोष्टी राबवून महात्मा फुले यांचे सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालविले.

## ६.७ अस्पृश्यतेविरूद्धचा लढा :-

अस्पृश्यतेचा समुळ नायनाट झाल्याशिवाय हिंदू समाज एकसंघ होणार नाही. हा दृष्टीकोन समोर ठेवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी आपापल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून सर्वस्वपणाला लावून अस्पृश्यतेच्या विरोधात उभयतांनी संघर्ष केला होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते अस्सल दर्जाचे संशोधक होते. इतिहास, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र आदी विषयांचे गाढे अभ्यासक होते. केवळ सहभोजने आणि मंदिर प्रवेश या गोष्टी अस्पृश्यता या हिंदू समाजाला जडलेल्या रोगावरील वरवरची मलमपट्टी होती, हे मर्म महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूर्ण ओळखून होते. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता समूळ नष्ट करण्यासाठी आयुष्यभर अस्पृश्यतेचे मूळ शोधून काढण्यासाठी स्वतःला संशोधनात गाढून घेतले होते. त्यामधूनच त्यांचा 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथही प्रकाशित झाला होता. भारतीय अस्पृश्यतेसंबंधी इबेट्समन, सिर्नाट, रिस्ले व रसेल इत्यादी परकीय अभ्यासकांनी यापूर्वी शोध घेण्याचा प्रयत्न केला होता. भारतातील अनेक संशोधकांनी अस्पृश्यतेचा मागोवा आतापर्यंत घेतलेला दिसतो. त्यामध्ये पहिले भारतीय संशोधक म्हणून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा गौरवाने उल्लेख करावा लागतो. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे हे संशोधन मुंबई येथे १८ ऑक्टोबर १९०६ रोजी स्थापन केलेली भारतीय निराश्रीत साहयकारी मंडळ(डिप्रेस्ड क्लास मिशन सोसायटी ऑफ

इंडिया) ही संस्था पुढील अनेक संशोधक आणि कार्यकर्ते ज्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कार्य केले त्या व्यक्तींची मुलस्त्रोत ठरली. मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक आणि विचारवंत यांचे अस्पृश्यता निवारण मंडळ आणि त्यांचा 'अस्पृश्यतेचा प्रश्न' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ यापाठीमागे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची प्रेरणा व आदर्श होता. हे माटे यांनी आपल्या 'चित्रपट' या आत्मचरित्रात नोंदवून ठेवले आहे.

अस्पृश्यता निवारणाचे कार्य हे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि राजर्षी शाहू महाराज यांच्यामधील महत्त्वाचा दुवा होता. भारतातील ७०० संस्थानिकापैकी फक्त दोन चारच संस्थानिक अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात मनोभावे गुंतलेले दिसतात. त्यामध्ये कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज हे होत. त्यांचा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी जवळचे संबंध होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात शाहू महाराजांचा सक्रिय पाठिंबा होता. डिप्रेस्ड क्लास मिशनच्या मदतीकरीता मिस व्हायोलेट क्लार्क या गव्हर्नर क्लार्क यांच्या मुलीच्या गाण्याचा जो जलसा होणार होता. त्या जलशासाठी राजर्षी शाहू महाराजांनी २०० रूपये देणगी दिल्याचा उल्लेख महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'माझ्या आठवणी व अनुभव' या आत्मचरित्रात आहे.[१४]

राजर्षी शाहू महाराजांच्या अस्पृश्यता निवारण कार्याचा गौरवपूर्ण आढावा मोठया कौतुकाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे घेताना आढळतात. राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत जी अथक आणि प्रामाणिक धडपड केली त्याचे बहुसंख्य पुरावे त्यांच्या भाषणात आणि  इतर कागदपत्रातून मिळतात. माणगाव येथे अस्पृश्य वर्गाच्या परिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षेतखाली प्रमुख वक्ते या नात्याने २२ मार्च १९२० रोजी केलेल्या भाषात शाहू महाराजांनी 'आपण अस्पृश्य वर्गाकरीता जे थोडेफार प्रयत्न केले आहेत. ते एका लहानसा पुस्तक रूपाने बाबूराव यादव यांनी प्रसिद्ध केले आहेत.' असे स्पष्ट केले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डॉ.केतकरांच्या ज्ञानकोशात 'अस्पृश्यता निवारणाचा आधुनिक इतिहास' या नावाने जी विस्तृत नोंद केली आहे. त्या प्रकारचा नोंदीतील शाहू महाराजांच्या अस्पृश्यता कार्याबाबतचा कोणीही उल्लेख केलेला पाहावयास मिळत नाही. या लेखात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात की, 'नागपूर येथील भारतीय अस्पृश्य परिषदेचे  ते अध्यक्ष होते. ते दिल्ली येथील या परिषदेच्या अधिवेशनात मुद्दाम

हजर होते. त्यांच्या राज्यातच नव्हे तर त्यांच्या राजवाडयात अस्पृश्यांना सर्वत्र मुक्तद्वार असे. राजरोसपणे ते त्यांना पंक्तीला घेऊन जेवत असत. सर्व प्रकारच्या सरकारी नोकऱ्यांवर व सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना मज्जाव न करण्याचे फर्मान त्यांनी स्वतः शिंदेंना मोठया अभिमानाने दाखविले’ स्वतःच्या वाडयात राजर्षी शाहू महाराजांनी ५० अस्पृश्य विद्यार्थ्यांचे फुकट वसतिगृह आणि भोजनगृह काढले होते. अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्याविषयी दिलेली माहिती महत्त्वपूर्ण आहे. कारण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य करीत असताना केवळ स्वतःलाच नव्हे, तर आपल्या संपूर्ण कुटुंबाला या कार्यात गुंतविले होते.[१५]

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेची स्थापना केली. आजन्म या संस्थेचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या परंपरेतील काम केल्याचे दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी वेठबिगारीची पद्धत बंद केली होती. त्याप्रमाणेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मांग वसाहत करण्यासाठी फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते.[१६]

प्रार्थना समाज व ब्राम्हो समाजाचे कार्य करीत असताना संपूर्ण भारत पायी फिरल्यामुळे खेडेगावातील अस्पृश्य समाजाची अस्पृश्य समाजाची दयनीयता अनुभवण्यास मिळाली होती. भारतीय समाज आणि समाजव्यवस्था समजून घेतली होती. याचवेळी त्यांनी अस्पृश्यतेचे मूळ शोधण्याचे ठरविले. केवळ वर्णव्यवस्थेच्या काल्पनिक धोरणावरून समकालीन अस्पृश्यतेची उत्पत्ती लावत न बसता तिचे ग्रामव्यवस्थेशी असलेले नाते, धार्मिक ताणतणावाचे त्या अमानुष प्रथेला मिळालेले योगदान, समाजाने हीन मानलेल्या या जातींच्या पुर्वसंचिताची चिकित्सा, अस्पृश्यतेच्या प्रथेचा विकासक्रम, ग्रंथामधून करण्यात आलेले वर्णन इत्यादी सर्व गोष्टीमधून अस्पृश्यतेचा जन्म शोधण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर सातत्याने वेगवेगळया सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळीमध्ये भाग घेऊन भारतीय लोकांच्या जीवनामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारणासाठी उभी केलेली डिप्रेस्ड क्लास मिशनची चळवळ ही त्यातील सर्वात मोठी चळवळ होती व ते शिंदे यांचे जिवितकार्य ठरले.[१७]

राजर्षी शाहू महाराज हे नुसतेच बोलके समाज सुधारक नव्हते तर त्यांनी प्रत्यक्ष कृती करून अस्पृश्यांच्या सुधारणा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासाठी त्यांनी अस्पृश्यांना संस्थानच्या नोकरीत सहभागी करून घेतले. प्रगतीची संधी देऊन व सामाजिक प्रतिष्ठा देण्यास सुरूवात केली. महार समाजातील काहींना माहूत म्हणून कामावर घेतले. 'राजर्षी शाहू महाराजांनी आपली बहीण राजकन्या चंद्रप्रभाबाई यांचा विवाह तुकोजीराव होळकर(इंदूर) यांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी करण्याचे योजले होते. मराठा राजघराणातील कन्या पाऊणशे वर्षापूर्वी धनगर घराण्यात देणे हे मोठे क्रांतिकारी पाऊल होते. आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या विवाह सोहळयाच्यावेळी वरातीत सरकारी घोडागाडीवर अस्पृश्य व्यक्तीला कोचमन म्हणून बसविले. तसेच बलुतेदाराची व वेठबिगाराची पद्धत कायद्याने बंद केली. गंगाराम कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापूरात मध्यवस्तीत चहाचे दुकान काढून दिले. अशा प्रकारच्या अनेक समाज सुधारणा करून राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाबरोबरच महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारण चळवळ तेवत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले.[१८]

## ६.८ शेतकऱ्याविषयीचे कार्य

शेतकरी वर्गाची हलाखीची स्थिती कशी सुधारावी हा एक विठ्ठल रामजी शिंदे यांच्या काळातील प्रमुख विषय बनला होता. इ.स.१९२६ ते १९३२ या कालखंडात शेतकऱ्यांच्या सभा भरवून, परिषदामध्ये भाषणे करून त्यांच्यामध्ये जागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले होते. ते स्वतः शेतकरी वर्गातील होते. जमखंडी येथे गरीब शेतकऱ्यांची स्थिती किती हलाखीची असते. याचे त्यांनी लहानपणी निरीक्षण व अनुभव घेतला होता. शेतकरी वर्गाबद्दल आस्था असल्याने ते युरोपला गेले असता इंग्लंड, फ्रान्स व स्वित्झर्लंडमधील शेतकरी वर्गाची स्थिती कशी आहे, याचे त्यांनी निरीक्षण केले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर सातत्याने वेगवेगळया सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळीमध्ये भाग घेऊन भारतीय लोकांच्या जीवनामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. शेतकरी चळवळीत भाग घेऊन त्यात नवे राजकीय विचार आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेतकरी हा एक समग्र समाजघटक नसून त्यात वर्गीय विभाजन होत आहे, हे त्यांनी जाणले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे केवळ एकाच गोष्टीवर किंवा एकाच

सुधारणेवर भर देणारे सुधारक नव्हते. तर ते जीवनाकडे समग्र दृष्टिकोणातून पाहात होते, हे त्यांच्या शेतकरी चळवळीवरून आपल्या लक्षात येते. देशी संस्थानिकांच्या अन्यायाखाली दबलेल्या शेतकऱ्यांना एकत्र करून संघटना बांधण्याचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या चळवळीमध्ये हा जो मनःपूर्वक सहभाग घेतला आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या हिताबद्दल त्यांना असलेली आंतरिक तळमळ दिसून येते. सरकारी साऱ्यात शेतकऱ्याला सूट व तहकुबी द्यावी, जमीनदारांच्या खंडाबाबतही अशीच भूमिका स्वीकारावी व सावकारांचा व्याजाचा दर याच न्यायाने कमी करावा. याविषयी प्रयत्न केले. सांगली संस्थानातील तेरदाळ येथील परिषदेप्रमाणे भोर संस्थानतील, वाळवा तालुका व चांदवड तालुका येथील शेतकरी परिषदामध्ये म.विठ्ठल रामजी शिंदे यांनी सहभाग घेतला होता. भोर परिषेदत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे अध्यक्ष होते. तर वाळवे येथील शेतकरी परिषदेचा विशेष म्हणजे या परिषदेत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भांडवलशाहीची चर्चा करून तिचा आपल्या चळवळीशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे.[१९]

राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्याविषयी कार्य करताना शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. कारण त्याकाळात शेतकऱ्यांना शेती पिकविण्यासाठी पावसावर अवलंबून राहावे लागत होते. दुष्काळामुळे त्यांची अवस्था बिकट होत होती. जरी पाऊस वेळेवर पडला आणि पीक चांगले आले असेल तरी व्यापारी आणि सावकार हे शेतकऱ्यांना लुबाडत असत. म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी त्यावर उपाययोजना करण्याचे ठरविले.

राजर्षी शाहू महाराजांनी शेतीमालाला रास्त भाव मिळावा, यादृष्टीने शेतीमालावर आधारित असा एक उद्योग कोल्हापूरात काढावयाचा त्यांनी ठरविले. त्यादृष्टीने त्यांनी स्पिनींग अँड वीव्हिंग मिल १७ सप्टेंबर १९०६ रोजी कोल्हापूर येथे सुरू केला. त्याचे नाव 'शाहू मिल' असे ठेवले. ही भारतातील सरकारी क्षेत्रातील पहिला उद्योग होय किंवा पहिली गिरणी होय. हा उद्योग व्यवस्थित चालावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी ही कापड गिरणी दरबारामार्फत चालविली. त्यामुळे या गिरणीत पुरेशे भांडवल व उत्तम व्यवस्थापन करून चांगल्या प्रकारे चालण्यास मदत झाली. अशाप्रकारे शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या मालाचा प्रश्न

सोडविण्यासाठी व व्यापाऱ्याच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी हा धाडशी निर्णय घेऊन तो यशस्वी केला. यातच या राजाचे मोठेपण दिसून येते.[२०]

राजर्षी शाहू महाराजांनी ध्येयवादी दृष्टिकोनातून नियोजनपूर्वक केलेल्या बहुविध सर्वकष सुधारणामुळे कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे परिणाम झाले. विशेषतः शेती आणि कृषी औद्योगिक धोरणामुळे फक्त कोल्हापूर संस्थानावरच परिणाम झाला असे नाही, तर त्याचा प्रभाव महाराष्ट्रावर झाला. हिंदुस्थान कृषीप्रधान देश आहे. शेती हा मुख्य व्यवसाय आहे. ज्यांना देशाचा विकास करावयाचा आहे त्यांनी आपली शेती प्रथम सुधारली पाहिजे. इतर देशाच्या तुलनेने भारताचे सरासरी उत्पन्न फारच कमी आहे. हे वाढविण्यासाठी पुष्कळ करता येण्यासारखे आहे. सुधारीत व आधुनिक शेतीचा पुरस्कार सर्वांनी केला पाहिजे. यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. त्यासाठी वनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करणे, कृषी शिक्षणाला महत्त्व देणे, सहकार, कृषी उत्पन्नावर आधारीत उद्योग व्यापार, शेतकरी सहकारी पतपेढया यांचा विस्तार करणे, विहिरी खणण्यासाठी व सुधारलेल्या औजारासाठी शेतकऱ्यांना बिनव्याजी आणि स्वस्त दराने कर्ज पुरवठा करणे, दुष्काळात कायम पाणीपुरवठा व्हावा, पिण्याचे पाणी व बागायती शेती वाढावी म्हणून लहान–मोठया पाटबंधाऱ्यांच्या योजना तयार करून त्यांची कार्यवाही करणे.

अशा प्रकारची पंचसूत्री योजना शाहू महाराजांनी आखून घेतली होती. ब्रिटिश व इतर संस्थानात शेती सुधारणेसंबंधी कसलेही धोरण अस्तित्त्वात नव्हते. शाहू महाराजांनी शेती सुधारणेला बहुजन विकासवादाची जोड दिली. हे त्यांच्या धोरणाचे वेगळेपण आपणास दिसून येते.[२१]

शेतकरी अवर्षणाच्या संकटापासून मुक्त झाल्याशिवाय त्याची प्रगती होणार नाही. त्यावर उपाय म्हणून शेतीला बारमाही पाणीपुरवठा व्हावा, यादृष्टीने मोठा धरण प्रकल्प आणि कालवे, पाटबंधारे योजना राजर्षी शाहू महाराजांनी आखली. जून ते ऑगष्ट १९०२ अखेर तीन–चार महिने राजर्षी शाहू महाराजांनी इंग्लड व युरोपीय देशाचा दौरा केला. त्यावेळी अनेक ठिकाणी प्रचंड तलाव व कालव्यांचे जाळे पसरलेले त्यांनी पाहिले. युरोपीय लोकांच्या सुखी व समृद्ध जीवनाची गुरूकिल्ली त्यांना सापडली आणि ते प्रभावीत झाले. जनतेला दुष्काळाच्या छायेतून सोडविण्यासाठी आणि शेतकऱ्यास सुख–समृद्धीच्या मार्गावर नेण्यासाठी राजर्षी शाहू

महाराजांनी धरण बांधण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पडणारा प्रचंड आर्थिक खर्च घेण्याचाही निर्धार त्यांनी केला.[२२]

सन १८९६ मध्ये कोल्हापूर राज्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळात जनतेला धान्यपुरवठा करताना राजर्षी शाहू महाराजांना खूप कटू अनुभव आला होता. म्हणूनच महाराजांनी असे ठरविले की, अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी मोठी कालवे योजना हाती घेण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. त्यासाठी त्यांनी कालवे योजना हाती घेतली. त्यासाठी त्यांनी कोल्हापूर राज्यातून वाहणाऱ्या नद्यांचा सर्व्हे करून त्यादृष्टीने कालवे योजना अमलात आणली.

भोगावती नदीवर २६०० फूट लांबीचे व ११० फूट उंचीचे धरण बांधण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी जागा निवडली. या धरणाखाली वीस हजार एकर जमीन ओलिताखाली आणता येईल असे नियोजन केले. तसेच खर्चही तीस लाखापर्यंत येणार होता. दाजीपूरजवळील फेजिवडे येथे भोगावती नदीवर धरण बांधले. धरणामुळे होणाऱ्या जलाशयाला 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव'. नाव देण्यात आले.[२३]

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात शेतकऱ्यांसाठी फार मोठे कार्य केले होते. या धरण प्रकल्पाने हरितक्रांती झाली, कोल्हापूर राज्याचा कायापालट झाला. शेतकरी वर्गाला सुखी व समृद्ध जीवनाचा मार्ग मिळाला. शेतकऱ्यांची फार मोठया संकटातून सुटका केली होती. त्यामुळेच शेतकरी हा सावकार व व्यापारी यांच्या कचाटयातून सुटला होता. तसेच दुष्काळातून शेतकऱ्याची सुटका व्हावी, त्याला शेतीसाठी बारमाही पाणीपुरवठा व्हावा, यादृष्टीने कालवे व धरण योजना अमलात आणून कोल्हापूर राज्यात हरितक्रांती घडवून आणण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले होते.

## ६.९ क्षात्रजगद्गुरूपदाला विरोध

शाहू महाराजांनी सुरूवातीपासूनच जातिभेदाला विरोध करून समाजाभिमुख धोरणाचा स्वीकार केलेला होता. सनातनी प्रवृत्तीचा स्वीकार करून समाजातील आपले स्थान टिकविण्याचा प्रयत्न करणाऱ्या ब्राम्हणांना हे मान्य होण्यासारखे नव्हते. महाराजांचे धोरण सामाजिक समता व देशोन्नतीस उपयुक्त असले तरी, अज्ञानी व अंधश्रद्धा समाजावर निरनिराळी बंधने ठेवून आपले वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या ब्राम्हणांच्या प्रवृत्तीला हे धोरण

मान्य होणारे नव्हते. अधिकारग्रहण केल्यानंतर महाराजांना जाणवले की, संस्थानच्या राज्यकारभारात ब्राम्हण किंवा उच्च जातीच्या व्यक्तींचे प्रमाण अधिक होते. बहूजन समाजाचे प्रमाण अतिशय अल्प होते. त्यामुळे सन १८९४ पासूनच त्यांनी अब्राम्हणांना नोकऱ्या देण्यास सुरूवात केली. अब्राम्हणाला प्रतिष्ठेची नोकरी म्हणजे आपले आर्थिक नुकसान व सामाजिक समता निर्माण करण्याच्या प्रयत्नांना विरोध केला. प्राचीन काळापासून समाजातील इतर जातींच्या हिताची पर्वा न करता केवळ आपले कल्याण साधण्याची ही ब्राम्हण प्रवृत्ती आधुनिक काळाच्या संदर्भात प्रतिगामी आहे. असे महाराजांना वाटू लागले. त्यामुळेच पुढील काळात या दोन भिन्न प्रवृत्तीमध्ये संघर्ष होणे अटळ होते. राजर्षी शाहू महाराज म्हणतात की, ब्राम्हणांची कारस्थाने कधी बंद होणार नाहीत असे मला वाटते. धर्माच्या बाबतीत उत्पन्न झालेल्या मतभेदांची ब्राम्हणांना विशेष दिक्कत वाटत नाही. परंतु मागासलेल्या वर्गांना पुढे आणण्याचे माझे धोरण मात्र पुष्कळ ब्राम्हणांना आवडत नाही, हीच गोष्ट खरी असावी. कालचक्राच्या फेऱ्यामुळे जी नवीन परिस्थिती निर्माण झाली होती. तिला तोंड देणे त्यांना क्रमप्राप्त आहे. अशा या परिस्थितीतच वेदोक्त प्रकरणाची भर पडली. महाराष्ट्राच्या सर्व सामाजिक जीवनाला वेगळे वळण देण्याला व इतिहासाला कलाटणी देण्याला समर्थ ठरली असे दिसते. या वेदोक्त प्रकरणाने त्या काळात महाराष्ट्रात खळबळ निर्माण केली.[२४]

राजर्षी शाहू महाराजांच्या बाबतीत जे वेदोक्त प्रकरण उद्‌भवले होते. त्या प्रकरणात राजर्षी शाहू महाराजांना निर्विवाद विजय मिळाला होता. तरीही राजर्षी शाहू महाराजांना सनातनी हिंदू धर्मपीठांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी मराठयांकरीता वेगळे धर्मपीठ निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. त्यामधूनच त्यांनी १२ ऑक्टोबर १९२० रोजी गारगोटीजवळ पाटगावच्या मौनी महाराज यांच्या गादीवर सदाशिवराव लक्ष्मण पाटील बेनाडीकर या संस्कृत व तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी असलेल्या तरूणाची क्षात्रजगद्‌गुरू म्हणून नेमणूक केली.

परमेश्वर आणि धर्म या दोन संकल्पनांवर पूर्ण विश्वास असणाऱ्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना देव आणि मानव यामध्ये कोणी मध्यस्थ असणे ही कल्पना पूर्णपणे मान्य नव्हती. त्यामुळेच ते शाहू छत्रपतींनी निर्माण केलेल्या क्षात्रजगद्‌गुरूपदाला जाहीरपणे विरोध करीत होते. सत्ता आणि संपत्ती यांच्या मोहात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे कधीच गुरफटलेले दिसत नाहीत. त्यामुळेच ते 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणारच' अशीच भूमिका

निर्भयपणे घेत होते. अर्थातच क्षात्रजगद्गुरूपदाबाबत त्यांनी आपल्या लेखनांतून, भाषणातून राजर्षी शाहू महाराजांच्या विरोधी भूमिका घेतली. त्याचे प्रतिकूल परिणाम त्यांना भोगावे लागलेले दिसतात.[२५]

सन १९२० मध्ये माँटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा अहवालाप्रमाणे नोव्हेंबर महिन्यात पहिली निवडणूक होणार होती. या निवडणुकीत मराठयांसाठी ७ जागा राखीव होत्या त्यामधूनच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी उभे राहावे असे त्यांच्या चाहत्यांना वाट होते. परंतु मराठा–ब्राम्हणेत्तर समाजाने काँग्रेस राष्ट्रीय प्रवाहापासून वेगळी करणे महर्षी शिंदे यांना मान्य नव्हते. या निवडणूकीत पुणे शहरातून सर्वसाधारण जागेसाठी महर्षी शिंदे उभे होते. तर जहाल पक्षाचे उमेदवार न.चि.केळकर होते. याखेरीज मवाळतर्फे शेठ मानूरकर आणि स्वतंत्र उमेदवार म्हणून वासुदेवराव गुप्ते उभे होते. त्यांना शाहू महाराजांचा पाठिंबा होता. परंतु न.चि.केळकर यांनी एका सभेत आपण 'मराठा' पत्राचे संपादक असल्यामुळे मराठाच आहोत, असे विधान केले. न.चि.केळकर यांच्या या विधानाची राजर्षी शाहू महाराजांनी टर उडविली. महर्षींना २१ ऑगस्ट १९२० रोजी पाठविलेल्या पत्रात शाहू लिहितात, 'माझ्या घोडयाचे नाव टर्किश फ्लॅग ठेवले. माझ्या गाईच नाव जपान ठेवले म्हणून मी जपानी अगर तुर्की लोकांचा पुढारी होणे योग्य होईल?' त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी राजर्षी शाहू महाराजांनी आणखी एक पत्र विठ्ठल रामजी शिंदे यांना पाठवून त्यांना निवडणुकीत पुर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु शाहू महाराजांनी दिलेले आश्वासन पाळलेले दिसत नाही. कारण ३ ऑक्टोबर १९२० रोजी पुण्यात भवानी पेठेत धर्मशाळेच्या आवारात शिवाजी मराठा शाळेची जी जाहीर सभा झाली त्या सभेचे राजर्षी शाहू महाराज अध्यक्ष होते. या सभेत विठ्ठल रामजी शिंदे यांना बोलण्याचा आग्रह झाला. त्यांनी आपल्या भाषणात क्षात्रजगद्गुरूपदाला विरोध केला. याचा गैरफायदा सभेला हजर असणाऱ्या टिळकपंथीय श्रोत्यांनी घेऊन राजर्षी शाहू महाराजांची सभा उधळून लावली. परिणामी राजर्षी शाहू महाराजांनी महर्षी शिंदे यांना निवडणूकीत दिलेला पाठिंबा काढून घेतला. अर्थातच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा या निवडणूकीत दारूण पराभव झाला. या निवडणूकीत राजर्षी शाहू महाराजांचा पुन्हा पाठिंबा लाभलेले वासुदेव गुप्ते विजयी झाले.[२६]

## ६.१० महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्यातील स्नेहाचे संबंध–

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी क्षात्रजगद्‌गुरूपदास विरोध केला होता यावरून राजर्षी शाहू महाराजांशी त्यांचे मैत्रीचे संबंध संपुष्टात आलेले दिसत नाहीत. तर या दोघातील स्नेहाचे संबंध मृत्युपर्यत टिकून राहिलेले दिसून येतात. कारण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यातील ‘संशोधक’ हा राजर्षी शाहू महाराजांना नेहमीच प्रभावीत करीत होता. म्हणूनच ते एका पत्रात त्यांना शिवचरित्र लिहिण्याची विनंती करताना दिसतात. तर १७ जुलै १९२१ रोजी महर्षीना पाठविलेल्या पत्रात ते महर्षी शिंदे यांना कोल्हापूरात येण्याची विनंती करतात. याच पत्रात ते कोल्हापूर म्युनिसिपालिटीचा चेअरमन अस्पृश्य जातीतील नेमल्याचे ते कौतुकाने सांगतात.[२७]

## ६.११ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांचा केलेला गौरव

राजर्षी शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर महर्षी शिंदे यांचा राजर्षी शाहू महाराजांचे चिंरजीव राजाराम महाराज यांच्याशी पत्रव्यवहार सुरू होता. त्यात राजर्षी शाहू महाराजांच्याविषयी गौरवोद्‌गार काढलेले दिसते. २४ मे १९२२ रोजी राजाराम महाराजांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात की, ‘ श्रीमन्महाराज श्री शाहू महाराजांच्या अत्यंत आकस्मित व अकाली निधनामुळे आमच्या मिशनला व विशेषतः मला स्वतःला दुःख वाटत आहे. गेल्या वीस वर्षात त्यांचा आणि माझा जो परिचय झाला आणि त्यातल्यात्यात अस्पृश्य वर्गाच्या उद्धाराच्या कामी महाराजांनी जो पुढाकार घेतला. तो स्मरून तर माझे व्यक्तिविषयक आणि कधीही न भरून येण्यासारखे नुकसान झाले आहे. त्याचे आम्ही नम्र वाटेकरी आहोत. जास्त लिहिण्यास मला शब्दच सुचत नाही.’ तर एप्रिल १९२३ च्या महर्षी शिंदे यांनी राजाराम महाराजांना पाठविलेल्या पत्रात शाहू महाराजांची आपण (महर्षी) यांनी शिवचरित्र लिहिणे अशी खूप इच्छा होती, याची आठवण करुन देतात. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना शाहू महाराजांच्या कार्याबद्दल नेहमीच आदर वाटत होता. म्हणूनच ते ज्ञानकोशात शाहू महाराजांच्या अस्पृश्यता निवारण कार्याचा मनःपूर्वक मागोवा घेतात. इतकेच नव्हे, तर शाहू महाराजाना स्वराज्यद्रोही ठरविणाऱ्या त्यांच्या विरोधकांना ते ठणकावून सांगतात. १९२८ मध्ये महर्षी शिंदे लिहितात, ‘शाहूराजा नुसता मराठा नव्हता, ब्राम्हणेतरही नव्हता. तो नवयुगातील सर्वागपूर्ण राष्ट्रपुरूष होता, तो परकियांची नांगी ओळखून होता, ही गोष्ट ज्यांनी त्यांच्याशी गुजगोष्टी केल्या त्यांना सांगणे नको. ते हाडाचे मराठा असल्याने जो गनिमी कावा त्यांच्या वर्तनात उघड चमकू लागला, हा कावा त्यांनी

पत्करला नसता, तर महाराष्ट्राच्या जनतेला जागे करून तिला तिच्या पायावर उभी करण्याचे काम त्यांच्या हातून झाले नसते शाहू जरी आता पडद्याबाहेर पडले होते, तरी त्यांनी कधी कोणाला सामना दिला नाही. पण प्रत्येकाच्या बगलेतील हाडे त्यांना न कळत त्या राष्ट्रसेवकाने हसतहसत खिळखिळी करून टाकली.'[२८]

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना राजर्षी शाहू महाराजांच्याविषयी फार आदर होता, हे स्पष्ट होते. या दोघांची वैचारीक जडणघडण एकसारखी होती. एवढेच नव्हेतर या दोघांच्यामधील कार्य करण्याची प्रगल्भताही एकसारखी असलेली दिसून येते. या दोघांनी अस्पृश्यांच्या, स्त्रियांच्या व मागासलेल्या लोकांच्या उद्धारासाठी फार मोठे कार्य केलेले दिसून येते. एक राजा असूनही राजर्षी शाहू महाराजांनी सामान्य जनतेसाठी केलेले हे कार्य बहुमोल होते. शेवटी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनीही त्यांच्या या कार्याचा गौरव केलला दिसून येतो.

## ६.१२ मुरळी व देवदासी पद्धतीस प्रतिबंध घालण्याचा प्रयत्नः-

मुरळी पद्धतीस प्रतिबंधक घालण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांनी जोरदार प्रयत्न केला. कर्मवीर शिंदे यांनी या कार्यास जमखंडीपासून सुरूवात केली होती. तेथील एक दहा वर्षाची महार जातीतील मुलगी शिक्षण घेत असताना तिला मुरळी म्हणून सोडण्यात आले होते. तेव्हा त्या मुलीच्या आई-वडिलांना त्या मुलीचा मुरळीचा व्यवसाय सोडण्यास सांगून व शिक्षणाची व्यवस्था करण्यास सांगितले. तसेच येथून पुढे या मुलीला मुरळीचा व्यवसाय करावयास लावू नका, अशी ताकीद दिली. या जमखंडीच्या प्रकारानंतर मिशनच्या प्रयत्नाने सन १९१० मध्ये पुणे जिल्हयातील जेजुरीच्या यात्रेत मुरळी प्रतिबंध सभा भरविली. मुरळी सोडण्याचे व तिचा धार्मिक विधी करण्याचे स्थळ म्हणजे जेजुरी येथील खंडेरायाचे मंदिर होय. तेथील मुरळी प्रथा बंद व्हावी, यासाठी मुरळी प्रतिबंध चळवळ सुरू केली होती. या चळवळीला प्रत्यक्ष कृतीचे स्वरूप देण्यासाठी त्यांनी मुंबई येथे 'निराश्रीत बाल संरक्षक मंडळी' या संबंधीचे कार्य संस्था करीत होती, त्या संस्थेस सहकार्य केले. या चळवळीचे वैशिष्टये म्हणजे ही सामान्य स्तरातील मंडळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रेरणेने या मुरळयांशी स्वतः लग्न करून त्यांना या रूढीच्या गाळांतून बाहेर काढण्याचे काम करीत होते.[२९]

भारतीय समाजव्यवस्थेने स्त्रीस अत्यंत हीन दर्जाची वागणूक दिली. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू असा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. खालच्या जातीतील मुली व मुले देवाला सोडण्याचा प्रघात होता. त्यामुळे जोगता, जोगतीन, देवदासी, मुरळी इत्यादी वर्ग तयार होत असत. जोगतीन, देवदासी, मुरळी या स्त्रियांच्या त्यांच्या घरातील संपत्तीवर कोणताच अधिकार राहत नसे. देवस्थानात परंपरेने तिला हक्क मिळत, परंतु तो हक्क आणि दर्जा हीन असे. यास तरीही समाज मान्यता होती. राजर्षी शाहू महाराजांनी त्यास पायबंद घालण्यासाठी 'जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा' केला. अशा स्त्रियांना जनक आई बापाच्या मिळकतीत वारसा हक्काने अधिकार प्राप्त करून दिले. देवदासी प्रथा उखडून टाकण्याचे प्रयत्न केले.[३०]

अशाप्रकारे देवदासी व मुरळी ही प्रथा नष्ट व्हावी, या उद्देशाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांनी मोठे प्रयत्न केले होते. तेव्हा ही प्रथा त्या कालखंडात समूळ नष्ट जरी झाली नसली तरी राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केलेल्या या कायद्यास महत्त्वाचे स्थान आहे. अशाप्रकारे देवदासी किंवा मुरळीच्या मुक्तीच्या किंवा एकूणच स्त्रीमुक्तीच्या चळवळीतील कार्यकर्त्यानी चांगल्या प्रकारे कार्य करून त्या कामामध्ये यशही मिळविले होते.

### ६.१३ सांस्कृतिक जीवनात सुधारणा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी समाजात सुरू असलेल्या वाईट प्रथा बंद करण्यासाठी मोठया प्रमाणात कार्य केले होते. त्याचप्रमाणे शाहू महाराजांनीही असे कार्य केलेले दिसून येते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रीशिक्षण, होलिका उत्सव, मद्यपान बंदी, मुरळी प्रथा या विषयावरही चळवळी करून आपले सांस्कृतिक जीवन जास्त शुद्ध आणि आनंददायी करण्याचा प्रयत्न केला. मद्यपानामुळे समाजाच्या नैतिकतेचा ऱ्हास होतो. पण त्याचे काही आर्थिक पैलू आहेत. हे त्यांनी ओळखले होते. होळीचा सण हा खरे तर निरामय आनंदाचा सण पण त्यात बीभत्सपणा निर्माण झाला आहे. तो दूर करून त्यात शुद्ध आनंद देणारा सांस्कृतिक आशय समाविष्ट करावा असे शिंदे यांचे सांगणे होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे केवळ एकाच गोष्टीवर किंवा एकाच सुधारणेवर भर देणारे सुधारक नव्हते. तर ते जीवनाकडे समग्र दृष्टिकोणातून पहात होते, हे त्यांच्या वेगवेगळया चळवळीवरून आपल्या लक्षात येईल.[३१]

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक सुधारणाबरोबरच स्त्री उन्नतीसाठी अनेक कायदे केले. न्या.रानडे, लोकहितवादी, लोकमान्य टिळक यांच्या तुलनेत राजर्षी शाहू महाराज हे कर्ते सुधारक ठरतात. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाचे समर्थन करून न थांबता राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कुटुंबात तसा विवाह करण्याचे धाडस केले. विवाहाचे वय, शारीरिक सक्षमता, यांचा विचार करून बालविवाह थांबविले. मुलींच्या शिक्षणाचा विचार करून स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले. राजाराम कॉलेजमध्ये मुलींना फी माफ केली होती. वारसाहक्क, घटस्फोटाचे हक्क, परंपरेने स्त्रीला नाकारले. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी असे हक्क बहाल करणारा कायदा केला. व स्त्रीमुक्ती स्त्रीदास्य अंतास हातभार लावला. विधवा पुनर्विवाह करण्याचे धाडस करून त्यासही कायदेशीरपणा प्राप्त करून दिला.[३२]

**मान्यवरांच्या घेतलेल्या मुलाखती व भेटी दिलेल्या संस्था :–**

मौखिक व क्षेत्रिय कार्यामधून राजर्षी शाहू महाराज व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे मूल्यमापन. या समाजसुधारकांचा आदर्श डोळयासमोर ठेवून आजही वंचितांच्या शिक्षणाचा विचार आणि व्यवहार या संस्थानामध्ये दिसून येतो. वसतिगृहे, मोफत वहया, गणवेश वाटप, पोषण, पोषक आहार यासारख्या सुविधा काळजीपूर्वक पुरविल्या जातात. या संस्थामधील हे समाजसुधारणेच्या कार्याचा गौरव तेथील कर्मचाऱ्यांना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आला आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केली. ही संस्था स्थापनेचा उद्देश तळागाळातील मागासवर्गीयांना शिक्षणाची संधी मिळणे हा होय. आज या संस्थेत आर्थिक निकषावर आधारित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. येथील विद्यार्थ्यांना कपडे, मोफत वहया, पुस्तके पुरविली जातात. आज या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे वसतिगृह नानापेठ पुणे येथे करण्यात आली आहे. या संस्थेत प्रवेश घेणारे विद्यार्थी हे डहाणू, ठाणे, परभणी, नाना पेठेतील काशेबोर्ड, आंबेडकरनगर येथील आहेत. शासनामार्फत येथील विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके व पोषण आहार पुरविला जातो. आजपर्यंत या संस्थेतील विद्यार्थी हे क्रीडाक्षेत्र, वकील, राजकारणी व समाजसेवक बनलेले दिसून येतात. या संस्थेच्या शाखा आदमबाग, आवळे, जांबूत, वडगहळ, शिंदे रानमळा, साकीरवाडी इत्यादी ठिकाणी आहेत. या संस्थेमार्फत पुणे येथील नानापेठेत महात्मा फुले

मुलींची प्रशाला सुरू करण्यात आलेली आहे. महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी संस्थेने विविध कोर्स सुरू केलेले आहेत. हे कोर्स किमान कौशल्यावर आधारीत आहेत. महिलांना वेगवेगळया क्षेत्रात कार्य करण्यासाठी पाठविले जाते. शेतकऱ्यासाठी ही संस्था दरवर्षी दुष्काळग्रस्तासाठी मदत करते. नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी ही संस्था पाणी बचत, बी–बियाणे पुरवठा व पशुसंवर्धन इत्यादीसाठी उपाययोजना केल्या जातात.[३३]

डिप्रेस्ड क्लास मिशन या संस्थेची स्थापना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य वर्गाना शिक्षण देण्यासाठी केली होती. या संस्थेच्या देशभर शाखा आहेत. आज संस्थेत अस्पृश्याबरोबर इतर विद्यार्थ्यांना आर्थिकतेच्या अटीवर प्रवेश दिला जातो. या संस्थेत विद्यार्थ्याच्या राहण्याची चांगली सोय करण्यात आलेली आहे. तेथे प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आहे. शासनाकडून विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पोषण आहार ही मदत पुरविली जाते. संस्थेपुढील ध्येय व उद्दिष्टे हे वंचित घटकाला शैक्षणिक प्रवाहात आणणे हे आहे. संस्थापातळीवर बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो. या संस्थेमार्फत स्त्रियांचा सामाजिक स्तरही उंचावलेला दिसून येतो. त्यासाठी स्त्रियांना नोकरीत सामावून घेतले जाते. तसेच संस्थेच्या कारभारात स्त्रियांना सहभागी करून घेतले जाते. संस्थेमार्फत स्त्रियांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी परदेशी दौरेही आयोजित केले जातात. संस्थेमार्फत शेतकऱ्यांच्या विकासासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले जातात. संस्थेकडून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशिक्षण व आर्थिक मदत दिली जाते.[३४]

डिप्रेस्ड क्लास मिशन या संस्थेची स्थापना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य, मागास व वंचित वर्गाना शिक्षण देण्यासाठी केली आहे. या संस्थेच्या देशभर शाखा आहेत. या संस्थेत अस्पृश्य समाजासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक कार्य केले जाते. आज संस्थेत अनुसुचित जमाती, अनुसुचित जाती, ओबीसी व इतर सर्व विद्यार्थ्यांना आर्थिक निकषावर आधारित प्रवेश दिला जातो. या संस्थेत विद्यार्थ्याच्या राहण्याची चांगली सोय करण्यात आलेली आहे. तेथे प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आहे. शासनाकडून विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पोषण आहार ही मदत पुरविली जाते. या संस्थेत पुणे, ठाणे, अकोले, नंदुरबार येथील विद्यार्थी प्रवेश घेतात. संस्थेपुढील ध्येय व उद्दिष्टे हे वंचित घटकाला शैक्षणिक प्रवाहात

आणणे, विद्यार्थ्यांचा सामाजिक स्तर उंचावणे, आर्थिक विकास साधणे, स्त्रियांच्या शैक्षणिक विकासास प्राधान्य देणे इ. आहे. संस्थापातळीवर बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो. या संस्थेमार्फत स्त्रियांचा सामाजिक स्तरही उंचावलेला दिसून येतो. त्यासाठी स्त्रियांना नोकरीत सामावून घेतले जाते. तसेच संस्थेच्या कारभारात स्त्रियांना सहभागी करून घेतले जाते. संस्थेमार्फत स्त्रियांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी परदेशी दौरेही आयोजित केले जातात. संस्थेमार्फत शेतकऱ्यांच्या विकासासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले जातात. संस्थेकडून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशिक्षण व आर्थिक मदत दिले जाते.[३५]

**राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या वसतिगृहासंबंधी घेतलेल्या मुलाखतीतून मिळालेली माहिती**

दि मोहमेडन (मुस्लिम बोर्डिंग) कोल्हापूर या वस्तीगृहाची स्थापना १५ नोव्हेंबर १९०६ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आली होती. या वसातिगृहात आज ७८ मुले राहत आहेत. हे वसतिगृह स्थापन करण्याचा उद्देश हा की बहुजन समाजासाठी शिक्षणाची गरज पूर्ण करणे हा होता. त्यादृष्टीने आजही हे वसतिगृह सुरू आहे. या वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्यांमध्ये सर्वधर्मीय समाजातील मुलांचा समावेश होत असे. या वसतिगृहातील मुलांना कॉट, फॅन, पाणी व स्नेहसंमेलन व ग्रंथालय व्यवस्था आहे. याशिवाय शैक्षणिक दृष्टीने एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. अभ्यासिका केंद्र, ग्रंथालय व्यवस्था उपलब्ध केलेली आहे. खेळाच्या साहित्यामध्ये फूटबॉल, कॅरम, बुद्धीबळ इत्यादीचा समावेश होता. या वसतिगृहामार्फत विद्यार्थ्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी व्याख्याने, प्रबोधनवर्ग आयोजित केले जातात. राजर्षी शाहू महाराजांची वसतिगृहाबाबतची संकल्पनाही मुस्लिम समाजातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा आहे.[३६]

दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर या वसतिगृहाची स्थापना १९०१ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आली होती. या वसतिगृहात आज १५० मुले राहत आहेत. हे वसतिगृह स्थापन करण्याचा उद्देश हा की जैन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे हा होता. त्यादृष्टीने आजही हे वसतिगृह सुरू आहे. या वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्यांमध्ये सर्वसामान्य कुटुंबातील मुलांचा समावेश होत असे. मात्र या वसतिगृहामध्ये मेरिटनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश

दिला जातो. या वसतिगृहातील मुलांना सर्व व्यवस्था केली जाते. याशिवाय शैक्षणिकदृष्टीने स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी, प्रोत्साहनपर व्याख्याने आयोजन करणे, आय.पी.एस.स्पर्धेसाठी तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शनाचे आयोजन केले जात असत. तळागाळातील विद्यार्थ्याला वसतिगृहात राहून शिक्षणाची गोडी निर्माण केली आणि ती फलदायी ठरत आहे. ग्रंथालय व्यवस्था उपलब्ध केलेली आहे. या वसतिगृहामार्फत विद्यार्थ्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी नवा मार्ग स्वीकारून व्याख्याने, प्रबोधनवर्ग आयोजित केले जातात. राजर्षी शाहू महाराजांचे योगदान शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचावी, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत शिक्षण मिळावे यासाठी विचार केला होता. पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव भारतीयांवर पडून त्यांच्यात समाजजागृती झाली. त्यामुळे शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले होते.[३७]

श्री. इंदुमती विद्यार्थी वसतिगृह, कोल्हापूर या वसतिगृहाची स्थापना १ जानेवारी १९१९ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आली होती. या वसतिगृहात आज ६० मुले राहत आहेत. हे वसतिगृह स्थापन करण्याचा उद्देश हा की मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उन्नती करणे, हा होता. त्यादृष्टीने आजही हे वसतिगृह सुरू आहे. या वसतिगृहात प्रवेश हा शासकीय नियमानुसार होत असतो. या वसतीगृहास राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या ज्येष्ठ सूनेच्या नावाने सुरू केले आहे. याशिवाय शैक्षणिकदृष्टीने स्कॉलरशिप, वक्तृत्त्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन केले जात आहे. वसतिगृहातील मुलांना जेवणाचे साहित्य, अंथरून व पांघरून दिले जात असत. याशिवाय सामाजिक उपक्रमामध्ये निबंध वाचन, थोर पुरूषांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जात आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेले हे वसतिगृह निश्चितच करवीरनगरीची जननी मानले जाते. या वसतिगृहाची ध्येय धोरणे ही मागसवर्गीय मुलांची शैक्षणिक दर्जा उंचावणे, आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करण्यास मदत करणे व मार्गदर्शन करणे हे होय.[३८]

मिस क्लार्क होस्टेल, कोल्हापूर या वसतिगृहाची स्थापना १६ फेब्रुवारी १९०८ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आली होती. या वसतिगृहात आज ४८ मुले राहत असून हे वसतिगृह स्थापन करण्याचा उद्देश हा की बहुजन समाजातीला मुलांना शिक्षण घेता यावे, हा होता. त्यादृष्टीने आजही हे वसतिगृह सुरू आहे. या वसतिगृहात प्रवेश हा ज्या पालकाचे वार्षिक उत्पन्न कमी आहे. तो दारिद्र्यरेषेखालील असून शेतमजूर असणाऱ्या

पालकांच्या मुलांना या वसतिगृहात प्रवेश दिला जातो. इतर वसतिगृहाप्रमाणेच या वसतिगृहात सर्व सोयी व सुविधा पुरविल्या जात आहेत. या वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक वाढीसाठी विविध तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबरोबरच खेळाचे साहित्यही पुरविले जाते. त्यामध्ये विशेषतः बैठे खेळ व हॉलीबॉल याचे साहित्य पुरविले जाते. या वसतिगृहामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे जे सामाजिक योगदान होते. त्यामधून अनमोल, बहुजन समाजातील शैक्षणिक परिवर्तन घडून आले. या वसतिगृहास सामाजिक चळवळीचा वारसा आहे. पूर्वी सामाजिक चळवळीचे केंद्र म्हणून या वसतिगृहाकडे पाहिले जात होते. वसतिगृहातील मुलांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी स्पर्धा परीक्षा, गायन–वादन, कला गुणांना वाव देणे इत्यादीद्वारे प्रयत्न केले जातात. याशिवाय सर्वांगीण विकास व जादा तास घेऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जातात.[३९]

श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राम्हण विद्यार्थी वसतिगृह, दसरा चौक, कोल्हापूर या वसतिगृहाची स्थापना २० मे १९१५ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आली होती. या वसतिगृहास राजर्षी शाहू महाराजांनी जागा दिली होती. या वसतिगृहात आज १०६ मुले राहत आहेत. हे वसतिगृह स्थापन करण्याचा उद्देश हा की प्रत्येक जातीधर्मातील विद्यार्थी शिकला पाहिजे, हा होता. त्यादृष्टीने आजही हे वसतिगृह सुरू आहे. या वसतिगृहात प्रवेश हा सर्व जाती धर्मातील मुलांना गुणवत्तेनुसार दिला जात आहे. इतर वसतिगृहाप्रमाणेच या वसतिगृहात सर्व सोयी व सुविधा पुरविल्या जातात. या वसतिगृहात विद्यार्थ्यासाठी प्रबोधनपर व्याख्याने आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबरोबरच बुद्धिबळ खेळाचे साहित्यही पुरविले जाते. या वसतिगृहामध्ये रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यासाठी मोफत आरोग्य तपासणी, ग्रंथालय व २८ तास अभ्यासिका सोय पुरविली जाते.[४०]

प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, कोल्हापूर या वसतिगृहात आज २५० मुले रहात आहेत. हे वसतिगृह स्थापन करण्याचा उद्देश हा की सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणे हा होता. त्या दृष्टीने आजही हे वसतिगृह सुरू आहे. शासकीय नियमानुसार या वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. राजर्षी शाहू महाराजांनी मराठा समाजातील मुलांना शिक्षण घेता यावे, या उद्देशाने हे वसतिगृह सुरू केले होते. इतर वसतिगृहाप्रमाणेच या वसतिगृहात सर्व सोयी व सुविधा पुरविल्या जात आहेत. या वसतिगृहात विद्यार्थ्यासाठी प्रबोधनपर व्याख्याने

आयोजित केली जातात. या वसतिगृहामध्ये शिष्यवृत्ती, आरोग्य सुविधा, ग्रंथालय, खेळाचे साहित्य पुरविले जाते. या वसगिृहात शिक्षण घेऊन अनेक मोठे तत्त्वज्ञ तयार झाले आहेत.[४१]

## ६.१४ समारोप

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोन समाजसुधारकांच्या सामाजिक कार्यास त्यांच्या कुटुंब व आप्तेष्टांची पार्श्वभूमी होती. त्यातूनच त्यांच्यावर झालेल्या संस्कारातून त्यांचा पिंड समाजसुधारकाचा बनलेला होता. राजर्षी शाहू महाराज यांना तर कोल्हापूर येथील भोसले घराण्यात दत्तक घेतल्याने त्यांच्यावर राजघराण्यातील संस्कार झालेले असतानाही त्यांनी समाजसुधारणेचे संस्कार होऊन सहाजिकच ते समाजसुधारणेकडे आकर्षित झाले होते. राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण ही फ्रेझरसाहेबांनी घडविली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोघांच्यामध्ये परस्पर संबंध प्रदीर्घ काळ होते. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आकलनात आणि प्रतिक्रिया प्रकट करण्यात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. मनाची आध्यात्मिक ठेवण, व्यापकपणे विचार करणारी जीवनदृष्टी, तरल संवेदनशीलता, सूक्ष्म सौंदयदृष्टी, भाषेच्या सामर्थ्याची यथोचित जाण इत्यादी वैशिष्टे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सांगता येतील. शाहू महाराज यांचेकडे अनेक लोकांशी संवाद साधण्याचे कौशल्य होते. त्यांची वागणूक ही निगर्वी व नम्रतेची होती. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वावर डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी, प्रार्थना समाज, आर्य समाज व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव पडलेला होता. त्यातूनच ते सामाजिक सुधारणा चळवळीकडे वळलेले दिसून येतात.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रार्थना समाजाचे प्रभावी प्रचारक होते. महर्षी शिंदे यांच्या मनावर केशवचंद्र सेन यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेऊन रीतसर ब्राम्हो समाजाचे अनुयायी झाले. याचदृष्टिकोनातून राजर्षी शाहू महाराज यांनी प्रार्थना समाजालाही मदत केलेली दिसते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोघांच्या मदतीमुळे प्रार्थना समाजास चालना मिळण्यास मदत झाली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्रार्थना व ब्राम्हो समाजाचे तर राजर्षी शाहू महाराज हे आर्य समाजाचे चाहते होते. तरीदेखील ते दोघेही महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारप्रणालीचे मनस्वी चाहते होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची तत्वप्रणाली

म्हणजे दुसरे तिसरे काही नसून दीन–दलित बहुजनांची अभिजनांच्या आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्याचा जाहीरनामा होता, असा दोघांचाही ठाम विश्वास होता. शाहू महाराजांचे शिक्षणविषयक वैचारिक जडणघडण ही सत्यशोधक समाज व आर्य समाज या दोन्हीतून झालेली दिसून येते. दोन्ही समाजातील जी शिक्षणविषयक तत्त्वे त्यांना योग्य वाटली त्याचाच स्वीकार त्यांनी केलेला दिसतो. अस्पृश्य शिक्षण व स्त्रीशिक्षणविषयक समाज जागृती हे विचार महात्मा फुले यांचेकडून शाहू महाराजांनी घेतले होते. सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी घातला. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर त्यांचे अस्पृश्य दलित समाजाच्या दारापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे कार्य शाहू महाराज यांनी केले. म्हणून ते महात्मा फुले यांचे वारसदार मानले जातात.

या दोन्ही समाजसुधारकांनी सत्यशोधक समाजास विरोध न करता उलट त्याचे अनुकरण करून सत्यशोधक समाजाचे कार्य आपापल्यापरीने चालू ठेवले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना व ब्राम्हो समाजाचे कार्य करताना सत्यशोधक समाजातील तत्वांचा प्रसार केलेला दिसून येतो. त्यामध्ये अस्पृश्यता निवारणासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना करून त्याद्वारे अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक समाजाचे कार्य चालू ठेवले होते. त्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले होते. त्यामध्ये अस्पृश्यता निवारण, वसतिगृहाची स्थापना, वेदोक्त प्रकरण, ब्राम्हणेत्तर चळवळीस मदत वगैरे गोष्टी राबवून महात्मा फुले यांचे सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालविले.

अस्पृश्यतेचा समूळ नायनाट झाल्याशिवाय हिंदू समाज एकसंघ होणार नाही. हा दृष्टीकोन समोर ठेवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी आपापल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून सर्वस्व पणाला लावून अस्पृश्यतेच्या विरोधात उभयतांनी संघर्ष केला होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते अस्सल दर्जाचे संशोधक होते. इतिहास, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र आदी विषयांचे गाढे अभ्यासक होते. केवळ सहभोजने आणि मंदिर प्रवेश या गोष्टी अस्पृश्यता या हिंदू समाजाला जडलेल्या रोगावरील वरवरची मलमपट्टी होती, हे मर्म महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूर्ण ओळखून होते. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता समूळ नष्ट करण्यासाठी आयुष्यभर

अस्पृश्यतेचे मूळ शोधून काढण्यासाठी स्वतःला संशोधनात गाढून घेतले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकऱ्यांच्यात सुधारणा व्हावी, यासाठी फार मोलाचे कार्य केलेले दिसून येते. शेतकरी चळवळीत भाग घेऊन त्यात नवे राजकीय विचार आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेतकरी हा एक समग्र समाजघटक नसून त्यात वर्गीय विभाजन होत आहे, हे त्यांनी जाणले होते. राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्याविषयी कार्य करताना शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळावर उपाययोजना करण्याचे ठरविले. त्यादृष्टीने त्यांनी 'स्पिनींग अँड वीव्हिंग मिल' १७ सप्टेंबर १९०६ रोजी कोल्हापूर येथे सुरू केली. त्याचे नाव 'शाहू मिल' असे ठेवले. शाहू महाराजांनी पंचसूत्री योजना आखून घेतली होती. ब्रिटिश व इतर संस्थानात शेती सुधारणेसंबंधी कसलेही धोरण अस्तित्त्वात नव्हते. शाहू महाराजांनी शेती सुधारणेला बहुजन विकासवादाची जोड दिली. शाहू महाराजांनी शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी दाजीपूरजवळील फेजिवडे येथे भोगावती नदीवर धरण बांधले. धरणामुळे होणाऱ्या जलाशयाला 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव'. नाव देण्यात आले.

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात शेतकऱ्यांसाठी फार मोठे कार्य केले होते. या धरण प्रकल्पाने हरितक्रांती झाली, कोल्हापूर राज्याचा कायापालट झाला. शेतीसाठी बारमाही पाणीपुरवठा व्हावा, यादृष्टीने कालवे व धरण योजना अमलात आणून कोल्हापूर राज्यात हरितक्रांती घडवून आणण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना राजर्षी शाहू महाराजांच्याविषयी फार आदर होता. या दोघांची वैचारिक जडणघडण एकसारखी होती. एवढेच नव्हे तर या दोघांच्यामधील कार्य करण्याची प्रगल्भताही एकसारखी असलेली दिसून येते. या दोघांनी अस्पृश्य, स्त्रियांच्या व मागासलेल्या लोकांच्या उद्धारासाठी फार मोठे कार्य केलेले दिसून येते. एक राजा असूनही राजर्षी शाहू महाराजांनी सामान्य जनतेसाठी केलेले हे कार्य बहुमोल होते. शेवटी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनीही त्यांच्या या कार्याचा गौरव केलला दिसून येतो.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व शाहू महाराज यांनी समाजात सुरू असलेल्या वाईट प्रथा बंद करण्यासाठी मोठया प्रमाणात कार्य केले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रीशिक्षण, होलिका उत्सव, मद्यपान बंदी, मुरळी प्रथा या विषयावरही चळवळी करून आपले सांस्कृतिक

जीवन जास्त शुद्ध आणि आनंददायी करण्याचा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक सुधारणाबरोबरच स्त्री उन्नतीसाठी अनेक कायदे केले. मुरळी पद्धतीस प्रतिबंधक घालण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांनी जोरदार प्रयत्न केला.

## संदर्भ


१) शिंदे वि.रा., माझ्या आठवणी व अनुभव, लेखन वाचन भांडारगृह, १९५८, पृ.८३ ते ८५

२) पवार गो. मा., महर्षी वि. रा. शिंदे जीवन व कार्य लोकवाङ्मयगृह प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती ४ मे २००४ पृष्ठ ४

३) शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ.८५

४) सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. २२

५) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११,पृ.२२

६) जाधव रमेश, शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक : एक शोध, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २७ मार्च २००७, पृ.९९

७) पवार गो.मा.(संपा.), महर्षी शिंदे रोजनिशी, मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद, पृ.३ ते ७

८) पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे, २६ जून २०१२, पृ. २१

९) शिंदे वि.रा., उपरोक्त, पृ. ९

१०) जाधव रमेश, उपरोक्त, पृ.१०१

११) कित्ता, पृ.१०१

१२) कीर धनंजय, शाहू छत्रपती A Royal Revolutionery, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६, पृ. ३८

१३) पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, उपरोक्त, पृ. १७२

१४) जाधव रमेश, उपरोक्त, पृ.१०२ व १०३

१५) कित्ता, पृ.१०३

१६) पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, नॅशनल ट्रस्ट बुक इंडिया, नवी दिल्ली, २००७, पृ. २९

१७) भोसले एस.एस.आणि सावंत, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे जन्मशताब्दी स्मृतिग्रंथ, पृ.११८

१८) सूर्यवंशी कृ.गो. उपरोक्त, पृ.११७

१९) ठोंबरे तानाजी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी, लोकवाङ्मयगृह मुंबई, फेब्रुवारी २००९, पृ. ४०

२०) सूर्यवंशी कृ.गो., उपरोक्त,पृ.६४०

२१) पवार शिरीष, उपरोक्त,पृ.१०४

२२) कित्ता, पृ.१०५

२३) सूर्यवंशी कृ.गो., उपरोक्त, पृ.६४०

२४) भिडे जी.एल., पाटील एन.डी, थोरात डी.एस., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑगस्ट २०११, पृ. १०७, १०८

२५) जाधव रमेश, उपरोक्त, पृ.१०४

२६) कित्ता, पृ.१०५

२७) कित्ता, पृ.१०५

२८) दै.सकाळ, २१ एप्रिल १९९६

२९) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू ग्रंथ प्रकाशक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २६ जून २००७, पृ. ११५

धाटावडकर भास्कर(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई, १९८८, पृ. ४१

३०) कित्ता, पृ. ४२

३१) नाईकवाडे अशोक(संपा.), महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शोध व बोध, ज्ञानेश प्रकाशन औरंगाबाद, पृ.१०५

३२) आढाव विलास, समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २८ नोव्हेंबर २००३, पृ.१७

३३) मुलाखत– शेख इकबाल जहांगीर, मुख्याध्यापक, म.न.पा.शाळा नानापेठ पुणे शहर

३४) मुलाखत– तायडे संभाजी सुदाम, प्रभारी प्राचार्य, पुणे शहर

३५) मुलाखत– शेवाळे मधुकर धर्माजी, जनरल सेक्रेटरी, डी.सी.एम. सोसायटी, पुणे महाराष्ट्र

३६) मुलाखत– मुजावर मुस्ताक चाँदसो, सिनीयर लिपीक, मोहमेडन मुस्लिम बोर्डिंग, कोल्हापूर

३७) मुलाखत– चौगुले आर.अे., अधिक्षक, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर

३८) मुलाखत– कांबळे राजाराम वसंत, अधिक्षक, श्री इंदुमती विद्यार्थी वसतिगृह, कोल्हापूर

३९) मुलाखत– विणकरे सुधाकर संभाजी, अधिक्षक, मिस क्लार्क होस्टेल, कोल्हापूर

४०) मुलाखत– भोपळे पाटील संजय महादेव, अधिक्षक, श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राम्हण विद्यार्थी वसतिगृह, दसरा चौक, कोल्हापूर

४१) मुलाखत– चौले डी.आर., अधिक्षक, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, कोल्हापूर

# प्रकरण सातवे

# उपसंहार

## प्रास्ताविक –

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे अंग आहे. हे ओळखून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य समाजासाठी शिक्षणाची दारे खुली केली. यासाठी त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' (निराश्रीत साहयकारी मंडळी) या संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करणे व या समाजातील लोकांना नोकऱ्या मिळवून देणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्टे होते. समाजात अनिष्ट प्रथा, जातिभेद, अस्पृश्यता, मुरळी सोडणे, देवदासी या प्रथा होत्या. या नष्ट करण्यासाठी महर्षी शिंदे यांनी जातीने लक्ष देवून या प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. यासाठी सरकार दरबारी कायदा करण्याचा आग्रह धरला होता.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांनी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाबाबतचे उचललेले क्रांतिकारक स्वरूपाचे पाऊल होते. आपल्या संस्थानात अस्पृश्य वर्गातील लोकांना सामावून घेतले गेले. अस्पृश्य, वंचित समाजाला सामाजिक, धार्मिक, आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचा एक मार्ग म्हणजे शिक्षण होय. या समाजातील लोकांना शिक्षण घेतल्याशिवाय ते सुधारणार नाहीत. त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचे कार्य कोणी केले असेल तर ते राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य जसे महत्त्वाचे आहे. तसेच अस्पृश्य उद्धाराचे कार्य ही महत्त्वाचे आहे. ब्रिटिश राजवटीच्या काळात अस्पृश्यांना प्रथमतः वरिष्ठ जातीच्या बरोबरीने काही अधिकार मिळाले. शिक्षणाची संधी आणि सरकारी नोकरीत प्रवेश मिळाल्याने त्यांचे अठरा विश्व दारिद्र्य व गुलामगिरी नष्ट होण्यास मदत होईल. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचे शाहू महाराजांना आकर्षण वाटत होते. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अलौकिक स्वरूपाचे कार्य केले. यामध्ये अस्पृश्य मुलांच्या शिक्षणासाठीही वसतिगृह काढली होती.

१) आधुनिक भारताच्या इतिहासात एकोणिसावे शतक हे राष्ट्रवादाचे, समाजसुधारकाचे शतक म्हणून ओळखले जाते. युरोपात चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रबोधन पर्व सुरू झाले.

भारतात प्रबोधन पर्व एकोणिसाव्या शतकात सुरू झाले. पश्चिमेकडील ज्ञान–विज्ञान आणि भारतातील भक्ती चळवळीच्या कार्याला सुरेख मिलाफ झाला आणि आधुनिकतेचे वारे वाहू लागले. प्रज्ञावंतानी गतिहीन, पारंपरिक समाजात नवसुधारणेचे बिजारोपण सुरू केले.

२) एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभापासून भारतात राष्ट्रवादाचे समाज व धर्म सुधारणेचे वारे वाहू लागले होते. त्याचवेळी राजा राममोहन रॉय यांनी भारतात पाश्चात्य धर्तीवर सुधारणास प्रारंभ केला होता. त्याचवेळी महाराष्ट्रात एकीची भावना नव्हती. भारतीय समाजात कर्मकांड, पूजा–अर्चा यांना महत्त्व प्राप्त झाल्यामुळे समाज दरिद्री जीवन जगत होता. अशा या समाजाला या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी अनेक समाजसुधारक पुढे आले होते. त्यामध्ये बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, विष्णूशास्त्री पंडित, तर्खडकर, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा फुले, शाहू महाराज, महर्षी शिंदे, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारक निर्माण झाले. या समाजसुधारकांनी आपल्या साहित्यातून लेखनीतून समाजात जागृती सुरू झाली त्यातून प्रगती केली. त्यांनी शिक्षणास अग्रक्रम देवून वंचित मागासलेल्या समाजासाठी शाळा सुरू केली. वसतिगृह स्थापन केले.

३) समाजात चार वर्ण अस्तित्त्वात होते. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी वर्णव्यवस्था समाजात होती. बहुजन समाज हा सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व आर्थिक सुधारणांपासून वंचित होता. शूद्रांस हलकी, कमी प्रतीची कामे करावी लागत होती. शिक्षणापासून हा वर्ग वंचित होता. या समाजास शैक्षणिक व आर्थिक दृष्टया भक्कम केल्याशिवाय तो आपल्या पायावर उभा राहणार नाही. याची जाणीव अनेक समाजसुधारकांना झाली.

४) महात्मा फुले यांनी या समाजाला जागृत करण्याचा प्रथम प्रयत्न केला होता. त्यांच्यासाठी पुणे येथे सन १८५१ मध्ये पहिली शाळा काढली. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे अंग आहे. हे ओळखून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य समाजासाठी शिक्षणाची दारे खुली केली. यासाठी त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' (निराश्रीत साहयकारी मंडळी) या संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करणे व या समाजातील लोकांना नोकऱ्या मिळवून देणे, हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्टे होते. समाजात अनिष्ट प्रथा, जातिभेद, अस्पृश्यता, मुरळी सोडणे, देवदासी या प्रथा होत्या.

या नष्ट करण्यासाठी महर्षी शिंदे यांनी जातीने लक्ष देवून या प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. यासाठी सरकार दरबारी कायदा करण्याचा आग्रह धरला होता. वासाहतिक काळातील कायदे, शिस्त व प्रबोधन यातून सुधारणेचा विचार रूजू लागला. शिस्तीशिवाय नवा विचार रूजत नाही, हे सिद्ध झाले. राजर्षी शाहू महाराज यांची ख्याती महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभर पसरली होती. कोल्हापूरच्या करवीर नगरीचे ते संस्थानिक राजे होते आपल्या संस्थानात अस्पृश्य वर्गातील लोकांना सामावून घेतले गेले. अस्पृश्य, वंचित समाजाला सामाजिक, धार्मिक, आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचा एक मार्ग म्हणजे शिक्षण होय. विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांनी स्क्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाबाबतचे उचललेले क्रांतिकारक स्वरूपाचे पाऊल होते. याची कल्पना येते. याचबरोबर अस्पृश्यता निवारणासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले. राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुले यांची ही परंपरा चालू ठेवून मागासलेल्या समाजाची उन्नती करणे हे राजर्षी शाहू महाराजांनी आपले जीवीत कार्य मानले होते. राजर्षी शाहू महाराज व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे वंचितांना न्याय मिळवून देणारे व मानवता धर्माचा विचार रूजविणारे थोर समाजसुधारक होते.

५) एकोणिसावे शतक हे महाराष्ट्रातील इतिहासास कलाटणी देणारे शतक समजले जाते कारण या शतकाच्या प्रारंभीच इंग्रजी सत्ता भारताबरोबरच महाराष्ट्रात स्थिर झाली होती. इंग्रजांनी महाराष्ट्रातील पेशव्यांची सत्ता संपुष्टात आणल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य संपुष्टात आले होते. महाराष्ट्रात घडून आलेल्या या राजकीय परिवर्तनाचे दूरगामी परिणाम येथील समाजाच्या व समाजजीवनाच्या सर्वच अंगावर झाले. महाराष्ट्रात नव्या युगाची सुरूवात झाली. पेशवेकाळातील महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अशांतता व अराजकता, अनास्था व अनाचार संपून इंग्रजांच्या राजवटीत सुनियोजित व सुव्यवस्थीत अशी कार्यक्षम शासनपद्धती सुरू झाली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या देशातील प्रजेबरोबर एक वेगळा विचार प्रवाह सुरू केला. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, श्रेष्ठत्व–कनिष्ठत्व इ. प्रतिगामी विचारांनी जखडलेल्या अनेक वाईट चालीरिती, रूढी परंपरा यांनी बांधल्या गेलेल्या येथील समाजाला सामाजिक समतेचा नवा

संदेश त्यांनी दिला. सामाजिक समता व त्याचा विचार प्रभावीपणे या सुधारकांनी मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याच्या आधी ५० वर्षापूर्वीच मांडला होता.

६) इंग्रजी राजवटीच्या आगमनाने या देशात नव्या विचारांचे वारे वाहू लागले. सर्व समाज संक्रमणावस्थेतून वाटचाल करू लागला. येथील समाजाला नवा साक्षात्कार झाला. या परिवर्तनामुळे येथील धार्मिक, सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक जीवन ढवळून निघाले. पाश्चात्यांचे आधुनिक, वैज्ञानिक, प्रगत व पुरोगामी विचार आत्मसात करणे येथील समाजाला जड गेले. त्यामुळे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिवर्तनात अनेक अडसर निर्माण झाले होते. महाराष्ट्रातील समाज आपली परंपरागत चालत आलेली जुनी संस्कृती सोडण्यास सहजासहजी तयार नव्हता. तर दुसऱ्या बाजूला परिस्थितीच्या दबावामुळे होऊ लागलेल्या परिवर्तनाला तो रोखूही शकत नव्हता. अशाप्रकारे या समाजाची झालेली कोंडी फोडण्याचे महत्वाचे कार्य या शतकात समाजसुधारकांनी केलेले दिसून येते. इंग्रजांच्या परकीय सत्तेचे राजकीय स्वरूप वेगळे व आकर्षक असले तरी या मागचा त्यांचा आर्थिक हेतू वेगळाच आहे याची जाणीव काही समाजसुधारकांना झाली होती. राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनातील आधुनिक व प्रगत प्रेरणांचा स्वीकार केल्याशिवाय आपल्या समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही याची जाणीव महाराष्ट्रातील समाजाला निर्माण करुन देण्याचे महान कार्य याकाळात समाज व धर्मसुधारकांनी केले. समाज व धर्मसुधारकामध्ये महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा गांधी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाज सुधारकांचा समावेश होता.

७) महाराष्ट्रात व भारतातील अनेक धर्मसुधारणा चळवळ, समाजसुधारकांनी केलेले कार्य, वृत्तपत्रांनी केलेली कामगिरी, पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव, मराठी भाषेत तयार झालेले साहित्य, इंग्रजी भाषेचा परिणाम अशा अनेक कारणामुळे राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. ब्रिटिशांची परकीय सत्ता दूर करून सर्वांगीण प्रगतीसाठी राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता वाटणारा एक गट निर्माण झाला होता. काही लोक क्रांतिकारक चळवळीकडे वळले, तर काहींनी सनदशीर मार्गाने ब्रिटिशांकडून स्वराज्य मिळविण्यासाठी संघटनात्मक मार्ग व कृती यांचा अवलंब केला. याचवेळी काही समाजसुधारकांना राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक

सुधारणेचे महत्त्व अधिक वाटत होते. तेव्हा त्यांनी बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व सामाजिक व धार्मिक जीवनातील अनिष्ट परंपरा इत्यादी दूर करण्यासाठी सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू केली होती. त्यामुळे विसाव्या शतकात सर्वच बाबतीत सुधारणा चळवळी सुरु झाल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होऊन त्यांचा पिंड समाजसुधारणेसाठी तयार झाला होता. मध्ययुगात राजेशाही अस्तित्वात होती. याकाळात धर्माचे स्तोम, राजसत्तेचे प्राबल्य वाढले होते. स्त्रियांना हीन वागणूक दिली जात होती. राजाच्या हातात सत्ता केंद्रित झाली होती. राज्यविस्तारासाठी राजे शेजारच्या राज्यावर आक्रमण करून त्यांना पराभूत करत असत. त्यांची संपत्ती लुटून आणत असत. त्याचबरोबर पराभूत राज्यातील स्त्रियांना पळवून आणून त्यांची अब्रू लुटली जात असे. या हिंदू स्त्रीला कोणाकडेही आपले गाऱ्हाणे मांडता येत नसे. तिच्या गळयाभोवती गुलामगिरीचा फास होता.

८) एकोणीसाव्या व विसाव्या शतकाच्या कालखंडात भारतीय समाजात धार्मिक कर्मकांडे, पुजाअर्चा, अंध:विश्वास, स्त्री–पुरूष भेद इत्यादी सर्व प्रकर्षाने जाणवत होता. समाजात अस्पृश्यता, जात–पात मोठया प्रमाणात पाळली जात होती. अस्पृश्यता निवारणासाठी सामुदायिक व संघटीत अशा परिस्थितीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या या सामाजिक सुधारणा मौलिक आहेत. सुधारणे बरोबरची ही पारंपरिक व्यवस्था बदलून टाकावयाची आहे. नवी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. हा परिवर्तनाचा विचार प्रभावीपणे कृतिशिल कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले आहे.

९) महर्षी शिंदे यांनी १८ ऑक्टो. १९०६ रोजी मुंबई 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'( निराश्रित साहाय्यकारी मंडळ) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेची उद्दिष्टे अशी होती की, अस्पृश्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण करणे, स्पृश्य समाजाचे परिवर्तन करणे तसेच अस्पृश्यांना न्याय हक्क मिळवून देणे, सार्वजनिक धर्माची शिकवण देणे इ. होते. बहुजन समाजातील लोकांना शिक्षणाची संधी मिळवून दिली. वर्षानुवर्षे हा समाज अंधःकारात, गुलामगिरीचे जीवन जगत होता. त्यांच्यात शिक्षणाच्या रूपाने ज्ञानाची ज्योत पेटविण्याचे महान कार्य महर्षी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या समाजसुधारकांनी केले आहे.

१०)एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात वंचित, उपेक्षित, शोषित, दलित, शेतकरी, कष्टकरी, कामगार व महिला या वर्गाच्या दुःखाला वाचा फोडण्याचे प्रथम काम महात्मा फुले यांनी केले आहे. त्यांना वंचितांचा ( सबाल्टर्नचा) नेता  असे संबोधले जाते. महर्षी वि.रा. शिंदे यांनी अस्पृश्यता १९०७ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात हा प्रश्न काँग्रेस श्रेष्ठीपुढे लावून धरला होता.

१२) राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूरमधील करवीर संस्थानात प्रथम अस्पृश्यांना सेवेत सामावून घेण्यापाठीमागे राजर्षी शाहू महाराजांची या अस्पृश्य वर्गाविषयी असलेली सहानुभूती, कळवळा दिसून येतो. चित्पावन ब्राह्मणांनी त्यास विरोध दर्शविला. परंतु राजर्षी शाहू महाराजांनी त्यांचा विरोध मोडून काढला. त्यासाठी  त्यांना त्यांचा रोष पत्करावा लागला. शिक्षणाचे महत्त्व ओळखून राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे मुला–मुलींना असावे, असा आदेश ३० सप्टेंबर १९१७ रोजी काढला होता. प्राथमिक शाळेबरोबरच माध्यमिक, उच्चमाध्यमिक व इतर व्यावसायिक शाळेची निर्मिती करण्यात आली. यामुळे सर्व समाजातील लोकांना याचा फायदा झाला. समाजातील अस्पृश्य, मागासलेल्या लोकांना शिक्षण घेता यावे, यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी 'मिस क्लार्क' हिच्या नावाने वसतिगृहे सुरू केले. या महिलेस अस्पृश्यांविषयी तळमळ होती. आपल्या हयातीत  तिने  या घटकाविषयी थोडे बहुत कार्य केले होते. अस्पृश्य जातीतील विद्यार्थ्यांना राहण्याची सोय व्हावी, यासाठी शाहू महाराजांनी व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग सुरू केले होते.

१३) समाजात ज्या चालीरीती, रूढी, परंपरा, जातिभेद व गुन्हेगार इत्यादी ज्या प्रथा समाजात होत्या. समाजाला लागलेली एक प्रकारची कीड होती. ही कीड नष्ट करण्यासाठी वि.रा. शिंदे यांनी अहोरात्र कष्ट सोसले. अनेक अवहेलना सहन कराव्या लागल्या. परंतु त्यांनी आपले काम अखंडपणे चालू ठेवले. या कामात भगिनी जनाक्का शिंदे यांचाही सहभाग होता. महर्षी शिंदे हे एक समाज सुधारक होते. त्याचबरोबर एक संशोधक आणि लेखकही होते. अस्पृश्य पूर्वी कोण होते, याचा शोध घेवून मनुस्मृतीमधील अस्पृश्यतेचे स्वरूपही त्यांनी उलगडून दाखविले आहे. सावकारांकडून व ब्रिटिश सरकारकडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. 'बळीचे राज्य'

देशात  यावे अशा पद्धतीने शेतकऱ्यांनी वर्तन करावे, असा संदेश त्यांनी आपल्या लेखनातून केला आहे.

१४) विठ्ठल रामजी शिंदे त्यांचे जे व्यक्तिमत्त्व घडले व भावी आयुष्यात त्यांच्या हातून जे कार्य झाले ते महत्वपूर्ण असून खोलवर परिणाम जाणवतो. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भावी समाजसुधारणेचा पाया त्यांच्या वडिलांच्या भागवत धर्मातून घातला गेला होता. समाजसुधारकांचे विचार त्यांच्या मनावर घरातून आई वडिलाकडून आले होते. वि. रा. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणेत मातोजी यमुनाबाई हिचा मोलाचा वाटा होता. त्यामुळेच त्यांच्या मनात स्त्री जातीबद्दल अपरंपार करुणा व भक्ती होती हे दिसून येते. ते ब्राम्होसमाजात गेल्याने सुधारक झाले नव्हते, तर सुधारक म्हणून ब्राम्हो समाजात गेले होते.

१५) विठ्ठल रामजी शिंदे यांच्या घरी सुधारकांचे वातावरण होते. त्यातूनच ते घडले होते. जातिभेदाचे संस्कारच मनावर झाला नसल्याने समाजसुधारकाप्रमाणेच आधुनिक सुधारकाप्रमाणे जातिभेद मोडण्याचा खटाटोप करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. त्यांच्या घरात सहाजिकपणेच समाजिक सुधारणेची तत्त्वे पाळली जात होती. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्या कार्यातून आणि विचारातून झालेला आढळतो. त्यांची घडण अशाप्रकारे त्यांच्या बालपणीच झाली होती. घरातील वातावरणाचा परिणाम त्यांच्या ग्रहणशील मनावर होऊन त्यांची बैठक अध्यात्मप्रवण बनली. मनाला उदारपणा व्यापकपणा आला. संमिश्र संस्कृतीत वाढल्याने भेद जाणवण्याऐवजी ऐक्य भावनाच जोपासली गेली होती. मन भावनाप्रवण बनले होते. म्हणूनच त्यांनी १९०३ मध्ये ब्राम्हो धर्मप्रचारक म्हणून जिवित कार्याला प्रारंभ केला.

१६) विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनात वैचारिक भावनिक प्रतिक्रिया व्यक्त होते. वाचन, निरीक्षण आणि चिंतन यांतून मनास प्रगल्भता आलेली होती. काहीतरी करावे ही उर्मी दांडगी होती. मूळचीच वृत्ती भावनाप्रधान आणि बाहय वास्तवाबद्दलचे असमाधान या सर्व कारणांचा परिणाम म्हणून वृत्तीची ही तीव्रता निर्माण झालेली होती. काही चांगले दिसले की ते मनःपूर्वक कौतुक करतात. त्याविषयी आदरभाव दाखवितात आणि वाईट दिसले की तीव्र निषेध करतात. मात्र ही भावनिक तीव्रता असली तरी ते चांगल्या वाईटाचा

निवाडा यथायोग्य करतात. त्यांच्या आकलनात आणि प्रतिक्रिया प्रकट करण्यात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. तीव्रता असली तरी मानसिक प्रगल्भपणामुळे विवेक सुटला नाही. मनाची आध्यात्मिक ठेवण, व्यापकपणे विचार करणारी जीवनदृष्टी, तरल संवेदनशीलता, सुक्ष्म सौंदयदृष्टी, भाषेच्या सामर्थ्याची यथोचित जाण इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सांगता येतील.

१७) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य हे विशिष्ट जडणघडणीतूनच झाले होते. त्यांच्या सामाजिक सुधारणा कार्याची चौकट त्यांच्या कुटुंबातच झाली होती. त्यांच्या आजोबा आजी व वडिलापासूनच त्यांना वारसा मिळाला होता. त्यांना त्यांचे आईनेही चांगले सुसंस्कृत संस्कार केले होते. पुढे त्यांच्यावर प्रार्थना समाजाचा प्रभाव पडला होता. तसेच ख्रिस्ती धर्मातील उदार तत्वांचाही त्यांच्यावर प्रभाव पडलेला होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनावर केशवचंद्र सेन यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. केशवचंद्र सेनच्या विचाराचा पगडा विठ्ठलरावजीच्या ठायी असला तरी जीवनासाठी ऊर्जेचा संयोग साधून भावी आयुष्यात ध्येय गाठण्याची इर्षा आणि रात्रं-दिवस तोच विचार त्यांच्या मनात घोळू लागला. त्यात तरुण आणि वृध्द मंडळींच्या गाठीभेटी होऊन समाजाविषयी काही तरी करण्याची धडपड सुरू झाली. म्हणूनच त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेऊन रीतसर ब्राम्हो समाजाचे अनुयायी झाले. महर्षी शिंदे यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा अतिशय गांभीर्याने घेतली होती. धर्मप्रसारक या नात्याने आपले आयुष्य उन्नत धर्मकार्यासाठी व्हावे, अशी त्यांच्या मनाची धारणा होत चालली होती.

१८) महर्षी शिंदे त्यांचा धर्म म्हणजे केवळ मत किंवा मनोवृत्ती नसेल तर साक्षात जीवन होते व ते जीवन हे सर्व बाजूचे असे राजकारण आणि आर्थिक अभ्युदय धर्म सुधारणा, समाज सुधारणा या सर्वासाठी त्याचे जिने त्याचा प्रयत्न व त्यांचे मरण ही अविस्मरणीय ठरले. धर्म शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याअगोदर महर्षी शिंदेनी लो. टिळकांची भेट घेऊन त्यांचे विचार ऐकण्याची इच्छा होती. वि. रा. शिंदे हे धर्मशिक्षणासाठी परदेशात गेले होते.

१९) राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही आपल्या पूर्वजांच्या वारसातून घडलेली होती. यशवंतराव घाटगे यांच्याकडे त्यांच्या वडीलांकडून कर्तृत्त्वाचा व पराक्रमाचा वारसा चालून आलेला होता. त्यांचे दत्तकविधान झाल्यानंतर सहाजिकच ते

छत्रपती बनल्याने त्यांची वैचारिक जडणघडण ही राजाप्रमाणे झाली. त्यांच्या विचाराची जडणघडण ही घाटगे व भोसले या दोन्ही घराण्याकडून झालेली दिसते. राजर्षी शाहू महाराज यांची वैचारीक जडणघडण ही फ्रेझर साहेबांनी घडविली होती. फ्रेजर साहेबांनी दिलेल्या शिक्षणातूनच शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण झालेली दिसून येते.

२०) राजर्षी शाहू महाराजांना सत्यशोधक समाजाची तत्त्वे उशिरा समजली असली तरी त्यातूनच त्याच्या वैचारिकतेची जडणघडण झालेली दिसून येते. सत्यशोधक समाजाची विचारसरणी व राजर्षी शाहू महाराजांचे विचार यामध्ये बरेचसे साम्य होते. आर्यसमाज व सत्यशोधक समाज यातील आपल्या विवेकबुद्धीला पटतील त्या चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांनी आपल्या विचारांची बैठक निश्चित केली होती. राजर्षी शाहू महाराजांची वैचारिक जडणघाडण ही मार्क्सवादातून झालेली दिसते. त्यांनी हिंदुस्थानातील क्रांतीचे महत्त्व सांगून भावी लोकशाही निष्ठा, कामगार राज्याचे स्वप्न कामगारांच्यापुढे शाहू महाराजांनी ठेवले होते.

२१) शाहू महाराजांचे शिक्षणविषयक वैचारिक जडणघडण ही सत्यशोधक समाज व आर्य समाज या दोन्हीतून झालेली दिसून येते. अस्पृश्य शिक्षण व स्त्रीशिक्षणविषयक समाजजागृती हे विचार महात्मा फुले यांचेकडून राजर्षी शाहू महाराजांनी घेतले होते. ब्राम्हणेत्तर चळवळीची बीजे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत आहेत. सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी घातला. शाहू महाराजांची वैचारिक जडणघडण ही ब्राम्हणेत्तर चळवळीतून घडत गेली होती.

२२) महाराष्ट्राच्या जडणघडणीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारताच्या राजकीय व सामाजिक इतिहासाला ज्या थोर व्यक्तींनी आपल्या कर्तृत्त्वाने नवी दिशा दिली. त्या महान नेत्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांचे नाव फार महत्त्वाचे आहे. राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळींचा महर्षी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारावर फार मोठा प्रभाव पडलेला होता. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करीत असताना या विविध चळवळीतील विचारांचा वापर कशाप्रकारे करावा आणि या विचारांना आचारांची जोड

कशाप्रकारे द्यावी याबाबत त्यांनी आयुष्यभर चिंतन केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा प्रभाव त्यावेळच्या समाजावर होऊन समाजसुधारणा होण्यासाठी फार मोठया प्रमाणावर मदत झाली होती.

२३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर सातत्याने वेगवेगळया सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळीमध्ये भाग घेऊन भारतीय लोकांच्या जीवनामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारणासाठी उभी केलेली डिप्रेस्ड क्लास मिशनची चळवळ ही त्यातील सर्वात मोठी चळवळ होती व ते विठ्ठल रामजी शिंदे यांचे जिवितकार्य ठरले. त्यांनी लोकमान्य टिळक व विशेषतः महात्मा गांधी यांच्या चळवळींना पाठिंबा दिला. गांधीच्या चळवळीत भाग घेऊन कारावास सोसला. व्हायकोम सत्याग्रहासारख्या महत्त्वाच्या सत्याग्रहात त्यांची प्रखर नैतिक भूमिका स्पष्ट झाली. शेतकरी चळवळीत भाग घेऊन त्यात नवे राजकीय विचार आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेतकरी हा एक समग्र समाजघटक नसून त्यात वर्गीय विभाजन होत आहे, हे त्यांनी जाणले होते. या महत्त्वाच्या सामाजिक व राजकीय चळवळीबरोबरच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रीशिक्षण, होलिका उत्सव, मद्यपान बंदी, मुरळी प्रथा या विषयावरही चळवळी करून आपले सांस्कृतिक जीवन जास्त शुद्ध आणि आनंददायी करण्याचा प्रयत्न केला. मद्यपानामुळे समाजाच्या नैतिकतेचा ऱ्हास होतो. पण त्याचे काही आर्थिक पैलू आहेत. हे त्यांनी ओळखले होते. होळीचा सण हा खरे तर निरामय आनंदाचा सण पण त्यात बीभत्सपणा निर्माण झाला आहे. तो दूर करून त्यात शुद्ध आनंद देणारा सांस्कृतिक आशय समाविष्ट करावा असे शिंदे यांचे सांगणे होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे केवळ एकाच गोष्टीवर किंवा एकाच सुधारणेवर भर देणारे सुधारक नव्हते, तर ते जीवनाकडे समग्र दृष्टिकोणातून पाहात होते, हे त्यांच्या वेगवेगळया चळवळीवरून आपल्या लक्षात येईल.

२४) राजर्षी शाहू महाराज हे नुसतेच बोलके समाज सुधारक नव्हते तर त्यांनी प्रत्यक्ष कृती करून अस्पृश्यांच्या सुधारणा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासाठी त्यांनी अस्पृश्यांना संस्थानच्या नोकरीत सहभागी करून घेतले. प्रगतीची संधी देऊन व सामाजिक प्रतिष्ठा देण्यास सुरूवात केली. महार समाजातील काहींना माहूत म्हणून कामावर घेतले. ‘राजर्षी शाहू महाराजांनी आपली

बहीण राजकन्या चंद्रप्रभाबाई यांचा विवाह तुकोजीराव होळकर(इंदूर) यांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी करण्याचे योजले होते. मराठा राजघराणातील कन्या पाऊणशे वर्षापूर्वी धनगर घराण्यात देणे हे मोठे क्रांतिकारी पाऊल होते. आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या विवाह सोहळयाच्यावेळी वरातीत सरकारी घोडागाडीवर अस्पृश्य व्यक्तीला कोचमन म्हणून बसविले. तसेच बलुतेदाराची व वेठबिगाराची पद्धत कायद्याने बंद केली. गंगाराम कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापूरात मध्यवस्तीत चहाचे दुकान काढून दिले. अशा प्रकारच्या अनेक समाज सुधारणा करून राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाबरोबरच महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारण चळवळ तेवत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

२५) राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक सुधारणाबरोबरच स्त्री उन्नतीसाठी अनेक कायदे केले. न्या.रानडे, लोकहितवादी, लोकमान्य टिळक यांच्या तुलनेत राजर्षी शाहू महाराज हे कर्ते सुधारक ठरातात. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाचे समर्थन करून न थांबता राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कुटुंबात तसा विवाह करण्याचे धाडस केले. विवाहाचे वय, शारीरिक सक्षमता यांचा विचार करून बालविवाह थांबविले. मुलींच्या शिक्षणाचा विचार करून स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले राजाराम कॉलेजमध्ये मुलींना फी माफ केली होती. वारसाहक्क, घटस्फोटाचे हक्क, परंपरेने स्त्रीला नाकारले तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी असे हक्क बहाल करणारा कायदा केला. व स्त्रीमुक्ती स्त्रीदास्य अंतास हातभार लावला. विधवा पुनर्विवाह करण्याचे धाडस करून त्यासही कायदेशीरपणा प्राप्त करून दिला.

२६) महाराष्ट्रातील समाजाला एकत्र येऊन लढाई व शेती व्यतिरिक्त सामाजिक कार्य करायचे हे माहित नव्हते. एखाद्या समाजाचे मंडळीकरण घडून यायला अवकाश होता. चार लोकांनी एकत्र विधायक गोष्टी सुरू करायच्या असतात या गोष्टींचा परिचय आपणास मिशनच्या माध्यमातून झाला. त्यातूनच पुढे समाजसुधारकांची मिशनरी फौज आपल्या समाजात निर्माण झाली. येथील समाजसुधारकांनी समाजात प्रबोधन घडवून आणण्याचे प्रयत्न केले. इंग्रजी विद्या व आक्रमणापुढे महाराष्ट्रातील समाज संपुष्टात येऊ नये म्हणून नियतीला शरण न जाता बदलत्या काळाप्रमाणे आपण बदललो तरच टिकून राहू अन्यथा

आपण नष्ट होऊ ही भावना समाजसुधारकामुळे महाराष्ट्रात आली. त्यांनी धार्मिक, सामाजिक, राजकीय बदल घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यातूनच अविरत धर्मसुधारणा सुरू झाल्या. या समाजसुधारकात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी बहुजन समाजासाठी फार मोठया प्रमाणावर कार्य केलेले आहे. त्यांच्या या कार्याचा उद्देश बहुजन समाजाला शिक्षण मिळून सर्व हक्क प्राप्त झाले पाहिजेत, तसेच या लोकांनी आपल्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचारासाठी जागरूक राहून आपल्या हक्कासाठी पेटून उठविणे हे होय.

२७) धर्म व सुधारणा हा महर्षी शिंदे यांच्या विचाराचा व जीवनाचा पाया होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या सामाजिक संस्थांच्या कार्यामार्फत अनिष्ठ चालीचा प्रतिबंध केला. मुलांप्रमाणेच मुलींना सक्तीचे शिक्षण मिळावे म्हणून चळवळ केली. त्यांनी त्यामार्फत प्रार्थना समाजाच्या मुंबई साप्ताहिक उपासना, धर्माचरण, नामकरण, उपनयन इत्यादी विधीसोबत त्यांनी नव्या उपक्रमांची भर घातली. अभिनव योजना आखल्या आणि पार पाडल्या. युरोपमध्ये पोस्टल मिशनचे कार्य त्यांनी पाहिले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबई प्रार्थना समाजामार्फत जे उपक्रम सुरू केले होते त्यामध्ये उदार धर्मग्रंथ वाचन वर्ग, तरूण ब्राम्हसंघ, कौटुंबिक उपासना मंडळ, प्रार्थना समाजाचे मुखपत्र ‘सुबोधपत्रिका’ साप्ताहिक(मुंबई) मध्ये ते लेखन करीत होते. ‘पंढरपूर’ येथे समाजाने चालविलेल्या ‘बालकाश्रम’ची धुरा ते सांभाळीत होते.

२८) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी २१ मे १९०७ रोजी निराश्रीत सेवा सदनाची स्थापना केली व त्यामार्फत दलित स्त्रियांचा, विधवा स्त्रियाचा उद्धार हा प्रमुख विचार त्यांनी कार्यवाहीत आणण्यास सुरूवात केली. इतर गरीब गरजू स्त्रियांना कशी मदत करता येईल यांचे धडे त्यांना दिले गेले. तसेच निराश्रीत महिला समाजामार्फत ही समाजातील स्त्रियांची सेवा केली. ही कामे करण्यासाठी एक प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटीची स्थापना केली.या सर्वच स्त्रियांनी निराश्रीत सेवासदन, निराश्रीत महिला समाज, संस्थेतील अनाथ, विधवांच्यासाठी अपार कष्ट घेतले.

२९) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सन १९०७ मध्ये त्यांनी ‘पश्चिम हिंदुस्थानातील मुलांचे रक्षण करणारी संस्था’ स्थापन केली. देवाला वाहिलेल्या मुलींच्याप्रमाणेच वाघ्या,

आराध्य, पोतराज, जोग्या अशी नावे धारण करून वाममार्गाने बीभत्स जीवन जगणाऱ्या आणि देवाला वाहिलेल्या मुलांनाही वरील संस्थेत आश्रय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण मिशनमधील विद्यार्थ्यांच्या साहाय्याने ही सभा व्यवस्थित पार पडली. इ.स.१९११ मध्ये याच प्रश्नावर त्यांनी मुंबई मुरळी प्रतिबंधक परिषद भरविली.

३०) वाईच्या ब्राम्होसमाजाची स्थापना करण्यास त्यांनी मदत करुन त्यामार्फत वाई तालुक्यात कार्य केले. त्यामध्ये त्यात वाई तालुक्यातील गावामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्योद्धाराचे व अंधश्रद्धा दूर व्हावी यासाठी ठिकठिकाणी भाषणे केली. त्यामुळे लोकांच्यात जागृती होण्यास मदत झाली. तसेच या समाजामार्फत राबविलेल्या उपक्रमात बोपेगाव येथील हरिजन वस्तीस मदत, श्री शिवाजी वाचनालयाची निर्मिती, श्री.एकनाथराव घोरपडे यांचा ब्रह्मविवाह, राममोहन विद्यार्थी गृह, वाईतील चौक व रस्त्याचे नामकरण, महर्षी शिंदे स्मारक निधी, महर्षी शिंदे विद्यामंदिर, जीर्णोद्धार फंड इ.कामे केली. तसेच वाईतील या ब्राम्हो समाजास महात्मा गांधी यांनी भेट देऊन गौरवोद्गार काढले.

३१) डिप्रेस्ड क्लासेस मिशनची सन १९०६ मध्ये स्थापना करून त्याद्वारे जे उपक्रम राबविले त्यामध्ये प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा सुरू करणे, गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनाची तयारी करण्यासाठी उद्योगशाळा चालविणे, विद्यार्थी वसतिगृहे, मोफत दवाखाने, धर्म व नीती शिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, जातिभेद व मूर्तिपूजा यांना वगळून चालविण्यात येणारी उपासनालये असे अनेक उपक्रम मिशनच्यावतीने चालविण्याचे निश्चित झाले. मिशनने प्रारंभीच्या काळात पुढील संस्था सुरू केल्या होत्या. मुलांसाठी एक व मुलीसाठी एक शाळा, नोकरी करणाऱ्या लोकांसाठी रात्रशाळा, धर्मार्थ दवाखाना, वाचनालय व ग्रंथालय, मुलांसाठी तालीम, महिलासाठी शिवणवर्ग, प्रार्थना व व्याख्याने इत्यादीचा समावेश होत होता.

या डिप्रेस्ड क्लास मिशनचा विस्तार मोठया प्रमाणावर होऊन त्याच्या शाखा परळ, देवनार, मदनपुरा, कामाठीपुरा, पुणे, मनमाड, इगतपूरी, इंदूर, अकोला, अमरावती, दापोली, मंगळूर, मद्रास, महाबळेश्वर व नाशिक इत्यादी ठिकाणी झाला. तर कार्याचा विस्तार हा मुंबई, पुणे, हुबळी, सातारा, ठाणे, दापोली, मालवण, मंगलोर, मद्रास, अकोला अमरावती, इंदूर,

भावनगर व कोल्हापूर याठिकाणी अस्पृश्यासाठी शाळा काढल्या होत्या. शाळा, दवाखाने, वसतिगृहे, उद्योगालये चालविणे, त्यासाठी सहकारी मिळविणे, देणग्या गोळा करणे, लहानमोठ्या परिषदा भरविणे असा मोठा व्याप त्यांनी वाढविला. ही जटील समस्या राजकीय आणि राष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी भारतभर प्रयत्न केले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुणे येथे सन १९१७ मध्ये 'अस्पृश्यता निवारक संघाची' स्थापना करण्यात आली. या संघाच्याद्वारे अस्पृश्यांसंबंधी वेळोवेळी जे राजकीय प्रश्न निघत त्यावर विचार करण्याची गरज होती. त्यात मिशनवर कोणतेही संकट येऊ नये, अशी त्यांची मूलतः दृष्टी होती. या संघामार्फत काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात 'अस्पृश्यता निवारणा'चा ठराव पास करून घेण्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. त्यासाठी अस्पृश्यता निवारक परिषद घेतली. या परिषदेत दोन ठराव पास केले होते. त्यात अस्पृश्यांच्या कल्याणासाठी विविध योजनाची दखल घेतली गेली होती.

अस्पृश्यता निवारणाचे कार्य विविध संस्थात्मक माध्यमातून सुरू असताना सन १९१२ मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिशनचे ठाणे पुण्यास आणले. तेथे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अहिल्याश्रमाची उभारणी केली. पुण्यासारख्या वाढत जाणाऱ्या अफाट शहरात अस्पृश्य बांधवांचे 'आधारकेंद्र व्हावे', अहिल्याश्रमातील भव्य इमारतीत अस्पृश्यांच्यासाठी शिक्षणकेंद्र, विद्यार्थी वसतिगृह त्यांना रोजगार मिळून स्वाभिमानाने जीवन जगता यावे यासाठी याची स्थापना केली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना करून त्याद्वारे अस्पृश्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा फार मोठया प्रमाणावर प्रयत्न केला होता. त्यात त्यांना यशही मिळालेले दिसून येते. मिशनचे काम प्रत्यक्ष पाहून काही नामांकित व्यक्तींनी या कामाबद्दल प्रोत्साहनपर अभिप्राय प्रकट केला आहे. लाला लजपतराय म्हणतात की, धार्मिक आणि परोपकारी मंडळीनी देशामध्ये चालविलेले हे अत्यंत पवित्र कार्य आहे. डॉ.भांडारकर म्हणतात की, विवेकशिलता ही अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हयांच्या प्रांतावर हल्ला करण्याचा जो सांप्रत काळ आहे. त्याचे निदर्शक म्हणजे ही संपूर्ण संस्था होय. टाइम्स ऑफ इंडियाचे संपादक स्टॅन्ले रीड यांनी म्हटले आहे, संस्थेच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या शाळांचे काम हे विशेषत्वाने स्तुत्य आहे. अस्पृश्यवर्ग हया शब्दप्रयोगापेक्षा अधिक महाभयंकर शब्दप्रयोग

भाषेमध्ये असू शकत नाही. मिशनने चालविलेले उदात्त कार्य अंतःकरणातील मर्माला स्पर्श करणारे आहे.

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्रत्यक्ष मुख्यतः हिंदू धर्मसुधारक नेते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या धार्मिक व सामाजिक अशा क्रांतिकारक सुधारणांची त्यांनी प्रशंसा केली. सत्यशोधक समाजाला लागलेले अनिष्ठ वळण नाहीसे होऊन त्याला उदात्त व स्वरूप यावे असा त्यांचा प्रयत्न होता. ज्याप्रमाणे ते ब्राम्हो व प्रार्थना समाज हे खेडयापाडयात जावेत म्हणून झटले, तसेच सत्याग्रहाची चळवळ बहुजन समाजात पसरावी म्हणूनही त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. यशापयशाला ते समान मानीत होते. अंधश्रद्धा नाहीशी होऊन डोळस श्रद्धा वाढावी यासाठी त्यांनी अध्यात्मप्रधान ब्राम्हो समाजाचे माध्यम उपयोगात आणले. शिंदे हे धर्मशास्त्रज्ञ समाजशास्त्रज्ञ, विविध भाषा व्युत्पत्तीतज्ञ होते. ऋषितुल्य व्यक्तित्व व परमेश्वरावर निष्ठा लोकांच्या प्रचितीस आल्यामुळे लोक त्यांना महर्षी म्हणू लागले. प्रभावी वक्ते, मार्मीक लेखक, इतिहास संशोधक, वगैरे अनेक दृष्टीने ते अष्टपैलू होते. कोणत्याही समकालीन विचारप्रवाहाला सर्वथा प्रमाण न मानता शिंदे स्वतंत्र व स्वावलंबी विचार आणि आचाराचे राहिले. तुलनात्मक व समन्वयक पद्धतीचे पुरस्कर्ते असल्यामुळे कुशल संघटकही होते. असा हा धर्मचिंतक, तत्त्वचिंतक व कर्ता समाजसुधारक हा एकमेव वाटतो.

आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल, १८७५ रोजी केली. या समाजाने आपली तत्त्वे मांडताना वेदांना अंतिम प्रमाण मानले होते. आर्य समाजाने धार्मिक सुधारणामध्ये हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, पौराणिक अनुष्ठाने या गोष्टी नाकारल्या. आर्य समाजाने सामाजिक चळवळ हाती घेतली. जातिव्यवस्था, जातिभेद व अस्पृश्यतापालन यास आर्य समाजाने विरोध केला. आर्य समाजाने बालविवाह, कायम वैधव्य, विधवांना हीन मानणे, पडदापद्धती, हुंडा पद्धती, बहुपत्नी विवाह, देवदासी प्रथा अशा वाईट प्रथांवर कठोर प्रहार करीत आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. राजर्षी शाहू महाराज यांनी आर्य समाजास कोल्हापूर येथे उदार हस्ते आर्थिक मदत केली. याचे कारण आर्य समाजाने वेदोक्त व वेद सर्वाना खुले केले. आर्य समाजामार्फत कोल्हापूर येथे हायस्कूल व कॉलेज दिर्घकाळपर्यत चालले होते. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला. राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१८ च्या आरंभी कोल्हापूर येथे आर्य समाजाची स्थापना करण्यास

प्रोत्साहन दिले होते. आर्य समाजाकडे राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल चालविण्यासाठी दिले होते. कोल्हापूरातील काही शाळेत महर्षी दयानंदाचा 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ मराठी विद्यार्ध्यांना सक्तीचा म्हणून त्यांनी सुरू केला. कोल्हापूर व जोतिबाच्या रस्त्यावर केर्ली येथे गुरूकुल स्थापन केले. त्याचवर्षी राजाराम अनाथाश्रम ही संस्था आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांना चालविण्यास दिली. त्यांच्या आर्थिक मदतीची सोय केली. अशा प्रकारे आर्य समाजाच्या कार्याला चालना देऊन आपल्या धार्मिक सुधारणेच्या कार्याची दिशा त्यांनी स्पष्ट केली. राजर्षी शाहू महाराजांनी आर्य समाजाच्याबाबतीत आपले विचार परखडपणे मांडून त्या समाजासाठी कोल्हापूर येथे मोठया प्रमाणावर कार्य केलेले दिसून येते.

प्रारंभीच्या काळात राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाकडे लक्ष दिले नव्हते. म्हणूनच त्यांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व, अस्पृश्यता इ.बाबीवर त्यांची श्रद्धा होती. आधुनिक महाराष्ट्रात बुद्धिप्रामाण्यावर अधिष्ठित समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे असे मानणाऱ्या महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. जातीभेद पाळणे हा धर्म नव्हे. निर्मिकाला नैवेद्याची किंवा मध्यस्थांची जरूरी नाही. शूद्र किंवा अतिशूद्र पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद झाली पाहिजे असे या सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण होते. छत्रपती शाहू महाराजांनाही वेदोक्त प्रकरणानंतर भट–भिक्षुकांच्या प्रवृत्तीची जाणीव झाली होती. त्यामुळेच ते या समाजाच्या विचारसरणीकडे आकर्षित झाले. ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात महाराजांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

राजर्षी शाहू महाराजांच्या चळवळीला राजाश्रय मिळाला. सत्यशोधक समाजाच्या कार्यालयासाठी राजर्षी शाहू महाराजांनी गंगावेशीतील जागा दिली. शाहू महाराजांनी आर्थिक उन्नती करून घेण्याचे व पर्यायाने बहुजन समाजाच्या विकासाचे आवाहन केले. सत्यशोधक समाजाच्या या प्रसाराच्या कामी महाराजांना अनेक सहकाऱ्यांनी मदत केली. राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचाच अधिक पुरस्कार करून त्यांचे कार्य पुढे चालविले होते. महात्मा फुले यांची सत्यशोधक समाजाची चळवळ राजर्षी शाहू महाराजांच्या कणखर नेतृत्त्वामुळे महाराष्ट्रात सर्वत्र पसरली. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर काही काळ ही

चळवळ अक्षरशः मृतवत झाली होती. परंतु या चळवळीला लाभलेले राजर्षी शाहू महाराजांचे नेतृत्त्व संजीवनी ठरले. त्यांच्यामुळे हया चळवळीत प्राण ओतला गेला.

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्य यात बरेचशे साम्य होते. ब्राम्हणांची धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढणे, जातिभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, अज्ञानी जनतेमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणे, यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. एका अर्थाने हे कार्य सत्यशाोधक समाजाचेच कार्य होते, आणि म्हणूनच त्या समाजाचे अनुयायी महाराजांच्या वेदनिष्ठेचा बाऊ न करता त्यांना सत्यशोधकी मानत होते. यात समाजाच्या अनुयायांच्या विचारांची गफलत नव्हती. तर महाराजांच्या कार्याचे वास्तव मूल्यमापन होते. याचा अर्थ असा होतो की, स्वतःस आर्यसमाजी म्हणवीत असता महाराज प्रत्यक्षात सत्यशोधक समाजाचे खरे कार्य करीत राहिले होते. पण तसे करीत असता आपल्या कार्यास सत्यशोधक समाजाचे लेबल लावण्याचे त्यांनी जाणीवपूर्वक टाळले होते.

कोल्हापूर संस्थानात जैन व लिंगायत या धर्मातील लोकसुद्धा मोठया प्रमाणावर होते. या दोन्ही समाजांच्या धार्मिक गरजांकडे राजर्षी शाहू महाराजांनी लक्ष पुरविले होते. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी धर्मजिज्ञासेपोटी अनेक धर्मांना, पंथाना, धार्मिक सुधारणावादी संघटनाना जवळ केले. त्यांना राजाश्रयही दिला. त्यांच्या तत्वज्ञानाचा परिचय करून घेतला. 'धर्म' या विषयासंबंधी त्यांचे विचार म्हणजे त्यात सुधारणा झाल्या पाहिजेत. तो अधिकाधिक समतावादी झाला पाहिजे. अशी त्यांची तळमळ होती. म्हणूनच त्यांनी 'वैदिक स्कूल' किंवा 'क्षात्रजगद्‌गुरू' यासारखे प्रयोग धर्माच्या क्षेत्रात केले होते. असेच काही धर्मासंबंधी मूलगामी विचार मांडले होते. महाराजांचे गुरू सर फ्रेझर यांनी म्हटले आहे की, 'अकबर बादशहाप्रमाणे एखादा नवीन धर्मपंथ स्थापन करता येतो, की काय याची चाचपणी महाराजांनी केली होती.' परंतु राजर्षी शाहू महाराजांना असे ही वाटत होते की, जसा सम्राट अकबराचा दिने ईलाही पंथ सम्राट अकबरानंतर अस्ताला गेला तसा आपलाही पंथ आपल्याबरोबर अस्ताला जाईल. म्हणूनच त्यांनी नवीन धर्मपंथ स्थापन करण्यापेक्षा अस्तित्त्वात असलेल्या आर्य समाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी आदी सुधारणावादी धर्मपंथांना राजाश्रय देऊन

त्यांच्यामधील चांगल्या तत्वांचा पुरस्कार समाज सुधारणेसाठी करण्याचे त्यांनी योजिले आणि त्याला अनुसरून त्यांनी आपल्या स्वतःच्या पद्धतीने त्यांची अंमलबजावणी केली.

महाराष्ट्रात ब्राम्हणेत्तर समाजाच्या जागृतीची अनेक केंद्रे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याच्या प्रेरणेने उभी राहिली होती. या केंद्राकडून ब्राम्हणेत्तर समाजासाठी शैक्षणिक संस्था व वसतिगृहे स्थापन झाली. या शैक्षणिक कार्याबरोबर समाज जागृतीचेही अनेक सत्यशोधकी उपक्रम हाती घेतले गेले. त्यांनी जातिनिहाय वसतिगृहे उघडली. अस्पृश्यांसाठी वेगळ्या शाळा व वसतिगृहे उघडली. त्यांनी जातिनिहाय वसतिगृहे उघडण्याचे कारण म्हणजे त्यावेळची वास्तव परिस्थिती होती. ब्राम्हणासहित सर्व जातींची मुले आलेली पाहून राजर्षी शाहू महाराजांना आनंद वाटत होता. परंतु काही दिवसानी वसतिगृहातील उच्चवर्णीय ब्राम्हण विद्यार्थी इतरवर्णीय विद्यार्थ्यांना हीन लेखू लागले.

सन १९०८ मध्ये 'अस्पृश्य मानलेल्या जातींत विद्याप्रसार करणारी मंडळी' या नावाची संस्था राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने स्थापन करण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात वृत्तपत्रांच्या क्षेत्रात ब्राम्हणांची मक्तेदारी होती. अशावेळी ब्राम्हणेत्तर पक्षाची बाजू समर्थपणे मांडणाऱ्या ब्राम्हणेत्तर वृत्तपत्रांची गरज राजर्षी शाहू महाराजांना वाटत होती. सन १९१९ ते १९२१ या कालखंडात राजर्षी शाहू महाराजांचे मद्रासच्या ब्राम्हणेत्तर चळवळीचे डॉ.माधवन नायर, सर पी.त्यागराज चेट्टी, सी.नटेश मुदलियार, सर शंकरन नायर आदी नेत्यांशी संबंध प्रस्थापित करून त्यास सहकार्य केले होते. मद्रासच्या ब्राम्हणेत्तर चळवळीविषयी व तिच्या नेत्यांविषयी राजर्षी शाहू महाराजांच्या मनात मोठी आदरभावना होती. महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीला राजर्षी शाहू महाराजांचे नेतृत्त्व लाभले होते. स्वतः राजर्षी शाहू महाराजांचा प्रयत्न हा ब्राम्हणेत्तर चळवळीची सूत्रे आपल्या हाती ठेवण्याचा होता. पण असे करीत असताना आपण ब्राम्हणेत्तर चळवळीचे प्रमुख नेते आहोत, असे कधी भासवून दिले नाही.

राजर्षी शाहू महाराज यांनी कामगार वर्गास ऐक्याचे व संघटीत होण्याचे आवाहन केले. कारण त्यावेळी देशात कामगारांच्या संघटना व्यापक पायावर उभ्या राहिलेल्या नव्हत्या. राजर्षी शाहू महाराज यांनी व्यक्त केलेल्या विचारातूनच पुढे सन १९२० मध्ये 'अखिल भारतीय कामगार संघटने'ची (आयटक) स्थापना झाली. तिचे अध्यक्ष म्हणून काँग्रेसचे नेते लाला

लजपतराय यांची निवड झाली. तसेच सन १९२५ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. तसेच कॉ.श्रीपाद अमृत डांगे व कॉ.मिरजकर यांचा कामगार नेते म्हणून उदय झाला. यावरूनच शाहू महाराजांनी संस्थात्मक कार्य केलेले दिसून येते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोन समाजसुधारकांच्या सामाजिक कार्यास त्यांच्या कुटुंब व आप्तेष्टांची पार्श्वभूमी होती. त्यातूनच त्यांच्यावर झालेल्या संस्कारातून त्यांचा पिंड समाजसुधारकाचा बनलेला होता. राजर्षी शाहू महाराज यांना तर कोल्हापूर येथील भोसले घराण्यात दत्तक घेतल्याने त्यांच्यावर राजघराण्यातील संस्कार झालेले असतानाही त्यांनी समाजसुधारणेचे संस्कार होऊन सहाजिकच ते समाजसुधारणेकडे आकर्षित झाले होते. राजर्षी शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडण ही फ्रेझरसाहेबांनी घडविली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोघांच्यामध्ये परस्पर संबंध प्रदीर्घ काळ होते. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आकलनात आणि प्रतिक्रिया प्रकट करण्यात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. मनाची आध्यात्मिक ठेवण, व्यापकपणे विचार करणारी जीवनदृष्टी, तरल संवेदनशीलता, सूक्ष्म सौंदयदृष्टी, भाषेच्या सामर्थ्याची यथोचित जाण इत्यादी वैशिष्टे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सांगता येतील. शाहू महाराज यांचेकडे अनेक लोकांशी संवाद साधण्याचे कौशल्य होते. त्यांची वागणूक ही निगर्वी व नम्रतेची होती. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वावर डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी, प्रार्थना समाज, आर्य समाज व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव पडलेला होता. त्यातूनच ते सामाजिक सुधारणा चळवळीकडे वळलेले दिसून येतात.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रार्थना समाजाचे प्रभावी प्रचारक होते. महर्षी शिंदे यांच्या मनावर केशवचंद्र सेन यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेऊन रीतसर ब्राम्हो समाजाचे अनुयायी झाले. याच दृष्टिकोनातून राजर्षी शाहू महाराज यांनी प्रार्थना समाजालाही मदत केलेली दिसते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज या दोघांच्या या मदतीमुळे प्रार्थना समाजास चालना मिळण्यास मदत झाली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे प्रार्थना व ब्राम्हो समाजाचे तर राजर्षी शाहू महाराज हे आर्य समाजाचे चाहते होते. तरीदेखील ते दोघेही महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारप्रणालीचे मनस्वी चाहते होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची तत्वप्रणाली

म्हणजे दुसरे तिसरे काही नसून दीन–दलित बहुजनांची अभिजनांच्या आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्याचा जाहीरनामा होता, असा दोघांचाही ठाम विश्वास होता. शाहू महाराजांचे शिक्षणविषयक वैचारिक जडणघडण ही सत्यशोधक समाज व आर्य समाज या दोन्हीतून झालेली दिसून येते. दोन्ही समाजातील जी शिक्षणविषयक तत्त्वे त्यांना योग्य वाटली त्याचाच स्वीकार त्यांनी केलेला दिसतो. अस्पृश्य शिक्षण व स्त्रीशिक्षणविषयक समाजजागृती हे विचार महात्मा फुले यांचेकडून शाहू महाराजांनी घेतले होते. सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी घातला. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर त्यांचे अस्पृश्य दलित समाजाच्या दारापर्यत शिक्षण पोहचविण्याचे कार्य शाहू महाराज यांनी केले. म्हणून ते महात्मा फुले यांचे वारसदार मानले जातात.

या दोन्ही समाजसुधारकांनी सत्यशोधक समाजास विरोध न करता उलट त्याचे अनुकरण करून सत्यशोधक समाजाचे कार्य आपापल्यापरीने चालू ठेवले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना व ब्राम्हो समाजाचे कार्य करताना सत्यशोधक समाजातील तत्वांचा प्रसार केलेला दिसून येतो. त्यामध्ये अस्पृश्यता निवारणासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना करून त्याद्वारे अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक समाजाचे कार्य चालू ठेवले होते. त्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबलिले होते. त्यामध्ये अस्पृश्यता निवारण, वसतिगृहाची स्थापना, वेदोक्त प्रकरण, ब्राम्हणेत्तर चळवळीस मदत वगैरे गोष्टी राबवून महात्मा फुले यांचे सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे चालविले.

अस्पृश्यतेचा समूळ नायनाट झाल्याशिवाय हिंदू समाज एकसंघ होणार नाही. हा दृष्टीकोन समोर ठेवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी आपापल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून सर्वस्व पणाला लावून अस्पृश्यतेच्या विरोधात उभयतांनी संघर्ष केला होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे केवळ समाजसुधारक नव्हते तर ते अस्सल दर्जाचे संशोधक होते. इतिहास, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र आदी विषयांचे गाढे अभ्यासक होते. केवळ सहभोजने आणि मंदिर प्रवेश या गोष्टी अस्पृश्यता ही हिंदू समाजाला जडलेल्या रोगावरील वरवरची मलमपट्टी होती, हे मर्म महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूर्ण ओळखून होते. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता समूळ नष्ट करण्यासाठी आयुष्यभर अस्पृश्यतेचे मूळ

शोधून काढण्यासाठी स्वतःला संशोधनात गाढून घेतले होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकरी चळवळीत भाग घेऊन त्यात नवे राजकीय विचार आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेतकरी हा एक समग्र समाजघटक नसून त्यात वर्गीय विभाजन होत आहे, हे त्यांनी जाणले होते. राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्याविषयी कार्य करताना शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळावर उपाययोजना करण्याचे ठरविले. त्यादृष्टीने त्यांनी स्पिनींग अँड वीव्हिंग मिल १७ सप्टेंबर १९०६ रोजी कोल्हापूर येथे सुरू केला. त्याचे नाव 'शाहू मिल' असे ठेवले. शाहू महाराजांनी पंचसूत्री योजना आखून घेतली होती. ब्रिटिश व इतर संस्थानात शेती सुधारणेसंबंधी कसलेही धोरण अस्तित्त्वात नव्हते. शाहू महाराजांनी शेती सुधारणेला बहुजन विकासवादाची जोड दिली. शाहू महाराजांनी शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी दाजीपूरजवळील फेजिवडे येथे भोगावती नदीवर धरण बांधले. धरणामुळे होणाऱ्या जलाशयाला 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव'. नाव देण्यात आले.

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात शेतकऱ्यांसाठी फार मोठे कार्य केले होते. या धरण प्रकल्पाने हरितक्रांती झाली, कोल्हापूर राज्याचा कायापालट झाला. शेतीसाठी बारमाही पाणीपुरवठा व्हावा यादृष्टीने कालवे व धरण योजना अमलात आणून कोल्हापूर राज्यात हरितक्रांती घडवून आणण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना राजर्षी शाहू महाराजांच्याविषयी फार आदर होता. या दोघांची वैचारीक जडणघडण एकसारखी होती. एवढेच नव्हेतर या दोघांच्यामधील कार्य करण्याची प्रगल्भताही एकसारखी असलेली दिसून येते. या दोघांनी अस्पृश्यांच्या स्त्रियांच्या व मागासलेल्या लोकांच्या उद्धारासाठी फार मोठे कार्य केले दिसून येते. एक राजा असूनही राजर्षी शाहू महाराजांनी सामान्य जनतेसाठी केलेले हे कार्य बहुमोल होते. शेवटी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनीही त्यांच्या या कार्याचा गौरव केलेला दिसून येतो.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व शाहू महाराज यांनी समाजात सुरू असलेल्या वाईट प्रथा बंद करण्यासाठी मोठया प्रमाणात कार्य केले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रीशिक्षण, होलिका उत्सव, मद्यपान बंदी, मुरळी प्रथा या विषयावरही चळवळी करून आपले सांस्कृतिक जीवन जास्त शुद्ध आणि आनंददायी करण्याचा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांनी

सामाजिक, आर्थिक, धार्मिक सुधारणाबरोबरच स्त्री उन्नतीसाठी अनेक कायदे केले. मुरळी पद्धतीस प्रतिबंधक घालण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराजांनी जोरदार प्रयत्न केला.

एकोणीसावे व विसावे शतकाच्या कालखंडातील भारतीय समाज अनेक बंधनामध्ये अडकला होता. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, अस्पृश्यता, जातिभेद इ. घटकांचा पगडा समाजामध्ये होता. उच्च वर्गातील समाज शिक्षण घेत असत. परंतु सर्वसामान्य अस्पृश्य जातीतील, पददलित समाज शिक्षणापासून वंचित होता. अंधारामध्ये तो चाचपडत जीवन जगत होता. त्यांच्यात दीप लावण्याचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी केले. या अस्पृश्य समाजाला न्याय हक्काने भांडण्यासाठी शिक्षणाची सोय निर्माण करून दिली. या दोन महान व्यक्तींचे अस्पृश्य समाजासाठी केलेले कार्य फार मोलाचे आहे.

पाश्चात्यांच्या आगमनामुळे आधुनिक शिक्षणाचा परिचय भारतीयांना झाला होता. महात्मा फुले यांनी वंचितांसाठी शाळांची, शिक्षणाची परंपरा निर्माण केली व ही परंपरा पुढे चालविण्याचे महान कार्य या दोन विभूतीनी केले. एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील समाज सुधारणा चळवळीत ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर तसेच मराठा व मराठेतर असे भेद दिसून येतात. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अस्पृश्यांना सामाजिक व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या लेखनाच्या/साहित्याच्या माध्यमातून समाजसुधारणेचे परखड विचार मांडले. अस्पृश्य, पददलित, मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण महत्त्वाचे आहे, हे ओळखून शिक्षण संस्थांची स्थापना केली. या दोन महाविभुतीनी विचारांना कृतीची जोड देऊनच प्रत्यक्षात समाजसुधारणेसाठी कार्य केले. त्यासाठी त्यांना सामाजिक अवहेलना सहन करावी लागली. धार्मिक व सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांची दुरावस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याविषयी गौरवोद्गार काढताना न्यायमूर्ती सर नारायणराव चंदावरकर म्हणतात की, “इतिहास असे सांगतो की, ज्यापासून राष्ट्राचा विकास होतो अशा सर्व प्रकारच्या चळवळींचा उगम थोडयाशा व्यक्तींच्या कार्यात सापडतो. प्रस्तुतच्या बाबतीत

त्या व्यक्ती म्हणजे ज्यांची प्रथम हेटाळणी झाली ते डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे गृहस्थ होते. त्यांच्या कार्याने प्रचंड हिंदू समाजाची सदसद्विवेकबुद्धी जागृत झाली.”

न्यायमूर्ती भवानीशंकर नियोगी म्हणतात की, “शिंद्याचा ज्याला भरीव हातभार लागला नाही, अशी लोकसेवेची व समाजोन्नतीची चळवळ दाखवून देणे कठीण आहे. राजकारण, समाजकारण, धर्मकार्य, शिक्षणकार्य इतकेच नव्हे तर वाङ्मयसेवा आणि इतिहास संशोधन या सर्वात शिंद्याचा भाग आहे आणि फार महत्त्वाचा भाग आहे. ज्या काळी विधवा विवाहासारखे साधे प्रश्न सुटणे दुरापास्त होते अशा त्या घनदाट धर्मवेडाच्या काळात अस्पृश्योद्धाराची चळवळ सुरू करणे, डिप्रेस्ड क्लासेस मिशन संस्था काढणे, इतकेच नव्हे तर अस्पृश्यता जाऊन त्यांच्यापैकी एक झाल्याप्रमाणे त्यांच्यात वागणे या गोष्टीसाठी अतुल स्वमत धैर्याची, एवढेच नव्हे तर मूलमार्गी बुद्धिची व समाजाविषयी खऱ्या कळकळीचीही गरज होती. इतक्या व्यापक व सूक्ष्म दृष्टीची कार्यकर्त्याची दृष्टी संबंध देशाइतकी विशाल विस्तृत असावी लागते. म्हणूनच शिंदे सामाजिक चळवळीप्रमाणेच अनेक राजकीय चळवळीतही भाग घेताना दिसत.”

प्रा.गं.बा.सरदार म्हणतात की, “महाराष्ट्रात सामाजिक पुनरूत्थानाचे दोन भिन्न विचारप्रवाह दिसून येतात. एक लोकहितवादी भांडारकर रानडे–आगरकर यांचा आणि दुसरा महात्मा फुले आणि शाहू यांच्या दोघांच्याही कार्याचे महत्त्व आणि मर्यादा यांची शिंद्याना जाणीव होती आणि दोघांच्याही सहकार्याची त्यांना उत्कंठा होती. म्हणून शिंदे हे प्रार्थना समाज आणि सत्यशोधक समाज, उच्चवर्णीय आणि बहुजन समाज, शहरातील समाज आणि खेडयातील समाज यांना साधू पाहणाऱ्या दुव्यासारखे आहेत.”

डॉ.गो.मा.पवार म्हणतात की, “राजकारणातील त्यांची मते जहाल व बाणा स्वतंत्र होता. म्हणून मुंबई प्रार्थना समाजातील मवाळ थोरांना ते जवळचे राहिले नाहीत. तर राजकारण हे सर्वस्व असणाऱ्या एकांतिक राष्ट्रवादी जहालांना ते जवळचे वाटले नाहीत. शिंद्यांनी जातीय राजकारण वर्ज्य मानले म्हणून सगळया मराठयांना ते जवळचे वाटले नाहीत. कर्मठ कर्मकांडावर आघात करणारे बहुजनपक्षवाले म्हणून सनातन्यांना ब्राम्हणांना ते परकेच राहिले. मिशनसारखी मोठी संस्था ताब्यात घ्यायला उतावीळ झालेल्या अस्पृश्य पुढाऱ्यांनाही ते नकोसे झाले. त्यांची दृष्टी व्यापक होती. एकजुटीच्या तत्त्वावर ते काम करू पाहात होते.”

रँ.र.पु.परांजपे म्हणतात की, “भारताचा जेव्हा सामाजिक कामगिरीचा इतिहास लिहिला जाईल, यात कै.शिंदे यांना फार उच्च व मानाचे स्थान इतिहासकार देतील.”

राजर्षी शाहू महाराजांच्याविषयी अनेक थोर नेत्यांनी गौरवोद्‌गार काढलेले आहेत. त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात की, “शाहूराजा नुसता मराठी नव्हता, नुसता ब्राम्हणेत्तरही नव्हता, तो नवयुगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरूष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा एक मोठा स्वाभाविक तरंग होता.”

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा.श्री यशवंतराव चव्हाण राजर्षी शाहू महाराजांच्याविषयी म्हणतात की, “कसब, गुण, कर्तृत्त्व याविषयी शाहू महाराजांना अतिशय आस्था होती आणि समाजातील रंजल्या गांजल्याबद्दल कणव होती. त्यांचे शरीर अवाढव्य होते. तसेच त्यांचे मनही तसेच होते. यामुळे समाजातील गुणी व कर्तृत्त्ववान लोकांना महाराजांचा आधार होता. त्याचप्रमाणे लहानशा खेडयातून लहानशा माणसालाही आधार होता. सत्ताधारी हा असा असावा लागतो. म्हणून ते एक केंद्रबिंदू बनले होते. लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण धाव घेतात, त्याचप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे केवळ वारसा हक्काने राजे नव्हते, तर ते लोकांचे राजे होते.”

वि.स.खांडेकर म्हणतात की, “मानवावर केवळ मानव म्हणून प्रेम करणारे शाहू महाराजांचे मन लोकोत्तर होते. अन्यायाविरूद्ध झगडताना ते वज्रकठोर बने. पण वंचित व दुःखी लोकांच्या दर्शनाने ते कुसुमकोमल होई. पृथ्वीच्या पाठीवर अनेक सम्राट झाले असतील, अनेक राजाधिराज गाजून गेले असतील. पण समाजाच्या तळच्या मानवतेवर माणूस म्हणून पाखर घालणारे राजे फार थोडे झाले असतील. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे त्यापैकी एक होते.”

पु.ल.देशपांडे म्हणतात की, “महाराष्ट्राच्या राज्याच्या गळयात कवडयाची माळ’ असे म्हणतात. मला ती माळ फार सूचक वाटते. लोकांचा राजा म्हणून ज्याला जगायचे असते त्याने स्वतःचे जीवन कवडीमोल मानायची तयारी ठेवावी लागते. उपभोगातून स्वामी हयासारखी सत्ताधिशाला सुंदर बिरूदावली नाही. शाहू महाराजांना ती लाभली होती.”

डॉ.वि.भि.कोलते म्हणतात की, “शाहू छत्रपतींनी महाराष्ट्रातील बहुजन समाजाची मानसिक गुलामगिरी नष्ट केली. जन्मसिद्ध वर्णविषमतेची गुलामगिरी नाहीशी केली मनुष्याला

मनुष्याप्रमाणे वागविले पाहिजे, अशी मानवतावादाची शिकवणूक दिली. शाहू छत्रपती असे थोर स्वातंत्र्यवीर होते, राष्ट्रपुरूष होते, ऋषी होते.”

अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व राजर्षी शाहू महाराज यांच्याविषयी वरील महाविभूतींनी काढलेल्या गौरवोद्गारावरूनच त्यांचे मोठेपण समजून येते. त्यांनी महाराष्ट्रातील समाजात सुधारणा व्हावी, यासाठी अतुलनीय कामगिरी करून आपला नावलौकिक मिळविला होता. त्यामुळे संपूर्ण भारतभर त्यांची प्रसिद्धी झालेली होती.

राजर्षी शाहू महाराज हे पुरोगामी महाराष्ट्रातील एक थोर संस्थानिक म्हणून त्यांची ओळख त्यांचे स्थान अबाधित आहे. त्यांना बहुजन समाजाचा फार मोठा जनाधार लाभला आहे. मात्र महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना समाजसुधारणेच्या इतिहासाची चिकित्सा करता त्यांना मराठा समाजानेही स्वीकारलेले दिसत नाही व दलितांनीही आपला नेता मानले नाही. एक वंचित समाजसुधारक म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी केलेल्या समाज व धर्म सुधारणा पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र घडविण्यात महत्त्वपूर्ण होता. ते एक सुधारणेचे सोनेरी पान आहे. त्यांच्या कार्याची चिकित्सा हाच शोध प्रबंधाचा उद्देश व प्रयत्न होता. या शोधप्रबंधात वंचितासाठी केलेले कार्य अधोरेखीत केले आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची

## प्राथमिक साधने

### इंग्रजी


1. Kolhapur State P.W.D. Report on the Maharani Laxmibai Tank at Fejivada, 1909
2. Report on the General Administration of the Kolhapur state : 1907-08
3. Report on the General Administration of the Kolhapur state : 1906-07
4. The Reformrs Committee(Franchyaes) Vol.II, Superitedent printing Press, India, 1919, P.6754, 6733
5. DPR- Report of the Director of Public Instruction, Bombay Presidency for the year 1885
6. LAB – Latthe, memoirs of his Highness Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, vol. 1
7. LAB – Latthe, memoirs of his Highness Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, vol. 1
8. DPR- Report of the Director of Public Instruction, Bombay Presidency for the year 1885, P.85
9. Kolhapur Archives Series Descriptive Catalogue: Vol. 4.

Kunte B.G.(Ed.), Descriptive Catalogue of Papers Relating to Rajarshi Shahu Chhatrapati of Kolhapur (1884-1922 A.D) Vol.1, Department of Archives Government of Maharashtra.


### मराठी


१) आयर्न जे. डब्ल्यू., ख्रिस्ती धर्म मराठी विश्वकोश, खंड ४

२) ब्राह्मोसमाज वाई, वार्षिक अहवाल, १९५०

३) ब्राह्मोसमाज वाई, वार्षिक अहवाल, १९६९

४) ब्राह्मोसमाज वाई, ट्रस्ट रजिस्टर, १९३८

५) ब्राह्मोसमाज वाई, अहवाल व पंचवार्षिक कामगिरी, २६ मे, १९३८

६) ब्राह्मोसमाज वाई, वार्षिक अहवाल, १९३८

७) दिल्ली दरबार मेमोरियल पाटील स्कूल, प्रशासन अहवाल, १९१२–१३

८) डेक्कन एज्युकेशन असोसिएशन(पुणे), हीरक महोत्सव अहवाल, १९४५

९) दि. मोहमेडन एज्युकेशन सोसायटी, प्रशासकीय अहवाल, १९०७–०८

१०) करवीर सरकारचे गॅझेट, भाग – १, १२ जुलै १९१९

११) करवीर सरकारचे गॅझेट, भाग – १, २० मार्च १९२०

१२) करवीर सरकारचे गॅझेट, भाग – १, शनिवार दि. २६ जुलै १९०२

१३) कोल्हापूर आणि एस.एम.सी. संस्थानांचा शिरगणती अहवाल, १८९१ व १९२१

१४) कोल्हापूर संस्थान सर्वसाधारण अहवाल, १९१६–१९१७

१५) कोल्हापूर दरबारचा अहवाल– सन १९०९–१०

१६) कोल्हापूर रेकॉर्ड ऑफिस फाईल नं. ४३, शाहूची आज्ञा, १२ जून १९२०

१७) मँचेस्टर कॉलेज ऑफ फर्म येथील नोंदवही

१८) कोल्हापूर दरबारचा प्रशासकीय अहवाल, १९०७–०८

१९) कोल्हापूर दरबारचा प्रशासकीय अहवाल, १९१२–१३

२०) कोल्हापूर दरबारचा प्रशासकीय अहवाल, १९१५–१६

२१) कोल्हापूर दरबारचा प्रशासकीय अहवाल १९१८–१९

२२) कोल्हापूर दरबारचा प्रशासकीय अहवाल, १९१९–२०

२३) कोल्हापूर दरबारचा प्रशासकीय अहवाल, १९२१–२२

२४) राजर्षी शाहू महाराजांचे राजनैतिक प्रतिनिधी कर्नल वुडसाहेब यांना पाठविलेले पत्र, १९ जानेवारी १९१८

२५) शाहू महाराजांचे अॅडम्सना अप्रकाशित पत्र, कोल्हापूर पुराभिलेख संग्रहालय, क्र.आर.१,२,३,१४, २० ऑगस्ट, १९२०

२६) श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९५७, पृ.१३

२७) शिंदे वि. रा. यांचे ॲमस्टरडॅम येथे १९०३ मध्ये भरलेल्या उदार धर्माच्या सभेवर भाषण, लेख, व्याख्याने व उपदेश

२८) शिंदे विठ्ठल रामजी, युनिटेरियन समाज लेख, व्याख्याने व उपदेश

२९) शिंदे विठ्ठल रामजी, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, नवभारत ग्रंथमाला नं.६, प्रकाशक वेदशाळा बलकुंदी, नागपूर, १९३३

३०) वाई नगरपरिषद, वार्षिक अहवाल, १९३९–४०, पृ.९

## दुय्यम साधने

### इंग्रजी

1) Latthe A.B., Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, Vol. I, Bombay, 1924

2) Pawar A.G.(Ed.), Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Kolhapur, 1978

### मराठी

१) आपटे दाजी नागेश, श्री महाराज सयाजीराव गायकवाड(तिसरे) यांचे चरित्र–खंड २ रा, डिजिटल लायब्ररी प्रकाशन, बडोदा, १९३६

२) आठल्ये वि. भा., आधुनिक भारताचा इतिहास, अंशुल पब्लिकेशन, नागपूर, २००६

३) आढाव विलास, समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज, प्रथमावृत्ती, २८ नोव्हेंबर २००३

४) भोसले एस.एस.आणि सावंत शिवाजीराव, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे जन्मशताब्दी स्मृतिग्रंथ, साधना प्रकाशन, पुणे, १९७९

५) भोळे भा.ल., महर्षी शिंदे यांचे विचार विश्व, प्रकाशन रयत शिक्षण संस्था, सातारा, २००१

६) बिपिनचंद्र, डॉ. एम. व्ही. काळे, मराठी अनुवाद, आधुनिक भारत, के सागर, पब्लिकेशन, पुणे २००६

७) बिपीनचंद्र, मॉडर्न इंडिया, के सागर पब्लिकेशन, पुणे, २००४

८) बाबर रा.कृ., महर्षी शिंदे आणि वाई ब्राम्होसमाज, साकेत प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९१

९) बागल माधव खंडेराव, सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ १९३०, प्रथमावृत्ती, १९३३

१०) भिडे जी.एल., पाटील एन.डी, थोरात डी.एस., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑगस्ट २०११

११) चव्हाण रमेश, (संपा.), राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, रा.ना.चव्हाण जन्मशताब्दी वर्ष प्रकाशन पुणे, एप्रिल २०१३

१२) चौसाळकर अशोक, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची अप्रकाशित रोजनिशी; ब्राह्मोसमाज शतसंवत्सरी सफर, रणधीर शिंदे, एप्रिल ते जून, २०१२

१३) चौसाळकर अशोक, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे धर्मविषयक विचार, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, फेब्रुवारी २००९

१४) चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, २००३

१५) चौथाईवाले सुरेश यशवंतराव, शाहू महाराजंचे आरक्षणाचे धोरण व सद्यस्थिती, कैलास पब्लिकेशन्स, औरंगापुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,जानेवारी २००४

१६) दीक्षित राजा, इतिहास समविचार आणि केशवसूत, लोकवाङ्मयगृह मुंबई, १९९३

१७) दीक्षित नी. सी., आधुनिक भारत, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, २००३

१८) देशमुख रा.ज. व देशमुख सुलोचना, निवडक : श्री.म.माटे, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., पुणे, २५ डिसेंबर २००७, प्रास्ताविक १४

१९) धाटावकर भास्कर(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई, १९८८,

२०) गाठाळ एस.एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगापुरा, औरंगाबाद, २००५

२१) जावडेकर श. द., आधुनिक भारत, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००६

२२) जाधव भ.बा.(संपा.), राजर्षी श्रीशाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१,

२३) जाधव रमेश, शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक : एक शोध, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २७ मार्च २००७

२४) जाधव व्ही. के., आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००४

२५) ग्रोवर बी. एल. व बेल्हेकर एस., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी, दिल्ली, ४ मे २०१५

२६) जाधव रमेश, शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक : एक शोध, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २७ मार्च २००७

२७) झामरे देव, भारतीय अर्थशास्त्र, मनोहर पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर २००१

२८) कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दहावी आवृत्ती, १९९३

२९) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतिकारक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११

३०) कीर धनंजय, शाहू छत्रपती अ रॉयल रिव्हॉल्यूशनरी, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६

३१) कदम शंकरराव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, जुलै, २०००

३२) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती –एक समाजक्रांतिकारक राजा, मुंबई, पहिली आवृत्ती १९७९,

३३) लठ्ठे आ. ना., श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, बेळगाव १९२५

३४) मंगुडकर मा.प.(संपा.) महाराष्ट्रातील समाज–प्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य, प्रकाशक ग. ज. अभ्यंकर, कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७५

३५) माडखोलकर गं. त्र्यं., श्रध्दांजली, नागपूर प्रकाशन नागपूर, १९७४

३६) मून वसंत(संपा.), डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९०

३७) नाईकवाडे अशोक(संपा.), महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शोध व बोध, ज्ञानेश प्रकाशन औरंगाबाद, १९९५

३८) फडके य.दि., शाहू छत्रपती आणि लोकमान्य, विद्या प्रकाशन, पुणे, १९८२

३९) फडकुले निर्मलकुमार(संपा.), प्रबोधनातील पाऊलखुणा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९९८

४०) पवार शिरीष, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य, सहयाद्री प्रकाशन पुणे, २६ जून २०१२

४१) पवार बा.ग., एक उपेक्षित महामानव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, मातृभूमी प्रकाशन, पुणे, २०१०

४२) पवार गो. मा., महर्षी वि. रा. शिंदे जीवन व कार्य लोकवाङ्मयगृह प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती, ४ मे २००४

४३) पवार गो.मा.(संपा.), महर्षी शिंदे रोजनिशी, मराठवाडा साहित्य परिषद, सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, २६ जानेवारी १९७९

४४) पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, नॅशनल ट्रस्ट बुक इंडिया, नवी दिल्ली, २००७

४५) पवार जयसिंग(संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, (छत्रपती शाहू महाराज : एक अभ्यास प्रा.शेषराव मोरे, नांदेड यांचा लेख), प्रकाशक, डॉ.जयसिंगराव पवार संचालक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर , २५ मे, २००१

४६) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, सुमेरू प्रकाशन डोंबिवली, २००८

४७) पवार जयसिंगराव(संपा.), राजर्षी शाहू ग्रंथ प्रकाशक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २६ जून २००७

४८) पामदत्त रजनी, भारत आजचा आणि उद्याचा, लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती, जुलै, १९८६

४९) पाटील शामराव, धाटावकर भास्कर(संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे आदेश, भाग १, मुंबई, १९८८

५०) पाटील व्ही. बी., विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, २००४

५१) पाटणे संभाजीराव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: एक धगधगीत व्यक्तिमत्व, सौ.नंदिनी गवळी, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, १९८१

५२) शिंदे भानुदास(संपा.), महाराष्ट्रः काल, आज आणि उद्या, (चोरगे वैशाली दशरथ यांचा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य हा शोधनिबंध) महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, २००४

५३) शिंदे विठ्ठल रामजी, माझ्या आठवणी व अनुभव, श्रीलेखन वाचन भांडार, पुणे, १९५८

५४) संगवे विलास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कार्य व प्रभाव, एक्सप्रेस पब्लिसिंग हाऊस सोलापूर, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर २००१

५५) सरदेसाई बी.एन. व नलावडे व्ही.एन., आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोबर २००४

५६) साळुंखे पी.बी.(संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य संस्कृती, मुंबई, १९७६

५७) साळुंखे नानासाहेब, शाहूच्या आठवणी, कृष्णाली प्रकाशन कोल्हापूर, २०१२

५८) सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी १९८४

५९) शिंदे विठ्ठल रामजी, माझ्या आठवणी व अनुभव, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९९

६०) ठोंबरे तानाजी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी, लोकवाङ्मयगृह मुंबई, फेब्रुवारी २००९

६१) वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४

६२) वैद्य द्वा.गो., प्रार्थना समाजाचा इतिहास, प्रार्थना समाज, मुंबई, १९३५

**मुलाखती**

१) श्री. शेख इकबाल जहांगीर, मुख्याध्यापक, म.न.पा.शाळा नानापेठ पुणे शहर

२) श्री. तायडे संभाजी सुदाम, प्रभारी प्राचार्य, पुणे शहर

३) श्री. शेवाळे मधुकर धर्माजी, जनरल सेक्रेटरी, डी.सी.एम. सोसायटी, पुणे, महाराष्ट्र

४) श्री. माणिक दशरथ , मु. नाना पेठ, पुणे.

५) मुजावर मुस्ताक चाँदसो, सिनीयर लिपीक, मोहमेडन मुस्लिम बोर्डिंग, कोल्हापूर

६) चौगुले आर.अे., अधिक्षक, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर

७) कांबळे राजाराम वसंत, अधिक्षक, श्री इंदुमती विद्यार्थी वसतिगृह, कोल्हापूर,

८) विणकरे सुधाकर संभाजी, अधिक्षक, मिस क्लार्क होस्टेल, कोल्हापूर

९) भोपळे पाटील संजय महादेव, अधिक्षक, श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राम्हण विद्यार्थी वसतिगृह, दसरा चौक, कोल्हापूर

१०) चौले डी.आर., अधिक्षक, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, कोल्हापूर

**एम.फिल. लघुशोधप्रबंध(अप्रकाशित)**

१) बांगर राहूल कैलास, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्पृश्य मुक्ती मार्ग एक चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित एम.फिल. शोधप्रबंध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, दि. ३०.०४.२०१६

**वृत्तपत्रे व साप्ताहिके**

१) दै.सकाळ, कोल्हापूर, २१ एप्रिल १९९६

२) दै.केसरी, पुणे, २२ ऑक्टोबर १९०१

४) साप्ताहिक तरुण महाराष्ट्र, जनाबाई स्मृती चित्रे,(लेख) १७ जून १९०४

५) साप्ताहिक स्वधर्म, कोल्हापूर, २७ जुलै, १९२२

६) सुबोधपत्रिका, मुंबई, २९ जून १९१९

७) विजयी मराठा, मुंबई, २१ जानेवारी १९२४

# प्रश्नावली

१. संस्थेचे नांव:----------------------------------------

२. संस्थापक: -----------------------------------------

३. संस्थेचे कामकाज कोण पाहतो. (सेक्रेटरी):- ------------------------

४. स्थापना वर्ष : ----------------------------------------

५. संस्था स्थापनेचा उद्देश: ----------------------------------

----------------------------------------------

६. संस्थेत कोणत्या विदयार्थ्यांना प्रवेश दिला जातो:----------------------

७. विद्यार्थी प्रवेशासाठीचे निकष: --------------------------------

----------------------------------------------

८. प्रत्येक वर्षी किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात : --------------------

----------------------------------------------

९. विद्यार्थ्यांना सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी कोणते प्रयत्न केले जातात:- -------

----------------------------------------------

१०. शिक्षणासाठी संस्थेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय काय?:-------

----------------------------------------------

११. विद्यार्थी संस्थेत प्रवेश घेण्यासाठी कुठल्या परिसरातून आले आहेत?

त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी संस्थेमार्फत कोणते प्रयत्न केले जाते:---------

------------------ ----------------------------

१२. संस्थेस शासनाकडून मिळणाऱ्या सोयी सुविधा: ---------------------

----------------------------------------------

१३. संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी कोणकोणत्या पदावर गेले : ---------------

----------------------------------------------

१४. संस्थेस परदेशी व्यक्तींची मदत होते का ? कोणत्याप्रकारे---------------

----------------------------------------------

१५.संस्थेच्या इतरत्र कोठे शाखा आहेत का?: ------------------------

१६. संस्थेचा कारभार करण्यासाठी आर्थिक मदत कशी होते : ----------------

----------------------------------------------

१७. कोणकोणत्या स्तरातून होते : ----------------------------

१८. संस्थेचे ध्येय कितपत साध्य झाले : ---------------------------

----------------------------------------------

१९. संस्थेची पुढील ध्येये उद्दीष्टे कोणती ? : ------------------------

२०. अस्पृश्य, मागास, वंचित, विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी संस्थेमार्फत कोणते विशेष प्रयत्न केले जातात : ----------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

२१. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी संस्था कोणते प्रयत्न करते: ------

----------------------------------------------

----------------------------------------------

२२. अशा मुलांसाठी कोणती सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मदत करते: ----------

----------------------------------------------

----------------------------------------------

२३.या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आलेख उंचावला काय ? : -------------------

----------------------------------------------

२४. स्त्रियांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी ही संस्था काय प्रयत्न करते?: --------

----------------------------------------------

---------- -----------------------------------

२५. स्त्रियांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी ही संस्था विशेष कार्य करते का?: -------

----------------------------------------------

----------------------------------------------

२६.स्त्रियांच्या विकासासाठी संस्थेकडून कोणते विशेष कार्य केले जाते : -----------

--------------------------------------------

--------------------------------------------

२७. संस्थेच्या कार्यात स्त्रियांचा सहभाग कशाप्रकारे घेतात? ----------------

--------------------------------------------

--------------------------------------------

२८. स्त्रिया स्वावलंबी बनण्यासाठी संस्थेकडून कोणकोणत्या प्रकारचे उदयोग, व्यवसायायिक प्रशिक्षण दिले जाते : ---------------------------------------

--------------------------------------------

२९. स्त्रियांना या व्यवसाय प्रशिक्षणाचा किती उपयोग झाला हे कसे तपासता: --------

--------------------------------------------

--------------------------------------------

३०. व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रिया राष्ट्रीय स्तरावर आपल्या उद्योगाचे प्रदर्शन करण्यासाठी आपण कोणते प्रयत्न करता? : --------------------------

--------------------------------------------

--------------------------------------------

३१.संस्थेमार्फत विशेष उदयोग प्रशिक्षणासाठी स्त्रियांना परदेशी दौऱ्यावर पाठवले जाते का ?

--------------------------------------------

--------------------------------------------

--------------------------------------------

३२. शेतकरी वर्गाच्या विकासासाठी संस्थेमार्फत कोणते काम केले जाते? ----------

--------------------------------------------

--------------------------------------------

३३. भूमिहीन शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी संस्था कोणते प्रयत्न करते ? ------

--------------------------------------------

--------------------------------------------

३४. नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी संस्थेमार्फत शेतकऱ्यांना कोणते मार्गदर्शन, प्रशिक्षण मिळते-----------------------------------------------

-----------------------------------------------

३५. किती टक्के शेतकरी या मार्गदर्शनाचा लाभ घेतात---------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३६. शेतकऱ्यांच्या विकासासाठी परदेशी दौऱ्यांचे आयोजन केले जाते का ? ---------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३७. या दौऱ्यासाठी शेतकऱ्यांची निवड करताना कोणते निकष लावता? -----------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३८. शेतकऱ्यांना संस्थेमार्फत मिळणाऱ्या लाभाचा फायदा झाला हे कसा तपासून पाहता? -

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३९. आधुनिक बि-बियाणे, खते, किटकनाशके, नैसर्गिक आपत्ती यांची सांगड घालण्यासाठी शेतकऱ्यांसाठी कोणते विशेष प्रयत्न केले जातात. ------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

मुलाखत घेणाऱ्याची नांव व सही　　　　　　मुलाखत देणाऱ्याची नांव व सही

परिशिष्टे १ – महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे मराठीतील हस्ताक्षर


गौतम बुद्धाचा उदय म्हणजे भारतीय (हिंदुस्थानच्या आजपर्यंतच्या इतिहासातील) इतिहासांतील एक मोठी मुहूर्तमेढ होय. कोणत्याही ऐतिहासिक विषयाचें विवेचन करावयाचें झाल्यास ह्या मेढीपासून पुढें मागीकडे व मागें पाठीकडे शोध करीत जावें लागतें आणि आम्हांला हि अस्पृश्यतेच्या खऱ्या भावनेसाठी ह्या दोन दिशांनी ह्या मेढीपासूनच आगमागें गेलें पाहिजे. म्हणून प्रथम प्रत्यक्ष बुद्धोदयकाळी म्हणजे इ.स. पूर्वी ६०० वर्षांचे सुमारास अस्पृश्यतेची उत्पत्ति निर्दिष्ट परंपरेच्या दृष्टीनें किती प्रतिष्ठा झाली होती तें पाहूं. ह्या काळीं उत्तर भारतांत चार वर्णांची आर्यांनी तर पूर्ण स्थापना केली होतीच, परंतु ती वर्णव्यवस्था जन्मजन्य म्हणून सिद्ध मानली जात असे. ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्या दोन्ही जाती डोयीजड झालेल्या असून त्यांच्यांत परस्पर वरचष्म्या संबंधी तंटा चालू होता. शूद्रच नव्हेत तर वैश्य आणि स्त्रियाहि अध्यासांतील अनधिकारी मानल्या जात. तूर्त चार वर्णांपलीकडे पोटजाती व वृत्तीबंधन झाल्या होत्या.

परिशिष्टे २ – महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे इंग्रजीतील हस्ताक्षर

Liberal Religion in India
Its i principles ii methods iii works.
History


Liberal Religion is an essential characteristic of modern civilized life. It is a reconciliation of the two apparently conflicting principles of human mind viz. Faith & Reason. Nowhere in the whole civilized world, not even excepting England & America, is this paradoxical phenomena of the Spirit – this mysterious harmony – showing more vivacity & vigour, than in India. It is there not a mere imported foreign product. It is decidedly & admittedly indigenous. Of course it would be ingratitude to say that India ows nothing in this respect. But what she owes to the West is only the purifying & fertilizing showers of Rationalism. The soil as well as the seeds of the vegetation are purely Indian & the whole growth is thriving in an Indian atmosphere. Long before the birth of modern civilization

परिशिष्टे ३ – महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे वाईच्या ब्राम्होसमाजास आलेले पत्र (दि.१५.०३.१९३७)



प्रेम.

वि. रा. शिंदे

# परिशिष्टे ४ – करवीर छत्रपती घराण्याचा वंशवृक्ष



## परिशिष्टे ५ –राजर्षी शाहू महाराजांचे हस्ताक्षर



उगार गाडीत बसतांना रंगा करून
कोणास पाडू नको जेवते वेळीं
सर्व मुलींना बरोबर घेऊन जेवीत
जा. सर्व मुलींनी चहा घेतल्यानंतर
तू चहा घेत जा. जेवते वेळीं
सर्व मुलींचा समाचार घेत जा.
सर्व मुलींनी व नोकर लोकांनी
तुझ्यावर प्रेम करावे अशा रीतीने
त्यांना वागवीत जा. कपट करूं नको.


आपल्या मुलीस

"वाडवडिलां सेवीत जावें ॥ सकलींशीं नम्र व्हावें ॥
पतीकोपीं नम्र असावें ॥ सेवकांवरी सदय व्हावें ॥
निजधर्मीं दृढ राहावें ॥ भाग्य येतां मत्त न व्हावें ॥
ऐशा लक्षणीं गृहिणी म्हणती ॥ इतरा कुळव्याधीच
होती ॥


कोल्हापूर कॅम्प
पुणें
११/१२/२०

असा उपदेश केला आहे तो
ध्यानात ठेवून वागत जावे.
कळावे सप्रेम लोभाची वृद्धी असो

परिशिष्टे ६ – राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रयत्नातून सुरू झालेली कोल्हापूरातील रेल्वे व हत्तीची साठमारी हा शिकारीतील धाडशी प्रकार



कोल्हापूर रेल्वे स्थानक
राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नातून कोल्हापुरात रेल्वे सुरू झाली



हत्तीची साठमारी - एक धाडसी क्रीडाप्रकार

परिशिष्टे ७ – वाई येथील ब्राम्हो समाज मंदिर व पुणे येथील निवासस्थान रामविहार



वाई येथील ब्राह्मसमाज मंदिर



पुणे येथील निवासस्थान – रामविहार

**परिशिष्टे ८ –**

**भेटी दिलेल्या संस्था व ठिकाणे**

१) पुरातत्व विभाग पुणे

२) जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे

३) भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे

४) पुराभिलेखागार विभाग, कोल्हापूर

५) राजर्षी शाहू महाराज रिसर्च सेंटर कोल्हापूर

६) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

७) श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

८) शासकीय विभागीय ग्रंथालय, विश्रामबागवाडा, पुणे.

९) जिल्हा ग्रंथालय पुणे

१०) बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डिप्रेस्ड क्लास मिशन संस्थेविषयी मुलाखत देणाऱ्या व्यक्तींची नावे**

१) शेख इकाबल जहांगीर, मुख्याध्यापक, म.न.पा.शाळा नानापेठ पुणे शहर

२) तायडे संभाजी सुदाम, प्रभारी प्राचार्य, पुणे शहर

३) शेवाळे मधुकर धर्माजी, जनरल सेक्रेटरी, डी.सी.एम. सोसायटी, पुणे महाराष्ट्र

४) प्रा.म्हस्के जे.के., पुणे शहर

५) मानिक दशरथ, नाना पेठ, पुणे

**राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या वसतिगृहासंबंधी घेतलेल्या मुलाखती**

१) मुजावर मुस्ताक चाँदसो, सिनीयर लिपीक, मोहमेडन मुस्लिम बोर्डिंग, कोल्हापूर

२) चौगुले आर.अे., अधिक्षक, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर

३) कांबळे राजाराम वसंत, अधिक्षक, श्री इंदुमती विद्यार्थी वसतिगृह, कोल्हापूर

४) विणकरे सुधाकर संभाजी, अधिक्षक, मिस क्लार्क होस्टेल, कोल्हापूर

५) भोपळे पाटील संजय महादेव, अधिक्षक, श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राम्हण विद्यार्थी वसतिगृह, दसरा चौक, कोल्हापूर


६) चौले डी.आर., अधिक्षक, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, कोल्हापूर




कोल्हापूर जिल्हयाचा नकाशा

राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते मुरगूड धरण तलावाचे उद्घाटन व जनतेचा मानपत्र समारंभ

(दि.६ फेब्रुवारी १९२२)




राजर्षी शाहू महाराजांच्या उपस्थितीत कर्नाटक ब्राम्हणेत्तर सामाजिक परिषद. (२० मे १९२०)




कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेत धारवाड, कर्नाटक व महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्यांसह सत्पुरुष सिद्धारूढ स्वामी (हुबळी) आणि शाहूमहाराज. स्वामींच्या उजव्या बाजूस सर त्यागराज चेट्टी (?), छत्रपतींच्या डाव्या बाजूस मिस्टर मेणाशिनकाई (?) व बाबूराव यादव.

राजर्षी शाहू महाराज इंग्लडमधील वास्तव्यात दरबारी पोषाखात असताना






शिक्षण घेतेवेळचे राजर्षी शाहू महाराज



सर एस.एम.फ्रेझर, शाहू महाराजाचे गुरू




डोक्यावर फेटा नाही असा महर्षी शिंदे यांचा दुर्मीळ फोटो



प्रार्थनासमाजाचे प्रचारक शिंदे



मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड



मँचेस्टर कॉलेज ऑक्सफर्डमध्ये अध्ययन करीत असताना



मँचेस्टर कॉलेज, ऑक्सफर्ड प्राध्यापक व सहाध्यायांसमवेत



दारूबंदी मोहिमेच्या सभेत डॉ. भांडारकर, लो. टिळक, ह. ना. आपटे, डॉ. हॅरॉल्ड मॅन यांच्यासमवेत म. शिंदे
१९०७



डी. सी. एम. सोसायटीच्या अहिल्याश्रम येथील मुख्य शाळेच्या इमारतीचा कोनशिला समारंभ
१९२३



डी. सी. मिशन संस्थेतील एक बक्षीस समारंभ



बोरगाव (ता. वाळवे) येथील शेतकरी परिषदेत भाषण करीत असताना, १९३१



रयत शिक्षणसंस्थेतील आजीव सेवकांना शपथ देण्याचा समारंभ, १९३७




महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आई-वडील व ज्येष्ठ मुलगा


(छायाचित्र श्री. घोरपडे गुरूजी यांच्या सौजन्याने)




दरबारी मंडळींसमवेत राजर्षी शाहू महाराज



न्यू पॅलेस - कसबा बावडा, कोल्हापूर




क्रीडाशौकिन शाहू महाराजांनी खास कुस्तीसाठी उभारलेले
वैशिष्ट्यपूर्ण खासबाग मैदान



राजर्षी शाहू महाराजांचा ध्यास - राधानगरी धरणाची निर्मिती



शालिनी पॅलेस, कोल्हापूर




संध्यामठ - रंकाळा तलाव, कोल्हापूर





कोठावळे बागेतील वनोपासना



वाई प्रार्थना संघ, प्रथम वार्षिकोत्सव, १९३७



गंगाराम कांबळे

अस्पृश्य समाजातील पुढारी, राजर्षी शाहू महाराजांच्या आज्ञेने कोल्हापूर येथे 'सत्यसुधारक हॉटेल', काढले. तसेच कोल्हापूर येथे राजर्षी शाहू महाराजांचे पहिले स्मारक यांनी उभारले.



मिस क्लार्क